# श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०१/२००८** **दिनांक १०.०१.२००८**

**स्थळ - शिर्डी कार्यालय** **वेळ- दुपारी २.३० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शिर्डी येथे गुरुवार दिनांक १० जानेवारी, २००८ रोजी आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४-१६०-२००८,दि.२.१.२००८ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते. परंतू काही अपरिहार्य कारणास्तव या सभेचे वेळेत बदल करण्यात येऊन सदरहू सभा गुरुवार दिनांक १० जानेवारी, २००८ दुपारी २.३० वाजेऐवजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आली असलेबाबत सर्व सदस्यांना दूरध्वनी व समक्ष तोंडी कळविण्यात आले, त्यानुसार सदरहू सभा गुरुवार दिनांक १० जानेवारी, २००८ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात मा. अध्यक्ष श्री. जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | मा. श्री. जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष | ०२. | मा.श्री.शंकरराव गेणुजी कोल्हे,उपाध्यक्ष |
| ०३. | मा.श्री.राधाकृष्ण एकनाथराव विखेपाटील | ०४. | मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग |
| ०५. | मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे | ०६. | मा.श्रीमती उर्मिला प्रदिप जाधव |
| ०७. | मा.श्रीमती रिम्पल लोहिया | ०८. | मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर |
| ०९. | मा.श्री.रमाकांत गणेश कर्णिक | १०. | मा.कॅप्टन सुरेख वासुदेवा |
| ११. | मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर | १२. | मा.श्री.कृष्णचंद्र श्यामसुंदर पांण्डेय |
| १३. | मा.सौ.सुमित्रा कैलास कोते | | |

मा.श्री.भाऊसाहेब रा.वाकचौरे
कार्यकारी अधिकारी.

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा. अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत, मा.श्री समि खतीब, यांनी फॅक्स पत्राद्वारे तसेच मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे, मा.डॉ.पी.एल.तिवारी, यांनी दूरध्वनीवरुन कळविले त्याची नोंद घेण्यात आली व समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१ दिनांक २२.०९.२००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे**

**निर्णय क्र.०१** दिनांक २२.०९.२००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना पूरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेत असताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या.

**(०१) निर्णय क्र.७३९ मधील शेवटचा परिच्छेद-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, शासनाकडून स्पष्ट आदेश प्राप्त होईपर्यन्त, वरीलप्रमाणे कर्मचाऱ्यांचे मागणीप्रमाणे शिक्षणशुल्क समितीने निश्चित केलेल्या शैक्षणिक शुल्काचा परतावा देण्यात यावा. जेथे शिक्षण शुल्क समितीने शुल्क निश्चित केलेली नाही त्या ठिकाणी शासन/ शासनमान्य विद्यापीठ यांनी ठरविलेले शिक्षण शुल्क विचारात घ्यावे. इतरत्र पूर्वीचे नियमाप्रमाणे परतावा देण्यात यावा. तसेच सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षापासून अनुत्तीर्ण पाल्याचे शैक्षणिक फीचा परतावा फक्त त्या वर्षापुरता देणेत येऊ नये, असे ठरले.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

यावर सविस्तर चर्चा होऊन, शासनाकडून स्पष्ट आदेश प्राप्त होईपर्यन्त, वरीलप्रमाणे कर्मचाऱ्यांचे मागणीप्रमाणे शिक्षणशुल्क समितीने निश्चित केलेल्या शैक्षणिक शुल्काचा परतावा **सन २००४-०५ पासून** देण्यात यावा. जेथे शिक्षण शुल्क समितीने शुल्क निश्चित केलेली नाही त्या ठिकाणी शासन/शासनमान्य विद्यापीठ यांनी ठरविलेले शिक्षण शुल्क विचारात घ्यावे. इतरत्र पूर्वीचे नियमाप्रमाणे परतावा देण्यात यावा. तसेच सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षापासून अनुत्तीर्ण पाल्याचे शैक्षणिक फीचा परतावा फक्त त्या वर्षापुरता देणेत येऊ नये, असे ठरले. (कार्यवाही -प्रशासनशाखा-०३)

**(०२) निर्णय क्र.७६८ मध्ये-**

**(ड)** ०२. सदरहू कामांसाठी आर्किटेक्ट डि.ओ.निकम,पुणे यांची साईआश्रम प्रकल्पाचे मंजूर आर्किटेक्ट फीच्या दरामध्ये नेमणूक करणेस मान्यता देण्यात आली.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**(ड)** ०२. सदरहू कामांसाठी आर्किटेक्ट डि.ओ.निकम,पुणे यांची साईआश्रम प्रकल्पाचे मंजूर आर्किटेक्ट १ % फीच्या दरामध्ये नेमणूक करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**(०३)** व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त पुढील सभेत कायम झालेनंतर कार्यवाही सुरु करणेत येते. त्यामुळे झालेल्या निर्णयानुसार प्रत्यक्ष काम सुरु होऊन पूर्ण होण्यास अगर अंमलबजावणीस बराच उशीर होतो. यापुढे अशाप्रकारे इतिवृत्त पुढील सभेत कायम होण्याची वाट न पहाता इतिवृत्त मा.अध्यक्ष यांनी मान्य केल्यानंतर लगेच प्रशासनाने सर्व संबंधित विभागांना त्याची प्रत पाठवून कार्यवाही सुरु व्हावी तसेच व्यवस्थापन समितीचे सभेत झालेल्या निर्णयाची अंमलबजावणी करणेकामी संबंधित उपसमितीनेही पाठपुरावा करावा. इतिवृत्त व्यवस्थान समितीचे पुढील सभेपुढे नोंद घेणेसाठी सादर करीत जावे.

(कार्यवाही- सर्व प्र.अ./सर्व खातेप्रमुख)

यानंतर सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

**विषय नं.०२ दिनांक १४.१०.२००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे**

**निर्णय क्र.०२** दिनांक १४.१०.२००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना पूरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

**विषय नं.०३ दिनांक १८.११.२००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे**

**निर्णय क्र.०३** दिनांक १८.११.२००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना पूरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

**विषय नं.०४ दिनांक ०८.१२.२००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.०४** दिनांक ०८.१२.२००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना पूरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेत असताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या.

**(०१) निर्णय क्र.७९२ मधील शेवटचा परिच्छेद -**

यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्तकामी एकच निविदा प्राप्त झाल्याने याकामी फेरनिविदा मागविण्यात याव्यात असे ठरले.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्तकामी मे.युनिव्हर्सल केमिकल्स,नाशिक यांचे नविन दर स्वीकारण्यास व याकामी येणारे रक्कम रुपये ९३,८८५०.५० चे जादा खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**(०२) निर्णय क्र.८३१ मधील शेवटचा परिच्छेद-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री एस.बी. पटणे यांना कोर्ट केस मागे घेणेकामी कन्सेंट अफिडेव्हीट (समझोता प्रतिज्ञापत्र)करुन देऊन कोर्ट केस मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथून काढून घेणेकामी जानेवारी-२००८ अखेर लेखी मुदत देण्यात यावी. या कालावधीत त्यांनी कन्सेंट अफिडेव्हीट (समझोता प्रतिज्ञापत्र) दाखल करुन कोर्ट केस मागे घेणेबाबत पूर्तता न केल्यास त्यांचेबाबत फेरप्रस्ताव व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे सादर करावा.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री एस.बी. पटणे यांना कोर्ट केस मागे घेणेकामी कन्सेंट अफिडेव्हीट (समझोता प्रतिज्ञापत्र)करुन देऊन कोर्ट केस मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथून काढून घेणेकामी जानेवारी-२००८ अखेर लेखी मुदत देण्यात यावी. या कालावधीत त्यांनी कन्सेंट अफिडेव्हीट (समझोता प्रतिज्ञापत्र) दाखल करुन कोर्ट केस मागे घेणेबाबत पूर्तता न केल्यास त्यांचेबाबत श्री.आर.एन.धोर्डे,हायकोर्ट ॲडव्होकेट,औरंगाबाद यांचा सल्ला घेऊन, पुढील कार्यवाही करण्यात यावी, असें ठरलें.

(कार्यवाही-कामगार अधिकारी)

**(०३) निर्णय क्र.८३२ मधील शेवटचा परिच्छेद-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री मच्छिंद्र दिगंबर धनेश्वर यांना कोर्ट केस मागे घेणेकामी कन्सेंट अफिडेव्हीट (समझोता प्रतिज्ञापत्र)करुन देऊन कोर्ट केस मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथून काढून घेणेकामी जानेवारी-२००८ अखेर लेखी मुदत देण्यात यावी. या कालावधीत त्यांनी कन्सेंट अफिडेव्हीट (समझोता प्रतिज्ञापत्र) दाखल करुन कोर्ट केस मागे घेणेबाबत पूर्तता न केल्यास त्यांचेबाबत फेरप्रस्ताव व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे सादर करावा.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री मच्छिंद्र दिगंबर धनेश्वर यांना कोर्ट केस मागे घेणेकामी कन्सेंट अफिडेव्हीट (समझोता प्रतिज्ञापत्र)करुन देऊन कोर्ट केस मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथून काढून घेणेकामी जानेवारी-२००८ अखेर लेखी मुदत देण्यात यावी. या कालावधीत त्यांनी कन्सेंट

अफिडेव्हीट (समझोता प्रतिज्ञापत्र) दाखल करुन कोर्ट केस मागे घेणेबाबत पूर्तता न केल्यास त्यांचेबाबत श्री.आर.एन.धोर्डे,हायकोर्ट ॲडव्होकेट,औरंगाबाद यांचा सल्ला घेऊन, पुढील कार्यवाही करण्यात यावी, असें ठरलें. (कार्यवाही-कामगार अधिकारी)

**(०४) निर्णय क्र.८३३मधील शेवटचा परिच्छेद-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.देवराम जयराम थोरात, लिपीक-टंकलेखक यांना कोर्ट केस मागे घेणेकामी कन्सेंट अफिडेव्हीट (समझोता प्रतिज्ञापत्र)करुन देऊन कोर्ट केस मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथून काढून घेणेकामी जानेवारी-२००८ अखेर लेखी मुदत देण्यात यावी. या कालावधीत त्यांनी कन्सेंट अफिडेव्हीट (समझोता प्रतिज्ञापत्र) दाखल करुन कोर्ट केस मागे घेणेबाबत पूर्तता न केल्यास त्यांचेबाबत फेरप्रस्ताव व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे सादर करावा.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.देवराम जयराम थोरात, लिपीक-टंकलेखक यांना कोर्ट केस मागे घेणेकामी कन्सेंट अफिडेव्हीट (समझोता प्रतिज्ञापत्र)करुन देऊन कोर्ट केस मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथून काढून घेणेकामी जानेवारी-२००८ अखेर लेखी मुदत देण्यात यावी. या कालावधीत त्यांनी कन्सेंट अफिडेव्हीट (समझोता प्रतिज्ञापत्र) दाखल करुन कोर्ट केस मागे घेणेबाबत पूर्तता न केल्यास त्यांचेबाबत श्री.आर.एन.धोर्डे,हायकोर्ट ॲडव्होकेट,औरंगाबाद यांचा सल्ला घेऊन, पुढील कार्यवाही करण्यात यावी, असें ठरलें. (कार्यवाही-कामगार अधिकारी)

यानंतर सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

**विषय नं.०५ दिनांक १४.१०.२००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या छाननी समिती सभेचे इतिवृत्त**

**निर्णय क्र.०५** दिनांक १४.१०.२००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या छाननी समिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन या इतिवृत्तातील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

"श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,अधिनियम-४ चे कलम नं.२१ (२) पोटकलम (१) मध्ये निर्देश केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेश तरतूदी केल्यानंतर आणि विश्वस्तव्यवस्थेच्या निधित, शिल्लक राहीली असल्यास, अशा शिल्लक रक्कमेचा, विश्वस्तव्यवस्थेच्या वितरण योग्य उत्पन्नाच्या ३० टक्केपेक्षा अधिक नसेल येवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल.

**(एक)** राज्य शासनाच्या पूर्व मंजूरीने एखादया नोंदणीकृत सार्वजनीक विश्वस्तव्यवस्था,किंवा नोंदणीकृत सोसायटी यांचेकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रिडा अकादमी वा संस्था,सार्वजनीक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रीत अथवा शारीरीक दृष्टया विकलांग व्यक्तीसाठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करुन घेण्यासाठी अथवा कला वा साहित्य क्षेत्राशी संबंधीत असलेली एखादी नोंदणीकृत सार्वजनीक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून अन्य कोणत्याही बिगर-वाणिज्यिक सांस्कृतीक संघटनेची स्थापना व देखभाल करुन घेण्यासाठी : किंवा

**(दोन)** स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानाच्या सोयींमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगर पंचायतीला सहाय्य करण्यासाठी :

परंतु, राज्य शासन या पोट - कलमाच्या प्रयोजनार्थ,मुंबई उच्च न्यायालयाचे पूर्व मान्यतेने नियुक्त केलेल्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधिशाच्या अध्यक्षतेखाली , असा अध्यक्ष आणि समितीच्या सदस्यांनी त्यांच्यामधून निवडून दिलेले दोन सदस्य अशा एकूण तीन सदस्यांची मिळून बनलेली एक छाननी समिती स्थापन करील : आणि या छाननी समितीचा कालावधी समितीच्या कालावधीबरोबरच संपेल :

परंतू आणखी असे की, छाननी समिती आपल्या सभांचे आयोजन करण्यासाठी व कामकाज पहाण्यासाठी आणि या अधिनियमाखालील आपले कार्य पार पाडण्यासाठी विनियम तयार करील तसेच संस्थान विश्वस्त व्यवस्थेकडून वित्त सहाय्य मिळविण्यासाठी या अधिनियमाखाली विविध नोंदणीकृत सार्वजनिक धर्मादाय विश्वस्तव्यवस्थांकडून समितीला प्राप्त झालेल्या अर्जाची शिफारस करण्यासाठी माणके निर्धारित करण्याच्या दृष्टीने मुंबई उच्च न्यायालयाने केवल आर.सेमलानी यांच्या प्रकरणामधील रिट विनंती अर्ज क्र.२००३ चा २७६४ यामध्ये दिलेले निर्देश आणि मार्गदर्शक तत्वे यांना अनुरुप अशी मार्गदर्शक तत्वे तयार करुन ती प्रकाशित करील.

व्यवस्थापन समितीचे दि.२७.१२.२००४ चे सभेतील निर्णय क्र.१२९ अन्वये छाननी समितीबाबत खालीलप्रमाणे निर्णय पारित झालेला आहे.

"संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडे वित्तीय सहाय्य मिळविणेसाठी विविध नोंदणीकृत सार्वजनिक धर्मादाय विश्वस्तव्यवस्थेकडून समितीला प्राप्त झालेल्या अर्जाची शिफारस करण्यासाठी मानके निर्धारित करण्याच्या दृष्टीने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम- २००४ मधील कलम २१/२ (एक व दोन) मध्ये नमूद असलेल्या प्रयोजनांसाठी शासनातर्फे मुबई उच्च न्यायालयाच्या निवृत्त

न्यायाधिशाच्या अध्यक्षतेखाली, आणि समितीच्या सदस्यांनी त्यांच्यामधून निवडून दिलेले इतर दोन सदस्य अशी एकूण तीन सदस्यांची मिळून बनलेली छाननी समिती स्थापन करील, आणि तिचा कालावधी समितीच्या कालावधीबरोबरच संपेल.

सदर छाननी समितीमध्ये व्यवस्थापन समितीतील दोन सदस्य सर्वश्री मा.आमदार ज.मु.ससाणे, अध्यक्ष व माजी आमदार मा.श्री.शंकरराव गेणूजी कोल्हे,उपाध्यक्ष यांची नियुक्ती करण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले, तशी शिफारस शासनास करण्यात यावी.

यानंतर शासन निर्णय क्र.सासंवि २००५/९११(१२७)/का.सोळा, मंत्रालय, मुंबई-३२,दि.२६ जुलै,२००७ चे पत्रान्वये मा.न्यायमुर्ती ए.एस.भाटे (सेवानिवृत्त) यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर पत्राची व्यवस्थापन समितीचे दि.११.८.२००७ चे सभेत निर्णय क्र.६८७ अन्वये नोंद घेऊन मान्यता देण्यात आलेली आहे, सदर कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.

सन, २००४-०५, २००५-०६, २००६-०७ या आर्थिक वर्षात श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्थेमार्फत वाटप करण्यात आलेले आर्थिक अनुदानाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

सन, २००४-०५, २००५-०६, २००६-०७ या आर्थिक वर्षात श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्थेमार्फत वाटप करण्यात आलेले आर्थिक अनुदानाची माहिती समक्ष देणेत आली. तसेच चालु २००७-०८सालामध्ये १४.१०.२००७ अखेर ८.४९ कोटी इतके आर्थिक अनुदान देण्यात आले आहे, त्याची नोंद घेण्यात आली.

श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,अधिनियम-४ चे कलम नं.२१ (२) पोटकलम (१) मध्ये निर्देश केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतूदी केल्यानंतर आणि विश्वस्तव्यवस्थेच्या निधित शिल्लक राहीली असल्यास,अशा शिल्लक रक्कमेचा, विश्वस्तव्यवस्थेच्या वितरण योग्य उत्पन्नाच्या ३० टक्केपेक्षा अधिक नसेल येवढा भाग,समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल, अशी तरतूद आहे. परंतू शासनाचे मान्यतेने ३० टक्केपेक्षा जास्त प्रमाणात अनुदान देण्यात आलेले असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे समितीचे अधिकारात चालू वर्षी सन २००७-०८ करिता अनुदान वाटपासाठी रक्कम शिल्लक नाही. त्यामुळे २००७-०८ मध्ये छाननी समितीची सभा बोलाविण्याची आवश्यकता नाही. ज्यावेळी ही रक्कम उपलब्ध होईल त्यावेळी ही सभा बोलविण्यात यावी, असे मा.अध्यक्ष श्री. ए.एस. भाटे यांनी सांगितले. यावर श्री.ससाणे, अध्यक्ष- व्यवस्थापन समिती यांनी वरीलप्रमाणे दिलेल्या अनुदानामध्ये संस्थानचे अधिनियम कलम १७ (ण) नुसार दिलेल्या अनुदानाच्या समावेश असल्याचे निदर्शनास आणून दिले. अशा प्रकारे दिलेले अनुदान, तपासणी करुन वरील रकमेतून कमी करुन सदर तरतूदीनुसार देय अनुदानाबाबत तपशीलवार माहिती सादर करावी, अशा सूचना मुख्य लेखाधिकारी यांना देण्यात आल्या, त्याची नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**<u>मा.श्री.सुधाकर जोशी, निवृत्त आय.ए.एस.,पुणे यांनी तयार केलेले छाननी समितीचे प्रारुप विनियम-</u>**

मा.श्री.सुधाकर जोशी, निवृत्त आय.ए.एस., पुणे यांनी तयार केलेले छाननी समितीचे प्रारुप विनियमाचा मसुदा अध्यक्ष व सदस्यांना पुरविण्यात आला होता, त्याची नोंद घेण्यात आली. सदरहू मसुदयाचा अभ्यास करुन आवश्यक सुधारणा करुन पुढील सभेत सादर करण्यात यावा, असे ठरले.

**विषय नं.०६** **दिनांक ११.०८.२००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे आस्थापना उपसमिती सभेचे इतिवृत्त**

**विषय नं.०६** वेळेअभावी सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.०७** **दिनांक ०४.१०.२००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.०७** दिनांक ०४.१०.२००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन या इतिवृत्तातील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

**(०१) श्री पुण्यतिथी उत्सव २००७ करीता कलाकार कार्यक्रम निश्चित करणे बाबत.**

श्रीपुण्यतिथी उत्सव शनिवार, दि.२०/१०/२००७ ते मंगळवार, दि.२३/१०/२००७ अखेर साजरा होणार असून त्यात सहभागी होणा-या किर्तनकार व कलाकार यांची पत्रे आलेली आहेत, त्यांचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | कलाकार/कीर्तनकारांचे नांव व पत्ता | तपशील | कलाकार संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | जी लक्ष्मण मुर्ती, प्लॉट नं.१, एमसीएच-४४२, एसबीआय ऑफीसर्स कॉलनी, बाग अंबरपेट, हैद्राबाद-१३ (आं.प्र.) | भक्तीगीत कार्यक्रम | ०६ | मानधन १,१०१/- व जाण्या-येण्याचे भाडे |
| ०२. | बी बिंदुमाधवी, कला नृत्य निकेतन, प्लॉट नं.४१, ललिथा नगर, अदिकमेट, हैद्राबाद-(आं.प्र) | कुचिपुडी नृत्य कार्यक्रम | १० | मानधन रु. ५,०००/- |
| ०३. | श्री भोलानाथ रा समेळ, ३/१५, एकविरा सदन, ३४ बि मुगभाट क्रॉस लेन, गिरगांव, मुंबई-०४ मो.नं.९२२४२८७३०८ | भक्तीगीत कार्यक्रम | ०६ | गाडीभाडेसह रु. १५,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०४. | श्री के.व्ही सत्यनारायणा, के.व्ही.एस वृंदावनम्, गांधी नगर, एलुरु-५३४ ००२, | कुचिपुडी नृत्य कार्यक्रम | १८ | मानधन रु.२५,०००/- + गाडी भाडे रु. ८,०००/- एकूण रु. ३३,०००/- |
| ०५. | श्री संजय सी कुलकर्णी, संचालक, स्वरांजली संगीत विद्यालय, सावळीविहीर, शेतकी फार्म, सौ.कल्पना माने, संचालीका, शामकर्ण, सामाजिक प्रतिष्ठाण, व नादब्रम्ह संगीत विद्यालय, शिर्डी | सांस्कृतिक कार्यक्रम | २८ | मानधन रु.०५,०००/- |
| ०६. | श्री अभय माणके, शांता कारम्, ११६९-बी-७१ नं.स्कीम, इंदौर - ०४५२ ००७, | भक्ती गीत कार्यक्रम | ०५ | रु.१०,०००/- व गाडी भाडे |
| ०७. | श्री विजय साखरकर, दत्तनिवास, चाळ नं.२/१०, देवीपाडा, मच्छिमार्केट समोर, बोरिवली(पू,), मुंबई - ६६ | साई-स्वर नृत्योत्सव कार्यक्रम | १५ | संस्थान नियमानुसार. |
| ०८. | श्री अनिल पाटनी, कोमल स्पर्श, जैन मंदिर रोड, कमाल का कुआ, भीलवाडा-३११ ००१(राजस्थान), | भवाई नृत्य कार्यक्रम | ०५ | मानधन रु.११,०००/- व गाडीभाडे- रु.७,०००/- एकूण रु.१८,०००/- |
| ०९. | श्री.आर.के.सक्सेना, ९०३, टाईप-४, लक्ष्मीबाई नगर, आय.एन.ए. मार्केटसमोर, न्यु-दिल्ली-११००२३ | साई-भजन कार्यक्रम | | मानधन रु.१५,०००/- |
| १०. | ए.अनंतलक्ष्मी, (ए.रविकुमार) द्वारा-कॅनरा बँक, नारायणपुरम्, रामबिल्ली, डिमीली, विझाग, | गायन कार्यक्रम | २५ | |
| ११. | श्री भागवतुला सेथु राम, असि.प्रोफेसर, एच नं.२-२-११२३/९ जे न्यु नालाकुंटा, हैद्राबाद, | कुचीपुडी नृत्य कार्यक्रम | २० | मानधन रु.२५,०००/- |
| १२. | श्री विनायक दादाजी जाधव, कला साई नाट्य संस्था, सप्तर्षी मळा, मडकर हॉस्पीटलजवळ, ,कोपरगांव मो.नं.९४२३०३८८३० | पुत्र कामेष्टी किंवा शामची धमाल समाज प्रबोधनपर नाटक. | २२ | मानधन रु. ३५,०००/- |
| १३. | ह.भ.प.शरद महाराज नेरलकर, द्वारा-श्री सिध्दी विनायक मंदिर, पाठक गल्ली, नांदेड, | किर्तन कार्यक्रम | ०२ | संस्थान नियमानुसार |
| १४. | ह.भ.प.गंगाधरबुवा व्यास, साईसदन, बि.नं.१, तिसरा मजला, मढवी हायस्कुलजवळ,जुना आयरे रोड, डोंबीवली(पु), मुंबई | किर्तन कार्यक्रम | ०३ | संस्थान नियमानुसार |

उपरोक्त प्रमाणे अ.नं. १ ते १२ कलाकारांची व अ.नं. १३ ते १४ किर्तनकारांची उत्सवात सहभागी होणेकामी पत्रे आलेली आहेत. त्यातील दि.२२/१०/२००७ रोजी एकादशी असलेने एकादशीचे किर्तन असते, उर्वरीत तीन दिवसासाठी कलाकारांची निश्चिती होणे आवश्यक आहे. सदर कालावधीत पाऊस येणेची शक्यता असलेने कार्यक्रम समाधी मंदिराशेजारील स्टेजवर करीत असतो. उपरोक्तपैकी खालील दर्शविलेले कार्यक्रम व किर्तनकार यांचे कार्यक्रम आयोजित करणेस मान्यता असावी.

| अ.नं. | कलाकाराचे नांव व पत्ता | कार्यक्रमाचा तपशील | मानधन | दिनांक |
|---|---|---|---|---|
| ०१. | ह.भ.प.शरद महाराज नेरलकर, द्वारा-श्री सिध्दी विनायक मंदिर, पाठक गल्ली, नांदेड, | किर्तन कार्यक्रम | संस्थान नियमानुसार. | २०/१०/२००७ ते २३/१०/२००७ |
| ०२. | श्री भोलानाथ रा समेळ, ३/१५, एकविरा सदन, ३४ बि मुगभाट क्रॉस लेन, गिरगांव, मुंबई-०४ | भक्तीगीत कार्यक्रम | गाडीभाडेसह रु.१५,०००/- | दि.२०/१०/२००७ |
| ०३. | श्री.आर.के.सक्सेना, ९०३, टाईप-४, लक्ष्मीबाई नगर, आय.एन.ए. मार्केटसमोर, न्यु-दिल्ली-११००२३ | साई-भजन कार्यक्रम | मानधन रु.१५,०००/- | मुख्य दिवशी दि.२१/१०/२००७ |
| ०४. | श्री विजय साखरकर, दत्तनिवास, चाळ नं.२/१०, देवीपाडा, मच्छिमार्केट समोर, बोरिवली(पू,), मुंबई | साई-स्वर नृत्योत्सव कार्यक्रम | संस्थान नियमानुसार. | दि.२३/१०/२००७ |

अ.नं.५ मधील श्री संजय सी कुलकर्णी, संचालक, स्वरांजली संगीत विद्यालय, सावळी विहीर व सौ. कल्पना माने, संचालिका, नादब्रम्ह संगीत विद्यालय, शिर्डी, यांचे संयुक्त विद्यमाने श्री पुण्यतिथी उत्सवात सांस्कृतिक कार्यक्रम सादर करणेस परवानगी मागितलेली आहे, सदरचे स्थानिक कलाकार असून त्यांना प्रोत्साहन देणेकामी संबंधीतांचा सांस्कृतिक कार्यक्रम श्री पुण्यतिथी उत्सवाचे अगोदर म्हणजे शुक्रवार, दि.१९/१०/२००७ रोजी रात्रौ ७.३० ते ९.३० असा कार्यक्रम देणेस हरकत नाही, असे नम्र मत आहे. त्यांचे एकूण २८ कलाकार असून संबंधीतांनी रु.५,०००/- इतके मानधन मागितलेले आहे, तथापि त्यांना मानधनाची अपेक्षा नाही, त्यांना श्री साईचरणी कार्यक्रम सादर करावयाचा आहे.

तसेच अ.नं.१२ मधील श्री विनायक दादाजी जाधव, कला साई नाट्य संस्था, कोपरगांव, यांनी श्री पुण्यतिथी उत्सवात कोणत्याही एका दिवशी पुत्र कामेष्टी किंवा शामची धमाल समाज प्रबोधनपर नाटक सादर करणेस संधी द्यावी, अशी विनंती केलेली आहे, सदरचे पत्रास मा.श्री.अशोक भि.खांबेकर,विश्वस्त, शिफारस केलेली असून त्यांना रु.२५,०००/- इतके मानधन देणेबाबत कळविले आहे. तथापि पुत्र कामेष्टी हा नाट्य प्रयोग यापुर्वी कोपरगांवचेच कलावंतांनी सादर केलेला आहे. शामची धमाल हा नाट्य प्रयोग सादर करणेबाबत तसेच मानधनाबाबत निर्णय घ्यावा लागेल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, खालीलप्रमाणे कार्यक्रम निश्चित करण्यात यावे अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

**अ) किर्तन कार्यक्रम-**

ह.भ.प.शरद महाराज नेरलकर यांचा श्री पुण्यतिथी उत्सव-२००७ मध्ये किर्तनकार्यक्रम ठेवण्यात यावा.

**ब) कलाकार कार्यक्रम-**

| अ.नं. | दिनांक | कलाकाराचे नांव व कार्यक्रम | कार्यक्रमाचे स्वरुप | द्यावयाचे मानधन |
|---|---|---|---|---|
| ०१ | २०.१०.२००७ | श्री भोलानाथ रा समेळ, ३/१५, एकविरा सदन, ३४ बि मुगभाट क्रॉस लेन, गिरगांव, मुंबई-०४ | भक्तीगीत कार्यक्रम | गाडीभाडेसह रु.१५,०००/- |
| ०२ | २१.१०.२००७ | श्री संजय सी कुलकर्णी, संचालक, स्वरांजली संगीत विद्यालय, सावळी विहीर व सौ. कल्पना माने, संचालिका, नादब्रम्ह संगीत विद्यालय, शिर्डी, यांचे संयुक्त विद्यमाने | सांस्कृतिक कार्यक्रम | गाडीभाडेसह रुपये ५,०००/- |
| ०३ | २३.१०.२००७ दु.३.०० ते ५.०० | श्री विजय साखरकर, दत्तनिवास, चाळ नं.२/१०, देवीपाडा, मच्छिमार्केट समोर, बोरिवली(पू,), मुंबई | साई-स्वर नृत्योत्सव कार्यक्रम | गाडी भाडेसह एकत्रित रुपये १२,५००/- |
| | २३.१०.२००७ सायं. ७.३० ते ९.३० | श्री.आर.के.सक्सेना, ९०३, टाईप-४, लक्ष्मीबाई नगर, आय.एन.ए. मार्केटसमोर, न्यु-दिल्ली-११००२३ | साई-भजन कार्यक्रम | मानधन रु.१५,०००/- |
| ०४ | २३.१०.२००७ सायं. ७.३० ते ९.३० | श्री किरण परिख स्वरसाधना,कोपरगांव | "वन मॅन शो" कार्यक्रम | मानधन रु.११,०००/- |

(कार्यवाही-प्रशासन शाखा,वशी-०५)

**(०२) दसरा (पुण्यतिथी ) उत्सव -२००७ करीता मंडप टाकणेकामी आलेले कोटेशन्स उघडून निर्णय घेणे बाबत**

श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी तर्फे यंदाचा दसरा ( पुण्यतिथी ) उत्सव २००७ शनिवार दिनांक २०/१०/२००७ ते मंगळवार दिनांक २३/१०/२००७ अखेर चार दिवस साजरा करण्यात येणार आहे. साईभक्तांचे सोयीसुविधांसाठी मंदिर परीसरात, साईनगर, धर्मशाळा, भक्तनिवासस्थान व प्रसादालय परिसरात विविध ठिकाणी खालीलप्रमाणे मंडप उभारणे आवश्यक आहे.

**( रंगित सुशोभित कापड, वरिल बाजूस पत्रा, मंडपाचे साईडनी वरिल बाजुस ३ फुटापर्यंत कापड )**

**अ) मंदिर परीसरातील मंडप:-**

| अ.नं. | (अ) मंडप तपशिल | चौरस फुट |
|---|---|---|
| ०१ | समाधी मंदिर उत्तर बाजू चावडी गेट ते नगरव्दार गेट २८४'x २०' जाड कापडाचा उंची १८' फुट असलेला मंडप | ५६८०.०० |
| ०२ | समाधि मंदिर दक्षिण बाजु द्वारकामाई ते नगरद्वार गेट पर्यत. १८' x ६००' उंची १८' असावी. | १०८००.०० |
| ०३ | श्री गुरुस्थान मंदिर (निंबवृक्षाच्या) पश्चिम बाजु ६०'x २०' दक्षिणोत्तर (१५' ते १८' उंची) | १२००.०० |
| ०४ | श्री गुरुस्थान मंदिर पुर्व बाजु ६०'x २०' दक्षिणोत्तर जाड कापडाचा पुरेशी उंची असलेला मंडप | १२००.०० |
| ०५ | `श्री ` चे चावडी समोर ४०'x ३५' (१५' ते १८' उंची ) | १४००.०० |
| ०६ | लेंडीबागेतील मंडप वरिल बाजूने पत्रा असलेला मंडप (कमीत कमी १५' उंची)<br>अ) दत्त मंदिर मागील बाजु - ३५'X ५०'<br>ब) दत्त मंदिर समोरील बाजु -७५'X४०' | १७५०.००<br>३०००.०० |
| ०७<br>A) | समाधी मंदिरा शेजारील स्टेज करीता<br>१) मेकअप रुम २२'x१०'<br>२) मेकअप रुम पत्रा १८' x१६' | २२०.००<br>२८८.०० |
| B) | स्टेजवरील मंडप ४०' x २०' | ८००.०० |
| C) | स्टेजच्या बाजुो मंडप १०' x १०' | १००.०० |
| D) | मेकअप रुम पार्टीशन ७०' x ८' | ५६०.०० |
| E) | स्टेजसमोर मंडप ६०'x ४०' | २४००.०० |
| ०८ | समाधी मंदिराचे पुर्वेकडील जागेत ( जूनी जिल्हा परिषद शाळेजवळ) (१८'उंची)<br>१) २१०'x ७०'<br>२) स्टेज ३०'x २०' | १४७००.००<br>६००.०० |
| ०९ | लाडु काउंटर समोर ४०'x ३०' (१८' उंची) | १२००.०० |
| | **एकुण चौ. फुट.** | **४५८९८.००** |

**ब) i) प्रसादालय परीसर, साईनगर परिसर, धर्मशाळा, नविन भक्तनिवासस्थान व इतर ठिकाणचे मंडप:-**

| | | |
|---|---|---|
| ०१ | प्रसादालय तिकीट काऊंटर समोर (बिछायतीसह) जेवण रेलिंग पुर्व / पश्चिम बाजु १२२' x ४२' | ५१२४.०० |
| ०२ | जेवण शेड पुर्व बाजु - ७०'X६०'= ४२००(बिछायतीसह) - ४०'x२०'= ८०० | ५०००.०० |
| ०३ | प्रसादालय बुकींग काउंटर पश्चिम बाजू ४५'x२५' | ११२५.०० |

| | | |
|---|---|---|
| | पार्टीशन १३५'x१०' | १३५०.०० |
| ०४ | प्रसादालय पश्चिम बाजू ४०' x २५' (पश्चिम बाजू बुफेसाठी) कनातीसह | १०००.०० |
| ०५ | व्हीआयपी साठी प्रसादालय हॉल नं.२मध्ये पार्टीशन १००'x८' | ८००.०० |
| ०६ | स्वयंसेवी पार्टीशन १५०'x १०' | १५००.०० |
| ०७ | साई उदयान ४५'x६०' | २७००.०० |
| ०८ | कन्या शाळा समोरील लॉनवर १५०'x ६०' ( बिछायतीसह) | ९०००.०० |
| ०९ | धर्मशाळा परिसर<br>१) पश्चिम बाजू १२०'x१२०' (बिछायत व कनातीसह )<br>२) ऑफीस समोर ४५'x६०' | <br>१४४००.००<br>२७००.०० |
| १० | साईनगर परिसर (बिछायती व कनातीसह)<br>१) १०५'x१०५'<br>२) ९०'x२१०'<br>३) ७५'x१५०'<br>४) ६०'x१२०' | <br>११०२५.००<br>१८९००.००<br>११२५०.००<br>७२००.०० |
| ११ | नविन भक्तनिवासस्थान ( ५०० रुम) वाहन पार्किंगचे ठिकाणी ४५'x३९०' ( बिछायत व कनतीसह ) गादया ७०० नग सह | १७५५०.०० |
| १२ | साईनाथ हायस्कुल ६०'x१००' (बिछायती व कनातीसह) | ६०००.०० |
| १३ | साईप्रसाद नं.२ समोर चौकशी कार्यालयासमोर १५ फुट उंची असलेला १५' x ६०' | ९००.०० |
| १४ | प्रसादालय पार्किंग गांव जेवणासाठी १२ ते १५ फुट उंची असलेला ( बिछायत व कनतीसह )<br>१३०'x ९०'<br>७५'x ३५' | <br>११७००.००<br>२६२५.०० |
| | | १,३१,८४९.०० |
| | **एकुण चौ. फुट ( अ + ब) =** | १,७७,७४७ |

याकामी पत्र्याचे छत व सुशोभित कापड व बिछायतीसह मंडप उभारणेकामी अंदाजे रुपये आठ लक्ष मात्रचे खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे दि. २२/०९/२००७ चे सभेत मान्यता देण्यात आली आहे. याकामी पत्र्याचे तसेच मोठ्या प्रमाणावर मंडप बांधण्याचे साहित्य असलेल्या कैलास डेकोरेटर्स, नगर कातुरे मंडप, पुणे शर्मा मंडप, वैजापूर यांचेकडून तसेच इतर ही अशा प्रकारे काम करणाऱ्या मंडप ठेकेदार यांचेकडून कोटेशन मागविणेस मान्यता देण्यात आली आहे.

याकामी अहमदनगर, पुणे, औरंगाबाद येथील खालील मंडप ठेकेदार यांना कोटेशन्स / दरपत्रक सादर करणे बाबत इकडील जा.नं. १५५७६ दि.२९/०९/२००७ चे पत्रान्वये दिनांक ०१/१०/२००७ रोजी दुपारी ०३ वाजेपर्यंत सिलबंद पाकिटात सादर करणेबाबत कळविण्यात आले होते.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | श्री. बी. एम कातुरे, पुणे | ०२ | शर्मा मंडप, वैजापूर |
| ०३ | कैलास मंडप डेकोरेटर्स, अहमदनगर | ०४ | चौरे मंडप डेकोरेटर्स, पुणे |
| ०५ | ताठे मंडप डेकोरेटर्स, पुणे | ०६ | मुथ्था डेकोरेटर्स, अ.नगर |

उपरोक्त पैकी खालील ०३ ही मंडप निविदासादरकर्त्यांनी कोटेशन्स / दरपत्रक उशीरा म्हणजेच दि. ०२/१०/२००७ रोजी प्राप्त झालेले आहेत.

०१. कैलास मंडप डेकोरेटर्स, अहमदनगर
०२. शर्मा मंडप, वैजापूर
०३. ताठे मंडप डेकोरेटर्स, पुणे

उपरोक्त प्राप्त झालेली ०३ ही कोटेशन्स/दरपत्रके आजचे सभेत उघडून मंडप ठेकेदाराशी समक्ष चर्चा/वाटाघाटी केली असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | कोटेशनसादरकर्त्याचे नाव | कोटेशन मधील दर प्र.चौ.फुट रुपये | | वाटाघाटीअंती देऊ केलेले दर प्र.चौ.फुट रुपये | |
|---|---|---|---|---|---|
| | | पत्रा मंडप | प्लॅस्टिक ताडपत्री मंडप | पत्रा मंडप | प्लॅस्टिक ताडपत्री मंडप |
| ०१. | मे.कैलास डेकोरेटर्स, अहमदनगर | १३.०० | ६.०० | ९.५० | ---- |
| ०२. | मे.शर्मा मंडप,वैजापुर | ६.०० | ५.०० | ६.०० | ---- |
| ०३ | मे.ताठे मंडप डेकोरेटर्स,पुणे | १३.६१ | --- | ९.०० | ---- |

यावर सविस्तर चर्चा होऊन, निविदेमधील एकूण १,७७,७४७ चौ.फूट मंडपापैकी "अ"मधील अ.न.१ ते ५ व अ.नं.७ ते ११ वगळून आवश्यक असलेल्या ५८,९,८७ चौ.फूट मंडप व ३२० र.फू. पार्टीशन अशा प्रकारे मंडपाची उभारणी करण्यात यावी असे ठरले.

याकामी ठेकेदारांशी चर्चा/वाटाघाटी केली असता मे.शर्मा मंडप डेकोरेटर्स,वैजापूर यांचे दर स्विकारण्यात यावे व पार्टीशनचे काम त्यांनी समक्ष चर्चेत देऊ केलेल्या रुपये ८/-प्रती रनिंग फुट या दराने करुन घेण्यात यावे, तसेच याव्यतिरिक्त आवश्यकता भासल्यास वाढीव मंडपाचे काम मे.शर्मा मंडप, वैजापूर यांचे दरात इतर ठेकेदारांकडून करुन घेण्यात यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**(०३) नवीन प्रसादालय लॅण्डस्केपींग करणेसाठी कारंजा व इरिगेशन सिस्टीमचे आलेले कोटेशन उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे**

श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीचे मा.व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयान्वये श्रीक्षेत्र शिर्डी येथे भेट देणा-या साईभक्तांना प्रसाद भोजनाची सुविधा मिळणेकामी अदयावत प्रसादालय इमारतीचे काम पुर्ण होत आले आहे.

नविन प्रसादालय इमारत व परिसर यास शोभेल असे लॅन्डस्केपींग ( गार्डन) करण्याचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत ठरले आहे.यासाठी लॅन्डस्केप आर्किटेक्ट श्रीमती.अमृता पवार,नाशिक यांनी याकामी आराखडा व एस्टीमेट रु.३५,८५,१८०.०० खर्चाचे सादर केले होते.या बाबत दि.२९/०६/२००७ रोजीचे बैठकित चर्चा होवुने इलेक्ट्रीफीकेशन काम संबंधित विभागामार्फत सध्याचे विद्युत ठेकेदाराकडून मंजूर निविदा दरात करुन घेण्यात यावे .तसेच बगीचा व फौंटनचे काम संबधिंत विभागामार्फत निविदा अथवा कोटेशन्स मागवून करण्यात यावे .सिव्हील वर्क व वॉटर सप्लायचे काम आय.व्ही.आर.सी.एल याचे कडून त्यांचे मंजूर निविदा दरात करुन घ्यावे .त्यासाठी येणारे योग्य त्या खर्चास मंजूरी देण्यात आलेली आहे.

सदरचे टेंडर मध्ये सुशोभिकरणासाठी पाण्याचा कारंजा व लॅन्डस्केपींगच्या झाडांना पाणी देणेसाठी इरिगेशन सिस्टीम नमुद केलेली आहे. पाण्याच्या कारंजा साठी रु.१,००,०००/- ची व इरिगेशन सिस्टीम साठी रु.२२,९६०/-अशी एकूण रुपये रुपये १,२२,९६०/- ची तरतूद केलेली असून, पाण्याचा कारंजा व इरिगेशन सिस्टीम याकामी कोटेशन मागविण्यात आले होते. व्यवस्थापन समितीचे दिनांक २२.९.२००७ चे सभेत ठरलेप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन त्याचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले आहेत.

| अ.नं. | कोटेशनसादरकर्त्याचे नाव | पाण्याच्या कारंजा कामी देऊ केलेले दर रुपये | इरिगेशन सिस्टीम कामी देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | रेणूका टेड्रींग कं, नाशिक | ६,८६,८०.०० | ३,००,९२९.०० |
| ०२. | गजानन मशिनरी स्टोअर्स,नाशिक | ७,५८,५००.०० | ३,४५,६९९.०० |
| ०३ | जगताप इलेट्रिकल्स,नाशिक | ७,८६,२५०.०० | ३,३९,८८४.०० |

उपरोक्त कोटेशन्स हे नविन प्रसादालयाचे दर्शनीभाग व पाठीमागील भागात कारंजा उभारणीकामी मागविण्यात आले असून, चर्चेदरम्यान प्रसादालयाचे पाठीमागील भागात कारंजा न करता फक्त दर्शनीभागातच कारंजा उभारण्यात यावा, असे सभेचे मत पडले. त्यामुळे वरील तक्त्यातील दर हे जास्त वाटत असल्याने कोटेशनसादरकर्त्यांना एकत्रित सभेपुढे बोलविण्यात येऊन, फक्त दर्शनी भागातच कारंजा उभारणी करावयाची असल्याने, याकामी सुधारीत कोटेशन्स मागवून निर्णय घेण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**(०४) ड्रेनेज चेंबरवरील झाकणे खरेदीकामी कोटेशन्सधारकांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे**

मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २८/०७/२००७ चे सभेतील निर्णय क्रं. ६२६ नुसार पाणी पुरवठा विभागासाठी प्रसादालय, मंदिर परिसर, धर्मशाळा स्टाफ क्वॉर्टर, शैक्षनिक संकूल, धर्मशाळा-नांदुर्खी रोड इ. ठिकाणची चेंबर झाकणे फुटलेली असल्याने तेथे नविन झाकणे टाकणेसाठी नविन झ ााकणे कोटेशन मागवून खरेदी करणेकरीता अंदाजे एकुण रुपये २,३१,४८९/- मात्रचे खर्चास मंजुरी देण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे सदरची झाकणे खरेदी करणेकरीता कोटेशन मागविण्यात आली. त्यानुसार प्राप्त झालेले खालीलप्रमाणे कोटेशन्स मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २२/०९/२००७ चे सभेत समक्ष उघडण्यात आली.

| अ.नं. | कोटेशन्स धारकाचे नांव |
|---|---|
| ०१ | ऋषिकेश इलेक्ट्रिकल्स, नाशिक. |
| ०२ | अमित कॉंक्रिट वर्क्स, कोकमठाण (कोपरगांव). |
| ०३ | स्वदर्शन इलेक्ट्रिकल्स, नाशिक. |

या कोटेशनचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे .

| अ.नं | तपशिल | ऋषिकेश इलेक्ट्रिकल्स, नाशिक | अमित कॉंक्रिट वर्क्स, कोकमठाण (कोपरगांव) | स्वदर्शन इलेक्ट्रिकल्स, नाशिक |
|---|---|---|---|---|
| ०१ | २१" x २४" - मेडियम / २४" x २४" - मेडियम | रु. ९८५/- | रु. ८११.०० | रु. ९३३.०० |
| ०२ | ३६" x ३६ "- मेडियम | रु. १७१०.०० | रु. १६३३.०० | रु. १७९६.०० |
| ०३ | २४" x ३६"- मेडियम | रु. १२०५.०० | रु. १०८४.०० | रु. ११९२.०० |
| ०४ | १८" x १५"- मेडियम LD/ १८" x १८"- मेडियम LD | रु. ५००.०० | रु. ४०८.०० | रु. ४४८.०० |
| ०५ | ३६" x ४८"- हेवी | रु. ३७००.०० | रु. ३५००.०० | रु. ३८५०.०० |
| ०६ | १८" x १८"- मेडियम LD | रु. ५००.०० | रु. ४०८.०० | रु. ४४८.०० |
| ०७ | २४" x ३६"- हेवी | रु. १७५०.०० | रु. १६४३.०० | रु. १८०७.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०८ | १८" x ३६"- मेडियम | रु. ९००.०० | रु. ८४२.०० | रु. ९२६.०० |
| ०९ | १२" x १२"- मेडियम LD | रु. २५०.०० | रु. १९७.०० | रु. २१७.०० |
| १० | २१" x ३६"- मेडियम / २४" x ३६"- मेडियम | रु. १२०५.०० | रु. १०८४.०० | रु. ११९२.०० |
| ११ | २४" x १८"- मेडियम | रु. ७१०.०० | रु. ६३४.०० | रु. ६९७.०० |
| १२ | १२" x १८"- मेडियम LD | किंमत नाही. | रु. ३००.०० | किंमत नाही. |
| १३ | २४" x २४"- मेडियम | रु. ९८५.०० | रु. ८११.०० | रु. ९३३.०० |
| १४ | ३६" x ३८"- हेवी / ३६" x ३६"- हेवी | रु. २६००.०० | रु. २३२६.०० | रु. २५५८.०० |
| १५ | ३६" x ४८"-मेडियम HD | रु. ३७००.०० | रु. ३५००.०० | रु. ३८५०.०० |

उपरोक्त कोटेशन सादरकर्त्यांना आजचे सभेत समक्ष चर्चा / वाटाघाटी करीता बोलविण्यात आले होते परंतू ऋषिकेश इलेक्ट्रिकल्स,नाशिक यांनी त्यांचे दिनांक ४.१०.२००७ रोजी फॅक्स पत्र पाठवून देऊ केलेले दरात कोणताही बदल नसलेबाबत कळविले आहे तसेच स्वदर्शन इलेक्ट्रिकल्स, नाशिक यांनी फॅक्स पत्राव्दारे त्यांनी देऊ केलेल्या दरात ०.५% सुट देऊ केलेली आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, अमित कॉंक्रिट वर्क्स, कोकमठाण यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-पाणीपुरवठा विभाग प्रमुख)

**(०५) कनकुरी साठवण तलाव येथे ५० एच.पी. इलेक्ट्रीक मोटार व पॅनेल बसविणेकामी कोटेशन्सधारकांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे**

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २८.०७.२००७ चे सभेतील निर्णय क्रं. ५९६ (१०) नुसार लुबी कंपनीच्या ०२ नग ५० एच.पी. मोटारी खरेदी करणेसाठी अंदाजे रु. १,५०,०००/- व मोटारीकरीता लागणारा मोटार स्टार्टर पॅनल खरेदी करणेकरीता अंदाजे रु. १,३८,१३९/- मात्र व इतर आवश्यक मटेरियल खरेदी करावे लागणार असल्याने त्यासह येणारे अंदाजे एकुण रु. ३,३५,४०६/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे सदरच्या लुबी कंपनीच्या ०२ नग ५० एच.पी. मोटारी खरेदी करणेकरीता कोटेशन मागविण्यात आली. त्यानुसार प्राप्त झालेले खालीलप्रमाणे कोटेशन्स मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २२/०९/२००७ चे सभेत समक्ष उघडण्यात आली.

| अ.नं. | कोटेशन्स धारकाचे नांव |
|---|---|
| ०१ | अनुराधा ॲग्रो सर्व्हिस, लोणी |
| ०२ | भनसाळी मोटर्स, राहाता. |
| ०३ | अनुराधा ॲग्रो एजन्सी, अकोले. |
| ०४ | सिध्दार्थ ट्रेडर्स, कोल्हार. |

या कोटेशन्सचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो आजचे सभेत सर्व सदस्यांना पुरविण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते.

| अ.नं. | कोटेशनकर्त्याचे नांव | ५० एच.पी. - ४१५ होल्ट, K.W.-३७ कंपनी- लुबी मॉडेल- L.B.F.-१२५, ४ Stage मोटार डिसचार्ज - २२०० L.P.M. पाणबुडी किंवा ओपनवेल (Total Head-६० मीटर) |
|---|---|---|
| ०१ | **अनुराधा ॲग्रो सर्व्हिस, लोणी.** | |
| | कोटेशनमधील दर | रु.५२,८८४.६२ + ४% वॅट |
| | चर्चा/वाटाघाटीनंतरचे दर | रु.५२,८८४.६२ + ४% वॅट |
| ०२ | **भनसाळी मोटर्स, राहाता.** | |
| | कोटेशनमधील दर | रु. ६१,०००.०० वॅटसह. |
| | चर्चा/वाटाघाटीनंतरचे दर | रु. ६१,०००.०० वॅटसह. |
| ०३ | **अनुराधा ॲग्रो एजन्सी, अकोले.** | |
| | कोटेशनमधील दर | रु.५७,७२५.०० वॅटचा उल्लेख नाही. |
| | चर्चा/वाटाघाटीनंतरचे दर | अनुपस्थित |
| ०४ | **सिध्दार्थ ट्रेडर्स, कोल्हार.** | |
| | कोटेशनमधील दर | रु.५६,६५०.००वॅटचा उल्लेख नाही. |
| | चर्चा/वाटाघाटीनंतरचे दर | अनुपस्थित |

उपरोक्त कोटेशन्समध्ये मे.भनसाळी मोटर्स,राहाता यांचे दर मे.अनुराधा ॲग्रो सर्व्हीस लोणी यांचे दरापेक्षा जास्त आहे. मे.अनुराधा ॲग्रो सर्व्हीस लोणी यांनी देऊ केलेले दर LBF-१२५ हे उभ्या पाणबुडी मोटारीचे आहे. परंतू मे.भनसाळी मोटर्स,राहाता हे लुबी कंपनीचे अधिकृत डिलर असून ते कंपनीकडून संस्थानकरीता विशेष प्रकारचे LBF-१२५ हे आडवे मॉडेल तयार करुन देणार असल्याने

त्यांचे दर जरी जास्त असले तरी त्यांचे दर स्विकारणेत येऊन त्यांना मोटार पुरविणेबाबत पुरवठा आदेश देण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-पाणीपुरवठा विभाग प्रमुख)

**(०६) ३" पी.व्ही.सी.पाईप खरेदीकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडणे बाबत.**

नविन प्रसादालयाचे काम अंतिम टप्प्यात आहे. नविन प्रसादालय परिसरात बगीचा विभागामार्फत बगीचा डेव्हलप करणे प्रस्तावित आहे. त्याकरिता पाण्याची गरज भासणार आहे. संस्थानचा वाढता परिसर त्यात पाण्याची टंचाई लक्षात घेता पिण्याच्या पाण्यातून बगीचा विभागासाठी ते पिण्याचे पाणी देता येणार नाही. त्याकरीता ओव्हरहेड टाकी जवळ संस्थानची विहीर आहे. त्या विहीरीवरुन नविन प्रसादालय येथे पाईप लाईन टाकल्यास ते पाणी बगीचासाठी वापरता येईल. ओव्हर हेड टँक ते प्रसादालय हे अंतर अंदाजे ४५५० फुट आहे. (अंदाजे १४०० मीटर) ही पी.व्ही.सी.पाईप लाईन ओव्हरहेड टँक ते प्रसादालय अशी टाकावयाची असल्याने त्या पाईपलाईनच्या नालीतून ही पाईपलाईन टाकता येईल. तेंव्हा नाली खोदाई खर्च येणार नाही. त्याकरिता खालीलप्रमाणे पी.व्ही.सी.पाईप व मटेरिअल खरेदी करावे लागेल. सदर पाईपचे मटेरिअल कोटेशन मागवून खरेदी करणेकरिता अंदाजे एकूण रुपये १,०५,१४४/- मात्रचे खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे दि.२२.९.२००७ चे सभेत मंजूरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार सदरचे मटेरिअल खरेदीकामी खालीलप्रमाणे कोटेशन्स प्राप्त झाले आहेत.

| अ.नं. | कोटेशनसादरकर्त्याचे नाव |
|---|---|
| ०१. | नितीन इलेक्ट्रिकल्स, राहाता |
| ०२. | अनुराधा ॲग्रो एजन्सी,अकोले |
| ०३. | सिध्दार्थ ट्रेडर्स,कोल्हार |
| ०४. | अनुराधा ॲग्रो सर्व्हीस,लोणी |
| ०५. | भनसाळी मोटर्स,साकुरी-राहाता |
| ०६. | मिर्लींद सेल्स कार्पोरेशन,अहमदनगर (ओपन कोटेशन) |

वरीलप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत उघडण्यात असता कोटेशनसादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | कोटेशनसादरकर्त्याचे नाव | तपशील | कोटेशन मधील दर प्रती नग रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | नितीन इलेक्ट्रिकल्स, राहाता | पीव्हीसी पाईप ३" फिनोलेक्स कं. | ३९५.०० |
| | | पीव्हीसी बेंड ३" | ७०.०० |
| | | पीव्हीसी टी ३" | ६०.०० |
| | | टेलपीस (पुर्ण सेटसह) | १८०.०० |
| | | पीव्हीसी गेट व्हॉल्व ३" | २८०.०० |
| | | फ्लॅंज टाईप गेटव्हॉल्व ३" | २४५०.०० |
| ०२. | अनुराधा ॲग्रो एजन्सी,अकोले | पीव्हीसी पाईप ३" फिनोलेक्स कं. | ४०८.०० |
| | | पीव्हीसी बेंड ३" | ४०.०० |
| | | पीव्हीसी टी ३" | ७५.०० |
| | | टेलपीस (पुर्ण सेटसह) | ३०.०० |
| | | पीव्हीसी गेट व्हॉल्व ३" | -- |
| | | फ्लॅंज टाईप गेटव्हॉल्व ३" | २२००.०० |
| ०३. | सिध्दार्थ ट्रेडर्स,कोल्हार | पीव्हीसी पाईप ३" फिनोलेक्स कं. | ३९१.००+४% व्हॅट =४०६.६४ |
| | | पीव्हीसी बेंड ३" | ३९.००+४% व्हॅट =४०.५६ |
| | | पीव्हीसी टी ३" | ७०.००+४% व्हॅट =७२.८० |
| | | टेलपीस (पुर्ण सेटसह) | ३०.००+४% व्हॅट =३१.२० |
| | | पीव्हीसी गेट व्हॉल्व ३" | -- |
| | | फ्लॅंज टाईप गेटव्हॉल्व ३" | २१५०.००+४% व्हॅट =२२३६.०० |
| ०४. | अनुराधा ॲग्रो सर्व्हीस,लोणी | पीव्हीसी पाईप ३" फिनोलेक्स कं. | ३८८.००+४% व्हॅट =४०३.५२ |
| | | पीव्हीसी बेंड ३" | ३७.००+४% व्हॅट =३८.४८ |
| | | पीव्हीसी टी ३" | ६८.००+४% व्हॅट =७०.७२ |
| | | टेलपीस (पुर्ण सेटसह) | २६.००+४% व्हॅट =२७.०४ |
| | | पीव्हीसी गेट व्हॉल्व ३" | -- |
| | | फ्लॅंज टाईप गेटव्हॉल्व ३" | २०००.००+४% व्हॅट =२०८०.०० |
| ०५. | भनसाळी मोटर्स,साकुरी-राहाता | पीव्हीसी पाईप ३" फिनोलेक्स कं. | ३९९.०० |
| | | पीव्हीसी बेंड ३" | ६०.०० |
| | | पीव्हीसी टी ३" | ११०.०० |
| | | टेलपीस (पुर्ण सेटसह) | १६०.०० |
| | | पीव्हीसी गेट व्हॉल्व ३" | ७५०.०० |
| | | फ्लॅंज टाईप गेटव्हॉल्व ३" | २२००.०० |
| ०६. | मिर्लींद सेल्स कार्पोरेशन,अहमदनगर | पीव्हीसी पाईप ३" फिनोलेक्स कं. | ३९५.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पीव्हीसी बेंड ३" | ६०.०० |
| | | पीव्हीसी टी ३" | ६०.०० |
| | | टेलपीस (पुर्ण सेटसह) | १००.०० |
| | | पीव्हीसी गेट व्हॉल्व ३" | ३५०.०० |
| | | फ्लॅंज टाईप गेटव्हॉल्व ३" | १८००.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, अ.नं.६ चे कोटेशनसादरकर्ते मे.मिलींद सेल्स कार्पोरेशन,अहमदनगर हे फिनोलेक्स कंपनीचे अधिकृत डिलर असल्याने त्यांचे दर मान्य करण्यात येऊन, त्यांना पी.व्ही.सी.पाईप व त्याअनुषंगिक मटेरिअल खरेदीकामी आदेश देण्यात यावा,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-पाणीपुरवठा विभाग प्रमुख)

**(०७) शववाहिका क्र.एमएच-१७-टी-७१३१ चे बॉडी दुरुस्ती कामाचे कोटेशन उघडणेबाबत.**

दिनांक २७/०८/२००७ रोजी संस्थान वाहन शववाहिका नं.एमएच-१७/टी-७१३१ साईबाबा हॉस्पिटल मधुन कै. विष्णु रूपचंदजी हिंदुजा यांची डेडबॉडी कटणी (मध्यप्रदेश) येथे सोडणे कामी सकाळी ०६.०० वाजता गेले होते. जातांना प्रवासात अकोला (बाळापुर) या शहराच्या पुढे साधारणत: १५-२० कि.मी. चे अंतरावर बोरगांव-मंजु या गावाजवळ वाहन पलटी होऊन अपघात झाला. दि.२९/०८/२००७ रोजी सकाळी ११.०० वाजता अपघातग्रस्त शववाहिका वाहन विभागात आणण्यात आलेली आहे.

मा.का.अ.कार्या.आवक नं.११८५०/दि.१७/०९/२००७ चे मंजुरीने सदर अपघातग्रस्त वाहनांचे दुरूस्ती कामाकरीता अंदाजे रू.१,५५,०००/- मात्र खर्च अपेक्षीत असलेने बॉडी बिल्डर्स यांचेकडुन कोटेशन बोलाविणेस व वाहन दुरूस्ती नंतर दुरूस्ती खर्चा बाबत इंन्शुरन्स क्लेम करणेस तसेच झालेल्या खर्चाचा प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेकरीता मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेस मान्यता मिळालेली आहे. सदर मान्यतेनुसार, जा.नं.एसएसएस/वाहन/१५०४३/ दि.१९/०९/२००७ ने खालील चार बॉडी बिल्डर्स यांचेकडुन कोटेशन मागविण्यात आलेली होती.

०१. श्री लक्ष्मी ॲटो बॉडी, नाशिक.
०२. खिरा बॉडी बिल्डर्स, पुणे.
०३. इन-कोच बिल्डर्स, मुंबई.
०४. शिवशक्ती इंजिनीअरींग वर्क्स, बाभळेश्वर

वरील बॉडी बिल्डर्स पैकी खालील प्रमाणे बॉडी बिल्डर्स यांनी कोटेशन पाठविलेली आहे.

०१. श्री लक्ष्मी ॲटो बॉडी, नाशिक.
०२. इन-कोच बिल्डर्स, मुंबई.
०३. शिवशक्ती इंजिनीअरींग वर्क्स, बाभळेश्वर

तरी वरील प्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन, कोटेशनसादरकर्त्यांशी समक्ष चर्चा/वाटाघाटी केली असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | कोटेशनसादरकर्त्यांचे नाव | देऊ केलेले दर रुपये | वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | श्री लक्ष्मी ॲटो बॉडी, नाशिक. | १,५५,०००.०० | १,४०,०००.०० |
| ०२ | इन-कोच बिल्डर्स, मुंबई. | २,७१,१२५.०० | अनुपस्थित |
| ०३ | शिवशक्ती इंजिनीअरींग वर्क्स, बाभळेश्वर | १,४२,७८०.०० | १,२५,०००.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन,शिवशक्ती इंजिनिअरींग वर्क्स,बाभळेश्वर यांचे निम्नतम दर स्विकारणेत यावेत. तसेच सदर शववाहिकेचे संपूर्ण बॉडी नविन करण्यात येऊन, त्याबदल्यात या गाडीचे जुने निघालेले मटेरिअल मे.शिवशक्ती इंजिनिअरिंग वर्क्स,बाभळेश्वर यांना मोफत देण्यात यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

**(०८) द्वारकामाई मंदिरात नवीन चांदीच्या पादुका बसविणेबाबत**

श्रींचे द्वारकामाई मंदिरामध्ये एकूण ०३ चांदीच्या पादुका स्थापीत केलेल्या आहेत. पैकी एक धुनी समोरील मखराजवळ, धुनीच्या बाजुस व श्रींच्या बसण्याच्या शिळेवर अशा एकूण ३ चांदीच्या पादुका बसविण्यात आलेल्या आहेत. यापैकी श्रींचे मखरा समोरील चांदीच्या पादुका खराब झालेल्या असून त्यापैकी एका पाऊलास छिद्र पडलेले आहे.

याकामी श्री. टकले बंधू, नाशिक यांचा अभिप्राय मागविण्यात आला आहे. श्री. टकले सराफ, नाशिक यांनी त्यांचे दि.१७.०८.२००७ रोजीचे अहवालात खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

०१. श्री द्वारकामाई मंदिराजवळील चांदीच्या पादुका वापरामुळे झिजल्या आहेत, त्या दुरुस्तीचे दृष्टीने योग्य वाटत नाहीत.

०२. या पादुका बदलून तेथे चांदीच्या पत्र्यावर बसविलेल्या ओतीव पादुका करणे योग्य ठरेल.

दि.२०.०८.२००७ रोजी श्री. टकले बंधू यांनी नवीन चांदीच्या पादुकासाठी लागणारा खर्च व मंजुरी याबाबत तपशिल दिलेला आहे तो खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | एकूण चांदीचे वजन | टंच | प्रति किलो दर | चांदी खर्च | एकूण मजूरी | एकूण रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ७.५०० किलो | ९८ | १७५३०/- | १३१४७५/- | ३४६५०/- | १६६१२५/- |

यापुर्वीच्या चांदीच्या पादुका श्री. टकले बंधू, नाशिक यांचेकडूनच बनविण्यात आल्या होत्या परंतू त्या वापरामुळे झिजल्या आहेत.

उपरोक्त नवीन पादुकासाठी लागणारी चांदी व मजुरीचा येणारा खर्च अंदाजे रुपये १,६६,१२५/- मात्र देणगी दाखल देण्यास श्री भूपेंद्रभाई यू. मेहता, मुंबई हे देण्यास तयार आहेत. तरी नवीन पादुका तयार करुन बसविणेस व याकामी देणगी स्विकारणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी तसेच या पादूकांवर सोन्याचा मुलामा देण्याबाबत संबंधित भक्तांना विनंती करण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-मंदीर विभाग प्रमुख)

**०९ श्रीसाईबाबा हॉस्पिटल,शिर्डी येथै अल्पोपहार(नाष्टा) व पेय पदार्थ बनवून उपलब्ध करुन देणेबाबत प्राप्त झालेल्या निविदा उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे**

श्रीसाईबाबा हॉस्पिटल, शिरडी येथे अल्पोपहार (नाष्टा) व पेय पदार्थ बनवून उपलब्ध करुन देणे बाबत दि.२५/०४/२००७ चे टिप्पनी अन्वये विहित पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन फेर निविदा मागविण्यास मंजुरी मिळालेली आहे.

त्यानुसार कॅन्टीन चालवण्यास देणेबाबत गावकरी, नाशिक व लोकमत, नगर या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.१०/०५/२००७ ते दि.२०/०५/२००७ अखेर संस्थानचे शिर्डी व मुंबई येथील कार्यालयात निविदा विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या व निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत दि.२२/०५/२००७ अखेर ठेवण्यात आली होती. शिर्डी येथील कार्यालयात ५ निविदा विक्री साठी ठेवण्यात आल्या होत्या व मुंबई येथील कार्यालयात ५ निविदा विक्री साठी ठेवण्यात आल्या होत्या. त्यातील शिर्डी येथील कार्यालयात ४ निविदांची विक्री झालेली आहे तर मुंबई येथील कार्यालयात एकही निविदांची विक्री झालेली नाही. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे दोन निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

०१.मे. विराज केटर्स, अहमदनगर.

०२. मे. सुशीलकुमार ओझा, इंदौर.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन निविदासादकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीमध्ये निविदासादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव | निविदेत देऊ केलेली रक्कम रु. | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेली रक्कम रुपये (दरमहा) |
|---|---|---|---|
| ०१. | मे. विराज केटर्स, अहमदनगर. | ३१,००१.०० | ३१,००१.०० |
| ०२. | मे. सुशीलकुमार ओझा, इंदौर. | २८,०००.०० | ३५,०००.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.सुशीलकुमार ओझा,इंदौर यांची उच्चतम दराची निविदा स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**(१०) Philips 2-D Echo मशिनसाठी IMS Software Colour Printer खरेदीकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडून निर्णय घेणे.**

दि. ३१/०३/२००७ चे मा. वैद्यकीय समिती Cathlab विभागासाठी IMS सॉफ्टवेअर व कलर प्रिंटर खरेदीचा अंदाजे खर्च रु. ८०,०००/- चा प्रस्ताव मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. त्यावर चर्चा होऊन सदर खरेदी हि विहित पध्दतीने कोटेशन मागवुन करण्यात यावी असे ठरले.

त्यानुसार इकडील पत्र क्र. ६३८२ दि. २०/०४/२००७ अन्वये एकुण ६ अधिकृत विक्रेत्यांकडुन दि.३०/०४/२००७ अखेर कोटेशन मागविण्यात आले आहेत. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे तीन बंद कोटेशन प्राप्त झालेले आहेत.

०१. मे. स्नॅझी सर्व्हिसेस, औरंगाबाद

०२. मे. युनीव्हर्सल ट्रेडर्स, पुणे

०३. मे. मेडसायनाप्टीक प्रा. लि., पुणे

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| S.N. | Item Description | Qty | Universal Traders, Pune | Snazzy Services & Software, Aurangabad | Medsynaptic Pvt. Ltd.,Pune | Total Amt. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | IMS Software | 1 | | 46018.40 | <u>**40000.00**</u> | <u>**40000.00**</u> |
| 2 | Colour Printer | 1 | (A) 79750.00 for model 3800 (DN) dual Network Laser Jet. | 50508.00 Laser Jet 3800 | <u>**45000.00 Laser Jet 3800**</u> | <u>**45000.00**</u> |
| | | | (B) 68750.00 for model 3800 (N) Network Laser Jet. | | | |
| | | | (C) 52750.00 for model 3800 Laser Jet. | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | **Total Amt.in Rs. -** | **85000.00** |

वरील प्रमाणे तुलनात्मक दरातील तक्त्यानुसार IMS सॉप्टवेअर व कलर प्रिंटरसाठी मे. मेडसायनाप्टीक प्रा. लि., पुणे यांचे दर हे निम्नतम आहेत. त्यानुसार सदरचे IMS सॉप्टवेअर व कलर प्रिंटर खरेदीकामी रु.८५,०००/- इतका खर्च येणार आहे.

तरी मे. मेडसायनाप्टीक प्रा. लि., पुणे यांचेकडून IMS सॉप्टवेअर व कलर प्रिंटर खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु.८५,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**(११) जनरल ओ.टी मध्ये लाईट सोर्स केबल व क्वाटरी केबल खरेदीकामी प्राप्त झालेले कोटेशन उघडून निर्णय घेणे.**

श्रीसाईबाबा रुग्णालयातील जनरल ओ. टी. विभागात लॅप्रोस्कोपीच्या शस्त्रक्रियेसाठी लाईट सोर्स व क्वाटरी केबलची आवश्यकता असते. सदर लाईट सोर्स व क्वाटरी केबलची जनरल ओ. टी. विभागाने डि. पी. क्र. ८३ व ८४ दि. २५/०१/२००७ अन्वये मागणी केली होती.

त्यानुसार उपरोक्त लाईट सोर्स व क्वाटरी केबल विहित पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदी करण्याच्या व याकामी येणाऱ्या रु. ६१,८४१/- चे खर्चाचा प्रस्ताव दि.३१/०३/२००७ रोजीचे मा. वैद्यकिय समिती सभेमध्ये ठेवण्यात आला होता. यावर चर्चा होऊन उपरोक्त लाईट सोर्स व क्वाटरी केबल कोटेशन मागवुन खरेदी करण्यात यावे, असे ठरले.

त्यानुसार इकडील पत्र क्र. ६०२८ दि.१६/०४/२००७ अन्वये एकुण ०८ पुरवठा धारकांकडुन दि. ३०/०४/२००७ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे ३ बंद कोटेशन प्राप्त झालेले आहेत.

०१.मे. ऑल इंडीया सर्जीकल, मंबई

०२.मे. चिमको बायो-मेडीकल इंजि.कं., मंबई.

०३. मे. कालेलकर सर्जीकल इंडस्ट्रीज, मंबई.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| S.N. | Item Description | Qty | Kalelkar Surgicals , Mumbai | Chimco Bio-medical , Mumbai | The All India Surgical, Mumbai | Total Amt. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Fiberoptic Light Source Cable | 1 | -- | **41951.250**<br>**Karl Storz** | 4050.000<br>Size 3.5mmX180cm Long. | **41951.25** |
| | | | | | 4500.000<br>Size 4.5mmX230cm Long. | |
| 2 | Biopolar Cautery Cable | 2 | **1237.500** | 6592.500 | 281.250 | **2475.00** |
| 3 | Unipolar Cautery Cable | 2 | **1096.875** | 3352.500 | 281.250 | **2193.75** |
| | | | | | **Total Amt.in Rs. -** | **46620.00** |

आपल्याकडे कार्ल स्टोअर्ज या कंपनीचे लॅप्रोस्कोप इन्स्ट्रुमेंट आहेत त्यासाठी कार्ल स्टोअर्ज या कंपनीचा लाईट सोर्स घ्यावा लागणार आहे. कार्ल स्टोअर्ज या कंपनीचे लाईट सोर्स करीता मे.चिमको बायोमेडीकल इंजि. कं., मुंबई यांनीच फक्त दर दिलेले आहे, तेंव्हा सदर लाईट सोर्स मे.चिमको बायोमेडीकल इंजि. कं., मुंबई यांचेकडून खरेदी करावा लागणार आहे. तर क्वाटरी केबल साठी मे.कालेलकर सर्जिकल, मुंबई यांच्या केबल उत्कृष्ट दर्जाच्या असल्यामुळे तेथे त्यांची शिफारस करण्यात आलेली आहे.

त्यानुसार सदरचे लाईट सोर्स खरेदीकामी रु.४१९५१.२५ तर सदरच्या प्रत्येकी २ नग क्वाटरी केबलसाठी ४६६८.७५/- इतका खर्च येणार आहे. त्यानुसार सदरचे खरेदीकामी रु.४६६२०/- इतका खर्च येणार आहे.

तरी मे.चिमको बायोमेडीकल इंजि. कं., मुंबई यांचेकडून लाईट सोर्स तर मे.कालेलकर सर्जिकल, मुंबई यांचेकडून क्वाटरी केबल खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या एकूण रु.४६,६२०/-चे खर्चास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस आहे.

**(१२) लाईट सोर्स केबलसह खरेदीकामी प्राप्त झालेले कोटेशन उघडून निर्णय घेणे.**

श्री साईबाबा रुग्णालयातील ई. एन. टी. सर्जन डॉ. टंडन यांनी ई. एन. टी. च्या काही दैनंदिन नाजुक शस्त्रक्रिया करणेसाठी आवश्यक असणाऱ्या लाईट सोर्स केबलची मागणी केली होती.

त्यानुसार उपरोक्त लाईट सोर्स केबलसह खरेदीकामीचा रु. २४,८६२,५०/- चा प्रस्ताव मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता.

मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने इकडील पत्र क्र. ३०८२ दि. २७/०२/२००७ अन्वये एकुण ८ पुरवठा धारकांकडुन दि. ०२/०३/२००७ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे ३ कोटेशन प्राप्त झालेले आहेत

०१.मे. चिमको बायो-मेडीकल इं जि. कं., मुंबई.
०२.मे. कालेलकर सर्जिकल, मुंबई. (उघडलेल्या स्थितीत प्राप्त कोटेशन)
०३.मे. झेनिथ सर्जिकल, मुंबई.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| S. N. | Item Description | Qty | Kalelkar Surgicals , Mumbai | Zenith Surgical Co., Mumbai | Chimco Bio-medical , Mumbai | Total Amt. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Fibre Light Source <ENDOSOL-II> 2 Outlet 2-250 Watt Halogen Lamp Variable Light intensity Heat Absorbing Filter. | 1 | **18675.00** | 87750.00 | 117180.00 | **18675.00** |
| 2 | Fibre Light Cable O 4.5mm Length 180cm High Intensity Cable | 1 | **6142.50** | 27000.00 | 41951.25 | **6142.50** |
| | | | | | **Total Amt.in Rs. -** | **24817.50** |

वरील प्रमाणे तुलनात्मक दरातील तक्त्यानुसार लाईट सोर्स केबलसह करीता मे.कालेलकर सर्जिकल, मुंबई यांचे दर हे निम्नतम आहेत. त्यानुसार सदरचे लाईट सोर्स केबलसह खरेदीकामी रु.२४,८१७.५० इतका खर्च येणार आहे.

तरी मे.कालेलकर सर्जिकल, मुंबई यांचेकडून लाईट सोर्स केबलसह खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु.२४,८१७.५० चे खर्चास मान्यता देण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**(१३) वैद्यकीय संचालक यांचे अधिकारातील तातडीची औषधे (माहे ऑगस्ट-२००७) खरेदीस मंजूरी मिळणे बाबत**

श्रीसाईबाबा रुग्णालयाचे कॅथलॅब विभागात दैनंदिन ॲन्जीओग्राफी, ॲन्जीओप्लास्टीसाठी लागणारे सर्जिकल साहित्य व सी.आर.यु. विभागास शस्त्रक्रिया झाल्यानंतर लागणारी इंजेक्शन इत्यादी तसेच श्री साईनाथ रुग्णालयाकरीता दैनंदिन वापरासाठी लागणारी औषधे जी आपल्याकडे उपलब्ध नव्हती व तातडीने खरेदी करणे गरजेचे होते ती औरंगाबाद, नाशिक, कोपरगाव, पुणे, मुंबई जळगाव, अहमदनगर, शिर्डी येथून तातडीने खरेदी केलेली आहेत.

श्रीसाईबाबा रुग्णालय हे दि. १५/०५/२००६ रोजी कार्यान्वित झालेले आहे. सदरचे रुग्णालय नव्यानेच चालु झालेले असल्यामुळे व वेगवेगळया विभागात वेळोवेळी नवनवीन तज्ञ डॉक्टर हे हजर होत होते, त्यामुळे सन २००६-२००७ मध्ये मागणी केलेल्या औषधांव्यतिरीक्त बरीचशी नविन औषधे संबंधित डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार खरेदी करावी लागतात. (विशेषत: CVTS, CRU, CATHLAB इत्यादी विभाग) अशी वारंवार लागणारी नविन औषधे हि सन २००७-०८ या वार्षिक औषधे खरेदीमध्ये मागणी करण्यात आलेली आहेत. त्यामुळे येथून पुढे तातडीची औषधे खरेदी करण्याचे प्रमाण बरेचशे घटेल.

तसेच सी.आर.यू. व कॅथलॅबमध्ये दाखल होणाऱ्या रुग्णांसाठी लागणारी औषधे आपण पॅकेजमध्ये देत असल्यामुळे ती आपणास तातडीने खरेदी करुन दयावी लागतात. ॲन्जीओग्राफी व ॲन्जीओप्लास्टीसाठी रुग्णांची संख्या सतत वाढत असल्यामुळे सन २००६-०७ या वर्षातील वार्षिक मागणी अपूरी पडत आहे.

माहे ऑगस्टपासून सन २००७-०८ या वर्षामध्ये मागणी केलेल्या निविदेतील मंजुर दरानुसार (R/C) खरेदी करण्यात येत आहे. याशिवाय वार्षिक मागणी व्यतिरीक्त तातडीने लागणाऱ्या औषधांसाठी औरंगाबाद, नाशिक, कोपरगाव, पुणे, मुंबई जळगाव, अहमदनगर, शिर्डी येथील होलसेल विक्रेत्यांकडून नामांकित कंपनीचे दरपत्रक मागवून त्यानुसार आवश्यकतेप्रमाणे लागणारी औषधे त्यांचेकडून खरेदी करण्याचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करण्यात येत आहे.

खालील तपशिलातील नमुद केलेली औषधे वार्षिक मंजुर दराने (२००७-०८) उपलब्ध होणेस काही कालावधी लागणार असल्याने ती तातडीने खरेदी करणे गरजेचे होते. त्यासाठी एकुण रु. ९९९४४/- इतका खर्च आलेला आहे. सदरची खरेदी हि माहे ऑगस्ट - २००७ मध्ये वैद्यकिय संचालक यांना मा.व्यवस्थापन समिती सभा दि. ०३/०६/२००७ निर्णय क्र. ३४८ नुसार दरमहा असलेल्या रु.१,००,०००/-चे तरतूदीतून माहे-ऑगस्ट मध्ये केलेली आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे-

| Sr.No. | Name of Party | Bill No. | Date | Total Amt. |
|---|---|---|---|---|
| 1 | Centenial Surgical, Mumbai | 549 | 25/08/2007 | 1411.00 |
| | | | **Total Amt.** | **1411.00** |
| 2 | HI-Tech Surgical System, Mumbai | 1942 | 02/08/2007 | 1679.00 |
| | | | **Total Amt.** | **1679.00** |
| 3 | J.S.P.Surgical, Nashik | 8177 | 04/08/2007 | 5155.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | **Total Amt.** | **5155.00** |
| 4 | Kanchan Drugs, Pune. | 3791 | 06/08/2007 | 2986.00 |
| 5 | Kanchan Drugs, Pune. | 3997 | 13/08/2007 | 6323.00 |
| | | | **Total Amt.** | **9309.00** |
| 6 | Kapil Medical, Jalgaon | 729 | 27/08/2007 | 1285.00 |
| | | | **Total Amt.** | **1285.00** |
| 7 | Kundan Surgical, Ahmednagar | 3093 | 30/08/2007 | 11400.00 |
| | | | **Total Amt.** | **11400.00** |
| 8 | Life Line Surgical, Kopargaon | 470 | 24/08/2007 | 3898.00 |
| 9 | Life Line Surgical, Kopargaon | 510 | 28/08/2007 | 371.00 |
| 10 | Life Line Surgical, Kopargaon | 513 | 29/08/2007 | 450.00 |
| | | | **Total Amt.** | **4719.00** |
| 11 | Mauli Pharma, Kopargaon | 5730 | 29/08/2007 | 281.00 |
| 12 | Mauli Pharma, Kopargaon | 5760 | 31/08/2007 | 338.00 |
| | | | **Total Amt.** | **619.00** |
| 13 | Meena Agencies, Nashik | 1435 | 14/08/2007 | 550.00 |
| | | | **Total Amt.** | **550.00** |
| 14 | Nasan Medicals, Pune. | 107 | 02/08/2007 | 1575.00 |
| | | | **Total Amt.** | **1575.00** |
| 15 | Pankaj Pharma, Pune. | 2696 | 14/08/2007 | 9240.00 |
| | | | **Total Amt.** | **9240.00** |
| 16 | Pharmaco, Pune | 3564 | 20/08/2007 | 6989.00 |
| 17 | Pharmaco, Pune | 3805 | 29/08/2007 | 6400.00 |
| | | | **Total Amt.** | **13389.00** |
| 18 | Prince Medical & General Stores, Nashik | 107 | 03/08/2007 | 7200.00 |
| | | | Total Amt. | 7200.00 |
| 19 | Rahul Enterprises, Nashik. | 265 | 24/08/2007 | 17653.00 |
| | | | **Total Amt.** | **17653.00** |
| 20 | Renuka Surgical, Aurangabad | 129 | 07/08/2007 | 2050.00 |
| | | | **Total Amt.** | **2050.00** |
| 21 | S.P. Distributosr, Pune | 748 | 10/08/2007 | 6240.00 |
| | | | **Total Amt.** | **6240.00** |
| 22 | Shree Ortho Tools, Nashik | 51 | 23/08/2007 | 1125.00 |
| | | | **Total Amt.** | **1125.00** |
| 23 | Vasant Distributor, Nashik | 206 | 28/07/2007 | 3100.00 |
| | | | **Total Amt.** | **3100.00** |
| 24 | Vijay Medical Stores,Shirdi. | 235 | 29/08/2007 | 15.00 |
| 25 | Vijay Medical Stores,Shirdi. | 236 | 29/08/2007 | 183.00 |
| 26 | Vijay Medical Stores,Shirdi. | 238 | 29/08/2007 | 27.00 |
| 27 | Vijay Medical Stores,Shirdi. | 239 | 29/08/2007 | 204.00 |
| 28 | Vijay Medical Stores,Shirdi. | 240 | 30/08/2007 | 334.00 |
| 29 | Vijay Medical Stores,Shirdi. | 243 | 31/08/2007 | 767.00 |
| 30 | Vijay Medical Stores,Shirdi. | 246 | 31/08/2007 | 715.00 |
| | | | **Total Amt.** | **2245.00** |
| | | | **Total Amt.** | **99944.00** |

## Partywise Bill Summery

| **Sr.No.** | **Name of Party** | **Total Amt.** |
|---|---|---|
| 1 | Centenial Surgical, Mumbai | 1411.00 |
| 2 | HI-Tech Surgical System, Mumbai | 1679.00 |
| 3 | J.S.P.Surgical, Nashik | 5155.00 |
| 4 | Kanchan Drugs, Pune. | 9309.00 |
| 5 | Kapil Medical, Jalgaon | 1285.00 |
| 6 | Kundan Surgical, Ahmednagar | 11400.00 |
| 7 | Life Line Surgical, Kopargaon | 4719.00 |
| 8 | Mauli Pharma, Kopargaon | 619.00 |
| 9 | Meena Agencies, Nashik | 550.00 |
| 10 | Nasan Medicals, Pune. | 1575.00 |
| 11 | Pankaj Pharma, Pune. | 9240.00 |
| 12 | Pharmaco, Pune | 13389.00 |
| 13 | Prince Medical & General Stores, Nashik | 7200.00 |
| 14 | Rahul Enterprises, Nashik. | 17653.00 |
| 15 | Renuka Surgical, Aurangabad | 2050.00 |
| 16 | S.P. Distributosr, Pune | 6240.00 |
| 17 | Shree Ortho Tools, Nashik | 1125.00 |

| | | |
|---|---|---|
| 18 | Vasant Distributor, Nashik | 3100.00 |
| 19 | Vijay Medical Stores,Shirdi. | 2245.00 |
| | **Total Amt.** | **99944.00** |

तरी उपरोक्त प्रमाणे पुर्णांकित रक्कम रु. ९९,९४४/-( रु. नव्यान्नव हजार नऊशे चौरेचाळीस मात्र) चे खरेदीस व खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**(१४) एम.आर.आय. टेक्निशियन यांचे नियुक्त्यांबाबत.**

वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पीटल शिरडी यांनी दि.२६/०९/२००७ रोजीचे टिपणी इकडेस प्राप्त झाली असून,त्यात "श्रीसाईबाबा हॉस्पीटलमध्ये दि.३०/०५/२००७ रोजी एम.आर.आय. मशिन कार्यान्वित होऊन सुरळीतपणे सुरु झालेले आहे.जवळपासचे परिसरात एम.आर.आय.ची सुविधा नसल्याने श्रीसाईबाबा हॉस्पीटलमध्ये विविध व्याधींच्या निदानाकरीता एम.आर.आय. करण्यासाठी रुग्णांचा ओघ दिवसेंदिवस वाढत आहे. परंतू सध्या एकच एम.आर.आय. तंत्रज्ञ असल्यामुळे रुग्णांना सेवा देणेकामी सदर तंत्रज्ञाची ससेहोलपट होऊन सेवेत विलंब होत आहे.त्यामुळे वेळेत रुग्णसेवा देणेसाठी आणखी दोन एम.आर.आय.टेक्निशियनची नितांत गरज भासू लागली आहे. जेणेकरुन काम शिफ्टमध्ये करणे सुकर होईल.तसेच रविवारीही सदर विभागाचे कामकाज चालू ठेवता येणे शक्य होईल.

उपरोक्त कारणास्तव रेडीओलॉजी विभागाकरीता दोन एम.आर.आय. टेक्निशियनची संस्थान नियमानुसार तातडीने नियुक्ती व्हावी, असे नम्र मत आहे.

शासनाकडून नुकत्याच मान्यता प्राप्त होऊन आलेल्या आकृतिबंधात सदरचा आकृतिबंध सादर करतेवेळी एम.आर.आर. मशिनचा समावेश नसल्याने उपरोक्त तंत्रज्ञांचे मान्यतेचा समावेश केलेला नाही.

तथापी सदरचे मशिन बसविण्याचे निश्चित झालेनंतर दि.०६/०१/२००७ रोजी आयोजीत केलेल्या मुलाखतीव्दारे सदर टेक्निशियनच्या मुलाखती घेण्यात आलेल्या आहेत.त्यापैकी खालील उमेदवार मुलाखतीस हजर होते.

**अ) <u>श्री अहिरे विजय भाऊराव:-</u>** यांना दि.६ सप्टेंबर २००७ रोजी एम.आर.आय.टेक्निशियन या पदासाठी नियुक्ती आदेश देण्यात आला होता. परंतू कामावर हजर होणे संदर्भात आजपावेतो त्यांनी कुठल्याही प्रकारे लेखी अथवा तोंडी कळविलेले नाही. दूरध्वनीवरुन त्यांच्याशी संपर्क साधला असता त्यांना सध्या मिळत असलेला पगार सदर आदेशातील वेतनापेक्षा जास्त असल्यामुळे मी येण्यास ईच्छूक नाही, असे त्यांनी म्हटले आहे.

**ब) <u>श्री घुले रोहीदास गवराम</u> :-** यांचा दि.२०/०९/२००७ रोजी इकडील कार्यालयास एम.आर.आय. टेक्निशियन या पदासाठी अर्ज प्राप्त झालेला आहे.

सदर अर्जाचे अवलोकन करता सध्या ते एम.आर.आय. टेक्निशियन या पदावर युनिटी अहमदनगर ईमेजिंग प्रा.लि.अहमदनगर येथे ५ वर्षापासून सदर पदावर कार्यान्वित आहेत. अर्जासोबत त्यांनी त्यांचा बायोडाटा जोडलेला आहे. त्यांची शैक्षणिक पात्रता बी.ए.डीप्लोमा इन एक्स-रे अँड टेक्नॉलॉजी २००५ मध्ये पुर्ण केला असल्याचे दिसते.

सदर उमेदवाराने किमान रुपये- ११,०००/- प्रतिमाह वेतन मिळावे, अशी मागणी केली आहे.तसेच त्यांचे पत्नीस लॅब टेक्नीशिअन पदावर नियुक्ती मिळावी अशी अट आहे.

**क) <u>श्री मुसमाडे बाळासाहेब भागवत</u> :-** यांची दि.०६/०१/२००७ रोजी एम.आर.आय. टेक्निशियन पदासाठी आयोजीत केलेल्या मुलाखतीव्दारे मुलाखत घेण्यात आली आहे. सदर उमेदवाराने पुन्हा सादर केलेल्या अर्जाचे अवलोकन करता सध्या ते एम.आर.आय. टेक्निशियन या पदावर भारती हॉस्पीटल अँड रिसर्च सेंटर,धनकवडी,पुणे येथे ८ जुलै २००२ पासून कार्यरत आहे. त्यांची शैक्षणिक पात्रता १२ वी ,डिप्लोमा इन एक्स-रे सन- १९९८ मध्ये पुर्ण केल्याचे दिसते.

सदर उमेदवार रु- १५,०००/- प्रतिमाह वेतन व त्यांची पत्नी यांना ईसीजी टेक्निशियन या पदावर नियुक्ती द्यावी, अशी अट घातलेली आहे.

श्री मुसमाडे बाळासाहेब भागवत यांची पत्नी ईसीजी टेक्निशियनन या पदावर भारती हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर,धनकवडी,पुणे येथे ५ वर्षापासून रुपये -७,५००/- प्रतिमाह इतक्या वेतनावर काम करत आहेत,असे त्यांच्याशी चर्चा केली असता समजले.

तथापी, श्री साईबाबा हॅास्पिटलसाठी शासनाने मंजूर केलेल्या आकृतिबंधात ईसीजी टेक्निशियन हे पद समाविष्ठ केलेले नसल्यामुळे या पदासाठी मंजुरी घेणे आवश्यक आहे.मात्र प्रत्यक्षात या पदावर ३ व्यक्तिंची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

**ड)श्री.आहेर रणजीत हिरामण:-** यांचा दि.२२/०९/२००७ रोजी इकडील कार्यालयास एम.आर.आय. टेक्निशियन या पदासाठी अर्ज प्राप्त झालेला आहे.त्यांची शैक्षणिक पात्रता बी.एस्सी. (Phy), डी.एम.एल.टी., डीप्लोमा इन सीटी स्कॅन असुन वैद्यकीय संचालक यांनी ३ वर्ष अनुभव -१.५ Tesla

Machine. व एम.आर.आय.टेक्निशियनसाठी शिफारस असा शेरा मारलेला आहे व शनिवार दि.२२/०९/२००७ रोजी झालेल्या मा.उपसमितीच्या मिटींगमध्ये एम.आर.आय.टेक्निशियन यांना नियुक्ती देण्यात यावी,अशा सूचना विश्वस्तांनी दिलेल्या आहेत.

**इ) श्री.ठोसर राजेंद्र बारकु :-** हे श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये दि.१९/०५/२००७ पासून एम.आर.आय. टेक्निशियन या पदावर कार्यरत आहेत. त्यांना रुपये- ८,०००/- प्रतिमाह फिक्स पे इतके वेतन मिळत आहे. नविन एम.आर.आय. टेक्निशियनची नियुक्ती करताना जे वेतन देण्यात येईल तितकेच वेतन श्री राजेंद्र ठोसर यांना देण्यात यावे.

तरी उपरोक्त "अ - ब - क - ड - इ " चे अवलोकन होऊन एम.आर.आय.टेक्निशियनची दोन पदे संस्थान नियमानुसार तातडीने भरणेबाबत व एम.आर.आय.टेक्निशियन यांना रुपये- १२,५००/- प्रतिमाह वेतन देऊन सदर विभागाच्या कामकाजात गती येणेकामी योग्य तो निर्णय व्हावा", असे नमुद केले आहे.

यावर "आस्थापना विभागामार्फत रितसर नेमणूक व्हावी. सध्या उमेदवारांनी मागीतलेल्या वेतना प्रमाणे संस्थानमध्ये टेक्निशियन या पदासाठी वेतनश्रेणी आहे.त्यात Last pay fixation व्हावे, असे मत आहे ", असे संबंधीत प्रशासकीय अधिकारी यांनी अभिप्राय दिले आहे.

एम.आर.आय.टेक्निशियनची तातडीने आवश्यकता आहे. शासनाकडून मान्य आकृतिबंधात सी.टी. स्कॅन, डायलेसिस, इ.सिनिअर टेक्निशियनसाठी रु.-५०००-१५०-८००० अशी वेतनश्रेणी प्रस्तावीत केलेली आहे. सदर एम.आर.आय.टेक्निशियन यास रु.- ५०००-१५०-८००० वेतनश्रेणीत ५ वेतनवाढी दिल्यास रु.- १२,१६१/- इतके वेतन होईल. तूर्त एकत्रित रु.- १२,०००/- वेतनावर नेमणूक देता असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.रोहिदास गवराम घुले, यांनी रुपये ११०००/- चे वेतनावर तयारी दर्शविली आहे. तथापि त्यांनी पत्नीस लॅब टेक्निशियन म्हणून नियुक्ती द्यावी अशी केलेली विनंती मान्य करणे शक्य नसल्याने श्री.आहेर रणजीत हिरामण यांना एक वर्षाचे कालावधीसाठी रुपये १२०००/- एकत्रित वेतनावर नेमणूक देण्यात यावी तसेच एम.आर.आय टेक्निशियनला इतर हॉस्पिटलमध्ये रुपये १२०००/- ते रुपये १५०००/- वेतन तसेच इतर फायदे दिले जातात. त्यामुळे टेक्निशियन सोडून गेल्यास पेशंटची गैरसोय होईल म्हणून सध्या संस्थान सेवेत असलेले, श्री.ठोसर राजेंद्र बारकु यांनाही रुपये ८०००/- ऐवजी रुपये १२०००/- एकत्रित वेतन देण्यात यावे. अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**(१५) कन्या महाविद्यालयातील शिक्षणसेवकांना मानधनाऐवजी वेतनश्रेणी देणेबाबत**

प्राचार्या,श्री साईबाबा कन्या शाळा यांचे कडील टिपणीत सन २००५-२००६ मध्ये कनिष्ठ महाविद्यालयात इ.११ वी कला आणि वाणिज्य शाखांचे वर्ग सुरु करण्यात आले आहे.या वर्गाच्या अध्यापनासाठी सन २००५-२००६ मध्ये तासिका तत्वावर रु.४५/- प्रति तासिका प्रमाणे खालील तक्त्यातील अ.नं.१ ते १० या शिक्षणसेवकांची नेमणूक करण्यात आली . या सर्व शिक्षणसेवकांच्या सन २००६-२००७ मध्ये शिक्षणसेवक (अर्धवेळ) या पदावर दरमहा रु.२५००/-प्रमाणे दि.३०/०४/२००७ अखेर नेमणूका करण्यात आल्या होत्या.

| **अ.क्र.** | **शिक्षणसेवकांचे नाव** | **सन २००६-०७** | **शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता** | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री दिलीप शंकरराव शेळके | अर्धवेळ शिक्षणसेवक | एम.ए | इंग्रजी | बी.एड |
| २ | श्रीमती कांचन अहिलाजी झावरे | अर्धवेळ शिक्षणसेवक | एम.ए | मराठी | बी.एड |
| ३ | श्री सुनिल पंढरीनाथ कांडेकर | अर्धवेळ शिक्षणसेवक | एम.ए | हिंदी | बी.एड |
| ४ | श्रीमती सरीता विष्णू गागरे | अर्धवेळ शिक्षणसेवक | एम.ए | इतिहास | बी.एड |
| ५ | श्रीमती रेश्मा भाऊसाहेब नेहे | अर्धवेळ शिक्षणसेवक | एम.कॉम | | बी.एड |
| ६ | श्री प्रशांत दत्तात्रय गडकरी | अर्धवेळ शिक्षणसेवक | एम.ए | इंग्रजी | बी.एड.फिजी |
| ७ | श्री सुनिल जोसेफ गायकवाड | अर्धवेळ शिक्षणसेवक | एम.ए | अर्थशास्त्र मराठी | बी.एड |
| ८ | श्रीमती सिमा प्रभाकर जाधव | अर्धवेळ शिक्षणसेवक | एम.ए | राज्यशास्त्र | बी.एड |
| ९ | श्रीमती वंदना रावसाहेब देशमुख | अर्धवेळ शिक्षणसेवक | एम.ए | अर्थशास्त्र मराठी | बी.एड |
| १० | श्री सुजितकुमार अशोक दळवी | अर्धवेळ शिक्षणसेवक | एम.कॉम | | बी.एड |

सन २००६-२००७ मध्ये कनिष्ठ महाविद्यालयात इ.११ वी इ.१२ वी या वर्गाच्या सुरु असलेल्या तुकडया व विद्यार्थीसंख्या तसेच नैसर्गिक वाढीने सन २००७-०८ मध्ये होणा-या तुकडया व विद्यार्थी संख्या यांचा तपशील पुढील प्रमाणे -

| | सन २००६-०७ | | | सन २००७-०८ | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | वर्ग | तुकडी संख्या | विद्यार्थी संख्या | वर्ग | तुकडी संख्या | विद्यार्थी संख्या |
| ०१ | ११ वी विज्ञान | ०१ | ७९ | ११ वी विज्ञान | ०२ | १२३ |
| ०२ | ११ वी वाणिज्य | ०१ | ९९ | ११ वी वाणिज्य | ०२ | १५७ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ०३ | ११ वी कला | ०२ | १७० | ११ वी कला | ०२ | १६६ |
| ०४ | १२ वी विज्ञान | ०१ | ६९ | १२ वी विज्ञान | ०१ | ७५ |
| ०५ | १२ वी वाणिज्य | ०१ | ६२ | १२ वी वाणिज्य | ०१ | ८८ |
| ०६ | १२ वी कला | ०१ | ७५ | १२ वी कला | ०२ | १५६ |
| | **एकूण ०७** | | **५५४** | **एकूण १०** | | **७६५** |

सन २००६-०७ मध्ये इ.११ वी व इ.१२ विज्ञान तसेच वाणिज्य शाखेची प्रत्येकी एक वर्ग तुकडी कला शाखेच्या इ.११ वी च्या दोन वर्ग तुकडया व इ.१२ वी कला शाखेची एक वर्ग तुकडी अशा एकूण ०७ मान्यता प्राप्त वर्ग तूकडया सुरु असून नैसर्गिक वाढीने सन २००७-०८ मध्ये इ.११ वी कला, विज्ञान व वाणिज्य शाखेच्या प्रत्येकी एक वर्ग तुकडी अशा एकूण १० वर्ग तुकडया सुरु आहेत. इ.११ वी ची विज्ञान तसेच वाणिज्य शाखेची प्रत्येकी एक वर्गतुकडी सन २००७-०८ मध्ये नव्याने सुरु केली असल्याने या दोन वर्ग तुकडयांची मान्यता प्रलंबित आहे.

सन २००७-०८ मध्ये वरील सर्व वर्ग तुकडया आणि विद्यार्थी संख्या लक्षात घेता शिक्षणसेवकांना पूर्णवेळ पदासाठीचा कार्यभार उपलब्ध होत आहे. वरील तक्त्यातील अ.क्र.०१ वे १० या सर्व शिक्षणसेवकांच्या सन २००७-०८ मध्ये मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८ जुलै २००७ चे सभेतील निर्णय क्र.५१५ (६) नुसार कंन्या विद्या मंदिराकडील शिक्षणसेवकांना शासनाचे निर्णयाप्रमाणे वेतन देणेबाबत ठरले आहे.आणि शासन निर्णयानुसार अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयातील पूर्णवेळ शिक्षणसेवकांना दरमहा देण्यात येत असलेल्या रु. ५०००/- या मानधनावर दि.१५ जून २००७ पासून पूर्णवेळ शिक्षणसेवक म्हणून तूर्त नेमणूका करण्यात आलेल्या आहेत.

दि.२६ जूलै २००१ च्या शासन निर्णयानुसार विनाअनुदानित शाळांना शिक्षणसेवक योजना लागू नाही.त्यामुळे संस्थानच्या शाळांना सदरची योजना लागू होत नाही. तक्त्यातील अ.नं.०१ ते १० या सर्व शिक्षणसेवकांनी रु.५०००/- या मानधना ऐवजी रु.७२२५-२२५-११०५० ही वेतनश्रेणी लागू करावी अशी विनंती केली आहे. वरील शिक्षणसेवकांचे विनंतीचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभे समोर आपले मान्यतेने विचारार्थ सादर करता येईल, असे मुख्याध्यापिका यांनी नमूद केलेले आहे.

उपरोक्त बाबत मा.मुख्याध्यापिका,श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर,शिर्डी यांचे अभिप्राय संस्थान प्रचलित पध्दत व शासन निर्णयानुसार (स्कुलकोड,आरक्षण नियमानुसार)अंमलबजावणी विचारात घेवून वेतनश्रेणी देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त शिक्षकांना रुपये ५,०००/-ऐवजी रुपये १०,०००/- एकत्रित वेतन देण्यात यावे, त्यांचे काम समाधानकारक असल्यास पुढील शैक्षणिक वर्ष जुन-२००८ पासून वेतनश्रेणी देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**(१६) रुग्णालय- वार्षिक छपाईबाबत- निविदा उघडणे बाबत...**

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२९.०६.२००७ मधील निर्णय क्र.४६२ नुसार श्री साईबाबा हॉस्पिटल विभागासाठी आवश्यक असणारे रजिष्टर व फॉर्म्स छपाईस व त्याकामी येणारे रक्कम रु. ४ लाख पर्यंतचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार संस्थान जा.क्र.एसएसएस/ खरेदी-रुग्णालय/ १४३४०/ २००७, दि.०८.०९.२००७ अन्वये दि.१५.०९.२००७ अखेर मागणी करणेत आलेली दरपत्रके आजचे सभेत उघडणेत आलेल्या आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

**अ.नं. कोटेशनधारकाचे नाव व गाव**

०१. प्रिंटवेल प्रिंटर्स, मालेगाव,
०२. मयुर ऑफसेट, श्रीरामपुर,
०३. अभिषेक ऑफसेट, राहुरी,
०४. कॅप्रिकॉन प्रिंटर्स, पुणे
०५. अविराज पॅकवेल, कोपरगाव
०६. टेके प्रिंटर्स, अहमदनगर
०७. युगल प्रिंटर्स, अहमदनगर
०८. सावता प्रिंटर्स, राहाता

उपरोक्त सर्व निविदाधारकांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन निविदासादरकर्त्यांना व्यवस्थापन समितीचे पुढील सभेत चर्चेसाठी आमंत्रित करणेत यावेत अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.०८ दिनांक ०७.११.२००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.०८** दिनांक ०७.११.२००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन या इतिवृत्तातील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

**(०१) शांतीनिवास दर्शन हॉल व भक्तनिवास दर्शन हॉल येथे सुरक्षिततेकरीता खिडक्यांना ग्रील बसविणेबाबत प्राप्त झालेले कोटेशन्स उघडुन कोटेशनसादरकर्त्यांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे**

शांतिनिवास वरील मजल्याचे उत्तर बाजूस व भक्तनिवास वरील मजल्याचे पुर्व बाजूस ग्रील बसविणेबाबत व येणाऱ्या रुपये १,३२,०४७.०० इतक्या खर्चाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २८-०७-२००७ चे झालेल्या सभेत मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. हा प्रस्ताव या सभेत विषय क्र.५३ निर्णय क्र. ५६४ अन्वये मान्य करण्यात आला असून या कामासाठी वर्कशॉप-फॅब्रिकेटरकडून कोटेशन मागवावेत असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार वर्कशॉप-फॅब्रिकेटरर्सना पत्र पाठवून कोटेशन्स मागविण्यात आली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे ०५ कोटेशन्स प्राप्त झाले आहेत. कोटेशन तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | कोटेशन्ससादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१ | मे.रुचा इंजिनिअरींग वर्क्स ,नवी मुबई |
| ०२ | मे.साई इंजिनिअर्स , अंबड, नाशिक |
| ०३ | मे.लक्ष्मी स्टील ॲण्ड इंजि.को.,नाशिक |
| ०४ | मे. आकार मशिन्स प्रा.लि., नाशिक |
| ०५ | मे.प्रणव कार्पोरेशन,पुणे |

उपरोक्तप्रमाणे शांतिनिवास दर्शन हॉल व भक्तनिवास दर्शन हॉल येथे सुरक्षिततेकरीता खिडक्यांना ग्रील बसविणेबाबत प्राप्त झालेली कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन कोटेशन्ससादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | कोटेशन्ससादरकर्त्याचे नांव | कोटेशन्समध्ये देऊ केलेले दर रुपये | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | मे.रुचा इंजिनिअरींग वर्क्स ,नवी मुबई | १,८४,८६०.०० | अनुपस्थित |
| ०२ | मे.साई इंजिनिअर्स , अंबड, नाशिक | १,५९,६००.०० | १,५०,०००.०० |
| ०३ | मे.लक्ष्मी स्टील ॲण्ड इंजि.को.,नाशिक | १,८१,९००.०० | अनुपस्थित |
| ०४ | मे. आकार मशिन्स प्रा.लि., नाशिक | १,७०,३५०.०० | १,७०,३५०.०० |
| ०५ | मे.प्रणव कार्पोरेशन,पुणे | १,८९,७६०.०० | १,८०,०००.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.साई इंजिनिअर्स, अंबड, नाशिक यांची निम्नतम दराचे कोटेशन्स स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

**(०२) पाणी मापक यंत्रासाठी कॅनालवर रुम बांधेणे बाबत**

श्री साईबाबा संस्थानचे पाणी पूरवठा विभागाचे साठवण तलावात येणारे पाण्याचे मोजमाप करण्यासाठी पाणी मापक यंत्र बसविण्याचे आहे. पाणी पुरवठा विभागाने दि. ०९/०७/२००७ चे टिपणीव्दारे कळविले की, शासन परिपत्रक क्र. बिपापु १००१ (७१३/२००१) सिं.व्य (धो), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दि. ०७/०४/२००३ अन्वये आपणास पाटबंधारे विभाग, नाशिक यांनी साठवण तलावात येणारे पाण्याचे मोजमाप करणेसाठी पाणी मापक यंत्र बसविणेबाबत कळविले आहे. त्यानुसार त्यास मा. व्यवस्थापन समितीने दिनांक २०/०५/२००७ चे सभेतील नि.क्र. ४०९ अन्वये त्यास मान्यता दिलेली आहे. सदरहू यंत्रासाठी ७'x७'x७' यामापाची कॅनाल जवळ ओपन चारीवर आर.सी.सी. रुम बांधकाम विभागामार्फत बांधणेबाबत कळविले आहे.

त्यानुसार साईटवर समक्ष पाहणी केली असून कॅनॉलचे चारीवर ७'x७'x८' याआकाराची रुम बांधता येईल. सदरहू बांधकाम हे आर.सी.सी. स्वरुपात करावे लागेल. आर.सी.सी. फुटींग, कॉलम व बीमसह प्लीन्थ लेव्हलला तसेच छतासाठी आर.सी.सी. स्लॅबलचे बांधकाम करावे लागेल. भिंती विट बांधकामात करता येईल. याप्रमाणे बांधकामासाठी प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार रु. ६०,०००.०० मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. सदरचे काम हे मटेरीअल व मजुरीदरासह स्थानिक ठेकेदार यांचेकडून कोटेशन मागवून करुन घेण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त कामी बांधकाम साहित्य खरेदी व मजूर ठेकेदार यांचेकडून विहित पद्धतीने कोटेशन मागवून बांधकाम विभागाअंतर्गत काम करुन घेण्यास व याकामी येणारे उपरोक्त खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**(०३) <u>हॉस्पिटल वाहनांचे पार्किंगबाबत</u>**

श्री साईबाबा हॉस्पीटल शिर्डी यांनी उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये असे कळविले आहे. की, हॉस्पीटल परिसरात पार्कीगची व्यवस्था नसल्याने काही वैद्यकीय अधिकारी व स्टाफ वाहने लावत असतात. तसेच रुग्णांचे नातेवाईकही यात भर टाकत असतात. यासर्व करणांमुळे आतील परिसरात वाहनांची संख्या वाढत असून कधी - कधी सुरक्षा कर्मचाऱ्यांशी वाद होत असल्याचे दिसून येते.

त्यामुळे येथील सर्व वाहने जवळच असणाऱ्या साईनगर मैदानावर बांधकाम विभागामार्फत योग्य त्या सुविधा (शेड वगैरे) पुरवून लावणेस आदेश केला तर सोईस्कर होईल असे कळविले आहे.

हॉस्पीटल परिसरात उपरोक्त प्रमाणे लावणेत येणारी सर्व वाहने साईनगर मैदानावर लावणेकामी बांधकाम विभागामार्फत योग्य ती पार्कींग व्यवस्था करणेस सुचविले आहे.

त्यानुसार इकडील विभागामार्फत पाहणी करण्यात आली आहे. साईनगर मैदानाचे पुर्व किंवा उत्तर बाजूस ३००'x१५' आकाराचे पत्र्याचे शेड तयार करता येईल. सदर शेड , खाली सोलींग पी.सी.सी. व छतास जी.आय.पन्हाळी पत्र्यांचे असे कायमस्वरुपी करता येईल. सदर शेडसाठी प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार रु. ४,३७,०००.०० मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. सदरहू काम हे मोठ्या स्वरुपाचे असल्याने संस्थान पॅनलवरील आर्किटेक्ट यांचेकडून प्लॅन, एस्टीमेट व निविदा तयार करुन घेता येईल. तसेच वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिद्ध करुन निविदा मागवून करता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनगर मैदानाचे पूर्व किंवा उत्तर बाजूस ३००'x१५' आकाराचे लोखंडी पाईप वापरुन पत्र्याचे शेड तयार करण्यात यावे. या शेडमध्ये दगडाचे सोलींग करुन त्यावर मुरुम टाकण्यात यावा, याकामी येणाऱ्या योग्य त्याखर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**(०४) <u>स्टेनलेस स्टील फेब्रीकेटेड इक्वीपमेंट खरेदीबाबत निर्णय घेणे.</u>**

सदरहू विषयावर चर्चा होऊन, याबाबत व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय घेण्यात यावा अशी याउपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय)

(०५) एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि.नाशिक,पाणीतपासणीकामी नेमणूक करणे बाबत.

पाणी पुरवठा विभागाकडील कनकुरी साठवण तलाव येथून शुध्द केलेले पाणी पिण्यासाठी व इतर वापरासाठी संस्थान परिसरामध्ये वितरीत करण्यात येते. सदरचे पाणी शुध्द होवून ते पिण्यायोग्य आहे किंवा नाही याबाबत पाण्याच्या नमुन्यांची लॅबमध्ये तपासणी होणे आवश्यक असल्याने तलावावरील लॅबमध्ये तपासणी करण्यात येते. तसेच आरोग्य विभाग अहमदनगर येथेही तपासणी करण्यात येते. शिवाय एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि.नाशिक यांची याकामी नेमणूक करण्यात आलेली होती. व त्यांचेकडे पाणी तपासून दरमहा अहवाल मागविला जात आहे. व त्यांनी केलेल्या सुचना आमलात आणून पाणी शुध्द केले जाते.

एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि.नाशिक गेली ०४ वर्ष दरमहा पिण्याचे पाण्याचे नमुने तपासून देणे कामी काम करीत आहे. दि.३१/१२/२००७ रोजी त्यांचे मुदत संपत आहे.

एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि. नाशिक यांचे काम समाधानकारक असुन वेळोवेळी ते या कामासंदर्भात बहुमोल मार्गदर्शन करीत असतात.

दिनांक- ०१/०१/२००८ ते दिनांक- ३१/१२/२००८ या नविन वर्षाकरीता पाणी नमुने तपासणी कामी त्यांचे पुन्हाः नेमणूक करणे आवश्यक आहे. याकामी त्यांना प्रती शॉम्पल रुपये ६००/-मात्र + रुपये १००/- व्हीजीट चार्ज + १२.३६% सर्व्हीस टॅक्स दयावा लागणार आहे.

तरी दिनांक- ०१/०१/२००८ ते दिनांक- ३१/१२/२००८ अखेर एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि.नाशिक यांची पाणी नमूने तपासणी कामी नेमणूक करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-पाणीपुरवठा विभाग प्रमुख)

**(०६) भक्तनिवास दर्शनलाईनमध्ये बसविणेसाठी एल.सी.डी.टी.व्ही. खरेदी करणेबाबत.**

श्री साईबाबांच्या दर्शनासाठी शांतिनिवास व भक्तनिवास येथील तळमाळा व पहिल्या माळयावरील दर्शन लाईन मधून साईभक्त दर्शनाला जातात.

दर्शन लाईन मधून जाताना भक्तांना श्री साईबाबांचे दर्शन टी.व्ही. च्या स्क्रीनवर व्हावे यासाठी सन २००१ मध्ये व्हीडीओकॉन कंपनीचे नॉर्मल कॅथरॉड टी.व्ही. खरेदी करुन बसविले आहेत, तेंव्हापासून सदर टी.व्ही. दररोज सुमारे १८ तास चालू असतात. नेहमीच्या वापरामुळे काही टी.व्हीं. च्या पिक्चर टयुब वीक झालेल्या आहेत त्यामुळे त्या टी.व्हीं. वरील चित्र व्यवस्थित दिसत नाही. सदर टी.व्ही. बदलून तेथे एलसीडी टाईप टी.व्ही. बसविणे योग्य होईल असे वाटते.

हल्ली मार्केट मध्ये नवीन तंत्रज्ञान असलेले एलसीडी टाईप टी.व्ही. आलेले आहेत. या टी.व्हीं. ची स्क्रीन नॉर्मल टी.व्ही. पेक्षा मोठी असल्याकारणाने टी.व्ही. वरील चित्र सुस्पष्ट दिसते, टी.व्ही. दिसण्यास स्क्रीन टाईप दिसतो व या टी.व्ही. ला कमी जागा लागते.

शांतिनिवास तळमाळा, पहिला माळा, भक्तनिवास तळमाळा, पहिला माळा येथील दर्शन लाईन यापैकी शांतिनिवास तळमाळा येथे (तसेच समाधी मंदीर, द्वारकामाई येथेही) देणगी आलेले एलसीडी टाईप टी.व्ही. फीट केलेले आहेत, त्यांची कार्यक्षमता चांगली आहे. दोन्ही इमारतींचा तळमाळा पूर्ण होणेसाठी भक्तनिवास तळमाळा येथे खालीलप्रमाणे एलसीडी ३२" व २०" टी.व्ही. खरेदी करणे योग्य होईल. खरेदी करण्यात येणाऱ्या टी.व्हीं. चे वर्णन खालीलप्रमाणे -

| अ.नं. | टी.व्ही. चे वर्णन | नग | अंदाजे दर प्रती नग | अंदाजे एकूण किंमत |
|---|---|---|---|---|
| १. | ३२" एलसीडी टी.व्ही. एलजी कंपनी मॉडेल नंबर 32 LC 2 RXTJ अथवा सोनी कंपनी मॉडेल नंबर KLV32 5/200A फ्लोरिंग व वॉल माउंटींग ब्रॅकेट सह | ०६ | ५०,०००/- | ३,००,०००/- |
| २. | २०" एलसीडी टी.व्ही. मॉडेल नंबर 20LZ-50 फ्लोरींग व वॉल माउंटींग ब्रॅकेटसह | ०४ | २२,०००/- | ८८,०००/- |
| | | | **एकूण** | **३,८८,०००/-** |

तरी उपरोक्तप्रमाणे १० टी.व्ही. खरेदीसाठी अंदाजे रुपये ३,८८,०००/- पूर्णांकित रुपये ४,००,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,भक्तांचे दर्शनलाईनमध्ये प्रत्यक्ष पहाणी करुन आवश्यक त्याठिकाणी १० नग एल.सी.डी.टी.व्ही.खरेदीकामी सोनी या नामांकित कंपनीकडून निविदा मागविण्यात याव्यात, याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ४,००,०००/- खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-ध्वनीक्षेपण विभाग प्रमुख)

**(०७) उत्सवातील कार्यक्रमांसाठी साऊंड सिस्टीम मटेरिअल खरेदी करणेबाबत.**

श्री साईबाबा संस्थान तर्फे रामनवमी, गुरुपौर्णिमा, श्री साई पुण्यतिथी, गोकुळ अष्टमी इ. साजरे होणारे उत्सवामध्ये प्रसिध्द कलाकारांचे कार्यक्रम आयोजित केले जातात, तेथे जमलेल्या भक्तांना कार्यक्रम ऐकू येण्यासाठी सन १९९५ मध्ये जे.बी.एल. (U.S.A.) कंपनीचे २५० वॅट क्षमतेचे टू वे स्पिकर नग ०६ व फिलीप्स कंपनीचे ॲम्प्लीफायर, स्पिरीट कंपनीचा मिक्सर, माईक इ. खरेदी केलेले आहेत व ते आतापर्यंत वापरात आहेत. स्पिकरच्या टयुटरची दुरुस्ती झालेली आहे तसेच स्पिकरचे मॅग्नेट व पेपर जुने झाल्यामुळे स्पिकरचा पूर्वीसारखा पूर्ण क्षमतेने आवाज येत नाही.

साऊंड सिस्टीम यंत्रणेच्या तंत्रज्ञानामध्ये नेहमी बदल झालेला आहे, याशिवाय साईनगर किंवा नवीन भक्तनिवासच्या विशाल ग्राऊंडवर प्रसिध्द कलाकारांच्या कार्यक्रमासाठी दहा ते पंधरा हजार प्रेक्षकांचा समुदाय जमा होतो, अशा वेळेस १९९५ साली खरेदी केलेली सिस्टीम अपुरी पडते. याकरीता जे.बी.एल. (U.S.A.) कंपनीचे खालीलप्रमाणे स्पिकर व यंत्रणा खरेदी विभागामार्फत टेंडर अथवा कोटेशन पध्दतीने खरेदी करता येईल.

| अ.नं. | मटेरियल वर्णन | नग | अंदाजे दर प्रती नग | अंदाजे एकूण किंमत |
|---|---|---|---|---|
| १. | जेबीएल कंपनीचे स्पिकर सिरीज SRX 700 मॉडेल नंबर SRX 725 मेड इन युएसए | ०४ | ७५,०००/- | ३,००,०००/- |
| २. | जेबीएल कंपनीचे स्पिकर सिरीज SRX 700 मॉडेल नंबर SRX 728S मेड इन युएसए | ०२ | ७५,०००/- | १,५०,०००/- |
| ३. | A.K.G. कंपनी वायरलेस व्होकल मायक्रोफोन मॉडेल नंबर WMS-4000 मेड इन युएसए | ०१ | ४२,०००/- | ४२,०००/- |
| ४. | ॲम्प्लीफायर क्राऊन कंपनी मॉडेल नंबर 3600VZ | ०२ | १,१०,०००/- | २,२०,०००/- |
| ५. | टू वे बास रिफ्लेक्स स्पिकर मॉडेल नंबर MPRO Series/MP412 मेड इन युएसए | ०२ | ४०,०००/- | ८०,०००/- |
| | | | **एकूण** | ७,९२,०००/- |
| | | | +१२.५ % VAT | ९९,०००/- |
| | | | **एकूण किंमत** | ८,९१,०००/- |

तरी कृपया उत्सव कार्यक्रमाकरीता वरीलप्रमाणे साऊंड सिस्टीम मटेरियल खरेदी करणेकरीता अंदाजे रुपये ८,९१,०००/- पूर्णांकित रुपये ९,००,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- ध्वनीक्षेपण विभाग प्रमुख)

**(०८) मंदिर विभागास लागणाऱ्या शॉल्स खरेदीकामी आलेले कोटेशन्स उघडून निविदासादरकर्त्यांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

समाधी मंदिरात श्रींचे दर्शनासाठी येणारे मान्यवर, अतिथी, व्ही.आय.पी.व महत्वाचे पदसिद्ध अधिकारी वर्ग यांचा संस्थानचे वतीने शॉल व श्रीफळ देऊन सत्कार केला जातो. त्यांचे सत्कारकामी संस्थानचे वतीने शॉल देण्याची पूर्वापार पद्धत असल्याने मान्यवरांचा शॉल व श्रीफळ देऊन सत्कार करणेत येत आहे. यापूर्वी मंदिरातील बाबांना अर्पण केलेल्या शॉल्स देण्यात येत असत, मात्र देणगी आलेल्या शॉल्समध्ये किंमतीचा व दर्जाचा फरक असल्याने मागील वर्षापासून निविदा मागवून एकाच प्रकारच्या शाली खरेदी करणेस सुरुवात झालेली आहे.

मंदिर विभागाने एका वर्षासाठी २.२५ मीटर लांबी व १.०० मीटर रुंदी असलेल्या ८००० नग कॉटन शॉल्सची मागणी केलेली आहे. सदरील ८००० नग शॉल्स खरेदीस मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२०.०५.२००७ निर्णय क्र.४२५ नुसार मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार संस्थान जा.क्र.एसएसएस/ खरेदी-मंदिर/११०८८/२००७ दि.१४.०७.२००७ अन्वये दि.३०.०७.२००७ अखेर दरपत्रके व नमुने मागविणेत आलेले असून आजअखेर खालीलप्रमाणे दरपत्रके प्राप्त झालेली आहेत. त्याचा तपशिल-

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव व गांव |
|---|---|
| ०१. | सुपर डाईंग ॲण्ड कॉटन मॅन्यु.कंपनी ,प्रायव्हेट लिमीटेड, सातारा |
| ०२. | मे.शारदा टेक्सटाईल्स मिल्स (मुंबई) (प्रा.),लिमीटेड, मुंबई |
| ०३. | पलख एन्टरप्राईजेस, सुरत |
| ०४. | आदिनाथ टेक्स-केम लिमीटेड, सुरत |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन कोटेशन्ससादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव व गांव | कोटेशनमधील दर रुपये | वाटाघाटी अंती देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१. | सुपर डाईंग ॲण्ड कॉटन मॅन्यु.कंपनी ,प्रायव्हेट लिमीटेड, सातारा | ४२.०० | ४०.०० |
| ०२. | मे.शारदा टेक्सटाईल्स मिल्स (मुंबई) (प्रा.), लिमीटेड, मुंबई | ७०.००<br>(२.५०x११२ मी.) | अनुपस्थिती |
| ०३. | पलख एन्टरप्राईजेस, सुरत | ४२.००<br>(२.२५x१ मी.) | अनुपस्थिती |
| ०४. | आदिनाथ टेक्स-केम लिमीटेड, सुरत | ५४.००<br>(२.२५x१ मी.) | अनुपस्थिती |

यावर सविस्तर चर्चा होऊन, सुपर डाईंग ॲण्ड कॉटन मॅन्यु.कंपनी, प्रायव्हेट लिमीटेड, सातारा, यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी)

**(०९) गावरान तूप (ऑक्टोबर २००७ ते मार्च २००८) खरेदीकामी आलेल्या निविदा उघडून चर्चा/ वाटाघाटीने निर्णय घेणे.**

व्यवस्थापन समिती सभा दि.१७.०२.२००७ मधील निर्णय क्र.१५० क (४) नुसार प्रसादालयामध्ये प्रसादलाडू तयार करणेकामी आवश्यक असणारे ४५०० क्विंटल गावरान तूप (ॲगमार्क/लुज) दि.०१.०४.२००७ ते दि.३०.०९.२००७ व दि.०१.१०.२००७ ते दि.३१.०३.२००८ अशा दोन टप्प्यात खरेदी करणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार माहे आक्टोबर २००७ ते मार्च २००८ या कालावधीकरीता आवश्यक असणारे २२५० क्विंटल गावरान तूप खरेदीकामी दि.१-३.०९.२००७ चे दरम्यान वर्तमानपत्रात जाहिरात देऊन दि.०४ ते १३.०९.२००७ अशी निविदा विक्री मुदत ठेवणेत आलेली होती. तसेच निविदा स्विकारणे मुदत दि.१५.०९.२००७ अशी ठेवणेत आलेली असून निविदासोबत बयाणा रक्कम व नमुन्यांची मागणी केलेली आहे.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव व गांव |
|---|---|
| ०१. | रेखा डेअरी इंडस्ट्रीज, इंदौर |
| ०२. | मेहता डेअरीज, कोल्हापूर |
| ०३. | जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिकरोड |
| ०४. | अग्रवाल मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट, भोर जि.पुणे |
| ०५. | मोहन सेल्स एजन्सीज, नाशिक |
| ०६. | श्रीजी मिल्क फुडस लिमीटेड, न्यु दिल्ली |

उपरोक्तपैकी अ.नं.६ चे श्रीजी मिल्क फुडस लिमीटेड, न्यु दिल्ली यांची निविदा दि.२०.०९.२००७ रोजी प्राप्त झाल्याने त्यांचे निविदाचा विचार करता येणार नाही. उर्वरीत अ.नं.१ ते ५ च्या निविदाधारकांना आजचे सभेपुढे चर्चेसाठी आमंत्रित करणेत आलेले आहेत.

तरी उपरोक्तप्रमाणे प्राप्त निविदा आजचे सभेत समक्ष उघडणेत येऊन,निविदासादरकर्त्यांना चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांना खालीलप्रमाणे दर देऊ केले आहेत.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव व गांव | ब्रॅण्ड व प्रतीमहा तूप पुरविण्याची क्षमता | निविदे मधील दर रुपये प्रती किलो (व्हॅटसह) | वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये प्रती किलो (व्हॅटसह) |
|---|---|---|---|---|
| ०१. | रेखा डेअरी इंडस्ट्रीज, इंदौर | मोहक/३७५ क्विंटल | १४४.०० | १३२.०० |
| ०२. | मेहता डेअरीज, कोल्हापूर | स्फुर्ती /१६६ क्विंटल | १५०.८० | अनुपस्थित |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०३. | जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिकरोड | आबाद/६०० क्विंटल | १३९.३६ | १३२.०० |
| ०४. | अग्रवाल मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट, भोर जि.पुणे | राजयोग/४०० क्विंटल | १३५.२० | १३५.२० |
| ०५. | मोहन सेल्स एजन्सीज, नाशिक | आबाद | १५०.८० | १३६.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त निविदेतील मे.रेखा डेअरी इंडस्ट्रीज,इंदौर व मे.जयहिंद किराणा स्टोअर्स,नाशिकरोड यांचे दर समान निम्नतम आहेत. मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिकरोड हे संस्थानचे जुने पुरवठादार असून, त्यांनी संस्थानला वेळोवेळी आवश्यकतेनुसार नियमित पुरवठा केलेला आहे. तसेच त्यांची पुरवठ्याची क्षमता व यापूर्वीचा अनुभव लक्षात घेता त्यांना ७५ टक्के मे.रेखा डेअरी इंडस्ट्रीज,इंदौर यांना २५ टक्के तूप पुरविण्याचा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी)

**(१०) कनिष्ठ महाविद्यालयासाठी संगणक,बेंचेस व फर्निचर खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडणे बाबत.**

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२८.०७.२००७ मधील निर्णय क्र.६०४ नुसार श्री साईबाबा कनिष्ठ महाविदयालयासाठी आवश्यक असणारे संगणक, बेंचेस व इतर फर्निचर खरेदीस व त्याकामी येणारे रक्कम रु.२७,५०,०००/-पर्यंतचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यास अनुसरुन दि.०१-०३.०९.२००७ चे दरम्यान वर्तमानपत्रात जाहिरात देऊन शिरडी व मुंबई येथे दि.४ ते १३ सप्टेंबर या कालावधीत निविदा विक्री ठेवणेत आलेली होती. तसेच बयाणा रकमेसह निविदा स्वीकारणे मुदत दि.१५.०९.२००७ अशी ठेवणेत आलेली होती. त्यानुसार मुदतीअंती प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव व गांव |
|---|---|
| ०१ | आर.डी.डाटा सिस्टम्स, नाशिक |
| ०२ | ठक्कर स्टील इंडस्ट्री, नांदेड |
| ०३ | ओम एंटरप्राईजेस, डोंबीवली |
| ०४ | गिल्डा कॉम्प्युटर्स, नांदेड |
| ०५ | साई एंटरप्राईजेस, श्रीरामपूर |
| ०६ | यश कॉम्प्युटर्स, अहमदनगर |
| ०७ | प्रगती इंडस्ट्रीज, संगमनेर |
| ०८ | अल्टीमेट कॉम्प्युटर्स, राहाता |
| ०९ | स्टील फॅब कार्पोरेशन, पुणे |
| १० | काशिको ट्रेडींग प्रा.लिमीटेड, कोपरगांव |
| ११ | सोहम ट्रेडींग कार्पोरेशन, नाशिक |
| १२ | एम.एस.एस.आय.डी.सी.लि.,अहमदनगर |
| १३ | गुणे इंजिनीअरींग कंपनी, पुणे |
| १४ | एस.व्ही.एम. इंडस्ट्रीज, अमरावती |
| १५ | रोहरा कॉम्प्युटर प्रॉडक्टस, मुंबई |
| १६ | मुरबाडकर बिझनेस इंडस्ट्रीज, कल्याण |
| १७ | मल्टी डिस्प्लीनरी ट्रेनिंग सेंटर, डहाणू |
| १८ | चार्मी एंटरप्राईजेस, मुंबई |
| १९ | कॉम्प्युलिंक्स, मुंबई |
| २० | केजेएम ग्रुप सिस्टम सोल्युशन, भायंदर |

तरी उपरोक्तप्रमाणे प्राप्त दरपत्रके उघडणेत येऊन ज्या निविदाधारकांनी बयाणा रक्कम व कागदपत्रे दिलेली आहे. अशा निविदासादरकर्त्यांना आजचे सभेपुढे समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते.

उपरोक्त उपस्थित सर्व निविदासादरकर्त्यांना सभेपूढे समक्ष बोलाविण्यात येऊन, त्यांनी देऊ केलेल्या दरा आणखी सूट देणार किंवा कसे याबाबत लेखी पत्र बंद पाकिटात देणेबाबत सांगण्यात आले.

त्यानुसार निविदासादरकर्त्यांनी देऊ केलेले बंद पाकिटे मा.कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडण्यात आली असता निविदासादरकर्त्यांनी त्यांनी देऊ केलेल्या दरात खालीलप्रमाणे सुट देऊ केली.

| अ.नं. | **निविदाधारकाचे नाव व गांव** | **देऊ केलेली सुट** |
|---|---|---|
| ०१ | आर.डी.डाटा सिस्टम्स, नाशिक | अनुपस्थित |
| ०२ | ठक्कर स्टील इंडस्ट्री, नांदेड | ४ % सुट |
| ०३ | ओम एंटरप्राईजेस, डोंबीवली | अनुपस्थित |
| ०४ | गिल्डा कॉम्प्युटर्स, नांदेड | ५ % सुट |
| ०५ | साई एंटरप्राईजेस, श्रीरामपूर | गोदरेज फर्निचरवर ३.४० % सुट |
| ०६ | यश कॉम्प्युटर्स, अहमदनगर | ७ % सुट |
| ०७ | प्रगती इंडस्ट्रीज, संगमनेर | बेंचेस ५ % स्टॅंड ४ % टेबल ५ % सुट |
| ०८ | अल्टीमेट कॉम्प्युटर्स, राहाता | आयटेमवाईज सूट |
| ०९ | स्टील फॅब कार्पोरेशन, पुणे | बेंचेस रु.४००/-प्रतीनग सुट |
| १० | काशिको ट्रेडींग प्रा.लिमीटेड, कोपरगांव | २ % सुट |

| | | |
|---|---|---|
| ११ | सोहम ट्रेडींग कार्पोरेशन, नाशिक | आयटेमवाईज सुट |
| १२ | एम.एस.एस.आय.डी.सी.लि.,अहमदनगर | बेंचेस रु.२८/-प्रतीनग सुट |
| १३ | गुणे इंजिनीअरींग कंपनी, पुणे | २ % सुट |
| १४ | एस.व्ही.एम. इंडस्ट्रीज, अमरावती | अनुपस्थित |
| १५ | रोहरा कॉम्प्युटर प्रॉडक्टस, मुंबई | अनुपस्थित |
| १६ | मुरबाडकर बिझनेस इंडस्ट्रीज, कल्याण | ३ % सुट |
| १७ | मल्टी डिस्प्लीनरी ट्रेनिंग सेंटर, डहाणू | अनुपस्थित |
| १८ | चार्मी एंटरप्राईजेस, मुंबई | फॅक्सपत्राद्वारे सुट नाही |
| १९ | कॉम्प्युलिंक्स, मुंबई | आयटेमवाईज सुट |
| २० | केजेएम ग्रुप सिस्टम सोल्युशन, भायंदर | १ % सुट |

उपरोक्त पुरवठादारांनी दिलेल्या सुट दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला त्यातील निम्नतम दर खालीलप्रमाणे आहे. मात्र उत्पादकाकडील एक बेंचेसचा नमुना संबंधित विभागाकडून तपासून घेणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

**अ) संगणक -**

| अ.न | निम्नतम दरधारकाचे नांव | तपशिल | निम्नतम दर रुपये |
|---|---|---|---|
| 01. | GUNE ENGINEERING, PUNE | Computer Set -1<br>Compaq Desktop Computer, Intel Pentium 4 2.0 Ghz or Higher, Core 2 Duo Processor ATI Chipset Mbd. 1 GB DDR RAM 160GB 7200 RPM Harddisk DVD Writer with Lightscribe 17"LCD Monitor with Built-in speaker wireless Multimedia Keyboard wireless optical scroll mouse with Licensed copy of window 2003 sever | 47,138.00 |
| 02 | YASH COMP, AHMEDNAGAR | Computer set -2No<br>Compaq Desktop Computer, Intel Pentium 4 2.0 Ghz or Higher, Core 2 Duo Processor ATI Chipset Mbd. 1 GB DDR RAM 160GB 7200 RPM Harddisk DVD Writer with Lightscribe 17"LCD Monitor with Built-in speaker wireless Multimedia Keyboard wireless optical scroll mouse with Licensed copy of window xp+sp3 | 39,060.00 |
| 03 | KJM GROUP BHAYANDER | Computer set -12No<br>Compaq Desktop Computer, Intel Pentium 4 2.0 Ghz or Higher, Core 2 Duo Processor ATI Chipset Mbd. 1 GB DDR RAM 80GB 7200 RPM Harddisk 17"LCD Monitor with Built-in speaker wireless Multimedia Keyboard wireless optical Scroll Mouse with Licensed copy of Windows XP+sp3 | 37,520.00 |
| 04 | R.D.DATA NASHIK | DVD Writer-USB- LG/SONY (1No)<br>Laser Jet Printer HB/1022 (2Nos) | 1300.00<br>9200.00 |
| 05 | SOHAM TRADING CORP. NASHIK | UPS-750 VA 15,min Backup, champion make (5No) | 2100.00 |
| 06 | ROHRA ,MUMBAI | Laserjet printer -HP 1022 (2Nos) | .9200.00 |
| 07 | YASH COMP AHMEDNAGAR | Dot Matrix Printer - Epson LQ 2180 (1NO) | 30,318.00 |

**ब) फर्निचर-**

| अ.न | निम्नतम दरधारकाचे नांव | तपशील | नग | निम्नतम दर रु. |
|---|---|---|---|---|
| 01 | Pragati Ind.Sangamner | **Lecture Stand** | 15 | 1200.00 |
| 02 | KJM GROUP BHAYANDER | **Table** | 20 | 9,899.01 |
| 03 | KJM GROUP BHAYANDER | **Table** | 02 | 12,374.01 |
| 04 | KASHIKO,KOPARGAON | **Fiber Chair** | 100 | 230.30 |
| 05 | KJM GROUP BHAYANDER | **Cushion steel Chairs.** | 10 | 2,276.01 |
| 06 | SAI ENT.SHRIRAMPUR | **Executive Chairs** | 02 | 5,497.51 |
| 07 | KASHIKO,KOPARGAON | **Office Chairs.** | 20 | 1,956.08 |
| 08 | KJM GROUP BHAYANDER | **Storewell** | 10 | 11,681.01 |
| 09 | KJM GROUP BHAYANDER | **Storewell** | 05 | 7,127.01 |
| 10 | KASHIKO,KOPARGAON | **Computer Table** | 15 | 3,856.30 |
| 11 | KJM GROUP BHAYANDER | **Plane Table** | 10 | 890.01 |
| 12 | KASHIKO,KOPARGAON | **Fiber Stool** | 100 | 117.60 |
| 13 | KJM GROUP BHAYANDER | **Notice Board** | 10 | 1,385.01 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 14 | GUNE ENGINEERING, PUNE | **Fixograph Board (English)** | 01 | 8,058.54 |
| 15 | KJM GROUP BHAYANDER | **Steel Book Case** | 20 | 12,473.01 |
| 16 | KJM GROUP BHAYANDER | **Pigeon Hole Lockers.** | 01 | 19,304.01 |
| 17 | R.D.DATA,NASHIK | **Caccum Cleaner** | 02 | 11,00.00 |

**क) बेंचेस-**

| अ.न | निम्नतम दरधारकाचे नांव | **तपशिल** | नग | निम्नतम दर |
|---|---|---|---|---|
| ०१. | स्टील फॅब्र.कार्पो.पुणे | **बेंचेस** | ४०० | २,२९०.०० |

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी)

**(११) श्री साईबाबा रुग्णालयासाठी वार्षिक छपाईकामी प्राप्त झालेले दरपत्रके उघडणे बाबत**

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२९.०६.२००७ मधील निर्णय क्र.४६२ नुसार श्री साईबाबा हॉस्पिटल विभागासाठी आवश्यक असणारे रजिष्टर व फॉर्म्स छपाईस व त्याकामी येणारे रक्कम रु.४ लाख पर्यंतचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार संस्थान जा.क्र.एसएसएस/खरेदी-रुग्णालय/१४३४०/२००७ दि.०८.०९.२००७ अन्वये दि.१५.०९.२००७ अखेर दरपत्रके मागणी करणेत आलेली होती. प्राप्त दरपत्रके मा.व्यवस्थापन उपसमिती सभा दि.४.१०.२००७ मध्ये उघडणेत आलेली आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | **कोटेशन्सादरकर्त्यांचे नाव व गांव** |
|---|---|
| ०१ | प्रिंटवेल प्रिंटर्स, मालेगांव |
| ०२ | मयुर ऑफसेट, श्रीरामपूर |
| ०३ | अभिषेक ऑफसेट, राहुरी |
| ०४ | कॅप्रिकॉन प्रिंटर्स, पुणे |
| ०५ | अविराज पॅकवेल, कोपरगांव |
| ०६ | टेके प्रिंटर्स, अहमदनगर |
| ०७ | युगल प्रिंटर्स, अहमदनगर |
| ०८ | सावता प्रिंटर्स, राहाता |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त दरपत्रकांचा तुलनात्मक तपशील आजचे सभेत सादर करण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना आजचे सभेपुढे समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते.

उपरोक्त उपस्थित सर्व निविदासादरकर्त्यांना सभेपूढे समक्ष बोलाविण्यात येऊन, त्यांनी देऊ केलेल्या दरात आणखी सूट देणार किंवा कसे याबाबत लेखी पत्र बंद पाकिटात देणेबाबत सांगण्यात आले.

त्यानुसार निविदासादरकर्त्यांनी देऊ केलेले बंद पाकिटे मा.कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडण्यात आली असता निविदासादरकर्त्यांनी त्यांनी देऊ केलेल्या दरात खालीलप्रमाणे सुट देऊ केली.

| अ.नं. | **कोटेशन्सादरकर्त्यांचे नाव व गांव** | **देऊ केलेली सुट** |
|---|---|---|
| ०१ | प्रिंटवेल प्रिंटर्स, मालेगांव | अनुपस्थित |
| ०२ | मयुर ऑफसेट, श्रीरामपूर | आयटेमवाईज सुट |
| ०३ | अभिषेक ऑफसेट, राहुरी | २ % सुट |
| ०४ | कॅप्रिकॉन प्रिंटर्स, पुणे | आयटेमवाईज सुट |
| ०५ | अविराज पॅकवेल, कोपरगांव | २ % सुट |
| ०६ | टेके प्रिंटर्स, अहमदनगर | अनुपस्थित |
| ०७ | युगल प्रिंटर्स, अहमदनगर | ५ % सुट |
| ०८ | सावता प्रिंटर्स, राहाता | २ % सुट |

उपरोक्त पुरवठादारांनी दिलेल्या निम्नतम दरधारकाचा तपशिल खालीलप्रमाणे -

| अ.नं. | **कोटेशन्सादरकर्त्यांचे नाव व गांव** | **निम्नतम दराने येणारी रक्कम** |
|---|---|---|
| ०१ | मयुर ऑफसेट, श्रीरामपूर | १,१८,१३६.४० |
| ०२ | अविराज पॅकवेल, कोपरगांव | ७८,२१०.३० |
| ०३ | टेके प्रिंटर्स, अहमदनगर | ४९,७२५.०० |
| ०४ | प्रिंटवेल प्रिंटर्स, मालेगांव | ३५,१५०.०० |
| ०५ | सावता प्रिंटर्स, राहाता | २६,८३८.२० |
| ०६ | कॅप्रिकॉन प्रिंटर्स, पुणे | ११,०५०.०० |
| | एकूण | ३,१९,१०९.९० |

उपरोक्त निम्नतम दरधारकाचे न्यूनतम दर स्विकारणेत यावेत,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी)

**(१२) श्रीसाईबाबा दैनंदिनी व दिनदर्शिका- २००८ छपाई कामाचे कोटेशन्स उघडून निर्णय घेणे**

मा. व्यवस्थापन समितीचे दि.२८.०७.२००७ चे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.२७ निर्णय क्र.६२२ नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी प्रकाशित श्री साईबाबा दैनंदिनी व दिनदर्शिका २००८ छपाई करणेस मान्यता देणेत आली आहे. त्यानुसार खालील दर्शविल्याप्रमाणे श्री साईबाबा दैनंदिनी व दिनदर्शिका २००८ छपाई करुन घेण्याचे ठरले आहे.

| अ.नं. | तपशिल | छपाई संख्या |
|---|---|---|
| ०१ | श्री साईबाबा दैनंदिनी २००८ | ९०,००० नग |
| ०२ | श्री साईबाबा दिनदर्शिका २००८<br>६ सीट तारखेसह व नावासह<br>(प्रत्येक सीटवर दोन महिने) | १,००,००० नग |
| ०३ | श्री साईबाबा दिनदर्शिका २००८<br>सिंगल सीट ( दिनदर्शिकेचे खालील बाजूस प्रतिमहा तारखेसह १२ सीट) | २,००,००० नग |

वरीलप्रमाणे श्री साईबाबा दैनंदिनी व दिनदर्शिका २००८ चे छपाईचे काम हे खालील ३० निवडक प्रेसधारकांना जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/१३१६७ दि.२२.०८.२००७ नुसार श्री साईबाबा दैनंदिनी/दिनदर्शिका २००८ छपाई कामाचे कोटेशन्स पाठविण्यात येवून, ते पूर्णपणे भरुन दि.१२.०९.२००७ अखेर पाठविण्याचे कळविण्यात आले आहे.

| **अ.नं.** | **प्रेसधारकाचे नाव** |
|---|---|
| ०१ | मे.युनायटेड मल्टीकलर प्रिंटर्स,पुणे |
| ०२ | मे.अमल ऑफसेट प्रा.प्रा.लि.दादर, मुंबई |
| ०३ | मे.रविक आर्टस् ॲन्ड प्रिंटर्स प्रा.लि.वडाळा, मुंबई |
| ०४ | मे.ब्ल्यु बर्ड (इंडिया) प्रा.लि.पुणे. |
| ०५ | मे.निट प्रिंटर्स, अहमदनगर |
| ०६ | मे.कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई |
| ०७ | मे.सुमंगल आरटेक, मुंबई |
| ०८ | मे मॅग्ना ग्रॅफिक्स (इंडिया) प्रा.लि.मुंबई. |
| ०९ | मे.बळवंत प्रिंटर्स, पुणे |
| १० | मे.प्रिंटोग्राफी फोर्ट, मुंबई |
| ११ | मे.प्रिंटमन, मुंबई |
| १२ | मे.विकास इले.(सकाळ पेपर्स) सातपूर, नाशिक |
| १३ | मे.अजय ऑफसेट प्रा.लि.पुणे |
| १४ | मे.प्रिंट पॅक बिजनेस फॉमर्स प्रा.लि. लातुर |
| १५ | मे.माणिकचंद नंदादिप पेपर प्रॉ.प्रा.लि., पुणे |
| १६ | मे.चिराग प्रिंटर्स, मुंबई |
| १७ | मे.चेरी ऑफसेट प्रिटींग ॲण्ड पॅकेजिंग इंडस्ट्रीज प्रा.लि. सोलापूर |
| १८ | मे न्यू राधारमण प्रिटींग प्रेस., मुंबई |
| १९ | मे सेफ ऑफसेट प्रायव्हेट लि., मुंबई |
| २० | मे नेक्टर प्रिंटर्स प्रायव्हेट लि., मुंबई |
| २१ | मे कल्याणी कार्पोरेशन, पुणे |
| २२ | मे ओनस प्रिंट सोलुशन (इंडिया) प्रा.लि., मुंबई |
| २३ | मे निर्मल ऑफसेट प्रा.लि., नाशिक |
| २४ | मे दि.प्रिमियर को-ऑपरेटिव्ह प्रिंटर्स लि.चे महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे |
| २५ | मे ऑस्कर ऑफसेट प्रा.लि., मुंबई |
| २६ | मे उचित ग्राफिक्स प्रिंटर्स प्रा.लि., मुंबई |
| २७ | मे एस.व्ही. प्रिंटर्स मुंबई |
| २८ | मे.प्रेमियर प्रेस,सिंकदराबाद |
| २९ | साई सिक्युरिटी प्रिंटर्स लि., बंगलोर |
| ३० | श्रीरंग प्रकाशने प्रा.लि., नाशिक |

वरील एकूण ३० प्रेसधारकांपैकी दि.१२.०९.२००७ अखेर मुदतीत खालील प्रमाणे निवडक प्रेसधारकांची कोटेशन्स् दाखल झाली आहेत.

| **अ.नं.** | **प्रेसधारकाचे नाव** |
|---|---|
| ०१ | मे.युनायटेड मल्टीकलर प्रिंटर्स,पुणे |
| ०२ | मे.अमल ऑफसेट प्रा.प्रा.लि.दादर, मुंबई/नाशिक |
| ०३ | मे.निट प्रिंटर्स, अहमदनगर |
| ०४ | मे.कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई |
| ०५ | मे मॅग्ना ग्रॅफिक्स (इंडिया) प्रा.लि.मुंबई. |
| ०६ | मे.बळवंत प्रिंटर्स, पुणे |
| ०७ | मे.अजय ऑफसेट प्रा.लि.पुणे |
| ०८ | मे.चेरी ऑफसेट प्रिटींग ॲण्ड पॅकेजिंग इंडस्ट्रीज प्रा.लि. सोलापूर |
| ०९ | मे न्यू राधारमण प्रिटींग प्रेस., मुंबई |
| १० | मे कल्याणी कार्पोरेशन, पुणे |
| ११ | मे दि.प्रिमियर को-ऑपरेटिव्ह प्रिंटर्स लि.चे महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे |

| | |
|---|---|
| १२ | मे ऑस्कर ऑफसेट प्रा.लि., मुंबई |
| १३ | मे एस.व्ही. प्रिंटर्स मुंबई |
| १४ | साई सिक्युरिटी प्रिंटर्स लि., बंगलोर |
| १५ | श्रीरंग प्रकाशने प्रा.लि., नाशिक |

उपरोक्त प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन कोटेशन्स सादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव | श्री साईबाबा दैनंदिनी- २००८ | श्री साईबाबा दिनदर्शिका- २००८ (६ सिट तारखेसह व नावासह प्रत्येक सिटवर दोन महिने) | श्री साईबाबा दिनदर्शिका- २००८ (सिंगल सिट दिनदर्शिकेच्या खालील बाजूस प्रतिमहा तारखेसह १२ सिट ) |
|---|---|---|---|---|
| ०१ | मे.युनायटेड मल्टीकलर प्रिंटर्स,पुणे | | | |
| | निविदेतील दर | ६९.५२ | ९.१६ | ६.७८ |
| | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |
| ०२ | मे.अमल ऑफसेट प्रा.प्रा.लि.दादर, मुंबई/नाशिक | | | |
| | निविदेतील दर | --- | १२.७० | ८.१३ |
| | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर | --- | १२.६५ | ८.०८ |
| ०३ | मे.निट प्रिंटर्स, अहमदनगर | | | |
| | निविदेतील दर | ५६.८० | ९.७५ | ८.५० |
| | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर | ५४.०० | ९.०० | ८.०० |
| ०४ | मे.कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई | | | |
| | निविदेतील दर | ५४.२० | ८.४५ | --- |
| | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |
| ०५ | मे मॅग्ना ग्रॉफिक्स (इंडिया) प्रा.लि.मुंबई. | | | |
| | निविदेतील दर | ५३.३३ | ८.८७ | ५.९२ |
| | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर | ५०.०० | ८.४० | ५.७० |
| ०६ | मे.बळवंत प्रिंटर्स, पुणे | | | |
| | निविदेतील दर | ४९.५० | ८.९२ | --- |
| | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |
| ०७ | मे.अजय ऑफसेट प्रा.लि.पुणे | | | |
| | निविदेतील दर | --- | ८.४३ | ४.७६ |
| | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |
| ०८ | मे.चेरी ऑफसेट प्रिटींग ॲण्ड पॅकेजिंग इंडस्ट्रीज प्रा.लि. सोलापूर | | | |
| | निविदेतील दर | ५३.५० | ९.०५ | ५.८० |
| | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर | ५३.५० | ८.७५ | ५.४० |
| ०९ | मे न्यू राधारमण प्रिटींग प्रेस., मुंबई | | | |
| | निविदेतील दर | ६२.६६ | ९.५९ | ६.५८ |
| | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर | ६१.६६ | ९.०० | ६.०० |
| १० | मे कल्याणी कार्पोरेशन, पुणे | | | |
| | निविदेतील दर | ४९.४४ | ९.९९ | ४.९५ |
| | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर | ४७.४४ | ८.८९ | ४.७५ |
| ११ | मे दि.प्रिमियर को-ऑपरेटिव्ह प्रिंटर्स लि.चे महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे | | | |
| | निविदेतील दर | ५६.७१ | ११.८२ | ७.५२ |
| | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर | ५०.०० | ११.८२ | ७.५२ |
| १२ | मे ऑस्कर ऑफसेट प्रा.लि., मुंबई | | | |
| | निविदेतील दर | ४७.८२ | ९.२० | ६.३९ |
| | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर | ४६.८० | ९.१० | ६.२९ |
| १३ | मे एस.व्ही. प्रिंटर्स मुंबई | | | |
| | निविदेतील दर | --- | ११.१० | ७.२५ |
| | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |
| १४ | साई सिक्युरिटी प्रिंटर्स लि., बंगलोर | | | |
| | निविदेतील दर | --- | ९.६० | ५.६५ |
| | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर | --- | ८.४५ | ५.२५ |
| १५ | श्रीरंग प्रकाशने प्रा.लि., नाशिक | | | |
| | निविदेतील दर | ५४.२७ | ९.७१ | ६.८९ |
| | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |

यावर सविस्तर चर्चा होऊन दैनंदिनी छपाईकामी मे दि.प्रिमियर को-ऑपरेटिव्ह प्रिंटर्स लि.चे महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे ही सहकारी संस्था असून त्यांनी मागील वर्षाचे दैनंदिनी छपाईचे काम केलेले आहे. त्यांचे दर जरी जास्त असले तरी त्यांचे छपाईचा दर्जा चांगला असल्याने श्री साईबाबा दैनंदिनी २००८ छपाईचे काम प्रती दैनंदिनी छपाई दर रुपये ५०/-प्रमाणे मे दि.प्रिमियर को-ऑपरेटिव्ह प्रिंटर्स लि.चे महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे यांना देण्यात यावे, कागद खरेदीपोटी त्यांना मागणीनुसार रुपये २५ लाख ॲडव्हान्स देणेत यावा,असें ठरले.

तसेच श्रीसाईबाबा दिनदर्शिका- २००८ (सहा सिट तारखेसह व नावासह प्रत्येक सिटवर दोन महिने) करिता मे.मॅग्ना ग्राफिक्स (इं) प्रा.लि., मुंबई यांचे (प्रति दिनदर्शिका रु.८.४०) तसेच श्री

साईबाबा दिनदर्शिका- २००८ (सिंगल सिट दिनदर्शिकेच्या खालील बाजूस प्रतिमहा तारखेसह १२ सिट) करिता मे कल्याणी कार्पोरेशन, पुणे यांचे (प्रति दिनदर्शिका रु.४.७५) निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस आहे.

याचवेळी झालेल्या चर्चेत श्री साईबाबांची समाधी फक्त शिर्डी येथेच असून मूळ मंदिर शिर्डी येथेच आहे. देशात कोठेही श्री साईबाबा संस्थानचे अधिकृत मंदिर नाही व देशात असलेल्या इतर मंदिरास श्री साईबाबा संस्थानची मान्यता नाही असे दैनंदिनीमध्ये मराठी,हिन्दी व इंग्रजीतुन स्वतंत्र पानावर विनम्र आवाहन भक्तांना करण्यात यावे,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने प्रमुख)

**(१३) श्रीसाई सच्चरित मराठी पोथीची सुपर डिलक्स आवृत्ती छपाई कामाचे कोटेशन्स उघडून निर्णय घेणेबाबत.**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी प्रकाशित कै.गोविंद रघुनाथ दाभोलकर कृत श्री साई सच्चरित मराठी पोथी ( सुपर डिलक्स आवृत्ती ) अद्यावत स्वरुपात प्रकाशित करणेस मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक- १४.१०.२००६ रोजीचे सभेतील विषय नं. ३१ निर्णय क्र. ८१४ अन्वये २००० प्रती प्रती नग दर रु. १६०/- प्रमाणे एकूण रु. ३,२०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. श्री साई सच्चरित मराठी पोथीची सुपर डिलक्स आवृत्ती छपाईचे काम हे अत्यंत जिगरीचे असल्याने प्रथम आवृत्ती उत्कृष्ट दर्जाची होणेसाठी फक्त मुंबई येथील खालील १४ निवडक प्रेसधारकांना जा.नं.एसएसएस.वशी-प्रकाशने-१२९५९/१७.०८.२००७ अन्वये कोटेशन पाठवून ते दिनांक-०७.०९.२००७ अखेर भरुन पाठविणेस कळविले होते. त्याचा तपशिल..

| अ.नं. | **प्रेसधारकांचे नांव** | अ.नं. | **प्रेसधारकांचे नांव** |
|---|---|---|---|
| ०१ | मे. रविक आर्टस् ॲण्ड प्रिंटर्स प्रा.लि.,मुंबई | ०२ | मे. कमर्शियल बुक बायडिंग वर्क्स, मुंबई |
| ०३ | मे. सुमंगल आरटेक ,अंधेरी (पू.)मुंबई | ०४ | मे.मॅग्ना ग्राफिक्स ( इंडिया) लि., मुंबई |
| ०५ | प्रिंटमन्न, मुंबई | ०६ | मे. प्रिंटोग्राफी,मुंबई |
| ०७ | न्यू राधारमण प्रिंटींग प्रेस, मुंबई | ०८ | मे. चिराग प्रिंटर्स, मुंबई |
| ०९ | नेक्टर प्रिंटर्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई | १० | सेफ ऑफसेट प्रायव्हेट लि., मुंबई |
| ११ | मे.ओनस प्रिंट सोल्युशन ( इंडिया ) प्रा.लि.,मुंबई | १२ | मे.ऑस्कर ऑफसेट प्रायव्हेट लि., मुंबई. |
| १३ | उचिता ग्राफिक प्रिंटर्स प्रा.लि.,मुंबई | १४ | एस.व्ही.प्रिंटर्स, मुंबई |

वरील एकूण १४ निवडक प्रेसधारकांपैकी दि.०७.०९.२००७ अखेर मुदतीत खालीलप्रमाणे प्रेसधारकांची कोटेशन्स दाखल झालेली आहेत.

| अ.नं. | **प्रेसधारकांचे नांव** | अ.नं. | **प्रेसधारकांचे नांव** |
|---|---|---|---|
| ०१ | मे. कमर्शियल बुक बायडिंग वर्क्स, मुंबई | ०२ | मे.मॅग्ना ग्राफिक्स ( इंडिया) लि.,कांदिवली ( पश्चिम),मुंबई |
| ०३ | न्यू राधारमण प्रिंटींग प्रेस, मुंबई | ०४ | सेफ ऑफसेट प्रायव्हेट लि., मुंबई |
| ०५ | मे.ऑस्कर ऑफसेट प्रायव्हेट लि.,नवी मुंबई. | | |

उपरोक्त प्रमाणे मुदतीत प्राप्त झालेली खालीलप्रमाणे कोटेशन्स आजचे सभेत उघडणेत आले असता कोटेशनधारकांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं | कोटेशनसादरकर्त्यांचे नाव | कोटेशनमध्ये देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|
| ०१ | मे.कमर्शियल बुक बायडिंग वर्क्स,मुंबई | ३३७.०० |
| ०२ | मे.मेग्ना ग्राफीक्स (इं) प्रा.लि.,मुंबई | ३२४.७० |
| ०३ | मे.न्यू राधारमण प्रिंटींग प्रेस, मुंबई | ५१४.८० |
| ०४. | मे.सेफ ऑफसेट प्रा.लि.,मुंबई | ४६०.०० |
| ०५ | मे.ऑस्कर ऑफसेट प्रा.लि.,नवी मुंबई | २५५.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन,मे.ऑस्कर ऑफसेट प्रा.लि., नवी मुंबई यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, याकामी १,९०,०००.०० मात्रचे जादा खर्चास मान्यता देण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने प्रमुख)

**(१४) श्रीसाईबाबांचे छायाचित्रित पॉकेट साईज फोटोबाबत.**

मे मॅग्ना ग्राफिक्स (इंडिया) लि., मुंबई यांनी त्यांचे दि. ०८.०९.२००७ चे पत्राद्वारे ३डी श्री साईबाबांचे छायाचित्रीत पॉकेट साईज फोटो आकार २.५" x ३.५" चे ११,००० (अकरा हजार ) नग संस्थानला देणगी स्वरुपात देणेबाबत इच्छा दर्शविली आहे. उपरोक्त फोटो छपाईकामी त्यांना प्रति नग दर रु.६.६० पैसे मात्र खर्च येणार असलेबाबत त्यांनी कळविले आहे. यासाठी त्यांनी उपरोक्त फोटोची संस्थानकडून मागणी करणेबाबत विनंती केली आहे.

सदरचे फोटो मागिल वर्षी मे. मॅग्ना ग्राफिक्स (इंडिया) लि., मुंबई यांनी ना नफा ना तोटा या तत्वावर छपाई किंमतीचे दराने पुरवठा करण्याची तयारी दर्शविली होती. याबाबत निर्णयास्तव मा. व्यवस्थापन समितीचे दि.१४.१०.२००६ रोजीचे सभेतील विषय नं. २६ निर्णय क्र. ८७३ नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी द्वारा फक्त संस्थान प्रकाशित फोटोंचीच विक्री केली जाते.

इतर खाजगी श्री साईबाबांचे फोटो, पोस्टरची विक्री केली जात नाही. यामुळे सदरचा प्रस्ताव स्वीकारला गेला नाही. तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी द्वारा दिनदर्शिका २००८ सिक्स शिटर व श्री साईबाबा दिनदर्शिका सिंगल सिट प्रकाशित करुन श्री साईभक्तांना विक्रीस उपलब्ध करुन देण्याचे नियोजन आहे.

मे. मॅग्ना ग्राफिक्स (इंडिया) लि., मुंबई यांनी सदरचे ३डी श्री साईबाबांचे छायाचित्रीत पॉकेट साइज फोटो सुबक व आकर्षक असल्याबाबत कळविले आहे. तरी मे. मॅग्ना ग्राफिक्स (इंडिया) लि., मुंबई यांचेकडून उपरोक्तप्रमाणे ३ डी श्री साईबाबांचे छायाचित्रीत पॉकेट फोटो आकार २.५" x ३.५" चे ११,००० (अकरा हजार) नग प्रती नग छपाई रु.६.६० पैसे प्रमाणे देणगी म्हणून स्वीकारणेस व ते प्रति नग रु.७/- प्रमाणे संस्थानमार्फत विक्री करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने प्रमुख)

**(१५) श्रीसाईसच्चरित मराठी (पोथी) ची ऑडिओ सी.डी. मास्टरची निर्मितीकामी ध्वनी मुद्रणाकरिता लागणाऱ्या स्टुडिओ भाडे संबंधीत कोटेशन्स उघडून निर्णय घेणे.**

श्रीसाईबाबा संस्थान प्रकाशित श्री साई सच्चरित मराठी या ५३ अध्याय असलेल्या पोथीची ऑडीओ सी.डी. साईभक्तांना उपलब्ध करुन देण्याबाबत मानस असल्याने मा. व्यवस्थापन समितीचे दि.२८.०७.२००७ चे सभेतील निर्णय क्रं ५५८ या समंत निर्णयानुसार कै. गोविंद रघुनाथ दाभोलकर कृत श्री साई सच्चरित मराठी (पोथी) ची ऑडीओ सी.डी. ची निर्मिती करणेस व त्यासाठी स्टुडिओ भाडे, गायक मानधन बील , गायिका मानधन बिल, ब्लॅन्क डी.व्ही.डी./सी.डी /डॉट मास्टरिंग चार्जेस, किबोर्ड चार्जेस , प्रवास खर्च व इतर या प्रमाणे येणा-या एकूण रुपये १०,६०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळाली आहे.

उपरोक्तप्रमाणे कै. गोविंद रघुनाथ दाभोलकर कृत श्री साईसच्चरित मराठी (पोथी) ची ऑडीओ सी.डी. मास्टरची निर्मितीची कार्यवाही श्री.सुधांशू लोकेगावकर , संगीत व कला मार्गदर्शक, कन्या विद्यामंदिर शिर्डी यांचे मार्गदर्शनाखाली करुन घेणे आहे. यासाठी श्री साई सच्चरित मराठी (पोथी) ची ऑडीओ सी.डी. मास्टर निर्मितीकामी ध्वनिमुद्रणाकरीता स्टुडिओ भाडे चार महिन्यासाठी (१२० दिवस) भाडे दर ताशी रुपये ४००/- (चारशे) प्रमाणे १० तास x १२० दिवस x ४०० यानुसार रुपये ४,८०,०००/- भाड्याचे अपेक्षित रक्कमेचा खर्च लागणार आहे. याबाबत स्टुडिओ भाडे संबंधीत कोटेशन्स ही श्री. सुधांशू लोकेगावकर , संगीत व कला मार्गदर्शक, कन्या विद्यामंदिर, शिर्डी यांनी प्रत्यक्ष मुंबई येथे जाऊन तीन स्टुडिओ धारकांची कोटेशन्स आणलेली आहेत त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | स्टुडिओ धारकाचे नांव |
|---|---|
| ०१ | स्टुडिओ-ऑडिओ गेमिक्स, दादर मुंबई |
| ०२ | सीटी हार्ट डिजिटल , अंधेरी मुंबई |
| ०३ | डिअर स्टुडिओ, मुंबई |

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स न उघडता श्रीसाईसच्चरित मराठी (पोथी) ची ऑडिओ सी.डी. मास्टरची निर्मितीकामी सौ. ज्योत्स्ना गणपुले, पुणे यांचेकडून प्रस्ताव मागविणेत येऊन सदर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे मान्यतेसाठी सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने प्रमुख)

**(१६) साईभक्तांना पुस्तके/ फोटोसाठी प्लॅस्टीक पिशव्या उपलब्ध करुन देणेबाबत.**

श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी. प्रकाशित प्रकाशने विभागाद्वारे एकूण ६७ प्रकारचे पुस्तके व २२ प्रकारचे फोटो तसेच ९ प्रकारामध्ये इलेक्ट्रॉनिक्स ॲटम त्यात संस्थान निर्मित श्री साईबाबा मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार कॅसेट/सी.डी., व्हीसीडी , डी.व्ही.डी., शिर्डीदर्शन व्हीसीडी साईभक्तांसाठी प्रकाशने पुस्तके/फोटो विक्री काऊंटर नं.१ व २ वर भक्तांना उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.

संस्थान प्रकाशित पुस्तके/फोटो व इतर इलेक्ट्रॉनिक्स कॅसेट, सी.डी. साईभक्तांना सुव्यवस्थित नेणेसाठी प्लॅस्टीक पिशव्यांमधून देणेकामी प्लॅस्टीक पिशव्या खरेदी करण्यात येवून साईभक्तांना काऊंटरवर उपलब्ध करुन दिल्यास साईभक्तांना पुस्तके/फोटो व इतर इलेक्ट्रॉनिक्स कॅसेट, सी.डी. नेण्यास चांगला उपयोग होऊ शकेल. त्यासाठी प्लॅस्टीक पिशव्या खरेदी करणेकामी खालील साईजनुसार प्लॅस्टीक पिशव्या साईजनुसार दरपत्रक अवलोकनार्थ सादर केले आहे.

| अ.नं. | तपशिल | साईज | प्रति हजारी दर रुपये | पिशवी क्षमता |
|---|---|---|---|---|
| ०१ | पांढरी पिशवी | १७" x २३" | ६१०/- | ७ नग पुस्तकांसाठी वापरता येईल. (वजन ७ किलो) |
| ०२ | पांढरी पिशवी | १६" x २०" | ५४०/- | ५नग पुस्तकांसाठी वापरता येईल. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | (वजन ५ किलो) |
| ०३ | पांढरी पिशवी | १३" x १६" | ३००/- | ३ नग पुस्तकांसाठी वापरता येईल. (वजन ३ किलो) |
| ०४ | पांढरी पिशवी | ९" x १३" | १९०/- | १ नग पुस्तकांसाठी वापरता येईल. (वजन १ किलो) |

उपरोक्तप्रमाणे प्लॅस्टीक पिशव्या खरेदी केल्यास खालीलप्रमाणे कार्यवाही करता येईल.

उपरोक्तप्रमाणे अ.नं.१ मध्ये दर्शविलेप्रमाणे प्लॅस्टीक पिशव्या साईभक्तांना उपलब्ध करुन दिल्यास त्याचा जास्तीत जास्त ७ पुस्तके/फोटो मागणी करणा-या साईभक्तांना चांगला उपयोग होऊ शकेल त्याचा किरकोळ प्रमाणात पुस्तके/फोटो खरेदी करणा-या भक्तांना देणे उचित होणार नाही.

अ.नं. २ मध्ये दर्शविलेप्रमाणे प्लॅस्टीक पिशव्या साईभक्तांना उपलब्ध करुन दिल्यास त्याचा किरकोळ प्रमाणात मागणी करणा-या जास्तीत जास्त ५ पुस्तके/फोटो व त्यापेक्षा कमी मागणी करणा-या साईभक्तांनाही चांगला उपयोग होऊ शकेल.

तरी यासाठी अ.नं. २ यात दर्शविलेली पांढरी पिशवी साईज १६" x २०" प्रति हजारी रुपये ५४०/- प्रमाणे खरेदी केल्यास प्रकाशने विभागाअंतर्गत दोन्ही बुकस्टॉलसाठी अंदाजे वर्षभरात अनुक्रमे प्रत्येकी १,००,००० नग या प्रमाणे २,००,००० नग प्लॅस्टीक पिशव्या संस्थानचे वर्षभराच्या टेंडरमध्ये नमुद करुन खरेदी करणेस व त्यासाठी एकूण रुपये १,०८,०००/- मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने प्रमुख)

**(१७) पुस्तके/उत्कृष्ट दर्जाचे रंगीत फोटो साईभक्तांना उपलब्ध करुन देणेबाबतचे कोटेशन्स उघडून निर्णय घेणे.**

मा.व्यवस्थापन समितीचे दि. २८.०७.२००७ रोजीचे सभेतील निर्णयानुसार तसेच जा.नं.एसएसएस/वशी/ प्रकाशने/ १३९४२/२००७ दि.३०.०८.२००७ ने मराठी भाषेतील १ पुस्तक व ५ फोटो पाच रंगात एकाच साईजमधील छपाई करणेकामी खालील ३० निवडक प्रेसधारकांना छपाई कामाचे कोटेशन पाठवून ते दि.२५.०९.२००७ पर्यंत मुदतीत भरुन जमा करणेविषयी कळविण्यात आले आहे.

| .नं. | प्रेसधारकाचे नाव | अ.नं. | प्रेसधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ०१ | मे.युनायटेड प्रिंटर्स,पुणे | १६ | मे.चिराग प्रिंटर्स, मुंबई |
| ०२ | मे.अमल ऑफसेट प्रा.प्रा.लि.दादर, मुंबई | १७ | मे.चेरी ऑफसेट प्रिंटींग ॲण्ड पॅकेजिंग इंडस्ट्रीज प्रा.लि. सोलापूर |
| ०३ | मे.रविक आर्टस् ॲन्ड प्रिंटर्स प्रा.लि.वडाळा, मुंबई | १८ | मे न्यू राधारमण प्रिंटींग प्रेस., मुंबई |
| ०४ | मे.ब्ल्यु बर्ड (इंडिया) प्रा.लि.पुणे. | १९ | मे सेफ ऑफसेट प्रायव्हेट लि., मुंबई |
| ०५ | मे.निट प्रिंटर्स, अहमदनगर | २० | मे नेक्टर प्रिंटर्स प्रायव्हेट लि., मुंबई |
| ०६ | मे.कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई | २१ | मे कल्याणी कार्पोरेशन, पुणे |
| ०७ | मे.सुमंगल आरटेक, मुंबई | २२ | मे ओनस प्रिंट सोल्युशन इंडिया प्रा.लि.,मुंबई |
| ०८ | मे मॅग्ना ग्रॉफिक्स (इंडिया) प्रा.लि.मुंबई. | २३ | मे निर्मल ऑफसेट प्रा.लि., नाशिक |
| ०९ | मे.बळवंत प्रिंटर्स, पुणे | २४ | महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे |
| १० | मे.प्रिंटोग्राफी फोर्ट, मुंबई | २५ | मे ऑस्कर ऑफसेट प्रा.लि., मुंबई |
| ११ | मे.प्रिंटमन, मुंबई | २६ | मे उचित ग्राफिक्स प्रिंटर्स प्रा.लि., मुंबई |
| १२ | मे.विकास इले.(सकाळ पेपर्स) सातपूर, नाशिक | २७ | मे एस.व्ही. प्रिंटर्स मुंबई |
| १३ | मे.अजय ऑफसेट प्रा.लि.पुणे | २८ | मे.प्रेमियर प्रेस,सिंकदराबाद |
| १४ | मे.प्रिंट पॅक बिजनेस फॉमर्स प्रा.लि. लातुर | २९ | श्रीरंग प्रकाशन प्रा.लि.,नाशिक |
| १५ | मे.माणिकचंद नंदादिप पेपर प्रॉ.प्रा.लि., पुणे | ३० | साई सिक्युरिटी प्रिंटर्स लि., बंगलोर |

उपरोक्त पैकी खालील ८ निवडक प्रेसधारकांची कोटेशन्स प्राप्त झाली आहेत.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव | अ.नं. | प्रेसधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ०१ | मे न्यू राधारमण प्रिंटींग प्रेस., मुंबई | ०२ | मे.निट प्रिंटर्स, अहमदनगर |
| ०३ | मे कल्याणी कार्पोरेशन, पुणे | ०४ | मे मॅग्ना ग्रॉफिक्स (इंडिया) प्रा.लि.मुंबई. |
| ०५ | मे.बळवंत प्रिंटर्स, पुणे | ०६ | महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे |
| ०७ | मे.अजय ऑफसेट प्रा.लि.पुणे | ०८ | साई सिक्युरिटी प्रिंटर्स लि., बंगलोर |

उपरोक्त प्रमाणे मुदतीत प्राप्त झालेली कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडणेत आले असता कोटेशन्स सादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहे.

| अ.नं. | कोटेशनसादरकर्त्यांचे नाव | श्रीसाईनाथ स्तवन मंजरी व सुमनाजंली मराठी २९ वी आवृत्ती | दगडावर बसलेले बाबा ५ रंगात रंगीत २०"x २८" | द्वारकामाई बाबा ५ रंगात रंगीत २०"x २८" | द्वारकामाईत कानाला हात लाऊन बसलेले बाबा ५ रंगात रंगीत २०" x २८" | श्रीसाईबाबा मुर्ती फोटो ५ रंगात रंगीत २०" x २८" | श्रीसाईबाबा पालखी फोटो ५ रंगात रंगीत २०" x २८" |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ |
| ०१ | मे.न्यू राधारमण प्रिटींग प्रेस, मुंबई | २.५५ | ६.५५ | ६.५५ | ६.५५ | ६.५५ | ६.५५ |
| ०२ | मे कल्याणी कार्पोरेशन, पुणे | १.६४ | **५.७१** | **५.७१** | **५.७१** | ५.७१ | **५.७१** |
| ०३ | मे.बळवंत प्रिंटर्स,पुणे | --- | ५.७२ | ५.७२ | ५.७२ | ५.७२ | ५.७२ |
| ०४ | मे.अजय ऑफसेट प्रा.लि.पुणे | **१.६३** | ५.७४ | ५.७३ | ५.७१ | **५.७०** | ५.७२ |
| ०५ | मे.निट प्रिंटर्स, अहमदनगर | --- | ७.०० | ७.०० | ७.०० | ७.०० | ७.०० |
| ०६ | मे.मेग्ना ग्राफीक्स (इं) प्रा.लि.,मुंबई | १.९३ | ५.७३ | ५.७३ | ५.७३ | ५.७३ | ५.७३ |
| ०७ | मे.महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे | १.६५ | ७.३८ | ७.३८ | ७.३८ | ७.३८ | ७.३८ |
| ०८ | मे.साई सिक्यूरिटी प्रिंटर्स,बंगलोर | --- | ६.०३ | ६.०३ | ६.०३ | ६.०३ | ६.०३ |

यावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त तक्त्यातील अधोरेखीत निम्नतम दर मान्य करण्यात यावेत, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने प्रमुख)

**(१८) निरोपयोगी /खरात लोखंडी खुर्च्या वार्षिक उच्चतम दराने विक्री करणेबाबत.**

माहिती तंत्रज्ञान विभागाच्या डेडस्टॉक रजिष्टरला रिव्हॉल्व्हींग चेअर्स सततच्या वापरामुळे खराब झालेल्या असून वापरायोग्य नाहीत सदरच्या लोखंडी रिव्हॉल्व्हींग चेअर्स बऱ्याच वर्षापासून वापरुन निरोपयागी/ खराब झालेल्या आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | संगणक कोड नं. | ॲसेट टाईफ | तपशिल | नग | घसारा वजा जाता किंमत |
|---|---|---|---|---|---|
| 01 | CHR/033 | FURN | COMPUTER USSERE | 01 | 95.00 |
| 02 | CHR/034 | FURN | SWEVEL CHAIRS GODREJ | 01 | 95.00 |
| 03 | CHR/074 | FURN | WORK CHAIR WITHOUT ARMS | 01 | 240.00 |
| 04 | CHR/075 | FURN | WORK CHAIR WITHOUT ARMS | 01 | 240.00 |
| 05 | CHR/078 | FURN | GODREJ WORK CHAIR WITHOUT ARMS | 01 | 60.00 |
| 06 | CHR/102 | FURN | GODREJ WORK CHAIR (IRON) | 01 | 1325.00 |
| 07 | CHR/106 | FURN | GODREJ WORK CHAIR (IRON) | 01 | 1325.00 |
| | | | | | 3380.00 |

उपरोक्त निकामी झालेल्या रिव्हॉल्व्हींग चेअर्स वार्षिक उच्चतम दराने विक्री करुन त्या माहिती तंत्रज्ञान विभागाचे डेडस्टॉकमधून कमी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, माहिती तंत्रज्ञान विभागाकडील उपरोक्त निकामी झालेल्या रिव्हॉल्व्हींग चेअर्स जाहिर लिलावाने विक्री करणेत यावी व त्या स्टॉकमधून कमी करणेत याव्या, अशी या उपसमितीची शिफारस आहे.

**(१९) नवीन व्दारावती भक्तनिवास इमारतीमध्ये अंतर्गत दुरध्वनी सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी केबल व इतर साहित्य खरेदी करणेबाबत.**

संस्थानची अंतर्गत दूरध्वनी व्यवस्था अधिक गतीमान व अत्याधुनिक होणेसाठी तत्कालीन मा. विश्वस्त मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार, Siemens Hipath 4300IP ही अद्ययावत डिजीटल ईपीएबीएक्स यंत्रणा मे. सिमेन्स लि., मुंबई यांचेकडून माहे ऑगस्ट, २००४ मध्ये खरेदी करुन, कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. या अत्याधुनिक अंतर्गत दूरध्वनी यंत्रणेव्दारे समाधी मंदिर परिसर, रुग्णालय व धर्मशाळा परिसर, नविन भक्तनिवासस्थान या ठिकाणी तीन एक्सचेंज बसविण्यात आलेले असून, या तिन्ही एक्सचेंजमध्ये एकूण १९ Analog कार्डस् बसविण्यात आले आहेत. या १९ Analog कार्डस्व्दारे एकुण ४०० अंतर्गत दूरध्वनी विविध विभागांना संदेशवहनासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

श्री साईभक्तांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने संस्थानने विविध उपक्रम हाती घेतले आहेत. या उपक्रमांतर्गत जास्तीत जास्त साईभक्तांची निवासाची व्यवस्था संस्थानमार्फत होणेसाठी नविन व्दारावती भक्तनिवास इमारतीचे बांधकाम चालू असून, ते अंतिम टप्यात आहे. या इमारतीमध्ये संपर्कासाठी दूरध्वनी सेवा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

नविन व्दारावती इमारतीमध्ये अंतर्गत दूरध्वनी सेवा उपलब्ध करुन देणेसाठी श्री साईबाबा हॉस्पिटल मध्ये बसविण्यात आलेल्या सिमेन्स कंपनीच्या अद्ययावत दूरध्वनी यंत्रणेच्या एक्सचेंजमधून

दूरध्वनी सेवा देण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. त्यासाठी खालील प्रमाणे दूरध्वनी साहित्य खरेदी करावे लागणार आहे.

| अ.नं. | तपशील | नग | अंदाजे दर | अंदाजे एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | ५० पेअर जेलीफिल्ड आर्माड टेलीफोन केबल | ३०० मीटर | २२५/- प्रती मीटर (कर अतिरिक्त) | ६७,५००/- (कर अतिरिक्त) |
| ०२ | ५० पेअर डी.पी.बॉक्स | १ नग | २०००/- प्रती नग (कर अतिरिक्त) | २०००/- (कर अतिरिक्त) |
| | **एकूण** | | | **६९,५००/- (कर अतिरिक्त)** |

वरील साहित्य खरेदी करणेसाठी अंदाजे रुपये ६९,५००/-(कर अतिरिक्त) चा खर्च अपेक्षित आहे. सदरील साहित्य खरेदी करणेची कार्यवाही खरेदी विभागामार्फत नामांकित कंपन्यांकडून विहित पध्दतीने दरपत्रके मागवून करता येईल.

उपरोक्तप्रमाणे, नविन व्दारावती भक्तनिवास इमारतीमध्ये अंतर्गत दूरध्वनी सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी दूरध्वनी साहित्य खरेदी विभागामार्फत नामांकित कंपन्यांकडून विहित पध्दतीने दरपत्रके मागवून खरेदी करणेस व त्यासाठी येणारे एकत्रित अंदाजे रुपये ६९,५००/-(कर अतिरिक्त ) च्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- आय.टी.विभाग प्रमुख)

**(२०) सिस्टीम ऑडिटरची नेमणूक करणेबाबत.**

**(अ)** संस्थानचे संगणकीकरण कार्यक्रमांतर्गत संगणकीय नेटवर्कव्दारे सध्या संस्थानची विविध कार्यालये, देणगी काऊंटर्स, खोली वाटप कक्ष, चहा कॅन्टीन, लेखाशाखा चेक / डी. डी., स्वागत कक्ष, प्रसादालय भोजन तिकीट विक्री, दोन्ही रुग्णालये, ब्लड बॅन्क इ. ठिकाणची साधारणतः ६५ ते ७० संगणके फायबर ऑप्टीक केबलव्दारे एकमेकांशी जोडण्यात आलेले आहे. सध्या खालीलप्रमाणे सॉफ्टवेअर्स विविध विभागांत कार्यान्वीत आहेत.

A) आयआयएमव्ही, पूणे यांचेकडून तयार करुन घेतलेले सॉफ्टवेअर-

| | | |
|---|---|---|
| ०१.देणगी काऊंटर्स | ०२.खोली वाटप कक्ष | ०३.मनीऑर्डर |
| ०४.चेक / डीडी | ०५प्रसादालय तिकीट विक्री | ०६. चहा कॅन्टीन तिकीट विक्री |
| ०७. भक्तमंडळ सभासद नोंदणी | ०८. पुस्तक विक्री | ०९. कापड कोठी |
| १०. जनसंपर्क कार्यालय | ११. साईलीला सभासद | १२.प्रसाद लाडू |

B) माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत बनविण्यात आलेले सॉफ्टवेअर-

| | | |
|---|---|---|
| ०१. पगारबिल सॉफ्टवेअर | ०२. आवक विभागाचे सॉफ्टवेअर | ०३.काऊंटींग सॉफ्टवेअर |
| ०४. सोने-चांदी देणगी पावती | ०५. टेलिफोन सॉफ्टवेअर | ०६. अकाऊंट आऊटवर्ड |

उपरोक्तप्रमाणे, A मधील सॉफ्टवेअर्स हे आयआयएमव्ही, पूणे यांचेकडून तयार करुन घेण्यात आलेले असून, B मधील सॉफ्टवेअर्स हे माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत तयार करण्यात आलेले आहेत. उपरोक्त सर्व सॉफ्टवेअर्स संस्थानचे विविध कार्यालयांतील संगणकांवर ऑनलाईन आहे. या सर्व संगणकांवरील दैनंदिन सर्व डेटा मध्यवर्ती सर्व्हर रुममध्ये ठेवण्यात आलेल्या २ GB RAM साधारणतः २१९ GB साठवणूक क्षमता असलेल्या सर्व्हरमध्ये संकलीत करण्यात येत आहे.

**(ब)** संस्थानचे विविध कार्यालयांमध्ये कार्यान्वीत असलेले उपरोक्त सॉफ्टवेअर्स हे लेखाशाखा व अर्थिक व्यवहाराशी निगडीत असून, या सर्व सॉफ्टवेअरचा गैरवापर व डुप्लीकेशन टाळणेच्या दृष्टीने तसेच अर्थिक दृष्ट्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या सर्व सॉफ्टवेअरची तपासणी व त्यांचे सिस्टिम ऑडीट (प्रणाली लेखापरिक्षण) होणे अत्यंत गरजेचे आहे. आयआयएमव्ही, पूणे यांचेकडून तयार करुन घेण्यात आलेले सॉफ्टवेअर्स हे जून्या पध्दतीने तयार करण्यात आलेले असून, सदरील जून्या पध्दती या कालबाह्य झालेल्या आहेत. शिवाय वेळोवेळी लेखापरिक्षण अहवालात या सिस्टिमबाबत प्रश्न निर्माण होत आहे. नुकत्याच झालेल्या सन-२००६-२००७ चे लेखापरिक्षण अहवालात सध्या चालू असलेल्या सर्व सिस्टिम्स / सॉफ्टवेअर हे संगणक क्षेत्रातील तज्ञ सिस्टिम ऑडीटर कडून तपासून, त्यांचे मार्गदर्शनानुसार त्यात योग्य ते बदल करुन घ्यावेत, असे निर्देश संस्थान लेखापरिक्षक श्री. गायकवाड अॅन्ड सन्स, मुंबई यांनी दिलेले आहेत.

माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत विविध विभागांसाठी नविन सॉफ्टवेअर तयार करण्याचे कामकाज हाती घेण्यात आलेले आहेत. प्रथम टप्पात प्रसादालय, खरेदी व मध्यवर्ती भांडार विभागांसाठी आवश्यक सॉफ्टवेअर संस्थानचे प्रचलीत पध्दतीनुसार तयार करण्याची कार्यवाही चालू आहे. परंतु, यात देखील सिस्टिम ऑडीट होणे आवश्यक आहे. शिवाय माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानचे उत्पन्नात वाढ होणारे विविध प्रकल्प हाती घेण्याचे नियोजित आहे. सदर प्रकल्पांसदर्भात विविध पार्ट्यांशी करण्यात येणारे करारनामे अचूक होणेसाठी सिस्टिम ऑडीटरची नितांत गरज आहे.

उपरोक्त कामी श्री अभिजीत गायकवाड, मुंबई यांचेशी चर्चा केली असता, त्यांनी संस्थानचे सिस्टिम ऑडीटर म्हणून कामकाज पाहण्यास सहमती दर्शविलेली आहे. त्यांचे वाणिज्य शाखेतून

शिक्षण झालेले असून, अमेरिकेतील नामवंत संस्थेतून सिस्टिम ऑडीटरचे उच्च दर्जाचे शिक्षण घेतलेले आहे. त्यामुळे त्यांना या क्षेत्रातील कामाचा चांगला अनुभव आहे. श्री अभिजीत गायकवाड यांची सिस्टिम ऑडीटर म्हणून नेमणूक केल्यास, त्यांचेकडून संस्थानमधील सर्व सॉफ्टवेअरचे सुरक्षिततेच्या दृष्टीने ऑडीट करुन घेता येईल. असे ऑडीट झालेनंतर संगणक प्रणालींमध्ये आढळणाऱ्या त्रुटी, दोष इत्यादींचे निवारण प्रोग्रामर्सकडून करुन घेता येईल. श्री अभिजीत गायकवाड, मुंबई यांनी संस्थानमध्ये सिस्टिम ऑडीटरचे कामकाज मोफत करण्यास सहमती दर्शविलेली आहे. परंतु, त्यांना शिर्डी येथे येणे-जाणेचा खर्च व शिर्डी येथे आल्यानंतर त्यांची भोजनाची व निवासाची व्यवस्था संस्थानमार्फत करावी लागणार आहे.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे, श्री. अभिजीत गायकवाड, मुंबई यांची एक वर्षासाठी सिस्टिम ऑडीटर म्हणून नेमणूक करणेस व त्यांना शिर्डी येथे येणे-जाणेचा खर्च व शिर्डी येथे आल्यानंतर त्यांची भोजनाची व निवासाची व्यवस्था संस्थानमार्फत करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**(२१) सर्व्हर रुम व माहिती तंत्रज्ञान विभागातील संगणकामासाठी 3 KVA युपीएस खरेदी करणेबाबत**

श्री साईबाबा संस्थानचे संगणकीय कार्यक्रमांतर्गत संस्थानचे विविध विभाग, देणगी कार्यालये, खोली वाटप कक्ष, प्रसादालय बुकींग इ. ठिकाणची संगणके माहिती तंत्रज्ञान विभागातील सर्व्हरव्दारे एकमेकांना जोडण्यात आलेली आहे. सदर सर्व्हर व सर्व्हररुम मधील स्विचेस्ला देण्यात आलेला विद्युत पुरवठा अखंडीत/सुरळीत ठेवणेसाठी Punca ३KVA युपीएस बसविण्यात आलेला होता. परंतु, सदर युपीएस खराब झाल्याने, रुग्णालयांसाठी खरेदी करण्यात आलेला युपीएस सध्या माहिती तंत्रज्ञान विभागातील सर्व्हर रुममध्ये तात्पुरत्या स्वरुपात वापरण्यात येत आहे. सदर युपीएसची रुग्णालयास आवश्यकता आहे. तसेच दिनांक २८ सप्टेंबर, २००७ रोजी अचानक विद्युत पुरवठा उच्च दाबाने होऊन, माहिती तंत्रज्ञान विभागातील दोन व दुरध्वनी यंत्रणेसाठी वापरात असलेले दोन असे चार मॉनिटर जळाले आहे. तसेच एक प्रिंटर जळालेला आहे. याबाबत विद्युत विभागप्रमुख यांचेशी चर्चा केली असता, विद्युत पुरवठ्याचे दाबात अचानक वाढ झाली होती, असे सांगण्यात आले. परंतु, हाय व्होल्टेज ट्रिपर ट्रिप होईपर्यंत सदरील नुकसान झालेले आहे.

विद्युत पुरवठ्याचे अनियमीत दाबामुळे मांहिती तंत्रज्ञान विभागातील सर्व्हर्स केव्हाही जळण्याची शक्यता नाकारता येत नाही. या सर्व्हरवर संस्थानचे विविध विभागांतील, देणगी काऊंटर्स, रुम बुकींग, प्रसादालय व चहा कॅन्टीन कुपन्स बुकींग, पगारबिल, आवक विभाग, लेखाशाखा विभाग आदि ठिकाणचे संगणकांवरील सर्व डेटा साठविण्यात येत आहे. सदर सर्व्हर व संगणकांना सुरळीत विद्युत पुरवठा करणेबाबत श्री विजय नायडू, मानद स्थानिक सल्लागार यांचेशी चर्चा केली असता, त्यांनी सध्या असलेला युपीएस बदलून खालील तपशीलाप्रमाणे नविन युपीएस बसविण्यात यावा, असे सुचविले आहे.

| Sr. No. | Description | Make | Qty. | Appox. Price |
|---|---|---|---|---|
| 01. | 3 KVA ON-LINE UPS<br>• Tower Model<br>• 50 Min Battery Back-up<br>• 18 AH X16 nos of SMF Battery<br>• Battery Stand & Battery Connecting Cable<br>• Necessary Interface Power Cord.<br>3 Years on site warranty for UPS and one year warranty for Battery. | APC | 02 | 2,20,000/- + Taxes |
| 02 | 3 KVA Redundant switch for redundancy with automatic switchover between two UPS. | APC | 01 | 50,000/- + Taxes |
| | **Total** | | | **2,70,000/- + Taxes** |

माहिती तंत्रज्ञान विभागतील सर्व्हर रुममधील संगणके व सर्व्हर यांसाठी नियमीत विद्युत पुरवठा होणेसाठी तक्त्यात दर्शविलेप्रमाणे, युपीएस खरेदी करणे आवश्यक आहे. यासाठी अंदाजे रक्कम रुपये २,७०,०००/- + टॅक्स इतका खर्च अपेक्षित आहे. सदर खरेदीची कार्यवाही विहित पध्दतीने खरेदी विभागामार्फत करता येईल.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे, माहिती तंत्रज्ञान विभागासाठी युपीएस खरेदी विभागामार्फत विहित पध्दतीने खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रक्कम रुपये २,७०,०००/- + टॅक्सचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-आय.टी.विभाग प्रमुख)

**(२२) नवीन बसेसच्या कुशनला कापडी खोळी शिवणेबाबत**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थे मार्फत नगरसुल रेल्वेस्टेशन येथुन तसेच मंदिर परिसर ते नवीन भक्तनिवास स्थान येथुन साईभक्त ने-आण करणे करीता नवीन चार टाटा स्टार बसेस तसेच इंग्लिश मिडीयम स्कुलची मुले ने-आण करणे करीता तिन स्कुल बसेस खरेदी केलेल्या आहेत. तसेच नवीन दोन बसेसचे बॉडी बांधणीचे काम चालु आहे. सदर बसेस साईभक्तांकरीता व लहान मुलांकरीता वापरात असलेने कुशन खराब होऊ नये म्हणुन कापडी खोळी शिवुण घेणे अत्यंत आवश्यक आहे. याकरिता खालील प्रमाणे कापड खरेदी करावे लागेल.

| **अ.नं.** | **बस क्रमांक** | **वापर** | **अंदाजे आवश्यक कापड** |
|---|---|---|---|
| ०१ | एमएच-१७/टी-७१०९ | नगरसुल बस | ५५ मिटर |
| ०२ | एमएच-१७/टी-७११० | नगरसुल बस | ५५ मिटर |
| ०३ | एमएच-१७/टी-८५०४ | न.भ.नि. स्थान बस | ५५ मिटर |
| ०४ | एमएच-१७/टी-८५०५ | न.भ.नि. स्थान बस | ५५ मिटर |
| ०५ | एमएच-१७/टी-८५०१ | स्कुल बस | ४५ मिटर |
| ०६ | एमएच-१७/टी-८५०२ | स्कुल बस | ४५ मिटर |
| ०७ | एमएच-१७/टी-८५०३ | स्कुल बस | ४५ मिटर |
| ०८ | नवीन बस | नवीन प्रसादालय | ४० मिटर |
| ०९ | नवीन बस | नवीन प्रसादालय | ४० मिटर |
| | **एकुण अंदाजे आवश्यक कापड** | | **४३५ मिटर** |

वरील नऊ बसेस करीता अंदाजे ४३५ मिटर कापड लागेल. याकामी कापड, मजुरी इतर कामा करीता अंदाजे रू.७५,०००/- मात्र खर्च अपेक्षीत असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने प्रमुख)

**(२३) दिपावलीच्या सुट्टयामध्ये गर्दीचे कालावधीत साईभक्तांचे सोयी करीता मंडप व्यवस्थेबाबद.**

दिपावली सुट्टी निमीत्त साईभक्तांची गर्दी होण्याची शक्यता असल्याने दि. ०७/११/२००७ ते दि. १८/११/२००७ (**१२ दिवस**) कालावधीसाठी खालील ठिकाणी शामियाना कापडी मंडप, बाजूचे पार्टीशन (कनाती) सह, बिच्छायतीसह (मॅटीन) व आवश्यक गादयासह मंडप मंदिर परिसरात, तसेच धर्मशाळा, प्रसादालय परिसरात साईभक्तांचे सोयी करीता मंडप उभारणी करणे आवश्यक आहे.

**मंडप टाकण्याचे ठिकाण व तपशील खालीलप्रमाणे :**

| अ.नं. | मंडप तपशिल | |
|---|---|---|
| ०१ | साईबाबा भक्तनिवासस्थान परीसरातील मंडप कनात,गाद्या(बिछायतीसह) | |
| | पार्किंग दक्षिण बाजू ४५'x २००' | ९००० चौरस फुट |
| | माहिती केंद्र १०'x१०' | १०० चौरस फुट |
| | समाधी मंदिर व प्रसादालय परिसरातील मंडप | |
| | प्रसादालय तिकीट काऊंटर समोर (बिछायतीसह) १५' उंची असलेला रेलिंग पुर्व / पश्चिम बाजु १२२'X४२' | ५१२४ चौरस फुट |
| | प्रसादालय पार्किंग १२ ते १५ फुट उंची असलेला ( गाद्या बिछायत व कनातीसह ) १३०'x ९०' | ११७०० चौरस फुट |
| | साईउदयान (बुफे जेवणासाठी ) ६०'x ४५' (बिछायत व कनातीसह) | २,७०० चौरस फुट |
| | चौकशी कार्यालयासमोर २०'x६०' | १२०० चौरस फुट |
| ०२ | साईभक्तांचे दर्शन लाईन करीता टेरेसवर मंडप २८०'x १०' | २,८०० चौरस फुट |
| ०३ | साईबाबा भक्तनिवासस्थान येथे बाथरुम करीता पत्रा पार्टीशन | १०० रनिंग फुट |
| ०४ | बिछायतीच्या गादया (भक्तनिवास परिसर) | ४०० नग |

दिपावलीचे सुट्टी चे दरम्यान होणाऱ्या संभाव्य गर्दीचा विचार करता , व फारच कमी कालावधी असल्याने खालील मंडप ठेकेदार यांचे कोटेशन मागविण्यात येऊन समक्ष उघडण्यात आले असून त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| **अ. नं.** | **ठेकेदाराचे नांव** | **एकुण रक्कम** | **शेरा** |
|---|---|---|---|
| ०१ | श्री. झुराळे टेन्ट मंडप डेकोरेटर्स, निमगांव खैरी | २,११,३४४/- | व्दितीय निम्नतम |
| ०२ | श्री किरण तरटे मंडप डेकोरटर्स, साकुरी | २,७९,९९२/- | चतुर्थ निम्नतम |
| ०३ | श्री सावता मंडप डेकोरेटर्स, राहाता | २,३५,३६८/- | तृतीय निम्नतम |
| ०४ | श्री. शेख महेबुब इमाम, रोशनी मंडप, संक्रापूर ता. राहुरी | **१,९२,५९५/-** | **प्रथम निम्नतम** |

उपरोक्त तपशिला वरुन असे दिसून येते की, **श्री. शेख मेहबूब इमाम, (रोशनी मंडप)** संक्रापूर ता. राहुरी यांचे दर निम्नतम स्वरुपाचे आहेत. सदरचे काम एकुण १६ दिवसाचे होते परंतू मंडप टाकण्यासाठी कीमाण २ ते ३ दिवसाचा कालावधी आवश्यक आहे. व शाळेला सुट्टी दि. १८/११/२००७ पर्यत आहे. दि. ७/११/२००७ ते दि. १८/११/२००७ अखेर आहे. त्यामुळे एकुण १२ दिवसाकरीता मंडप टाकण्याचा कार्यादेश ठेकेदार यांना देण्यात आला आहे. एकुण १२ दिवसाकरीता मंडपासाठी रु. ०.३० पैसे प्रति दिवस प्रति चौ. फुट , गादीसाठी प्रति रु. ५.०० प्रति नग प्रति दिवस व पत्रा पार्टीशनसाठी रु. २.५० प्रति दिवस प्रति रनिंग फुट याप्रमाणे **श्री. शेख मेहबूब इमाम, (रोशनी मंडप),** संक्रापूर, ता. राहुरी यांचे निम्नतम दराने १२ दिवसाकरीता रु. १,४४,४४७.०० मात्र खर्च आलेला आहे.

तरी येणारे रु. १,४४,४४७.०० मात्रचे खर्चास व उपरोक्त प्रमाणे मंडपाचे काम ठेकेदार रोशनी मंडप, शेख मेहबूब इमाम, संक्रापूर. यांचेकडून करुन घेणेस कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता त्यास व मान्य दराने जादा मंडप टाकण्याची आवश्यकता असल्यास मान्य दराने जादा मंडप टाकण्यास तसेच भक्तांची गर्दी टिकून राहील्यास मंडपाची मुदतवाढ करण्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**(२४) श्रीसाईबाबा हॉस्पीटल लॅण्डस्केपींग कामाचे ठेकेदार श्री. मिलिंद एस. पाचोरकर, निफाड यांचे मूदतवाढ मागणीबाबत .**

श्रीसाईबाबा हॉस्पीटल येथे येणारे रुग्ण व त्यांचे नातेवाईक तसेच इतर व्यक्तींना प्रसन्न व प्रफुल्लीत वातावरण अनुभवयास मिळावे या दृष्टीकोणातून सदर जागेवर लॅण्डस्केपींग करण्याचे काम ठेकेदार मिलींद एस. पाचोरकर यांचेमार्फत करण्यात येत आहे. सदर काम हे पूर्णत्वाचे मार्गावर असून सुमारे ७०% काम पूर्ण झाले आहे. निविदा शर्तीनुसार सदर काम पूर्ण करण्यासाठी ०३ महिने इतकी मूदत देण्यात आली आहे. सदर मूदत दि. ०६ सप्टेंबर २००७ रोजी संपुष्टात आलेली आहे. ठेकेदार यांचे रॅम्प फ्लोरिंग फाउंटन कंपाउंड भिंत, कडप्पा फरशी बसविणे व विद्युतीकरण इ. कामे अद्याप बाकी आहे.

ठेकेदार श्री. मिलींद एस. पाचोरकर, निफाड यांनी दि. १३/०९/२००७ चे पत्राव्दारे सदर काम पूर्ण करण्यासाठी दि. ३०/१०/२००७ पर्यंत मूदतवाढ मिळावी अशी विनंती केली आहे. त्यासाठी त्यांनी खालील कारणे नमूद केलेली आहे.

०१. काम सुरु असताना प्रत्यक्ष जागेवरील मोजमाप व ड्रॉईंग वरील मोजमाप यात फरक येत असल्याने ड्रॉईंग बदलावी लागल्याो २० ते २५ दिवस उशिर होत आहे.
०२. तसेच कामासाठी लागणारे मुरुम व दगड पावसामुळे विहित मूदतीत मिळाले नाही.
०३. तसेच वाळुचा लिलाव बंद असल्यामुळे नदीची वाळू उपलब्ध होत नाही.
०४. पाटबंधारे विभागाने कॅनॉलला पाणी सोडल्याने बेड कॉंक्रीटींग करण्यास विलंब झाला.
०५. इलेक्ट्रीकचे साहित्य ऑर्डर दिल्यावर दोन ते तीन आठवडेनंतर उपलब्ध होत आहे.

ठेकेदार यांचे वरील विनंतीबाबत सदर कामाचे आर्किटेक्ट अमृता पवार, नाशिक यांनी दि. ०३/१०/२००७ चे पत्राव्दारे असा अभिप्राय दिलेला आहे की, उपरोक्त विनंतीची कारणे लक्षात घेता, ठेकेदार यांना दिनांक ३०/१०/२००७ पर्यंत मूदतवाढ देणेस हरकत नाही.

तरी ठेकेदार यांनी दि. ३०/१०/२००७ पर्यंत मूदतवाढीची मागणी केलेली आहे. आर्किटेक्ट यांचे अभिप्रायानुसार ठेकेदार यांना वरील बाबींचा विचार करता दि. ३०/१०/२००७ अखेर मूदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**(२५) सर्व्हरवरील डेटाचा (माहितीचा) बॅकअप घेणसाठी Dat Drive खरेदी करणेबाबत.**

**(अ)** संस्थानचे संगणकीकरण कार्यक्रमांतर्गत संगणकीय नेटवर्कव्दारे सध्या संस्थानची विविध कार्यालये, देणगी काऊंटर्स, खोली वाटप कक्ष, चहा कॅन्टीन, लेखाशाखा चेक / डी. डी., स्वागत कक्ष, प्रसादालय भोजन तिकीट विक्री, दोन्ही रुग्णालये, ब्लड बॅन्क इ. ठिकाणची साधारणतः ६५ ते ७० संगणके फायबर ऑप्टीक केबलव्दारे एकमेकांशी जोडण्यात आलेले आहे. सध्या १८ संगणक प्रणाली संस्थानचे विविध कार्यालयांत ऑनलाईन आहे. या सर्व संगणकांवरील डेटा मध्यवर्ती सर्व्हर रुममध्ये ठेवण्यात आलेल्या २ GB RAM सर्व्हरमध्ये संकलीत करण्यात येत आहे. दिवसेंदिवस संगणकीय कामकाजाचा वापर वाढत असल्याने, सर्व्हरवरील संकलीत करण्यात येणारा डाटा वाढत आहे. एक महिन्याला साधारणतः ५७ एमबी डाटा संकलीत केला जातो. या सर्व डाटाचे संरक्षण व नियोजन करणेकामी त्याचा दररोज बॅकअप घेणे आवश्यक आहे. बॅकअप घेणेकामी रुग्णालयांसाठी खरेदी करण्यात आलेल्या Dat Drive चा वापर करण्यात येत आहे.

**(ब)** रुणालयांचे दैनंदिन कामकाजासाठी हॉस्पिटल मॅनेजमेंट सॉफ्टवेअर कार्यान्वीत करण्यात आलेले असून, सदर सॉफ्टवेअरव्दारे करण्यात आलेल्या कामकाजाचा डेटा श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये ठेवण्यात आलेल्या सर्व्हरवर संकलीत करण्यात येत आहे. याचेही संरक्षण व नियोजन

करणे आवश्यक असल्याने, रुग्णालयांसाठी खरेदी करण्यात आलेला Dat Drive मिळणेबाबत श्री साईबाबा हॉस्पिटलचे दिनांक ०५ ऑक्टोबर, २००७ रोजीचे डिपीअन्वये कळविलेले आहे. रुग्णालयाकडील Dat Drive त्यांना परत देणे आवश्यक आहे. माहिती तंत्रज्ञान विभागातील सर्व्हरवरील डेटाचा बॅकअप घेणेसाठी पर्यायी व्यवस्था करणेबाबत संस्थानचे मानद तांत्रिक सल्लगार श्री विजय नायडू, कोपरगाव यांचेशी चर्चा केली असता, त्यांनी नविन Dat Drive व IBM Tivoli सॉफ्टवेअर खरेदी करणे आवश्यक असल्याचे सुचविले आहे. त्यानुसार नविन Dat Drive व IBM Tivoli सॉफ्टवेअर खरेदी करणेसाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

**(क) खर्चाचा तपशील-**

| Sr. No. | Description | Value unit pack | Rate | Total Amount |
|---|---|---|---|---|
| **A) HARDWARE-** | | | | |
| 01. | IBM Ultrium 3 LTO Drive 400/800 GB | | 1,99,000.00 | 1,99,000.00 + Taxes |
| **B) SOFTWARE** | | | | |
| 01. | IBM Tivoli Storage Manager Extended Edition 10 Value Units License. | 30 | 5540.00 | 1,66,200.00 + Taxes |
| 02. | IBM Tivoli Storage Manager for Database 10 Value Units License. | 20 | 10595.00 | 2,11,900.00 + Taxes |
| 03. | IBM TIVOLI CONTINUOUS DATA PROTECTION FOR FILES-PC EDITION 25 CLIENT DEVICES LICENSE. | 2 | 77650.00 | 1,55,300.00 + Taxes |
| **C) MEDIA KIT-** | | | | |
| 01. | MEDIA KIT FOR ALL SOFTWARE MENTION IN ABOVE “B” | --- | --- | 16,600.00 + Taxes |
| **D) TRAINING-** | | | | |
| 01. | TRAINING FOR TECHNICAL STAFF OF ALL ABOVE PRODUCTS | --- | --- | 14,500.00 + Taxes |
| **TOTAL AMOUNT (A+B+C+D)** | | | | **7,63,500.00 + Taxes** |

माहिती तंत्रज्ञान विभागातील सर्व्हरवरील डेटाचा बॅकअप घेणेसाठी नविन Dat Drive व इतर संगणकांवरील डेटा सुरक्षित राहणेसाठी सॉफ्टवेअर खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रुपये ७,६३,५००/- + टॅक्स इतका खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त परिच्छेदांत नमुद केलेप्रमाणे, माहिती तंत्रज्ञान विभागातील सर्व्हरवरील डाटाचा (माहिती) बॅकअप घेणेसाठी नविन Dat Drive व IBM Tivoli सॉफ्टवेअर खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रुपये ७,६३,५००/- + टॅक्स पर्यंतचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, तो मान्य करण्यात यावा,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/आय.टी.विभाग प्रमुख)

**(२६) केंद्र शासनाच्या Skill Devlopment Initiative कार्याक्रमाअंतर्गत अभ्यासक्रम औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत सुरु करणे बाबत.**

श्रम मंत्रालय, भारत सरकार यांचे डायरोक्टोरेट जनरल ऑफ एम्प्लॉयमेंट ॲण्ड ट्रेनिंग (DGE&T) यांचे मार्फत SKILL DEVLOPMENT INITIATIVE SCHEME (SDIS) ही Modular Employer Skills (MES) वर आधारीत योजना सुरु करण्याची कार्यवाही शासकीय पातळीवर सुरु आहे. प्रथम महाराष्ट्र व तामिळनाडू राज्यात सुरुवात करुन टप्प्या-टप्प्याने सर्व राज्यांमध्ये हा उपक्रम राबविला जाणार आहे. या योजनेअंतर्गत उमेदवारांना अल्प मुदतीचे प्रशिक्षण देऊन त्यांची DGET नवी दिल्ली मार्फत कौशल्य चाचणी घेऊन प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. या योजनेसाठी केंद्र शासनाच्या अर्थ विषयक कॅबीनेट कमिटीने त्यांच्या दिनांक २४.०५.०७ च्या बैठकीमध्ये रु.५५०/- कोटी ची मंजुरी दिलेली आहे.

**योजनेचा उद्देश व वैशिष्टे-**

अ) अर्धवट शिक्षण सोडलेले, सध्याचे कामगार व आय.टी.आय. झालेल्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण.

ब) सध्या उपलब्ध असलेल्या साधन सामुग्रीचा प्रभावी वापर करणे.

क) अर्धवेळ, सुटीच्या दिवशी, पुर्णवेळ अभ्यासक्रम चालविण्याची लवचिकता,

ड) ५ वी पर्यंत शिक्षण झालेले व १४ वर्षापेक्षा अधिक वयाच्या उमेदवारांना संधी.

इ) २११ निरनिराळया अभ्यासक्रमातुन आवश्यक अभ्यासक्रम घेता येतील.

या योजनेअंतर्गत अभ्यासक्रम चालविण्यासाठी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचनालय, मुंबई यांनी राज्यातील काही निवडक वर्ग-१ दर्जाच्या शासकीय व अ दर्जा प्राप्त अशासकीय औ.प्र. संस्थांच्या/

केंद्रांच्या सोबत आपल्या संस्थेची Vocational Training Provider (VTP) म्हणून निवड केलेली आहे.

सध्या आपल्या संस्थेत सुरु असलेल्या पुर्णवेळ अभ्यासक्रम विभागांशी संबंधीत गटातुन काही निवडक अभ्यासक्रम सुरु करता येतील. ती खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Name or the Sector | Name of Courses | Educational Qualification | Duration (Hours) |
|---|---|---|---|---|
| 1 | Automobile | Basic Automotive Servicing (4 Wheelers) | 5 th | 180 |
| 2 | Automobile | Basic Automotive Servicing (2-3 Wheelers) | 5 th | 180 |
| 3 | Automobile | Repair & overhauling of engine systems (Petrol/ Diesel) | 5 th | 320 |
| 4 | Electrical | Basic Electrical Training | 8 th | 120 |
| 5 | Electrical | Repair of Home Appliance | 8 th | 120 |
| 6 | Electrical | House Wiring | 8 th | 120 |
| 7 | Electronics | Installation & Maintenance of DTH System | 8 th | 60 |
| 8 | Electronics | Repair & maintenance of Washing Machine and Microwave ovan | 8 th | 60 |
| 9 | Electronics | Repair & maintenance of T.V. Receiver | 8 th | 180 |
| 10 | Fabrication | Basic Welding (Gas) | 8 th | 120 |
| 11 | Fabrication | Basic Welding (Arc) | 8 th | 120 |
| 12 | Fabrication | MAC/ CO2 Welding | 8 th | 90 |
| 13 | Fabrication | Fabrication Welding | 8 th | 180 |
| 14 | Information and Communication Technology | Computer Fundamentals, MS-Office & Internet | 10 th | 120 |
| 15 | Information and Communication Technology | Tally | 10 th | 180 |
| 16 | Information and Communication Technology | Desk Top Publishing | 8 th | 180 |
| 17 | Information and Communication Technology | Computer Hardware | 10 th | 180 |
| 18 | Information and Communication Technology | Computer Networking | 10 th | 180 |
| 19 | Production and Manufacturing | Turning | 8 th | 210 |
| 20 | Production and Manufacturing | Milling | 8 th | 210 |
| 21 | Production and Manufacturing | Surface Grinding | 8 th | 210 |
| 22 | Production and Manufacturing | Cylindrioal Grinding | 8 th | 210 |
| 23 | Refrigeration & Air Conditioning | Repair & maintenance of Refrigeratore and Deep Freezers | 5 th | 120 |
| 24 | Refrigeration & Air Conditioning | Service & maintenance of Water Cooler & Bottel Cooler | 5 th | 120 |
| 25 | Refrigeration & Air Conditioning | Repair & maintenance of of Air Conditioner | 5 th | 120 |

या अभ्यासक्रमांसाठी केंद्र शासनाकडुन यशस्वी विद्यार्थ्यांमागे प्रति विद्यार्थी प्रती तास रु.१५/- याप्रमाणे अनुदान (Reimbusment) दिले जाईल अशी माहिती देण्यात आलेली आहे. यामधुन प्रशिक्षणार्थ्यांसाठी लागणारा कच्चा माल परीक्षेसंबंधी काम करणारे निदेशक व अन्य कर्मचाऱ्यांना मानधन वितरीत करावयाचे आहे. त्यामधुन रक्कम शिल्लक राहील्यास ती संस्थेकडे कायम स्वरुपी जमा होत राहील.

विद्यार्थ्यांकडून अभ्यासक्रमांचे कालावधीनुसार रु.५००/- (९० तास), रु.१०००/- (९१ ते १८० तास), रु.१,५००/- (१८१ ते २७० तास), रु.२०००/- (२७० पेक्षा जास्तीत जास्त तास), अशी प्रशिक्षण शुल्क फी घेता येईल. तसेच विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क (Assement/ Testing फी) म्हणून रु.५००/- ते ८००/- घ्यावे लागणार आहे. मात्र विद्यार्थी परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेनंतर त्यांना भरलेली प्रशिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क परत मिळणार आहे.

अभ्यासक्रम सुरु करण्याच्या दृष्टीने प्रति अभ्यासक्रम अंदाजे रु.२५,०००/- पर्यंत अभ्यासक्रमांचे गरजेनुसार टुल्स-इक्वीपमेंट-यंत्रे यासाठी खर्च अपेक्षित आहे. तसेच शासनाकडून मिळणाऱ्या अनुदान Reimbusment मधुन शासन ठरविल त्या दराने मानधनाने गरजेनुसार सध्या

कार्यरत असलेल्या नियमित कर्मचारी व तासिका/ कंत्राटी पध्दतीने वेळोवेळी नेमुन त्यांच्या सेवा याकामी वापराव्या लागतील.

तरी केंद्र शासनाच्या सदर योजने अंतर्गत सुरु करावयाच्या Vocational Training Provider (VTP) म्हणून आपल्या औ.प्र.संस्थेत कार्यरत करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय.)

**(२७) श्री साईबाबा दिनदर्शिका २००८ मोठी साईज (खाजगी दिनदर्शिका) छपाईबाबत**

मे मॅग्ना ग्राफिक्स (इंडिया) लि., मुंबई यांनी त्यांचे दि. ०८.०९.२००७ चे पत्राद्वारे मागिल वर्षाप्रमाणे याहीवर्षी सन २००८ या वर्षासाठी श्री साईबाबा दिनदर्शिका २००८ मोठी साईज छपाई करुन देण्याची तयारी दर्शविली आहे. सदरची दिनदर्शिका कॉस्ट टु कॉस्ट ( ना नफा ना तोटा ) या तत्वावर करुन देणार असल्याचे कळविले आहे.

सन २००४ मध्ये मे मॅग्ना ग्राफिक्स (इंडिया) लि., मुंबई यांनी ३,३०० कॅलेन्डर्स संस्थानला देणगी दिलेले होते. त्या कॅलेन्डर्सची किंमत प्रती नग रुपये २५०/- प्रमाणे संस्थानने विक्री केली असून, विक्री झालेली रक्कम संस्थानमध्ये जमा आहे. तसेच सन २००६ मध्ये मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६.०८.२००५ चे सभेतील विषय नं. ०७ निर्णय ७५६ या समंत निर्णयानुसार २०,००० नग प्रती नग छपाई दर रुपये १५०/- या प्रमाणे छपाई कामाचा पुरवठा आदेश देण्यात आलेला होता. याच धर्तिवर मा. व्यवस्थापन समितीचे दि.१४.१०.२००६ चे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं. २६ निर्णय ८७३ नुसार श्री साईबाबा दिनदर्शिका २००७ मोठी साईज २०,००० नग प्रती दर रु.१६२/- याप्रमाणे छपाई कामाचा आदेश संबंधीत साईग्रेस फाऊन्डेशन्स, मुंबई यांना देण्यात आला होता, त्यांचेकडून सदर दिनदर्शिकेचे २०,००० नगांपैकी आवक झालेले १७२०० नगांची विक्री तपशिल अहवाल खालील प्रमाणे

| एकूण आवक | विक्री कालावधी | विक्री नग | विक्री दर रुपये | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १७२०० | डिसेंबर २००६ | ६,११५ | १७५/- | १०७०१२५ |
| | जानेवारी २००७ ते मार्च २००७ पर्यंत | ११,०११ | १७५/- | १९२६९२५ |
| | संभावना | ७४ | | |
| | एकूण | १७,२०० | एकूण रक्कम | २९९७०५० |

मे मॅग्ना ग्राफिक्स (इंडिया) लि., मुंबई यांनी मागिल वर्षाचे दिनदर्शिकेसाठी चांगल्या प्रकारचा फोटो ग्राफ, डिझाईनचा वापर करुन कॅलेन्डर सुबक आकर्षक असे तयार केले होते, यानुसार मागिल वर्षाप्रमाणे चालू वर्षीही मे मॅग्ना ग्राफिक्स (इंडिया) लि., मुंबई हे श्री साईबाबा दिनदर्शिका ८ पेजेस (मोठी साईज) चांगल्या प्रकारचा फोटो ग्राफ, उत्कृष्ट डिझाईन, आकारबद्ध , चांगल्या प्रकारचा उच्च दर्जाचा कागद वापरुन छपाई करुन देणार असलेबाबत कळविले आहे.

मे मॅग्ना ग्राफिक्स (इंडिया) लि., मुंबई यांनी चालू वर्षीही ते दिनदर्शिका २००८ (८ पेजेस) एकूण ३०,००० नग छपाई करुन देणेबाबत कळवून माहे नोव्हेंबर २००७ पर्यंत उपलब्ध करुन देणार असलेबाबत कबुल केले आहे. सदरची दिनदर्शिका ते खालील दर्शविल्या तपशिलातील छपाई दरानुसार करुन देणार असल्याचे कळविले आहे.

<u>श्री साईबाबा दिनदर्शिका २००८ ( ८ पेजेस ) मोठी साईज २२"x३५"</u>

| अ.न | **तपशिल** | **छपाई दर रुपये** | **एकूण खर्च रुपये** |
|---|---|---|---|
| **अ)** | ३०,००० ( तीस हजार) नग छपाई केल्यास | १५५/- | ४६,५०,०००/- |
| **ब)** | २५,००० (पंचविस हजार) नग छपाई केल्यास | १५९/- | ३९,७५,०००/- |

उपरोक्तप्रमाणे **"अ"** नुसार ३०,००० नग छपाई केल्यास प्रती नग छपाई दर रुपये १५५/- प्रमाणे एकूण रुपये ४६,५०,०००/- इतका खर्च व **"ब"** नुसार २५,००० नग छपाई केल्यास प्रती नग छपाई दर रुपये १५९/- प्रमाणे एकूण रुपये ३९,७५,०००/- याप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

मॅग्ना ग्राफिक्स इंडिया लि., मुंबई यांनी त्यांचे दि.०८.०९.२००७ चे फॅक्स पत्रान्वये सदर श्री साईबाबा दिनदर्शिका छपाई आदेश " **मे. साईग्रेस फाऊन्डेशन, मुंबई** " या नावाने देणेबाबत सुचित केले आहे.

तरी वरील तपशिलाप्रमाणे त्यांचेकडून खालील दर्शविले प्रमाणे :-

१) "अ" नुसार ३०,००० नग छपाई केल्यास प्रती नग छपाई दर रुपये १५५/- प्रमाणे एकूण रुपये ४६,५०,०००/- इतका खर्च येईल

२) "ब" नुसार २५,००० नग छपाई केल्यास प्रती नग छपाई दर रुपये १५९/- प्रमाणे एकूण रुपये ३९,७५,०००/- खर्च येईल.

तरी उपरोक्तप्रमाणे **"अ"** किंवा **"ब"** बाबत विचार होऊन श्री साईबाबा दिनदर्शिका २००८

(आठ पेजेस) मोठी साईज " **मे. साईग्रेस फाऊन्डेशन, मुंबई** " यांचेकडून छपाई करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्तपैकी "ब" नुसार २५,००० नग छपाई करुन घेण्यास व याकामी प्रती नग रुपये १५९/- प्रमाणे एकूण रुपये ३९,७५,०००/-चे खर्चास मान्यता देण्यात यावी व सदरचे दिनदर्शिका प्रति नग रुपये १६५/- प्रमाणे विक्री करण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने प्रमुख)

**(२८) नवीन प्रसादालयासाठी साऊंड सिस्टीम खरेदी करणे बाबत.**

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१७.०२.२००७ मधील निर्णय क्र.१६० नुसार नवीन प्रसादालय इमारतीमध्ये सीसीटीव्ही, पी.ए. व केबल टी.व्ही. सिस्टीमच्या कामासाठी रु.१० लाख ची मंजुरी मिळालेली आहे. त्यानुसार ध्वनीक्षेपण विभागामार्फत सदरील टेंडरची जाहिरात वर्तमानपत्रात प्रसिध्द करुन शिरडी व मुंबई येथे टेंडर विक्री ठेवणेत आलेली होती. मात्र मुदतीअंती एकही टेंडर प्राप्त न झाल्याने ध्वनीक्षेपण विभागाने पुन्हा जाहिरात देऊन टेंडर विक्री करण्यात आली असता, मुदतीअंती फक्त एकच टेंडर प्राप्त झाल्याने टेंडर मुदतीत वाढ केलेली होती. त्यानंतर प्राप्त झालेले एक टेंडर असे एकूण दोन टेंडर मा.व्यवस्थापन उपसमितीचे सभेत सादर करणेत आले असता, ०२ टेंडर विचारात घेऊन खरेदीचा निर्णय घेणे योग्य होणार नाही. वारंवार मागणी करुनही पुरेसे टेंडर प्राप्त होत नसल्याने रु.५ लाख पर्यंतचे साहित्य कोटेशन पध्दतीने खरेदी करावे असा निर्णय झालेला आहे.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२८.०७.२००७ मधील निर्णय क्र.५१७ नुसार रु.५ लाख पर्यंतचे साहित्यासाठी संस्थान जा.क्र.एसएसएस/ खरेदी-ध्वनीक्षेपण/ १४१५५/ २००७, दि.०४.०९.२००७ अन्वये २८ पुरवठाधारकांकडून दरपत्रके मागणी करणेत आलेली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे प्राप्त दरपत्रके आजचे सभेत उघडणेत आले.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | इंटरनॅशनल इलेक्ट्रिकल्स, अ.नगर | ०३. | एमआरएच डिजीटल सिस्टीम्स प्रा.लि., मुंबई |
| ०२. | दिपक इलेक्ट्रिकल्स, कोपरगाव | ०४. | रमेश इलेक्ट्रिकल्स कार्पोरेशन, मुंबई (फॅक्स पत्र ) |

उपरोक्त दरधारकांचा तुलनात्मक तक्ता तयार करणेत येऊन न्युनतम दराने संबंधितांना पुरवठा आदेश देणेत यावेत अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-ध्वनीक्षेपण विभागप्रमुख)

**विषय नं.०९** **दिनांक २२.११.२००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.०९** दिनांक २२.११.२००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन या इतिवृत्तातील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

मा.श्रीमती प्रतिभाताई पाटील, राष्ट्रपती, भारत सरकार ह्यांचे मंगळवार दिनांक २७ नोव्हेंबर, २००७ रोजी सकाळी ९.५० वाजात शिर्डी येथे आगमन होत असून, मा.राष्ट्रपतींच्या शिर्डी भेटीबाबत केलेल्या नियोजन व तयारीचा आढावा घेणेकामी सर्व खातेप्रमुख यासभेस उपस्थित होते, त्यांचेसमवेत आजचे सभेत खालीलप्रमाणे चर्चा करण्यात येऊन निर्णय घेण्यात आले.

**(०१)** मा.श्रीमती प्रतिभाताई पाटील, राष्ट्रपती, भारत सरकार ह्यांचे मंगळवार दिनांक २७ नोव्हेंबर, २००७ रोजी सकाळी ९.५० वाजता शिर्डी येथे आगमन होत असून, हेलिपॅडवर बुके देऊन त्यांचे स्वागत करण्यात यावे. याठिकाणी ५०'x३०' या आकाराचा पेंडाल/मंडप (संडास बाथरुम सुविधेसह) टाकण्यात यावा. तसेच हेलिपॅडवर फायर फायटर व वैद्यकीय सुविधेसह ॲम्ब्युलन्स ठेवण्यात यावी.

**(०२)** त्यानंतर मा.राष्ट्रपती यांचे हेलिपॅडवरुन पिंपळवाडी रस्त्याने मराठी शाळेच्या मोकळया जागेतून मुख दर्शन गेटमधुन (गेट नं.०३) मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारातुन आगमन होईल.

**(०३)** मंदिर विभागात सकाळी ६.३० वा.ची आरती संपल्यानंतर दर्शनलाईन व मंदिर परिसरामधील भक्तांना सकाळी ८.०० वाजेपर्यंत दर्शन देण्यात येईल. ८.०० नंतर मंदिर व मंदिर परिसर मोकळा करण्यात यावा.

**(०४)** मा.राष्ट्रपतीचे भेटी दरम्यान ३ तास दर्शन बंद राहिल अशी जाहिर सूचना ध्वनीक्षेपकावरुन वेळोवेळी करण्यात यावी व तसे वर्तमानपत्रातही प्रसिद्ध करण्यात यावे.

**(०५)** सत्यनारायण पूजेच्या सकाळच्या बॅचेस बंद ठेवण्यात येऊन फक्त दुपारी १.०० वा. एक बॅच घेण्यात यावी.

**(०६)** मंदिर परिसरातील व परिसरातील सर्व कार्यालये सकाळी ११.३० पर्यन्त बंद ठेवण्यात यावीत.

**(०७)** मंदिरामध्ये नविन कारपेट टाकण्यात यावे तसेच, मंदिरातील व्ही.आय.पी. कक्षात सोफा खुर्च्या टाकुन बैठक व्यवस्था सुसज्ज करण्यात यावी.

**(०८)** मान्यवरांचे मंदीरात आगमन झालेनंतर मा.राष्ट्रपती व मा.मुख्यमंत्री यांना बुके देऊन त्यांचे स्वागत करण्यात यावे. मा.राष्ट्रपती व मा.मुख्यमंत्री यांच्या हस्ते श्रींची पाद्य पूजा करण्यात येईल. मा.राष्ट्रपती व मा.मुख्यमंत्री यांचा शाल, श्रीफळ तसेच श्रींची चांदीची मुर्ती देऊन सत्कार करण्यात यावा. सदर ठिकाणी अद्ययावत वैद्यकीय सुविधा ठेवण्यात यावी. त्यानंतर मान्यवरांचे मंदिरापासून नवीन प्रसादालयाकडे प्रस्थान होईल.

**(०९)** सर्व मा.विश्वस्तांना सर्व ठिकाणचे (All Places) पास देण्यात यावेत. तसेच निमंत्रितामध्ये काही संस्थान अधिकाऱ्यांचाही समावेश करण्यात यावा.

**(१०)** मा.राष्ट्रपती व मा.मुख्यमंत्री यांचे नवीन प्रसादालयाकडे आगमन झाल्यानंतर मा.उपाध्यक्ष श्री. कोल्हे साहेब त्यांचे स्वागत करतील. त्याठिकाणी मा.श्री.रेड्डी व मा.श्री. रमणी यांची ओळख करुन देण्यात येईल. निमंत्रित मान्यवरांची व्यवस्था संस्थानचे पी.आर.ओ. व मा. विश्वस्तांपैकी दोन विश्वस्त करतील. सदर ठिकाणी गाडया पार्किंगची व्यवस्था करण्यात येईल. पत्रकार व मीडीया यांच्यासाठी २० जागा ठेवण्यात येतील. सन्माननीय अतिथी प्रसादालय परिसरात प्रवेश करतील व प्रसादालयाचे उद्‌घाटनाचे वेळी कोनशिलांचे रिमोट कंट्रोलच्या सहाय्याने अनावरण करतील. त्यानंतर अतिथींना चहा-पान व नाष्टयाची व्यवस्था करण्यात यावी. सदर ठिकाणी कमानी, मंडप, फायर फायटर व वैद्यकीय सुविधेसह ॲम्ब्युलन्सची व्यवस्था करण्यात यावी.

**(११)** मा.राष्ट्रपती व मा.मुख्यमंत्री यांना सोन्याच्या १० ग्रॅम, ०५ ग्रॅम २.५०० ग्रॅम वजनाच्या नाण्यांचा सेट प्रत्येकी एक संस्थानमार्फत भेट म्हणून देण्यात यावा.

**(१२)** मा.राष्ट्रपती व मा.मुख्यमंत्री यांचे प्रस्तानानंतर निमंत्रित मान्यवरांचे उपस्थितीत त्याच ठिकाणी मा.श्री.रेड्डी, मा.श्री. रमणी यांचे तसेच नवीन प्रसादालयाचे संबंधित आर्किटेक्ट, इंजिनिअर्स यांचा सत्कार करण्यात यावा.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख/अधिक्षक मंदीर/जनसंपर्क अधिकारी/ध्वनीक्षेपण प्रमुख)

**(१३) श्री साई प्रसादालय इमारत उद्‌घाटन कार्यक्रमाबाबत.**

दि. २७/११/२००७ रोजी श्री साई प्रसादालय इमारत उद्‌घाटन कार्यक्रम महामहीम राष्ट्रपती, श्रीमती प्रतिभा देविसिंग पाटील, भारत सरकार, यांचे हस्ते होणार आहे. या कार्यक्रमासाठी महामहीम राष्ट्रपती, महोदय यांचे हेलीकॉप्टर नविन भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथील उभारलेल्या हेलिपॅड वर उतरणार आहेत. तसेच महामहीम श्रींचे दर्शना करीता मंदिरात जाणार आहे. त्या करीता सुरक्षा विभागाने कळविलेनुसार महामहीम यांचे निवासाकरीता खालील ठिकाणी सुरक्षा गृह (सेफ रुम) तयार करणे आवश्यक आहे, असे कळविले आहे.

०१. नविन भक्तनिवासस्थान मधील A १ व B १ या दोन व्हि. आय. पी. मध्ये सुरक्षा गृह (सेफ रुम) तयार करणे.

०२. समाधी मंदिरात व्हि. आय. पी. रुम व शेजारील रुममध्ये सुरक्षा गृह (सेफ रुम) तयार करणे.

०३. समाधी मंदिरात प्रवेश द्वारापासून ते समाधी पर्यंत मॅटींग बसविणे.

उपरोक्त प्रमाणे तीन ठिकाणी ०४ वातानूकुलीत व्हि. आय. पी. सुरक्षा गृह (सेफ रुम) ची व्यवस्था करणे आवश्यक असल्याने अशा प्रकारच्या रुम तयार करणेकामी उपरोक्त ०४ रुममध्ये व समाधी मंदिरात प्रवेश द्वारापासून ते समाधी पर्यंत मॅटींग बसविणे आवश्यक आहे. या करीता खालील तिन मॅटींग पुरवठा धारकाकडून दरपत्रके मागविणेत आली होती. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ. नं. | मॅटींग तपशिल | श्री. मेहुल बिपीन देसाई, संगमनेर | ॲडव्हेंचर मॅट्रेसेस्, अ.नगर | दिपीका सेल्स कार्पोरेशन, अ. नगर. |
|---|---|---|---|---|
| ०१. | नोव्हा ॲक्रेलिक लाल /मरुन रंगाचे १२ फुट रुंदीचे व ९ एमएम जाडीचे कारपेट पुरविणे व जागेवर बसविणे | ---- | रु. ४२.०० प्रति चौ. फुट | रु. ४७.०० प्रति चौ. फुट |
| ०२ | लोटस् कारपेट २१३ नं. चे रुंदी १२ फुट असलेले पुरविणे व जागेवर बसविणे | रु. ८५.०० प्रति चौ. फुट | रु. ७०.०० प्रति चौ. फुट | रु. ८०.०० प्रति चौ. फुट |

उपरोक्त प्रमाणे तपशिला नुसार आवश्यक असणारे मॅटींग करीता ॲडव्हेंचर मॅट्रेसेस्, अ.नगर यांचे निमनत्म स्वरुपाचे असल्याने व सदरचे काम तातडीचे म्हणजेच दि. २५/११/२००७ चे अगोदर पुर्ण करणे आवश्यक असल्याने ॲडव्हेंचर मॅट्रेसेस्, अ.नगर यांना कळविण्यात आले असून काम पुर्ण करुन घेण्यात येत आहे. या करीता अंदाजे ३,१२५.०० चौ. फुट मॅंटींग खरेदी करीता रु. १,३१,२५०.०० मात्र खर्च अपेक्षित आहे. असा प्रस्ताव मा. कार्यकारी अधिकारी, यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, महामहीम, श्रीमती. प्रतिभा देविसींग पाटील, राष्ट्रपती, भारत सरकार, हया दि. २७/११/२००७ रोजी येणार असल्याने समाधि मंदिरात टाकणेकामी तसेच सदरच्या सेफ रुम सुरक्षा विभागाचे दि. २५/११/२००७ चे आगोदर ताब्यात देण्याचे असल्याने व काम तातडीचे असल्याने आवश्यकते प्रमाणे मॅंटींग टाकणे करीता येणारे रु. १,३१,२५०.०० मात्रचे योग्य त्या खर्चास व ॲडव्हेंचर मॅट्रेसेस्, अ.नगर यांचे दर निमन्तम स्वरुपाचे असल्याने त्यांचेकडून खरेदी करण्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान करण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**(१४) श्री साई प्रसादालय इमारत उदघाटन सभांरभासाठी फुलांची सजावट करणे बाबत.**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था,शिर्डीचे मा.व्यवस्थापन समितीचे विविध निणर्यान्वये श्री क्षेत्र येथे भेट देणा-या हजारो साईभक्तांना प्रसाद भोजनाची सुविधा विनसायास व विना विलंब मिळावी या दृष्टीने अंदाजे ५५०० भक्त एकाच वेळेस प्रसाद भोजन घेवू शकतील असे अदयावत प्रसादालय इमारतीचे बांधकाम करण्यात आलेले आहे.

दिनांक २७/११/२००७ रोजी नविन प्रसादालय इमारतीचे उदघाटन प्रतिभाताई पाटील मा.राष्ट्रपती भारत सरकार यांचे शुभहस्ते आयोजीत केलेले आहे. नविन प्रसादालय इमारत उद्घाटन या कार्यक्रमासाठी भारत सरकार व महाराष्ट्र सरकार यांचे अनेक मान्यवर या कार्यक्रमासाठी उपस्थित राहणार आहे. सजावट करणेसाठी अंदाजे रु.४,००,०००/- ( रु. चार लाख )मात्र खर्च अपेक्षित आहे. या कामी सजावट करणेसाठी खालील सजावटदारांकडून दरपत्रके मागविण्यात आलेली होती. त्यांचा तपशिल खालील प्रमाणे

| अ.न. | नाव | आवक नंबर | रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | अशोक प्लॉवर स्टॉल,मुंबई | ३८०५० | ३,७५,००० |
| ०२ | प्रविण किसनराव जाधव,मुंबई | ३८०५१ | ३,९५,००० |
| ०३ | राजेंद्र लक्ष्मणराव हिंगणे, मंबई | ३८०५२ | ४,००,००० |
| ०४ | निवृत्ती नामदेव कोकणे, मंबई | ३८०५३ | ३,८५,००० |
| ०५ | विनायक प्लॉवर,स्टॉल | ३८०५४ | ३,८०,००० |

उपरोक्त तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे अशोक प्लॉवर स्टॉल ,मुंबई. यांचे फुल सजावटीचे दर न्युनत्तम आल्याने श्री साई प्रसादालय इमारत व मंदिर सजावट त्यांचे कडून घेणेस व त्याकामी येणारे योग्य त्या सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात यावी असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बगीचा विभाग प्रमुख)

**(१५) श्रीसाईबाबा हॉस्पीटल येथे वाढीव फर्निचर व ॲल्युमिनीअम पार्टीशन व दरवाजे तयार करणे कामाबाबत.**

श्रीसाईबाबा हॉस्पीटल वैद्यकीय संचालक यांनी श्री साईबाबा हॉस्पीटल येथे काही वाढीव फर्निचर व ॲल्युमिनीअम पार्टीशन दरवाजे तयार करुन मिळणेबाबत वेगवेगळया निवदेनांव्दारे कळविले होते. त्यानुसार आवश्यक ती मोजमापे घेऊन आर्किटेक्ट शितल जोशी, श्रीरामपूर यांचेकडून प्लॅन व अंदाजपत्रक तयार करुन घेण्यात आले. याप्रमाणे अंदाजपत्रकानुसार सदर कामास रुपये ७,०९,०००.०० मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

उपरोक्त वाढीव फर्निचर व ॲल्युमिनीअम पार्टीशन व दरवाजेचे काम करणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि. २०/०५/२००७ रोजीचे सभेत निर्णय क्र. ३७८ अन्वये येणारे खर्चास व वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे निविदा मागविणेकरीता मंजुरी देण्यात आलेली आहे. परंतू हॉस्पीटल विभागाने नंतर काही वाढीव मागण्या कळविल्या असून त्यांचाही निविदेत समावेश करण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर खर्चाची रक्कम वाढून रु. १०,४३,२१२.०० मात्र इतकी झालेली आहे. त्यानुसार वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या होत्या व कोऱ्या निविदा विक्रीची मूदत दि. २०/०९/२००७ ते दि. ०३/१०/२००७ अखेर ठेवण्यात आली होती. सदर मूदतीत खालील पाच ठेकेदारांनी कोऱ्या निविदा विकत घेतलेल्या होत्या.

०१) जे.के. एंटरप्रायजेस, नाशिक
०२) सुदर्शन फ्लेक्झीबल पॅकेजिंक प्रा. लि., नाशिक
०३) डॅश इंटेरीअर, मुंबई
०४) मारवेल इंटेरीअर डिकोरर्टस ॲण्ड लेण्ड स्केपिंग डिझाईनर्स, नाशिक
०५)कमल कन्स्ट्रक्शन, नाशिक

सिलबंद निविदा सादर करणेसाठी दि. १०/१०/२००७ अखेर मूदत देण्यात आली होती. विहित मूदतीत उपरोक्तपैकी फक्त खालील दोन ठेकेदारांनी सिलबंद निविदा सादर केली.

०१) डॅश इंटेरीअर, मुंबई
०२) कमल कन्स्ट्रक्शन, नाशिक

त्यामुळे दि. १६/१०/२००७ चे टिपणी अन्वये वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन फेर निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विक्रीची मूदत दि. ३१/१०/२००७ ते दि. ०५/११/२००७ अखेर ठेवण्यात आली होती. सदर मूदतीत खालील चार ठेकेदारांनी कोऱ्या निविदा विकत घेतल्या होत्या.

०१) नाशिक ग्लास डेपो, नाशिक
०२) सायली सेल्स कॉर्पोरेशन, अहमदनगर
०३) अतुल व्ही. चव्हाण, अहमदनगर

०४) एम.एम. कन्स्ट्रक्शन, नाशिक

सिलबंद निविदा सादर करणेसाठी दि. ०८/११/२००७ अखेर मूदत देण्यात आली होती. विहित मूदतीत उपरोक्त चार पैकी खालील एका ठेकेदाराने निविदा सादर केली.

०१) नाशिक ग्लास डेपो, नाशिक

त्यानुसार पुर्वी दि. १०/१०/२००७ रोजी प्राप्त झालेले दोन व दि. ०८/११/२००७ रोजी प्राप्त झालेले एक असे तिन निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | निविदा सादरकर्त्यांचे नांव |
|---|---|
| ०१ | डॅश इंटेरीअर, मुंबई |
| ०२ | कमल कन्स्ट्रक्शन, नाशिक |
| ०३ | नाशिक ग्लास डेपो, नाशिक |

उपरोक्त निविदा आजचे सभेपुढे उघडण्यात आल्या असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | ठेकेदारांचे नांव | निविदा रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| ०१. | डॅश इंडेरियर्स,मुंबई | ०८,०४,४६०.०० | प्रथम निम्नतम |
| ०२. | नासिक ग्लास डेपो, नाशिक | १०,४९,६३२.०० | तृतीय निम्नतम |
| ०३. | कमल कन्स्ट्रक्शन, नाशिक | ०९,८०,०००.०० | व्दितीय निम्नतम |

वरील निविदांबाबत सविस्तर चर्चा होउन संबंधित निविदासादरकर्त्यांकडून ते दर कमी करणेसाठी इच्छुक असल्यास, तसे सुधारीत देकार मागवून ते मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करावेत अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.१०** **दिनांक २०.१२.२००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त**

**निर्णय क्र.१०** दिनांक २०.१२.२००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन या इतिवृत्तातील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

**(०१) नविन प्रसादालय माऊंटेड एल.पी.गॅस प्लँट उभारणी कामाच्या निविदा उघडणेबाबत.**

नविन प्रसादालयाकरिता एल.पी. गॅस यंत्रणा उभारणीकामी येणा-या अंदाजे रु.२,००,००,०००/- खर्चास व वृत्तपत्रात जाहिरात देउन जाहिर निवीदा मागविणेस मा. व्यवस्थापन समिती दि.२९/०६/२००७ चे सभेतील निर्णय क्र.४७१ ने मान्यता मिळालेली आहे. त्यानूसार प्रसादालयाकडील दि.०९/०८/२००७ चे टिपणीन्वये जाहिर निवीदाकामी वृत्तपत्रात जाहिरात देण्यात आलेली आहे. उपरोक्त जाहिरातीनुसार खालीलप्रमाणे निवीदाधारकांनी को-या निवीदा खरेदी केलेल्या आहेत व त्या सर्व निवीदाधारकांनी दरपत्रक सादर केलेली आहेत.

| अं.नं. | निवीदाधारकाचे नाव |
|---|---|
| ०१ | ग्लोब गॅस इक्वीपमेंट प्रा.लि., मुंबई |
| ०२ | स्पीटेक इक्वीपमेंट प्रा.लि., भांडुप, मुंबई |
| ०३ | इंडस्ट्रीयल इंजिनिअरिंग कंपनी, नवी मुंबई |
| ०४ | लार्सन ॲण्ड टुब्रो लि., पुणे |

उपरोक्त निविदासादरकर्त्यांनी सादर केलेले दरपत्रके आजचे सभेत समक्ष उघडण्यात आली, या दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय)

**(०२) नविन प्रसादालयाकरिता सोलर स्टीम कुकींग यंत्रणा उभारणीकामी आवश्यक निविदा न आलेबाबत.**

मा.व्यवस्थापन समिती दि.०६/०१/२००७ चे सभेतील निर्णय क्र.५४ अन्वये नविन प्रसादालयाकरीता सोलर स्टीम कुकींग यंत्रणा उभारणीकामी अंदाजे रु.१,३६,००,०००/- चे खर्चास व वृत्तपत्रात जाहिरात देउन मोहरबंद निवीदा मागविणेस मान्यता मिळालेली आहे. मोहरबंद निवीदा मागविणेकामी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे एजन्सींनी को-या निवीदा खरेदी केलेल्या आहेत.

| अं.नं. | निवीदाधारकांचे नांव |
|---|---|
| १. | मे.सुप्रिम रे सोलर सिस्टीम्स, पुणे |
| २. | मे.शारदा इनव्हेंशन्स, नाशिक |
| ३. | मे.गढीया सोलर सिस्टीम्स प्रा.लि., बलसाड (गुजरात) |

उपरोक्त ३ एजन्सीपैकी अं.नं. २ व ३ यांनीच दरपत्रक सादर केलेले आहेत. अं.नं.१ यांनी दरपत्रक सादर केलेले नाही. संस्थान नियमानूसार कमीत कमी ३ दरपत्रक (निवीदा) असणे गरजेचे आहे. संस्थानने मा.श्री माहुलकर, मेडाचे प्रतिनीधी यांच्या उपस्थितीत दि.०६/०९/२००७ रोजी उपरोक्त

निवीदाधारकासमवेत प्रिबिड मिटीग आयोजित केलेली होती. सदर मिटींगमध्ये चर्चेअंती निवीदा खरेदीकरणारांनी वेगवेगळया साईजच्या डीशचे दरपत्रक सादर केलेले असल्याचे आढळून आले. तसेच निवीदाफॉर्ममध्ये अन्य तांत्रिक त्रुटी असल्याचे आढळून आले. तरी त्याकामी सल्लागार (मेडा) यांचे मार्गदर्शन घेउन फेरनिवीदा सादर करणे योग्य होईल. मेडाकडून डिशची साईज व त्रुटीबाबत अंतीम अहवाल आल्यानंतर निवीदा फॉर्ममध्ये आवश्यक ते बदल करुन फेरनिवीदा प्रसिध्द करणेस व उपरोक्त २ निवीदासादरकर्त्यांनी प्रथम रु.५,०००/- भरुन निवीदा फॉर्म खरेदी केलेले असल्याने त्यांना फेरनिवीदेचा फॉर्म मोफत देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता

यावर सविस्तर चर्चा होऊन, याकामी फेर निविदा मागविण्यात याव्यात. मे.मेडा यांचे मार्गदर्शनाने या क्षेत्रात काम करत असलेल्या व्यक्ती/कंपन्या यांना पत्र देऊन विशिष्ट मुदतीत डायरेक्ट दर मागविण्यात यावेत. तसेच ज्यांनी पूर्वी दरपत्रके सादर केलेले आहेत त्यांना मोफत फेरनिविदाफॉर्म देण्यात यावेत अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय)

**(०३) फेब्रीकेटेड इक्वीपमेंट खरेदीबाबत निर्णय घेणे.**

नविन प्रसादालयासाठी फेब्रीकेटेड किचन इक्वीपमेंट खरेदीसाठी आलेल्या निवीदा मा. व्यवस्थापन समिती दि.२०/५/२००७ चे सभेमध्ये उघडण्यात आलेल्या असून निवीदाधारकांना दि.२६/५/२००७ चे सभेपुढे चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात ओलेले होते. चर्चा व वाटाघाटीसाठी खालील निवीदाधारक हजर होते.

०१) शिवा इंजिनीअर्स मेटाप्रो, पुणे.
०२) ग्राईहूड इंडस्ट्रीज, कोल्हापूर.
०३) ठक्कर इक्वीपमेंट कंपनी, नवि दिल्ली.
०४) मेटल फॅब्रीकेटर्स ऑफ इंडिया, मुंबई.
०५) मार्क्स टेन इक्वीपमेंट (इं.) प्रा.लि.,मुंबई.
०६) साई इंजिनीअर्स, नासिक.
०७) स्वराज इंडस्ट्रीज, कोपरगाव.
०८) बोनीसन इक्वीपमेंट प्रा.लि. पुणे.
०९) अपोलो इंडस्ट्रीज, वटवा, अहमदाबाद.
१०) राजलक्ष्मी इंडस्ट्रीज, कोल्हापूर.
११) सुयोग इक्वीपमेंट प्रा.लि. पुणे.

वरीलप्रमाणे १ ते ११ निवीदासादरकर्त्यांना समक्ष बोलावून चर्चा केली असता प्रत्येकाने वेगवेगळया पध्दतीने दर सादर केल्याचे आढळून आलेले दराची तुलना करणे अशक्य असल्यामुळे सर्वांनी फेब्रीकेटेड किचन इक्वीपमेंटचे बेसिक दर, कर व त्यावरील इतर खर्च वेगळा दर्शवून दरपत्रक सादर करावे असे त्यांना सांगण्यात आले होते. त्यानूसार उपस्थित ११ निवीदासादरकर्त्यांनी सभेस्थानी काही वेळातच सुधारीत दराची दरपत्रक बंद पाकीटात सादर केली. सदर बंद पाकीटे सभेच्या ठिकाणी उघडण्यात आलेली आहेत. उर्वरीत अनुपस्थित असलेले खालीलप्रमाणे

१) एल.एल. इक्वीपमेंट, मुंबई
२) राजलक्ष्मी कमर्शियल किचन इक्वीपमेंट प्रा.लि. बेंगलोर.
३) सिम्पल एन्टरप्रायजेस, नवी दिल्ली.
४) बिंदल इक्वीपमेंट, इंदौर.

या चार निवीदासादरकर्त्यांना कुरीअरद्वारे कळवून सुधारीत दरपत्रके मागविण्यात आली होती. त्यांनी सादर केलेली सुधारीत दरपत्रके मा. कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडण्यात आलेली असून वरीलप्रमाणे १ ते १५ निवीदासादरकर्त्यांनी सादर केलेल्या सुधारीत दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता मा. व्यवस्थापन समिती दि.३/७/२००७ चे उपसमिती सभेपुढे सादर करण्यात आलेला होता.

वरीलप्रमाणे निवीदासादरकर्त्यांनी देउ केलेल्या दरात आणखी काही सुट देणार किंवा कसे याबाबत दि.३/७/२००७ चे सभेत समक्ष चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. समक्ष चर्चेत निवीदासादरकर्त्यांनी दरपत्रकात खालीलप्रमाणे सुट देण्याचे मान्य केलेले आहे.

| अ.नं. | कंपनीचे नावं | चर्चा / वाटाघाटीमध्ये देउ केलेली सुट |
|---|---|---|
| ०१. | शिवा इंजिनीअर्स, मेटाप्रो, पुणे | १०% सुट |
| ०२. | ग्राईहुड इंडस्ट्रीज, कोल्हापूर | सुट नाही |
| ०३. | एल.एल.इक्वीपमेंट ॲण्ड मशिन्स प्रा.लि. मुंबई | सुट नाही |
| ०४. | ठाकर इक्वीपमेंट कंपनी, नवी दिल्ली | संपूर्ण काम मिळाल्यास १०%<br>५० ते ७५ लाखाचे काम मिळाल्यास ७.५%<br>५० लाख ते १० लाखाचे काम मिळाल्यास ५ ते ७.५%<br>फॅक्स पत्रात दर्शविल्याप्रमाणे |
| ०५. | राजलक्ष्मी कमर्सियल किचन इक्वीपमेंट प्रा.लि. बेंगलोर | अनुपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ०६. | सिम्पल एन्टरप्राईज, नवी दिल्ली | अनुपस्थित |
| ०७. | मेटल फेब्रीकेटर्स ऑफ इंडिया, मुंबई | ५% सुट |
| ०८. | मार्क्स टेल इक्वीपमेंट(इं)प्रा.लि.मुंबई | १२.५% सुट |
| ०९. | साई इंजिनीअर्स, नासिक | डायनिंग टेबल वगळता उर्वरीत वस्तूवर ५% सुट |
| १०. | स्वराज इंडस्ट्रीज, कोपरगाव | ३५% सुट |
| ११. | बोनीसन इक्वीपमेंट प्रा.लि. पुणे | ९% सुट |
| १२. | बिंदल इक्वीपमेंटस्, इंदौर | अनुपस्थित |
| १३. | अपोलो इंडस्ट्रीज,वटवा, अहमदाबाद | अनुपस्थित ३% सुट पत्राद्वारे |
| १४. | राजलक्ष्मी इंडस्ट्रीज, कोल्हापूर | डायनिंग टेबल वगळता उर्वरित वस्तूवर ५% सूट |
| १५. | सुयोग इक्वीपमेंट प्रा.लि. पुणे | ४% सुट |

उपसमिती सभेपुढे यावर सविस्तर चर्चा होउन उपरोक्त निवीदाधारकांना ज्यांनी टेबलाचे दर देउ केलेले आहेत त्यांना टेबलाचे नमुने तयार करणेस सांगणेत आले व वरीलप्रमाणे देउ केलेल्या सुटीचे दराचा तक्ता पुढील व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करावा असे उपसमितीने शिफारस केली होती. त्यास मा.व्यवस्थापन समिती दि.२८/७/२००७ चे सभेतील विषय क्र.६ वरील निर्णय क्र.५१७ नुसार मान्यता देण्यात आलेली आहे.

उपसमितीचे शिफारशीनुसार निवीदासादरकर्त्यांनी पाठविलेले टेबल्सचे नमुने व सुट वजा जाता केलेला दराचा तुलनात्मक तक्ता मा.व्यवस्थापन समिती दि.२८/७/२००७ चे सभेपुढे ठेवण्यात आला होता. सभेतील विषय क्र.१५ वरील निर्णय क्र.५२६ अन्वये सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आलेली आहे.

मा.व्यवस्थापन समिती दि.२८/७/२००७ चे सभेतील निर्णय क्र.५१७ नुसार खालील निवीदासादरकर्त्यांनी टेबलाचे व राईस कुकर्सचे नमुने तयार करुन पाठविलेले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | साई इंजिनीअर्स, नासिक | - | टेबल व कुकर |
| २) | स्वराज इंडस्ट्रीज, कोपरगाव | - | टेबल व कुकर |
| ३) | मेटल फेब्रीकेटर्स ऑफ इंडिया, मुंबई | - | टेबल व गॅस शेगडी |
| ४) | राजलक्ष्मी इंडस्ट्रीज, कोल्हापूर | - | टेबल |
| ५) | शिवा इंजिनीअर्स, मेटाप्रो, पुणे | - | टेबल |
| ६) | अपोलो इंडस्ट्रीज, वटवा, अहमदाबाद | - | टेबल |
| ७) | ग्राईहुड इंडस्ट्रीज, कोल्हापूर | - | टेबल |
| ८) | सुयोग इक्वीपमेंट प्रा.लि. पुणे | - | टेबल |

उपरोक्तप्रमाणे सर्व टेबल्स व कुकर्सचे नमुन्यांचे श्री संजीव देशमुख, किचन सोल्युशन कॉम, किचन सल्लागार यांनी क्वालिटी इन्स्पेक्शन केलेले असून, त्यांचे दि.०१/१०/२००७ चे फॅक्सद्वारे त्यांनी उपरोक्त १ ते १५ निवीदासादरकर्त्यांपैकी खालील ७ निवीदासादरकर्त्यांची शॉर्ट लिस्ट कळविलेली आहे.

१) मेटल फेब्रीकेटर्स ऑफ इंडिया, मुंबई.
२) न्यु राजलक्ष्मी, बेंगलोर
३) स्वराज इंडस्ट्रीज, कोपरगाव
४) सुयोग इक्वीपमेंट प्रा.लि., पुणे
५) ग्रेहाउंड इंडस्ट्रीज कोल्हापूर
६) शिवा इंजिनीअर्स, मेटाप्रो, पुणे
७) राजलक्ष्मी इंडस्ट्रीज, कोल्हापूर

श्री देशमुख किचन कन्सलटंट यांनी सदरचे फॅक्समध्ये असेही कळविले आहे की , खरेदीसाठी टेंडरमधील तरतुदीनुसार दराची वैधता ६० दिवसाची आहे. त्यामुळे टेंडरधारकाकडून किंमतीबाबत सुधारीत संमतीपत्र घेणे आवश्यक आहे. त्यानूसार अंतीम निर्णय घेणे योग्य होईल.

उपरोक्त परिस्थितीचा विचार करता, खालीलप्रमाणे प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

अ) श्री संजीव देशमुख, किचन कन्सलटंट यांनी दि. १/१०/०७ चे शॉर्टलिस्ट शिफारस पत्रात नमूद केले आहे की, काही महिन्यात स्टे.स्टीलचे मार्केटमध्ये (बाजारभाव) चढउतार झालेला असल्याने सद्यस्थितीतील परिस्थीतीनुसार सुधारीत दर मागविणे गरजेचे आहे. याबाबत उपरोक्त १ ते ७ पुरवठादाराकडून खुलासा तथा फेरदर मोहरबंद पाकीटात मागविणेबाबत तसेच

ब) किचन कन्सलटंट यांनी शॉर्टलिस्टमध्ये नामनिर्देशीत केलेल्या ७ निविदा सादरकर्त्याव्यतीरिक्त इतर ८ निवीदा सादर कर्त्याची अनामत रक्कम त्यांना परत पाठविणेबाबत व जे निवीदासादरकर्ते टेबल नमुना परत मागतील त्यांना टेबल परत देण्यात यावेत.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त 'अ' व 'ब' प्रस्तावास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय)

**(०४) नाताळ सुटी कालावधीत मोठ्या प्रमाणात होणाऱ्या गर्दीमध्ये सेवा/सुविधा पुरविणेकामी तात्पुरत्या केटरर्सची नेमणूक करणेबाबत.**

श्रीं चे दर्शनार्थी साईभक्तांची नाताळ सुटी कालावधीत दरवर्षी मोठया प्रमाणात गर्दी होत असते. गर्दीमध्ये साईभक्तांची निवासाची गैरसोय टाळण्यासाठी जुनी मराठी शाळा, साईउद्यान, साईप्रसाद नं.२ पार्कींग, साईनगर, साईबाबा भक्तनिवास व धर्मशाळा परिसरात तात्पुरते मंडप टाकण्यात येतात. त्यापैकी साईप्रसाद नं.२ पार्कींग, साईउद्यान इमारत, साईनगर पटांगण व साईबाबा भक्तनिवासस्थान येथे स्वयंसेवी भोजन व्यवस्था प्रसादालयामार्फत पुरविण्यात येते. पैकी साईबाबा भक्तनिवासस्थान येथे सध्या दैनंदिन सरासरी ५००० पर्यंत भक्त प्रसादभोजनाचा लाभ घेतात. या ठिकाणी प्रसाद भोजन देण्यासाठी लागणारे पदार्थ प्रसादालयात बनवून साईबाबा भक्ततिनवासस्थान कॅन्टीनमध्ये वितरीत केले जातात. हे सर्व करीत असतांना साईबाबा भक्तनिवासस्थान हे प्रसादालयापासून दूर अंतरावर असल्याने तसेच तेथील स्वयंसेवी भोजन व्यवस्थेकामी प्रसादभोजन पदार्थ हे नगर-मनमाड हायवेवरुन वाहनाने वाहून न्यावे लागतात. गर्दीचे काळामध्ये नगर-मनमाड हायवेवरील वाहनांची ये-जा (वाहतुक) नेहमी विलंबाने होत असते. त्यामुळे भोजन पदार्थ घेऊन जाणारे वाहन वेळेवर प्रसादालयात येत नाही व साईबाबा भक्तनिवासस्थानला वेळेवर पोहचू शकत नाही. त्यामुळे साईबाबा भक्तनिवासस्थान मधील स्वयंसेवी व्यवस्था पदार्थ वेळेवर न मिळाल्याने व्यवस्था कोलमडली जाते व साईभक्तांना भोजन घेणेसाठी प्रतिक्षा करावी लागते. त्यामुळे भक्तांची गैरसोय तर होतेच व भक्तांच्या नाराजीस सामोरे जावे लागते.

वरीलप्रमाणे वस्तुस्थितीचा विचार करता साईबाबा भक्तनिवासस्थान मध्ये विनाविलंब भोजन व्यवस्था पुरविणेकामी तात्पुरते नाताळ सुटीत भक्तांची गर्दी आहे तोपर्यंत कालावधीसाठी स्वतंत्र केटरर्सची नेमणुक करुन भोजन व अल्पोपहार देणे योग्य राहील. सदरचे भोजन व अल्पोपहार बनविणेकामी किराणामाल, भाजीपाला, गॅस संस्थानकडून पुरविता येईल, केटरर्सकडून भोजन व अल्पोपहार बनविणे व वितरीत करणेचे काम करुन घेता येईल. त्याकामी स्थानिक केटरर्सकडून टेंडर बोलविता येतील.

भोजन व अल्पोपहारमधील पदार्थ खालीलप्रमाणे असावेत.

| | **भोजन पदार्थ** | **अल्पोपहार पदार्थ** |
|---|---|---|
| १) | पुरी | १) पुरी |
| २) | कडधान्य उसळ | २) कडधान्य उसळ |
| ३) | भात | ०४)आमटी |
| ०५) | बुंदी | |

तरी नाताळ सुटीचे कालावधीत भक्तांची गर्दी आहे तोपर्यंत आवश्यकता विचारात घेउन साईभक्तांचे सोईसाठी वरिलप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,सदरचा प्रस्ताव मान्य करण्यात आला व याकामी स्थानिकचे केटरर्स यांचेकडून त्वरीत २ दिवसात भोजन व अल्पोपहार तयार करण्याचे व भक्तांना वितरीत करण्याचे कामासाठी दरपत्रके घेण्यात यावीत व संबंधित केटरर्स यांना मा.विश्वस्त सर्वश्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे, डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व अशोक भिमाशंकर खांबेकर यांचे समक्ष दिनांक २४.१२.२००७ रोजी बोलावुन घेऊन केटरर्स यांचेशी चर्चा/वाटाघाटीअंती दर निश्चित करण्याचा व केटरर्स नेमण्याचा निर्णय घेण्यात यावा,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय)

**(०५) नाताळ सुट्टीत भक्तांना पुरेशा प्रमाणात प्रसाद लाडू पुरविण्यासाठी तात्पुरत्या केटरर्सचे नेमणूकीबाबत.**

संस्थान मार्फत श्री साईभक्तांना पुरविण्यासाठी प्रसाद लाडू बनविण्यात येतात. सदरचे प्रसाद लाडू तयार करण्यासाठी कॉन्ट्रक्टर श्री माधव गंगाराम नाईकवाडी यांना वार्षिक टेंडर देण्यात आलेले आहे. त्यांना सध्या रु.१२१/- प्रति हजारी दराने काम देण्यात आलेले आहे. ते गर्दीचे प्रमाणानूसार दररोज २५ ते ४० क्विंटल साखरेचे लाडू बनवितात. मात्र साधारणतः दिपावली सुटी व नाताळचे सुटीमध्ये साईभक्तांची गर्दी मोठया प्रमाणात वाढते. त्यावेळी अंदाजे ६५ ते ७० क्विंटल लाडूची गरज भासते. मात्र तेवढे लाडू एकटे श्री नाईकवाडी बनवू शकत नाहीत.

दिपावली सुटीतील मोठया प्रमाणातील गर्दीमध्ये श्री नाईकवाडी यांचेकडील मोतीचूर लाडू कमी पडले व अधून मधून कांउटर काही काळ बंद ठेवावे लागले. त्यावेळी मा. अध्यक्ष महोदय यांनी साईभक्तांना पुरेशा प्रमाणात लाडू पुरविणेसाठी गर्दीचे काळामध्ये तात्पुरत्या स्वरुपात दुस-या एजन्सीकडून लाडू बनवून घ्यावेत अशी सुचना केलेली आहे. त्यामुळे नाताळचे गर्दीमध्ये लाडू कमी

पडू नये म्हणून यापूर्वी प्रसादालयामध्ये लाडू बनविणा-या एजन्सींना व परिसरातील खालील अनुभवी केटरर्सना दुरध्वनीवरुन संपर्क साधून विचारणा केलेली आहे.

१) कैलास केटरर्स, राहाता.
२) लोढा मंगल केंद्र, कोपरगाव.
३) साईप्रयाग केटरर्स, शिर्डी .
४) गुरुकृपा लेबर कॉन्ट्रॅक्टर, अंदरसुल.

वरीलपैकी अ.नं.१ ते ३ यांनी सदर काळामध्ये लग्नाची व इतर कामे घेतलेली असल्याने व श्री नाईकवाडी यांचे दरात कामे परवडणार नाहीत. कमीत कमी रु.७५० ते ९०० (रु.१६७ ते २०० प्रति हजारी) प्रति क्विंटल दर देणार असल्यास प्रयत्न करु असे सांगितले आहे. अ.नं.४ गुरुकृपा लेबर कॉन्ट्रॅक्टर द्वारा भगवान काशिनाथ मिसाळ यांनी दि.३०/११/२००७ चे अर्जान्वये रु.६५२ पैसे ५० प्रति क्विंटल (रु.१४५ प्रति हजारी) प्रमाणे लाडू बनविणेचे काम करणेस तयार असलेबाबत लिहून दिले आहे. गुरुकृपा लेबर कॉन्ट्रक्टर यांनी पुर्वी दोन वर्ष स्वतंत्रपणे आपलेकडे लाडू बनविणेचे काम केलेले असून त्यांना मोठया प्रमाणात लाडू बनविणेचा अनुभव आहे.

सदर लाडू बनविणेचे काम नविन साई प्रसादालयातील लाडू किचनमध्ये सुरु केलेले आहे. त्याकामी समृध्दी इण्डेन, राहाता व प्रवरा गॅस एजन्सी, बाभळेश्वर यांचेकडून शक्य तेवढे घरगुती वापराचे सिलेंडर्स घेत आहोत. मात्र त्यांचेकडून घरगुती वापराचे सिलेंडर्सचा पुरवठा होउ शकत नाही त्यावेळी व्यावसायिक वापराचे सिलेंडर घ्यावे लागतात.

श्री मिसाळ, गुरुकृपा लेबर कॉन्ट्रक्टर, अंदरसूल यांचे पूर्वीचे कामाचा अनुभव व दराचा विचार करुन गर्दीचे कालावधीसाठी आवश्यक बाब म्हणून दि.११/१२/२००७ पासून रु.१४५/- प्रति हजारी दराने त्यांना मोतीचूर लाडू बनविणेचे काम दिलेले आहे. भक्तांची गर्दी आहे तोपर्यंत त्यांचेकडून प्रसादलाडू बनवून घेण्याचे काम करुन घेण्यात येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस आहे.

मंदिर परिसरात उत्तर बाजूस गेट नं.०२ शेजारी सद्या प्रसादलाडू विक्रीसाठी चालु असलेल्या काऊंटर्समुळे मंदिर परिसरात खूपच गर्दी होते ही गर्दी कमी होण्यासाठी सदर ठिकाणचे सर्व लाडू काऊंटर्स मारुती मंदिराशेजारील जिल्हा परिषदेकडून मिळालेल्या १६ गुंठे जागेत तसेच प्रसादालय परिसरात स्थलांतरीत करण्यात यावेत, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय/कॅन्टीन विभाग प्रमुख)

**(०६) नवीन प्रसादालय इंडीयन ब्रँडेड किचन इक्वीपमेंट पुरवठादार यांचे इक्वीपमेंट पुरवठा करणेकामी मुदतवाढ मिळणेबाबत.**

नविन प्रसादालयाकरीता मा.व्यवस्थापन मंडळाच्या दिनांक २६/०५/२००७ च्या सभेतील निर्णय क्रं. ४४४ व ४४५ नूसार

| अ. नं. | पुरवठादाराचे नांव | इक्वीपमेंटचा तपशील | संख्या |
|---|---|---|---|
| १. | जय नवनाथ इंजि.वर्क्स , कोल्हापूर | ऑनलाईन चक्की युनिट | ०१ |
| २. | पी.बी.एस इलेक्ट्रॉनिक्स, मुंबई | आर.ओ. प्लॅन्ट | ०१ |
| ३. | सेल्सीअस रेफ्रीजरेशन , मुंबई | कोल्डस्टोअरेज | ०२ |
| ४. | मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद | स्टीम बॉयलर | ०१ |
| ५. | रुसेल एअरफ्लो सिस्टीम्स प्रा.लि. , मुंबई | इंन्सेक्टोक्युटर | ७५ |
| ६. | मंगल मेटल वर्क्स , बेळगांव | डो निडर (आटा मळणी यंत्र) | ०१ |
| ७. | राजलक्ष्मी इंडस्ट्रीज, कोल्हापूर | पल्वरायझर<br>पोटॅटोपीलर | ०१<br>०१ |
| ८. | अल्फाटेक इंडस्ट्रीज , पुणे | डो डिव्हायडर | ०२ |
| ९. | श्रेयस एन्टरप्रायजेस, अहमदनगर | इलेक्ट्रॉनिक वजनकाटे | ०४ |
| १०. | ए.व्ही.ए. इंजिनिअर्स , मुंबई | हायप्रेशर वॉटरजेट मशिन | ०४ |
| ११. | स्टॅकवेल मार्केटिंग सर्व्हीसेस, मुंबई | सॅकपॅलेट<br>हायड्रोलीक ट्रॉली | ७५<br>०४ |
| १२. | निलकमल क्रेटस् ॲण्ड बिन्स प्रा.लि., मुंबई | परफोरेटेड प्लास्टीक ट्रे | ४०० |
| १३. | मे.नवनीतलाल ॲण्ड ब्रदर्स , नाशिक | टिलटिंग टाईप वेट मसाला ग्राईंडर | ०२ |

वरील अ.नं.१ ते १३ पुरवठादारांना नमुद केलेल्या वेगवेगळया इक्वीपमेंटस्करीता पुरवठा आदेश दि.०७/०८/२००७ रोजी देण्यात आले असुन अलाईड सिस्टीमचे पुरवठादार यांनी त्यांचे टेंडरफॉर्ममध्ये वेगवेगळी ॲडव्हान्स रकमेची मागणी केलेली होती. मात्र सदर मागणी मान्य न करता दि.११/०८/२००७ रोजीच्या व्यवस्थापन मंडळाच्या सभेतील विषय क्र.७ निर्णय क्र.६८९ नुसार ४०% रक्कम पुरवठादारांना रितसर करारपत्र करुन दि.१४/११/२००७ रोजी देण्यात आलेली आहे.

त्यानुसार काही पुरवठादारांनी ॲडव्हान्स मिळालेपासून इक्विपमेंट पुरवठा करण्यास ६० दिवसाचा कालावधी पत्राद्वारे मागितला आहे. तसेच काही पुरवठादारांनी ॲडव्हान्स न घेता इक्विपमेंट

तयार करुन संस्थान प्रतिनीधीस तपासणी करण्यास पत्राद्वारे कळविले होते. त्यानुसार त्यांनी इन्सपेक्शन झाल्यानंतर इक्विपमेंट पुरवठा करण्यास ६० दिवसाचा कालावधी मागितला आहे. मुळ टेंडरफॉर्ममधील अटी/शर्ती नुसार पुरवठा आदेशापासून ६० दिवसाच्या आत इक्विपमेंट पुरवठा करण्याची तरतुद आहे. तसेच न केल्यास पुरवठा आदेशाच्या एकूण रकमेच्या दर आठवडयास १% दंड पुरवठादारास आकारण्याची तरतूद आहे. मात्र पुरवठा आदेश, करारपत्र, ॲडव्हान्स इत्यादी गोष्टीस वेळ लागल्यामुळे टेंडरमधील दंडाची तरतूद बराचशा टेंडरधारकांना सोसावी लागणार आहे.

ॲडव्हान्स घेतलेचे तारखेनंतर अथवा इन्स्पेक्शन केलेल्या तारखेनंतर जर पुरवठादाराने ६० दिवसाचे आत इक्वीपमेंटचा पुरवठा केला नाही तर त्यास निवीदेतील तरतुदीनुसार दंडाची आकारणी करावी. मात्र ॲडव्हान्स न घेता पुरवठादाराकडून इक्वीपमेंट पुरविण्यास ६० दिवसापेक्षा विलंब झाल्यास त्याबात कार्यकारी अधिकारी यांनी पुरवठादाराचे स्पष्टीकरण अथवा सबळ कारणाची शहानिशा करावी असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादलय)

**(०७) नाताळ सुटीचे काळात कापडी मंडपामध्ये भक्तांना पुरविण्यात येणाऱ्या गादी-चादरीचे सेवा आकाराबाबत.**

नाताळ सुटीचे कालावधीत तसेच वर्षाअखेर व नववर्षारंभी श्री साईंचे दर्शनासाठी शिर्डी येथे येणाऱ्या भक्तांचे संख्येत प्रचंड वाढ होते. त्यामुळे भक्तांसाठी असणारी संस्थानची निवास, प्रसादभोजन वगैरे पायाभूत सुविधा कमी पडते. संस्थानकडे भक्तांचे निवासासाठी एकूण **८९४** एवढया खोल्या असून त्यामध्ये सुमारे दहा हजार पर्यंतचे भक्तांचीच निवासव्यवस्था होऊ शकते त्यामुळे प्राप्त परिस्थितीत भक्तांची निवासव्यवस्था करण्यासाठी संस्थान शाळेच्या तसेच साईनाथ माध्यमिक विद्यालयाच्या इमारती तसेच प्राथमिक शाळा वगैरे उपलब्ध इमारती सुटीच्या कालावधीत ताब्यात घेण्यात येतात. त्याचबरोबर संस्थानच्या मोकळया जागेत कापडी / शामियाना मंडप टाकून यासर्व ठिकाणी भक्तांना गाद्या,चादरी पुरवून त्यांची झोपण्याची अतिरिक्त व्यवस्था करण्यात येते. वाढीव निवासव्यवस्थेच्या ठिकाणी भक्तांसाठी लाईट, पिण्याचे पाणी,तात्पुरती स्नानगृहे,स्वच्छतागृहे,स्नानासाठी गरमपाणी, क्लोकरुम, चहा,कॉफी, प्रसादभोजन इ.व्यवस्थापुरविण्यात येतात.

चालू वर्षात दि.२१/१२/२००७ पासून सलग सरकारी सुटया असल्यामुळे याही वर्षी मोठया प्रमाणात भक्तांची गर्दी होण्याचा संभव आहे. त्यामुळे अतिरिक्त निवासव्यवस्था म्हणून
दि.२१/१२/२००७ पासून घेण्यात येत असलेल्या इमारती (खोल्या)खालीलप्रमाणे-

०१) श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय,शिर्डी.
०२) संस्थान आय.टी.आय.
०३) संस्थान कन्या विद्या मंदिर.
०४) संस्थान इंग्लीश मेडीयम स्कूल.
०५) सेवाधाम व साईनगर इमारतींमधील रिक्त असलेली कर्मचारी निवासस्थाने.
०६) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा-पिंपळवाडी रोड.
०७) नगरपंचायत शिर्डी हॉल.
०८) नवीन प्रसादालय इमारत.

या इमारतीमधील खोल्या संस्थानने ताब्यात घेतल्या आहेत. याशिवाय मोकळया जागेत सुमारे २ लाख चौरसफुट आकारमानाचे कापडी/शामियाना मंडप चारही बाजुंनी कनातीसह व जमीनीवर बिछायतीसह उभारण्यात आलेले आहेत. या अतिरिक्त व्यवस्थेच्या ठिकाणी सुमारे १६ हजार व्यक्तीपर्यंतची निवासव्यवस्था होऊ शकेल.

संस्थानकडे भक्तांच्या निवासव्यवस्थेसाठी खोल्यांमध्ये नियमीत वापरात असलेल्या गाद्या, चादरी व्यतिरिक्त ३५०० गाद्या, ५० सतरंज्या तसेच (विभाग अधिक्षक प्रमुख भांडाराकडे शिल्लक असलेल्या एकूण) सुमारे १३५०० चादरी/ब्लॅंकेट इ. आंथरणे पांघरणेचे कपडे उपलब्ध आहेत. भक्तांची गैरसोय होऊ नये म्हणून दि.२१/१२/२००७ ते दि.०२/०१/२००८ या १३ दिवस कालावधीसाठी मंडपधारकांकडून दरपत्रके मागणी करुन खालीलप्रमाणे भाडोत्री दराने गाद्या,चादरी घेण्यात आलेल्या आहेत.

| तपशील. | संख्या. | कालावधी. | प्रतिदिवस भाडयाचा दर रुपये. | भाडयाची होणारी रक्कम. |
|---|---|---|---|---|
| गाद्या.<br>चादरी. | ७२००.<br>७२००. | २१/१२/२००७ ते<br>०२/०१/२००८ अखेर<br>१३ दिवस. | ७-००<br>४-०० | ६,५५,२००-००<br>३,७४,४००-००<br>--------------- |
| | | | एकूण.. | **१०,२९,६००-००** |

भक्तांचे गर्दीचे प्रमाण विचारात घेवून प्राप्त परिस्थितीत उपरोक्तशिवाय गरज भासल्यास अधिकच्या गाद्या,चादरी भाडयाने घ्याव्या लागतील. तसेच जादा मंडप उभारणी करावे लागतील.

एकूण परिस्थिती विचारात घेता मंडपभाडे व्यतिरिक्त गाद्या,चादरींसाठी मोठया प्रमाणात खर्च अपेक्षित आहे.

मंडपामध्ये भक्तांना निवास करण्यासाठी / झोपण्यासाठी देण्यात येणाऱ्या चादरींचा सांभाळ करणे ही बाब अत्यंत महत्वाची आहे. कारण गहाळ होणाऱ्या चादरींची किंमत भरुन द्यावी लागेल.

त्यामुळे मंडपात निवास करणाऱ्या भक्तांना द्यावयाच्या गाद्या,चादरींचे भाडे घेणे व चादरीसाठी अॅडव्हान्स ठेवणे आवश्यक आहे. म्हणजे परिणामी संस्थानला गाद्या चादरीचे भाड्यापोटी अथवा नुकसान भरपाईचा भुर्दंण्ड संस्थानला सोसावा लागणार नाही म्हणुन ज्या दराने भाडयाने गाद्या, चादरी घेतल्या आहेत तेवढयाच दराने भक्तांकडून सेवाआकार घेणे व प्रति चादरीसाठी रु.१००/- डिपॉझीट घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,चौकशी निवासस्थान/धर्मशाळा प्रमुख/अधिक्षक,भक्तनिवासस्थान)

**विषय नं.१० दिनांक २०.१२.२००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त**

**निर्णय क्र.१०** दिनांक २०.१२.२००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन या इतिवृत्तातील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

**(०८) साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडील वातानुकुलीत दोन खोल्यांचे सेवा आकाराबाबत.**

मा.महामहिम राष्ट्रपती यांचे हस्ते दि.२७/११/२००७ रोजी संस्थानचे नवीन प्रसादालय इमारतीचे उद्‌घाटन झाले. नियमानुसार सेफरुम असावी म्हणून सदरवेळी संस्थानचे साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीच्या तळमाळयावरील ६ कॉटचा ए-१ व बी-१ या खोल्यांना रंगकाम करुन,फ्लोअरींग गालीचा टाकून या खोल्यांमध्ये ए.सी.बसविण्यात आलेले आहेत.

याच इमारतीमध्ये दुसऱ्या मजल्यावर मा.पुर्व व्यवस्थापन मंडळाच्या काळात मा.अध्यक्ष सो.यांचेसाठी तयार करण्यात आलेल्या ६ कॉटचे रुमला ६ व्यक्तींकरीता प्रति २४ तासांसाठी रु.९००/- सेवाआकार व रु.१०००/- डिपॉझीट रक्कम घेण्यात येत आहे.

मा.महामहिम राष्ट्रपती यांचे शिर्डी भेटीचे वेळी सेफरुम म्हणून तयार करण्यात आलेल्या ६ कॉटच्या २ खोल्यांमधील व्यवस्थाही मा.अध्यक्ष सो. यांचेसाठी तयार केलेल्या खोलीप्रमाणेच आहे. सदरचे दोन ६ कॉटचे खोल्यांना प्रति खोलीस २४ तासांसाठी रु.९००/- सेवाआकार व रु.१०००/- डिपॉझीट घेण्यास तसेच खोलीत निवासासाठी जादा व्यक्ती मर्यादा २ ठेवून (१० वर्षावरील) प्रति व्यक्तीस **रु.१००/-** प्रमाणे सेवाआकार घेण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,भक्तनिवासस्थान)

**(०९) गोदरेज कंपनीचे स्कॅनर व इतर सुरक्षा साधने खरेदी करणे बाबत.**

श्रीसाईमंदिर परिसरात सुरक्षिततेच्या दृष्टीने आत येण्याच्या प्रवेशद्वारांवर साईभक्तांकडील साहित्य चेक करणेकामी स्कॅनर व चेकींग करिता गेटवर डी. एफ. एम. डी. व सी. सी. टी. व्ही. कॅमेरे कार्यान्वीत करावयाचे आहे. या बाबत गोदरेज कंपनीने प्रोजेक्ट अहवाल तयार करुन मा. व्यवस्थापन मंडळाच्या मिटींगमध्ये सादर केला होता. मा. व्यवस्थापन मंडळाच्या दि. २८.०७.२००७ रोजी झालेल्या मिटींगमध्ये विषय क्रमांक ६४ व निर्णय क्रमांक ५७५ अन्वये चर्चा होवून प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे सदर सिस्टीम करिता ट्रायकलर कन्सलटंसी प्रा. ली. मुंबई या कंपनीस कन्सलटंट म्हणुन नेमण्यात आले आहे.

मा. पोलिस महानिरीक्षक, परिक्षेत्र नाशिक यांनी चेकींग करिता स्कॅनर, डी. एफ. एम. डी. व सी. सी. टी. व्ही. चे कॅमेरे व अत्याधुनिक रेकॉर्डींग सिस्टीम तात्काळ कार्यान्वीत करणे बाबत कळविले आहे. गोदरेज कंपनीचे प्रतिनीधी यांचेसोबत चर्चा केली असता स्कॅनर व इतर साहित्य ऑर्डर दिल्यानंतर तिन आठवड्याच्या कालावधीनंतर पुरविण्यात येतील. परंतु तत्पुर्वी तातडीने स्कॅनर आवश्यक असल्यास कंपनी भाडेतत्वाने स्कॅनर देईल. भाडेपोटी होणारी रक्कम स्कॅनरच्या खरेदी किंमतीमधुन कमी केली जाईल. एका स्कॅनरचे भाडे महिन्याला तिन लाख रुपये असेल. त्याकरिता कंपनीकडे डिपॉझीट रक्कम ठेवावी लागेल असे कळविले आहे.

तरी गोदरेज कंपनीचे स्कॅनर, डी. एफ. एम. डी, सी. सी. टी. व्ही. सिस्टीम खरेदी करण्यास लागणाऱ्या कालावधीपुर्वी भाडे तत्वाने उपरोक्त साधने कार्यान्वीत करणेकरिता मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. त्यानुसार संबंधित कंनीचे प्रतिनिधी यांना समक्ष चर्चेसाठी बोलविण्यात आले होते. चर्चेअंती त्यांचेकडील एकच स्कॅनर विदाऊट एक्सप्लोझिव्ह असल्याचे सांगितले असल्याने सदरचा स्कॅनर भाडे तत्वाने घेण्यात येऊ नये अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-संरक्षण विभाग प्रमुख)

**(१०) मोबाईल लॉकर्स सुविधेबाबत.**

नाताळ सुटीचे कालावधीत तसेच वर्षाअखेर व नववर्षारंभी श्री साईचे दर्शनसाठी शिर्डी येथे येणाऱ्या साईभक्तांचे संख्येत प्रचंड वाढ होऊन मोठ्या प्रमाणात गर्दी होते. सुरक्षाविषयक दृष्टीकोन विचारात घेऊन मंदिर परिसराचे आंत भक्तांनी मोबाईल नेऊ नयेत अशी सक्ती करण्यात आलेली आहे. मंदिर परिसरात प्रवेश करण्यासाठी भक्तांसाठी २ इन व ३ आऊट गेट ठेवण्यात आलेले आहेत. मंदिर परिसराचे दक्षिण व पश्चिम प्रवेश गेटचे बाहेर लॉकर्स उभारणी करुन तेथे संस्थान कर्मचारी नेमून भक्तांना मोबाईल, पादत्राणे कॅमेरे ठेवण्यासाठी विना सेवाआकार व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्याचे व्यवस्थापन संस्थानचे संरक्षण विभगामार्फत करण्यात येत आहे.

तथापि भक्तांना पादत्राणे, कॅमेरे, मोबाईल ठेवण्यासाठी करण्यात आलेली सदरची व्यवस्था गर्दीचे कालावधीत अपूरी पडते. त्यामूळे पर्यायी अतिरिक्त व्यवस्था करुन श्रीसाईबाबा संस्थान एम्प्लाईज क्रेडीट को.ऑप सोसायटीस मंदिरालगत दक्षिण बाजूस साईनाथ छा ाया या इमारतीमध्ये दोन गाळे देण्यात येऊन त्या ठिकाणी भक्तांचे कॅमेरे, मोबाईल,पादत्राणे इत्यादी ठेवण्याची व्यवस्था करण्याचा प्रस्ताव आहे. या ठिकाणी मोबाईल कॅमेरे ठेवण्यासाठी भक्तांकडून घ्यावयाचा मोबदला/ सेवाआकार निश्चित होणे आवश्यक आहे. या संदर्भात श्री साईबाबा संस्थान एम्प्लाईज क्रेडीट को.ऑप सोसायटीचे चेअरमन श्री रामराव शेळके यांचेशी समक्ष चर्चा केली असता प्रति मोबाईल, कॅमेरा साठी रुपये २/-सेवाआकार भक्तांकडून घेण्यास मान्यता असावी अशी मागणी केलेली आहे.

तरी भक्तांचे मोबाईल,कॅमेरा ठेवणेसाठी श्री साईबाबा संस्थान एम्प्लाईज क्रेडीट को.ऑप सोसायटी यांना प्रति नगास रुपये २/- प्रमाणे सेवाआकार घेण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-विधी अधिकारी/संरक्षण विभाग प्रमुख)

**(११) श्रीसाईबाबा हॉस्पीटल समोरिल जागेत लॅन्डस्केपींग करणे बाबत रोपांची कोटेशन उघडणे बाबत.**

नव्याने तयार करण्यात आलेल्या श्री.साईबाबा हॉस्पीटलच्या ( सुपर स्पेशालिटी ) समोरिल मोकळया जागेत गार्डन करावयाचे आहे. या हॉस्पीटल मध्ये येणा-या रुग्ण व त्यांचे नातेवाईक तसेच इतर व्यक्तींना प्रसन्न व प्रफुल्लीत असे वातावरण अनुभवास मिळावे तसेच रुग्णांना धुळीचा व प्रदुषणाचा त्रास होवू नये, या दृष्टीने या जागेवर लॅन्डस्केप करणेकामी खालीलप्रमाणे रु.५,५३,५ ७२.३२ मात्र खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | कामाचे स्वरुप | रक्कम |
|---|---|---|
| ०१ | लॅन्डस्केपींग करावयाची जागा | १४४७६४.०० |
| ०२ | पाण्याचा कारंजा | ४००००.०० |
| ०३ | बांधकाम व इलेक्ट्रीकल खर्च | ३६८८०२.३२ |
| | | ५,५३,५७२.३२ |

या मध्ये रु. १४४७६४/- मात्र लॅन्डस्केपींगसाठी दर्शविलेली आहे.श्री.साईबाबा हॉस्पीटलच्या ( सुपर स्पेशालिटी) समोरिल मोकळया जागेत गार्डन करणेकामी आर्किटेक्ट अमृता पवार,नाशिक यांनी खालील प्रमाणे रोपांची यादी दिलेली आहे.

| No | Name of Plant | Quantity |
|---|---|---|
| 01 | Areca plam | 29 |
| 02 | Cenna | 19 |
| 03 | White miniature Ixora | 105 |
| 04 | Red miniature Ixora | 123 |
| 05 | Verigete Aaisocia | 21 |
| 06 | Cathea zebra | 21 |
| 07 | Nephrolepis fern | 21 |
| 08 | Red wex plam | 37 |
| 09 | Green shephalera | 28 |
| 10 | Gyngcoiunt podophyium Butterfly | 27 |
| 11 | Ribben Grass | 113 |
| 12 | Cycus 2.5 | 2 |
| 13 | Acalypha Godrej | 52 |
| 14 | Tulsi | 40 |
| | Total | 609 |

उपरोक्त प्रमाणे रोपांची कोटेशन मागवण्यात आले असता ०४ कोटेशन प्राप्त झालेले आहे.

| अ.न. | नर्सरीचे नाव |
|---|---|
| ०१ | पापायाज नर्सरी, नाशिक |
| ०२ | बाबूलाल नर्सरी, नाशिक |

| | |
|---|---|
| ०३ | तपोवन नर्सरी, नाशिक |
| ०४ | अनुराधा ॲग्रो ,नाशिक |

उपरोक्त प्रमाणे ०४ कोटेशन पैकी अ.क्र ०१ पापायाज नर्सरी, नाशिक यांचा फॅक्स आलेला आहे. इतर नर्सरी याचे कोटेशनचे बंद पॉकिट प्राप्त झालेले आहे.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| No | Name of Plant | मागणी (नग) | पापायाज नर्सरी, नाशिक | बाबूलाल नर्सरी, नाशिक | तपोवन नर्सरी, नाशिक | अनुराधा ॲग्रो. नाशिक |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | Areca plam | २९ | ७५.०० | ९०.०० | **७०.००** | ८०.०० |
| 02 | Cenna | १९ | १५.०० | १०.०० | **०७.००** | १२.०० |
| 03 | White miniature Ixora | १०५ | -- | **२२.००** | -- | २५.०० |
| 04 | Red miniature Ixora | १२३ | -- | **२०.००** | -- | २५.०० |
| 05 | Verigete Aaisocia | २१ | -- | **२०.००** | -- | ३०.०० |
| 06 | Cathea zebra | २१ | १५.०० | **७.००** | -- | ०७.०० |
| 07 | Nephrolepis fern | २१ | २५.०० | **२५.००** | -- | २५.०० |
| 08 | Red wex plam | ३७ | -- | **१०००.००** | -- | १०००.०० |
| 09 | Green shephalera | २८ | २५.०० | **१०.००** | १०.०० | १२.०० |
| 10 | Gyngcoiunt podophyium Butterfly | २७ | -- | **१२.००** | -- | १५.०० |
| 11 | Ribben Grass | ११३ | १०.०० | **०६.००** | ०७.०० | ०७.०० |
| 12 | Cycus 2.5 | २ | -- | **२०००.००** | -- | २०००.०० |
| 13 | Acalypha Godrej | ५२ | -- | **०२.००** | ०३.०० | ०३.०० |
| 14 | Tulsi | ४० | ०५.०० | **०३.००** | ०३.०० | ०३.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्तपैकी बाबूलाल नर्सरी, नाशिक यांचे बहूतांश दर निम्नतम आहेत. मात्र अ.नं.०१ व ०२ करीता तपोवन नर्सरी, नाशिक यांचे दर निम्नतम आहे, त्यांचे दरात बाबूलाल नर्सरी, नाशिक यांना विचारणा करुन ते त्या दरामध्ये देण्यात तयार असतील तर त्यांना पुरवठा आदेश देण्यात येऊन, त्यांचेकडून सर्व रोपे खरेदी करण्यात यावीत. अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम प्रमुख/बगीचा प्रमुख)

**(१२) शिर्डी महोत्सव ०७ करिता समाधी मंदिर, व्दारकामाई,चावडी व गुरुस्थान या ठिकाणी फुलांची सजावट करणेस मंजूरी मिळणे बाबत.**

संस्थान मार्फत प्रत्येक साज-या होणा-या उत्सवात समाधी मंदिर व मंदिर परिसरास फुलांची सजावट करण्यात येते.यामध्ये वेगवेगळी फुले वापरुन सजावट करण्यात येते. दिनांक ३०/१२/२००७ ते ०१/०१/२००८ या कालावधीत संस्थान मार्फत शिर्डी महोत्सव ( नववर्ष ) हा कार्यक्रम साजरा करण्यात येणार आहे. यासाठी ठिकाणी फुलांची सजावट करता येईल.

**अ) समाधी मंदिर .**

०१) श्रींच्या पाठीमागील कमान सजवणे

०२) श्रींचे समाधीच्या दक्षिण-उत्तर बाजूस फुलांच्या माळा सोडणे

०३) नंदी जवळील गेटला तोरण लावणे.

०४) प्रवेशव्दार तोरण लावणे.

**ब) व्दारकामाई**

०१) व्दारकामाईतील आतील तोरण

०२) दगडाजवळील फोटोस बुके व माळा लावणे.

क) चावडी

०१) चावडीचे आतील फोटोस माळा सोडणे व बुके लावणे

०२) चावडी समोरील बाजूस तोरण लावणे.

**ड) गुरुस्थान**

०१) संपूर्ण मंदिरास तोरणे लावून माळा सोडणे

उपरोक्त प्रमाणे सजावट करणेसाठी पुणे येथून कोटेशन मागविण्यात आलेली आहेत.सजावट करणेचे ०३ कोटेशन प्राप्त झालेले आहे.

| अ.न. | नाव |
|---|---|
| ०१ | समर्थ डेकोरेटर्स,पुणे |
| ०२ | श्री व्ही. डी उंदरे, पुणे |

| | |
|---|---|
| ०३ | साई प्लॉवर,डेकोरेटर्स,पुणे |

उपरोक्त प्रमाणे ०३ फुलांची सजावट करणा-या दुकांनाची /फर्मची कोटेशनची(बंद पॉकिट ) आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले असता कोटेशन्ससादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.न. | नाव | देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|
| ०१ | समर्थ डेकोरेटर्स,पुणे | ६०,०००.०० |
| ०२ | श्री व्ही. डी उंदरे, पुणे | ५२,०००.०० |
| ०३ | साई प्लॉवर,डेकोरेटर्स,पुणे | ४१,०००.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, साई प्लॉवर डेकोरेटर्स,पुणे यांचे निम्नतम दर स्विकारुन त्यांना कार्यादेश देण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम प्रमुख/बगीचा प्रमुख)

**(१३) देणगी काऊंटर नंबर दोन येथे संगणकीय जाळे उभारणीबाबत.**

संस्थानचे संगणकीकरण कार्यक्रमांतर्गत संगणकीय नेटवर्कव्दारे सध्या संस्थानची विविध कार्यालये, देणगी काऊंटर्स, खोली वाटप कक्ष, चहा कॅन्टीन, लेखाशाखा चेक / डी. डी., स्वागत कक्ष, प्रसादालय भोजन तिकीट विक्री, इ. ठिकाणची साधारणतः ६५ ते ७० संगणके फायबर ऑप्टीक केबलव्दारे एकमेकांशी जोडण्यात आलेले आहे.

संस्थानमार्फत सध्या देणगी स्विकारणेसाठी देणगी काऊंटर नंबर दोन जून्या कॅन्टीन विभागाच्या हॉलमध्ये सुरु करण्यात आलेले आहे. सध्या या ठिकाणी देणगी स्विकारणेसाठी चार संगणके ठेवण्यात आलेले असून, यापैकी तीन संगणके सध्या ऑनलाईन करण्यात आलेले आहे. य ठिकाणी प्रत्यक्षात पाच संगणकांव्दारे देणगी स्विकारणेची व्यवस्था करण्यात आलेली आहे. या ठिकाणी तात्पुरते स्वरुपात नेटवर्कींग स्विच बसविण्यात आलेले आहे. परंतु, असे निदर्शनास आले आहे की, गर्दीच्या काळात सदरील स्विच ओव्हरलोडमुळे बंद पडतात किंवा नेटवर्कची गती कमी होत आहे. त्यामुळे देणगी स्विकारतांना साईभक्तांना विनाकारण रांगेत ताटकळत उभे राहावे लागते. यासाठी तातडीने कार्यवाही करावी असे तोंडी निर्देश विश्वस्त श्री वाबळे साो, यांनी विभागप्रमुखांना दिलेले आहे.

सदरच्या ठिकाणच्या संगणकांची गती वाढविणेबाबत उपाय योजना करणेसाठी विभागप्रमुख यांनी पाहणी केली असता, सदरच्या ठिकाणी बसविण्यात आलेले जूने स्विच बदलून नविन जादा क्षमतेचे स्विच टाकणे आवश्यक आहे. याचा गोषवारा पुढीलप्रमाणे-

| Sr. No. | Description | Make | Qty. | Amount |
|---|---|---|---|---|
| A | Passive Components | | | |
| 01. | 12U wall mount rack with all standard accessories | HCL | 01 no. | 55,00,000 |
| 02. | LIU 24 port rack mount with accessories | D-link | 01 no. | |
| 03. | SC Pigtail single mode | D-link | 12 nos. | |
| 04. | SC coupler plate | D-link | 02 nos. | |
| 05. | SCcoupler | D-link | 12 nos. | |
| 06. | Optical fibre patch cord single mode | D-link | 02 nos. | |
| 07. | Cat 6 Cable box | D-link | 01 nos. | |
| 08. | Cat 6 pathmax panel (24 port) | D-link | 01 nos. | |
| 09. | Cat 6 Information outlet | D-link | 10 nos. | |
| 10. | Cat 6 patch cord 3 ft | D-link | 10 nos. | |
| 11. | Cat 6 patch cord | D-link | 07 nos. | |
| **B.** | **Labour charges** | | | |
| 01. | Laying & placing of fibre cable & all pigtail termination | -- | -- | 13,000 |
| 02. | 12U rack installation with panel dressing | -- | 01 no. | |
| **C.** | **Active component** | | | |
| 01. | Single mode fibre module for D-link layer 3 switch | D-link | 01 no. | 34,151 |
| 02. | Layer 2 24 port switch with single mode appropriate fibre module | D-link | 01 no. | |
| | **Total for A+B+C** | | | **1,02,151** |

नव्याने सुरु करण्यात आलेल्या देणगी काऊंटर नंबर दोनवर अद्ययावत संगणकीय जाळे उभारणी करणेसाठी उपरोक्त तपशीलप्रमाणे अंदाजे रक्कम रुपये १,०२,०००/- पर्यंतचा खर्च अपेक्षित असून, सदरचे काम संस्थानचे नियमीत पुरवठादार मिनी कॉम्प, मुंबई यांचेकडून तातडीने करुन घेता येईल.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे, नव्याने सुरु करण्यात आलेल्या देणगी काऊंटर नंबर दोनचे अद्ययावतीकरण मिनि कॉम्प, मुंबई यांचेकडून तातडीने करुन घेणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,०२,०००/- पर्यंतच्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-आय.टी.विभाग प्रमुख)

**(१४) दर्शन लाईनमध्ये नाताळ सुटीचे कालावधीत भक्तांना विनामूल्य चहा देणेबाबत.**

नाताळ सुटीचे कालावधीत वर्षाअखेर व नुतन वर्षारंभी श्री साईंच्या दर्शनासाठी शिर्डी येथे येणाऱ्या भक्तांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ होऊन, प्रचंड गर्दी होते. चालू वर्षीही नाताळ सुटीच्या काळात भक्तांची मोठया प्रमाणात गर्दी होणार आहे. शिर्डीस येणाऱ्या भक्तांची सोय करणे ही संस्थानची जबाबदारी आहे हे विचारात घेऊन आवश्यक त्या सर्व प्रकारच्या पायाभूत सुविधा संस्थानमार्फत भक्तांना पुरवून भक्तांची व्यवस्था करण्याचा संस्थानचा प्रयत्न आहे. याचाच एक भाग म्हणून नाताळ सुटीच्या गर्दीमध्ये दर्शनलाईनमध्ये भक्तांना विनामुल्य चहा देण्याची व्यवस्था करावी तसेच दर्शनलाईनमध्ये भक्तांना पिण्याचे पाण्याची व्यवस्था करावी. त्यासाठी गरजेनुसार आवश्यक तेवढे पिण्याचे पाण्याचे पाऊच खरेदी करण्यात यावेत अशी सूचना मा.अध्यक्ष महोदय यांनी दिलेली आहे.

तरी साईभक्तांना नाताळ सुटीचे कालावधीत दर्शनलाईनमध्ये विनामुल्य चहा, पाणी देण्याचे कार्यवाहीस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय/कॅन्टीन विभाग प्रमुख)

**(१५) नाताळ सुटीचे काळात भक्तांचे अतिरिक्त निवासव्यवस्थेच्या ठिकाणी भक्तांना चहा, कॉफी, दूध, नाष्टा पुरविणेचे व्यवस्थेबाबत.**

नाताळ सुटीचे कालावधीत तसेच वर्षाअखेर व नववर्षारंभी श्री साईंच्या दर्शनासाठी शिर्डी येथे येणाऱ्या भक्तांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ होते. त्यामुळे भक्तांसाठी असणारी निवास, प्रसादभोजन वगैरे पायाभूत सुविधा कमी पडते. संस्थानकडे भक्तांचे निवासासाठी एकूण ८८४ एवढया खोल्या असून त्यामध्ये सुमारे दहा हजारपर्यंतचे भक्तांचीच निवासव्यवस्था होऊ शकते. त्यामुळे प्राप्त परिस्थितीत भक्तांची निवासव्यवस्था करण्यासाठी संस्थानच्या शाळेच्या तसेच साईनाथ माध्यमिक विद्यालयाच्या इमारती व प्राथमिक शाळा वगैरे उपलब्ध इमारती सुटीच्या कालावधीत ताब्यात घेण्यात येतात. त्याचबरोबर संस्थानच्या मोकळया जागेत कापडी/ शामियाना मंडप टाकून भक्तांचे निवासाची अतिरिक्त व्यवस्था करण्यात येते.

चालू वर्षात वर्षात दि.२१.१२.२००७ पासून सलग सरकारी सुट्टया असल्यामुळे याही वर्षी मोठया प्रमाणात भक्तांची गर्दी होण्याचा संभव आहे. त्यामुळे अतिरिक्त निवासव्यवस्था म्हणून दि.२१.१२.२००७ पासून घेण्यात येत असलेल्या इमारती (खोल्या) खालीलप्रमाणे-

०१) श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय, शिर्डी,
०२) संस्थान आय.टी.आय.,
०३) संस्थान कन्या विद्या मंदिर,
०४) संस्थान इंग्लिश मेडीयम स्कूल,
०५) सेवाधाम व साईनगर इमारतींमधील रिक्त असलेली कर्मचारी निवासस्थाने,
०६) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा- पिंपळवाडी रोड,
०७) नगरपंचायत शिर्डी हॉल,
०७) नवीन प्रसादालय इमारत.

या इमारतीमधील खोल्या संस्थानने ताब्यात घेतल्या आहेत. याशिवाय मोकळया जागेत सुमारे २ लाख चौ.फुट आकारमानाचे कापडी/ शामियाना मंडप चारही बाजुनी कनातीसह व जमीनीवर बिछायतीसह उभारण्यात आलेले आहेत. या अतिरिक्त व्यवस्थेच्या ठिकाणी सुमारे १६ ते २० हजार व्यक्तीपर्यंतची निवासव्यवस्था होऊ शकेल.

अतिरिक्त निवासव्यवस्थेच्या ठिकाणी भक्तांना बिछायती, गाद्या, चादरी, पिण्याचे पाणी, लाईट, तात्पुरती स्नानगृहे, स्नानासाठी गरमपाणी, स्वच्छता, सुरक्षा, क्लोकरुम, प्रसादभोजन इ.व्यवस्था संस्थानमार्फत पुरविण्यात येते.

भक्तांचे होणाऱ्या प्रचंड गर्दीच्या काळात करण्यात येणाऱ्या अतिरिक्त निवासव्यवस्थेच्या ठिकाणी भक्तांना पायाभूत असलेल्या सर्वच सुविधा उपलब्ध करुन देण्यास संस्थान प्रशासनाची ओढाताण व अडचण होते हे विचारात घेऊन अतिरिक्त निवासव्यवस्थेच्या ठिकाणी शाळा व कापडी मंडपात निवास करणाऱ्या व भक्तांना चहा, कॉफी, दुध, नाष्टा इ.सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी गर्दीचे कालावधीपुरती खाजगी विक्रेत्यांना परवानगी देऊन व्यवस्था करुन घ्यावी, असे मत आहे. त्यासाठी आवश्यकतेप्रमाणे हातगाडया स्टॉल व व्हेन्डींग मशिन लावता येईल. व्हेन्डींग मशिन लावण्यासाठी संस्थानकडून इलेक्ट्रिक मिटर बसवून कनेक्शन देता येईल व होणारे इलेक्ट्रिक बिल संबंधीताकडून भरणा करुन घेता येईल. संस्थानचे धर्मशाळा विभागाकडील कॅन्टीन, संस्थानने वार्षिक कराराने ठेकेदारास चालविण्यास दिलेले आहे. त्यासाठी कॅन्टीनमध्ये भक्तांना पुरविण्यात येणाऱ्या पदार्थांचे दर संस्थानने ठेकेदारास ठरवून दिलेले आहेत त्याच दराने चहा, कॉफी, दुध, नाष्टा भक्तांना माफक दरात दिला जाईल याची काळजी घेण्यात येईल.

तरी उपरोक्तप्रमाणे नाताळ सुटीचे कालावधीत अतिरिक्त निवासव्यवस्थेच्या ठिकाणी, खाजगी व्यक्तिमार्फत भक्तांची चहा, नाष्टयाची सोय करुन घेण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय/कॅन्टीन विभाग प्रमुख)

**विषय नं.१० दिनांक २०.१२.२००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त**

**निर्णय क्र.१०** दिनांक २०.१२.२००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन या इतिवृत्तातील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

**(१६) श्री.महेश रेड्डी व त्यांचे कुटुंबिय यांना कायमस्वरुपी आरती व दर्शन व्यवस्थेबाबत.**

व्यवस्थापन समितीचे दिनांक २८.०७.२००७ चे सभेत निर्णय क्र.५७४ अन्वये साईभक्त ए.एम. रेड्डी, चेअरमन ॲण्ड मॅनेजींग डायरेक्टर, ए.एम.आर. कन्स्ट्रक्शन लि., हैद्राबाद यांना श्रींचे सिहासनासाठी व श्रींच्या मुर्तीच्या पाठीमागील भिंतीवर जे चांदीकाम केलेले आहे त्या ठिकाणी सर्व काम सोन्यामध्ये तयार करुन देणेस मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार श्री.रेड्डी यांनी सुमारे रुपये ११ कोटी खर्च करुन ९६ किलो वजनाचे श्रींचे सिहासन व श्रींच्या मुर्तीच्या पाठीमागील भिंतीवरची प्रभावळ इ. (भिंतीवर जे चांदीकाम केलेले आहे त्या ठिकाणी) सर्व काम सोन्यामध्ये करुन दिलेले आहे.

श्री रेड्डी यांनी संस्थानला देऊ केलेली देणगी संस्थानचे इतिहासात सर्वाधिक व ऐतिहासिक आहे. याबाबत रेड्डी कुटूंबियांचा संस्थानमार्फत सत्कार करण्यात यावा,तसेच त्यांचे कुटूंबियातील फक्त खालील व्यक्तीं शिर्डीस येतील त्या त्या वेळेस त्यांना प्रत्येकी जास्तीत जास्त दहा कुटुंबियांसमवेत तहयात आरती व दर्शन व्यवस्था विनामुल्य करण्यात यावी, तसेच दिनांक २० डिसेंबर ते ३१ डिसेंबरपर्यंत त्यांचेमार्फत लेंडीबागेत आयोजित करण्यात येणाऱ्या नामसप्ताहास कायमस्वरुपी मान्यता देणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

| अ.नं | नांव | वय वर्षे |
|---|---|---|
| ०१. | श्री. ए. आदिनारायण रेड्डी | ६२ |
| ०२. | सौ. ए. सुलोचना रेड्डी | ५८ |
| ०३. | श्री. ए. गिरीष रेड्डी | ४२ |
| ०४. | सौ. ए. लता रेड्डी | ३६ |
| ०५. | कु. ए. साहिनी रेड्डी | १२ |
| ०६. | चि. ए. साईसंतोष रेड्डी | १० |
| ०७. | श्री. ए. महेश रेड्डी | ४० |
| ०८. | सौ. ए. राधिका रेड्डी | ३५ |
| ०९. | चि. ए. साई नितीश रेड्डी | ११ |
| १०. | चि. ए. साई अनीश रेड्डी | ०९ |
| ११. | श्री. एम. गोपाल रेड्डी | ५७ |
| १२ | श्री.शंकराय्या | ७० |

(कार्यवाही-अधिक्षक,मंदीरविभाग/जनसंपर्क अधिकारी)

**(१७) निवासस्थानास मुदतवाढ देणेबाबत मा.श्री भाऊसाहेब रा.वाकचौरे, कार्यकारी अधिकारी यांचे अर्जाबाबत.**

मा.श्री भाऊसाहेब रा.वाकचौरे, कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे दिनांक १५.१२.२००७ चे अर्जान्वये ते श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी येथे कार्यकारी अधिकारी या पदावर प्रतिनियुक्तीने दिनाक ६.०२.२००१ पासून कार्यरत असून शासन सेवानियमाप्रमाणे ते दिनांक ३१.१.२००८ रोजी सेवेतून सेवानिवृत्त होत आहे.

त्यांचे मुलाचे शिक्षण चालू असल्याने त्याचा अभ्यास व परिक्षा यासाठी तसेच घराचे बांधकाम चालू असल्याने माहे फेब्रुवारी २००८ पासून सहा महिने ते रहात असलेल्या निवासस्थानास मुदतवाढ देणेबाबत विनंती केली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,चौकशी निवासस्थान/अधिक्षक,आस्थापना)

**(१८) श्री साईसत्चरित नेपाळी व रशियन भाषेत रुपांतरीत करुन प्रकाशित करणेबाबत.**

श्री.विकास सी. मेहता,दिल्ली यांचे प्रकाशने विभागात दाखल झालेले वरील विषयांकित संदर्भिय पत्राद्वारे त्यांनी नेपाळी व रशियन भाषिक साईभक्तांसाठी श्री साईसत्चरिताचे नेपाळी व रशियन भाषेत रुपांतरीत करण्याची तयारी दर्शविली आहे.

**अ)** विकास मेहता, दिल्ली यांनी त्यांचे प्रस्तुत पत्राद्वारे श्री साईबाबांच्या लीलेचा प्रसार हा इतर देशामध्येही वाढला असलेबाबत कळवून, त्यादृष्टीने नेपाळ व रशिया या देशातील लाखो श्री साईभक्तांच्या श्री साईबाबांचे लीलांविषयी माहिती होणेकरीता तेथील भक्तांनी श्री साईसत्चरिताचे नेपाळी व रशियन भाषेत रुपांतरीत करणेविषयी श्री मेहता यांना सुचित केलेनुसार त्यांनी श्री साईसत्चरिताचे रशियन व नेपाळी भाषेत रुपांतरीत करुन संस्थानद्वारा प्रकाशित करणेबाबत प्रस्तावित केले आहे. त्यासाठी त्यांनी संस्थानमार्फत पत्राव्दारे परवानगीची मागणी केली आहे.

श्री.विकास सी. मेहता,दिल्ली यांचे "चिल्ड्रेन्स श्री साईबाबा" हिंदी व इंग्रजी भाषेत तसेच एक फकिर की पाठशाला हे हिन्दी भाषिक पुस्तके याप्रमाणे तीन प्रकाशने संस्थान मार्फत प्रकाशित करुन साईभक्तांना उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

**ब)** श्री.विकास सी. मेहता,दिल्ली यांनी त्यांचे द्वारा लिखीत चिल्ड्रेन्स श्री साईबाबा या हिन्दी व इंग्रजी भाषिक संस्थान प्रकाशित पुस्तकाचे मराठी व तामिळ या भाषांसहीत इतर भारतीय प्रातिंक भाषांमध्येही सदर पुस्तकाचे रुपांतर करुन संस्थानद्वारा प्रकाशित करणेबाबत सुद्धा प्रस्तुत करुन त्याचा शिर्डी येथे येणा-या विविध भारतीय प्रातिंक भाषिक भक्तांसाठी चांगला उपयोग होईल असे नमुद केले आहे**.**

श्री.विकास सी. मेहता,दिल्ली यांनी ते श्री साईसत्चरिताचे नेपाळी व रशियन भाषांमध्ये संबंधीत भाषिक तज्ज्ञाकडून रुपांतरीत करुन घेणार असल्याचे कळवून, त्यांचेकडून सदर श्री साईसत्चरिताचे पुर्णपणे भाषांतर झालेनंतर ते तपासून घेणेसाठी संस्थानकडे पाठविणार असलेबाबत कळविले आहे.

तरी वरील "**अ**" यात दर्शविलेप्रमाणे नेपाळी व रशियन भाषेत श्री साईसत्चरिताचे भाषांतर करुन घेणेस व "**ब**" यात दर्शविलेप्रमाणे श्री विकास मेहता, दिल्ली लिखीत चिल्ड्रेन्स श्री साईबाबा या हिन्दी व इंग्रजी भाषिक पुस्तकाचे मराठी व तामिळ भाषेत भाषांतर करुन घेणेसंबंधी श्री विकास मेहता, दिल्ली यांना अधिकार पत्र देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-प्रकाशने प्रमुख)

**विषय नं. ११ नोंद घेण्याचे विषय.**

**०१. (अ) जमा खर्च तक्ता सप्टेबर-ऑक्टोबर-नोव्हेंबर,डिसेंबर,२००७**

**(ब) माहे सप्टेबर-ऑक्टोबर-नोव्हेंबर,डिसेंबर, २००७ मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/-चे मर्यादेत केलेल्या खर्चाच्या तक्त्याची नोंद घेणे.**

**(क) गुंतवणूक तक्त्याची नोंद घेणे.**

**(ड) माहे सप्टेबर - ऑक्टोबर व नोव्हेंबर, डिसेंबर,२००७ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

**(इ) माहे सप्टेबर-ऑक्टोबर-नोव्हेंबर,डिसेंबर २००७ मध्ये श्री साईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. ११** (A) माहे सप्टेंबर,ऑक्टोबर,नोव्हेंबर व डिसेंबर,२००७ मधील जमा रु ११,४४,६६,२३३.६०, १२,४९,९८,४५८.०८, १४,१५,०९,८८५.०३, १७,६९,३६,०८२.३५ आणि खर्च रुपये १२,१५,२२,९३०.१२, १३,७९,२१,९७४.३८, ८,६१,१४,०२१.२० व ८,९६,६९२.४१ चा तक्ता, माहे सप्टेंबर,ऑक्टोबर,नोव्हेंबर व डिसेंबर,२००७ मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/-चे मर्यादेत केलेल्या खर्च रुपये ३,१३,४११.५०, ३,८४,९०२.००, ३,३७,४४५.०० व ३,४८,९८९.५० खर्चाचा तक्ता**,** दिनांक ९.१०.२००७ अखेरीस रु २,३३,९४,१९,९९८.००, दिनांक १६.११.२००७ अखेर रुपये २,३४,४०,०४,२२४.०० दिनांक ८.१२.२००७ अखेर रुपये २,३४,४०,०४,२२४.०० दिनांक ५.१.२००८ अखेर रुपये २,४०,०४,२२४.०० गुंतवणूकीची परिस्थिती दर्शविणारा तक्ता, माहे माहे सप्टेंबर,ऑक्टोबर,नोव्हेंबर व डिसेंबर,२००७ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या सोने चांदी,कापड व इतर वस्तूसह एकूण रुपये ४,३३,०६,५०६.००, ५,००,९५,६०६.००,५,२१,९०,४७४.००, ७,१२,६४,६५८.०० व देणगीचा तक्ता, माहे सप्टेंबर,ऑक्टोबर, नोव्हेंबर व डिसेंबर,२००७ मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तुचा रुपये १,८०,२७५.००, २,४१,०८२.००, १,८६,४४७.००, १,९१,०५३.०० चा अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.

**०२. माहे सप्टेबर,ऑक्टोबर व नोव्हेंबर,२००७ या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. ११** **(B)** माहे सप्टेबर,ऑक्टोबर व नोव्हेंबर,२००७ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदान अनुक्रमे रुपये ७७,७६,८६३.००, ५५,७६,१११.००, ५४,८३,०६१.०० चा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, मान्यता देण्यात आली.

**०३. साईनाथ रुग्णालयातील गरीब रुग्णांना माहे सप्टेबर-ऑक्टोबर-नोव्हेंबर,२००७ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. ११** **(C)** माहे सप्टेबर,ऑक्टोबर व नोव्हेंबर,२००७ मध्ये साईनाथ रुग्णालयातील रुग्णांना अनुक्रमे अंतररुग्ण रुपये ९१,७००/-,६१,२९५/-,६२,९८२/-, बाह्य रुग्ण रुपये ५२,८१८/-,५९,६०२/-, ६०,३०४/- थॅलसेमिया व हिमोफेलिया रुपये ६४,६५०/-,५४,७००/-,५६,१००/- वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.

**०४. श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये माहे सप्टेबर,ऑक्टोबर व नोव्हेंबर,२००७ देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. ११** **(D)** माहे सप्टेबर,ऑक्टोबर व नोव्हेंबर,२००७ मध्ये श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये रुग्णांना वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या रुपये १६,४९,८२७/-,१७,५२,७७८/-,२३,२६,९६७/- सवलतींची माहिती दर्शविणारा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, मान्यता देण्यात आली.

**०५. माहे सप्टेबर,ऑक्टोबर व नोव्हेंबर,२००७ मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. ११** **(E)** माहे सप्टेबर,ऑक्टोबर व नोव्हेंबर,२००७ मध्ये संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या ३१८२९, ३२९४५ व ३२३५८ कर्मचाऱ्यांच्या/कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.

**०६. बांधकाम प्रगती तक्त्याची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. ११** **(F)** बांधकाम प्रगती अहवाल दर्शविणारा तक्ता त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पूरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात आली व "ब" प्रमाणे अंतिम बिल आदा करणेस मान्यता देण्यात आली

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**०७. पाणी तपासणी अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे**

**निर्णय क्र. ११** **(G)** माहे ऑक्टोबर,नोव्हेंबर व डिसेंबर,२००७ मध्ये संस्थान पाणीपुरवठा योजने अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या संस्थानचे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमूने (सॅम्पल्स) मे.एनव्हायरो लॅब, नाशिक यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांचेकडून आलेले तपासणी अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**विषय नं. १२** **जुना आर्थोपेडीक ओ.टी टेबल बायबॅक करुन नवीन टेबल खरेदीकामी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र.१२** याबाबत वैद्यकीय उपसमिती सभेत निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

**विषय नं. १३** **श्रीसाईबाबा रुग्णालयाचे प्रयोगशाळा विभागासाठी उपकरणे खरेदीकामी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र.१३** याबाबत वैद्यकीय उपसमिती सभेत निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

**विषय नं. १४** **सोनोग्राफी मशिन खरेदीकामी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र.१४** याबाबत वैद्यकीय उपसमिती सभेत निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

**विषय नं. १५** **सर्जिकल साहित्य व हॉस्पिटल फर्निचर खरेदीकामी प्राप्त झालेले कोटेशन उघडून निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.१५** याबाबत वैद्यकीय उपसमिती सभेत निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

**विषय नं. १६** **डिजिटल रेडिओग्राफी मशिनसाठी स्क्रिनसह कॅसेट खरेदीकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडून निर्णय घेणे बाबत.**

**निर्णय क्र.१६** याबाबत वैद्यकीय उपसमिती सभेत निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

**विषय नं. १७** **सर्जिकल इंस्ट्रुमेंट खरेदीकामी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र.१७** याबाबत वैद्यकीय उपसमिती सभेत निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

**विषय नं.१८** **संस्थान रुग्णालयांसाठी सांडपाणी प्रक्रिया संयंत्र (STP) उभारणेकामी आलेल्या निविदांवर निर्णय घेणे**

**निर्णय क्र.१८** श्रीसाईनाथ व श्रीसाईबाबा हॉस्पीटलकरीता सांडपाणी प्रक्रिया संयंत्र उभारणेकामी व त्यासाठी येणारे योग्य त्या खर्चास दि. १९/०८/२००६ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. ५५४ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रकल्पाकरीता आपण प्रकल्प सल्लागार म्हणून मे. एनस्ट्रक्ट कन्सलटींग इंजिनिअर्स, पुणे यांची नेमणुक केलेली आहे. त्यासाठी आपण त्यांचेकडून सदर प्रकल्पासंदर्भातील योग्य ते मार्गदर्शन व निविदा तयार करुन घेतल्या. त्यानुसार दि. ०४/११/२००७ चे वर्तमान पत्रात निविदा सूचना प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या होत्या. कोऱ्या निविदा विक्रीसाठी दि. ०५/११/२००७ ते दि. १४/११/२००७ पर्यंतचा कालावधी ठेवण्यात आला होता. विहित

मूदतीत खालील ०४ ठेकेदारांनी श्री साईनाथ रुग्णालयाचे १५० $m^3$/day व श्री साईबाबा रुग्णाललयाचे २०० $m^3$/day साठीचे कोऱ्या निविदा विकत घेतल्या.

१. मेलहेम इंजिनिअर्स, प्रा.लि.,पुणे

२. डेक्कन एनवायरोमेंटल कन्सलटंटस, पुणे

३. जी.एस.वॉटर ट्रिटमेंट टेक्नालॉजीस, मुंबई

४. दोशिऑन लिमिटेड, अहमदाबाद

सिलबंद निविदा सादर करणेसाठी ठेकेदार यांना दि.०४/१२/२००७ कार्यालयीन वेळेपर्यंत मूदत देण्यात आली होती. विहित मुदतीत खालील ०३ ठेकेदारांनी सिलबंद निविदा सादर केलेली आहे.

**अ) श्री साईनाथ रुग्णालयाकरीता STP संयंत्र उभारणे :- (१५० $m^3$/day) :-**

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव |
|---|---|
| ०१ | मेलहेम इंजिनिअर्स प्रा.लि., पुणे |
| ०२ | जी.एस.वॉटर ट्रिटमेंट टेक्नोलॉजीस, प्रा.लि., मुंबई (ACME) |
| ०३ | डेक्कन एनवायरोमेंटल कंन्सलटंटस, पुणे (DEC) |

**ब) श्री साईबाबा हॉस्पीटलकरीता STP संयंत्र उभारणे :- (200 $m^3$/day) :-**

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव |
|---|---|
| ०१ | मेलहेम इंजिनिअर्स प्रा.लि., पुणे |
| ०२ | जी.एस.वॉटर ट्रिटमेंट टेक्नोलॉजीस, प्रा.लि., मुंबई (ACME) |
| ०३ | डेक्कन एनवायरोमेंटल कंन्सलटंटस, पुणे (DEC) |

तरी विहित मूदतीत प्राप्त झालेल्या वरीलप्रमाणे 06 सिलबंद निविदा आजचे सभेपुढे उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता तयार करुन त्यावर प्रकल्प सल्लागार यांचा अभिप्राय घेण्यात यावा व प्रस्ताव निर्णयार्थ पुढील सभेपुढे सादर करावा असे,ठरलें.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.१९** **चिक्कूच्या फळांचे कोटेशन्स उघडून चर्चा/ वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.१९** मौजे -शिर्डी,तालुका राहाता येथील सर्व्हे नं १२४ मधील खातेदार श्री संजय रामराव शेळके यांचे ०० हे ६० आर व श्री विलास रंगनाथ शेळके यांचे ०० हे ६० आर यांचे क्षेत्र दिनांक १२/१०/२००७ रोजी संस्थानने खरेदी केलेले आहे.या क्षेत्रामध्ये फळबाग असून यामध्ये चिक्कू २०२ झाडे,नारळ १३ झाडे, आंबे १५ झाडे ,रामफळ ०८ झाडे ,सिताफळ ०६ झाडे, जांभूळ ०४ झाडे, चिंच ०१ व इतर ०५ झाडे आहेत.

सध्या चिक्कूच्या झाडांना बाहार आलेला आहे. या करिता फळ झाडांची खोती घेणा-या ठेकेदारांना खोती देता येईल.याकामी जानेवारी २००८ ते जून २००८ या कालावधी करिता खोती देणेसाठी स्थानिक बागवानाकडून जा.न. एसएसएस/वशी -बगीचा /१९६०६/२००७ दि.१२/१२/२००७ अन्वये कोटेशन मागविण्यात आलेले आहेत. विहीत मुदतीत दि.२१-१२-२००७ अखेर प्राप्त झालेल्या कोटेशनचा तपशिल खालील प्रमाणे

| अ.न. | कोटेशन धारकांचे नाव |
|---|---|
| ०१ | श्री.रहिमतभाई पठाण,अमरावतीकर |
| ०२ | बबु पठाण,शिर्डी |
| ०३ | श्री सुभाष कारभारी सदाफळ,राहाता |
| ०४ | श्री शप्पुखॉ सखरखॉ पठाण,निमगांव |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेपुढे समक्ष उघडण्यात येऊन, कोटेशनसादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले आहेत.

| अ.न. | कोटेशनसादरकर्त्याचे नाव | कोटेशनमधील दर रुपये | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | श्री.रहिमतभाई पठाण,अमरावतीकर | ४०,०००/- | अनुपस्थित |
| ०२ | बबु पठाण,शिर्डी | ६१,०००/- | ६५,०००/- |
| ०३ | श्री सुभाष कारभारी सदाफळ,राहाता | ७१,१०१/- | ७१,१०१/- |
| ०४ | श्री शप्पुखॉ सखरखॉ पठाण,निमगांव | ५१,०००/- | ७०,०००/- |

यावर सविस्तर चर्चा होऊन,श्री.सुभाष कारभारी सदाफळ,राहाता, यांची उच्चतम दर स्वीकारणेत येऊन,त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें. (कार्यवाही-बगीचा विभाग प्रमुख)

**विषय नं.२०** **नविन प्रसादालयाकरिता स्टेनलेस स्टील फेब्रीकेटेड किचन इक्विममेंट खरेदीकामी प्राप्त झालेले सुधारित दरपत्रके उघडून चर्चा/ वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.२०** सदरहू प्रस्तावावर व्यवस्थापन समितीचे पुढील सभेत निर्णय घेण्यात यावा,असें ठरलें.

**विषय नं.२१** **समाधी मंदिरातील व चारही महाव्दारात स्टेनलेस स्टिल रेलींग तयार करुन बसविणेकामी प्राप्त झालेली टेंडर्स उघडून टेंडरधारकांशी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र.२१** समाधी मंदिरातील व चारही महाव्दारात स्टेनलेस स्टील रेलींग तयार करुन बसविणेबाबत व येणा-या रक्कम रुपये २४,५३,२३१.०० इतक्या खर्चाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २८-०७-२००७ चे सभेतील विषय क्र.५७ निर्णय क्र. ५६८ अन्वये मान्य करण्यात आला आहे. या कामासाठी येणा-या खर्चास व याकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन टेंडर मागवावेत असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. दिनांक ०१-११-२००७ ते दिनांक २०-११-२००७ असा टेंडर विक्री कालावधी ठेवण्यात आला होता. सिलबंद टेंडर सादर करण्याची मुदत दिनांक २०-११-२००७ अखेर अशी ठेवण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त झालेल्या टेंडर्सचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | पार्टीचे नांव |
|---|---|
| ०१ | मे.साई इंजिनिअर्स , अंबड, नाशिक |
| ०२ | मे.श्री समर्थ इंडस्ट्रीज, भोसरी, पुणे. |
| ०३ | मे. शेखर जे.साळवे, संगमनेर |
| ०४ | मे.प्रथमेश कन्स्ट्रक्शन्स, कल्याण. |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले टेंडर्स आजचे सभेपुढे समक्ष उघडण्यात येऊन, कोटेशनसादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले आहेत.

| अ.नं. | पार्टीचे नांव | टेंडरमधील दर रुपये | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | मे.साई इंजिनिअर्स , अंबड, नाशिक | २४,१९,६१७.०० | १८,१४,७१३.०० |
| ०२ | मे.श्री समर्थ इंडस्ट्रीज, भोसरी, पुणे. | २८,३९,७०२.०० | २६,९७,७१७.०० |
| ०३ | मे. शेखर जे.साळवे, संगमनेर | २९,०७,५१७.०० | २८,३४,५३८.०० |
| ०४ | मे.प्रथमेश कन्स्ट्रक्शन्स, कल्याण. | १८,१४,६२३.०० | १७,२३,८९२.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन,मे.प्रथमेश कन्स्ट्रक्शन्स,कल्याण यांचे निम्नतम दर स्वीकारणेत येऊन,त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें. (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

**विषय नं. २२** **लाडू विक्रीकरीता स्टेनलेस स्टिलचे काऊंटर व स्टेनलेस रेलिंग तयार करुन मिळणेकामी प्राप्त झालेली प्राप्त झालेली टेंडर्स उघडून टेंडरधारकांशी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत**

**निर्णय क्र.२२** लाडू विक्रीकरीता स्टेनलेस स्टीलचे काऊंटर व स्टेनलेस रेलींग तयार करुन मिळणेबाबत व येणा-या रक्कम रुपये २०,४३,३३७.०० इतक्या खर्चाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २८-०७-२००७ चे सभेतील विषय क्र.५९ निर्णय क्र. ५७० अन्वये मान्य करण्यात आला आहे. या कामासाठी येणा-या खर्चास व याकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन टेंडर मागवावेत असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. दिनांक ०१-११-२००७ ते दिनांक २०-११-२००७ असा टेंडर विक्री कालावधी ठेवण्यात आला होता. सिलबंद टेंडर सादर करण्याची मुदत दिनांक २०-११-२००७ अखेर अशी ठेवण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त झालेल्या टेंडरस तपशील खालीलप्रमाणे

| अ.नं. | पार्टीचे नांव |
|---|---|
| ०१ | मे.साई इंजिनिअर्स , अंबड, नाशिक |
| ०२ | मे.श्री समर्थ इंडस्ट्रीज, भोसरी, पुणे. |
| ०३ | मे. शेखर जे.साळवे, संगमनेर |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले टेंडर्स आजचे सभेपुढे समक्ष उघडण्यात येऊन, कोटेशनसादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले आहेत.

| अ.नं. | पार्टीचे नांव | टेंडरमधील दर रुपये | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | मे.साई इंजिनिअर्स , अंबड, नाशिक | २०,४०,०००.०० | १९,३८,०००.०० |
| ०२ | मे.श्री समर्थ इंडस्ट्रीज, भोसरी, पुणे. | २५,७९,६१९.०० | २५,०२,२३०.०० |
| ०३ | मे. शेखर जे.साळवे, संगमनेर | १९,८९,६२९.०० | १९,३९,६८९.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.साई इंजिनिअर्स, अंबड, नाशिक यांचे निम्नतम दर स्वीकारणेत येऊन,त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें. (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

**विषय नं. २३ शांतीनिवास दर्शनलाईन प्रवेशव्दाराचा पॅसेज,लेंडीबागेत व नवीन भक्तनिवासस्थानाकडून काऊंटर सुरक्षेसाठी स्टेनलेस स्टिल ग्रील व रेलींग तयार करुन बसविणेकामी प्राप्त झालेली टेंडर्स उघडून टेंडरधारकांशी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत**

**निर्णय क्र.२३** शांतिनिवास दर्शन लाईन प्रवेशव्दाराचा पॅसेज, लेंडी बागेत व नविन भक्तनिवासस्थानकडील काऊंटर सुरक्षेसाठी स्टेनलेस स्टील ग्रील व रेलींग तयार करुन बसविणेकामी व येणा-या रक्कम रुपये ९,७९,९७६.०० इतक्या खर्चाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २८-०७-२००७ चे सभेतील विषय क्र.५४ निर्णय क्र. ५६५ अन्वये मान्य करण्यात आला आहे. या कामासाठी येणा-या खर्चास व याकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन टेंडर मागवावेत असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. दिनांक ०१-११-२००७ ते दिनांक २०-११-२००७ असा टेंडर विक्री कालावधी ठेवण्यात आला होता. सिलबंद टेंडर सादर करण्याची मुदत दि. २०-११-२००७ अखेर अशी ठेवण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त झालेल्या टेंडरस तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | पार्टीचे नांव |
|---|---|
| ०१ | मे.साई इंजिनिअर्स , अंबड, नाशिक |
| ०२ | मे. स्वामी समर्थ इंडस्ट्रीज, माळेगांव एम.आय.डी.सी., सिन्नर |
| ०३ | मे. श्री समर्थ इंडस्ट्रीज, पुणे. |
| ०४ | मे. शेखर जे.साळवे, संगमनेर |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले टेंडर्स आजचे सभेपुढे समक्ष उघडण्यात येऊन, कोटेशनसादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले आहेत.

| अ.नं. | पार्टीचे नांव | टेंडरमधील दर रुपये | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | मे.साई इंजिनिअर्स , अंबड, नाशिक | ९,६२,६१०.०० | ८,९५,२२७.०० |
| ०२ | मे. स्वामी समर्थ इंडस्ट्रीज, माळेगांव एम.आय.डी.सी., सिन्नर | १३,६७,५१५.०० | १२,३०,७६८.०० |
| ०३ | मे. श्री समर्थ इंडस्ट्रीज, पुणे. | ११,७०,७७१.०० | ११,३५,७४८.०० |
| ०४ | मे. शेखर जे.साळवे, संगमनेर | ७,८१,११९.०० | ७,६१,५१३.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. शेखर जे.साळवे, संगमनेर यांचे निम्नतम दर स्वीकारणेत येऊन,त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें. (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

**विषय नं. २४. गुरुस्थान दक्षिण बाजूकडील भिंतीवर सुरक्षेसाठी स्टेनलेस स्टिल रेलींग तयार करुन बसविणेकामी प्राप्त झालेली टेंडर्स उघडून टेंडरधारकांशी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत**

**निर्णय क्र.२४** मंदीर परिसर सुरक्षिततेच्या दृष्टीने गुरुस्थान दक्षिण बाजुकडील भिंतीवर रेलींग बसविणेबाबत व येणा-या रक्कम रुपये ३,७५,२४४.०० इतक्या खर्चाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २८-०७-२००७ चे सभेतील विषय क्र.५६ निर्णय क्र. ५६७ अन्वये मान्य करण्यात आला आहे. या कामासाठी येणा-या खर्चास व याकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन टेंडर मागवावेत असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. दिनांक ०१-११-२००७ ते दिनांक २०-११-२००७ असा टेंडर विक्री कालावधी ठेवण्यात आला होता. सिलबंद टेंडर सादर करण्याची मुदत दिनांक २०-११-२००७ अखेर अशी ठेवण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त झालेल्या टेंडरसचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | पार्टीचे नांव |
|---|---|
| ०१ | मे.साई इंजिनिअर्स , अंबड, नाशिक |
| ०२ | मे. श्री समर्थ इंडस्ट्रीज, भोसरी, पुणे. |
| ०३ | मे. शेखर जे.साळवे, संगमनेर |
| ०४ | मे.प्रथमेश कन्स्ट्रक्शन्स, कल्याण |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले टेंडर्स आजचे सभेपुढे समक्ष उघडण्यात येऊन, कोटेशनसादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले आहेत.

| अ.नं. | पार्टीचे नांव | टेंडरमधील दर रुपये | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | मे.साई इंजिनिअर्स , अंबड, नाशिक | ४,०४,७१९.०० | ३,८४,४८३.०० |
| ०२ | मे. श्री समर्थ इंडस्ट्रीज, भोसरी, पुणे. | ४,९८,१४८.०० | ४,८३,२०४.०० |
| ०३ | मे. शेखर जे.साळवे, संगमनेर | ४,०४,१२९.०० | ३,९३,९८५.०० |
| ०४ | मे.प्रथमेश कन्स्ट्रक्शन्स, कल्याण | ४,२१,८७५.०० | ४,००,७८१.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.साई इंजिनिअर्स, अंबड, नाशिक यांचे निम्नतम दर स्वीकारणेत येऊन,त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें. (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

**विषय नं. २५ जनसंपर्क कार्यालयाजवळ स्टेनलेस स्टिलचे रेलिंग तयार करुन बसविणोकमी प्राप्त झालेली टेंडर्स उघडून टेंडरधारकांशी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत**

**निर्णय क्र.२५** जनसंपर्क कार्यालयाजवळ स्टेनलेस स्टीलचे रेलींग तयार करुन बसविणेबाबत व येणा-या रक्कम रुपये ९,३१,९०५.०० इतक्या खर्चाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २८-०७-२००७ चे सभेतील विषय क्र.५५ निर्णय क्र. ५६६ अन्वये मान्य करण्यात आला आहे. या कामासाठी येणा-या खर्चास व याकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन टेंडर मागवावेत असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. दिनांक ०१-११-२००७ ते दिनांक २०-११-२००७ असा टेंडर विक्री कालावधी ठेवण्यात आला होता. सिलबंद टेंडर सादर करण्याची मुदत दिनांक २०-११-२००७ अखेर अशी ठेवण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त झालेल्या टेंडर्स तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | पार्टीचे नांव |
|---|---|
| ०१ | मे.साई इंजिनिअर्स , अंबड, नाशिक |
| ०२ | मे.श्री स्वामी समर्थ इंडस्ट्रीज, माळेगांव एम.आय.डी.सी., सिन्नर |
| ०३ | मे. श्री समर्थ इंडस्ट्रीज, भोसरी, पुणे. |
| ०४ | मे. शेखर जे.साळवे, संगमनेर |
| ०५ | मे.प्रथमेश कन्स्ट्रक्शन्स, कल्याण. |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले टेंडर्स आजचे सभेपुढे समक्ष उघडण्यात येऊन, कोटेशनसादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले आहेत.

| अ.नं. | पार्टीचे नांव | टेंडरमधील दर रुपये | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | मे.साई इंजिनिअर्स , अंबड, नाशिक | ९,४०,०००.०० | ८,९३,०००.०० |
| ०२ | मे.श्री स्वामी समर्थ इंडस्ट्रीज, माळेगांव एम.आय.डी.सी., सिन्नर | १७,९०,९९९.०० | १५,३९,८९९.०० |
| ०३ | मे. श्री समर्थ इंडस्ट्रीज, भोसरी, पुणे. | १२,७२,९८५.०० | १२,३४,७९५.०० |
| ०४ | मे. शेखर जे.साळवे, संगमनेर | ९,६२,०३४.०० | ९,३७,८८७.०० |
| ०५ | मे.प्रथमेश कन्स्ट्रक्शन्स, कल्याण. | ११,६१,९७७.०० | ११,३८,७३७.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.साई इंजिनिअर्स, अंबड, नाशिक यांचे निम्नतम दर स्वीकारणेत येऊन,त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें. (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

**विषय नं.२६ विद्युत विभागाचे मागणीनुसार ए.सी. खरेदीकामी आलेले कोटेशन उघडून निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र.२६** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२८.०७.२००७ निर्णय क्र.६१२ व दि.०८.१२.२००७ मधील निर्णय क्र.१९३ व २०२ नुसार विदयुत विभागाने मागणी केलेल्या व्होल्टास कंपनीच्या एअर कंडीशनर्सचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | मा.व्य.समितीच्या ठरावाचा तपशील | बसविण्याचे ठिकाण | एसीचा तपशील | मागणी | अंदाजे खर्च |
|---|---|---|---|---|---|
| **व्होल्टास मेक स्प्लिट, वॉल माऊंटेड एअरकंडीशनर्स-रोटरी कॉम्प्रेसरसह** | | | | | |
| ०१. | दि.२८.०७.२००७ निर्णय क्र.६१२ | साईनिवास अतिथीगृह इमारत मिटींग हॉल | क्षमता-२.० टन | ०४ नग | १,४०,०००/- |
| | | जनसंपर्क कार्यालय जवळील मिटींग हॉल | क्षमता-२.० टन | ०८ नग | २,८०,०००/- |
| | | प्रशासकीय कार्यालय व जनसंपर्क कार्यालय | क्षमता-१.५ टन | ०६ नग | १,८०,०००/- |
| | | | | **एकुण** | **६,००,०००/-** |
| ०२. | दि.०८.१२.२००७ निर्णय क्र.१९३ व २०२ | २ डी एको रुम व सर्व्हर रुम | क्षमता-२.० टन | ०२ नग | ७२,०००/- |
| | | | | **एकुण रक्कम रुपये** | **६,७२,०००/-** |

उपरोक्त प्रमाणे एअर कंडीशनर्ससाठी दि.०४-०६/१२/२००७ चे दरम्यान वर्तमानपत्रात जाहिरात देऊन, निविदाधारकाचे लेटरहेडवर दर व बयाणा रक्कम असलेली सिलबंद निविदाची दि.१८.१२.२००७ अखेर मागणी करणेत आलेली आहे. मुदतीअंती प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा तपशील खालीलप्रमाणे-

०१. रायसोनी कुल टेक, पुणे
०२. लकी रेफिजरेशन, नाशिक
०३. व्होल्टास लिमीटेड, पुणे
०४. कुल ब्रिज, कात्रज, पुणे

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन कोटेशन्ससादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | कोटेशन्ससादरकर्त्याचे नांव | क्षमता | कोटेशन्समधील दर (इन्स्टॉलेशन व वॅट सह) रुपये | चर्चाअंती देऊ केलेले दर (इन्स्टॉलेशन व वॅट सह) रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | रायसोनी कुल टेक, पुणे | क्षमता-२.० टन | ३१,०००/- | अनुपस्थित |
| | | क्षमता-१.५ टन | २६,५००/- | अनुपस्थित |
| ०२ | लकी रेफिजरेशन, नाशिक | क्षमता-२.० टन | ३०,०००/- | २८,५००/- |
| | | क्षमता-१.५ टन | २५,५००/- | २५,०००/- |
| ०३ | व्होल्टास लिमीटेड, पुणे | क्षमता-२.० टन | ३०,५००/- | अनुपस्थित |
| | | क्षमता-१.५ टन | २६,०००/- | अनुपस्थित |
| ०४ | कुल ब्रिज, कात्रज, पुणे | क्षमता-२.० टन | २९,४००/- | २८,४००/- |
| | | क्षमता-१.५ टन | २४,४००/- | २४,७००/- |

यावर सविस्तर चर्चा होऊन,कुल ब्रिज कात्रज,पुणे यांचे निम्नतम दर स्वीकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी)

**विषय नं. २७ स्वच्छता साहित्य खरेदीकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडणेबाबत.**

**निर्णय क्र.२७** दि.१६/०९/२००६ चे मा.व्यवस्थापन समिती सभेमध्ये श्रीसाईबाबा रुग्णालयाकरीता आवश्यक असणाऱ्या स्वच्छता साहित्य खरेदी कामीचा रु.२,००,०००/- पर्यंतचे अंदाजे खर्चाचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला होता. सदर मटेरीअल संस्थानचे विहीत पध्दतीने खरेदी करण्यास मान्यता मिळालेली आहे.

मा.व्यवस्थापन समिती सभेतील मंजुरी अन्वये इकडील पत्र क्र.१४३६० दि.१०/०९/२००७ अन्वये एकुण ५ पुरवठा धारकांकडून दि.२५/०९/२००७ अखेर कोटेशन मागविण्यात आलेले होते. त्यास अनुसरुन तीन बंद कोटेशन प्राप्त झालेले आहेत.

| Sr.No | Name of Party |
|---|---|
| 01 | M/s. Monarch Creations,Mumbai. |
| 02 | M/s. Shantilal Dhanaji & Co, Mumbai. |
| 03 | M/s. Grishkumar & Co, Mumbai. |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले. या कोटेशन्सचा तुलनात्मक तक्ता तयार करुन त्यातील निम्नतम दर स्विकारणेत यावे असे ठरले.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. २८ आर्थोस्कोप ट्रॉली खरेदीकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडणे बाबत.**

**निर्णय क्र.२८** श्रीसाईबाबा रुग्णालयातील Ortho O.T. विभागाने शस्त्रक्रियेच्यावेळी आर्थोस्कोप सेट व्यवस्थित ठेवण्यासाठी एक नग आर्थोस्कोप ट्रॉलीची विभागाने डि.पी. क्रमांक २९२७ दि.०७/०६/२००७ अन्वये मागणी केलेली आहे. त्यानुसार एक नग आर्थोस्कोप ट्रॉली खरेदीकामी अंदाजे रु.३१,०००/- चा प्रस्ताव दि.२२/०९/२००७ चे मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला होता. त्यावर चर्चा होऊन सदर आर्थोस्कोप ट्रॉली संस्थानचे विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करण्यास मान्यता मिळालेली आहे.

मा.व्यवस्थापन समिती सभेतील मंजुरी अन्वये इकडील पत्र क्र.१५८३३ दि.०६/१०/२००७ अन्वये एकूण ०८ पुरवठा धारकांकडून दि.२५/१०/२००७ अखेर कोटेशन मागविण्यात आलेले होते. त्यास अनुसरुन ०४ सिलबंद कोटेशन प्राप्त झालेले आहेत.

1. M/s. K.B.Electronics, Mumbai.
2. M/s. Janak healthcare Pvt.Ltd., Mumbai.
3. M/s. Nikhil Enterprises, Mumbai.
4. M/s. Jovi Pharmaceuticals, Mumbai.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले. या कोटेशन्सचा तुलनात्मक तक्ता तयार करुन स्पेसिफकेशन्सप्रमाणे त्यातील निम्नतम दर स्विकारणेत यावे असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. २९ फुड सर्व्हिस ट्रॉली खरेदीकामी प्राप्त झालेले कोटेशन उघडणे बाबत.**

**निर्णय क्र.२९** दि. ०६/०१/२००७ चे मा. व्यवस्थापन समिती सभेत निर्णय क्र. ६९(३) अन्वये ४ नग फुड सर्व्हिस ट्रॉली कोटेशन मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.१,५५,२०५/- चे खर्चास मान्यता मिळालेली होती, त्यानुसार दि.१०/०२/२००७ अखेर एकुण ८ अधिकृत विक्रेत्यांकडुन कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन ३ विक्रेत्यांचे कोटेशन प्राप्त झालेली होती.

प्राप्त कोटेशनमध्ये केवळ दोनच कोटेशनधारकाचे दर प्राप्त झाले होते. त्यामुळे सदर खरेदीकामी फेर कोटेशन मागविण्याचा प्रस्ताव दि.०२/०४/२००७ च्या टिप्पणीन्वये मा. कार्यकारी

अधिकरी साहेब यांचेकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. त्यानुसार इकडील पत्र क्र.७०६३ दि.०३/०५/२००७ अन्वये एकुण १५ अधिकृत विक्रेते यांचेकडुन दि.१५/०५/२००७ अखेर कोटेशन मागविण्यात आलेले आहेत. त्यास अनुसरुन ७ अधिकृत विक्रेत्यांचे कोटेशन प्राप्त झालेली होती.

परंतु कोटेशन मागविताना ट्रॉली खरेदीकामी दिलेले Specification मध्ये असणाऱ्या पॉटची उंची हि फारच कमी असल्यामुळे आपणास पाहिजे त्या फूड सर्व्हिस ट्रॉली मिळणार नव्हती. सदरचे ४ नग फूड सर्व्हिस ट्रॉली खरेदीकामी रु.१,५५,२०५/- इतक्या रक्कमेची मा.व्यवस्थापन समिती सभेची मान्यता आहे. तेंव्हा या कामी आपणास आवश्यक उंचीचे पॉटसाठीचे Specification देऊन त्याप्रमाणे सुधारीत ४ ऐवजी २ नग ट्रॉली खरेदी करण्याचा फेर प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यासाठी अंदाजे रु. ९१,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

त्यानुसार इकडील पत्र क्र. १४९६३ दि. १८/०९/२००७ अन्वये एकुण ८ अधिकृत विक्रेते यांचेकडुन दि.२९/०९/२००७ अखेर कोटेशन मागविण्यात आलेले होते. त्यास अनुसरुन ३ अधिकृत विक्रेत्यांचे कोटेशन प्राप्त झालेली आहेत. ते खालीलप्रमाणे -

| अ.नं. | कोटेशन्ससादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१ | मे. के. बी. इलेक्ट्रॉनीक्स, मुंबई |
| ०२ | मे. जोवी फार्मासुटीकल्स, मुंबई |
| ०३ | मे. निखिल एंटरप्रायजेस, मुंबई |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले. या कोटेशन्सचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे पूढील सभेपूढे निर्णयार्थ सादर करुन कोटेशन्ससादरकर्त्यांना समक्ष नमुन्यासह चर्चा/वाटाघाटीसाठी आमन्त्रित करावे असे ठरले.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ३०** **श्री साईबाबा रुग्णालयाकरीता आर्थोपेडिक इन्स्ट्रूमेंट खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.३०** श्री साईबाबा रुग्णालयातील आर्थोपेडीक विभागातील मानद व कायमस्वरुपी आर्थोपेडीक तज्ञ डॉक्टरांनी दि.०३/१०/२००७ चे पत्रान्वये रुग्णालयामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या शस्त्रक्रिया करणेकामी काही आर्थोपेडीक इन्स्ट्रुमेंट सेटची मागणी केलेली आहे. सध्या होत असलेल्या शस्त्रक्रिया व्यतिरिक्त खालील प्रमाणे अद्यावत शस्त्रक्रिया ते करणार आहेत.

1. Total Knee & Hip Replacement
2. Spine Surgery
3. Nail Surgery
4. Arthoscopy
5. For Plating
6. Laminectomy

त्यासाठी त्यांनी आर्थोपेडीक इन्स्ट्रूमेंट सेटची मागणी केलेली त्याचे परिशिष्ट "अ" म्हणून सोबत ठेवले आहे.असून ती रुग्णालयातील मानद व कायमस्वरुपी तज्ञ डॉक्टरांनी तपासून निश्चित केलेली आहे व त्यासाठी अंदाजे रु.२०,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे आर्थोपेडीक इन्स्ट्रुमेंट विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२०,००,०००/- पर्यंतचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ३१** **श्रीसाईबाबा संस्थान रुग्णालयांसाठी स्वतंत्र लॉण्ड्री विभाग सुरु करणे बाबत.**

**निर्णय क्र.३१** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये विविध अतिदक्षता विभागांचे एकूण ४२ beds असून तेथील रुग्णांचे दैनंदिन विधीसुध्दा bed वरच होतात. या व्यतिरिक्त इतर Wards मध्ये सर्जरी, आर्थो, इ. चे रुग्ण सुध्दा बेड ला खिळून असतात. बालरुग्ण असल्यास त्यांचे विधीसुध्दा बेडवरच होतात.

ऑपरेशन थिएटर्समधील covers, drapes, डॉक्टर व इतर स्टाफचे changes, sheets, cap- mask इ. लिनन रक्ताने माखले जाते.

जंतु संसर्ग झालेल्या जखमांतून पू-लस इ. वाहून लिनन खराब होते.

श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये सध्या ९०% Occupancy असून इथे रोज सुमारे १५ ऑपरेशन्स होतात.

**येथील लिनन - a) रुग्णांचे कपडे, बेडशीट्स, चादरी.**

**b) ऑपरेशन थिएटर्समध्ये लागणारे निर्जंतुक कपडे.**

**c) रक्त, मलमूत्र, उलटी इ.ने माखलेले कपडे**

**d) इत्यादी**

असे विविध प्रकारचे कपडे सध्या श्री साईबाबा संस्थानच्या लॉण्ड्री विभागामार्फत धुतले जात आहेत.

➢ **या पध्दतीमधील तोटे पुढीलप्रमाणे:-**

१) रक्त, मलमूत्र, उलटी इ. ने माखलेले कपडे निर्जंतुक कपडयात मिसळतात व सर्वच विभागांचे (ऑपरेशन थिएटर्ससहित) लिनन खराब होऊ शकते.
२) रुग्णांच्या संसर्गाने (पू, जखमांमधील लस इ.) इतर कपडयात जंतूंचा प्रादुर्भाव होऊन भक्तनिवास इ. विभागातही भक्त गणांमध्ये रोगराई पसरु शकते.
३) सध्याचे लॉण्ड्रीतील धुलाईची पध्दत ही हॉस्पिटल्ससाठी योग्य नसून हॉटेल, धर्मशाळा इ. च्या कपडयांसाठीच योग्य आहे.
४) लिनन मधील विविध प्रकारांचे कपडे धुण्यासाठी वेगवेगळया प्रक्रियांची गरज असून हॉस्पिटलचे लिनन

Categary- I ते Categary- IV अशी केलेली आहे. यासाठी Hypochlorite, Dettol सारखे Antiseptic, Detergent (निरमा पावडर) चे कमी जास्त प्रमाण योजलेले आहे. संस्थानच्या लॉण्ड्रीत अशा विविध प्रक्रिया करणे शक्य नाही.
५) संस्थानच्या लॉण्ड्रीमध्ये Heat Dryer उपलब्ध नाही. कपडे लवकर वाळवून ते जंतुविरहीत करण्यासाठी या मशिनचा उपयोग जरुरीचा आहे.
६) Universal Hospital Precautions, Prevention of hospital cross infections इ. साठी वेगळी लॉण्ड्री असणे अत्यंत गरजेचे आहे.

❖ **हॉस्पिटल मधील लिननचे प्रकार :-**

ऑपरेशन्स थिएटर्स, कॅथलॅब, क्रिटिकल केअर युनिटस्, डायलेसिस, Patients for operation, Cardiac Recovery Unit, Deluxe-A.C.-Private wards, Offices इत्यादी विविध विभागांमधील रुग्ण व कर्मचा-यांसाठी (डॉक्टर्स, नर्सेस व इतर कर्मचारी) वेगवेगळया लिननची आवश्यकता असते.

❖ **लिनन खराब होण्यामागची कारणे:-**

हॉस्पिटलमधील दैनंदिन वापराने लिनन खराब होण्याची मुख्य कारणे पुढीलप्रमाणे
१) रक्ताने खराब होणे,
२) पू अथवा तत्सम पदार्थांमुळे
३) उलटी :- शौच - लघवी इ. प्रकारांमुळे
४) दैनंदिन वापरामुळे मळकटणे.

❖ **लिननच्या निर्जंतुकरणाचे महत्व :-**

**अ)** ओ.टी. मध्ये पूर्ण निर्जंतुक लिनन असणे अनिवार्य असते अन्यथा ऑपरेशन व्यवस्थित पार पडूनही रुग्णास जंतुसंसर्ग होऊ शकतो.
**ब)** Cardiac Recovery Unit, Post operative cases या रुग्णांना देण्यात येणारे लिनन पूर्ण निर्जंतुक असणे अतिशय गरजेचे असते.

**या व्यतिरिक्त -**

**अ)** Deluxe ward, Private ward इ. ठिकाणच्या महत्वाच्या व्यक्तींसाठी तेथील वार्डाचे दर पाहता देण्यात येणारे लिनन पूर्णपणे स्वच्छ व डागरहित असावे लागते.
**ब)** डॉक्टर्स, नर्सेस व इ. कर्मचारी यांचे चेंजेस जंतु विरहित असणे अनिवार्य असते.
**क)** प्रस्तावित - कर्मचा-यांना देण्यात येणा-या Uniform ची धुलाई, हॉस्पिटलमधील साधे व मळकट झालेले लिनन यांची धुलाई. - हॉस्पिटलच्या प्रस्तावित लॉण्ड्रीमार्फत होऊ शकेल.

वरील विविध प्रकारांची धुलाई करण्यासाठी विविध Procedures ची जरुरी असून Laundry कार्यान्वित करण्यासाठी काही मशिनरी, पाणीपुरवठा, वीज पुरवठा, इतर काही जागा, पाणी निचरा व्यवस्था व मनुष्यबळ यांची खालीलप्रमाणे आवश्यकता आहे.
(पाणीपुरवठा, वीज पुरवठा, मनुष्यबळ इ. साठी श्री साईबाबा हॉस्पिटलची व श्री साईनाथ रुग्णालयाची गरज वेगवेगळी असू शकते.)

- **श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कामाचा गोषवारा** :- (दररोज सरासरीने - ८१० नग.)

१) बेडशीट्स - १५०
२) उशीखोळ - १००
३) ड्रॉ शीट्स - १५०
४) पुरुष पेशंटचे ड्रेस - ७५ शर्टस्, ७५ पॅंट्स
५) महिला पेशंटचे ड्रेस - ७५ गाऊन्स
६) चादरी - ५०
७) टॉवेल्स - ५०
८) नॅपकिन्स - २५
९) ब्लॅंकेट्स - १०

१०) ओ.टी. लिनन - विविध प्रकारचे कपडे - ५० नग

- **<u>हॉस्पिटलचे प्रस्तावित Laundry करिता आवश्यक साधनसामग्री व मनुष्यबळ पुढीलप्रमाणे:-</u>**

**साधन सामग्री :-**

१) Washer with provision of hot water rinsing.
२) Spin Dryer /Tumble Dryer
३) Heat Dryer
४) २ Irons with Ironing Table.

**मनुष्यबळ :-**

(एकूण-३ कामगार एका शिफटसाठी प्रमाणे तीन शिफटसाठी एकूण-९ कर्मचारी.)

अ) Washer , Dryer - एक कामगार
ब) इस्त्री करण्यासाठी - एक कामगार
क) सर्व नगांची मोजणी करणे, वर्गवारी करणे, नोंदवही update करुन ठेवणे
इ. कामांसाठी - एक कामगार

**(या करिता कामगार विभाग प्रमुख यांचेकडून गरजेनुसार कामगार उपलब्ध व्हावेत.)**

❖ **धुलाईच्या विविध प्रक्रिया: -**

A) ८ तास २% Hypochlorite मध्ये भिजवणे
B) Antiseptic solution मध्ये दोन ते तीन तास भिजवणे.
C) Washing with Hot water १५ minutes.
D) Drying - Spin drying - Hot air drying
E) Ironing
F) Autoclave / ETO

➢ **Categories of Linen :-**

**Cat. I** - १) ऑपरेशन थिएटर्समध्ये लागणारे (डॉक्टर्स, नर्सेस व इतर स्टाफसाठी) Dress Changes
२) O.T. Linen
३) Linen for Post Operative patients.
A B C D E F (प्रक्रिया)

**Cat II :-** Dialysis, Unsoiled line from Deluxe, A.C., Pvt. Wards, ICCU, GICU, डॉक्टरांचे एप्रन्स
B C D E (प्रक्रिया)

**Cat III : -** All other linen (Unsoiled), कर्मचा-यांचे एप्रन्स.
C D E (प्रक्रिया)

**Cat IV :-** Soiled Linen
A B C D E (प्रक्रिया)

❖ **कार्यवाही**

- प्रत्येक पाळीमध्ये वेगवेगळया वर्गवारीमधील कपडे वेगवेगळे धुतले जातील व पुन्हा वेगवेगळया वॉर्डस्‌मध्ये पाठवले जातील.
- संपूर्ण लिननचे रेकॉर्ड व्यवस्थित ठेवले जाईल.
- प्रस्तावित लॉंड्री ३ पाळयांमध्ये - सकाळ, संध्याकाळ व रात्री अशी चालेल.
- (सकाळी ७ ते दुपारी २ पहिली शिफट, दुपारी २ ते सायं. ९ दुसरी शिफट, सायं. ९ ते सकाळी ७ तिसरी शिफट.)
  **यापैकी श्री साईनाथ रुग्णालयासाठी १ पाळी निश्चित करण्यात येऊ शकेल.**

❖ **लॉण्ड्रीसाठी लागणारे आवश्यक साहित्य पुढीलप्रमाणे :-**

1. Washing Machine - Capacity ५० Kg **२ No.**
2. Spin dryer, extractor - Capacity ५० kg. **२ No.**
3. Heat blow dryer - Capacity २५ kg **२ No.**
4. Irons (इस्त्री) २ No.
5. Ironing Table १ No.
6. Storage :- ४ Cupboards .
7. Office Table १ No.

8. Chairs - ३ No.
9. Arrangement for transportation (तीन चाकी रिक्षा - ड्रायव्हरसह)
10. १०० litre drums - ४ No.
11. A shed of size :- २०' x ३०'
12. Water supply
13. Drainage facility
14. Electricity supply

❖ **खर्चाचे अंदाजपत्रक**

- **भांडवली खर्च (Capital Expenditure) :- (अंदाजे)**

१. Washer - (Capacity ५० kg) **२ नग-** अंदाजे रुपये- ३,१६,०००/-
०२. Spin dryer - extractor (Capacity ५० kg) **२ नग-**अंदाजे रुपये- ३,००,०००/-
३. Heat Tumble Dryer (Capacity २५ kg.) **२ नग-** अंदाजे रुपये- ३,५२,०००/-
४. Irons अंदाजे रुपये- ५०००/- प्रमाणे २ नगास Rs.१०,०००/-
५. Ironing Table १ No. अंदाजे रुपये- ४०००/-
६. Cupboards (Rs.७५००/- each - ) **४ नग**-Total Rs.३०,०००/-
७. Office Table १ - Rs.७५००/-
८. Chairs ३ - (१ Chair Rs.५००/- ) अंदाजे रुपये- Rs.१५००/-
९. १०० लिटर्सचे Plastic Drum (Rs.५०० each प्रमाणे ) ४ नगांसाठी- Rs.२०००/-
१०. Shed - Bldg. Material & Construction,
११. Plumbing.
१२. Electrical installation.

**Total (Approximately) = Rs.१०,२३,००० + १० + ११+१२**

❖ **दरमहा आवर्ती खर्च :-**

**अ)** १. कर्मचारी पगार (कंत्राटी कर्मचारी) - (दररोज ९ कर्मचारी) - दरमहा अंदाजे रुपये ३५,०००/-
२. निरमा अथवा तत्सम डिटर्जंट पावडर - दरमहा ३० किलो - अंदाजे रुपये ७५०/-
३.Sodium Hypochorite - दरमहा १५ कॅन (प्रत्येक कॅन ५ लिटरचा) -अंदाजे रुपये १,२००/-
१. Dettol अथवा तत्सम Antiseptic Solution - दरमहा ३० लिटर - अंदाजे रुपये १,२००/-

**ब) विदयुत आकार -**

**क) पाणी पुरवठा -**

- **एकूण दरमहा आवर्ती खर्च रुपये ३८,१५० + विदयुत आकार + पाणी पुरवठा**

**अंदाजे प्रस्तावित खर्च -**

**अ) भांडवली -** रु. १०,२३,०००/- + बांधकाम + वीज पुरवठा + पाणी पुरवठा + ड्रेनेज इत्यादीकामीचा विभागवार खर्च.

**ब) आवर्ती -** दरमहा खर्च रुपये ३८,१५०/- + विदयुत आकार + पाणी पुरवठा

❖ **प्रस्तावित जागा -**

उपरोक्त प्रस्तावाकरिता साईनगर परिसरातील जनरेटरचे पश्चिमेकडे व समर्पण बिल्डींगचे पूर्वेकडील भागातील मोकळया जागेत अथवा श्री लोढा यांचे विहीरीशेजारील जागेत योग्य त्या सुविधेसह बांधकाम,विदयुत व पाणीपुरवठा विभागाचे समन्वयाने लॉण्ड्रीचे इन्स्टॉलेशन शक्य होईल.

श्री साईबाबा संस्थानच्या विविध विभागांमार्फत विहित पध्दतीने खालीलप्रमाणे कार्यवाही करुन घेणे जरुरीचे आहे.

- **विभागवार कामाचे स्वरुप -**

१) शेड (२०' x ३०') चे बांधकाम - बांधकाम विभाग.
२) विदयुत पुरवठा - विदयुत विभाग.
३) पाणी पुरवठा व सांडपाणी निचरा - पाणीपुरवठा विभाग.
४) योग्य त्या साहित्याची खरेदी - खरेदी विभाग

तरी उपरोक्तप्रमाणे हॉस्पिटलकरिता स्वतंत्र लॉण्ड्री विभाग सुरु करणेस, सदरकामी येणारा भांडवली खर्च अंदाजे रुपये १०,२३,०००/- अधिक बांधकाम, विदयुत पाणीपुरवठा इ. कामासह दरमहा येणारा आवर्ती खर्च अंदाजे रुपये ४०,०००/- तथा विविध संबंधित विभागांमार्फत उपरोक्त काम करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ३२** **ब्लड बँक विभागासाठी सेट्रल मॉनिटरींग सिस्टम बसवून मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३२** श्रीसाईबाबा रुग्णालयातील रक्तपेढीमध्ये रक्त व रक्त घटक साठविण्यासाठी ५ ब्लड बँक रेफरिजेरेटर्स व ४ डिफ्रीजर सतत वापरात असतात. सदर फ्रीजर चालू असतांनी त्यांचे टेंपरेचर सतत बघणे आवश्यक असते. सदर फ्रीजरचे टेंपरेचर सतत बघणेसाठी त्यांनी डि.पी. क्रमांक ६००३ दि.२२/०९/२००७ अन्वये सेंट्रल मॉनिटरींग सिस्टीम बसवून मिळणेबाबतची मागणी केलेली आहे.

सदर सेंट्रल मॉनिटरींग सिस्टीम बसविल्यामुळे खालील फायदे होऊ शकतात.

सदर सेंट्रल मॉनिटरिंग सिस्टम बसविल्यामुळे खालील फायदे होऊ शकतात.

०१. सदर CMS System मुळे टेंपरेचर मॉनिटरिंग एकाच ठिकाणाहून करता येईल त्यामुळे मॅन पॉवर कमी लागेल.

०२. सदर CMS System च्या वापरामुळे कोणत्या फ्रिजरला टेंपरेचर प्रॉब्लेम आहे ते कळू शकते.

०३. सदर CMS System मुळे प्रत्येक दिवसाचे टेंपरेचर रिर्पोटींग कळू शकेल.

Technical Specifications of Central Monitoring System for Blood Bank

1. The CMS can give alarm at a remote place with indication of refrigerator whose parameter under consideration is beyond its set limits.
2. The CMS can register different temperature limits for different refrigerators within which the refrigerator is expected to operate.
3. The CMS should have an in-built RTC so that every reading recorded will have a day, date and time stamp.
4. The CMS should have a local memory to store the system settings, limits of the parameters and records of the temperature magnitudes. These settings do not get disturbed in case of power interruption also.
5. The time interval between two successive records can be settable from 1 minute to 60 minutes.
6. The CMS have a capacity to store about 6 to 20 days data records ( if data acquisition interval is 15 minutes).
7. Temperature range should be wide, which covers all refrigerators from – 100$^0$C to 400 $^0$C .
8. Resolution of indication and recording should be 0.1$^0$C.
9. Date output should available in different formats, such as graphs, charts, tabular format, digital format etc.
10. Simple ordinary paper can be used for output printouts. No calibrated paper is required.
11. The graphs generated by the system should have automatic scaling facility to use the maximum paper area. Thus the graph scale is expanded or contracted automatically as the selection of graph limits and the output magnitudes.
12. One single report everyday for all the refrigerators.

सदर सेंट्रल मॉनिटरींग सिस्टीम बसविणेकामी व त्यासाठी लागणाऱ्या ॲक्सेसरीज खरेदीकामी अंदाजे रु.१,२७,०००/- इतका खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ३३** **संस्थान कर्मचारी जादा वैद्यकीय बीलाचा परतावा देणेबाबत**

**निर्णय क्र.३३** संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबून असलेल्या त्यांचे अवलंबीतांना कर्मचारी वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये जादा वैद्यकीय बीलाचा परतावा देण्यात येतो. त्याप्रमाणे ज्या कर्मचाऱ्यांची बीले एका वर्षात रुपये ५०००/- चे आत असतील त्यांचा परतावा मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर होतो व ज्या बीलांची रक्कम रुपये ५०००/- पेक्षा अधिक आहे त्यांचे बीलास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागते. यापूर्वी व्यवस्थापन समितीचे दिनांक ११.०९.२००४ चे सभेतील निर्णय क्र.१९ अन्वये येथून पुढे अशा प्रकारची कर्मचाऱ्यांची वैद्यकीय बीले वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ सदस्य मा.डॉ.एकनाथ भा.गोंदकर व मा.डॉ.पी.एल.तिवारी यांनी तपासून त्यांचे शिफारशीनुसार बीले अंतीम मंजूरीसाठी व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावीत, असें ठरलें आहे.

त्यानुसार खालीलप्रमाणे कर्मचाऱ्यांची बीले सदस्य मा.डॉ.एकनाथ भा.गोंदकर व सदस्य मा. डॉ.पी.एल. तिवारी यांना दाखवून घेतली आहेत. त्यानुसार खालील देयके आदा करण्याची शिफारस केली आहे, ज्यास मान्यता देण्यात आली. यामध्ये श्री फकिरा बाबासाहेब मोहन हे स्वत: HIV बाधीत रुग्ण आहे त्यामूळे त्यांचे बील विशेष बाब म्हणून मंजूर करण्यात यावे असे ठरले.

| अ.नं. | कर्मचाऱ्यांचे नाव | रुग्णालयाचे नाव | मागणी रक्कम | देय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ. यशोधन अरुण पितांबरे | श्री साईनाथ रुग्णालय, शिरडी | १३८४.०० | १३८४.०० |
| २ | श्रीमती गीता आप्पासाहेब शिंदे | श्री साईनाथ रुग्णालय, शिरडी | २६३५.०० | २५९९.०० |
| ३ | श्री. सुभाष नारायण चित्रे | श्री साईबाबा रुग्णालय, शिरडी | ४६२२.०० | ४२६२.०० |
| ४ | श्री. प्रदिप दशरथ शिंदे | श्री साईबाबा रुग्णालय, शिरडी | ८७१०.०० | ८०१४.०० |
| ५ | श्री. गुरुप्रसाद अरुण कापरे | श्री साईबाबा रुग्णालय, शिरडी | १९०७.०० | १९०७.०० |
| ६ | श्री. किशोर साहेबराव गवळी | श्री साईबाबा रुग्णालय, शिरडी | ३३४.०० | ३३४.०० |
| ७ | श्री. शैलेश महादेव जगताप | श्री साईबाबा रुग्णालय, शिरडी | २६४५.०० | २६४५.०० |
| ८ | श्री.आण्णासाहेब गोवर्धन कुदळे | श्री साईनाथ रुग्णालय, शिरडी | २४१८.०० | २४१८.०० |
| ९ | श्रीमती सुशिला बबन भारस्कर | श्री साईनाथ रुग्णालय, शिरडी | ६८९.०० | ६८९.०० |
| १० | श्री. के. यु. तुपे | सुजाता बिर्ला हॉस्पिटल, नाशिक | २४६०२.०० | २४६०२.०० |
| ११ | श्रीमती रोहीणी वसंत जक्का | श्री साईबाबा रुग्णालय, शिरडी | ३५००.०० | २८००.०० |
| १२ | डॉ. पुनम बाळासाहेब गवळी | श्री साईबाबा रुग्णालय, शिरडी | २५५३.०० | २५५३.०० |
| १३ | श्री. अनिल देवराम धरम | डॉ. श्रीकांत देशमुख हॉस्पिटल, संगमनेर | १८१६९.०० | १००००.०० |
| १४ | श्री.बाबासाहेब फकीरा मोहन | संजीवनी आयुर्वेदीक ॲन्ड सर्जीकल हॉस्पिटल, श्रीरामपुर | १५०००.०० | १३,५००.०० |
| | | एकुण- | ८९१६८.०० | ६४२०७.०० |

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ३४ श्रीसाईनाथ रुग्णालयातील ऑपरेशन थिएटरकरीता ऑटोक्लेव्ह खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.३४** श्री साईनाथ रुग्णालयातील ऑपरेशन थिएटरकरीता सन १९९८ साली एक नग १८ KW हाईस्पीड ऑटोक्लेव्ह मेडीक्वीप कंपनीचा मे. एम. शहा ॲण्ड कंपनी, पुणे यांचेकडून एक नग रु.१,२२,०००/- इतक्या रक्कमेत खरेदी करण्यात आला होता. सदर मशिन खरेदी करुन ८ वर्ष झालेली असून सदर ऑटोक्लेव्हचा पत्रा ४ -५ ठिकाणी चिरल्यामुळे तो सध्या वापरता येऊ शकत नाही. कारण सदर ऑटोक्लेव्ह हा कपडे / साहित्य निर्जंतूक करण्यासाठी वापरतात व त्यामध्ये मोठ्या प्रमाणात वाफ असते सदर वाफेमुळे ऑटोक्लेव्हचा स्फोट होऊन तेथे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना धोकादायक ठरु शकते, त्यामुळे एक नविन १८ KW हाईस्पीड ऑटोक्लेव्ह खरेदी करणे गरजेचे आहे. नविन ऑटोक्लेव्ह खरेदी करतांनी जुना ऑटोक्लेव्ह बायबॅक करता येईल.

सदरचे नविन १८ KW हाईस्पीड ॲटोक्लेव्ह २०छ x ३६छ खरेदीस अंदाजे रु.२,५०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

***Technical Specifications:-***

- Horizontal High Speed Sterilizer with ISI mark.
- Chamber Size : 20" x 36"
- Power Consumption : 18 KW
- Working Pressure : 32 PSI
- Working Temperature : 134 Degree C

तरी वरीलप्रमाणे एक नग १८ KW हाईस्पीड ॲटोक्लेव्ह २०" x ३६"बायबॅक सह विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,५०,०००/- च्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ३५ स्पाईन सर्जरी इन्स्ट्रुमेंट सेट खरेदीकामी प्राप्त झालेले कोटेशन उघडणेबाबत.**

**निर्णय क्र.३५** श्रीसाईबाबा रुग्णालयात आर्थोपेडीक शस्त्रक्रिया गृहामध्ये Spine Surgery च्या शस्त्रक्रिया करणेसाठी Spine Surgery Instrument Set ची आवश्यकता आहे. सदरच्या Spine Surgery Instrument Set कोटेशन मागवून खरेदीकामीचा अंदाजे रु.१,११,१४४.३८ खर्चाचा प्रस्ताव दि.२२/०९/२००७ चे मा.व्यवस्थापन समीती सभेमध्ये मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता.

मा.व्यवस्थापन समिती सभेतील मंजुरी अन्वये इकडील पत्र क्र.१५८३५ दि.०६/१०/२००७ अन्वये एकूण १० कोटेशन धारकांकडून दि.२५/१०/२००७ अखेर कोटेशन मागविण्यात आलेले होते. त्यास अनुसरुन कोटेशन प्राप्त झालेले आहेत ते खालीलप्रमाणे-

१. मे. कालेलकर सर्जिकल प्रा.लि., मुंबई.

२. मे. साऊथ इंडीया सर्जीकल कंपनी लि., मुंबई

३. मे. सुश्रूत सर्जीकल प्रा. लि., पूणे (प्रशासन शाखेमार्फत टपालातून उघडून मिळाले)

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले. ही कोटेशन्स तज्ञ समितीपूढे सादर करण्यात येऊन या कोटेशन्सचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ३६** **ऑक्सिजन पाईपलाईनचे वाढीव काम करणेकामी प्राप्त झालेले कोटेशन उघडणेबाबत.**

**निर्णय क्र.३६** श्रीसाईबाबा रुग्णालयात नवीन एम. आर. आय. मशिन खरेदी करण्यात येऊन कार्यान्वीत करण्यात आलेले आहे. तसेच रुग्णालयात नवीनच न्युरो ऑपरेशन थिएटरचे काम चालु असून न्युरो रिकव्हरी वार्ड तयार करावयाचा आहे. सदर विभागात ऑक्सिजन, सक्शन, व्हॅक्युम इत्यादीसाठी पाईप लाईनचे काम करावे लागणार आहे. त्याचबरोबर आय.सी.सी.यु. मध्ये दोन व जी.आय.सी.यु. मध्ये दोन खाटांची संख्या वाढवयाची आहे. त्यासाठी प्रत्येक खाटालगत ऑक्सिजन, व्हॅक्युम व सक्शनचे पॉईट वाढवावे लागणार आहे.

वरीलप्रमाणे ऑक्सिजन पाईप लाईनचे वाढीव काम विहित पध्दतीने कोटेशन मागवून करवून घेणेकामीचा अंदाजे रु.२,५३,४५०/-चे खर्चाचा प्रस्ताव दि.२२/०९/२००७ चे मा. व्यवस्थापन समीती सभेमध्ये मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता.

मा.व्यवस्थापन समिती सभेतील मंजुरी अन्वये इकडील पत्र क्र.१५७१६ दि.०३/१०/२००७ अन्वये एकूण ०८ कोटेशन धारकांकडून दि.२५/१०/२००७ अखेर कोटेशन मागविण्यात आलेले होते. त्यास अनुसरुन ०४ सिलबंद कोटेशन प्राप्त झालेले आहेत. प्राप्त कोटेशनपैकी मे.सिध्दार्थ इंजि.कंपनी, मुंबई यांना पाठविलेले पत्र पत्ता चूकीचा असल्यामुळे परत आले त्यामुळे त्यांना पुन्हा इकडील पत्र क्र.१८६७४ दि.२३/११/२००७ अन्वये पत्र पाठविण्यात आले होते त्यानुसार त्यांचे देखील कोटेशन प्राप्त झालेले आहेत असे एकूण ०४ कोटेशन प्राप्त झालेले आहे ते खालीलप्रमाणे-

1. M/s. AL-Med Equipments, Mumbai.
2. M/s. United Surgical, Thane.
3. M/s. Siddharath Eng.Co., Mumbai.
4. M/s. Jambotkar Medequip Pvt.Ltd., Mumbai

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले. ही कोटेशन्स तज्ञ समितीपूढे सादर करण्यात येऊन या कोटेशन्सचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ३७** **आय.सी.यु.विभागातील पल्स ऑक्सीमिटरचे अपग्रेडेशनबाबत.**

**निर्णय क्र.३७** श्री साईनाथ रुग्णालयातील अतिदक्षता विभागात पेशंटचे एस. पी. ओ. टु., हार्ट रेट इ. घेणेकरीता मे. एल. ॲण्ड. टी. पुणे या कंपनीचे Stellar P पल्स ऑक्सीमिटर एकुण ०४ नग सन १९९९ साली खरेदी करण्यात आले आहेत. सदर चारही पल्स ऑक्सीमिटरचे दुरुस्ती व देखभालीकरीता कंपनीचे अधिकृत सर्व्हिस डीलर मे. ॲड्रॉईट मेडीकल सिस्टीम ॲण्ड सर्व्हिसेस, पुणे यांचेकडे दरवर्षीप्रमाणे या वर्षी दि. ०१/०२/२००७ ते दि. ३१/०१/२००८ या कालावधीकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करण्यात आले आहे. सदरचे कालावधीत दुरुस्ती व देखभालीकरीता आवश्यक असणारे स्पेअर पार्ट कंपनी स्वखर्चाने बदलणार असुन डिस्प्ले, ॲक्सेसरीज व अपग्रेडेशन इत्यादीकरीता येणारा खर्च संस्थानला करावयाचा आहे.

आय.सी.यु. विभागाने त्यांचे पत्र क्र. ५८४१ दि. १८/१२/२००७ अन्वये सदरचे चारही पल्स ऑक्सीमिटर मध्ये NIBP Upgrade Kit बसवून मिळणेबाबत मागणीपत्र पाठविले आहे. सदरचे अपग्रेडेशन केल्यास Stellar P या पल्स ऑक्सीमिटर मॉनिटरवर पेशंटचे ब्लड प्रेशर देखील मोजता येईल व सदर मॉनिटरवर हार्ट रेट, एस.पी.ओ.टु. व ब्लड प्रेशर हे तीनही पॅरामीटर एकाचवेळी पाहता येतील. त्यामुळे पेशंटचे ब्लड प्रेशर वारंवार मॅन्युअली घेण्याची आवश्यकता पडणार नाही.

वरीलप्रमाणे Stellar P मॉनिटर्सचे NIBP Upgradation करणेकरीता मे. ॲड्रॉईट मेडीकल सिस्टीम्स् ॲण्ड सर्व्हिसेस, पुणे या मे. एल.ॲण्ड टी., पुणे यांच्या अधिकृत सर्व्हिस डीलर कडुन अंदाजे खर्चाचे कोटेशन मागविण्यात आले असुन ते खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Description | Qty. | Rate Per | Amount in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01 | NIBP Upgrade Kit For Stellar-P With Standard Accessories | 04 | 50,000.00 | 2,00,000.00 |
| | | | +VAT 12.5% | 25,000.00 |
| | | | **Total in Rs.** | **2,25,000.00** |

वरीलप्रमाणे Stellar P पल्स ऑक्सीमिटर -०४ नग मॉनिटर्सचे NIBP Upgradation करणेकरीता अंदाजे एकुण रु. २,२५,०००/-(अक्षरी रु. दोन लाख पंचविस हजार मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचे अपग्रेडेशन मे. एल. ॲण्ड टी., पुणे यांच्या विविध सर्व्हिस डीलरकडुन कोटेशन मागणी करुन करता येईल.

तरी आय.सी. यु. विभागातील Stellar P पल्स ऑक्सीमिटर -०४ नग मॉनिटर्सचे NIBP अपग्रेडेशन मे. एल. ॲण्ड टी. पुणे या कंपनीच्या विविध डीलर्सकडुन कोटेशन मागवुन करुन घेणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रु. २,२५,०००/- च्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर कला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ३८** **ऑपरेशन थिएटर विभागातील मल्टीपॅरा मॉनिटर्सच्या अपग्रेडेशनबाबत.**

**निर्णय क्र.३८** श्रीसाईनाथ रुग्णालयातील ऑपरेशन थिएटर विभागात पेशंटचे ब्लड प्रेशर, इ.सीजी. आणि एस. पी. ओ. टु., इ. घेणेसाठी मे. एल. ॲण्ड. टी. पुणे या कंपनीकडुन सन १९९९ साली Star ५० मॉनिटर्स -०२ नग व सन २००६ साली Planet ५० मॉनिटर्स -०२ नग खरेदी करण्यात आले आहेत. सदर मॉनिटर्सपैकी Star ५० मॉनिटर्स -०२ नग चे कंपनीच्या अधिकृत सर्व्हिस डीलरकडे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करण्यात आले असुन सदर कालावधीत मे. ॲड्रॉइट मेडीकल सिस्टीम ॲण्ड सर्व्हिसेस, पुणे यांचे इंजिनीअर सर्व्हिस देत आहेत. सदर कालावधीत दुरुस्तीकरीता आवश्यक असणारे स्पेअर पार्ट कंपनी स्वखर्चाने बदलणार आहे. परंतु अपग्रेडेशन, डिस्प्ले व ॲक्सेसरीज संस्थानला वेगळे खरेदी करावे लागणार आहेत.

श्रीसाईनाथ रुग्णालयाच्या ऑपरेशन थिएटर विभागाने त्यांचे पत्र क्र. ७६०२ दि. ०३/१२/२००७ अन्वये Star ५० मल्टीपॅरा मॉनिटर्सला ETCO२ Attachment बसवून मिळणेबाबत मागणीपत्र पाठविले आहे. सदर अपग्रेडेशन केल्यामुळे वरील मॉनिटर्सवर पेशंटने उच्छश्वासाद्वारे सोडलेला CO२ गॅसचे प्रमाण मोजता येते. सदरचे CO२ चे प्रमाण मोजणे शस्त्रक्रिया करतेवेळी ॲनेस्थेटीक डॉक्टरांच्या दृष्टीने आवश्यक असते.

सदरचे ETCO2 (Capnography) अपग्रेडेशनकरीता मे.एल. ॲण्ड.टी. कंपनीचे अधिकृत सर्व्हिस डीलर मे. ॲड्रॉइट मेडीकल सिस्टीम ॲण्ड सर्व्हिसेस, पुणे यांचेकडुन खर्चाचे अंदाजपत्रक मागविण्यात आले असुन त्यांनी त्यांचे पत्र क्र. AMSS/OCT/QUT/०४१ दि. १०/१२/२००७ अन्वये खालीलप्रमाणे कोटेशन पाठविले आहे.

| Sr.No. | Description | Qty | Rate Per | Amount in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01 | Capnography Upgrade Module for Star 50 Monitor With all Standard Accessories | 02 | 1,25,000.00 | 2,50,000.00 |
| | | | + VAT 12.50% | 31,250.00 |
| | | | **Total in Rs.** | **2,81,250 .00** |

वरीलप्रमाणे एकुण दोन नग Star ५० मॉनिटर्सचे ETCO२ अपग्रेडेशन करणेसाठी एकुण रु. २,८१,२५०/- (अक्षरी रु. दोन लाख एक्याऐंशी हजार दोनशे पन्नास मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचे अपग्रेडेशन मे. एल ॲण्ड टी. पुणे यांचे विविध सर्व्हिस डीलर्स यांचेकडुन कोटेशन मागणी करुन करता येईल.

तरी वरीलप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयाच्या ऑपरेशन थिएटर विभागातील मे. एल. ॲण्ड टी., पुणे या कंपनीच्या दोन Star ५० मॉनिटर्सचे ETCO२ अपग्रेडेशन करणेकरीता येणाऱ्या एकुण रु. २,८१,२५०/- चे खर्चास व सदरचे अपग्रेडेशन मे. एल. ॲण्ड टी. कपनीच्या विविध डीलर्सकडुन कोटेशन मागवुन करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ३९** **श्री साईबाबा हॉस्पिटल- मेडीकल स्टोअर बाबत.**

**निर्णय क्र.३९** सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ४०** **श्रीमती सिंधूबाई पुंडलिक बढे यांना वैद्यकीय मदत देणे बाबत.**

**निर्णय क्र.४०** श्रीमती सिंधूबाई पुंडलीक बढे - मदतनीस प्रसादालय विभाग - यांनी दिनांक २४/०७/२००६ रोजी अर्ज करुन त्यांचा मुलगा विष्णू पुंडलिक बढे यांच्या पुढील उपचारासाठी एकूण रु.३,००,०००/-ॲडव्हान्सची मागणी केली होती. श्रीमती बढे यांचा अर्ज दि.१९/०८/२००६ चे मा.व्यवस्थापन समिती चे सभपुढे ठेवण्यात आला होता.त्यावर चर्चा होऊन निर्णय क्र.६४६ अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

श्रीमती बढे यांनी दि.२४/०७/२००६ चे अर्जान्वये मुलाच्या उपचारासाठी रु.३,००,०००/- इतका खर्च येणार असून श्रीमती बढे यांनी रु.२ लाख ॲडव्हान्स मिळावे अशी विनंती केली होती. संस्थान वैद्यकिय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये श्रीमती बढे यांचा मुलगा हा त्यांचेवर अवलंबित होत नसल्यामुळे त्यांना वैद्यकिय देखभाल नियमावली नुसार वैद्यकिय बिलाचा परतावा मिळणार नाही. श्रीमती बढे ह्या वर्ग ४ च्या कर्मचारी असून त्यांची इतका खर्च करण्याची आर्थिक कुवत नाही. श्रीमती बढे यांची संस्थान सेवा फक्त १२ वर्षे शिल्लक असून त्यांना सध्या निव्वळ पगार फक्त रु.२२८२/- इतका मिळत आहे. सबब श्रीमती सिंधूबाई बढे यांना तूर्त पगारापोटी रु.१.५० लाख बिनव्याजी ॲडव्हान्स म्हणून द्यावा व त्याची वसूली त्यांचे पगारातून रु.१,०००/- प्रतिमहा वसूल करणेत यावी असा निर्णय झालेला आहे.

श्रीमती बढे यांनी दि.१५/०३/२००७ च्या अर्जासोबत मा.आ.राधाकृष्ण विखे पा. यांचे दि.०१/०४/२००७ चे पत्रान्वये त्यांना दिलेला ॲडव्हान्स माफ करणे बाबत सहानभूती पूर्वक विचार करण्यात यावा, असे पत्र दिलेले आहे. त्यानुसार दि.०७/०५/२००७ चे टिप्पणीन्वये प्रस्ताव मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांच्याकडे पुढील आदेशासाठी ठेवण्यात आला होता. सदर प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयाप्रमाणे कार्यवाही व्हावी असा आदेश पारीत झालेला आहे व तसे संस्थानचे अस्थापना विभागास कळविण्यात आले होते.

श्रीमती सिंधूबाई बढे या ॲडव्हान्सची रक्कम पगारातून वसूल होऊ नये व संस्थानकडून त्यांना झालेल्या खर्चाची रक्कम मिळणे बाबत तगादा करत असलेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, पूर्वी व्यवस्थापन समितीचे दिनांक १९.८.२००६ चे सभेतील निर्णय क्र.६४६ अन्वये कार्यवाही करण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं. ४१ बगीचा विभागाकरीता ट्रॅक्टर खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.४१** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०४.०३.२००६ निर्णय क्र.१४८ नुसार कनकुरी येथील साठवण तलावावरील नांगरट करणे व नव्याने शेती महामंडळाचे खरेदी केलेल्या शेतीची मशागत करणे इत्यादी कामासाठी आवश्यक असणारा जॉनडियर कंपनीचा ट्रॅक्टर तसेच पल्टीप्लाऊ, सरी रेझर व इतर अनुषंगिक साहित्य अधिकृत विक्रेत्याकडून खरेदीस मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार संस्थान जा.क्र.एसएसएस/ खरेदी-बगीचा/ ८०२४/ २००६, दि.१९.०६.२००६ अन्वये दि.२४.०६.२००६ अखेर दरपत्रके मागविणेत आलेले असून मुदतीअंती खालीलप्रमाणे दरपत्रके प्राप्त झालेली आहेत. त्याचा तपशील-

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नाव | ट्रॅक्टर कंपनीचे नाव |
|---|---|---|
| १ | मायकेल ॲटोमोबाईल्स, श्रीरामपूर | एचएमटी |
| २ | अंबिका ॲटोमोबाईल्स, येवला | आयशर |
| ३ | मातृछाया सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस प्रा.लि., अ.नगर | जॉनडिअर |
| ४ | मे. राहुल ट्रॅक्टर्स, कोल्हार | जॉनडिअर |
| ५ | भनसाळी ट्रॅक्टर्स, प्रा.लि., कोपरगाव | स्वराज |

उपरोक्त निविदाधारकांपैकी फक्त क्र.३ व ४ यांनीच संस्थानचे मागणीप्रमाणे जॉनडिअर कंपनीचे ट्रॅक्टरचे दर भरलेले असल्याने त्यांना मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१९.०८.२००६ मध्ये चर्चा/ वाटाघाटीसाठी आमंत्रित करणेत आलेले होते. निर्णयाअंती संबंधितांनी दिलेल्या सुट दराचा विचार करुन मे. राहुल ट्रॅक्टर्स, कोल्हार यांना न्युनतम दर रु.४,६१,५३५/- चा पुरवठा आदेश देण्यात यावा, असे ठरले आहे. तथापि जॉनडिअर कंपनीऐवजी बलवान कंपनीच्या ट्रॅक्टर संस्थानसाठी उपयुक्त असल्याने बलवान कंपनीचे ट्रॅक्टर घेण्यात यावे अशी तोंडी सुचना मा.अध्यक्ष महोदय यांनी केलेली होती. त्यामुळे जॉनडियर ट्रॅक्टरचा पुरवठा आदेश तात्पुरता स्थगित ठेवणेत आलेला आहे. तरी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१९.०८.२००६ मध्ये जो निर्णय घेणेत आला आहे तो निर्णय रद्द करण्यात येऊन बलवान कंपनीचा ट्रॅक्टर खरेदी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,बलवान कंपनीचा ट्रॅक्टर खरेदीकामी अधिकृत विक्रेत्यांकडून कोटेशन्स मागविण्यात याव्यात,असें ठरलें. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी)

**विषय नं. ४२ दूध दरवाढीबाबत.**

**निर्णय क्र.४२** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१७.०२.२००७ निर्णय क्र.१५०(क-८) नुसार संस्थानचे कॅन्टीन विभागाकरीता आवश्यक असणारे गाय दूध खरेदी निविदा पद्धतीने करणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देऊन, निविदा मागविणेत येऊन संबंधितांना मा.व्यवस्थापन समिती सभा दि.३०.०४.२००७ मध्ये चर्चेसाठी आमंत्रित करणेत आलेले होते. निर्णयाअंती संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पादक व प्रक्रिया संघ मर्यादित., अमृतनगर ता.संगमनेर यांना संस्थान जा.क्र.७७२६ दि.०१.०५.२००७ अन्वये रु.१२.५० प्र.लि.या वार्षिक मंजूर दराने ३.५ फॅट, ८.५एसएनएफ प्रतीचे दूध पुरविणेचा पुरवठा आदेश देणेत आलेला असून मागणीप्रमाणे त्यांचा पुरवठा चालू आहे.

मे.संगमनेर तालुका दूध संघ, अमृतनगर यांनी त्यांचे क्र.२१९३ दि.१७.११.२००७ चे पत्राने शासनामार्फत दूध खरेदी दर हे कृश व पृष्ठ काळासाठी वेगवेगळे असतात. यामध्ये रु.१/-चा फरक असतो. महाराष्ट्र शासनाने दि.०१.१०.२००७ पासून दूध खरेदीमध्ये रु.१/- व दि.१.११.२००७ पासून ४.० फॅट व ८.५ एसएनएफ गुणप्रतीच्या दूध खरेदीमध्ये रु.२/- ने वाढ केलेली आहे. तसेच विदयुत खर्च व इतर अनुषंगिक खर्चामध्ये वाढ झालेली असलेमुळे संघास रु.३/- प्र.लिटर दरवाढ देऊन रु.१५.५० प्र.लिटर दराने पुरवठा करणेची विनंती केलेली आहे.

मे.संगमनेर तालुका दूध संघ यांना दिलेल्या पुरवठा आदेशात दिलेले दर हे वार्षिक स्वरुपाचे असून कृषकाळाचे व पृष्ठकाळाचे एकच दर राहतील तसेच यात कोणत्याही प्रकारची दरवाढ देता येणार नाही. तथापि शासनाने दरवाढ दिल्यास त्याबाबत जी.आर.ची प्रत सादर केल्यानंतर विचार करता येईल असे नमुद केलेले आहे. याबाबत त्यांना जी.आर.ची प्रत पाठविणेस सांगणेत आलेले होते मात्र वेळोवेळी कळवूनही त्यांनी दि.०१.१०.२००७ ची महाराष्ट्र शासनाची रु.१/- दरवाढीची जी.आर.प्रत दिलेली नाही. तसेच दि.०१.१०.२००७ चा कोणताही जी.आर.शासनाने काढलेला नाही. तसेच त्यांनी पत्रासोबत जोडलेल्या शासन निर्णय क्र.एमएलके/१००५/१२८१/प्र.क्र.१५/पदुम-८ दि.७ नोव्हेंबर २००७ च्या जी.आर.मध्ये ३.५/८.५ गुणप्रतीसाठी प्रती लिटर खरेदी दरात रु.१.५० प्र.लि.वाढ करणेत यावी. संघ/संस्थाना सध्या देण्यात येणाऱ्या कमिशनच्या (अंतर्गत वाहतुक, कॅन खर्च, व्यवस्थापन खर्च, शितकरण खर्च व इतर ) दरात कोणताही बदल नाही व सदर दूध खरेदी दरवाढ ही दिनांक १ नोव्हेंबर २००७ पासून देण्यात यावी असे नमूद केलेले आहे. त्यामुळे त्यांना रु.३/-प्रती लिटर वाढ देता येणार नाही मात्र शासनाच्या निणर्यानुसार दि.०१ नोव्हेंबर २००७ पासून रु.१.५० प्रती लिटर दरवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, शासनाने दिलेली दरवाढ देण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी/कॅन्टीन विभाग प्रमुख)

**विषय नं. ४३ सन २००७-०८ प्रसादालय जादा किराणा माल खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.४३** सन २००७-०८ मध्ये ( दि.०१.०५.२००७ ते दि.३०.०३.२००८ अखेर) प्रसादालय व कॅन्टीन विभागाचे दैनंदिन वापरासाठी आवश्यक किराणा माल खरेदीकामी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१७.०२.२००७ निर्णय क्र.१५० नुसार मान्यता मिळालेली असून कृषि उत्पन्न बाजार समितीचे मोंढयावरुन मा.विश्वस्तांचे उपस्थितीत गहू, हरबरा व मोहरी खरेदी करणेत आलेला आहे. गव्हाची व हरभऱ्याची आवक वाढल्याने मुळ मंजूरीपेक्षा १६५.३४ क्विंटल गहू व ७.१६ क्विंटल हरबरा जादा खरेदी केलेला आहे. उर्वरीत किराणा मालाची खरेदी ही मा.व्यवस्थापन समिती सभा दि.३०.०४.२००७ मधील निर्णयानुसार निविदा पद्धतीने झालेली असून प्रसादालयाचे आवश्यकतेनुसार संबंधित पुरवठाधारकांकडून माल खरेदी करणेत येत आहे. श्रीसाईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडे व सुपर स्पेशालिटी हॉस्पीटलकडे प्रसादभोजन स्वयंसेवी कक्ष प्रसादालय विभागामार्फत सुरु करणेत आलेला असून दैनंदिन सुमारे ३५०० ते ४५०० साईभक्त त्या ठिकाणी प्रसाद भोजन घेत आहेत. तसेच दिवसेंदिवस साईभक्तांची गर्दी वाढत असल्याने नाष्टा पाकिटे, प्रसादलाडूची जादा विक्री होत आहे.

सन २००७-०८ चे पुरवठा कालावधी वर्ष एप्रिल ते मार्च असे केलेले असून मार्च २००८ पर्यंत खरेदीबाबतचा निर्णय न झाल्यास एप्रिलमध्येही वार्षिक मंजूर दराने खरेदी करावी लागेल. त्यानुसार डिसेंबर ते मार्च साठी रु.२,७२,३९,१८३/- खर्च अपेक्षित असून एप्रिल महिन्यांसाठी रु.१,२३,६६,२८५/- खर्च येईल. सन २००७-०८ साठीचे प्रसादालय माल खरेदी निविदेतील शर्ती/अटीनुसार २५ टक्के जादा माल मान्य दरानेच पुरविणे पुरवठादारावर बंधनकारक आहे. तथापि काही माल हा साईभक्तांची गर्दी वाढल्यास २५ टक्केपेक्षा जादा घ्यावा लागणार आहे. वार्षिक मंजूर दराने २५ टक्के मालाची एकुण किंमत रु.२,५२,११,७८३/- होईल. २५ टक्क्यापेक्षा जास्त माल खरेदी करावा लागल्यास त्याची एकुण किंमत रु.१,४३,९३,६८५/- होईल. मार्केटमधील मालाची झालेली दरवाढ पहाता, २५ टक्केपेक्षा जादा असलेली मागणी पुरवठाधारकाने नाकारल्यास, आवश्यकतेप्रमाणे माल बाजार भावाने खरेदी करावा लागेल. सर्व मालासाठी एकुण रु.३,९६,०५,४६८/- खर्च येईल. एकुण खर्चापैकी निव्वळ प्रसादलाडूसाठी रु.३,६२,३२,१८०/- खर्च येणार आहे. गेल्या तिन वर्षामध्ये प्रसादलाडूंचा खप पहाता सन २००५-०६ मध्ये ८.७३ कोटी, २००६-०७ मध्ये रु.११.२५ कोटी तर २००७-०८ (८ महिन्यात) मध्ये ९.१८ कोटी रकमेच्या लाडूची विक्रमी विक्री झालेली आहे. परिशिष्टामध्ये दर्शविलेल्या वाढीव मागणीबाबत प्रसादालय प्रमुखांशी चर्चा केलेली असून गेल्या ७ महिन्यांचे वापराचे परिमाणावरुन वाढीव मागणी तयार करणेत आलेली आहे. यामध्ये प्रत्यक्ष बदल होऊ शकतो. सदरची खरेदी ही आवश्यकतेनुसारच करणेत येईल.

तरी उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे एकुण पुरवठयाचे २५ टक्के किराणा माल मान्य दराने खरेदी करणेस, तसेच त्यापेक्षा जास्त माल खरेदी करावयाचे झाल्यास व पुरवठादाराने मुळ मंजूर दराने माल देऊ केल्यास त्यांचेकडून अन्यथा बाजार भावाने खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.३,९६,०५,४६८/- पुर्णांकित रक्कम रु.४ कोटी पर्यंतचे खर्चास मान्यता देणेस तसेच मार्च अखेरीस खरेदीचा निर्णय न झालेस एप्रिल महिन्यात वरीलप्रमाणे खरेदी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी)

**विषय नं. ४४ सन २००८-०९ वार्षिक किराणा माल खरेदीस तत्वतः मान्यता देणेबाबत.**

**निर्णय क्र.४४** सन २००८-०९ सालामध्ये प्रसादालय व कॅन्टीन विभागाचे दैनंदिन वापराकरीता खरेदी करावयाचे गहू, हरबरा इ.धान्य तसेच तांदूळ, तूप, तेल, साखर, चहा, दूध विविध प्रकारचा किराणा माल, बिस्कीटे इत्यादी मालाचा तपशीलवार तक्ता सोबत सादर केलेला आहे. सन २००८-०९ ची अंदाजे मागणी दाखवितांना गेल्या ३ वर्षाच्या प्रसादालय व कॅन्टीन विभागाकडील प्रत्यक्ष वापराची आकडेवारी दिलेली असून त्यात भक्तनिवासस्थान येथे केलेली जेवणाची व्यवस्था, श्रीसाईबाबा रुग्णालय विभागात रुग्णांना देण्यात येणारे जेवण तसेच सत्संग सप्ताह, पारायण, सोहळा, सामुदायिक विवाह आदी कार्यक्रमासाठी माल देणगी दयावी लागते. गर्दीचे कालावधीमध्ये इतर ठिकाणी आवश्यकतेनुसार स्वयंसेवी प्रसादभोजन कक्ष चालू केले जातात, नैसर्गिक आपत्तीच्या काळात संस्थानमार्फत दिली जाणारी मदत याचा समावेश धरुन २५% वाढ गृहीत धरलेली आहे. त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे-

**अ) मोंढयावरुन जाहिर लिलाव पध्दतीने खरेदी....**

| | | | |
|---|---|---|---|
| गहू - | ९००० क्विंटल | मेथी- | १.५० क्विंटल |
| हरभरा- | ६०० क्विंटल | सफेद तीळ- | २.०० क्विंटल |
| खिसमिस- | १८५ क्विंटल | | |

दरवर्षी गहू, हरभरा, मेथी व सफेद तिळ इ.ची खरेदी कृषी उत्पन्न बाजार समितीचे कोपरगाव, कोल्हार इत्यादी ठिकाणच्या मोंढयावरून मा.स्थानिक विश्वस्तांचे उपस्थितीमध्ये जाहिर लिलाव पध्दतीने करणेत येते. सन २००८-०९ करीता कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कोपरगांव, कोल्हार व राहाता इत्यादी ठिकाणच्या मोंढयावरून जाहीर लिलावाने खरेदी करावी लागेल व खरेदी केलेला माल मध्यवर्ती भांडारातील दोन्ही गोडाऊनमध्ये साठवून जागा अपुरी पडल्यास राज्य वखार महामंडळाचे कोपरगांव येथील गोदामामध्ये ठेवावा लागेल. सदरील खरेदी मार्च २००८ पासून मा.विश्वस्तांचे उपस्थितीत सुरू करणेस मान्यता देण्यात आली. गेले २ ते ३ वर्षापासून मोहरीची आवक कमी झाल्याने त्याचा निविदेमध्ये समावेश केलेला आहे.

तसेच मागील वर्षाप्रमाणे सन २००८-०९ मध्येही प्रसादालयासाठी आवश्यक खिसमिस कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पिंपळगांव बसवंत, तासगांव, सांगली पंढरपूर येथील मोंढयावरून जाहीर लिलावाने खरेदी करणेस तसेच मे.प्रवरा फळे, भाजीपाला खरेदी विक्री व प्रक्रिया शेतकरी सहकारी संस्था मर्यादित, प्रवरानगर यांचेकडील नमुने पाहून मा.विश्वस्तांचे उपस्थितीत खरेदी करणेस व अहमदनगर येथील गुगळे कोल्ड स्टोअरेज यांचे शितगृहात साठविणेस मान्यता देण्यात आली.

प्रसादालयाचे दैनंदिन वापराकरीता आवश्यक भाजीपाला कृषी उत्पन्न बाजार समिती कोपरगांव, शिरडी, सावळीविहीर, राहाता इ. ठिकाणचे मोंढयावर जाहीर लिलावाने खरेदी करणेत येत आहे. उत्सव, महोत्सव आदी गर्दीच्या काळात साईभक्तांची गर्दी वाढल्यास नाशिक येथून भाजीपाला खरेदी करणेत येतो. सन २००८-०९ मध्येही कृषी उत्पन्न समितीचे कोपरगांव, शिरडी सावळीविहीर, राहाता इत्यादी ठिकाणचे मोंढयावरून जाहिर लिलाव पध्दतीने तसेच आवश्यकतेनुसार नाशिक व इतर ठिकाणाहून भाजीपाला खरेदी करणेस मान्यता देण्यात आली.

**ब) कोटेशन मागवून खरेदी..साखर १०६०० क्विंटल (एम ३०/एस ३० ग्रेड)**

सन २००८-०९ मध्ये कॅन्टीन तसेच प्रसादलाडू बनविणेसाठी आवश्यक साखर खरेदीसाठी मागील प्रचलित पद्धतीप्रमाणे अ.नगर जिल्हयातील कोपरगांव, राहाता व श्रीरामपूर तालूक्यातील ५० कि.मी.च्या परिसरातील कारखान्याकडून कारखाना तसेच संस्थान वाहनाने वाहतूक अशा दराचे टेंडर मागवून व वाहतुक खर्चाबाबत शहानिशा करून खरेदीस अथवा एकच कोटेशन प्राप्त झाल्यास त्यांचे मान्य दराने खरेदीस मान्यता असावी. प्रसादलाडूचा खप वाढलेला असल्याने तसेच पारायण, सोहळा आदी सार्वजनिक कार्यक्रमांना साखर देणगी दयावी लागत असल्याने साखरेची वाढीव मागणी केलेली आहे.

**क) जाहिर निविदा मागवून खरेदी..**

**०१. किराणा माल, कडधान्ये व मसाल्याचे पदार्थ**

प्रसादालयाचे दैनंदिन वापरासाठी लागणारा किराणा माल, कडधान्ये व मसाले पदार्थ इत्यादी खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहिरात देउन को-या निविदांची विक्री करून ठराविक मुदतीत निविदा व मालाचे नमुने मागवून, मा.विश्वस्त समितीचे सभेमध्ये नमुने निवडून, तसेच संबंधितांना समक्ष चर्चेसाठी बोलावून त्यांनी दिलेल्या सुट दरांचा विचार करुन तसेच नमुने पाहून अंतिम निर्णय घेतला जातो. त्याप्रमाणेच सन २००८-०९ साठीचे खरेदीकामी कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

**०२. सोना मसुरी तांदुळ- ६००० क्विंटल**

सन २००६-०७ मध्ये मा.विश्वस्तांचे उपस्थितीत आंध्रप्रदेशातून तिन ते चार तांदुळ कारखान्यांमधील नमुने समक्ष पाहून सोना मसुरी तांदुळ खरेदी करणेत आलेला होता. सन २००७-०८ मध्ये निविदेमध्ये सोना मसुरी तांदुळाची मागणी करुन खरेदी करणेत आलेला होता. सन २००८-०९ मध्ये निविदेत मागणी करणेस अथवा आवश्यकता वाटलेस मा.विश्वस्तांच्या उपस्थितीत आंध्रप्रदेश किंवा इतर उत्पादक प्रदेशामधून तांदुळ खरेदी करणेस मान्यता देण्यात आली.

**०३. गावरान तूप- ५८०० क्विंटल**

प्रसादालयामध्ये प्रसाद लाडू तयार करणेकामी आवश्यक असणारे गावरान तूप सन २००७-०८ मध्ये मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार दोन टप्प्यात, निविदा मागवून खरेदी करणेत आले होते. सन २००८-०९ साठीही दि.०१.०४.०८ ते ३०.०९.०८ व ०१.१०.०८ ते ३१.०३.२००९ अशा २ सहामाहीसाठी वेगवेगळया निविदा मागवाव्यात. तसेच लूज ३५ किग्रॅ. कॅन व १५ किग्रॅ. डब्यातील ॲगमार्क तूपासाठी निविदा मागणी करून खरेदी करावी असे ठरले.

**०४. चहा- ५० क्विटंल व कॉफी-६ क्विटंल**

कॅन्टीन विभागासाठी सन २००८-०९ मध्ये ब्रुक बॉण्ड सुपर डस्ट, टाटा सीटीसी डस्ट व सपट सीटीसी डस्ट तसेच कॉफीसाठी ब्रुक बॉण्ड कॅफे गोल्डची निविदा मागणी करून खरेदीस मान्यता देण्यात आली.

**०५. बिस्कीटे - पार्ले, ब्रिटानीया व सनफिस्ट**

कॅन्टीनमध्ये दैनंदिन विक्रीकामी आवश्यक असणारे पार्ले प्रॉडक्टसचे ८८/२२० ग्रॅम, क्रॅकजॅक व मोनॅको तसेच ब्रिटानीया प्रॉडक्टसचे ८८/२५० ग्रॅम, फिफ्टी-फिफ्टी, स्नॅक्स व सनफिस्ट प्रॉडक्टस बिस्कीटे कंपनीच्या विक्रेत्यांकडून खरेदी करणेस तसेच श्री साईभक्तांचे मागणीनुसार वरील कंपन्यांचे ब्रॅण्ड पैकी काही नवीन खरेदी करावयाची झाल्यास त्यास मान्यता देण्यात आली.

**०६. पॅकेज्ड् ड्रीकींग वॉटर -०१ लिटर व ५०० एमएल पॅकींग**

शासनाच्या नियमानुसार आयएसआय स्टॅण्डर्ड मान्यता प्राप्त पॅकेज्ड् ड्रीकींग वॉटर उत्पादनाच्या निविदा मागणी करून १ लिटर व ५०० एमएल पॅकींगमध्ये ड्रीकींग वॉटर खरेदीस मान्यता देण्यात आली.

**०७. गाय दूध - दररोज अंदाजे १५०० लिटर**

कॅन्टीन विभागाचे दैनंदिन वापरासाठीचे गाय दूध ३.५ ते ३.८ फॅट व ८.५ एसएनएफ गुणवत्तेचे दूध खरेदी कामी निविदा मागणी करून खरेदीस मान्यतादेण्यात आली.

**०८. डिश वॉशिंग मशिन लिक्वीड, लिक्वीड सोप व क्लिनींग पावडर-**

प्रसादालयाकडील भांडे धुण्याच्या मशिनसाठी आवश्यक असणारे डिश वॉशिंग मशीन लिक्वीड, साफसफाईसाठी लिक्वीड सोप व क्लिनींग पावडरसाठी निविदा मागणी करून खरेदीस मान्यता देण्यात आली.

सन २००७-०८ मध्ये निविदा मागणी करतांना आर्थिक उलाढालीबाबत निकष देण्यात आलेला असल्याने योग्य क्षमतेच्या पुरवठादाराकडून निविदा सादर केल्या गेल्या होत्या. सन २००८-०९ मध्येही खालीलप्रमाणे वार्षिक उलाढालीबाबत निकष देवून त्या निकषानुसार निविदांची मागणी करण्यात यावी, असे ठरले.

| अ.नं. | तपशिल | संस्थानला करावयाची अंदाजे खरेदीची रक्कम | पुरवठाधारकाची अपेक्षित वार्षिक उलाढाल |
|---|---|---|---|
| ०१. | किराणामाल- तांदुळ,दाळी, कडधान्ये व इतर | रु.५,३०,५१,९८०/- | रु.५०,००,०००/- |
| ०२. | खादयतेल (सुर्यफूल/मका ) | रु.१,२०,८६,८८०/- | रु.१,००,००,०००/- |
| ०३. | गावरान तूप (सहामाही खरेदी) | रु.७,८४,१६,०००/- | रु.५०,००,०००/- |
| ०४. | चहा व कॉफी | रु.५,५०,०००/- | रु.१०,००,०००/- |
| ०५. | गाय दुध | रु.७१,१७,५००/- | रु.१,००,००,०००/- |
| ०६. | बिस्कीटे | रु.२२,१०,०००/- | रु.२०,००,०००/- |
| ०७. | पॉलिकप | रु.१२,६३,६००/- | रु.२०,००,०००/- |
| ०८. | प्लॅस्टीक पिशवी | रु.५०,४७,१२०/- | रु.३०,००,०००/- |
| ०९. | मिनरल वॉटर | रु.१०,७५,०००/- | रु.१०,००,०००/- |

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी)

**विषय नं. ४५ विविध राष्ट्रीयकृत बँकांना दक्षिणा पेटी मोजणीस पाचारण करणेबाबत.**

**निर्णय क्र.४५** श्रीसाईभक्तांची दिवसेंदिवस वाढत असलेल्या गर्दीमुळे दक्षिणा पेटीमध्ये जमा होणारी रोख रक्कम व इतर वस्तु यांचे प्रमाणही वाढत चालले आहे. पूर्वी दक्षिणा पेटीची मोजणी आठवड्यातून एक वेळेस केली जात होती. परंतु दक्षिणा पेटी भरण्याचे प्रमाण वाढत चालल्याने मोजणी आठवड्यातून दोन वेळेस करावी लागत आहे. दक्षिणा पेटीमध्ये भारतीय चलनातील रोख रक्कम, नाणी, परकीय चलन, सोने, चांदी व इतर वस्तु प्राप्त होतात. दक्षिणा पेटी मोजणीच्या वेळेस नेमून दिलेल्या राष्ट्रीयकृत बँकेचे प्रतिनिधी तसेच सोने चांदीचा कस काढण्यासाठी संस्थान मान्यताप्राप्त सोनार हजर राहतात. दक्षिणा पेटी मोजणीसाठी साधारणपणे संस्थानचे ११० ते १२५ कर्मचारी, प्रशासकीय अधिकारी व मा. कार्यकारी अधिकारी सो. हजर राहून प्रत्यक्ष मोजणीवर नियंत्रण ठेवतात. जमा झालेली रोख रक्कम मोजणी संपल्यानंतर हजर असलेल्या राष्ट्रीयकृत बँकेस जागेवर चलन भरुन ताब्यात दिली जात आहे. मोजणीमध्ये प्राप्त झालेले सोने, चांदी व मौल्यवान खडे हे जागेवरच प्रतवारीनुसार मुंल्यांकन करुन

सिलबंद केले जातात. एका मोजणीच्या वेळेस सरासरी १ कोटी ते १ कोटी ४० लाखांपर्यत रोख रक्कम जमा होत आहे.

श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था कायदा २००४ नुसार संस्थानची रक्कम फक्त राष्ट्रीयकृत बँकेतच ठेवण्याचे बंधन आहे. त्यानुसारच नेहमीच्या दक्षिणा पेटी मोजणीसाठी शिर्डीमधील स्टेट बँक ऑफ इंडिया व युनियन बँक ऑफ इंडिया या बँकाच्या शाखांना आलटून-पालटून पाचारण करण्यात येत आहे.

दक्षिणा पेटीत प्राप्त होणारी मोठ्या प्रमाणातील रक्कम व त्यानुसार आठवड्यातून दोनदा अगर तिनदा करावी लागणारी मोजणी यासाठी इतर राष्ट्रीयकृत बँकांनाही ह्या प्रक्रियेत सामाविष्ट करुन घेणे गरजेचे होत आहे. स्टेट बँक ऑफ इंडिया व युनियन बँक ऑफ इंडिया या दोन बँकाव्यतिरीक्त आंध्र बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, बँक ऑफ बडौदा व सेंट्रल बँक ऑफ इंडिया या बँकांनी दक्षिणा पेटी मोजणीसाठी त्यांचे प्रतिनिधी हजर राहून रोख रक्कम व नाणी स्विकारण्याची तयारी दर्शविली आहे. त्यांच्या प्रस्तावांप्रमाणे त्यांना दक्षिणा मोजणीबाबत पाचारण केल्यास रोख रक्कम व नाणी यांचे वेळच्या वेळी विभाजन होऊन संस्थानला जास्तीत जास्त राष्ट्रीयकृत बँकाकडून सेवा प्राप्त करुन घेता येतील, परंतु त्यांना दक्षिणा पेटी मोजणीबाबत व रक्कम स्विकारणेबाबत पुढील काही नियम/अटी व शर्तीनुसार पाचरण करता येईल :

(१) बँकेचे कर्मचारी दक्षिणा पेटी मोजणीसाठी बोलाविल्यास, त्यांनी मोजणीच्या दिवशी सकाळी ८.०० वाजता वेळेवर हजर राहणे आवश्यक आहे.

(२) बँकेने स्वखर्चाने त्यांच्या वाहनातून दक्षिणा पेटी मोजणी झालेली रोख रक्कम व नाणी बँकेत नेण्याची व्यवस्था करावी.

(३) दक्षिणा पेटी मोजणी झाल्यावर जमा झालेल्या एकूण रकमेचे चलन बँक अधिकाऱ्याने जागेवरच संस्थानला पोहोच, स्वाक्षरी करुन द्यावी.

(४) दक्षिणा पेटीत प्राप्त झालेली संपूर्ण रोख रक्कम व नाणी बॅकेच्या प्रतिनिर्धीनी जागेवरच काळजीपूर्वक तपासून ताब्यात घ्याव+ायाची आहे. संस्थानला चलनाव्दारे सदर रकमेची पोहोच दिल्यानंतर तद्नंतर संस्थान कोणत्याही रकमेस (नोटा अगर नाणी) जबाबदार राहणार नाही.

(५) संस्थान ते बँक वाहतुक करतांना आवश्यक असणाऱ्या सुरक्षा व्यवस्थेची जबाबदारी बँकेने घ्यावयाची आहे. वाटेत काही घटना घडल्यास त्यास संस्थान जबाबदार राहणार नाही.

उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे आंध्र बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, सेट्रल बँक ऑफ इडिया व बँक ऑफ बडौदा या बँकाच्या शाखांना संस्थानची नियमित होणारी दक्षिणा पेटी मोजणीसाठी व मोजणी संपल्यानंतर रोख रक्कम व नाणी जागेवर स्विकारुन पोहच देण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

तसेच श्रीसाईभक्तांकडून ऑन लाईन देणगी स्वीकारणेसाठी संस्थानच्या व बँकांच्या वेब साईडवर ऑन लाईन देणगी सुविधा स्टेट बँक ऑफ इंडिया, युनियन बँक ऑफ इंडिया, सेंट्रल बॅक ऑफ इंडिया, सिंडिकेट बँक, आंध्र बँक, बँक ऑफ बडौदा, बँक ऑफ महाराष्ट्र इ. बॅकांकडून त्यांच्या वेबसाईटवर व संस्थानच्या वेबसाईटवर देणगी स्वीकारणेची सुविधा उपलब्ध करावी. त्यांना आवश्यकतेप्रमाणे संस्थानच्या नावे त्यांच्या बँकेत ऑन लाईन देणगी जमा होण्यासाठी स्वतंत्र बचत खाते उघडण्यात यावे. तसेच सर्व प्रकारच्या क्रेडीट व डेबिट कार्डस्‌वर संस्थानच्या वेबसाईटवर देणगी स्वीकारणेसाठी आवश्यकतेप्रमाणे सुरक्षित व मानांकित संस्था अगर बँकांचा पेमेंट गेट वे घेऊन, त्याद्वारे जमा झालेली देणगी संस्थाच्या सुविधेप्रमाणे राष्ट्रीयकृत बँकेत स्वतंत्र खाते उघडून त्यावर दैनंदिन जमा करावी,असे ठरले. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं. ४६** **देणगीच्या माध्यमातून निवासस्थान इमारती उभारणे बाबत**

**निर्णय क्र.४६** श्रीक्षेत्र शिर्डी येथे श्रीसाईंच्या दर्शनासाठी देश-विदेशातून येणाऱ्या साईभक्तांची दिवसेंदिवस गर्दी वाढतच आहे. सध्या प्रतिदिनी २५-५० हजार साईभक्त श्री क्षेत्र शिर्डी येथे भेट देऊन, श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेत असतात. उत्सवकाळात तसेच उन्हाळी सुट्टया, दिपावली व नाताळच्या सुट्टया, गुरुवार व रविवार तसेच या दिवसांना जोडून येणाऱ्या सरकारी सुट्टया इत्यादी काळात श्री क्षेत्र शिर्डीस भेट देणाऱ्या साईभक्तांची हीच संख्या सुमोर ३ ते ४ लाखांपर्यन्त जाते. विश्वस्तव्यवस्थेकडून साईभक्तांच्या सोयीसाठी सर्व मुलभूत सेवा अहोरात्र उपलब्ध करविण्यात आलेल्या आहेत. या सेवेत अत्यंत महत्वाच्या अशा निवासव्यवस्थेसाठी विविध प्रकारची, अद्ययावत सोयींनीयुक्त परिपूर्ण निवासस्थाने, सर्व स्तरातील साईभक्तांना त्यांच्या आर्थिक क्षमतेनुसार उपलब्ध आहेत. तसेच अतिमहत्वाच्या व्यक्तींसाठी वातानुकुलीत कक्ष तयार करण्यात आलेले आहेत. सध्या संस्थानकडे विविध प्रकारच्या एकुण **८१० खोल्या / हॉल्स व ४२५ लॉकर्स** उपलब्ध आहेत. या निवासस्थानांतून साईभक्तांना एका वेळेस जास्तीत जास्त ०२ दिवस राहाण्यासाठी परवानगी दिली जाते. सर्व साईभक्तांची व्यवस्था व्हावी, सर्वांना संस्थानचे निवासस्थान उपलब्ध व्हावे हा यामागील हेतू आहे.

तसेच भक्तांना आवश्यकतेप्रमाणे अल्प दरात जादा गाद्या, चादरी उपलब्ध करुन दिल्या जातात. या सर्व निवासस्थानांमधून २४ तास पाणी व विद्युत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे

तथापि, गेल्या दोन-तीन वर्षात उत्सवाचे काळात तसेच सलग दिर्घ मुदतीच्या सुट्टयांच्या काळात श्री क्षेत्र शिर्डी येथे साईभक्तांची अपेक्षापेक्षा जास्त गर्दी झाली. ऐनवेळेस साईभक्तांच्या निवासाची / निवाऱ्याची व्यवस्था करतांना प्रशासनाची अत्यंत धावपळ उडाली. त्यामुळे वेळोवेळी विविध ठिकाणी मंडपे, तंबू उभारुन साईभक्तांच्या निवासाची, भोजनाची व्यवस्था करण्यात आली व यावर प्रासंगिक खर्च ही मोठया प्रमाणावर करण्यात आला.

उपरोक्त विवेचनास अनुसरुन, मौजे निमगांव कोऱ्हाळे शिवारातील संस्थानने भूंसपादनाच्या माध्यमातून ताब्यात घेतलेल्या गट नंबर १७२ मधील जमिनीमध्ये सध्या शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांच्या देणगीतून उभारण्यात येणाऱ्या साईआश्रम प्रकल्पापैकी ०६ इमारती उभारण्यात येत आहे. तसेच या गट नंबर १७२ मधील उर्वरित जमिनीमध्ये संस्थान मार्फत ०६ इमारती उभारण्याच्या प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीने नुकतीच तत्वतः मान्यता दिलेली आहे.

**(अ) संस्थान मालकीच्या जमिनीमध्ये देणगीच्या माध्यमातून निवासस्थान उभारणे :**

साईभक्तांना निवारा व भोजन या मूलभूत गरजा पुरविण्यासाठी देणगीदार साईभक्त व्यक्ती / सार्वजनिक व धर्मादाय संस्था / खाजगी संस्था यांचेकडून प्राप्त होणाऱ्या देणगीच्या माध्यमातून संस्थान मालकीच्या जमिनीमध्ये / जागेमध्ये सर्वसोयींनी युक्त असे निवासस्थाने उभारण्याचे प्रयोजन आहे. याबाबतचा सविस्तर प्रस्ताव-वजा-तपशील खाली नमूद केला आहे.

०१. संस्थानच्या वास्तुविशारदांनी तयार केलेल्या बांधकाम नकाशानुरुप निवासस्थान इमारतींचा बांधकामाचा अंदाजित खर्च सर्वप्रथम निश्चित केला जाईल. असा अंदाजित बांधकाम खर्च निश्चित झालेनंतर अशा इमारतीच्या बांधकामासाठी इच्छुक असणाऱ्या साईभक्त व्यक्ती / संस्था यांच्याकरीता वृतपत्रातून व्यापक प्रसिध्दी दिली जाईल.

०२. पूर्ण इमारतीच्या बांधकामासाठी देणगी देण्यास इच्छुक असलेल्या व्यक्ती / संस्था यांचेकडून बांधकामाच्या मोबदल्यात अपेक्षित असलेल्या सवलतींच्या सविस्तर प्रस्तावासह त्यांची वैयक्तिक, आर्थिक, सामाजिक माहिती ही मागविण्यात येईल.

०३. संबंधित व्यक्ती / संस्थांकडून असा प्रस्ताव प्राप्त झालेनंतर मा.व्यवस्थापन समितीच्या विचारार्थ सदरील प्रस्ताव सादर करण्यात येईल. मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार अशा प्रस्तावांबाबत कार्यवाही केली जाईल.

तथापि, संपूर्ण इमारतीच्या बांधकामासाठी देणगी देण्यास ज्या इच्छुक व्यक्ती / संस्था असतील त्यांना साधारणतः संस्थानच्या खालील अटी-शर्ती कळविल्या जातील :

०१. जमिनीची व इमारतीची मालकी पूर्णतः श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीची राहिल.

०२. एका इमारतीत एकूण ज्या निवासी खोल्या उपलब्ध होतील, त्यापैकी साधारणतः ३० ते ४० टक्के निवासी खोल्या संबंधित व्यक्ती / संस्था यांचे नांवाने राखीव ठेवल्या जातील. (उदा. एका इमारतीत जर १२० खोल्या उपलब्ध होत असतील तर त्यापैकी ३६ ते ४८ खोल्या राखीव ठेवल्या जातील.)

०३. राखीव ठेवण्यात येणाऱ्या खोल्या या ठराविक व निश्चित राखून न ठेवता, उपलब्धतेनुसार राखून ठेवल्या जातील.

०४. संबंधित व्यक्ती / संस्थेने सदरील खोल्या या त्याचेशी संबंधित असणाऱ्या व्यक्ती / प्रतिनिधी यांनाच द्याव्यात.

०५. खोल्या राखून ठेवण्यासाठी संबंधित व्यक्ती / संस्थेने संस्थानकडे साधारणतः ०७ दिवस आधी आरक्षणाची सूचना पाठविली पाहिजे.

०६. संबंधित व्यक्ती / संस्थेस सदरील खोल्या या उत्सव व दिर्घ मुदतीच्या सुट्टयांचा कालावधी वगळतां राखून ठेवता येतील.

०७. संबंधित व्यक्ती / संस्थेकडून ज्या व्यक्ती अथवा प्रतिनिधी या निवासी खोल्यांचा उपभोग घेतील त्यांचेकडून नाममात्र स्वच्छता आकार वसूल केला जाईल. (साधारणतः प्रचलित दराच्या ५० टक्के दर आकारणेत येईल.)

०८. संबंधित व्यक्ती / संस्थेस ही सुविधा साधारणतः ३० ते ४० वर्ष उपलब्ध होईल. त्यानंतर परिस्थितीनुरुप याबाबतचा निर्णय घेण्यास संस्थानला मुभा राहिल / मोकळीक राहिल.

०९. संबंधित व्यक्ती / संस्था यांना राखून ठेवण्यात आलेल्या खोल्यांचा कोणत्याही पध्दतीने व्यापारी अथवा आर्थिक तत्वावर वापर करता येणार नाही.

१०. या इमारतींसाठी विद्युत व पाणीपुरवठा संस्थानमार्फत उपलब्धतेनुसार करण्यात येईल. यासाठी संबंधित व्यक्ती / संस्था यांचेकडून इतर कुठलाही आकार / शुल्क आकारणेत येणार नाही.

जमिनीचे / इमारतीचे सर्व प्रकारचे सरकारी-निमसरकारी कर संस्थान मार्फत भरण्यात येतील. या इमारतींची सर्व प्रकारची देखभाल दुरुस्ती संस्थान खर्चाने करण्यात येईल.

उपरोक्त प्रमाणे अटी-शर्ती लागू करुन साईभक्त देणगीदार व्यक्ती / संस्थांकडून संपूर्ण निवासस्थान इमारत उभारणेसाठी निधी उपलब्ध करवून घेता येईल. या अटी-शर्तीमध्ये दोन्ही संस्थांच्या विचार-विनिमयातून तसेच मा.व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने, कायदेशीर बाबी तपासून वेळोवेळी प्रसंगानुरुप बदल करता येतील, असे मत आहे.

**(ब) संस्थानमार्फत उभारणेत येणाऱ्या निवासस्थान इमारतीतून देणगी माध्यमातून खोल्या बांधणे.**

मौजे निमगांव कोऱ्हाळे मधील संस्थान मालकीच्या गट नंबर १७२ मधील जमिनीवर ०६ निवासस्थान इमारती उभारण्याचे प्रयोजन आहे. या इमारतीतील खोल्या जे देणगीदार साईभक्त एक रक्कमी देणगी तयार असतील, अशा साईभक्तांसाठी राखून ठेवता येतील. त्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव-वजा-तपशील खालील प्रमाणे :

०१. जमिनीची व इमारतीची मालकी पूर्णतः श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीची राहिल.

०२. संस्थानच्या वास्तुविशारदांनी तयार केलेल्या बांधकाम नकाशानुरुप निवासस्थान इमारतींचा बांधकामाचा अंदाजित खर्च सर्वप्रथम निश्चित केला जाईल. असा अंदाजित बांधकाम खर्च निश्चित झालेनंतर अशा इमारतीतील एक खोलीसाठी येणारा अंदाजित खर्च निश्चित केला जाईल. साधारणतः आजचे बाजारभावाने हा खर्च रक्कम रुपये ४ लाख मात्र पर्यन्त जाईल, असा अंदाज आहे.

०३. जे साईभक्त एक रक्कमी रक्कम रुपये ४ लाख मात्र देणगी खोली बांधकामासाठी देण्यास तयार असतील अशा भक्तांसाठी त्या इमारतीतील एक खोली राखून ठेवता येईल.

०४. राखून ठेवण्यात येणारी खोली ही ठराविक व निश्चित राखून न ठेवता, उपलब्धतेनुसार राखून ठेवली जाईल.

०५. संबंधित भक्ताने ही खोली त्याने स्वतः अथवा त्याचे कुंटूंबातील व्यक्ती / सदस्य अथवा त्याचे वारसदारांसाठीच वापरली पाहिजे.

०६. खोली राखून ठेवण्यासाठी संबंधित व्यक्ती / संस्थेने संस्थानकडे साधारणतः ०७ दिवस आधी आरक्षणाची सूचना पाठविली पाहिजे.

०७. अशा भक्तांसाठी अथवा त्याच्या अधिकृत प्रतिनिधीसाठी वर्षातून साधारणतः २४ दिवस राखून ठेवता येईल. यामध्ये तिन्ही उत्सवाचे काळात साधारणतः प्रत्येकी ०२ दिवस राखून ठेवता येईल. मात्र उत्सवाचे काळात खोली राखून ठेवावयाची असल्यास त्याची सूचना संबंधित भक्तांना लेखी पत्राव्दारे साधारणतः १५ दिवस आधी पाठविणे सक्तीचे राहिल.

०८. देणगीदार साईभक्तांस वर्षातील ज्या २४ दिवसांसाठी खोली राखून ठेवावयाची आहे, त्यामध्ये एकाच वेळेस भक्त जास्तीत जास्त ०७ दिवस खोली राखून ठेवू शकेल. तथापि कालावधी उत्सव व सुट्टयांचा कालावधी सोडून असावा.

०९. संबंधित व्यक्ती / ज्या व्यक्ती अथवा प्रतिनिधी या निवासी खोल्यांचा उपभोग घेतील त्यांचेकडून नाममात्र स्वच्छता आकार वसूल केला जाईल. (साधारणतः प्रचलित दराच्या ५० टक्के दर आकारणेत येईल.)

१०. संबंधित भक्तास ही सुविधा साधारणतः ३० ते ४० वर्ष उपलब्ध होईल. त्यानंतर परिस्थितीनुरुप याबाबतचा निर्णय घेण्यास संस्थानला मुभा राहिल / मोकळीक राहिल.

११. संबंधित व्यक्ती / संस्था यांना राखून ठेवण्यात आलेल्या खोल्यांचा कोणत्याही पध्दतीने व्यापारी अथवा आर्थिक तत्वावर वापर करता येणार नाही.

१२. या इमारतींसाठी विद्युत व पाणीपुरवठा संस्थानमार्फत उपलब्धतेनुसार करण्यात येईल. यासाठी संबंधित व्यक्ती / संस्था यांचेकडून इतर कुठलाही आकार / शुल्क आकारणेत येणार नाही. जमिनीचे / इमारतीचे सर्व प्रकारचे सरकारी-निमसरकारी कर संस्थान मार्फत भरण्यात येतील. या इमारतींची सर्व प्रकारची देखभाल दुरुस्ती संस्थान खर्चाने करण्यात येईल.

१३. देणगीदार भक्त ज्यावेळेस एकरकमी देणगी जमा करील त्याचवेळेस त्याचेकडून लेखाशाखेमार्फत एक करारपत्र करुन घेण्यात येईल. यामध्ये त्या भक्तांचे कुंटूंबातील व्यक्ती, वारसदार यांची विस्तृत माहिती भरुन घेण्यात येईल, तसेच कायदेशीर बाबींचा समावेश करण्यात येईल.

उपरोक्त प्रमाणे अटी-शर्ती लागू करुन साईभक्त देणगीदार व्यक्तीकडून निवासस्थान इमारतीतील एक खोली बांधणेसाठी एकरकमी निधी उपलब्ध करवून घेता येईल. या अटी-शर्तीमध्ये मा.व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने, कायदेशीर बाबी तपासून वेळोवेळी प्रसंगानुरुप बदल करता येतील, असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, देणगीच्या माध्यमातून निवासस्थाने उभारणेचे प्रस्तावात नमूद केलेल्या बार्बीबाबत मा.सदस्य श्री.पांडूरंग गमाजी अभंग,श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे व डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर यांचे उपसमितीने सविस्तर चर्चा तथा विचारविनीमय करुन याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करावा,असें ठरलें. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं. ४७ मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नंबर ११६/२,११६/३ व ११६/५ मधील जमीन खरेदीबाबत**

**निर्णय क्र.४७ (०१)** मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नंबर १७२ मध्ये शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई चे देणगीदार साईभक्त श्री.के.व्ही.रमणी यांचा साईभक्तांच्या सेवा-सुविधेसाठी साईआश्रम हा निवासस्थान प्रकल्प उभारण्याचे नियोजित आहे.

त्यासाठी रेखांकन करुन मा.सहाय्यक संचालक, नगर रचना, अहमदनगर यांच्या कार्यालयात सादर केलेले आहे. त्यामध्ये प्रस्तुत गट नंबर १७२ जाणारा रस्ता दाखविणे अपेक्षित आहे. गट नंबर १७२ च्या दक्षिणेस गट नंबर १७४ हा महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाचा आहे. त्यातून गट नंबर १७२ ला जाणारा वहिवाटीचा रस्ता आहे. सदर रस्ता दाखविणेसाठी गट नंबर १७२ व गट नंबर १७४ ची संयुक्त मोजणी होऊन सरकारी मोजणी खात्याने अस्तित्वात असलेला रस्ता मोजणी नकाशामध्ये दाखविणे आवश्यक आहे. यासाठी मोजणी करणेकामी करावयाच्या अर्जावर मा.स्थावर व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, लक्ष्मीवाडी मळा हे स्वाक्षरी करावयास तयार नाहीत. त्यामुळे मोजणी होऊन नकाशा मिळणे शक्य नाही.

गट नंबर १७२ च्या उत्तर दिशेस, लगत गट नंबर ११६ आहे. ते क्षेत्र विकत घेतल्यास गट नंबर १७२ मध्ये विनासायास जाता येते.

श्री. काशिनाथ गोविंद फटांगरे यांनी त्यांच्यासाठी व इतर दोन खातेदारांची खाली नमुद केलेली जमीन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीने विकत घ्यावी, म्हणून अर्ज दिलेला आहे.

| अ.नं. | खातेदाराचे नांव | गट नंबर | क्षेत्र |
|---|---|---|---|
| ०१ | श्री.काशिनाथ गोविंद फटांगरे | ११६/३ | ०० हे ०७ आर |
| ०२ | श्री.आशिष सुरेश दौड | ११६/५ | ०० हे ०७ आर |
| ०३ | श्री.अशिष सुरेश दौड<br>श्री.काशिनाथ गोविंद फटांगरे<br>श्री.दिपक गंगाधर साबदे | ११६/२ | ०० हे ०६ आर |
| | | **एकूण** | **०० हे २० आर** |

अर्जदाराने प्रती आर रुपये ३ लाख मात्र भाव देणेत यावा, अशी विनंती केलेली आहे. तसेच जमिनीच्या किंमतीबाबत वाटाघाटी करावयास तयारी दर्शविलेली आहे.

रेडिरेकनरप्रमाणे मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील बिनशेती जागेचा दर प्रती चौरस मीटर रक्कम रुपये २६०/- मात्र आहे, म्हणजेच प्रती आर रक्कम रुपये २६,०००/- (अक्षरी रुपये सव्वीस हजार मात्र) येत आहे. प्रश्नाधिन जमीन ही गुंठेवारीमध्ये बिनशेती झालेली आहे.

अर्जदार यांनी त्यांच्या नांवापुढे दर्शविलेल्या जमिनी दिनांक २५ जून, २००७ व दिनांक २६ जून, २००७ रोजी पुर्वीच्या खातेदारांकडून खरेदी केलेल्या आहेत. याबाबत कामगार तलाठी यांचेकडून फेरफार आणणेत आलेला आहे, त्याचा तपशील खालीलप्रमाणे :

| अ.नं. | पुर्वीच्या खातेदाराचे नांव | सध्याचे खातेदाराचे नांव | सर्व्हे नंबर ( क्षेत्र ) | क्षेत्र | खरेदी दिनांक | खरेदीची किंमत रुपये | खरेदीखताप्रमाणे प्रत्येक आरला येणारी किंमत रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | महेश दौलत गोसावी | श्री.आशिष सुरेश दौड | ११६/५ | ७०० चौमी (७ आर) | २५/०६/२००७ | २,५०,०००/- | ३५,७१४/- |
| ०२ | आशाबाई बाळासाहेब साठे | श्री.काशिनाथ गोविंद फटांगरे | ११६/६ | ७०० चौमी (७ आर) | २६/०६/२००७ | २,५०,०००/- | ३५,७१४/- |
| ०३ | नानासाो. विश्वनाथ कदम | ०१. काशिनाथ गोविंद फटांगरे<br>०२. आशिष सुरेश दौड<br>०३.दिपक गंगाधर साबदे | ११६/२ | ६०० चौमी (६ आर) | २६/०६/२००७ | २,०५,०००/- | ३४,१६७/- |

म्हणजेच तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे, प्रत्येक आरला सर्वसाधारणपणे रक्कम रुपये ३६,०००/- मात्र दर येत आहे.

अर्जदाराने अर्जात गट नंबर ११६/२, गट नंबर ११६/३ व गट नंबर ११६/५ असे नमुद केलेले आहे. सदरचे क्षेत्र / गट नंबर सलग नसल्याने संस्थानच्या मोजणीदारामार्फत प्रत्यक्ष जागा मोजून खात्री करुन घेण्यात येत आहे.

वरील विवेचनावरुन खालील बाबी दिसून येतात :

०१. अर्जदाराने अर्जात नमुद केलेली गट नंबर ११६/२, ११६/३ व ११६/५ क्षेत्र ०० हेक्टर २० आर जमीन संस्थान मालकीचे गट नंबर १७२ मध्ये जाणेसाठी आवश्यक आहे.

०२. अर्जदार यांनी रक्कम रुपये ३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लाख मात्र) प्रती आर याप्रमाणे जमिनीचे किंमतीची मागणी केलेली आहे.

०३. रेडिरेकनर प्रमाणे मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील बिनशेती जमिनीचा दर प्रति आर रुपये २६,०००/-(अक्षरी रुपये सव्वीस हजार मात्र ) येत आहे.

०४. अर्जदार हे जमिनीच्या किंमतीबाबत वाटाघाटी करावयास तयार आहेत.

उपरोक्त प्रमाणे, मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नंबर ११६/२, ११६/३ व ११६/५ क्षेत्र ०० हे २० आर खरेदी घेणेबाबत तत्वतः मान्यता मिळाल्यास, संबंधित अर्जदारांना मा. व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे चर्चा-तथा-वाटाघाटीस बोलविता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,शिर्डी साई ट्रस्ट,चेन्नई यांचे आर्थिक देणगीतून उभारण्यात येणाऱ्या श्रीसाई आश्रम प्रकल्पाचा भाग ०२ गट नं.१७२ मधील जमीनीत उभारणेत येत आहे. या ठिकाणी सुलभ व सोयीस्कररित्या जाणे-येणेसाठी अधिकृत रस्ता नाही. रस्ता असल्याशिवाय साईआश्रम प्रकल्पाचे बांधकामास परवानगी मिळणेबाबत अडचण येईल त्यामूळे सदरहू प्रकल्पाचे बांधकाम लवकर सुरु करता येणार नाही गट नं. १७२ चे दक्षिणेस शेतीमहामंडळाची जमीन आहे. शेतीमहामंडळाचे जमीनीबाबत सर्वोच्य न्यायालयात दावा सुरु असल्याने शेती महामंडळाचे जमीनीत तुर्त अधिकृत रस्ता मिळणे शक्य नाही गट नं. १७२ चे उत्तरेकडील गट नं. ११६ पैकी मधील जागेतून रस्ता खरेदी करणे आवश्यक आहे. करीता गट नं.११६ पैकी मधील सदरहू जमीनीची अत्यंत आवश्यक आहे. त्याकामी सदरहू क्षेत्रातील खातेदार श्री.दौंड,श्री.फटांगरे आणि श्री.साबदे यांना आजचे व्यवस्थापन समितीचे सभेपुढे चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. तथापि सदरहू खातेदारांनी श्री.रोहिदास गुंजाळ यांना उपरोक्त जमीनीची विसार पावती करुन दिलेली आहे. त्यामुळे श्री.गुंजाळ हे आजचे सभेपुढे हजर होते. त्यांचेशी जमीनीचे दराबाबत चर्चा करण्यात आली. श्री.गुंजाळ यांनी अतिमतः रुपये २.७० लाख प्रती आर अशा किंमतीस जमीन देऊ, असे सांगितले. त्यावर साधक बाधक चर्चा होऊन,श्री.गुंजाळ यांनी दिलेल्या प्रस्तावानुसार रुपये २.७० लाख प्रती आर या दराने जमीन खरेदीस मान्यता देण्यात आली. तत्पूर्वी श्री.गुंजाळ यांना विसारपावती रद्द करुन थेट संबंधित खातेदारांकडून जमीन खरेदी करण्यात येईल असे स्पष्ट करण्यात आले. त्यास श्री.गुंजाळ यांनी सहमती दर्शविली. त्यानुसार मौजे निमगाव कोऱ्हाळे येथील गट ११६/२/११६/क व ११६/५ मधील एकंदर २० आर जमीन प्रती आर रुपये २.७० लाख मात्र या दराने खरेदी करण्यात यावी. याकामी सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता करण्यात यावी. खरेदीसाठी आवश्यक असणारे मुद्रांक व नोंदणी शुल्क व इतर योग्य त्या अनुषंगिक सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. खरेदी खतात १०% रक्कम राखीव ठेवून सरकारी मोजणी झालेनंतर ही रक्कम आदा करण्यात यावी,असें ठरलें.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**(०२)** मौजे शिर्डी, तालुका राहाता येथील रहिवासी श्री. वेणूनाथ सुर्यभान गोंदकर व श्री. जगन्नाथ सुर्यभान गोंदकर यांनी दिनांक ०१ जानेवारी, २००७ रोजी मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर १४७ पैकी मधील एक एकर जमीन देणगी म्हणून स्वीकारणेबाबत प्रस्ताव-वजा-विनंती अर्ज सादर केलेला आहे.

**(अ)** श्री.वेणूनाथ सुर्यभान गोंदकर व श्री.जगन्नाथ सुर्यभान गोंदकर यांनी त्यांचे अर्जात खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे :

" मौजे शिर्डी येथे आपले संस्थानचे धर्मशाळेच्या जमिनीलगत (२०० रुम्सजवळ) सर्व्हे नंबर १४७ पैकी मध्ये आमचे मालकीची खालीलप्रमाणे जमीन आहे :

| अ.नं. | खातेदाराचे नांव | सर्व्हे नंबर | क्षेत्र<br>हेक्टर-आर-चौमी |
|---|---|---|---|
| ०१ | श्री.वेणूनाथ सुर्यभान गोंदकर | १४७/१ | ००-८९-००<br>००-०१-०० पोटखराबा<br>**००-९०-००** |
| ०२ | श्री.वेणूनाथ सुर्यभान गोंदकर | १४७/२ | ००-२८-००<br>००-०१-०० पोटखराबा<br>**००-२९-००** |
| ०१ | श्री.जगन्नाथ सुर्यभान गोंदकर | १४७/३ | ००-४१-००<br>००-०१-०० पोटखराबा<br>**००-४२-००** |
| | | **एकुण** | **०१-६१-००** |

उपरोक्त जमिनीपैकी, शिर्डी विकास योजनेतील ४५ मीटर रुंदीचे रस्त्याचे आरक्षण वगळून, उर्वरित जमिनीपैकी साधारणतः ०१ एकर जमीन आम्ही श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना विनामोबदला देणगी देणेस तयार आहोत.

त्याचे बदल्यात, आमचे उपरोक्त उर्वरित जमिनीमध्ये जाणेकामी, आपले धर्मशाळेच्या जमिनीतून जाणेस अत्यंत जवळचा व सोयीचा रस्ता उपलब्ध आहे. सध्या हा रस्ता आपले संस्थानमार्फत विकसित करण्यांत आलेला आहे. याच विकसीत झालेल्या रस्त्याने आमचे उपरोक्त जमिनीमध्ये जाणे-येणेकामी / वहिवाटीस आम्हांस लेखी परवानगी मिळावी. आपले मालकीचे जमिनीतून, आमचे जमिनीत मध्ये जाणे-येणेकामी रस्ता मिळाल्यासच आम्ही उपरोक्त सर्व्हे नंबर १४७ पैकीमधील साधारणतः एक एकर जमीन देणगी देणेस तयार आहोत.

आमची उपरोक्त शर्त मान्य झालेस, आपल्या संस्थानास जी साधारणतः एक एकर जमीन देणगी द्यावयाची आहे, ती आपले जमिनीचे लगत कोठे व कशा पध्दतीने द्यावयाची याचा चर्चेअंती निर्णय घेता येईल व हा निर्णय आम्हांस मान्य राहील. ”

श्री. गोंदकर बंधू यांनी अर्जाचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन लवकरात लवकर निर्णय घ्यावा, असे कळविलेले आहे.

**(ब)** अर्जदार श्री. गोंदकर बंधू यांची संस्थानच्या सर्व्हे नंबर १४८ पैकी मधील जमिनीच्या, धर्मशाळेलगत (२०० रुम्स) पश्चिमेस जमीन आहे. संस्थानचे कंत्राटी मोजणीदार यांनी उपरोक्त जमिनीचा स्थलदर्शक नकाशा तयार केला असून, सर्व्हे नंबर १४७ मधून मंजूर शिर्डी विकास योजनेतील ४५ मीटर रुंदीचा रस्ता जात असल्याचे दर्शविलेले आहे.

अर्जदार श्री.गोंदकर बंधू यांनी आपल्या अर्जात, रस्त्याचे आरक्षण वगळून, त्यांचे उर्वरित जमिनीपैकी ०१ एकर जमीन संस्थानला विनामोबदला देणगी देणेची तयारी दर्शविलेली आहे. परंतु त्यांनी त्यांचे अर्जात त्यांचे उर्वरित जमिनीमध्ये जाणे-येणेकामी, संस्थान मालकीच्या जमिनीत, धर्मशाळा विभागाकडे जाणेसाठी विकसित करण्यात आलेल्या रस्त्याने वहिवाट द्यावी, अशी विनंती-वजा-अट घातली आहे.

**(क)** संस्थानच्या मालकीच्या सर्व्हे नंबर १४८ मध्ये आजमितीस दवाखाना व भक्तांच्या सोयीसाठी धर्मशाळा असून, सध्या व्दारावती या सर्व सोयींनी सुसज्ज असलेल्या २४० खोल्यांच्या निवासस्थान इमारतीचे बांधकाम पूर्णत्वास येत आहे. सदरील निवासस्थानात उतरणाऱ्या भक्तांच्या वाहनांसाठी वाहने उभी करणेस पुरेशी जागा उपलब्ध नाही.

सध्या सर्व्हे नंबर १४८ मध्ये १२ मीटर रुंदीचा पुर्व पश्चिम रस्ता आहे. तसेच दक्षिणोत्तर १८ मीटर रुंदीचा डि.पी. रस्ता जात आहे.

अर्जदार यांना या रस्त्यावरुन वहिवाट दिल्यास, सदरचा रस्ता सार्वजनिक होऊन, त्यावरील वर्दळ वाढणार आहे.

**(ड)** अर्जदार यांना रस्ता देणे व त्याच्या बदल्यात एक एकर जागा देणगी घेणे हा व्यवहार नोंदणी पध्दतीने होणे आवश्यक आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ च्या कलम १७ (३) अन्वये सदरचा व्यवहार करण्यासाठी शासनाची मंजूर घेणे आवश्यक राहिल.

**(इ)** अर्जदार यांनी अर्जासोबत, सर्व्हे नंबर १४७/१, १४७/२ व १४७/३ चे ७/१२ उतारे सादर केलेले आहेत. त्यांचे अवलोकन केले असता, खालील संस्थांचे इतर हक्कात बोजे असल्याचे दिसून येते

०१. शिर्डी विविध कार्यकारी सहकारी सोसायटी, शिर्डी.

०२. साई नागरी सहकारी पतसंस्था, शिर्डी.

०३. श्री गुरुदेवदत्त ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था, शिर्डी.

०४. आंध्रा बँक, शिर्डी

संस्थानला जमीन देणगी म्हणून देतांना, उपरोक्त संस्थांचा बोजा फेडणे आवश्यक राहिल अथवा या संस्थांचे ना हरकत दाखले अर्जदारांनी सादर करणे आवश्यक राहिल, तसेच याबाबत कायदेशीर अभिप्राय ही घेता येईल.

**(ई)** अर्जदाराचे जमिनीचा समावेश शिर्डी विकास आराखडयात शेतजमीन म्हणून आहे. आजमितीस सदरची जमिनीची बिनशेती होणार नाही. याकरीता शिर्डी नगरपंचायतीमार्फत विकास आराखडयात फेरबदल प्रस्ताव शासनास सादर करुन बदल करता येईल. असा प्रस्ताव मान्य झालेनंतर बिगरशेती करुन इमारतीचे बांधकाम करता येईल. दरम्यान तोपर्यन्त सदर जागेचा वापर पार्किंगसाठी करता येईल.

**(फ)** अर्जदारास रस्ता दिल्यानंतर अर्जदार एक एकर जमीन देणगी देणार आहे, ती जमीन कोठे व कशा पध्दतीने द्यावयाची याबाबत चर्चा करुन करुन निर्णय घेण्यास अर्जदार यांची संमती आहे.

तरी अर्जदार श्री.वेणूनाथ सुर्यभान गोंदकर व श्री.जगन्नाथ सुर्यभान गोंदकर यांनी संस्थानचे मालकीचे सर्व्हे नंबर १४८ (धर्मशाळा) या जागेतून त्यांचे सर्व्हे नंबर १४७ पैकी मधील जमिनीत जाण्यासाठी रस्त्याची केलेली मागणी व त्याबदल्यात त्यांची सर्व्हे नंबर १४७/१, १४७/२ व १४७/३ मधील एक एकर जागा देणगी म्हणून स्वीकारणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, याकामी विश्वस्त मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग यांनी समक्ष पहाणी करुन याबाबत सविस्तर अहवाल व्यवस्थापन समितीस सादर करावा, असें ठरलें.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं. ४८** **आरक्षण क्रमांक ३७ व ३८ च्या प्रयोजनामध्ये अंशतः बदल करणेकामी शिर्डी नगरपंचायतीस प्रस्ताव पाठविणेबाबत.**

**निर्णय क्र.४८** **(अ)** शिर्डी विकास आराखडयात खालीलप्रमाणे आरक्षण व त्याचे प्रयोजन दर्शविण्यांत आलेले आहे :

| अ.नं. | आरक्षण क्रमांक | तपशील | सर्व्हे नंबर | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| ०१ | ३७ | प्राथमिक शाळा व क्रिडांगण | १२४ पै (सिटीएस ९५१ पै) | ०० हे ७८ आर ०० चौमी |
| ०२ | ३८ | क्रिडांगण | १२४ पै (सिटीएस ९५१ पै) | ०१ हे ८९ आर ०० चौमी |

आपणांकडील दिनांक ११ ऑगष्ट, २००६ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत निर्णय क्रमांक ६१ खालीलप्रमाणे झालेला आहे :

" ठराव क्रमांक ६१ : चर्चेअंती असे ठरले की, शिर्डी विकास योजनेतील आरक्षण क्रमांक २५, २९, ३८ (क्रिडांगण) व ३७ (प्राथमिक शाळा व क्रिडांगण) यासाठी आरक्षित आहेत. सदर आरक्षणांची विकसन यंत्रणा शिर्डी नगरपंचायत, शिर्डी आहे. श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांनी नगरपंचायतीने सदर आरक्षणे आहे त्याच कारणासाठी विकसित करणेसाठी भूसंपादन व विकास कामाचा खर्च करणेस तयार असलेबाबत नगरपंचायतीस ठराव दिल्यास विकसन यंत्रणा श्री साईबाबा संस्थान,शिर्डी यांची नेमणूक करणेसाठी प्रस्ताव शासनास सादर करणेत यावा. ही आरक्षणे मुळ जमीन मालकांना योग्य मोबदला देऊन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना विकसित करणेसाठी देणेस व विकसन यंत्रणा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना करणेसाठी त्यांचेकडील पत्र व ठराव प्राप्त करुन घेऊन पुढील कार्यवाही महाराष्ट्र नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये करणेस या ठरावान्वये सर्वानुमते मंजूरी देण्यात येत आहे. "

आरक्षण क्रमांक ३८ मध्ये ०१ हेक्टर ८९ आर क्षेत्र क्रिडांगणासाठी राखीव आहे. सदर क्षेत्रापैकी खाली नमुद केलेल्या खातेदारांच्या जमिनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीने खरेदी केलेल्या आहेत :

| अ.नं. | खातेदाराचे नांव | सर्व्हे नंबर | क्षेत्र |
|---|---|---|---|
| ०१ | श्री.संजय रामराव शेळके | १२४/११ | ०० हे ६० आर ०० चौमी |
| ०२ | श्री.विलास रंगनाथ शेळके | १२४/१२ | ०० हे ६० आर ०० चौमी |
| | | **एकूण** | **०१ हे २० आर ०० चौमी** |

उपरोक्त खातेदाराच्या जमिनी खरेदीबाबत आपणाकडील पत्र क्रमांक नपं/बांध/कावि-५/५७२/२००७, दिनांक ०६ ऑगष्ट, २००७ अन्वये ना हरकत दाखला मिळालेला आहे. आरक्षण क्रमांक ३८ (क्रिडांगण) साठी एकूण क्षेत्र ०१ हेक्टर ८९ आर आहे, त्यापैकी ०१ हेक्टर २० आर जमीन विकत घेतलेली आहे म्हणजे फक्त ०० हेक्टर ६९ आर जमीन भूसंपादीत करावयाची राहिलेली आहे.

**(ब)** आरक्षण क्रमांक ३८ हे क्रिडांगणाच्या प्रयोजनार्थ आरक्षित असून त्याचे एकंदर क्षेत्र ०१ हे ८९ आर आहे. त्यापैकी संस्थानने वर नमुद केल्याप्रमाणे ०१ हे २० आर क्षेत्राची खरेदी केलेली आहे. आता फक्त ०० हे ६९ आर जमीन भूसंपादीत करावयाची राहिलेली आहे. सदर आरक्षणाची विकसन संस्था / भूसंपादीत संस्था श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी ही झाल्यावर भूसंपादनाने घेता येईल. सध्या संस्थानची असलेल्या कन्या शाळा, इंग्लिश मिडियम स्कूल व आयटीआय यासाठी असलेली इमारत अपुरी आहे. इतरत्र प्रयत्न करुनही जागा मिळत नाही. त्यामुळे संस्थानने खरेदी केलेल्या उपरोक्त जमिनीमध्ये शैक्षणिक संकुल उभारणे योग्य व उचित होईल, असे मत आहे. संस्थानने खरेदी केलेल्या जागेवर संस्थानतर्फे शैक्षणिक संकुल (प्राथमिक शाळा / माध्यमिक शाळा / उच्च माध्यमिक

शाळा / कनिष्ठ महाविद्यालय) अथवा इतर शैक्षणिक कामासाठी उपयोगात आणणेचा मानस आहे. परंतु सध्या असलेल्या आरक्षणाच्या प्रयोजनात अंशतः बदल झालेशिवाय याबाबतची कार्यवाही करता येणे शक्य नाही.

आरक्षण क्रमांक ३७ व ३८ चे आरक्षणाच्या प्रयोजनात खालीलप्रमाणे अंशतः फेरबदल होणे आवश्यक आहे तसेच वरील दोन्ही आरक्षणाबाबत विकसन संस्था / भूसंपादन संस्था श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी असे होणे आवश्यक आहे. त्याचा तपशील :

| अ.नं. | आरक्षण क्रमांक | सध्या असलेल्या आरक्षणाच्या प्रयोजनाचा तपशील | सर्व्हे नंबर | क्षेत्र | आरक्षणाच्या प्रयोजनात करावयाचा अंशतः बदल |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ३७ | प्राथमिक शाळा व क्रिडांगण | १२४ पै (सिटीएस ९५१ पै) | ०० हे ७८ आर | क्रिडांगण |
| ०२ | ३८ | क्रिडांगण | १२४ पै (सिटीएस ९५१ पै) | ०१ हे ८९ आर | शैक्षणिक संकुल |

उपरोक्तप्रमाणे आरक्षण क्रमांक ३७ व ३८ मधील आरक्षणांच्या प्रयोजनात बदल करणेकामी तसेच सदरहू आरक्षणाची विकसन संस्था श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी असे करणेबाबत शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडेस प्रस्ताव सादर करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं. ४९ तात्पुरते सार्वजनिक स्वच्छतालयाबाबत.**

**निर्णय क्र.४९** श्रीसाईबाबा संस्थानमार्फत सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे. त्यामुळे महाद्वार नं.३ मधुन बाहेर पडल्यानंतर महाद्वार ४ पर्यंत म्हणजे मारुती मंदिर, चावडी, द्वारकामाई व मंदिराचा दक्षिणेकडील रस्ता ते फुल मार्केट या परिसरात कोठेही स्वच्छतागृहाची सोय नाही. त्यामुळे स्त्री-पुरुष साईभक्तांचे खुप हाल होतात, कुचंबना होते. याठिकाणी मुतारी बांधकाम करणेऐवजी फायबरच्या युरीनल ठेवणे जास्त संयुक्तीक होईल.

याकामी डबल युरीनल पाण्याच्या टाकीसह व्यवस्था करण्यासाठी अंदाजे रु.४०,०००/- मात्र खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,चांगल्या प्रतीचे पी.व्ही.सी./फायबर मधील युरिनल (स्त्री/पुरुष) दोन नग खरेदी करणेकामी उत्पादक कंपन्याकडून दर पत्रके मागविण्यात यावीत. याकामी येणाऱ्या योग्य त्या सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं. ५० मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नं.१८३ मध्ये बहूउद्देशिय हॉल बांधणेबाबत**

**निर्णय क्र.५०** **(अ)** मा.अध्यक्ष महोदय यांचे निर्देशानुसार, नामवंत आर्किटेक्ट हाफीज् कॉन्ट्रॅक्टर, मुंबई यांचे वरिष्ठ सहकारी श्री. सुरेश बाबु, श्री.जयंत केणी व इतर यांनी संस्थान अधिकाऱ्यांसह दिनांक ०४ ऑगष्ट, २००७ रोजी समाधी मंदिर परिसरासह संस्थान परिसराची तसेच शिर्डी व निमगांव कोऱ्हाळे येथील संस्थान मालकीच्या जमिनींची विकासात्मक कामांच्या दृष्टीने पहाणी केली. या पहाणीचा अहवाल लवकरच ते पाठविणार आहेत.

मौजे निमगांव कोऱ्हाळे शिवारातील संस्थान मालकीच्या जमिनींची / जागांची पहाणी करत असतांना, गट नंबर १८३ मधील जागेमध्ये संस्थानमार्फत साईभक्तांच्या सेवा-सुविधेसाठी तसेच स्थानिक रहिवासी-नागरिकांच्या दृष्टीने बहुउद्देशीय हॉल बांधणे योग्य व उचित राहिल, असे श्री.सुरेश बाबू व त्यांच्या सहकाऱ्यांनी सांगितले. या बहुउद्देशीय हॉलचा उपयोग संस्थानमार्फत साजरे करण्यात येणारे उत्सवाचे वेळेस मनोरंजनात्मक कार्यक्रमासाठी, विविध धार्मिक व सामाजिक कामासाठी करता येईल. तसेच शिर्डी येथे नेहमी विविध मोठ-मोठया सामाजिक व व्यावसायिक संस्थामार्फत मेळावे, शिबीरे वगैरे आयोजित केली जातात. या अशा संस्थांना या बहुउद्देशीय हॉलचा उपयोग होऊ शकेल, असे मत प्रदर्शित केले. आर्किटेक्ट हाफीज् कॉन्ट्रक्टर, मुंबई यांचे प्रतिनिधी लवकरच या बहुउद्देशीय हॉलचा सविस्तर प्रस्ताव तयार करुन पाठविणार आहेत.

**(ब)** यापूर्वी मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार या ठिकाणी प्रथम हेलिपॅड बांधणेचे नियोजन होते. सल्लागार संस्थेच्या मार्गदर्शनानुसार सदरील हेलिपॅड आता गट नंबर १९५ मध्ये उभारण्यात आलेले आहे. तद्नंतर या गट नंबर १८३ मध्ये साईभक्तांसाठी निवासस्थान प्रकल्प उभारणेचे नियोजन होते. तथापि आता शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचा साईआश्रम प्रकल्पाचा काही भाग हा गट नंबर १७२ मध्ये उभारण्याचे मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार निश्चित करण्यात आलेले आहे. त्यामुळे, निमगांव कोऱ्हाळे शिवारातील गट नंबर १८३ मधील ०५ हेक्टर ४० आर क्षेत्रामध्ये सर्व सोयींनी युक्त असा बहुउद्देशीय हॉल उभारणेस हरकत नाही, असे मत आहे.

या बहुउद्देशीय हॉलचे सविस्तर बांधकाम आराखडे व अंदाजपत्रक हाफीज कॉन्ट्रॅक्टर, मुंबई यांचेकडून तयार करुन घेता येतील. दरम्यान आर्किटेक्ट फी बाबतचे पत्र ही उपलब्ध करवून घेण्यात येत आहे. तरी याकामी आर्किटेक्ट म्हणून हाफीज् कॉन्ट्रॅक्टर, मुंबई यांची नेमणूक करणेस व गट नंबर १८३

मध्ये बहुउद्देशीय हॉल उभारणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,मौजे निमगाव को-हाळे गट नं.१८३ मध्ये अद्यायावत असा बहुउद्देशीय हॉल उभारणेस मान्यता देणेत आली. याकामी आर्किटेक्ट मे.हाफीज कॉन्ट्रॅक्टर,मुंबई यांचे कडून बांधकाम आराखडा व सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन घेण्यात यावे. मे हाफीज कॉन्ट्रॅक्टर,मुंबई यांची आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करण्यात यावी. आर्किटेक्ट फी बाबत त्यांचेकडून प्रस्ताव घेण्यात यावा,असें ठरलें. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं. ५१** **श्रीगुरुस्थान मंदीरासमोर सभामंडप बांधणेबाबत**

**निर्णय क्र.५१** मा. व्यवस्थापन समितीच्या विवीध निर्णयान्वये, श्री गुरुस्थान मंदिराची पुर्नःबांधणी पूर्ण करण्यात येऊन साईभक्तांसाठी मंदिर खुले करण्यात आलेले आहे. सध्या श्री गुरुस्थान मंदिरासमोर साईभक्तांना दर्शन सुलभरितीने व्हावे म्हणुन स्टिल रेलिंग लावण्यात आलेले आहे. तसेच पूर्वी गुरुस्थान मंदिराच्या वरती असणारे छत (शेड) या मंदिरासमोर उभारण्यात येत आहे.

साईभक्तांना श्रीं चे दर्शन झालेनतर मंदिरासमोर क्षण- दोण क्षण निवांत बसण्याची भावना असते, इच्छा असते. तथापी अशी जागा मंदिर परिसरात उपलब्ध नसल्याने साईभक्तांची खूपच कुंचबना होते.

श्री गुरुस्थान मंदिरासमोर सन १९९९ मध्ये मंदिर परिसराचे नुतनीकरण व सुशोभिकरण करते वेळेस `` ध्यान मंदिर `` म्हणुन तळघर बांधण्यात आले आहे. सदर तळघराचा वापर मंदिर विभागाकडील उत्सवाचे व इतर वेळेस लागणारे साहीत्य ठेवण्यासाठी केला जात आहे. सध्या सदर तळघराची उंची जमिनीपेक्षा ( रस्ता सपाटीकरणा ) पेक्षा सहा फूट आहे. सदरचे तळघराची उंची जमिनी पर्यंत कमी करुन साईभक्तांसाठी त्याचा वापर करता येईल किंवा कसे या बाबत आर्किटेक्ट माथूर ॲण्ड कापरे, नवि दिल्ली यांचे कडून मा. व्यवस्थापन समितीचे दि. १५/०५/२००६ चे सभेतील निर्णय क्र. ३२२ अन्वये सदर बेसमेंटचा वापर देणगी काउंटर व दक्षिणा हुंडी करणे बाबत आर्किटेक्ट यांचे कडून प्रस्ताव मागविणे बाबत ठरले होते.

त्यानुसार आर्किटेक्ट माथुर ॲण्ड कापरे, नवि दिल्ली यांचे प्रतिनीधी आर्किटेक्ट सोनीया कापरे, यांनी दि. २३/०२/२००६ यांनी समक्ष पाहाणी करुन दि. २७/०२/२००६ चे पत्रान्वये खालील प्रमाणे कळविले आहे.

संपूर्ण बेसमेंटच्या प्लॅटफॉर्मवर लॅण्डस्केप करण्याचे प्रस्तावीत आहे. संपूर्ण बेसमेंटच्या भोवती चेकर प्लेटच्या पायऱ्या करणे व झुडपे लावण्याचे प्रस्तावीत आहे. त्यामुळे प्लॅटफॉर्मवर मोकळी व आकर्शक जागा होईल. त्या प्लॅट फॉर्मवर लॉन लावल्यास तेथे भक्तांना बसता येईल व म्युझियम भोवती मोकळी जागा होईल. ` श्री साईबाबांचे` समाधी मंदिर व गुरुस्थानचे महत्व बघता, बेसमेंटचा जिना काढून दुसऱ्या ठिकाणी करता येईल. याबाबदचा सविस्तर पॅन व एस्टीमेट तयार करण्यात येत आहे.

तसेच आर्किटेक्ट यांना दि.२२/०१/०७ चे पत्रान्वये बेसमेंट वापराबाबत कळविण्यात आले होते. याबाबत आर्किटेक्ट यांनी ०५/०१/२००७ व दि. २९/०१/२००७ चे पत्रान्वये मंदिर परिसरातील वाढीव सोयी सुविधा करणे बाबत प्रस्ताव सादर केला होता. त्यावर सविस्तर चर्चा होऊन साईभक्तांची मंदिर परिसरातील गर्दी कमी व्हावी व साईभक्तांना विरंगुळा मिळावा या करीता संस्थानचे निमगांव को-हाळे येथिल शेती महामंडळाकडून घेतलेल्या स.नं. १९८,१९९,२०० मध्ये साई गार्डन करण्याचे मा व्यवस्थापन समितीचे दि. १७/२/२००७ निर्णय क्र. २४१ अन्वये ठरले आहे.

तरी साईभक्तांना गुरुस्थान मंदिरासमोर बसण्याची व्यवस्था करावयाची झाल्यास या बाबत आर्किटेक्ट माथुर ॲण्ड कापरे, असो, नवि दिल्ली यांचे कडून प्लॅन व प्रस्ताव मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,श्रीगुरुस्थान मंदीराची पुनर्बांधणी नुकतीच पूर्ण करण्यात आलेली आहे. तथापि पुनर्बांधणी करण्यात आलेले मंदीर आकाराने लहान असल्याने मंदीरामध्ये साईंच्या फोटोवर, शिवलिंगावर व पादुकांवर उन पडते तसेच पावसाळ्यातही पावसाचे पाणी मंदीरात जाणेची शक्यता आहे. त्यामुळे श्रीगुरुस्थान मंदीराचे समोर व चारही बाजू संरक्षीत होतील अशा पद्धतीचे व इतर वास्तूंना सुयोग्य होईल अशारितीने मंडपाची उभारणी करण्यात यावी. याकामी आर्किटेक्ट मे.माथूर ॲण्ड काप्रे,नवी दिल्ली यांचेकडून अभिप्राय घेऊन बांधकाम आराखडा व अंदाजपत्रक तयार करण्यात यावे.

तसेच श्रीगुरुस्थान मंदीरासमोरील ध्यानमंदीराची उंची जमीनपातळीपर्यंत करणेबाबत चर्चा झ ाली. गुरुस्थान मंदीरासमोरी ध्यानमंदीराबाबत यापूर्वी झालेले वेगवेगळे निर्णय घेतलेले आहेत. हे सर्व निर्णय रद्द करण्यात यावेत. आता गुरुस्थान मंदीरासमोरील ध्यान मंदीराची उंची जमीनपातळीपर्यंत करणेबाबत तसेच त्याठिकाणचा कोणत्या प्रकारे भक्तांचे सेवा सुविधांसाठी उपयोग करता येईल

याबाबत आर्किटेक्ट मे.माथूर ॲण्ड काप्रे,नवि दिल्ली यांचा अभिप्राय घेण्यात यावा. त्या दृष्टीने बांधकाम आराखडे व अंदाजपत्रक तयार करण्यात यावे,असें ठरले.(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.५२** **साई गार्डनबाबत.**

**निर्णय क्र.५२** मा. व्यवस्थापन समितीचे दि. १७/०२/२००७ चे सभेत आर्किटेक्ट श्रीमती सोनीया काप्रे, नवि दिल्ली यांनी शिर्डी येथे साईभक्तांसाठी साई गार्डन चा रु. ४६ कोटी चा प्रस्ताव सादर केला होता. त्यास मा.व्यवस्थापन समितीचे दि. १७/०२/२००७ चे सभेत नि.क्र. २४१ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

दिनांक ०७/०८/२००७ चे पत्रान्वये आर्किटेक्ट श्रीमती सोनीया काप्रे, नवि दिल्ली यांनी याकामाचा करारनामा करणेसाठी शिर्डी येथे येणेबाबत कळविले आहे. तसेच सदरचा प्रस्ताव मा.अध्यक्ष सो., यांचेशी महाराष्ट्र इंम्पोरियम नवि दिल्ली येथील भेटीच्या वेळेस चर्चा करणेत आली असता मा. अध्यक्ष सो., यांनी त्यामध्ये २००० व्यक्तींचा मिटींग हॉल व multilevel पार्कींग बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर करणेबाबत सुचविले असल्याचे कळविले आहे.

याबाबतचा प्रस्ताव आर्किटेक्ट यांनी तयार केला आहे. सदर प्रस्ताव व्यवस्थापन समितीपुढे सादर करणेसाठी आवश्यकता असल्यास त्यांनी शिर्डी येथे समक्ष येवून प्रस्ताव सादर करण्याची इच्छा व्यक्त केली असलेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, यापूर्वी साईगार्डनबाबत आर्किटेक्ट सोनीया काप्रे यांनी प्रेझेन्टेशन दिलेले आहे. त्यानुसार आर्किटेक्ट मे.माथूर ॲण्ड काप्रे,नवी दिल्ली यांना या कामाच्या टप्प्यानुसार निविदा व आराखडे तयार करणेबाबत सत्वर कळविण्यात यावे,असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं. ५३** **महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास शिर्डी येथे जमीन उपलब्ध करुन देणेबाबत.**

**निर्णय क्र.५३** **(अ)** मा.सहव्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक मपविम/जवमा/शिर्डी/२००७, दिनांक १७ सप्टेंबर, २००७ अन्वये मा.अध्यक्षसो., श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना अग्रेषित केलेल्या पत्राने खालीलप्रमाणे कळविलेले आहे :

" .. .. शिर्डी येथे पर्यटकांचा ओघ दिवसेंदिवस वाढत आहे, ही बाब नक्कीच अभिनंदनीय आहे. या ठिकाणी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे हॉटेल पिलिग्रीम इन आहे. तथापि पर्यटकांची/ भाविकांची वाढती संख्या लक्षात घेता ते कमी पडते. यासाठी आपल्या अधिपत्त्याखालील शिर्डी येथील अंदाजे १० एकर जमीन मध्यवर्ती ठिकाणी महामंडळास विनाशुल्क उपलब्ध करुन दिल्यास, पर्यटकांचा / भाविकांकरीता वाढील निवासी सुविधा उपलब्ध करुन देणे शक्य होईल. "

तसेच, मा.व्यवस्थापक, म.प.वि.म., दि पिलग्रिम्स इन, शिर्डी यांनी दिनांक २६ ऑक्टोबर, २००७ रोजीच्या मा.अध्यक्षसो., श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना अग्रेषित केलेल्या पत्राने खालीलप्रमाणे कळविलेले आहे :

" .. .. तसेच दिनांक २६ ऑक्टोबर, २००७ रोजी मा.ना.विजयसिंह मोहिते पाटील, मंत्री, ग्रामविकास व पर्यटन, महाराष्ट्र राज्य यांची आपणाबरोबर झालेली प्रत्यक्ष चर्चानुसार नवीन भेजनालयामागील ७ एकर जमिन महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास देणेबाबत चर्चा झाली तसेच चर्चामध्ये सुचविलेप्रमाणे ५ एकर जागेत म.प.वि.म.चे एक युनिट व दोन एकर जागेत साईभक्तांकरीता भक्तनिवास बांधण्याची योजना झाली. सदर ७ एकर जागेत साईभक्तांकरीता वाहनतळ, उपहारगृह व इतर आवश्यक त्या सोई सुविधा करणेबाबत चर्चा झाली.

तरी आपणांस विनंती करण्यात येते की, आजच्या बैठकीत चर्चा झालेप्रमाणे वरील जागा लवकरात लवकर उपलब्ध करुन देण्यात यावी जेणेकरुन बांधकामाबाबत सविस्तर प्रस्ताव आपणाकडे लवकर सादर करण्यात येईल. "

याशिवाय, मा.ना.श्री.विजयसिंह मोहिते पाटील, ग्रामविकास व पर्यटन मंत्री, महाराष्ट शासन यांनी दि पिलग्रिम्स इन, शिर्डी यांच्या दिनांक २६ ऑक्टोबर, २००७ रोजीचे पत्रावर दिनांक ०६ नोव्हेंबर, २००७ रोजी मा.अध्यक्षसो. यांना उद्देशून, " .. .. चर्चा झाल्याप्रमाणे त्वरीत कार्यवाहीस्तव विनंती आहे " असा अभिप्राय दिलेला आहे.

**(ब)** मा.व्यवस्थापक, मपविम, दि पिलग्रिम्स इन, शिर्डी यांनी मा.ग्रामविकास व पर्यटन मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेशी मा.अध्यक्षसो. यांचेशी झालेल्या चर्चेचा संदर्भ नमूद करुन, ०७ एकर जागेची / जमिनीची मागणी केलेली आहे. तसेच मा. संचालक, पर्यटन, महाराष्ट्र राज्य तथा मा.सहव्यवस्थापकीय संचालक, मपविम, मुंबई यांनी त्यांचेकडील दिनांक २३ नोव्हेंबर, २००७ रोजीचे मा.अध्यक्षसो. यांना अग्रेषित केलेल्या पत्रान्वये, मा. मंत्री, पर्यटन व ग्रामविकास, महाराष्ट्र राज्य यांचेशी दिनांक २६

ऑक्टोबर, २००७ रोजी झालेल्या चर्चेचा संदर्भ देऊन श्री क्षेत्र शिर्डी येथे अंदाजे १० एकर जागा / जमीन विनाशुल्क उपलब्ध करुन देणेबाबत विनंती केलेली आहे.

मौजे शिर्डी येथे संस्थान मालकीच्या कोणत्याही जमीन सध्या रिक्त नाहीत. मौजे निमगांव कोऱ्हाळेमधील जमिनी या रुग्णालय व इतर संस्थानच्या सार्वजनिक प्रयोजनासाठी भूसंपादन करुन मिळालेल्या आहेत, या ठिकाणी संस्थानचे विविध विकास प्रकल्प कार्यान्वीत करण्यात येत आहे.

उपरोक्त विवेचनास अनुसरुन, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांना संस्थान मालकीची मौजे निमगांव कोऱ्हाळे शिवारातील जमीन उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,मौजे निमगाव कोऱ्हाळे येथील संस्थान मालकीच्या जमीनी या भू संपादनाचे माध्यमातून मिळालेल्या आहेत. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास जमीन उपलब्ध करुन देणेस हरकत नाही. तत्पूर्वी मौजे निमगाव कोऱ्हाळे हद्दीमध्ये संस्थानचे विविध विकास प्रकल्प नियोजित आहेत. त्यासाठी संस्थानने जागाही निश्चित केलेल्या आहेत. त्या जागा वगळून उर्वरित जागा/जमीनी महाराष्ट्र राज्य पर्यटन महामंडळाच्या अधिकाऱ्यांना दाखविण्यात याव्यात. त्यांनी अशी जागा/जमीन निश्चित केल्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे माहितीसाठी व निर्णयार्थ पुनःश्च प्रस्ताव सादर करावा. तद्नंतर अधिनियमातील तरतूदीनुसार महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळास जागा/जमीन देणेबाबतचा प्रस्ताव शासनाचे मान्यतेसाठी सादर करावा,असें ठरलें.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं. ५४** **द्वारावती इमारतीतील निवासस्थानांसाठी कॉट, गाद्या व इतर फर्निचर खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.५४** संस्थानचे शिर्डी येथील स.नं. १४८ मधिल द्वारावती भक्तनिवास इमारतीचे तळमजला (पार्कींग) अधिक तिन मजले प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात असून पाणीपुरवठा , इलेक्ट्रीक पॅनेल्स, पॅनेल रुम व ड्रेनेजचे काम प्रगतीपथावर आहे. सदर इमारतीत प्रसाधनगृहासह सुसज्ज अशा एकूण दोनशे बावन्न खोल्या आहेत. याच इमारतीमध्ये अतिमहत्वाच्या व्यक्तींसाठी (VIP) ऐंशी खोल्या असलेल्यो चौथा मजल्याचे बांधकाम प्रस्तावित असल्याने, टेरेस वॉटरप्रूफींग,टेरेस पाईपलाईन, सौरउर्जेवरील वॉटर हिटींग प्रकल्प,लिफ्ट,पॉलीकार्बोनेट डोम,तिसरा मजला रंगकाम इ. कामे चौथ्या मजल्याचे बांधकामाचे वेळेस पूर्ण करावे लागणार आहेत.

भक्तनिवास इमारतीचा वापर सुरू करणेसाठी फर्निचर काम हाती घ्यावे लागणार आहे. त्यासाठी अंदाजपत्रक व निविदा तयार करणेचे काम आर्कीटेक्ट काबरे चौधरी, नाशिक यांचे मार्फत सुरु आहे. आर्कीटेक्ट काबरे चौधरी, नाशिक यांनी प्राथमिक अंदाजानुसार तळमजला (पार्कींग) अधिक तीन मजल्याचे २५२ खोल्याचे फर्निचर साठी रू.१,०६,५४,८५०/- व चौथा मजला फर्निचर कामासाठी रू ५७,६८,४५०/- मात्र असा एकूण रू. १,६४,२३,३००/-मात्र खर्च अपेक्षित असल्याचे त्यांचे दि. २१/१२/२००७ चे पत्रान्वये कळविले आहे. सदर अंदाजपत्रकात आर्कीटेक्ट यांनी कार्यालयीन कामकाजासाठी टेबल, खुर्च्या, काउंटर्स, प्रत्येक खोलीसाठी एम.एस.बेडस, फायबर फोम मॅट्रेसेस, कर्टन रॉडस, कर्टन्स, साईड टेबल, ड्रेसिंग टेबल (आरशासह),टीपॉय, स्टोरेज रॅक्स इ. बाबींचा समावेश केला आहे. तसेच चौथ्या मजल्यावर अतिमहत्वाच्या व्यक्तींसाठी (VIP) निवासव्यवस्था होणार असल्याने त्यासाठी उच्च दर्जाचे उपरोक्त फर्निचर विचारात घेउन अंदाजपत्रक तयार केले आहे.

चौथ्या मजल्याचे काम अदयाप सुरू झालेले नसल्याने सदर फर्निचर काम दोन टप्प्यात करावे लागणार आहे. तरी द्वारावती या भक्तनिवास इमारतीसाठी कार्यालयीन फर्निचरसह भक्तांच्या सुविधेसाठी खोल्या मधील फर्निचर तयार करणेकामी अंदाजे एकुण रू. १,६४,२३,३००/- मात्रचे खर्चास व वर्तमानपत्रात जाहीरात देऊन निविदा मागविणे मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

आजचे सभेत याबाबत माहिती देणेकामी द्वारावती निवासस्थान इमारतीचे आर्किटेक्ट काबरे हे स्वतः उपस्थित होते. फर्निचरचे कामाबाबत त्यांनी सभेस माहिती दिली. आर्किटेक्ट यांनी द्वारावतीमधील खोल्यांमध्ये प्रत्येकी दोन कॉटस् (बेडस्) गृहीत धरलेले आहे. त्याऐवजी प्रत्येक खोली मध्ये चार कॉटस् (बेडस्) गृहीत धरण्यात यावेत. तसेच सर्व फर्निचर लाकडी/ प्लायवूडचे न करता भक्तनिवासस्थानमध्ये करण्यात आलेल्या फर्निचरमध्ये अधिक सुधारणा करुन (उदा.३ फुटी कॉटऐवजी २।। फुट रुंदीचा कॉट) सविस्तर सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात यावे. त्यानुसार विहित पद्धतीने वर्तमानपत्रात जाहीरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असें ठरलें. तसेच चादरी, बेडशिट व इतर आवश्यक त्या साहित्यासाठीही निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागा प्रमुख)

**विषय नं. ५५** **नाताळा सुट्टीतील गर्दीचे कालावधीत साईभक्तांचे सोयीकरता उभारण्यात आलेल्या मंडपाबाबत.**

**निर्णय क्र.५५** नाताळ सुट्टयांचे कालावधीत दि. २१/१२/२००७ ते दि. ०२/०१/२००८ (१३ दिवस) या कालावधीमध्ये मंदिर परिसर, प्रसादालय परिसर, धर्मशाळा परिसर व नविन भक्तनिवासस्थान परिसरात शामियाना कापडी मंडप , बाजूचे पार्टीशन (कनाती) सह, खाली बिछायत (मॅटीन) व आवश्यक गादया व चादरीसह मंडप उभारणी करणे कामी येणारे रु. ११.५० लाखचे खर्चास मान्यता देणे बाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि. १८ नोव्हेंबर, २००७ रोजीचे सभेत सादर केला होता. यावर सविस्तर चर्चा होऊन दि. २१/१२/२००७ ते दि. ०२/०१/२००८ अखेर १३ दिवस नाताळ सुट्टयांचे कालावधीत मंडप उभारणीकामी कोटेशन / दरपत्रक मागविणेस व याकामी येणारे रु. ११.५० लाखचे खर्चास मान्याता देण्यात आली. तसेच गर्दीचे स्वरूप विचारात घेऊन वाढीव मंडप उभारणे, चादरी पुरविणे पुरविणेसह येणारे खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार अशा प्रकारचे मंडपाचे काम करणारे खालील १० मंडप ठेकेदार यांचेकडून समाधी मंदिर / प्रसादालय / धर्मशाळा परिसर भाग १ व श्री साईबाबा भक्तनिवासस्थान परिसर भाग २ या प्रमाणे दोन भागात कोटेशन्स / दरपत्रक मागविण्यात आली होती.

| | |
|---|---|
| ०१.झुराळे मंडप डेकोरेटर्स, खैरी निमगांव | ०६. कैलास मंडप ॲण्ड डेकोरेटर्स , अहमदनगर |
| ०२.गणेश मंडप, कोपरगांव | ०७. शर्मा मंडप डेकोरेटर्स, वैजापूर |
| ०३.रोशनी मंडप डेकोरेटर्स, संक्रापूर | ०८. मुथ्था डेकोरेटर्स, अहमदनगर |
| ०४.सावता मंडप ॲण्ड डेकोरेटर्स, राहाता | ०९. चौरे मंडप डेकोरेटर्स, अहमदनगर |
| ०५.तरटे मंडप, साकुरी (राहाता) | १०. सोनटके मंडप, राहाता. |

उपरोक्त मंडप ठेकेदार यांचे पैकी, खालील पाच ठेकेदार यांनी भाग ०१ व भाग ०२ चे कोटेशन पत्र घेतलेले आहेत.

०१.झुराळे मंडप डेकोरेटर्स, खैरी निमगांव
०२.रोशनी मंडप डेकोरेटर्स, संक्रापूर
०३.सावता मंडप ॲण्ड डेकोरेटर्स, राहाता
०४तरटे मंडप, साकुरी (राहाता)
०५.कैलास मंडप ॲण्ड डेकोरेटर्स , अहमदनगर

वरिल ठेकेदारापैकी तरटे मंडप, साकुरी वगळता इतर चार मंडप ठेकेदार यांनी घेतलेले कोटेशन / दरपत्रक मुदतीत दि. १३/१२/२००७ रोजी सादर केले होते. सदर कोटेशन त्याच दिवशी दि. १३/१२/२००७ रोजी मा. कार्यकारी अधिकारी,मा. विश्वस्त श्री. सुरेश वाबळे व श्री. अशोक खांबेकर, प्रशासकिय अधिकारी, मुख्य लेखाधिकारी व वरिष्ठ मुख्य अभियंता यांचे उपस्थितीत कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात कोटेशन उघडण्यात आले.

मंडप ठेकेदार यांचेशी यांनी एकुण १३ दिवसा करीता दिलेल्या मंडपाचे दराबाबत चर्चा /वाटाघाटी करण्यात आल्या.

वरिल प्रमाणे मागविण्यात आलेले कोटेंशन मधील भाग ०१ व भाग ०२ चे मंडप व्यवस्था करणे कामी दरपत्रकामधील कैलास मंडप डेकोरेटर्स, अहमदनगर यांचे सर्व समावेशक रु. २४,२८,९३९.०० मात्रचे दर निमन्तम स्वरुपाचे असल्याने त्यांचेकडून भाग ०१ व भाग ०२ या प्रमाणे कार्यादेश देण्यात यावा तसेच गर्दीचे कालावधीत अधिक मंडपची आवश्यकता भासल्यास त्यांचेकडून मंजूर दराप्रमाणे करुन घेण्यात यावे अथवा इतर मंडप ठेकेदार यांचेकडून कैलास मंडप डेकोरेटर्स, अहमदनगर यांचे मंजूर दरात करुन घेण्यात यावे व या कामी येणारे योग्य त्या खर्चासही मान्यता देण्याची शिफारस करण्यात आली. तसेच शिर्डी महोत्सवचे कार्यक्रमासाठी साईनगर येथिल ग्राउंडवर २५ x३० साईजचे एक स्टेज, ड्रेसींग रुम, २००x १०० चे मॅटींग, व ३०० नग प्लास्टीक खुर्च्या इ. ची कामे मंजूर दर असलेले ठेकेदार कैलास मंडप ॲण्ड डेकोरेटर्स, अहमदनगर यांचेकडून करुन घेणेस व याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्याची शिफारस करण्यात आली असलेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,मा.व्यवस्थापन समिती सदस्य व अधिकारी यांचे समितीने शिफारस केलेनुसार कैलास मंडप डेकोरेटर्स,अहमदनगर यांचेकडून नाताळ सुटीतील तसेच शिर्डी महोत्सवाकरिता मंडप उभारणी करणेस व त्याकामी येणाऱ्या योग्य त्या सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागा प्रमुख)

**विषय नं. ५६** **भक्तनिवासस्थानचे दक्षिणेकडील 'ए' विंगचे बाहेरील बाजूस असलेले गाळा नं.०१ चे लगतचे रिकामे जागेत बाथरुम करणेबाबत.**

**निर्णय क्र.५६** श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीचे ए विंगचे दक्षिणीकडे बाहेरील बाजुने वाहन पार्किंग आहे. सदरचे पार्किंगमध्ये वाहने आलेनंतर त्यातील साईभक्त प्रथम संडास/ बाथरुमची चौकशी करतात.

त्याकरिता अे विंग बाहेरीअल बाजू नंबर १ चे गाळ्या लगतचे रिकामे जागेत स्त्रियांकरीता बाथरुम/ मुतारी यांची आवश्यकता असल्याने सदरचे काम विभागामार्फत पूर्ण करणेत आले आहे.

तसेच बी / सी जनरल हॉलमध्ये सध्या स्त्रियाकरीता, पुरुषाकरीता असे स्वतंत्र विभाग आहेत. संडास बाथरुम यांची कमतरता जाणवत असल्यामुळे नविन संडास- बाथरुम बी/सी हॉलचे पश्चिम बाजूस तयार करणेत आलेले आहे. सदरचे संडास - बाथरुमचा वापर स्वतंत्र पुरुषाकरीता करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्याठिकाणी प्रवेशद्वारावर बी/ सी हॉलमधील संडास - बाथरुमचे पार्टीशन काढून सदरचे संडास - बाथरुम एकत्रित करुन त्याठिकाणी फक्त स्त्रिया करीताच बाथरुम तयार करणे कामी आर्किटेक्ट अरविंद वैद्य, संगमनेर यांनी रुपये २,६६,१००.०० मात्र रकमेचे एस्टीमेट सादर केले असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली. याकामी विहित पद्धतीने दरपत्रके मागवून सदरहू काम पूर्ण करण्यात यावे. (कार्यवाही-बांधकाम विभागा प्रमुख)

**विषय नं.५७** **नांदुर्खी येथील देणगी मिळालेल्या ४२ एकर जमिनीस कंम्पाऊंड करणेबाबत.**

**निर्णय क्र.५७** **(अ)** मौजे नांदुर्खी बु ाा ता. राहाता येथील ग्रामपंचायत व ग्रामस्थ, संस्थानला विकास कामांसाठी मौजे नांदुर्खी बुद्रूक येथील जमीन विनामुल्य देण्यास तयार आहेत. त्यानुसार मा. व्यवस्थापन समितीच्या दि. ११ ऑगस्ट २००७ रोजीच्या सभेत सदरची जमिन संस्थानला देणगी दाखल घेणेस व त्याजागेवर तार कंपाऊंड करणेस मान्यता मिळाली आहे.

मौजे नांदुर्खी बु येथील गट नं. ३३१ व ४४६ या लागून असणाऱ्या दोन गटांपैकी ७/१२ प्रमाणे एकूण १७ हेक्टर ८७ आर जमिन आहे. इकडील विभागाचे कंत्राटी सर्व्हेअर यांचे मोजणी नुसार एकूण १६ हेक्टर २२ आर जागा भरली आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | गट नंबर | ७/१२ प्रमाणे क्षेत्र हेक्टर-आर-चौमी | प्रत्यक्ष वहिवाटीप्रमाणे व मोजणीनुसार भरणारे क्षेत्र हेक्टर-आर-चौमी | कमी असणारे क्षेत्र हेक्टर-आर-क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| ०१ | ३३१ | १३-७६-००<br>००-६०-०० पोख<br>**१४-३६-००** | १३-२८-०० | ०१-०८-०० |
| ०२ | ४४६ | ०२-७२-००<br>००-७९-०० पोख<br>**०३-५१-००** | ०२-९४-०० | ००-५७-०० |
| | **एकूण** | **१७-८७-००** | **१६-२२-००** | **०१-६५-००** |

०१. जमिनीचे स्थळनिरीक्षण व जमिनी मोजणी अहवालाबाबत माहिती :गट नंबर ३३१ मध्ये तळे असून, तळयाखालील क्षेत्र ८२ आर आहे.

०२. गट नंबर ४४६ मध्ये तळे असून, तळयाखालील क्षेत्र ०१ हेक्टर ७७ आर आहे.

०३. गट नंबर ३३१ मध्ये दोन विहीरी असून, त्यापैकी एक विहीर नांदुर्खी बु ग्रामपंचायतीच्या पाणीपुरवठा योजनेची आहे. दुसरी विहरी गणेश सहकारी साखर कारखान्याने शेतीला पाणी देण्यासाठी खोदलेली आहे, असे चौकशीअंती समजले.

०४. गट नंबर ३३१ व ४४६ मध्ये शेतीच्या वापराकरीता पाणी साठविणेसाठी गणेश सहकारी साखर कारखान्याच्या मदतीने तळे तयार करण्यात आले असल्याचे समजले.

०५. गट नंबर ४४६ मध्ये एक विहीर असून तिला मोटारपंप बसविण्यात आलेला आहे. सदर विहीरमध्ये पाटाचे पाणी भरुन घेऊन लिफ्टव्दारे तळे पाण्याने भरण्यात येत असे.

०६. गट नंबर ४४६ मध्ये कर्मचाऱ्यांना राहण्याकरीता इमारत बांधण्यात आलेली आहे.

०७. गट नंबर ४४६ मध्ये राहाता गांवाकडे जाणाऱ्या रस्त्यालगत दोन लहान श्री लक्ष्मीमातेची मंदिरे बांधलेली आहेत.

०८. गट नंबर ३३१ व गट नंबर ४४६ मधून उत्तर-दक्षिण दिशेने जाणारा पूर्वीचा रस्ता रेकॉर्डला आहे, परंतु जागेवर अस्तित्वात नाही. त्याचे क्षेत्र ६८ आर आहे.

०९. गट नंबर ३३१ व गट नंबर ४४६ च्या ७/१२ उताऱ्यात,पुनर्वसनासाठी आरक्षित असा शेरा आहे. मात्र प्रत्यक्ष जमिनीमध्ये पुनर्वसनासाठीच्या जमिनीचे / क्षेत्राचे भूसंपादनकामी सिमांकन करण्यात आलेले नाही अथवा अस्तित्वात नाही.

१०. उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता, गट नंबर ३३१ चे क्षेत्र १३ हेक्टर २८ आर ०० चौमी अधिक गट नंबर ४४६ क्षेत्र ०२ हेक्टर ९४ आर ०० चौमी अधिक रस्त्याखालील क्षेत्र ०० हेक्टर ६८ आर ०० चौमी असे एकूण क्षेत्र १६ हेक्टर ९० आर ०० चौमी भरत आहे.

११. गट नंबर ३३१ व गट नंबर ४४६ मधील जागेस तारेचे कंपाऊंड करणेकामी अंदाजे एकूण १८३९ मीटर एवढे अंतर येत आहे.

**(ब)** उपरोक्तप्रमाणे मौजे नांदुर्खी येथील जमिनीस कंपाऊंड करणेबाबत खालीलप्रमाणे अंदाजित खर्च येईल

| अ.नं. | कंपाऊंडचा तपशील | अंदाजित खर्च रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१ | आर.सी.सी. पोलसह तार कंपाऊंड / आर.सी.सी.कॉलमसह एम.एस. गेट | ०४,२८,५५२/- |
| ०२ | एम.एस.पोलसह चेनलिंक फेन्सिंग / आर.सी.सी.कॉलमसह एम.एस.गेट | १७,४२,०००/- |
| ०३ | वीट व दगड बांधकामासह कंपाऊंड / आर.सी.सी.कॉलमसह एम.एस.गेट | ५२,५०,०००/- |

उपरोक्तपैकी, अ.नं. ०१ मध्ये दर्शविण्यांत आलेल्या आर.सी.सी.पोलसह तार कंपाऊंड करणे व आर.सी.सी. कॉलमसह एम.एस.गेट उभारणेकामी अंदाजित रक्कम रुपये ०४, २८,५५२/- मात्र इतका खर्च येईल. याकामी मान्यता मिळालेस विहीत पध्दतीने निविदा मागवून उपरोक्त काम पूर्ण करुन घेता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,प्रथमतः संस्थानचे नावे जागा होणेसाठीची कार्यवाही पूर्ण करावी. ७/१२ वर संस्थानचे नावाची नोंद झाल्यावर विहित पद्धतीने निविदा मागवून वरिलप्रमाणे काटेरी तारेचे कुंपण करण्यात यावे, असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागा प्रमुख)

**विषय नं.५८** **श्रीसाईबाबा हॉस्पिटल येथे वाढीव फर्निचर व ॲल्यूमिनियम पार्टीशन व दरवाजे तयार करणेबाबत.**

**निर्णय क्र.५८** श्री साईबाबा हॉस्पीटल वैद्यकीय संचालक यांनी श्री साईबाबा हॉस्पीटल येथे काही वाढीव फर्निचर व ॲल्युमिनीअम पार्टीशन दरवाजे तयार करुन मिळणेबाबत वेगवेगळ्या निवदेनांव्दारे कळविले होते. त्यानुसार आवश्यक ती मोजमापे घेऊन आर्किटेक्ट शितल जोशी, श्रीरामपूर यांचेकडून प्लॅन व अंदाजपत्रक तयार करुन घेण्यात आले. याप्रमाणे अंदाजपत्रकानुसार सदर कामास रुपये ७,०९,०००.०० मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

उपरोक्त वाढीव फर्निचर व ॲल्युमिनीअम पार्टीशन व दरवाजेचे काम करणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि. २०/०५/२००७ रोजीचे सभेत निर्णय क्र. ३७८ अन्वये येणारे खर्चास व वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे निविदा मागविणेकरीता मंजुरी देण्यात आलेली आहे. परंतू हॉस्पीटल विभागाने नंतर काही वाढीव मागण्या कळविल्या असून त्यांचाही निविदेत समावेश करण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर खर्चाची रक्कम वाढून रु. १०,४३,२१२.०० मात्र इतकी झालेली आहे. त्यानुसार वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या होत्या व को-या निविदा विक्रीची मूदत दि. २०/०९/२००७ ते दि. ०३/१०/२००७ अखेर ठेवण्यात आली होती. सदर मूदतीत खालील पाच ठेकेदारांनी को-या निविदा विकत घेतलेल्या होत्या.

०१. जे.के. एंटरप्रायजेस, नाशिक
०२ .सुदर्शन फ्लेक्झीबल पॅकेजिंक प्रा. लि., नाशिक
०३ .डॅश इंटेरीअर, मुंबई
०४.मारवेल इंटेरीअर डिकोरर्टस ॲण्ड लेण्ड स्केपिंग डिझाईनर्स, नाशिक
०५ मल कन्स्ट्रक्शन, नाशिक

सिलबंद निविदा सादर करणेसाठी दि. १०/१०/२००७ अखेर मूदत देण्यात आली होती. विहित मूदतीत उपरोक्तपैकी फक्त खालील दोन ठेकेदारांनी सिलबंद निविदा सादर केली.

०१. डॅश इंटेरीअर, मुंबई
०२. कमल कन्स्ट्रक्शन, नाशिक

त्यामुळे दि. १६/१०/२००७ चे टिपणी अन्वये वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन फेर निविदा मागविण्यात आल्या. को-या निविदा विक्रीची मूदत दि. ३१/१०/२००७ ते दि. ०५/११/२००७ अखेर ठेवण्यात आली होती. सदर मूदतीत खालील चार ठेकेदारांनी को-या निविदा विकत घेतल्या होत्या.

०१.नाशिक ग्लास डेपो, नाशिक
०२.सायली सेल्स कॉर्पोरेशन, अहमदनगर
०३.अतुल व्ही. चव्हाण, अहमदनगर
०४.एम.एम. कन्स्ट्रक्शन, नाशिक

सिलबंद निविदा सादर करणेसाठी दि. ०८/११/२००७ अखेर मूदत देण्यात आली होती. विहित मूदतीत उपरोक्त चार पैकी खालील एका ठेकेदाराने निविदा सादर केली.

०१. नाशिक ग्लास डेपो, नाशिक

त्यानुसार पुर्वी दि. १०/१०/२००७ रोजी प्राप्त झालेले दोन व दि. ०८/११/२००७ रोजी प्राप्त झालेले एक असे तिन निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | निविदा सादरकर्त्यांचे नांव |
|---|---|
| ०१ | डॅश इंटेरीअर, मुंबई |
| ०२ | कमल कन्स्ट्रक्शन, नाशिक |

| | |
|---|---|
| ०३ | नाशिक ग्लास डेपो, नाशिक |

उपरोक्त निविदा आजचे सभेपुढे उघडण्यात आल्या असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | ठेकेदारांचे नांव | निविदा रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| ०१. | डॅश इंडेरियर्स,मुंबई | ०८,०४,४६०.०० | प्रथम निम्नतम |
| ०२. | नासिक ग्लास डेपो, नाशिक | १०,४९,६३२.०० | तृतीय निम्नतम |
| ०३. | कमल कन्स्ट्रक्शन, नाशिक | ०९,८०,०००.०० | व्दितीय निम्नतम |

वरील निविदांबाबत सविस्तर चर्चा होऊन संबंधित निविदासादरकर्त्यांकडून ते दर कमी करणेसाठी इच्छुक असल्यास, तसे सुधारीत देकार मागवून ते मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करावेत असे उपरोक्त उपसमिती सभेमध्ये ठरले होते.त्यानुसार दि.०८.१२.२००७ चे टिपणी अन्वये सदरचे ठेकेदार यांना पत्र पाठवून निविदेत सुट देणेची विनंती करण्यात आली असता त्यांनी फॅक्सद्वारे सुट देऊ केलेबाबतचे पत्र दिले असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदा रक्कम | वाटाघाटीनंतरची रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | डॅश इंटेरीअर, मुंबई | ८,०४,४६०.०० | ०७,६४,२३७.०० | निविदा रकमेवर ५% सुट |
| २ | कमल कन्स्ट्रक्शन, नाशिक | ०९,८०,०००.०० | ०९,७०,२००.०० | निविदा रकमेवर १% सुट |
| ३ | नाशिक ग्लास डेपो, नाशिक | १०,४९,६३२.०५ | १०,३९,१३५.७२ | निविदा रकमेवर १% सुट |

उपरोक्त पैकी अ.नं.१ चे निविदाधारक मे. डॅश इंटेरीअर, मुंबई यांची निविदा रक्कम व वाटाघाटीनंतरची रक्कम ही निम्नतम स्वरुपाची दिसून येते. तरी सदरचे फर्निचर व ॲल्युमिनिअम कॅबीन व पार्टीशनचे काम करणेसाठी मे. डॅश इंटेरीअर, मुंबई यांना सदरकामाचा कार्यादेश देणेस, तसेच त्यासाठी रु.७,६४,२३७/- मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.५९** **महामहिम राष्ट्रपती,भारत सरकार यांची शिर्डी भेट रस्ते दुरुस्तीबाबत.**

**निर्णय क्र.५९** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेतर्फे श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री साईंच्या दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांना मुलभूत सेवा-सुविधा वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येतात. या सेवा-सुविधेतर्गतच श्री क्षेत्र शिर्डी येथे येणाऱ्या हजारो साईभक्तांना विनासायास व विनाविलंब प्रसाद भोजनाची व्यवस्था उपलब्ध व्हावी म्हणून मा.व्यवस्थापन समितीने भव्य व अद्ययावत सुविधा असलेली " श्री साई प्रसादालय " इमारत बांधणेचा निर्णय घेतला होता, त्यानुसार सदरहू इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यात आलेले आहे.

अशा या भव्य व अद्ययावत सेवा-सुविधा असलेल्या प्रसादालय इमारतीचे उद्घाटन करण्यासाठी मा.राष्ट्रपती महोदयांना मा.जयंतराव ससाणे, अध्यक्षसाो. यांनी दिनांक ०३ सप्टेंबर, २००७ रोजी श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री साईंच्या दर्शनासाठी येण्याचे व नियोजित प्रसादालय इमारतीचे उद्घाटन त्यांचे शुभहस्ते करणेबाबत निमंत्रण दिले होते. त्यानुसार मा. राष्ट्रपती भवन व त्यानंतर मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी कळविल्याप्रमाणे मा.राष्ट्रपती महोदया या दिनांक २७ नोव्हेंबर, २००७ रोजी श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री साई दर्शनासाठी व व प्रसादालय इमारतीच्या उद्घाटनासाठी येणार आहेत. या समारंभाची तयारी प्रशासनामार्फत सुरु करण्यात आलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक १८ नोव्हेंबर, २००७ रोजीच्या सभेत ठरल्याप्रमाणे या समारंभासाठी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता दिलेली आहे. या खर्चाच्या बाबींमध्ये रस्ते दुरुस्तीचा समावेश होता. तथापि मा.अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक प्रशा-३/८४०७/२००७, दिनांक १९ नोव्हेंबर, २००७ रोजीचे पत्रानुसार व मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांची त्यांचेकडील पत्र क्रमांक प्रशा/७९७९/२००७, दिनांक २० नोव्हेंबर, २००७ रोजीचे पत्रानुसार खाली नमूद केलेल्या बाबींवर खालीलप्रमाणे अंदाजित खर्च कळविलेला असून, याबाबतचा निधी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांचेकडे वर्ग करण्यात यावा, असे कळविलेले आहे.

| अ.नं. | कामाचा तपशील | मा.अधिक्षक अभियंता, साबांमं, अहमदनगर यांनी कळविलेला अंदाजित खर्च रुपये | मा.कार्यकारी अभियंता, संगमनेर यांनी कळविलेला अंदाजित खर्च रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | नगर-मनमाड रस्ता दुरुस्ती करणे. (५०० रुमपासून शासकीय विश्रामगृहापर्यन्तचे नगर मनमाड रस्त्याचे डांबरी पृष्ठभागाचे नुतनीकरण करणे.) | ६१,००,०००/- | ५९,४७,७५५/- |
| ०२ | प्रसादालयाकडे जाणारा रस्ता दुरुस्ती करणे. | | -- |

| | | | |
|---|---|---|---|
| ०३ | हेलिपॅडकडे जाणारा रस्ता दुरुस्ती करणे. ( नगर मनमाड रस्ता ते ५०० रुम शिर्डी येथील हेलीपॅड पर्यन्तच्या रस्त्याचे डांबरी पृष्ठभागाचे नुतनीकरण करणे.) | | ०३,१४,७२८/- |
| ०४ | शिर्डी येथे हेलिपॅड तयार करणे. | २८,००,०००/- | २८,००,०००/- |
| ०५ | बॅरेकेटींग करणे. (मा.राष्ट्रपती, नवी दिल्ली यांचे शिर्डी दौऱ्याबाबत तयार करण्यात आलेल्या हेलीपॅड भोवती तसेच जोड रस्त्यास बांबुचे बॅरेकेटींग करणे.) | ०२,००,०००/- | ०१,२३,९६०/- |
| ०६ | पिंपळवाडी रस्ता ते मारुती मंदिर रस्ता डांबरीकरण करणे. | -- | ०१,०२,१३४/- |
| | **एकूण रक्कम** | **९१,००,०००/-** | **९२,८८,५७७/-** |

उपरोक्त तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे, मा.अधिक्षक अभियंता, साबांमं, अहमदनगर यांनी एकूण ०५ कामांसाठी अंदाजित खर्च रुपये ९१,००,०००/- मात्र तर मा.कार्यकारी अभियंता, साबांवि, संगमनेर यांनी एकूण ०५ कामांसाठी अंदाजित खर्च रुपये ९२,८८,५७७/- मात्र इतका दर्शविलेला आहे.

तसेच, मा.पोलिस निरीक्षक, शिर्डी पोलिस स्टेशन यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक ३१८७/०७, दिनांक १९ नोव्हेंबर, २००७ रोजीच्या पत्रान्वये दिनांक २७ नोव्हेंबर, २००७ रोजी मा. राष्ट्रपती, भारत सरकार यांचे आगमन ते प्रयाण पावेतो हेलीपॅड ते नवीन प्रसादालय तसेच त्यांचे दौऱ्याचा मार्ग असे रोडचे दोन्ही कडील बाजूस बांबू-बल्लीचे बॅरीकेटींग लावण्याची व्यवस्था करावी, असे कळविलेले आहे.

मा.अधिक्षक अभियतां, साबांमं, अहमदनगर व मा.कार्यकारी अभियंता, साबांवि, संगमनेर यांनी कळविलेल्या खर्चाच्या अंदाजपत्रकात सदरहू बाबीचा खर्च कळविण्यांत आलेला नाही किंवा उल्लेख करण्यात आलेला नाही त्यामुळे या बाबीसाठी ही अतिरिक्त खर्च येणार आहे.

दि.२२.०९.२००७ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समिती सभेमधिल निर्णय क्र.७३३ अन्वये शिर्डी शहरातून जाणारा मालेगांव-कोपरगांव अहमदनगर रस्ता (राज्यमार्ग १० लांबी १६०५) जागतिक बँक प्रकल्पाकडे हस्तांतरीत करणे बाबत सविस्तर चर्चा होऊन, सदरहू रस्ता हा शिर्डी शहरात प्रवेश करण्यासाठी व रहदारीसाठी सर्वात प्रमुख रस्ता आहे. त्यामुळे जोपर्यंत हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पुनःश्च हस्तांतरीत होत नाही तोपर्यंत तो सुस्थितीत ठेवणेसाठी संस्थानतर्फे आवश्यक ती देखभाल व दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रथम सध्या रस्त्यावर काही ठिकाणी पडलेले खड्डे बुजविणे लँडस्केपींगमध्ये भर टाकणे इ. फुटपाथच्या इतर कामांसह दुरुस्ती करण्यात यावी. त्यासाठी येणारे योग्य त्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच रस्त्याचे नुतनीकरणासाठी नव्याने डांबरीकरणचा थर देणेकामी याकामाचे आर्किटेक्ट मे.निकम पाटील असोसिएटस,श्रीरामपूर यांचेकडून सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन घ्यावे व त्यास सार्वजनिक बांधकाम विभागाची तांत्रिक मान्यता घेणेत यावी. त्यानंतर सदरहू प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी सादर करणेत यावा,असें ठरलें आहे.

मा. राष्ट्रपती, भारत सरकार यांचे दौऱ्याबाबत मा. सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक १८ नोव्हेंबर, २००७ रोजी आढावा बैठक आयोजित केलेली होती, सदरहू बैठकीस मा.अध्यक्षसाो. हे ही हजर होते. या बैठकीत उपरोक्त तक्त्यात नमूद केलेली कामे ही सार्वजनिक बांधकाम विभागाने पूर्ण करावीत व त्याबाबतचा निधी संस्थानने उपलब्ध करुन द्यावा, असे मा. सचिवांनी सुचित केलेले आहे. याप्रमाणे संस्थानतर्फे निधी उपलब्ध करावयाचा झाल्यास त्यासाठी प्रथम श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ चे कलम २१ पोटकलम २ नुसार पुर्तता होणे आवश्यक आहे.

मा.अधिक्षक अभियंता, साबांमं, अहमदनगर किंवा मा.कार्यकारी अभियंता, साबांवि, संगमनेर यांनी कळविल्याप्रमाणे, उपरोक्त तक्त्यात नमूद केलेल्या कामांपोटी सार्वजनिक बांधकाम विभागास निधी उपलब्ध करुन देण्यात यावा किंवा कसे याबाबत प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सार्वजनिक बांधकाम विभाग/ मंडळ, अहमनगर यांचेमार्फत मा.राष्ट्रपती दौऱ्याचे वेळेस तयार करण्यात आलेल्या हेलिपॅडचा खर्च वगळून इतर रस्त्याच्या दुरुस्तीचा खर्च आदा करण्यात यावा. सार्वजनिक बांधकाम विभागाने दुरुस्त केलेल्या रस्त्यांमध्ये नगर-मनमाड रस्त्याच दुरुस्तीचा खर्च समाविष्ठ केलेला आहे. सदरहू रस्ता पूर्वी संस्थानने विकसित केला असल्याने या रस्त्याच्या देखभालीचे उत्तरदायित्व सध्या संस्थानवर आहे. तसेच सदरहू रस्ता दुरुस्ती व देखभालीबाबत मा.व्यवस्थापन समितीने यापूर्वीच निर्णय घेतलेला आहे. तत्पूर्वी रस्त्याची राहीलेली

कामे (उदा.सिलकोट, मार्गदर्शक पट्टे मारणे. आदी) सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पूर्ण करुन घेण्यात यावे, असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.६०** **नविन श्रीसाई प्रसादालय इमारतीकरिता यांत्रिक वायूविजन व्यवस्था बसविणेसाठी सल्लागाराची नेमणूक करणेबाबत**

**निर्णय क्र.६०** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) तर्फे मौजे निमगांव कोऱ्हाळे गट नं. ८०,८५ मधिल जागेत नविन श्री साई प्रसादालय इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. सदर इमारतीमध्ये प्रसाद भोजनासाठी ५५०० व्यक्तींची आसनक्षमता आहे. तसेच या इमारतीमध्ये तळमजला व पहिला मजला असून प्रसाद भोजन, बनविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या अद्यावत सुविधा करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये शुध्द पाणी पुरवठा व्यवस्था, उपभांडार गृह, प्रतिक्षागृह, भाजीपाला साठवणुकीसाठी शित गृहाची सोय, स्वतंत्र जनरेटर रुम आदी महत्वाच्या सुविधा करण्यात आल्या आहेत. तसेच परिसर सुशोभिकरणासाठी बाग-बगिचा व प्रशस्त अंतर्गत रस्त्यांचे अंतर्भाव या इमारतीमध्ये करण्यात आलेला आहे.

सदर इमारतीमध्ये मोठ्या प्रमाणावर साईभक्त प्रसाद भोजन घेणार आहेत. त्यामुळे साहजिकच मुख्य किचन मध्ये मोठ्या प्रमाणावर अन्न शिजविण्यात येईल. या ठिकाणी ज्वलन व वाफ यामुळे यांत्रिक वायुविजन आवश्यक आहे. तरी मुख्य किचन, बुंदी किचन, स्टोअर व इतर आवश्यक ठिकाणी यांत्रिक स्वरुपाची वायुविजन व्यवस्था करणेत यावी अशी सूचना मा. विश्वस्त श्रीमती उर्मिला जाधव यांनी केली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, नवीन श्री साई प्रसादालय इमारतीकरीता वायुवीजन व्यवस्था करण्यासाठी जाहिरात देऊन अर्ज मागणी करुन तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करण्यात यावी. याकामी सविस्तर प्रस्ताव, अंदाजपत्रक तयार करणे व इतर अनुषंगिक कार्यवाही विद्युत विभागामार्फत पूर्ण करण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं.६१** **नविन श्रीसाई प्रसादालय इमारत व श्रीसमाधी मंदीर परिसर येथे बसविणेकरिता पितळी अक्षरांचे फलक तयार करणेबाबत.**

**निर्णय क्र.६१** संस्थानचे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नं. ८०,८५ मधील जागेत नविन प्रसादालय इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले आहे. सदरहू इमारत अतिशय भव्य अशा स्वरुपाची असून या इमारतीत विविध विभाग आहेत. उदा. मुख्य किचन, बुंदी किचन, मुख्य डायनिंग हॉल, व्ही.आय.पी. डायनिंग स्वच्छतागृह इ. असे सर्व विभाग मिळून एकूण ३८ (आडतीस )विभाग आहेत. त्यांचे स्थान साईभक्तांना सहजरित्या निश्चित लक्षात यावे यासाठी पुर्वी लावण्यात आलेल्या पितळी अक्षरांप्रमाणे परंतू योग्य त्या आकाराचे विविध बोर्ड पितळी अक्षरांमध्ये तयार करुन बसविण्यात यावेत. तसेच यापुर्वी मंदिर परिसराचे पश्चिमेकडील कम्पाऊंडवर " श्री साईबाबा समाधी मंदिर परिसर, शिर्डी " असा मराठी व इंग्रजी प्रत्येकी एक पितळी अक्षरांमधिल फलक लावलेला आहे. असे अजून प्रत्येकी एक फलक कम्पाऊन्डवर लावण्यात यावेत अशी सूचना मा. विश्वस्त श्रीमती उर्मिला जाधव यांनी केली आहे. त्याचप्रमाणे समाधी मंदिर परसरातील पवित्र वारसा इमारती व इतर प्रमुख स्थानांना मराठी व इंग्रजी पितळी अक्षरांचे बोर्ड बसविणे सुशोभिकरणाचे दृष्टीने आवश्यक असून त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | श्री समाधी मंदिर | ०२. | श्री चावडी |
| ०३. | श्री व्दारकामाई | ०४. | श्री गुरुस्थान |
| ०५. | वस्तु संग्रहालय | ०६. | दिक्षीत वाडा |
| ०७. | श्री साईसत्यव्रत पुजा कक्ष | ०८. | श्री नंदादिप |
| ०९. | लेंडीबाग | १०. | श्री दक्षिण मुखी हनुमान मंदिर |
| ११. | श्री दत्त मंदिर | १२. | श्री शनि मंदिर |
| १३. | श्री महादेव मंदिर | १४. | श्री गणेश मंदिर |

वरिल प्रमाणे बोर्ड तयार करण्यासाठी अशा प्रकारच्या विशेष पुरवठाधारकांकडून कोटेशन्स मागविता येतील.

तरी वरीलप्रमाणे पितळी अक्षरांचे बोर्ड तयार करण्यासाठी कोटेशन्स अथवा निविदा मागविणेस व याकामी आवश्यक योग्य त्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, पितळी अक्षरांचे बोर्ड तयार करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन्स मागवून पितळी अक्षरे तयार करुन घेणे व ती बसविणेसाठी एम.एस./आर.सी.सी.शिट बोर्डस् तयार करणे इत्यादी कामासाठी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.
(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.६२** **नविन प्रसादालयाकरिता एल.पी.जी.गॅस प्लॅन्ट उभारणीकामी फेर दरपत्रके मागविणेबाबत.**

**निर्णय क्र.६२** नविन प्रसादालयाकरिता एल.पी. गॅस यंत्रणा उभारणीकामी येणा-या अंदाजे रु.२,००,००,०००/- खर्चास व वृत्तपत्रात जाहिरात देउन जाहिर निवीदा मागविणेस मा. व्यवस्थापन समिती

दि.२९/०६/२००७ चे सभेतील निर्णय क्र.४७१ ने मान्यता मिळालेली आहे. त्यानूसार प्रसादालयाकडील दि.०९/०८/२००७ चे टिपणीन्वये जाहिर निवीदाकामी वृत्तपत्रात जाहिरात देण्यात आलेली आहे. उपरोक्त जाहिरातीनुसार खालीलप्रमाणे निवीदाधारकांनी को-या निवीदा खरेदी केलेल्या आहेत व त्या सर्व निवीदाधारकांनी दरपत्रक सादर केलेली आहेत.

| अं.नं. | निवीदाधारकाचे नाव | पत्ता |
|---|---|---|
| ०१ | ग्लोब गॅस इक्वीपमेंट प्रा.लि. | मुंबई |
| ०२ | स्पीटेक इक्वीपमेंट प्रा.लि. | भांडुप, मुंबई |
| ०३ | इंडस्ट्रीयल इंजिनिअरिंग कंपनी | नवी मुंबई |
| ०४ | लार्सन ॲण्ड टुब्रो लि. | पुणे |

वरीलप्रमाणे १ ते ४ सिलबंद दरपत्रके मा. व्यवस्थापन उपसमिती दि.२०/१२/२००७ चे सभेमध्ये उघडण्यात आलेली असून एल.पी.गॅस प्लॅन्ट उभारणीकामी नेमलेले तज्ञ सल्लागार मे. सफेस क्वॉलिटी मॅनेजमेंट यांचे प्रतिनीधी श्री एच.के.सुतार यांनी दि.२२/१२/२००७ रोजी चारही टेंडरचे अनप्राईजबीडची समक्ष तपासणी केलेली आहे व सविस्तर अहवाल (इन्स्पेक्शन रिपोर्ट) दिलेला आहे. त्यामध्ये त्यांनी नमूद केलेले आहे की, मे. ग्लोब गॅस इक्वीपमेंट प्रा.लि. मुंबई यांनी टेंडरमधील अटी / शर्ती प्रमाणे संपूर्ण पुर्तता केलेली आहे त्यांनाच चर्चा व वाटाघाटीसाठी बोलविता येईल.

| अं.नं. | निवीदाधारकाचे नाव | टेंडरमधील प्री क्वालिफीकेशन बाबत. |
|---|---|---|
| , ०१ | ग्लोब गॅस इक्वीपमेंट प्रा.लि., मुंबई | संपूर्ण पुर्तता केलेली आहे. |
| ०२ | स्पेसटेक इक्वीपमेंट प्रा.लि. भांडुप, मुंबई | EMD रकमेचा डी.डी.जोडलेला नाही. तसेच एकूण १६ पैकी १० अटींच्या पात्रतेविषयी पुर्तता नाही. |
| ०३ | इंडस्ट्रीयल इंजिनिअरिंग कंपनी, नवी मुंबई | एकूण १६ पैकी १० अटींच्या पात्रतेविषयी पुर्तता नाही. |
| ०४ | लार्सन ॲण्ड टुब्रो लि., पुणे | एकूण १६ पैकी १५अटींच्या पात्रतेविषयी पुर्तता नाही. |

नविन प्रसादालयाकरीता माउंडेड एल.पी. गॅस प्लॅन्ट उभारणीकामी निवीदा मागविणेसाठी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. जाहिरातीनुसार निवीदा फॉर्म विक्रीची दि.२०/८/२००७ ते ३०/८/२००७ अखेर होती. निवीदा फॉर्म खरेदीनंतर टेंडर भरतांना काही तांत्रिक शंका, प्री क्वॉलिफीकेशनबाबत अडचणी असतील तर त्याचे निवारण करणेकामी कन्सलटंट यांचे प्रतिनीधीचे उपस्थितीत दि.०५/९/२००७ रोजी प्री बीड मिटींग बोलविण्यात आलेली होती. सदर मिटींगसाठी निवीदा खरेदी करणाराचे प्रतिनीधी समक्ष हजर होते. त्यांचे अडचणी व शंकांचे समाधान करण्यात आलेले असतांना देखील अ.नं.२ ते ४ या निवीदासादरकर्त्यांनी निवीदेमधील अटी / शर्तींची पुर्तता केलेली नाही.

नविन प्रसादालयासाठी एल.पी.गॅस प्लॅन्ट उभारणीकामी नियुक्त केलेले तज्ञ सल्लागार मे.सफेस क्वालिटी मॅनेजमेंट यांचे प्रतिनिधी श्री सुतार यांनी दिलेला अहवाल पाहता फक्त एकच निविदा सादरकर्ते पात्र आहेत व उर्वरीत ३ निविदा सादरकर्ते अपात्र आहेत. एल.पी.जी गॅस प्लॅन्ट उभारणीचे काम अंदाजे रु.२,००,००,०००/- (अक्षरी रु.दोन कोटी मात्र) पेक्षा जास्त खर्चाचे असल्यामुळे एकच निविदा विचारात घेउन प्लॅन्ट उभारणी करणे योग्य होईल असे वाटत नाही. तरी फेर निविदा मागणी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदर कामी अल्प मुदतीची तातडीची नोटीस देऊन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले. (कार्यवाही-प्रसादालय विभागप्रमुख)

**विषय नं. ६३** **नविन प्रसादालयाकडे हाय-मास्ट उभा करुन त्यावर मेटल हॅलाईड लॅम्प बसविणेबाबत व डोममध्ये मेटल हॅलाईड लॅम्प बसविणेबाबत.**

**निर्णय क्र.६३** दिनांक ११-०८-२००७ रोजी नविन प्रसादालयाकडे मा.अध्यक्ष साहेब, मा.उपाध्यक्ष साहेब, मा.विश्वस्त- श्री.डॉ.गोंदकर, श्री.वाबळे तसेच मा.श्रीमती जाधव यांचा राऊंड झाला असता, मा.उपाध्यक्ष, मा. वाबळे व मा.श्रीमती जाधव यांनी, इमारतीच्या पुढील दर्शनी भागामध्ये श्रीं चे मुर्तीची स्थापना करण्यात आलेली आहे. श्रीं चे मुर्तीवर रात्रीचे वेळेस पुरेसा शुभ्र प्रकाश असणे गरजेचे आहे. शिवाय इमारतीच्या पुढील दर्शनी भाग रात्रीचे वेळेस प्रकाशमय करावा लागणार आहे. श्रीं चे मुर्तीवर व इमारतीवर जास्त प्रकाश राहील याकरीता याठिकाणी १६ मीटरचा एक हाय-मास्ट लॅम्प लावणेबाबत सुचविले. म्हणून १६ मीटरचा एक हाय-मास्ट पोल व त्यावर मेटल हॅलाईड लॅम्प लावणेसाठी किती खर्च येऊ शकतो याचे इस्टिमेट त्वरीत कळविण्याविषयी आर्किटेक्ट मे.शक्ति परमार ॲड असोशिएटस, मुंबई यांना लेखी पत्राद्वारे विनंती करण्यात आली होती.

मे.आदिती इलेक्ट्रीकल्स, नासिक यांना नविन प्रसादालयाच्या इलेक्ट्रिफिकेशनच्या कामासाठी रु. ३,०३,९९,६६१.१५ इतक्या रकमेचा कार्यादेश संस्थान पत्र क्र. एसएसएस / विद्युत / ६५१ / २००७ दिनांक १२-०१-२००७ अन्वये देण्यात आलेला आहे.

मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांना नविन प्रसादालय इलेक्ट्रीकल कामाचे दिलेल्या कार्यादेशात हाय-मास्ट पोल व त्यावर मेटल हॅलाईड फिटींग बसविणेच्या कामाचा समावेश नाही. आर्किटेक्ट, मे.शक्ति परमार ॲंड असोशिएटस, मुंबई यांनी १६ मीटरचा हाय-मास्ट पोल व त्यावर मेटल हॅलाईड लॅम्प लावणेबाबत इस्टिमेट पाठविले असून महाराष्ट्र शासनाच्या डी.एस.आर.नुसार प्रती एक हायमास्ट पोल व त्यावरील लॅम्प फिटींग्जसाठी रु. ५,८९,१६६.७६ इतका खर्च कळविला आहे.

तसेच नविन प्रसादालयाच्या इमारतीत १४ डोम ( पिरॅमिड ) तयार करण्यात आले असून या डोममध्ये प्रकाशासाठी पूर्वीच्या इस्टिमेट महाराष्ट्र शासनाच्या डी.एस.आर.नुसार रु. १५,९७,५९६.०० किंमतीच्या ३५० इफिशिएन्ट टी-फाईव्ह फिटींग्ज बसविण्यात येणार होत्या. परंतू डोमच्या हाईटमुळे त्यांचा प्रकाश कमी पडत असल्याने फिलीप्स कंपनीच्या इंजिनिअर्सनी येऊन समक्ष पाहणी करून अहवाल दिल्यानुसार आर्किटेक्ट, मे.शक्ति परमार ॲंड असोशिएटस, मुंबई यांनी फिलीप्स कंपनीच्या इंजिनिअर्सनी सुचविल्यानुसार या डोममध्ये एकुण २२४ मेटल हॅलाईड लॅम्प लावण्यास लेखी कळविले असून महाराष्ट्र शासनाच्या डी.एस.आर.नुसार एकुण रु.१८,८१,४०२.४३ इतका खर्च येणार आहे. परंतू त्याठिकाणी पूर्वी प्रस्तावित असणाऱ्या ३५० इफिशिएन्ट टी-फाईव्ह फिटीग्ज कमी होणार असून त्यामुळे आता मेटल हॅलाईड लॅम्पसाठी फक्त रु. २,८३,८०६.४३ इतका जादा खर्च होणार आहे.

तरी महाराष्ट्र शासनाच्या डी.एस.आर.नुसार, हायमास्ट पोल व त्यावरील लॅम्प फिटींग्जसाठी रु. ५,८९,१६६.७६ व डोममधील लाईट फिटींग्जसाठी जादा रु. २,८३,८०६.४३ मिळून एकुण रुपये ८,७२,९७३.१९ इतका खर्च अपेक्षित आहे. हे काम मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांचेकडून इस्टिमेट दरानुसार करून घेता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्तकामी जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात. तसेच मे.आदिती इलेक्ट्रीकल्स,नाशिक यांनी केलेल्या कामाचे नियमानुसार बिल आदा करण्यात यावे असे ठरले. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं. ६४** **श्री समाधी मंदिर महाव्दार गेटवरील स्टेनलेस स्टिल रेलींगचे कामास कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत**

**निर्णय क्र.६४** दिनांक २७-१२-२००७ रोजी महामहिम राष्ट्रपती, भारत सरकार यांचा शिर्डी भेट दौरा असल्याने समाधी मंदिरातील `` श्रीं ``चे दर्शनावेळी समाधी मंदिर महाव्दार गेटवरील पाय-या उंच व चढण्यास कठीण असल्याने तेथे स्टेनलेस स्टील रेलींग बसविणेकामी मा.प्रशासकीय अधिकारी, श्री.जगताप साहेब व वरिष्ठ मुख्य अभियंता, बांधकाम विभाग, श्री.आहेर यांनी तोंडी आदेश दिले होते. त्यानुसार तातडीने स्टेनलेस स्टील रेलींग तयार करणेसाठी वर्कशॉप फॅब्रिकेटर्स, मे.साई इंजिनिअर्स, नाशिक यांना प्रत्यक्ष बोलावून तातडीने स्टेनलेस स्टील रेलींग तयार करुन उत्तर महाव्दार गेटवर फिट करुन घेतले. मे.साई इंजिनिअर्स, नाशिक यांनी याकामासाठी आलेले खर्चाचे बील क्र. एस-२६ दि. ०३-१२-२००७ अन्वये बील सादर केले आहे. तपशील खालीलप्रमाणे.

| Sr.No. | Material Details | Qty. | Rate. | Cost. |
|---|---|---|---|---|
| 01) | STAINLESS STEEL 304 ROUND PIPE - 50MM DIA. X 16 SWG THK. | 40 ft. | Rs. 220.00 (Per ft.) | Rs. 08,800.00 |
| 02) | STAINLESS STEEL 304 ROUND PIPE - 38MM DIA. X 16 SWG THK. | 40 ft. | Rs. 170.00 (Per ft.) | Rs. 06,800.00 |
| 03) | STAINLESS STEEL 304 90 DEG. BEND - 50MM DIA. | 04 Nos. | Rs. 220.00 (Per Nos.) | Rs. 00,800.00 |
| 04) | STAINLESS STEEL 304 GROUND PIPE BRACKET WITH HARDWARE SIZE :- 60 MM DIA X 10” | 04 Nos. | Rs. 500.00 (Per Nos.) | Rs. 02,000.00 |
| 05) | WELDING ROD | 2.0 KG. | Rs. 2500.00 (Per KG.) | Rs. 05,000.00 |
| 06) | LABOUR COST. INCLUDING FITTING AT SITE WITH CIVIL WORK. | | ------- | Rs. 10,000.00 |
| | | | TOTAL :- | Rs. 28,400.00 |
| | | | Total cost of Railing Work :- | Rs. 28,400.00 |
| | | | Taxes Vat 12.5% :- | Rs. 03,550.00 |
| | | | Transportation :- | Rs. 01,000.00 |
| | | | **Total cost of Railing :-** | **Rs. 32,950.00** |

उपरोक्तप्रमाणे श्री समाधी मंदिर महाव्दार गेटवर तातडीने बसविण्यात आलेल्या स्टेनलेस स्टील रेलींगचे बील मे.साई इंजिनिअर्स, नाशिक यांनी सादर केले असून बीलाची रक्कम रुपये ३२,९५०.०० मात्र मे.साई इंजिनिअर्स, नाशिक यांना आदा करणेस व आलेल्या खर्चास कार्योत्तर

मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यतादेण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं. ६५ मे.आयव्हिआरसीएल इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲण्ड प्रोजेक्टस् लि.,हैद्राबाद याचें नविन प्रसादालयाचे इलेक्ट्रीक कामाचे रनिंग बीलाची रक्कम आदा करणेबाबत.**

**निर्णय क्र.६५** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०४-०३-२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या मिटींगमध्ये नविन प्रसादालयाचे इलेक्ट्रीकल कामाबाबत विचारविनिमय होऊन नविन प्रसादालय प्रकल्पाच्या इमारतीसाठी नेमण्यात आलेले आर्किटेक्ट, मे.शक्ती परमार ॲण्ड असोसिएटस्, मुंबई यांचेकडून आलेल्या इलेक्ट्रीकल कामाच्या इस्टिमेटची तांत्रिक पडताळणी सार्वजनिक बांधकाम, विद्युत विभाग यांचेकडून करुन घेऊन या कामासाठी त्यांची तांत्रिक मान्यता प्राप्त करण्यात यावी व त्यानुसार निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले होते. त्यानुसार इलेक्ट्रीकल कामाचे अंदाजपत्रकाचे मान्यतेबाबत अनुक्रमे (०१) मा.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग, नाशिक, यानंतर (०२) मा.अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग, औरंगाबाद व शेवटी (०३) मा.मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग, मुंबई यांचेकडून पडताळणी करुन घेण्याची पद्धत असल्याने प्रथम नविन प्रसादालयाच्या इलेक्ट्रीकल कामाचे इस्टिमेट मा.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग, नाशिक यांचेकडे मान्यतेसाठी व पडताळणीसाठी सादर करण्यात आले होते.

या दरम्यान मे.आयव्हिआरसीएल इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲण्ड प्रोजेक्टस् लि,हैद्राबाद यांना जा.नं.एसएसएस / वशी-बांधकाम / ५९२१ / २००६ दिनांक ०३-०५-२००६ अन्वये इमारतीच्या सिव्हील कामाचा कार्यादेश देण्यात येऊन त्यानुसार त्यांनी काम चालू केले होते. परंतू नविन प्रसादालय इलेक्ट्रीकल कामाचे इस्टिमेटच्या मान्यतेची कार्यवाही चालू असल्याने तोपर्यंत इलेक्ट्रिकलचे टेंडर काढलेले नव्हते, व त्यामुळे इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर नेमलेला नव्हता. म्हणून मे.आयव्हिआरसीएल इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲण्ड प्रोजेक्टस् लि,हैद्राबादच्या चालू असलेल्या कामामध्ये स्लॅबमधील टाकावयाच्या इलेक्ट्रिकलच्या पी.व्ही.सी.पाईपबाबत प्रश्न निर्माण झाला होता व त्यामुळे मे.आयव्हिआरसीएल इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲण्ड प्रोजेक्टस् लि, हैद्राबाद यांचे स्लॅबचे काम थांबलेले होते.

शिर्डी येथे दिनांक २१-०८-२००६ रोजी मा.विश्वस्त श्रीमती जाधव मॅडम यांचे समवेत नविन प्रसादालयाच्या चालू असलेल्या कामाच्या प्रगती आढाव्यासाठी झालेल्या मिटींगमध्ये नविन प्रसादालय इलेक्ट्रीकल इस्टिमेटची तांत्रिक पडताळणीची कार्यवाही प्रक्रीया चालू असल्याने व त्यामुळे इलेक्ट्रिकल कामाचे टेंडर काढण्यास वेळ लागणार असल्याने या कालावधीत मे.आयव्हिआरसीएल इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲण्ड प्रोजेक्टस् लि,हैद्राबाद यांचे काम थांबू नये म्हणून मे.आयव्हिआरसीएल इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲण्ड प्रोजेक्टस् लि,हैद्राबाद यांनी इलेक्ट्रिकल कामाचे टेंडर फायनल होईपर्यंत चालू असलेल्या कामातील स्लॅबमध्ये पी.व्ही.सी.पाईप टाकणेचे ठरले, यास अनुसरुन मे.शक्ती परमार ॲण्ड असोसिएटस् , मुंबई यांनी मे.आयव्हिआरसीएल इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲण्ड प्रोजेक्टस् लि,हैद्राबाद यांचे दर पडताळून त्यांचे दिनांक १२-०९-२००६ चे फॅक्स अन्वये दर मंजूर केलेले होते व याबाबत मे.टाटा कन्सल्टंसी सर्व्हीसेस यांना मे.आयव्हिआरसीएल इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲण्ड प्रोजेक्टस् लि,हैद्राबाद यांना पत्र क्र.TCE-४९३८A-०४-०५९ अन्वये पाईप टाकणेविषयी कळविलेले होते. त्यानुसार मे.आयव्हिआरसीएल इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲण्ड प्रोजेक्टस् लि,हैद्राबाद यांनी स्लॅबमध्ये पाईप टाकलेले आहे. व या स्लॅबमध्ये टाकलेल्या पी.व्ही.सी.पाईपचे रु. २,३६,८८०.२५ इतक्या रक्कमेचे २ रे रनिंग बील त्यांनी सादर केलेले होते. सदरचे बील व काम मे.शक्ती परमार ॲण्ड असोसिएटस्, मुंबई यांनी चेक करुन बीलाची रक्कम रुपये रु. १,३१,५३६.३८ इतकी झाली आहे. तरी मे.आयव्हिआरसीएल इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲण्ड प्रोजेक्टस् लि,हैद्राबाद यांना रु. १,३१,५३६.३८ इतकी बीलाची रक्कम आदा करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-विद्यूत विभागप्रमुख)

**विषय नं. ६६ श्रीसाईबाबा हॉस्पिटल टेरेसवरील शेडला ग्रील बसविणेबाबत.**

**निर्णय क्र.६६** श्री साईबाबा हॉस्पीटल टेरेसवर रुग्णांचे नातेवाईकांसाठी पॉलिकॉर्बोनेटचे छत असलेले शेड तयार करण्यात येत आहे. सदरहू शेड हे कॅथलॅब व कार्डीयॅक ओ.टी.चे पेशंटचे नातेवाईकांना थांबणेकरीता तयार करण्यात आले आहे. सदरचे शेड हे हॉस्पीटल जुन्या बिल्डींग टेरेसवर असले कारणाने टेरेसवर शेडचे चहूबाजूने ७ फूट उंची पर्यंत ग्रील बसविणे गरजेचे आहे. जेणेकरुन टेरेसवर इतरत्र कुणालाही प्रवेश करता येणार नाही.

तरी उपरोक्तप्रमाणे शेडचे बाजूने ७ फूट उंचीचे एम.एस.ग्रील विद्युत विभागामार्फत बसवून मिळणेकामी बांधकाम विभागाने दिनांक ०५-०७-२००७ चे पत्रान्वये कळविले आहे. श्री साईबाबा हॉस्पीटल टेरेसवर रुग्णांचे नातेवाईकांना थांबणेसाठी करण्यात आलेल्या शेडचे सभोवती लोखंडी

एम.एस.ग्रील बनविणेसाठी आवश्यक असणारे मटेरीअल विद्युत विभागातील वर्कशॉपमध्ये उपलब्ध नसल्याने खालीलप्रमाणे मटेरीअल खरेदी करावे लागणार आहे.

| अ.क्र. | तपशील | मागणी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | एम.एस.स्क्वेअर पाईप, साईज:-४० x ४० x ३ एम.एम. | ८५० फूट. | रु. ८०.०० (प्रति फूट) | रु. ०,६८,०००.०० |
| ०२) | एम.एस.आयताकृती पाईप, साईज:-२० x ४० x ३ एम.एम. | १०० फूट. | रु. ६०.०० (प्रति फूट) | रु. ०,०६,०००.०० |
| ०३) | एम.एस.स्क्वेअर बार, साईज :- १२ एम.एम. | ९०० कि.ग्रॅ. | रु. ४०.०० (प्रति कि.ग्रॅ.) | रु. ०,३६,०००.०० |
| ०४) | एम.एस.शीट, साईज :- ८` x ४` x १८ गेज. | ०३५ कि.ग्रॅ. | रु. ६५.०० (प्रति कि.ग्रॅ.) | रु. ०,०२,२७५.०० |
| ०५) | हेवी बट बिजागरी, साईज :- ६`` | ०१२ नग. | रु. ४०.०० (प्रति नग.) | रु. ०,००,४८०.०० |
| ०६) | स्टेनलेस स्टील ऑल्ड्रॉप, साईज :- १२`` | ००४ नग. | रु. ८०.०० (प्रति नग.) | रु. ०,००,३२०.०० |
| | | | एकुण रक्कम<br>+ वॅट १२.५ % | रु. १,१३,०७५.००<br>रु. ०,१४,१३४.०० |
| | | | एकुण रक्कम<br>+ लेबर चार्जेस २५% | रु. १,२७,२०९.००<br>रु. ०,३१,८०२.०० |
| | | | एकुण रक्कम रु.<br>+ सर्व्हीस टॅक्स १२.५% | रु. १,५९,०११.००<br>रु. ०,१९,८७६.०० |
| | | | एकुण रक्कम :- | रु. १,७८,८८७.०० |

श्री साईबाबा हॉस्पीटल टेरेसवर करण्यात आलेल्या शेडचे सभोवती लोखंडी एम.एस.ग्रील बसविणेकरीता अंदाजे रक्कम रुपये १,७८,८८७/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

सदर प्रस्तावास मान्यता मिळणेस व कोटेशन बोलावून उपरोक्त काम करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं. ६७** **नवीन प्रसादालय प्रकल्पाचे इलेक्ट्रिकल कामास मुदतवाढ देणेबाबत**

**निर्णय क्र.६७** दि. ०६-०१-२००७ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार मे.आदिती इलेक्ट्रिकल्स,नासिक यांना नविन प्रसादालयाच्या इलेक्ट्रिफिकेशनच्या कामासाठी रु. ३,०३,९९,६६१.१५ इतक्या रकमेचा कार्यादेश संस्थान पत्र क्र.एसएसएस / विद्युत / ६५१ / २००७ दि.१२-०१-२००७ अन्वये देण्यात आला आहे. त्यांनी दिनांक २५-१२-२००७ रोजी एक पत्र दिले असून त्यात पुढीलप्रमाणे लेखी विनंती केली आहे.

वरील संदर्भीय विषयानुसार आम्ही नविन प्रसादालय इमारतीचे विद्युतीकरण पुर्ण केलेले आहे. परंतू खालील दिल्याप्रमाणे काही कामे अजून बाकी आहे. तरी ती पुर्ण करण्यासाठी मुदतवाढ देण्यात यावी.

०१). मीटर रुम बांधकाम करुन आम्हाला १५ डिसेंबरला ताब्यात देण्यात आली. त्यानुसार आम्ही ट्रान्सफॉर्मर सबस्टेशन व मीटर बसविण्याचे काम चालू केलेले आहे. सदर काम पुर्ण होण्यास एक महिन्याचा कालावधी लागेल.

०२). ऑफीस, व्ही.आय.पी., डायनिंग हॉल, सिलिंग व लँड स्केपिंगचे अद्याप काम चालू आहे. ते काम संपल्यानंतर आम्हाला विद्युत कामाला १५ दिवस लागणार आहे.

०३). अद्याप किचन व स्टोअर्सची मशिनरी बसविलेली नाही. मशिनरी बसविल्यानंतर आम्हाला पॉवर वायरींग करावे लागणार आहे.

तरी वरील सर्व कामाचे स्वरुप पाहता विद्युत काम पुर्ण होणेस माहे जानेवारी-२००८ पुर्ण महिना लागेल. तरी कृपया आम्हाला नविन प्रसादालय इमारत विद्युतीकरण कामास ३१ जानेवारी २००८ पर्यंत मुदतवाढ मिळावी, ही विनंती.

मे.आदिती इलेक्ट्रिकलचे काम हे आयव्हीआरसीएलच्या कामाबरोबरीने होणारे आहे. साईटवरील आयव्हिआरसीएलच्या कामाबरोबरच मे.आदिती इलेक्ट्रिकलचे काम चालू होत. आयव्हिआरसीएलकडून साईट क्लिअर करून मिळाल्यानंतरच मे.आदिती इलेक्ट्रिकलचे काम चालू करावे लागत होते. मे. आदिती इलेक्ट्रिकल्स, नासिक यांचे कामाची मुदत कार्यादेश दिल्यानंतर सहा महिन्यांची होती, परंतू त्यांनी पत्रात नमूद केलेल्या बाबी व मा. अमृता पवार, आर्किटेक्ट यांचे मार्गदर्शनाखाली ऑफीस, व्ही.आय.पी., डायनिंग हॉल, सेलिंग व लँड स्केपिंगचे काम चालू असल्याने मे. आदिती इलेक्ट्रिकल्स, नासिक यांना जानेवारी २००८ पर्यंत मुदतवाढ देणे गरजेचे असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विद्यूत विभागप्रमुख)

**विषय नं. ६८** **साईकथामृत पुस्तक मराठी व गुजराथी भाषेत प्रकाशित करणेबाबत.**

**निर्णय क्र.६८** श्री. जयसिंह ब. निंबाळकर यांनी त्यांचे दि.०४.०८.२००७ चे पत्राद्वारा मराठी व गुजरातीत संकलीत केलेले साईकथामृत ही दोन पुस्तके संस्थाननी छापावी व साईभक्तांपर्यंत पोहचवावी अशी विनंती केली आहे. त्यांनी सदरचे दोन्ही पुस्तके ही श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी प्रकाशित श्री साईंचे सत्यचरित्र कै. मु.ब. निंबाळकर लिखीत गद्यभाष्य पुस्तकातील प्रत्येक अध्यायातील कथा, प्रसंग याचे १३१ भागात संग्रहीत करुन सदर दोन्ही पुस्तकात समाविष्ट केली असल्याचे नमुद केले आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी द्वारा श्री साईबाबांचे जीवनावर , कथांवर व श्री साईबाबांची शिकवण व तत्त्वज्ञान यावर आधारित सध्या ६९ प्रकारची प्रकाशित झालेली पुस्तके आहेत. त्यात मराठी भाषेतील १८ पुस्तके व गुजराथी भाषेतील ६ प्रकारचे पुस्तके संस्थान प्रकाशित आहेत. यातील श्री साईसच्चरित्र मराठी व श्री साईसत्चरित्र गुजराथी ,श्री साईंचे सत्य चरित्र व दैनंदिन साईबोध या मराठी ग्रंथास चांगली मागणी आहे. तसेच श्री जयसिंह निंबाळकर बडोदे यांनी त्यांचेकडील दि.०६.११.२००५ चे पत्रान्वये संस्थान प्रकाशित १) दैनंदिनी साईबोध २) श्री साईंचे सत्य चरित्र ३) श्री साईबाबा अवतार व कार्य ४) शिलधी ५) श्री साईबाबांची शिकवण व तत्त्वज्ञान, या जुन्या मराठी साहित्याचे गुजराथी अनुवाद करुन साईभक्तांना उपलब्ध करुन देण्याची इच्छा प्रकट केलेनुसार सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि.०४.०२.२००६ रोजीचे सभेत निर्णयार्थ सादर केला असता, सदरच्या सभेतील विषय नं. ३५ निर्णय क्र.३५ नुसार सदरची पाच गुजराथी भाषांतरीत पुस्तके संस्थानद्वारे प्रकाशित करणेस मान्यता देण्यात आली असून, त्याकामीचे गुजराथी भाषेत डी.टी.पी. तयार करुन घेणेस व त्यासाठी येणा-या खर्चास मिळालेल्या मान्यते अन्वये श्री जयसिंह निंबाळकर यांना त्यांचे द्वारा प्रस्तुत वरील पाचही मराठी पुस्तकांचे गुजराथी भाषेत डी.टी.पी. तयार करण्याचे काम चालू करणेबाबत त्यांना जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/३४२०/२००६ दि.१०.०३.२००६ अन्वये कळविण्यात आले आहे. याप्रमाणे गुजराथी भाषेतील निर्णायक पुस्तकांचे प्रकाशन होणे बाकी आहे.

श्री. जयसिंह ब. निंबाळकर यांनी प्रस्तुत केलेले श्री साईकथामृत मराठी व गुजराथी भाषेतील दोन्ही पुस्तकात श्री साईंचे सत्यचरित्र कै. मु.ब. निंबाळकर लिखीत गद्यभाष्य पुस्तकातील प्रत्येक अध्यायातील कथा, प्रसंग याविषयी सारांशरुपाने संदर्भ घेण्यात आलेले आहे. तेंव्हा श्री. जयसिंह ब. निंबाळकर यांनी प्रस्तुत केलेले श्री साईकथामृत मराठी व गुजराथी भाषेतील कथारुप संक्षिप्त चरित्र वजा पुस्तके संस्थानव्दारा प्रकाशित करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं. ६९** **श्री साई स्तवन मंजिरी, तेलगु पुस्तक छपाईस व सी.डी. काढणेस परवानगी देणेबाबत.**

**निर्णय क्र.६९** श्रीमती जी. शोभा, हैद्राबाद ह्या साईभक्त असून, त्यांनी त्यांचे दि.१३.०८.२००७ चे पत्राद्वारा तेलगू स्तवन मंजरीची ऑडीओ सी.डी. व श्री साई स्तवन मंजिरी तेलगूच्या २५,०००/- प्रतींचे छपाई करण्याची इच्छा प्रकट केली आहे. ते सदरची स्तवन मंजिरी ही मराठी स्तवन मंजिरीचे तेलगू भाषेत रुपांतर करुन पुस्तक व सी.डी. ची निर्मिती करु इच्छित असलेबाबत मत प्रकट केले आहे. त्याकरीता त्यांनी संस्थानकडे परवानगी मिळणेविषयी विनंती केली आहे.

श्री साई स्तवन मंजिरीचे हक्क संस्थानकडे आहेत, श्री साईबाबांचे कार्याचा प्रचार - प्रसार व्हावा तसेच स्तवन मंजरीचे मुळ सहितेत बदल न करता या तत्त्वावर त्यांना तेलगू स्तवन मंजिरीचे पुस्तक छपाईस व सी.डी. निर्मितीस परवानगी देणेस हरकत नाही. फक्त पुस्तकाचे व सी.डी चे सुरुवातीस श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या सौजन्याने अशी टिप मुद्रीत करणेस त्यांना सांगता येईल.

तरी श्रीमती जी.शोभा हैद्राबाद यांनी त्यांचे दि.१३.८.२००७ चे पत्राद्वारे नमुद केलेप्रमाणे त्यांना मराठी स्तवन मंजिरीचे तेलगूत रुपांतर करुन तेलगू स्तवन मंजिरीचे पुस्तक छपाईस व सी.डी. निर्मितीस परवानगी देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं. ७०** **मे.अजय ऑफसेट प्रा.लि., पुणे यांचेकडून मुदतीनंतर प्राप्त पुस्तकांचे छपाई बिलातून विलंब शुल्क आकारणेबाबत.**

**निर्णय क्र.७०** मे. अजय ऑफसेट प्रा.लि, पुणे यांना जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/१८८६/२००७ दि.०३.०२.२००७ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी प्रकाशित खालील तपशिलाप्रमाणे पाच प्रकारची पुस्तके व एक प्रकारचा फोटो या प्रमाणे छपाई कामाचा पुरवठा आदेश देण्यात आला आहे.

अ) पुस्तके छपाई

| अ.नं | पुस्तकाचे नाव | छपाई संख्या | मंजूर दर व्हट व सर्व करांसह | संस्थान विक्री किंमत रु. पै. |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साईसत् चरित्र, कन्नड | २५,००० | २१.२३ पैसे | ३०.०० |
| ०२ | श्री सदगुरु साईनाथ सगुणोपासना आरती मराठी | १,२५,००० | १.६८ पैसे | २.०० |
| ०३ | श्री साईनाथ स्तवन मंजरी व सुमनांजली - मराठी | २०,००० | १.५३ पैसे | २.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०४ | श्री साईनाथ स्तवन मंजरी-गुजराथी | ५,००० | १.८४ पैसे | ३.०० |
| ०५ | मातृसाई- तेलगू | २०,००० | २३.७९ पैसे | ३०.०० |

ब) फोटो छपाई

| अ.नं | फोटोचे नाव | छपाई संख्या | मंजूर दर व्हट व सर्व करांसह | संस्थान विक्री किंमत रु. पै. |
|---|---|---|---|---|
| ०१ | दगडावर बसलेले बाबा फोटो चार रंगात साईज ४"X ६" | १,००,००० | ०.२७ पैसे | ०.५० |

उपरोक्त छपाई आदेशात पुस्तके/फोटो छपाईचे काम हे छपाई आदेशातील अट क्र.३ नुसार चार महिन्यात विनाविलंब सत्वर पूर्ण करणेबाबत कळविले असून, विलंबाने प्राप्त झालेल्या पुस्तकांचे देय बिलावर विलंब शुल्क आकार मा. व्यवस्थापन समितीचे परवानगीने आकारला जाईल असे कळविण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी जून २००७ अखेर पूर्णपणे छपाई कामाची पूर्तता करावयास हवी होती तथापी अद्यापपावेतो त्यांचेकडून खालील तपशिलाप्रमाणे छपाईचे काम पूर्ण होऊन येणे बाकी आहे.

| अ.नं | पुस्तकाचे नाव | छपाई आदेश संख्या | जमा छपाई संख्या | येणे छपाई संख्या |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साईसत् चरित्र, कन्नड | २५,००० | २४५२० | ४८० |
| ०२ | मातृसाई- तेलगू | २०,००० | ३,८४० | १६,१६० |

उपरोक्तप्रमाणे श्री साईसत् चरित्र कन्नड व मातृसाई तेलगू पुस्तकाचे छपाई काम बहुतांशी अपूर्ण असून, याबाबत पत्र क्र. १) जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/४२८८/२००७ दि.१६.०३.२००७. २) जा.नं.एसएसएस/वशी/ प्रकाशने/ ४५६८/२००७ दि.२०.०३.२००७. ३) जा.नं.एसएसएस/ वशी/ प्रकाशने/ ९३३५/ ००७ दि.१५.०६.२००७. ४) जा.नं.एसएसएस/वशी/ प्रकाशने/ १२२३०/२००७ दि.०४.०८.२००७. ५) जा.नं.एसएसएस / वशी/ प्रकाशने/ १४८५४/२००७ दि.१७.०९.२००७. याप्रमाणे ५ वेळा संबंधीत छपाईधारक अजय ऑफसेट प्रा.लि., पुणे यांना छपाईचे काम पूर्ण करुन संस्थानचे भांडार विभागात पोहोच करणेबाबत पत्रांद्वारे कळविण्यात आले आहे. मे .अजय ऑफसेट प्रा.लि., पुणे यांनी त्यांचेकडील दि.१७.०७.२००७ चे पत्राद्वारे श्री साईसत्चरित्र, कन्नड या पुस्तकाचे छपाई कामास दि.१०.०८.२००७ तसेच मातृ साई पुस्तकाचे छपाईचे काम दि.३१.०८.२००७ पर्यंत मुदत वाढवून मिळणेबाबत केलेले विनंतीस अनुसरुन जा.नं.एसएसएस/वशी/ प्रकाशने/१२२३०/ २००७ दि.०४.०८.२००७ अन्वये दि.३१.०८.२००७ पर्यंत मुदतवाढवून देण्यात येवून, छपाईचे काम पूर्ण करुन पुस्तके भांडार विभागात दि.३१.०८.२००७ अखेर पोहोच करणेबाबत कळविण्यात आले होते. तथापी त्यांना त्यांचे मागणीनुसार अपेक्षित मुदतवाढ देऊनही श्री साईसत्चरित्र, कन्नड व मातृसाई ,तेलगू या पुस्तकांचे छपाई काम पूर्ण झालेले नाही. याबाबत छपाईचे काम मुदतीत पूर्ण करणेबाबत त्यांचेशी दुरध्वनीद्वारा सुद्धावेळोवेळी संपर्क साधून कळविण्यात आले आहे. सदरचे त्यांना कळविलेल्या पत्रात छपाई आदेशातील अट क्र.३ नुसार मुदतीनंतर विलंबाने प्राप्त झालेल्या पुस्तकांचे देय बिलावर विलंब शुल्क आकार मा. व्यवस्थापन समितीचे परवानगीने आकारला जाईल व आपले प्रेसचे नाव निवडक प्रेसधारकांचे यादीतून वगळणेबाबत विचार केला जाईल यांची नोंद घ्यावी असे कळवूनही त्यांनी याबाबत कोणतीही दखल घेतलेली दिसून येत नाही.

तरी उपरोक्तप्रमाणे त्यांचेकडून दि.३१.०८.२००७ या मुदतीनंतर विलंबाने छपाई होऊन प्राप्त झालेल्या श्री साईसत् चरित्र कन्नड व मातृसाई तेलगू या दोन्ही पुस्तकांचे छपाई बिलातून विलंब शुल्क आकारणी करणेबाबत सदर पुस्तकांचे छपाई आदेशातील अटी व शर्ती नुसार विलंब शुल्क आकारणी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संबधितांकडून १% विलंबशुल्क म्हणून वसूल करण्यात यावे असे ठरले. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं. ७१** **सोनी डी.ए.डी.सी.मॅन्यु. इंडिया प्रा.कंपनी मुंबई यांचेकडून संस्थान प्रकाशित ऑडिओ/व्हीडीओ सी.डीचे उत्पादन करणेबाबत**

**निर्णय क्र.७१** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत श्रीं ची आरती ऑडीओ सी.डी., गुरुपाठाचे अभंग ऑडिओ सी.डी., श्री साईबाबा ग्रेट संत ऑफ शिर्डी सी.डी रोम, श्री साईबाबा आरती व्हीसीडी, शिरडी श्री साईबाबा की, व्हीसीडी चे उत्पादन करण्यात येत असून, या सी.डीं ची प्रकाशने विभागामार्फत विक्री करण्यात येते तसेच तेलगू साईसत्चरिताची ऑडीओ सी.डी एम.पी.-३ व मराठी श्री साई सच्चरिताची ऑडीओ सी.डी एम.पी.-३ उपलब्ध करुन देण्याचे नियोजन आहे. याप्रमाणे सी.डी./व्हीसीडी निर्मिती नामांकित कंपनीकडून करुन घेण्यात याव्यात त्यासाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि.२८.०७.२००७ चे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.३० निर्णय क्र.६२५ नुसार सोनी कंपनीकडून सदर निर्मितीचे काम करावयाचे झाल्यास त्यांचे कराराची, शर्ती व अटी डिपॉझीट इत्यादी

बाबतची सविस्तर माहिती लेखीस्वरुपात मागविण्यास मान्यता मिळालेनुसार जा.नं. एसएसएस/वशी/प्रकाशने/१४२६१/२००७ दि.०५.०९.२००७ अन्वये सोनी डी.ए.डी.सी मॅन्युफॅक्चरींग इंडिया प्रा.कंपनी,मुंबई यांना ऑडीओ/व्हीडीओ सी.डी. निर्मितीकामी त्यांच्या शर्ती व अटी बाबतची तपशिलात्मक माहिती इकडील कार्यालयाकडे पाठविणेबाबत कळविलेनुसार त्यांनी त्यांचेकडील पाठविलेले दि.२४.०९.२००७ रोजी इकडील कार्यालयात दाखल झालेले पत्राद्वारे खालील तपशिलाप्रमाणे माहिती कळविली आहे.

सोनी डी.ए.डी.सी मॅन्युफॅक्चरींग इंडिया प्रा.कंपनी,मुंबई ही सी.डी./व्हीसीडी चे ब-याच वर्षापासून उत्पादन करीत आहे. ऑडिओ /व्हीडीओ सी.डी.चे निर्मिती करुन घ्यावयाचे ठरल्यास त्यासाठी खालील प्रमाणे शर्ती/ अटींची प्रतिपूर्ती करणे गरजेचे असल्याचे कळविले आहे.

१) पेमेंट :- सी.डी./व्हीसीडी चा निर्मितीचा कार्यादेश देतेवेळी कार्यादेशात नमुद केलेप्रमाणे एकूण नगांच्या निर्मितीची १००% पूर्ण रक्कम आगाऊ अदा करावी लागेल.

२) टॅक्सेस ॲन्ड ड्युटीज :- सरकारी नियमानुसार सी.डी./व्हीसीडी निर्मितीकामी दराव्यतिरिक्त लागू असलेले सेल टॅक्स, व्हॅट, ओ.टी.टी., फ्रेट वगैरे याप्रमाणे योग्य करांचा रकमेचा बिलांच्या एकूण रकमेत समाविष्ट करणेत येईल.

३) पुरवठा :- सी.डी./व्हीसीडीची निर्मितीसाठी मास्टर, पॉझीटिव्हज् तसेच इतर संबंधीत कागदपत्रांची परिपूर्ण पूर्ततेसह प्राप्त झालेपासून १५ दिवसांत पुरवठा करणेचे कबुल केले आहे. उपरोक्तप्रमाणे निर्मितीचे काम पूर्ण झाल्यावर त्यांना निर्मिती संबंधीत देण्यात आलेली मास्टर व इतर त्यांना पुरविण्यात आलेले मटेरियल संबंधीत कंपनीकडून परत करण्यात येईल.

४) क्वॉन्टीटी (संख्या) :- कार्यादेशात नमुद केलेल्या निर्मितीचे एकूण नगांच्या +/- ५% नग ने तफावत असेल या एकूण आदेशापेक्षा अधिक जास्त किंवा कमी तफावतीने असलेल्या नगांचा स्वीकार करावा लागेल. तथापी सी.डी./व्हीसीडीचे निर्मितीचे बिल मात्र आदेशात कळविलेल्या प्रमाणे एकूण नगांचेच राहील.याबाबत पुरवठ्यातील तफावतीने जास्त किंवा कमी नगांच्या बिलाच्या रकमेबाबत उल्लेख केलेला नाही.

५) सी.डी./व्हीसीडी संबंधीत संस्थानचे कॉपीराईट असतील तसेच याबाबत सरकारी कायाद्याप्रमाणे संस्थानकडे असलेले व्हीसीडी/डीव्हीडी निर्मितीसाठी सेन्सॉर बोर्डाने प्रमाणित केलेले सेन्सॉर प्रमाणपत्राची प्रतिची मागणी केल्यास तीची प्रत संबंधीत कंपनीकडे सूपर्त करावी लागेल.

६) सोनी कंपनीद्वारा सी.डी. पुरवठ्याबाबत कंपनीचा सी.डी. विषयी वॉरंटी (ग्वाही) कालावधी सहा महिन्याचा असेल, सदर कालावधीत सी.डी. निर्मितीत काही दोष आढळल्यास त्या कंपनीद्वारा फ्री ऑफ कॉस्ट बदलून देण्यात येतील. तथापी ट्रान्सपोर्ट करतेवेळी सी.डी. डॅमेज (खराब) झाल्यास त्याची जबाबदारी कंपनी स्वीकारणार नाही .

उपरोक्तप्रमाणे सोनी डी.ए.डी.सी मॅन्युफॅक्चरींग इंडिया प्रा.कंपनी,मुंबई यांनी त्यांचे दि.२४.०९.२००७ रोजी दाखल झालेल्या पत्राद्वारे कळविलेप्रमाणे शर्ती व अटींची त्यांचेकडून सी.डी./व्हीसीडीचे निमिर्ती करावयाची झाल्यास वेळोवेळी पूर्तता करावी लागेल.

तरी सोनी डी.ए.डी.सी मॅन्युफॅक्चरींग इंडिया प्रा.कंपनी, मुंबई ही एक नावाजलेली कंपनी असून, गुणवत्तेनुसार उच्च दर्जा तिच्याकडून अपेक्षित आहे. तेंव्हा सोनी डी.ए.डी.सी मॅन्युफॅक्चरींग इंडिया प्रा.कंपनी, मुंबई यांचेकडून सी.डी./व्हीसीडी निर्मितीसाठी असलेल्या त्यांच्या शर्ती /अटी लक्षात घेता त्यांचेकडून वेळोवेळी कायम स्वरुपी संस्थान प्रकाशित सी.डी./व्हीसीडी चे निर्मितीचे कामे करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं. ७२** **श्री साईबाबांचे जन्माविषयी श्री साईचरित्र हिंदीमध्ये आलेल्या उल्लेखाबाबत.**

**निर्णय क्र.७२** श्री साईसच्चरित्र हिंदी अध्याय ७ वा पान क्रमांक ४४ वर विशेष या अंतर्गत श्री साईबाबांचे जन्मासंबंधी बाबांचे भक्त कै. म्हाळसापती यांनी श्री साईबाबांनी त्यांना असे सांगीतल होते की, " मेरा जन्म पाथरी के ब्राह्मण परिवार मे हुआँ था। मेरे माता पिता ने मुझे बाल्यावस्थामें ही एक फकीर को सौंप दिया था। " असे नमुद करण्यात आलेले आहे.

श्री साईसच्चरित्र मराठी हे कै. गोविंद रघुनाथ दाभोळकर ( हेमाडपंत) यांनी बाबांचे आशिर्वादाने लिहीले असून त्यास सर्वत्र अधिकृत मान्यता आहे. या ग्रंथाचा उपोद्‌घात कै. हरी सिताराम दीक्षित यांनी लिहीलेला असून, त्यामध्ये " श्री साईनाथ महाराज ५० वर्षापूर्वी शिरडीस प्रथम आले . शिरडी हे गांव अहमदनगर जिल्ह्यात आहे. महाराज मुळ कोठील राहणारे व त्यांचे माता - पिता कोण या विषयी खात्रीलायक माहिती मिळत नाही. एवढे मात्र खचित दिसते की, महाराजांचा संबंध मोगलाईशी बराच असावा. महाराजांचे बोलण्यात सेलु, जालना, मानवत, पाथरी, परभणी, नवरंगाबाद (औरंगाबाद) बीड , बेदर या मोगलाईच्या गावाचा वारंवार उल्लेख येत असे. एकदा एक पाथरीचा गृहस्थ महाराजांचे दर्शनास आला होता, त्याला महाराजांनी पाथरीची हकीकत विचारुन तेथील बहुतेक ठळक ठळक ग्रहस्थांचे नावे

घेऊन त्यांच्या विषयी चौकशी केली यावरुन महाराजांना पाथरीची विशेष माहिती होती असे म्हणता येईल, पण त्यांचा जन्म तेथलाचा असावा असे खात्रीलायक म्हणता येत नाही. "

मराठीचे सच्चरित्रातील उपद्घातातील बाबांचे जन्माविषयीची उपरोक्त माहिती बघता हिंदी सच्चरित्रातील अध्याय ७ मधील बाबांच्या जन्माविषयीचा उल्लेख हा वादग्रस्त व गैरसमज पसरविणारा असल्याने ब-याच साईभक्तांनी निदर्शनास आणून दिले आहे.

श्री साईसच्चरित्र मराठीचा पहीला अनुवाद इंग्रजीमध्ये श्री. ना.वा. गुणाजी (बेळगांव) यांनी १९४९ मध्ये केलेला आहे. सदरच्या ग्रंथामध्ये अध्याय ७ पान ४० वर तळटिपणी दिलेली आहे. त्यांना बाबांच्या जन्माविषयी कै. म्हाळसापतींनी त्यांचे म्हणणे जे होते ते भक्तांच्या अधिक माहितीकरीता म्हणून दिलेले आहे. मात्र ते म्हणणे बरोबरच आहे असा आग्रह नाही.

इंग्रजी चरित्रा वरुन नंतर गुजराथी, तामीळ, कन्नड, या भाषेत श्री साईसच्चरित्राचे अनुवाद प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत. त्यामध्ये सुद्धा बाबांचे जन्माविषयीची टिपणी नमुद करण्यात आलेली आहे.

श्री साईबाबांचा अवतार सर्व मानवाच्या जातीच्या कल्याणाच्या हेतुने झालेला आहे. श्री साईबाबांना जात, पंथ, धर्म इत्यादी गोष्टी मान्य नव्हत्या असे समजले जाते. त्यांचा अवतार हा सर्वधर्म समभाव यासाठी झाला आहे असे मानण्यात येते, त्यामुळे श्री साईबाबांचे दर्शनासाठी सर्व जाती, धर्म, पंथाचे लोक आज शिरडीस येतात.

बाबांचे जन्माविषयी हिंदी व गुजराथी चरित्रातील उल्लेख हा इंग्रजी चरित्रातील टिपणी प्रमाणेच तळास टाकता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं. ७३** **साठा संपत आलेल्या पुस्तकांचे पुनर्मुद्रण करणेबाबत.**

**निर्णय क्र.७३** **(०१)** पुस्तके साठा भांडार विभागात सध्या स्थितीत अल्प प्रमाणात साधारणतः ३ ते ४ महिने पुरेल एवढाच शिल्लक आहे. तसेच मा. व्यवस्थापन समितीचे दि.१९.०८.२००६ चे सभेतील विषय नं.२७ निर्णय ७०५ नुसार आदेश क्र.२९३९ दि.०६.११.२००६ अन्वये पारित करण्यात आलेल्या आदेशानुसार प्रकाशने विभागाअंतर्गत बुकस्टॉलवर पुस्तके/फोटोंचे कमीत कमी २५ प्रती व त्यापेक्षा जास्त प्रती खरेदीदारास यात साईभक्त, साईमंदिरे, स्थानिक दुकानदार यांना विक्री किंमतीवर १५% सवलतीचे दराने विक्री कार्यवाही चालू असल्याने त्यामुळे विक्रीचा खप वाढला असल्याने पुस्तके उपलब्धतेअभावी भक्तांची गैरसोय होऊ नये यासाठी खालील पुस्तके छपाई करून घेणे गरजेचे आहे.

**अ) पुस्तके छपाई परिशिष्ट**

| अ.नं | पुस्तकाचे नांव | भाषा | मागिल छपाईची तारीख | मागिल छपाईची संख्या | मागिल छपाई दर | नवीन छपाई संख्या | छपाई अंदाजे दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईसत्चरित्र | हिन्दी | २२.०१.२००७ | १,००,००० | २१.७० | २,००,००० | २५.०० | ५०,००,०००/- |
| ०२ | साईसत्चरित्र | तेलगू | २२.०१.२००७ | १,५०,००० | २६.०० | २,५०,००० | ३०.०० | ७५,००,०००/- |
| ०३ | श्री साई चरित्र | बंगाली | ०१.११.२००४ | ५००० | २७.०० | ५००० | ३०.०० | १,५०,०००/- |
| ०४ | चिल्ड्रेन्स साईबाबा (विकास मेहता लिखीत) | इंग्रजी | ०३.०२.२००७ | ५००० | ४७.०० | ५००० | ६०.०० | ३,००,०००/- |
| ०५ | श्री सद्गुरु साईनाथ सगुणो.मराठी आरतीचा हिन्दी अनुवाद | हिन्दी | ०४.०६.२००७ | २०,००० | ६.०० | १०,००० | ७.०० | ७०,०००/- |
| ०६ | रुद्राध्याय (११ वा अध्याय) | मराठी | ०३.०२.२००७ | १०,००० | १.८४ | १०,००० | २.०० | २०,०००/- |
| ०७ | श्री साईनाथ सगुणोपासना आरती | तामिळ | ०४.११.२००४ | ५,००० | ८.८० | ५००० | १०.०० | ५०,०००/- |
| ०८ | साईलिलामृत | हिन्दी | ०६.०२.२००२ | १०,००० | ११.७५ | ५००० | १२.०० | ६०,०००/- |
| ०९ | श्री साईनाथ सगुणो.आरती (झरिन) | इंग्रजी | १९.०१.२००५ | ५,००० | १०.२० | ५००० | १२.०० | ६०,०००/- |
| | | | | | | | **एकूण -** | १,३२,१०,०००/- |

**ब) पुस्तके छपाई परिशिष्ट**

| **अ.नं** | **पुस्तकाचे नांव** | **भाषा** | **मागिल छपाईची तारीख** | **मागिल छपाईची संख्या** | **मागिल छपाई दर** | **नवीन छपाई संख्या** | **छपाई अंदाजे दर** | **एकूण रक्कम** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | साई सत्चरित्र | तामिळ | ०३.१०.२००७ | २०००० | ३१.८४ | ३०,००० | ३५.०० | १०,५०,०००/- |
| ०२ | साईलिलामृत | हिंदी | ०६.०२.२००२ | १०,००० | ११.७५ | १०,००० | १५.०० | १,५०,०००/- |
| ०३ | साईलिलामृत | गुजराथी | ०९.०४.२००१ | ५००० | १२.७५ | ५००० | १५.०० | ७५,०००/- |
| ०४ | श्रीसाई स्तवन मंजरी | इंग्रजी | १९.०१.२००५ | ५००० | १.८५ | ५००० | ३.०० | १५,०००/- |
| ०५ | श्रीसाई स्तवन मंजरी | गुजराथी | २८.०६.००४ | १०००० | १.८० | ५००० | ३.०० | १५,०००/- |
| ०६ | मुलांचे साईबाबा | हिंदी | ०७.०६.२००४ | १०,००० | ३.०४७ | ५००० | ५.०० | २५,०००/- |
| ०७ | मुलांचे साईबाबा | कन्नड | १०.०६.१९९७ | १०००० | ३.०० | ५००० | ५.०० | २५,०००/- |
| ०८ | मुलांचे साईबाबा | तामिळ | १४.०१.२००३ | ३००० | ५.०० | ५००० | १०.०० | ५०,०००/- |
| ०९ | तेलगू पोथी | तेलगू | १८.०१.२००७ | ५००० | ६१.६० | ५००० | ६५.०० | ३,२५,०००/- |

| | |
|---|---|
| **एकूण -** | १७,३०,०००/- |

उपरोक्त "अ " व "ब" यात नमुद केलेप्रमाणेः-

"अ " या परिशिष्टात दर्शविल्याप्रमाणे पुस्तके छपाई कामी अपेक्षित खर्च एकूण रूपये - १,३२,१०,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी, बत्तीस लाख, दहा हजार )मात्र खर्च अपेक्षित आहे. तसेच " ब " या रकान्यात दर्शविल्याप्रमाणे पुस्तके छपाई कामी अपेक्षित खर्च एकूण रूपये - १७,३०,०००/- (अक्षरी रुपये सतरा लाख, तीस हजार )मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी वरील "अ " व "ब" या परिशिष्टात दर्शविलेप्रमाणे पुस्तकांची छपाई ही मा.व्यवस्थापन समितीचे समंत निर्णयानुसार निवडक प्रेसधारकांकडून छपाई कामाचे कोटेशन्स मागविणेस तसेच "अ" परिशिष्टात पुस्तकांची छपाईकामी अंदाजे एकूण १,३२,१०,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी, बत्तीस लाख, दहा हजार ) मात्र व " ब " या रकान्यात दर्शविल्याप्रमाणे पुस्तके छपाई कामी अपेक्षित खर्च एकूण रूपये -१७,३०,०००/- (अक्षरी रुपये सतरा लाख, तीस हजार )मात्र याप्रमाणे एकूण रुपये १,४९,४०,०००/- अपेक्षित खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं. ७४** **शुभा येरी, पुणे यांचेव्दारा हिंदी भाषेतून रुपांतरीत केलेल्या ले.क.मु.ब.निंबाळकर लिखित श्री साईंचे चरित्र प्रकाशित करणेबाबत.**

**निर्णय क्र.७४** शुभा येरी, पुणे यांनी त्यांचेकडील दि.२५.१०.२००७ चे पत्राद्वारे ले.कर्नल मु.ब.निंबाळकर लिखीत श्री साईंचे सत्यचरित्राचे हिन्दी भाषेतून रुंपातरीत करुन सदरचे हिन्दी रुपांतरीत श्री साईंचे सत्यचरित्र हिन्दी भाषिक भक्तांना संस्थानतर्फे उपलब्ध करणेबाबत इच्छा प्रकट केली आहे.

उपरोक्त संदर्भिय पत्र शुभा येरी, पुणे यांनी बडोद्याचे श्री. जे.बी. निंबाळकर यांचे सांगण्यावरुन लिहित असलेबाबत कळवून, श्री. मु.ब.निंबाळकर हयात असतांना त्यांच्याच मार्गदर्शनाखाली त्यांनी श्री साईंचे सत्यचरित्र या मराठी ग्रंथाचा हिन्दीत अनुवाद करण्यास सुरुवात केली असल्याचे पत्राद्वारे नमुद केले आहे. त्यांनी श्री साईंचे सत्यचरित्रातील प्रत्येक ओवीचा वेगळा अनुवाद न करता एक विषय किंवा घटनेवरच्या सगळ्या ओव्यांच्या भाषांतराचा परिच्छेद करण्याची पद्धत हिन्दीतून अनुवाद करतांना वापरली असल्याचे कळवून, त्यात मुळ गद्य ग्रंथातील एकही ओवी त्यांचेकडून अनुवाद करतांना गळालेली नाही, असे नमुद केले आहे.

श्री साईंचे सत्य चरित्राचे हिन्दी अनुवादाची भाषा सोपी असावी, या दृष्टीने शुभा येरी, पुणे यांनी हिन्दीतून भाषांतर केले आहे, त्यामुळे त्यांनी केलेल्या सोप्या भाषेतल्या अनुवादामुळे कमी शिकलेल्या भक्तांना, गृहीनींना त्यांचेद्वारा हिन्दीत रुपांतरीत केलेला साईंचे सत्य चरित्र हिन्दी अनुवादीत ग्रंथ वाचणेस व समजणेस सोपा असलेबाबत शुभा येरी यांनी मत प्रकट केले आहे. याबाबत त्यांचेद्वारा या अनुवादाचे ७५० पाने दिल्लीच्या साईभक्त आय.पी.एस. ऑफीसर श्री सत्पथींनी वाचन करुन मुळ ग्रंथातील सगळेभाव या भाषांतरात उत्कटपणे आले आहे, असा दिलेला अभिप्राय शुभा येरी यांनी पत्रात नमुद केला आहे.

शुभा येरी, पुणे यांनी पत्राद्वारे त्यांचे द्वारा हिन्दी अनुवादातील भाषेच्या दृष्टीने महाराष्ट्रातील व उत्तर हिंदुस्थानातील हिन्दीत फरक नक्कीच आहे, असे कळविले असून, त्यासाठी त्यांच्या हिन्दी अनुवादाची भाषा सुधारुन घेणे गरजेचे झाल्यास, ती सुधारुन घेणेबाबत त्यांची काही एक हरकत नसल्याचे मत प्रकट केले आहे.

शुभा येरी, पुणे यांनी श्री साईंचे सत्य चरित्रातील संपूर्ण ५३ अध्यायाचे हिन्दीत रुपांतर पूर्ण करुन त्यातील पहिला अध्याय त्यांनी पत्रासोबत अवलोकनार्थ पाठविला आहे. शुभा येरी, पुणे यांचेद्वारा हिन्दी भाषेतून रुपांतरीत केलेले कै.ले.कर्नल मु.ब. निंबाळकर लिखीत श्री साईंचे सत्यचरित्र प्रकाशित केल्यास, त्यामुळे मुळ मराठी चरित्राचा कै. ले.कर्नल.मु.ब. निंबाळकर यांनी केलेल्या गद्य अनुवादाचे हिन्दी अनुवादीत पुस्तक हिन्दी भाषिक भक्तांना उपलब्ध होऊ शकेल.

तरी शुभा येरी, पुणे यांनी त्यांचेद्वारा ले.कर्नल मु.ब. निंबाळकर लिखीत मराठी पुस्तकाचे हिन्दी भाषेतील रुपांतराचे पुस्तक संस्थानद्वारा प्रकाशित करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, तो अमान्य करण्यात आला.

(कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं. ७५** **श्री साईसच्चरित मराठी ग्रंथाचा ओवी टू ओवी इंग्रजी छपाईबाबत.**

**निर्णय क्र.७५** श्री साई सच्चरित मराठी ग्रंथाचा ओवी टू ओवी इंग्रजी अनुवाद कै. झरिन तारापोरवाला मुंबई यांनी केलेला आहे. संस्थानचे द्वीमासीक श्री साईलीलेतून तो प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. त्याची प्रथम आवृत्ती साईप्रेस (इंडिया) यांनी प्रसिद्ध केलेली आहे.

साई प्रेस ( इंडिया ) नवी दिल्ली यांनी सदर ग्रंथाचे सर्व हक्क संस्थानला वीनामुल्य देऊ केले आहेत.

संस्थान मार्फत कै. ना.वा. गुणाजी लिखीत गद्य चरित्र इंग्रजी भाषेतील भक्तांना उपलब्ध करुन दिलेले आहे. मात्र मुळ मराठी ग्रंथाचा ओवी टू ओवी अनुवाद प्रसिद्ध केलेस हेमाडपंत लिखीत चरित्राची ओळख भक्तांना होऊ शकेल.

सदरचे पुस्तकाचे हक्क संस्थानला घेणेस मान्यता असावी. प्रस्तावास मान्यता असलेस सदर पुस्तकाची प्रथम आवृत्तीचे छपाईचे काम साई प्रेस ( इंडिया ) नवी दिल्ली यांचे देखरेखीखाली करुन घेणे योग्य राहील.

श्री साई सच्चरित मराठी ग्रंथाचा ओवी टू ओवी इंग्रजी ५,००० प्रतिंची प्रथम आवृत्ती काढता येईल त्यासाठी अंदाजे छपाई दर रु.१३०/- प्रमाणे अंदाजे रु.६,५०,०००/- खर्च येईल सदर ग्रंथाची प्रथम आवृत्ती असल्याने ग्रंथ छपाईचे काम दिल्ली येथील साई प्रेस इंडिया, नवी दिल्ली यांचेकडून करुन घेणे योग्य होईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं. ७६** **श्रीसाईदैनंदिनी/दिनदर्शिका-२००८ भेट देणेबाबत.**

**निर्णय क्र.७६** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी प्रकाशित श्री साईबाबा दैनंदिनी/दिनदर्शिका २००७ ह्या मागिल वर्षी मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५.११.२००६ रोजीच्या सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.१५ निर्णय क्र.९५६ नुसार मा. व्यवस्थापन समितीचे सदस्यांना श्री साईबाबा दैनंदिनी व दिनदर्शिका २००७ चे सिक्स व शिंगल शिटर प्रत्येकी १०० नग भेट म्हणून देण्यात आल्या होत्या तसेच मा. व्यवस्थापन समितीचे दि.१६.०९.२००६ रोजीचे सभेतील विषय नं. २७ निर्णय क्र.७०५ नुसार सर्व आमदार व व्हीआयपी यांना दैनंदिनी व दिनदर्शिका भेट म्हणून देण्यात याव्यात असे ठरले.

मागिल वर्षाप्रमाणे चालू वर्षीही सन २००८ च्या श्री साईबाबा दैनंदिनी -१०० नग व दिनदर्शिका (सिक्स शिटर) १०० नग व दिनदर्शिका (सिंगल शिट) १०० नग याप्रमाणे मा. व्यवस्थापन समितीचे सदस्यांना भेट म्हणून देण्यात याव्या असे वाटते. याप्रमाणे मा. व्यवस्थापन समितीचे मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष व सदस्य असे १६ व मा.कार्यकारी अधिकारी याप्रमाणे एकूण १७ यांना दैनंदिनी प्रत्येकी १०० नग X १७ = १७०० नग, दिनदर्शिका सिक्स शिटर १०० नग X १७ =१७०० नग व दिनदर्शिका सिंगल शिट १०० नग X १७ =१७०० नग याप्रमाणे श्री साईबाबा दैनंदिनी व दिनदर्शिका २००८ भेट म्हणून देणेस देण्यास तसेच सर्व आमदार व व्हीआयपी यांना मा.वरिष्ठांच्या शिफारसीनुसार मागणीप्रमाणे भेट म्हणून वेळोवेळी देण्यात येणारे दैनंदिनी व दिनदर्शिका सिक्स व सिंगल शिटर २००८ संभावना खाते खर्ची टाकणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं. ७७** **श्री नादमयी न्यास,पुणे व्दारा निर्मित श्री साईसच्चरित मराठी (पोथी) ची ऑडीओ सी.डी.चे संस्थानव्दारे निर्मिती करणेबाबत.**

**निर्णय क्र.७७** श्री प्रफुल्ल गणपुले अध्यक्ष, श्री नादमयी न्यास, पुणे यांनी त्यांचे दि.२९.११.२००७ चे पत्रान्वये त्यांची श्री नादमयी न्यास, पुणे ही धर्मदाय संस्था नोंदणीकृत असलेबाबत कळवून, त्यांनी संस्थान द्वारा प्रकाशित श्री साईसच्चरित मराठी ओवीबद्ध ग्रंथ संगीतबद्ध केला असल्याचे नमुद केले आहे, त्यांची संस्था अध्यात्मिक ग्रंथ संगीतबद्ध करुन कॅसेट/सी.डी. या स्वरुपात सादर करीत असलेबाबत कळवून, आतापर्यंत त्यांनी खालील प्रमाणे अध्यात्मिक ग्रंथ संगीतबद्ध केले आहेत.

१) ज्ञानेश्वरीचे चार अध्याय, श्री सुरेश वाडकर आणि स्वरमाधूरी ज्योत्स्ना गणपुले यांच्या आवाजात संगीतबद्ध केले आहे.

२) भगवतगीता, स्वरमाधूरी ज्योत्स्ना गणपुले यांच्या सुमधूर आवाजात तालबद्ध संगीतमय केले आहे.

३) ह.भ.प. दासगणू महाराज लिखीत श्री गजानन विजय हा ओविबद्ध ग्रंथ तसेच गुरुचरित्रान्तर्गत गुरु गीता त्यांचे संस्थेने संगीतबद्ध केले आहे.

वरीलप्रमाणे अध्यात्मिक ग्रंथांचे त्यांचे संस्थेद्वारा संगीतबद्ध करुन, त्यास भक्तांचा उत्स्पुर्त प्रतिसाद मिळत असल्याचे कळवून, याप्रमाणेच त्यांनी श्री साईसच्चरित हा ओवीबद्ध ग्रंथ संगीतबद्ध केला असल्याचे नमुद करुन एमपीथ्री फॉर्ममध्ये एकूण चार सी.डी. चा हा संच असलेबाबत त्यांनी दि.०१.१२.२००७ रोजी शिर्डी दर्शन भेटीत प्रत्यक्ष झालेल्या चर्चेअंती कळविले आहे. याप्रमाणे सी.डी. निर्मितीसाठी त्यांनी निर्मिती केलेली श्री साईसच्चरित ग्रंथाची मास्टर सीडीज् ते संस्थानकडे श्री सद्‌गुरु साईबाबांची सेवा या भावनेने कुठल्याही मोबदल्याची अपेक्षा न करता संस्थानकडे सुपूर्त करण्याची तयारी दर्शविली आहे, याविषयीचे सर्व हक्क ते संस्थानला देण्यास तयार आहेत. यामागे श्री साईसच्चरिताची ऑडीओ सी.डी. ह्या इलेक्ट्रॉनिक्स माध्यमातून सद्‌गुरु साईनाथ महाराजांचे पुण्यपावन चरित्र घरोघरी पोचावे अशी त्यांनी मनापासून इच्छा प्रकट केली आहे.त्यांचेद्वारा या सी.डी. चे खालीलप्रमाणे वैशिष्टे आहेत

१) स्वरमाधूरी ज्योत्स्ना गणपुले यांचा सुमधूर व भावपूर्ण आवाज

२) अतिश सुस्पष्ट आणि शुद्ध शब्दोच्चार

३) पोथीचे शब्दशः प्रामाणिक अनुसरण.

४) संगीतबद्ध म्हणजे गायकी या स्वरुपात नव्हे , तर पारायण करावे तसेच पण स्वरतालबद्ध म्हणून सुश्राव्य

५) सदरची ऑडीओ सी.डी. ही कार चालवतांना, घरातील कामे करतांना, ऑफिसमध्ये , मंदिरे किंवा सभागृहांमध्ये ऐकता येईल.

तरी श्री नादमयी न्यास, पुणे यांनी प्रस्तुत केलेनुसार, त्यांचे संस्थेद्वारा संगीतबद्ध निर्मित केलेली स्वरमाधूरी ज्योत्स्ना गणपुले यांचा सुमधूर व भावपूर्ण आवाजात श्री साई सच्चरिताची ऑडीओ सी.डी. ची मास्टर सी.डी. स्वीकारणेस व संस्थानद्वारा सदर चरित्राची ऑडीओ सी.डी. ची प्रथम निर्मिती असल्याने श्री प्रफुल्ल गणपुले, अध्यक्ष श्री नादमयी न्यास, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली करावयाची झाल्यास त्यासाठी एकूण ४ नग सी.डीचा एक संच याप्रमाणे प्रथम निर्मिती करणे असल्याने ५,००० संचाची निर्मितीसाठी प्रती संचास अंदाजे रु.८०/- (एक सीडी निर्मितीस रुपये २०/- प्रमाणे चार सी.डी. साठी रुपये ८०/-) याप्रमाणे एकूण अंदाजे रुपये ४,००,०००/- (अक्षरी रुपये चार लाख) मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं. ७८** **श्री नादमयी न्यास,पुणे व्दारा निर्मित श्री साई सच्चरित सार हिंदी दोहावली ग्रंथाची ऑडीओ सी.डी.चे संस्थानव्दारे निर्मिती करणेबाबत.**

**निर्णय क्र.७८** श्री प्रफुल्ल गणपुले अध्यक्ष, श्री नादमयी न्यास, पुणे यांनी त्यांचे दि.२९.११.२००७ चे पत्रान्वये त्यांची श्री नादमयी न्यास, पुणे ही धर्मदाय संस्था नोंदणीकृत असलेबाबत कळवून, त्यांनी संस्थान द्वारा प्रकाशित श्री शिवनारायण टुवानी लिखीत श्री साई सच्चरित सार हिन्दी दोहावली ग्रंथ संगीतबद्ध केला असल्याचे नमुद केले आहे, त्यांची संस्था अध्यात्मिक ग्रंथ संगीतबद्ध करुन कॅसेट/सी.डी. या स्वरुपात सादर करीत असलेबाबत कळवून, आतापर्यंत त्यांनी खालील प्रमाणे अध्यात्मिक ग्रंथ संगीतबद्ध केले आहेत.

१) ज्ञानेश्वरीचे चार अध्याय, श्री सुरेश वाडकर आणि स्वरमाधूरी ज्योत्स्ना गणपुले यांच्या आवाजात संगीतबद्ध केले आहे.

२) भगवतगीता, स्वरमाधूरी ज्योत्स्ना गणपुले यांच्या सुमधूर आवाजात तालबद्ध संगीतमय केले आहे.

३) ह.भ.प. दासगणू महाराज लिखीत श्री गजानन विजय हा ओविबद्ध ग्रंथ तसेच गुरुचरित्रान्तर्गत गुरु गीता त्यांचे संस्थेने संगीतबद्ध केले आहे.

वरीलप्रमाणे अध्यात्मिक ग्रंथांचे त्यांचे संस्थेद्वारा संगीतबद्ध करुन, त्यास भक्तांचा उत्स्पुर्त प्रतिसाद मिळत असल्याचे कळवून, याप्रमाणेच त्यांनी श्री साई सच्चरित सार हिन्दी दोहावली ग्रंथ संगीतबद्ध केला असल्याचे नमुद करुन एमपीथ्री फॉर्ममध्ये एकूण तीन सी.डी. चा हा संच असलेबाबत त्यांनी दि.०१.१२.२००७ रोजी शिर्डी दर्शन भेटीत प्रत्यक्ष झालेल्या चर्चेअंती कळविले आहे. याप्रमाणे सी.डी. निर्मितीसाठी त्यांनी निर्मिती केलेली श्री साई सच्चरित सार हिन्दी दोहावली ग्रंथाची मास्टर सीडीज् ते संस्थानकडे श्री सद्‌गुरु साईबाबांची सेवा या भावनेने कुठल्याही मोबदल्याची अपेक्षा न करता संस्थानकडे सुपूर्त करण्याची तयारी दर्शविली आहे, याविषयीचे सर्व हक्क ते संस्थानला बहाल करणेस तयार आहेत. यामागे श्री साई सच्चरित सार हिन्दी दोहावली ग्रंथाची ऑडीओ सी.डी. ह्या इलेक्ट्रॉनिक्स माध्यमातून सद्‌गुरु साईनाथ महाराजांचे पुण्यपावन चरित्र घरोघरी पोचावे अशी त्यांनी मनापासून इच्छा प्रकट केली आहे,त्यांचेद्वारा या सी.डी. चे खालीलप्रमाणे वैशिष्टे आहेत

१) स्वरमाधूरी ज्योत्स्ना गणपुले यांचा सुमधूर व भावपूर्ण आवाज

२) अतिश सुस्पष्ट आणि शुद्ध शब्दोच्चार

३) पोथीचे शब्दशः प्रामाणिक अनुसरण.

४) संगीताचा सुन्दर साज, तसेच पण स्वरतालबद्ध म्हणून सुश्राव्य

५) सदरची ऑडीओ सी.डी. ही कार चालवतांना, घरातील कामे करतांना, ऑफिसमध्ये , मंदिरे किंवा सभागृहांमध्ये ऐकता येईल.

६) जरी दोहावली असली तरी प्रत्येक दोहा स्वतंत्र नसून सलग कथावर्णन असल्यामुळे प्रत्येक दोह्यानंतर म्युझिक न देता दोहे सलग गायले आहेत. जेथे नवीन विषय चालू होतो तेथे मात्र म्युझिक वापरले आहे. यामुळे कथेचा सलगपणा राहिला असून, योग्य तो अर्थबोध होतो.

तरी श्री नादमयी न्यास, पुणे यांनी प्रस्तुत केलेनुसार, त्यांचे संस्थेद्वारा संगीतबद्ध निर्मित केलेली स्वरमाधूरी ज्योत्स्ना गणपुले यांचा सुमधूर व भावपूर्ण आवाजात श्री साई सच्चरित सार हिन्दी दोहावलीची ऑडीओ सी.डी. ची मास्टर सी.डी. स्वीकारणेस व संस्थानद्वारा सदर दोहावलीची ऑडीओ सी.डी. ची प्रथम निर्मिती असल्याने श्री प्रफुल्ल गणपुले, अध्यक्ष श्री नादमयी न्यास, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली निर्मिती करावयाची झाल्यास त्यासाठी एकूण ३ नग सी.डीचा एक संच याप्रमाणे ५,००० संचाची निर्मितीसाठी प्रती संचास अंदाजे रु.६०/- (एक सीडी निर्मितीस रुपये २०/- प्रमाणे तीन

सी.डी. साठी रुपये ६०/-) याप्रमाणे एकूण अंदाजे रुपये ३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लाख) मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने प्रमुख)

**विषय नं. ७९** **श्री साईसत्चरित्र हिंदी जादा छपाई करणेबाबत.**

**निर्णय क्र.७९** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी प्रकाशित जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/११४०/२००७ दिनाक २२.०१.२००७ अन्वये निट प्रिटर्स,अहमदनगर यांना श्री साईसत् चरित्र हिंदी १,००,००० नग निम्नतम दर रु.२१.७० पैसे प्रमाणे छपाई कामाचा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. मे.निट प्रिटर्स,अहमदनगर यांचेकडून श्री साईसत् चरित्र हिंदी १,००,००० नगांची पुर्णपणे छपाई होऊन भांडार विभागात जमा झाले आहेत.

श्री साई सत्चरित्र हिंदी १,००,००० नगांची पुनरमुद्रीत करणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे. सध्या आज दि.२२.१२.२००७ रोजी श्री साईसत्चरित्र हिंदी या पुस्तकाच्या प्रकाशने विभाग सबस्टोअरमध्ये साईभक्तांना विक्री करणेकामी फक्त ४,४१० प्रतिच शिल्लक आहेत, सदरचा शिल्लक साठा हा फक्त २० ते २५ दिवस पुरेल एवढाच शिल्लक असल्याने तसेच सदर पुस्तकास साईभक्तांची मोठ्या प्रमाणात मागणी असल्याने तातडीने किमान १०,००० प्रती छपाई करणे गरजेचे होते, त्याकरीता सदरच्या जादा आवश्यक लागणा-या प्रतिंचे छपाई करणेबाबत संबंधीत प्रेसधारक मे निट प्रिटर्स,अहमदनगर यांचेशी दि.२२.१२.२००७ रोजी दूरध्वनीवरुन संपर्क केला असता, त्यांनी वरील संदर्भीय आदेशातील अट क्र. १० अन्वये संस्थानला आवश्यकता भासल्यास व मागणी केल्यास त्याच दरात त्याच अटी व शर्ती नुसार जादा प्रतींची छपाई करुन देण्यास तयार असलेबाबतच्या अटी नुसार ते उपरोक्त पुस्तकाच्या छपाई आदेशातील प्रती नग छपाई मंजूर दर रु.२१.७० पैसे नुसार छपाई करुन देण्याचे कबुल करुन तत्संबंधीत आशयाचे पत्रही प्रकाशने विभागात दाखल केले आहे.तदनुसार मे. निट प्रिंटर्स, अहमदनगर यांचेकडून छपाई करावयाचे जादाचे श्री साईसत् चरित्र हिंदी १०,००० (दहा हजार) नगांची तातडीची गरज म्हणून एकूण १०,००० नगांचे छपाईसाठी प्रती नग मंजूर छपाई दर रु. २१.७० पैसे याप्रमाणे मे. निट प्रिंटर्स, अहमदनगर यांना छपाई कामाचा पुरवठा आदेश देण्यात आला आहे तरी उपरोक्तप्रमाणे १०,००० नग हिन्दी चरित्र छपाईकामी रुपये २,१७,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख, सतरा हजार) मात्र चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने प्रमुख)

**विषय नं.८०** **श्री साईचरित्राची ऑडीओ सी.डीबाबत**

**निर्णय क्र.८०** श्री.रजनेश नायडू, नागपूर यांनी त्यांचेकडील दि.१३.१२.२००७ व दि.२२.१२.२००७ चे इमेल पत्राद्वारा त्यांनी त्यांचेद्वारा पाच भाषेतून श्री साईसत्चरिताच्या ऑडिओ सी.डीची निर्मिती विषयक दि.२२.१२.२००७ चे इमेल पत्राद्वारे खालील तपशिलाप्रमाणे टप्प्या टप्प्याने निर्मिती करुन ती संस्थानला मोफत देणार असलेबाबत इमेल पत्राद्वारा प्रस्तुत केले आहे.

१) श्री.रजनेश नायडू, नागपूर यांनी त्यांचे दि.१३.१२.२००७ चे इमेल पत्राद्वारे त्यांनी इंग्रजी व हिन्दी या भाषेतील साईसत्चरित्राच्या ऑडीओ सी.डीचे निर्मितीचे काम पूर्ण केले असून, तेलगू भाषेतून ऑडीओ सी.डीचे निर्मितीचे कामाची कार्यवाही चालू असल्याचे नमुद करुन, तदनंतर ते मराठी व गुजराथी भाषेतून सुद्धा ऑडीओ सी.डीचे निर्मिती करणार असलेबाबत कळवून, याप्रमाणे त्यांचेद्वारा निर्मित १) इंग्रजी २) हिन्दी ३) तेलगू ४) मराठी ५) गुजराथी अशा पाच भाषेतून एका भाषिक चरित्राच्या ७ सीडीज याप्रमाणे ऑडीओ सी.डी. ची निर्मिती करणार असलेबाबत प्रस्तुत केले आहे.

२) सदरच्या ऑडीओ सी.डीज ह्या मुंबईतील प्रख्यात सी.डी. निर्मिती विषयक कंपनीचे सी.डी. निर्मात्याकडील स्टुडिओत ध्वनिमुद्रीत केले असल्याचे कळवून, सदरच्या ध्वनिमुद्रीत सी.डीजचे नमुने ते संस्थानकडे मान्यतेसाठी पाठविणार असलेबाबत कळविले आहे.

३) श्री.रजनेश नायडू, नागपूर यांनी सदर इमेलपत्रात वरील तपशिलाप्रमाणे श्री साईसत्चरित्र ग्रंथाचे प्रत्येक भाषेतून एक चरित्राच्या सात सी.डीचा सेट याप्रमाणे एकूण पाच भाषिक ग्रंथाच्या ७ X ५ प्रमाणे ३५ सेटची निर्मिती करणार असून, प्रत्येक भाषेतील ग्रंथाच्या प्रत्येकी १,००० संचांची म्हणजे एकूण १०००X ३५ =३५००० ( पस्तीस हजार) सी.डी.ची निर्मिती करुन याप्रमाणे एकूण ३५,००० सी.डी. ते संस्थानला मोफत देणार असून, सदरच्या त्यांच्याद्वारा प्राप्त सी.डी. ह्या संस्थानने मोफत वाटणेबाबत किंवा विक्री करणेबाबतचा निर्णय त्यांनी संस्थानवर सोपविला आहे.

४) श्री.रजनेश नायडू, नागपूर यांनी त्यांचे दि.२२.१२.२००७ चे इमेल पत्राद्वारे त्यांचेद्वारा निर्मित ऑडीओ सीडीज ह्या मुंबईतील प्रख्यात सी.डी. निर्मितीविषयक कंपनीचे सी.डी. निर्मात्याकडील स्टुडिओत ध्वनिमुद्रीत केल्या असल्याचे कळवून, सदर सीडी निर्मात्याकडे वरील पाच भाषेतील सीडीजची मास्टर कॉपी असल्याने त्यापुढेही सदर सी.डीचे संस्थानला उत्पादन करावयाचे झाल्यास याच नामांकित कंपनीकडून संस्थानला वरीलप्रमाणे साईसत्चरिताच्या ऑडीओ सी.डी.ची निर्मिती

करण्याकरीता सदरचा सी.डी. निर्मीतीविषयक कंपनी कुठल्याही प्रकारे फायद्याची अपेक्षा नकरता ऑन कॉस्ट बेसीसवर संस्थानला करुन देऊ शकते असे श्री रजनेश नायडू यांनी त्यांचेकडील इमेल पत्रात नमुद केले आहे. तथापी त्यांचा हा प्रस्ताव स्वीकारणे उचित होणार असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.रजनेश नायडू, नागपूर यांनी वरील पाच भाषिक ग्रंथाच्या ऑडिओ सीडीजची निर्मिती करणेपूर्वी संस्थानची लेखी परवानगी घेतलेली नाही, संस्थानच्या अधिकृत मान्यता घेणे आगोदच त्यांनी सदर सी.डीजचे निर्मितीचे कार्यवाहीस विनापरवानगी सुरु केली आहे. संस्थान स्वतः वरील प्रमाणे पाच चरित्रांचे ऑडीओ सीडीजचे निर्मिती करु शकते यातील संस्थानद्वारा मराठी व तेलगू भाषेतून ऑडीओ सीडीजचे निर्मिती विषयक कामाची कार्यवाही चालू आहे. तरी श्री.रजनेश नायडू, नागपूर यांचा प्रस्ताव अमान्य करण्यात यावा,असें ठरलें.(कार्यवाही-प्रकाशने प्रमुख)

**विषय नं. ८१** **साईनिवास अतिथीगृह सेवा आकार वाढविणे बाबत**

**निर्णय क्र.८१** संस्थानचे साईनिवास अतिथीगृह या नविन व्ही.आय.पी. कक्षासाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४.०१.२००७ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.२१ नुसार श्री साईभक्तांकडून व इतर मान्यवरांकडून दि.१०.०१.२००४ पासून खालीलप्रमाणे सेवाआकार घेण्यात येत आहे.

| अ.नं. | तपशिल | सध्याचा सेवाआकार | अनामत रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | व्ही.आय.पी. कक्ष एकूण २४ कक्ष | २ व्यक्तींसाठी २४ तासांकरिता रु.७००/- जादा प्रौढ व्यक्तीस प्रत्येकी रु.२००/- १२ वर्षाखालील मुलास रु.१००/- (जास्तीत जास्त जादा २ व्यक्ती मर्यादा) | रु.५००/- |

वरीलप्रमाणे सेवाआकार घेण्यात येत आहे. तथापि व्ही.आय.पी. कक्षासाठी साईभक्तांची प्रचंड मागणी असते. त्यामुळे सदरचे कक्ष हे कायमच भरलेले असतात. यामुळे येणारे काही मान्यवर यांना रुम न मिळाल्यास ते नाराज होतात व तक्रार करतात. त्यामुळे सदरचे व्ही.आय.पी. कक्षाचे सेवाआकरामध्ये खालीलप्रमाणे वाढ करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

| अ.नं. | तपशिल | सध्याचा सेवाआकार | अनामत रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | व्ही.आय.पी. कक्ष एकूण २४ कक्ष | २ व्यक्तींसाठी २४ तासांकरिता रु.१०००/- जादा प्रौढ व्यक्तीस प्रत्येकी रु.२००/- १० वर्षाखालील मुलास रु.१००/- (जास्तीत जास्त जादा ३ व्यक्ती मर्यादा) | रु.१०००/- |

यावर सविस्तर चर्चा होऊन,सदरहू प्रस्ताव अमान्य करण्यात आला.

(कार्यवाही-अधिक्षक,चौकशी निवासस्थान)

**विषय नं. ८२** **धर्मशाळा विभागाकडील साईभक्तांना गादी, चादर, उशी पुरविणाऱ्या कंत्राटदसाराचे नेमणूकीबाबत**

**निर्णय क्र.८२** श्री साईबाबा संस्थानचे धर्मशाळा विभागाकडील इमातरीमध्ये वास्तव्यासाठी रहाणाऱ्या साईभक्तांना गादी, चादर, उशी, बेडशीट इ. पुरविण्याचे काम पे ॲण्ड युज पध्दतीने चालविणेत येत आहे. या कामासाठी कंत्राटदार नेमणूक करण्याकरिता वर्तमानपत्रात जाहिरात देणेत येऊन निविदा मागणी करणेत येते. मा.व्यवस्थापन समिती सभेत चर्चेअंती वाटाघाटीद्वारे संस्थानला दरमहा जादा मोबदला देणाऱ्या कंत्राटदारांची एक वर्षे कालावधीसाठी नेमणूक करणेत येते. कंत्राटदारांकडून साईभक्तांना भाडोत्री गाद्या, चादरी पुरविणेसाठी प्रति चोवीस तासांसाठी प्रती गादीस रु.५/- व चादरीसाठी रु.३/- हा दर ठरवून दिलेला आहे. गाद्या, चादरीचे भाडे साईभक्तांना निवासासाठी जागा देताना बिलात घेण्यात येते व प्रती महिना अखेरीस गाद्या, चादरीचे बिलाची होणारी एकुण रक्कम तपासणी करुन लेखाशाखेमार्फत कंत्राटदारास आदा करणेत येते. नेमणूक केलेल्या कंत्राटदाराकडून रु.२५,०००/- अनामत रक्कम बिनव्याजी म्हणून संस्थानकडे ठेवण्यात येते. सदर कंत्राटदाराचे कंत्राट संपल्यानंतर क्लिअरन्स झाल्यावर कंत्राटदारास अनामत रक्कम परत करण्यात येते.

वर नमूद केलेल्या पध्दतीस अनुसरुन दि.०१.०२.२००७ ते दि.३१.०१.२००८ या एक वर्षाचे कालावधीसाठी धर्मशाळा विभागाकडे साईभक्तांना गाद्या, चादरी पुरविण्यासाठी संस्थानने सौ.योगिता संतोष चव्हाण, शिर्डी या कंत्राटदाराची नेमणूक केलेली आहे. अनामत रकमेपोटी त्यांचेकडून रु.२५,०००/- बिनव्याजी ठेवणेत आलेले असून, मोबदला म्हणून त्यांचेकडून संस्थानला दरमहा रु.४४,४४४/- एवढी रक्कम घेण्यात येत आहे, तसा लेखी करारनामा त्यांचेशी केलेला आहे.

कंत्राटदार सौ.योगिता संतोष चव्हाण, यांचे कराराची मुदत दि.३१.०१.२००८ अखेर संपुष्टात ये तआहे. त्यामुळे दि.०१.०२.२००८ पासून पुढील एक वर्षाचे कालावधीसाठी धर्मशाळा विभागाकडे साईभक्तांना गाद्या, सादर पुरविणेसाठी कंत्राटदाराची नेमणूक होणे आवश्यक आहे.

विद्यमान कंत्राटदार सौ.योगिता संतोष चव्हाण, शिर्डी यांनी दि.२६.११.२००७ रोजी संस्थानकडे लेखी अर्ज सादर करुन त्यांना सध्याच्या आहे त्याच अटी/ शर्ती व दरमहा संस्थानला

रु.४४,४४४/- देणेचे बोलीवर पुन्हा एक वर्षाचे कालावधीसाठी कंत्राटमध्ये मुदतवाढ मिळावी, अशी विनंती केलेली आहे.

सौ.योगिता संतोष चव्हाण, यांना दि.०१.०२.२००७ पासून एक वर्षाचे कालावधीसाठी साईभक्तांना गाद्या, सादरी पुरवविणेचे कंत्राट दिले तेंव्हापासून आजतागायत त्यांनी श्री साईभक्तांना चांगली सेवा दिलेली असून, त्यांचे कामाबद्दल तक्रार नाही.

तरी दि.०१.०२.२००८ पासून पुढील एक वर्षाचे कालावधीसाठी सध्याचे आहे त्याच अटी/ शर्तीवर सौ.योगिता संतोष चव्हाण, यांना धर्मशाळा विभागाकडे साईभक्तांना गाद्या, चादरी पुरविणेचे कामासाठी मुदतवाढ द्यावी किंवा वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन नवीन कंत्राटदार नेमणुकीसाठी निविदा मागविण्यात याव्यात, असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर सध्याचे कंत्राटदार सौ.योगिता संतोष चव्हाण,शिर्डी यांना दिनांक ०१.०२.२००८ पासून चार महिने कालावधीसाठी सध्याचे आहे त्याच अटी शर्तीवर मुदतवाढ देण्यात यावी व दरम्यानचे कालावधीत धर्मशाळा विभागाने गाद्या- चादरी खरेदी करणेसाठी सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर मान्यतेसाठी सादर करावा व गाद्या तयार करुन घेऊन व चादरी खरेदी करुन भक्तांना गाद्या चादरी पुरविण्यासाठी कंत्राटदाराची नेमणूक न करता संस्थान मार्फतच सदरची व्यवस्था करण्यात यावी,असें ठरलें. (कार्यवाही-धर्मशाळा प्रमुख)

**विषय नं. ८३** **कालबाह्य व निकामी झालेले संगणक, प्रिंटस व दुरध्वनी संच विक्री करणे बाबत**

**निर्णय क्र.८३** वैधानिक लेखापरिक्षक यांनी निकामी अनावश्यक साहित्य वेळचे वेळी मंजूरी घेऊन स्टॉक मधून कमी करावे अशा सुचना दिलेल्या आहेत. डेडस्टॉकच्या वस्तू स्टॉक मधून कमी करतांना मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेण्यात यावी, असे नमूद करण्यात आलेले आहे.

माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत विविध विभागांना कार्यालयीन कामकाजासाठी संगणके व संपर्कासाठी दूरध्वनी संच देण्यात आलेले आहेत. यापैकी खालील तपशीलाप्रमाणे साहित्य दैनंदिन वापरामुळे निकामी/खराब व कालबाह्य झालेले आहेत. तसेच तंत्रज्ञानात वेळोवेळी बदल झाल्याने, काही साहित्याचे उत्पादन बंद झाल्याने,नादुरुस्त झालेले संगणक,प्रिन्टर व दूरध्वनी संच दुरुस्त करण्यासाठी आवश्यक पार्टस् बाजारात उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे ते माहिती तंत्रज्ञान विभागाच्या स्टोअरमध्ये पडून आहेत.

त्याची अभिलेखा विभागामार्फत लिलावाने विक्री करणेस तसेच लिलावाने विक्री झालेल्या साहित्याची नोंद माहिती तंत्रज्ञान विभागाच्या मालमत्ता नोंद वहीतून (डेडस्टॉक मधुन) कमी करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली.

| अ.नं | संगणक कोड नं | तपशिल | नग | प्रत्येकी मुळ किंमत |
|---|---|---|---|---|
| 01. | MCN/058 | EPSON LQ 2170 PRINTER | 4 | 31,000.00 |
| 02. | MCN/059 | ZENITH INTEL P-II | 1 | 40,000.00 |
| 03. | MCN/060 | EPSON LQ 2170 PRINTER | 1 | 31,000.00 |
| 04 | TEL/208 | BPL TELEPHONE 5490 | 2 | 600.00 |
| 05 | TEL/214 | SAMAY TELEPHONE 9000 | 2 | 353.00 |
| 06 | TEL/219 | ORPET TELEPHONE 1820 | 2 | 510.00 |
| 07 | TEL/220 | SAMY TELEPHONE 1000 | 1 | 294.00 |
| 08 | TEL/225 | BEETEL TELEPHONE 802 | 2 | 510.00 |
| 09 | TEL/229 | ORPET TELEPHONE 1010 | 1 | 345.00 |
| 10 | TEL/238 | ORPET TELEPHONE 1600LR | 5 | 278.00 |
| 11 | TEL/249 | ORPET TELEPHONE 1004 | 2 | 327.00 |

(कार्यवाही-आय.टी.विभाग प्रमुख)

**विषय नं.८४** **खराब झालेले लोखंडी टेबल वार्षिक उच्चतम दराने विक्री करणे बाबत**

**निर्णय क्र.८४** वैधानिक लेखापरिक्षक यांनी निकामी अनावश्यक साहित्य वेळचे वेळी मंजूरी घेऊन स्टॉक मधून कमी करावे अशा सुचना दिलेल्या आहेत. डेडस्टॉकच्या वस्तू स्टॉक मधून कमी करतांना मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेण्यात यावी असे नमूद करण्यात आलेले आहे.

माहिती तंत्रज्ञान विभागात कार्यालयीन कामकाजासाठी वापरण्यात येत असलेले खालीलप्रमाणे टेबल दैनंदिन वापरामुळे खराब झालेले आहे. त्याची अभिलेखा विभागामार्फत लिलावाने विक्री करणेस तसेच लिलावाने विक्री झालेल्या साहित्याची नोंद माहिती तंत्रज्ञान विभागाच्या मालमत्ता नोंद वहीतून (डेडस्टॉक मधुन) कमी करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली.

| अ.नं | संगणक कोड नं | तपशिल | नग | प्रत्येकी मुळ किंमत |
|---|---|---|---|---|
| 01 | TAB/030 | Steel Table Sunmica Top | 01 | 950.00 |
| 02 | TAB/037 | Sunmica Top Steel Table | 01 | 259.00 |
| 03 | TAB/085 | Sunmica Top Steel Table 2 side drawer | 01 | 259.00 |
| 04 | TAB/087 | Steel Table big Sunmica Top 2 side | 01 | 2,500.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | drawer | | |
| 05 | RAK/051 | Iron Rack with woden Top | 01 | 787.50 |

(कार्यवाही-आय.टी.विभाग प्रमुख)

**विषय नं. ८५** **माहिती तंत्रज्ञान विभागाकडील कायम तांत्रिक कर्मचाऱ्यांना अद्ययावत तांत्रिक प्रशिक्षण (Corporate Training) देणे बाबत.**

**निर्णय क्र.८५** **(अ)** संस्थानचे संगणकीकरण कार्यक्रमांतर्गत संगणकीय नेटवर्कव्दारे सध्या संस्थानची विविध कार्यालये, देणगी काऊंटर्स, खोली वाटप कक्ष, चहा कॅन्टीन, लेखाशाखा चेक / डी. डी., स्वागत कक्ष, प्रसादालय भोजन तिकीट विक्री, दोन्ही रुग्णालये, ब्लड बॅन्क इ. ठिकाणची साधारणतः ६५ ते ७० संगणके फायबर ऑप्टीक केबलव्दारे एकमेकांशी जोडण्यात आलेले आहे. सध्या १८ संगणक प्रणाली संस्थानचे विविध कार्यालयांत ऑनलाईन आहे. या सर्व संगणकांवरील डेटा मध्यवर्ती सर्व्हर रुममध्ये ठेवण्यात आलेल्या २ GB RAM क्षमतेच्या तसेच साधारणतः २१९ GB साठवणूक क्षमता असलेल्या सर्व्हरमध्ये संकलीत करण्यात येत आहे. सध्या दिवसेंदिवस संगणकीय कामकाजाचा वापर वाढत असून, सर्व्हरवरील संकलीत करण्यात येणारा डाटा दिवसेंदिवस वाढत आहे. विविध विभागांत चालणाऱ्या संगणक प्रणालींव्दारे एक महिन्याला साधारणतः ५७ एमबी डाटा संकलीत केला जातो. तसेच खरेदी व भांडार विभागासाठी नवीन संगणक प्रणाली तयार करण्याचे काम चालू असून, लवकरच कार्यान्वीत करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे लेखाशाखेचेही संपूर्ण संगणकीकरण करण्यात येत आहे. त्यामुळेही संस्थानचे डेटाबेसमध्ये वाढ होणार आहे.

**(ब)** संगणकीय क्षेत्रातील तंत्रज्ञानात वेळोवेळी बदल होत असल्याने, सदर कामकाज सुरळीतपणे होण्याच्या दृष्टीने संस्थानमधील डेटाबेसबाबत प्राप्त परिस्थितीची संपूर्ण माहिती असणारे तांत्रिक अर्हता उपलब्ध असलेले मनुष्यबळ संस्थान आस्थापनेकडे उपलब्ध नाही. डेटाबेस सर्व्हर अचानक बंद झाल्यास, यामध्ये सर्व विभागांचा साठविण्यात आलेला डाटा पूर्ण नष्ट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यादृष्टीने डेटाबेस सर्व्हरचे व्यवस्थापन करणे, डेटाबेस प्रणाली व्यवस्थापन व्यवस्थित करुन वेळोवेळी सदर डेटा सुरक्षित ठेवण्याची कार्यवाही व नियोजन करणे, सर्व्हरमध्ये येणाऱ्या अडचणी सोडवून घेऊन डेटाबेस प्रणाली सुरळीत कार्यरत ठेवणे, सर्व्हरमध्ये अपूर्ण असलेल्या तांत्रिक बाबींची पूर्तता करणे तसेच दिवसेंदिवस वाढत असलेला डेटा व बाजारात उपलब्ध असलेले नविन तंत्रज्ञान यांची सांगड घालून डेटाबेस सर्व्हर प्रणालीचे व्यवस्थापन करणेसाठी तत्कालीन श्री. अे. आर. औटी अति. लेखाधिकारी, यांना Oracle 9i Database चे प्रशिक्षण संस्थानमार्फत देण्यात आलेले होते. त्यानंतर त्यांचेवर माहिती तंत्रज्ञान विभागाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला होता. परंतु, त्यांचेवर सोपविण्यात आलेला माहिती तंत्रज्ञान विभागाचा कार्यभार काही प्रशासकीय कारणावरुन काढून घेण्यात आलेला असल्याने, सध्या माहिती तंत्रज्ञान विभागाकडे डेटाबेसचे व्यवस्थापन करणेसाठी सदर प्रशिक्षण घेतलेला कर्मचारी उपलब्ध नाही. शिवाय माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख सद्यःस्थितीत चार पदांचा कार्यभार सांभाळत आहे. तसेच विभागाकडे दैनंदिन कामकाजासाठी वरिष्ठ लिपीक उपलब्ध नसल्याने, ते कामही विभाग प्रमुख यांनाच पाहावे लागत आहे. तसेच डेटाबेस प्रणालीमध्ये येणाऱ्या अडचणी वेळेवर सोडविता येत नाही. यासाठी माहिती तंत्रज्ञान विभागातील तांत्रिक पात्र कर्मचाऱ्यांना Oracle 9i Database चे अद्ययावत प्रशिक्षण संस्थानमार्फत देण्यात यावे, असे नम्र मत आहे.

**(क)** माहिती तंत्रज्ञान विभागात श्री. रमेश चांगदेव पुजारी व श्री. अनिल केशवराव शिंदे यांची तांत्रिक सहाय्यक म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. तसेच श्री नवनाथ नरहरी मते यांची मदतनीस म्हणून नव्याने नेमणूक झालेली आहे. या तिघांवर संस्थानचे विविध विभागातील संगणकीय साहित्याची दुरुस्ती देखभाल करणे, विभागाचे मागणीनुसार संगणक प्रणाली तयार करणे, सध्या ऑनलाईन असलेल्या संगणक प्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करणे आदि. कामे सोपविण्यात आलेली आहे. सदर कर्मचाऱ्यांनी संगणक क्षेत्रातील शिक्षण घेतलेले असल्याने, त्यांना Oracle 9i Database प्रशिक्षण दिल्यास संस्थानचे डेटाबेसमध्ये येणाऱ्या दैनंदिन अडचणी आपणास विभागांतर्गत सोडविण्यास मदत होईल. परंतु, त्यांना Oracle 9i Database चे अद्ययावत प्रशिक्षण घेणेसाठी बाहेर गावी पाठविल्यास संस्थानचे संगणकीय कामकाजात येणाऱ्या दैनंदिन अडी-अडचणी सोडविण्यास अडचणी येण्याची शक्यता नाकारता येत आहे. सदर अडचणी येऊ नये म्हणून, Oracle 9i Database चे प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेतील प्रतिनिधींना आठवड्यातून दोन ते तीन दिवस शिर्डीस बोलाविता येईल व त्यांचे निवासाची व भोजनाची व्यवस्था संस्थानमार्फत करुन, माहिती तंत्रज्ञान विभागातील तांत्रिक कर्मचारी श्री. रमेश चांगदेव पुजारी, अनिल केशवराव शिंदे व श्री नवनाथ नरहरी

मते आणि माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख यांना संस्थानमध्येच Oracle 9i Database चे अद्ययावत प्रशिक्षण देता येईल. तसेच श्री साईबाबा हॉस्पिटलचे ज्यु. ईडीपी मॅनेजर श्री किशारे गवळी व श्री विनोद कोते यांनीही तातडीने सदरील प्रशिक्षण मिळावे, अशी मागणी केली आहे. कारण हॉस्पिटलमध्ये सॉफ्टवेअर हे कार्यान्वीत केलेली असून, त्यासाठी Oracle 9i Database चे प्रशिक्षण आवश्यक आहे. Corporate Training या नावाने संबोधले जाते. शिवाय याचा लाभ इतर तांत्रिक कर्मचाऱ्यांना घेता येईल व हे संस्थानचे हितावह ठरेल.

**(ड)** संस्थानमधील उपरोक्त कर्मचाऱ्यांना संस्थानमध्येच Corporate Training देणेबाबत संस्थानचे स्थानिक मानद तांत्रिक सलल्लागार श्री. विजय नायडू, कोपरगाव यांचेशी चर्चा केला असता, त्यांनी डेटाबेस व्यवस्थापन प्रणाली क्षेत्रातील नामांकित कंपनी Q-SOFT System & Solutation (P) LTd., Mumbai यांचे नाव सुचविलेले आहे. त्यानुसार, सदर संस्थेकडे प्रशिक्षणाबाबत चौकशी केली असता, त्यांनी ६ ते १० कर्मचाऱ्यांना १७ दिवसांचे प्रशिक्षण देणेसाठी रुपये १,४०,०००/- + टॅक्स इतका खर्च कळविलेला आहे. तरी, सदर Oracle 9i Database (Corporate Training) प्रशिक्षण संस्थानचे शिर्डी कार्यालयात घेण्यात यावे, असे नम्र मत आहे.

उपरोक्त परिच्छेदांत नमुद केलेप्रमाणे, माहिती तंत्रज्ञान विभागातील श्री. रमेश चांगदेव पुजारी, श्री अनिल केशवराव शिंदे, नवनाथ नरहरी मते आणि माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख तसेच श्री साईबाबा हॉस्पिटलचे ईडीपी विभागातील ज्यु. ईडीपी मॅनेजर श्री. किशोर गवळी, श्री. विनोद कोते यांना संस्थानमार्फत Oracle 9i Database (Corporate Training) चे अद्ययावत प्रशिक्षण Q-SOFT System & Solutation (P) LTd., Mumbai या संस्थेमार्फत देणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रुपये १,४०,०००/- + टॅक्स चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री विजय नायडू, स्थानिक मानद सल्लागार यांनी सुचविल्याप्रमाणे सदर प्रशिक्षण देण्यास व त्यासाठी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,४०,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-आय.टी.विभागप्रमुख)

**विषय नं. ८६** **संगणकीय जाळे विस्तारीकरणाबाबत**

**निर्णय क्र.८६** **(अ)** मा. व्यवस्थापन मंडळाचे विविध निर्णयांनुसार "ई- टेम्पल" प्रकल्पातर्गत कार्यालयीन कामकाजाचे संगणकीकरणासाठी यंत्रणेची उभारणी आणि कार्यान्वीकरण करणेची कार्यवाही मे.युनिकॉम इन्फोटेल प्रा.लि.,मुंबई यांचेकडून सन-२००४ मध्ये करुन घेण्यात आलेली आहे. या संगणकीय नेटवर्कव्दारे सध्या संस्थानची विविध कार्यालये, देणगी काऊंटर्स, खोली वाटप कक्ष, चहा कॅन्टीन, लेखाशाखा चेक / डी. डी., स्वागत कक्ष, प्रसादालय भोजन तिकीट विक्री, इ. ठिकाणची साधारणतः ६५ ते ७० संगणके फायबर ऑप्टीक केबलव्दारे एकमेकांशी जोडण्यात आलेले आहे.

**(ब)** संस्थान कामकाजाचे सोईच्या दृष्टीने विविध विभागांमध्ये नव्याने संगणके देण्यात आलेली आहे. सदर संगणकाव्दारे करण्यात येणाऱ्या कामकाजाचा बॅकअप मुख्य सर्व्हरवर घेणेसाठी सदर संगणके विविध ठिकाणी स्विच बसवून नेटवर्कींगध्ये जोडण्यात आलेली आहे. विविध ठिकाणी स्विचेस बसविल्यामुळे नेटवर्कीगचा स्पिड कमी होऊन सर्व सगणकांची गती कमी होते. यामुळे कामकाजात व्यत्यय येतो. विशेषकरुन देणगी काऊंटर्स, रुम बुर्कीग, कॅन्टीनव प्रसादालय येथील काऊंटर्सवरील संगणकांची गती कमी होते व गती कमी झाल्यामुळे श्रीसाईभक्तांना विनाकारण रांगेत ताटकळत उभे राहावे लागते. सदर अडचण येऊ नये यावर पर्याय काढणेसाठी संस्थानचे स्थानिक मानद तांत्रिक सल्लागार श्री विजय नायडू, कोपरगाव यांचेशी चर्चा केली असता, त्यांनी विविध ठिकाणी स्विचेस्च्या साहाय्याने जोडण्यात आलेली सर्व संगणके मुख्य स्विचला जोडणे आवश्यक असल्याचे सांगितले आहे. . त्यास अनुसरुन प्राथमिक टप्यात खालील ठिकाणी नेटवर्कींग पॉईंट काढणे आवश्यक आहे.

| अ.नं. | कार्यालय / ठिकाण | पॉईंट संख्या |
|---|---|---|
| ०१ | प्रशासकीय अधिकारी कार्यालय | ५ |
| ०२ | प्रशासन शाखा | ९ |
| ०३ | मिटींग विभाग | २ |
| ०४ | कामगार विभाग | ४ |
| ०५ | मा.अध्यक्ष सो. व मा. उपाध्यक्ष सो. यांचे स्विय सहाय्यक | १ |
| ०६ | अंतर्गत लेखापरिक्षण विभाग | १ |
| ०७ | कॅशिअर कॅबीन | १ |
| ०८ | मनीऑर्डर / चेक्स कक्ष | १ |
| ०९ | बांधकाम विभाग | १ |
| १० | विद्युत विभाग | १ |

| | | |
|---|---|---|
| ११ | आयटी विभाग | ९ |
| | **एकूण** | **३५** |

**(ड)** उपरोक्तप्रमाणे विविध ठिकाणी संगणकीय जाळयाचे विस्तारीकरण करणे आवश्यक असून, या कार्यवाहीसाठी खालीलप्रमाणे साहित्यांची आवश्यकता आहे.

| Sr. No. | Description | Qty. | Rate (approx) | Amount (approx) |
|---|---|---|---|---|
| **A.** | **D-Link Make** | | | |
| 01 | CAT6 UTP Cable | 05 Box | 5650.00 | 28250.00 |
| 02 | CAT^ Information outlet with face plate & black box | 35 Nos | 320.00 | 11200.00 |
| 03 | CAT6 24 port patch panel | 01 No. | 5350.00 | 5350.00 |
| 04 | CAT6 1mtr patch cord | 35 Nos. | 195.00 | 6825.00 |
| 05 | CAT6 2 mtrs patch cord | 30 Nos. | 220.00 | 6600.00 |
| 06 | 32mm PVC Capon casing | 200 Mtrs. | 35.00 | 7000.00 |
| | | **Total (A)** | | **65,225.00+ Taxes** |
| **B.** | **Installation** | | | |
| 01. | Of cable, Information outlet, panel patch cords, accessories, with dressing. | | | **17,500.00+Taxes** |
| | **Total Amount (A+B)** | | | **82,725.00+ Taxes** |

उपरोक्तप्रमाणे संगणकीय जाळयाचे विस्तारीकरणे करणेसाठी अंदाजे रुपये ८२,७२५/-+ टॅक्स पर्यंतचा खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-आय.टी.विभाग प्रमुख)

**विषय नं. ८७** **भक्तांना संस्थान विषयी माहिती प्राप्त होणेसाठी कियॉस्क (टच स्क्रिन) खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.८७** **(अ)** श्री क्षेत्र शिर्डीस देशाच्या व जगातील काना-कोपऱ्यातून, साईभक्त साईंच्या दर्शनासाठी येत असतात. या साईभक्तांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी विषयी व त्यांचेमार्फत भक्तांना पुरविण्यात येणाऱ्या सेवा-सुविधांची अधिकृत माहिती उपलब्ध व्हावी, या दृष्टीने संस्थान व्यवस्थापनामार्फत अत्याधुनिक तंत्रज्ञानामार्फत माहिती उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

संस्थान व्यवस्थापनामार्फत, याकामी अधिकृत वेबसाईट मराठी / इंग्रजी भाषेत उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सध्या या अधिकृत संस्थानचे वेबसाईटवर मराठी / हिंदी / इंग्रजी भाषेतून साधारणत: ४५०० पाने व श्री साईंचे विविध प्रकारचे साधारणत: ५०० फोटो उपलब्ध करुन दिलेले आहेत. याशिवाय संस्थानचे वेबसाईटव्दारे व डिश टि.व्ही.व्दारे श्रींचे थेट दर्शनाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

**(ब)** अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा एक पैलू, म्हणजेच कियॉस्क (टच् स्क्रिन) हे आहे. कियॉस्क म्हणजे, शिर्डी मध्ये भक्त आल्यानंतर त्यांना संस्थान व्यवस्थापनाविषयी तसेच मंदिरातील विविध कार्यक्रमांविषयीची माहिती स्वत: संगणकसारखे मॉनिटरवर ऑपरेट करुन उपलब्ध होऊ शकेल. यासाठी माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत कियॉस्कवर वापरता येईल, अशी अत्याधुनिक संगणक कार्यप्रणाली इंग्रजी, हिंदी व मराठी भाषेतून तयार केलेली आहे. सदर माहिती कियॉस्कव्दारे उपलब्ध करुन देण्यासाठी मा.व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयांनुसार प्रायोगिक तत्वावर दोन कियॉस्क खरेदी करुन एक कियॉस्क देणगी काऊंटर नंबर दोन शेजारील बाहेरच्या कोपऱ्यात तर दुसरा पूर्वीच्या कॅन्टीनच्या बाहेरील कोपऱ्यामध्ये बसविण्यात आलेले आहे. श्री क्षेत्र शिर्डीस येणारे साईभक्त हे ८० टक्के संगणक साक्षर असल्याने, अनेक साईभक्त आवश्यक माहिती सहजासहजी स्वत: कियॉस्क ऑपरेटर करुन उपलब्ध करुन घेत असून, यास चांगला प्रतिसाद मिळत आहे.

**(क)** शिर्डी येथे येणाऱ्या साईभक्तांच्या गर्दीचा ओघ पाहता तसेच त्यांना संस्थान व्यवस्थापनाविषयी, मंदिरातील विविध कार्यक्रमांविषयीची माहिती त्वरीत उपलब्ध होणेसाठी आणखी चार कियॉस्क सिस्टिम खरेदी करुन खालील गर्दीचे ठिकाणी बसविणे गरजेचे आहे.

१. नविन भक्तनिवासस्थान.

२. नविन प्रसादालय इमारत.

३. स्वागत कक्ष ( माहिती सुविधा केंद्र, बसस्टॅन्ड समोर)

४. म्युझियम हॉल.

**(ड)** सध्या बाजारात CMS व इतर नामांकित कंपन्यांचे कियॉस्क सिस्टिम उपलब्ध असून, चार कियॉस्क सिस्टिम्स खरेदी कराव्या लागणार आहेत. एक कियॉस्क सिस्टिमसाठी अंदाजे रुपये १,५०,०००/- (कर अतिरिक्त) याप्रमाणे चार कियॉस्क सिस्टिमसाठी अंदाजे रुपये ६,००,०००/- (कर अतिरिक्त) पर्यंतचा खर्च अपेक्षित आहे.

तरी उपरोक्त **परिच्छेद 'क' व 'ड'** मध्ये नमुद केलेप्रमाणे, संस्थान परिसरामध्ये कियॉस्क सिस्टिम बसविणेसाठी, चार कियॉस्क सिस्टिम CMS व इतर नामांकित कंपन्यांची दरपत्रके मागवून

खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रुपये ६,००,०००/-(कर अतिरिक्त) पर्यंतचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-आय.टी.विभाग प्रमुख)

**विषय नं. ८८ समाधी मंदिरातील श्रींचे मूर्तीचे दक्षिण-उत्तर बाजूने सोन्याचा पत्रा लावणेबाबत**

**निर्णय क्र.८८** श्री.महेश रेड्डी,हैद्राबाद यांनी श्रींच्या समाधी मंदीरातील दक्षिण उत्तर बाजूचे भिंतीवर नक्षीकाम असलेला सोन्याचा पत्रा देणगी दाखल देण्याची इच्छा दि.२३.१२.२००७ चे पत्राने केली आहे. श्री.रेड्डी यांनी सोन्याचे सिंहासन,छत्री, श्रींचे मुर्ती पाठीमागील भिंतीवरील पत्रा देणगी दाखल दिलेला आहे. त्यांनी बंगलोर येथील कारागीरामार्फत समक्ष काम करुन घेतले आहे. त्यामुळे ते काम चांगल्या प्रतीचे झाले आहे. त्याचपद्धतीने दक्षिण व उत्तर अशा दोन्ही बाजूंनी सोन्याचे पत्र्याचे काम करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,मंदीर विभाग)

**विषय नं. ८९ समाधी मंदिरातील व्हीआयपी दर्शनव्यवस्थेकरीता दर आकारणेबाबत**

**निर्णय क्र.८९** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं. ९० श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये ऑगस्ट -२००८ सत्रापासून दुसऱ्या पाळीमध्ये सुरु करावयाच्या व्यावसाय तुकड्यांबाबत.**

**निर्णय क्र.९०** श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये ऑगस्ट -२००७ पासून १) क्राप्टसमन फुड प्रॉडक्शन (व्हेज) २) कॉम्प्युटर ऑपरेटर अॅण्ड प्रोग्रॅमिंग असिस्टंट (COPA) हे दोन व्यवसाय सुरु करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५.११.२००६ रोजीचे विषय क्र.५८, निर्णय क्र.९३१ नुसार मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार विहीत मुदतीत आपण रितसर अर्ज शासकिय कार्यालयाकडे सादर केलेला आहे.

या दोन्ही व्यवसायांपैकी कॉम्प्युटर ऑपरेटर अॅण्ड प्रोग्रामिंग असिस्टंट (कोपा) या व्यवसायाचे शासनाच्या समितीमार्फत P.I.R. निरीक्षण व डी.जी.ई.टी., नवी दिल्ली यांचे स्थायी समितीमार्फत S.C.I.R. निरीक्षण झालेले असून या व्यवसायाकरीता ऑगस्ट- २००७ च्या सत्रापासुन प्रशिक्षणार्थ्यांना प्रवेश देणेत आलेले आहेत. डी.जी.ई.टी., नवी दिल्ली यांचे समितीने निरिक्षण अहवाल डी.जी.ई.टी., नवी दिल्ली यांचेकडे सादर केलेला आहे. त्यासाठी निदेशक भरतीची कार्यवाही प्रशासन शाखा (वशी-०१) कडे सुरु आहे. तसेच क्राप्टसमन फुड प्रॉडक्शन (व्हेज) या व्यवसायाच्या P.I.R. निरीक्षणाला साहित्य पुर्ततेनंतर सामोरे जावयाचे आहे. त्यामुळे या व्यवसायाला ऑगष्ट- २००७ पासुन सुरु झालेल्या सत्रात प्रशिक्षणार्थ्यांना प्रवेश दिलेले नाहीत. त्याचे साहित्य खरेदीची कार्यवाही सुरु आहे.

या दोन व्यवसायांपैकी कॉम्प्युटर ऑपरेटर अॅण्ड प्रोग्रॅमिंग असिस्टंट (COPA) या व्यवसायाचे साहित्य खरेदी करण्यात आलेले आहे व क्राप्टसमन फुड प्रॉडक्शन (व्हेज) या व्यवसायाचे खरेदीबाबतची कार्यवाही सुरु आहे. त्यामुळे ऑगष्ट- २००८ या सत्रापासून दुसऱ्या पाळीमध्ये सुरु करता येतील. त्यामुळे आणखी ३६ विद्यार्थ्यांची केंद्र शासनाचा राष्ट्रीय व्यवसाय प्रमाणपत्र अभ्यासक्रम पुर्ण करण्याची सुविधा संस्थेत निर्माण होईल. यासाठी अर्ज करण्याची मुदत दि.१७.११.२००७ असल्याने नोंदणी शुल्कासह शासकीय कार्यालयाकडे मुदतीत अर्ज सादर केला आहे. नविन दोन तुकडयांसाठी विशेष भांडवली खर्च करावयाची आवश्यकता भासणार नाही. फक्त विद्यार्थी टुल किट, कच्चा माल व दोन्ही तुकडीसाठी प्रत्येकी ०१ निदेशक यांची पुर्तता करावी लागेल. त्यासाठी आवश्यक आवर्ती व अनावर्ती खर्च खालीलप्रमाणे-

| ट्रेड व विद्यार्थी संख्या | अंदाजे भांडवली खर्च | अंदाजे आवर्ती खर्च (वार्षिक) | | | फी पासून मिळणारे उत्पन्न | निव्वळ आवर्ती खर्च (वार्षिक) (५+६) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | निर्देशक वेतन | कच्चा माल इ. | एकूण (३+४) | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| कोपा (२०) | २०,०००/- | १,६२,५००/- | ३०,०००/- | १,९२,५००/- | ३०,०००/- | १,६२,५००/- | सध्याच्या जागेत दुसऱ्या पाळीमध्ये या तुकडया चालतील |
| व्हेज (१६) | २४,०००/- | १,६२,५००/- | ६४,०००/- | २,२६,५००/- | २४,०००/- | २,०२,५००/- | |

वरीलप्रमाणे दोन व्यवसायांच्या दुसऱ्या तुकडया दुसऱ्या पाळीमध्ये सुरु करण्यास त्यासाठी लागणाऱ्या आवर्ती, अनावर्ती खर्चास व निदेशक भरतीस मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही- प्राचार्य आय.टी.आय.)

**विषय नं. ९१ श्री ताराचंद विठ्ठलराव म्हस्के यांचे कायदेशिर देणी देणेबाबत**

**निर्णय क्र.९१** सदरहू विषयाबाबत आस्थापना उपसमिती सभेत निर्णय घेण्यात यावा.

**विषय नं. ९२ डॉ.सुधीर श्रीराम करमरकर, माजी प्लॉस्टिक सर्जन, श्री साईबाबा हॉस्पिटल यांची टर्मिनेट ऑर्डर रद्द करुन त्यांना पूर्ववत कामावर घेणेबाबत.**

**निर्णय क्र.९२** डॉ. सुधीर श्रीराम करमरकर हे श्री साईबाबा हॉस्पीटल विभागात प्लॅस्टीक सर्जन या पदावर दि.०९-०५-२००६ पासून कामावर रुजु झाले होते. ते साईबाबा हॉस्पीटल येथे प्लॅस्टीक सर्जन म्हणून कार्यरत असतांना त्यांनी पुढील प्रमाणे गैरवर्तन केलेबाबत वैद्यकिय संचालक, श्री साईबाबा हॉस्पीटल यांचे दि.०२-०६-२००७ रोजीचे लेखी निवेदन आले होते. त्यात त्यांनी डॉ.करमरकर यांची रुग्णांशी वर्तनुक चांगली नाही, रुग्णाला उध्दट बोलणे, रागावणे असे प्रकार त्यांचेकडून केले जात होते. तसेच स्टाफशी त्यांचे सलोख्याचे संबंध नाही, त्यामुळे वादविवाद वाढतात. काहीतरी कुरापत काढून भांडण करण्याकडे त्यांचा कल असतो. नियमानुसार मिळणाऱ्या शेअरमध्ये /इन्सेन्टीव्हमध्ये वाढ होणेकरीता ऑपरेशनचा वरचा गट लिहणे, एकाच रुग्णाचे एकाच दिवशी एकाच वेळी एकाच भुलीमध्ये ऑपरेशन करुन त्या ऑपरेशनचे तीन वेगवेगळे ऑपरेशन दाखवून त्या तीन ऑपरेशनची फि रुग्णांकडून उकळून इन्सेन्टीव्ह वाढविण्याचे दृष्टीने गैरमार्गाचा त्यांचेकडून अवलंब केला जातो. त्यामुळे संस्थानचे नावलौकीकास बाधा निर्माण होते असे म्हटलेले आहे. त्यास अनुसरुन डॉ.करमरकर यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१६३५/०७ दि.२७-०६-२००७ अन्वये कारणे दाखवा नोटीस काढून त्यांचा लेखी खुलासा मागविणेत आला होता. त्याप्रमाणे त्यांनी त्यांचा दि.३०-०६-२००७ रोजीचा लेखी खुलासा सादर केला होता. त्यावर डॉ.करमरकर यांनी पुन्हा चुका होणार नाही याची हमी दिल्यामुळे त्यांना एकदा क्षमा करावी हि विनंती असा अभिप्राय वैद्यकिय संचालक यांनी नोंदविला होता.

त्यानंतर सदर प्रकरणाबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.२२-०९-२००७ रोजीचे सभेमध्ये चर्चा झाली. चर्चे अंती श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये कार्यरत असलेल्या प्लॅस्टीक सर्जरी विभागात उपचार घेणाऱ्या रुग्णांची संख्या विचारात घेता हा विभाग त्वरीत बंद करण्यात यावा. या विभागाचे वैद्यकिय अधिकारी डॉ.सुधीर एस.करमरकर यांना एक महिन्याचा नोटीस पे देवून सेवामुक्त करण्यात यावे. असा निर्णय मा.व्यवस्थापन समितीचे दि.२२-०९-२००७ रोजीचे सभेमध्ये निर्णय क्र.७०३ अन्वये पारीत झालेला आहे. सदर निर्णयास अनुसरुन डॉ.सुधीर करमरकर यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१५६५२/०७ दि.०२-१०-२००७ चे आदेशान्वये दि.०३-१०-२००७ पासून संस्थान सेवेतून कायम स्वरुपी कमी (टर्मिनेट) करणेत आले आहे.

डॉ.करमरकर यांना संस्थान सेवेतुन कमी (टर्मिनेट) करणेत आले नंतर त्यांनी दि.०३-१०-२००७ रोजीचे अर्जान्वये निर्णय घेणेपूर्वी मला मा.विश्वस्त सभेपुढे माझी बाजू मांडण्याची संधी दिली गेली नाही. या आकस्मात व दुर्देवी निर्णयामुळे माझी मानसीक, आर्थिक व व्यावसायीक अशी अत्यंत अपरिमित हानी झाली आहे. तरी सेवामुक्ती निर्णयाचा फेर विचार करावा व तो पर्यंत मला सेवेत रुजु ठेवणेचा आदेश व्हावा. अशी विनंती केली आहे.

डॉ.सुधीर श्रीराम करमरकर, माजी प्लॅस्टीक सर्जन, श्री साईबाबा हॉस्पीटल यांची टर्मिनेशन ऑर्डर रद्द करुन त्यांना पुर्ववत कामावर घेणेबाबत मा.श्री.शंकरराव गेणूजी कोल्हे साो., उपाध्यक्ष यांचेकडील जा.नं.८२८७ दि.०५-१०-२००७ रोजीचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झालेले आहे. सदरचे पत्रात डॉ.सुधीर श्रीराम करमरकर हे आपल्या श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी हॉस्पीटलमध्ये दि.०९-०५-२००६ पासून प्लॅस्टीक सर्जन या पदावर रुजु होते. त्यांना वरील संदर्भानुसार संस्थान सेवेतुन टर्मिनेट केले आहे. डॉ.सुधीर करमरकर यांनी आजपर्यंत चारशे प्लॅस्टीक सर्जरी शस्त्रक्रिया यशस्वीपणे केलेल्या आहेत. त्यांचेबद्दल एकाही रुग्णाची तक्रार नाही अगर त्यांच्या कामकाजाबद्दल सुपरस्पेशालिटी व्यवस्थापकीय समिती सदस्यांचीही तक्रार नाही. त्यांचे व्यवस्थापनाबरोबर सौदार्हपुर्ण संबंध होते. त्यांना संस्थानकडून आजवर एकही आरोपपत्र देण्यात आलेले नाही. त्यांनी आजवर विविध गुंतागुंतीच्या प्लॅस्टीक सर्जरी यशस्वीपणे पार पाडलेल्या आहेत. ते त्यांचे व्यवसायात हुशार, प्रामाणिक व प्रदीर्घ अनुभवी आहेत. सद्यपरिस्थितीत संस्थानचे सुपर स्पेशालिटी हॉस्पीटलमध्ये अशी सेवा रुग्णांना न मिळाल्याने त्यांना पुणे, मुंबई येथील हॉस्पीटलचा आधार घ्यावा लागणार आहे. तेव्हा परिसरातील गरजु व गरीब रुग्णांच्या अडचणीचा विचार करता त्यांची प्लॅस्टीक सर्जरी सेवा महत्वाची आहे, असे असतांनाही संस्थानच्या मॅनेजमेंट कमिटीने त्यांना त्यांची कुठलीही बाजू न मांडता, कुठलीही पुर्ववत कल्पना न देता टर्मिनेट केलेले आहे त्यामुळे त्यांचेवर व त्यांचे कुटुंबावर मोठी आपत्ती कोसळली आहे. डॉ. सुधीर करमरकर यांच्यावर अशा पध्दतीने घेतलेला निर्णय अन्यायकारक आहे. तरी त्यांना संस्थानने दिलेली टर्मिनेट ऑर्डर त्वरीत रद्द करुन पुर्ववत पदावर कामांवर घेण्यांसाठी तातडीची कार्यवाही राबवावी अशी शिफारस केली असलेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू प्रस्ताव अमान्य करण्यात आला.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना/कामगार अधिकारी)

**विषय नं. ९३** **श्री सिताराम जनार्दन शेळके व इतर तीन सशस्त्र बंदूकधारी यांना रोजंदारीवरील पगारवाढ होणेबाबत**

**निर्णय क्र.९३** मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी अॅन्ड अलाईड सर्व्हीसेस प्रा.लि.पुणे, सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर, कॅम्प-शिरडी यांना संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटल व परिसराचे सुरक्षेकामी सुरक्षा कर्मचारी पुरविणेचे कॉन्ट्रॅक्ट

दि.१७-०८-२००६ पासून देणेत आलेले आहे. त्यामध्ये श्री साईनाथ रुग्णालय,मंदिर परिसर,श्री साईबाबा हॉस्पीटल याठिकाणी एकुण २१ सेवानिवृत्त/माजी सैनिक यामधूनच सशस्त्र सुरक्षा रक्षक पुरविणेबाबत त्यांना कळविणेत आलेले आहे. सेवानिवृत्त/ माजी सैनिक सशस्त्र सुरक्षा रक्षकांचा वेतनदर प्रतिदिनी रुपये १८४.५५/-असा मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६-०७-२००६ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा निर्णय क्र.५३० अन्वये मान्य करणेत आलेला आहे. त्याप्रमाणे सेवानिवृत्त/माजी सैनिक सशस्त्र सुरक्षारक्षकांना प्रतिदिनी रुपये १८४.५५/-असा वेतनदर देण्यात येत आहे.

उपरोक्तचे सेवानिवृत्त/माजी सैनिक असलेल्या २१ सशस्त्र रक्षकांचे मंजुरीमध्येच दि.२१-०९-२००६ पासून पुर्वीचे एजन्सीकडील सिव्हील गणमॅन देखील पुरविणेबाबत मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हीसेस प्रा.लि.पुणे यांना कळविणेत आलेले आहे व सदर सिव्हील गणमॅनचा शासनाचे नियमाप्रमाणे किमान वेतनदर प्रतिदिनी रुपये १३३.८२ याप्रमाणे आहे. म्हणून श्री.सिताराम जनार्दन शेळके व इतर तीन सिव्हील गनमॅन यांना माजी सैनिक असलेल्या गनमॅनप्रमाणे रुपये १८४.५५ प्रतिदिनी याप्रमाणे वेतनदर न देता, त्यांना रुपये १३३.८२ याप्रमाणे किमान वेतनदर देण्यात येत आहे.

त्यानंतर मा.श्री.शंकरराव गेणूजी कोल्हे साो., उपाध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी यांचेकडून दि.०४-११-२००७ रोजीचे पत्र प्राप्त झालेले आहे. सदर पत्रात चआपले संस्थानमार्फत स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हिसेस प्रा.लि.पुणे या कामगार ठेकेदारामार्फत ०१. श्री.सिताराम जनार्दन शेळके, रा.आडगांव बु. ता.राहाता २.श्री.रेवणनाथ सिताराम शिंदे रा.धोत्रे, ता.कोपरगांव, ३. श्री.मधुकर होन, रा.चांदेकसारे, ता.कोपरगांव, ४.श्री.दत्तात्रय चौधरी, रा.शिंगवे, ता.राहाता हे इसम अनुक्रमे सन-१९९८, १९९९, २००० या साला पासून संस्थानच्या सिक्युरिटी विभागात सशस्त्र बंदुकधारी सिक्युरिटी म्हणून काम करीत आहेत. त्यांना रोजंदारीवर प्रत्येकी १३०/- रुपये पगार दिला जातो.

मात्र संस्थानने सन-२००६ साली माझी सैनिक यांना रोजंदारीवरील पगार रु.१८४/- दिला जात आहे. या सर्वांचे एकच काम आहे. श्री.सिताराम शेळके व इतर तीन यांना सेवा जेष्टतानुसार रु.१८४/- रोजंदारी पगार मिळणे योग्य असतांना देखील त्यांना पगार कमी दिला जात आहे. तरी संबंधीत ०४ सशस्त्र बंदुकधारी सिक्युरिटी यांना रोजंदारी पगार १८४/- करण्यात यावा,असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त चार सिव्हील गणमॅन यांना दिनांक १.१.२००८ पासून माजी सैनिकांप्रमाणे सुधारित वेतन देण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-कामगार अधिकारी)

**विषय न ९४** **मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲण्ड अलाईड सर्व्हिसेस प्रा.लि.पुणे यांचे सुरक्षा अनामत (सिक्युरिटी डिपॉझिट)बाबत.**

**निर्णय क्र.९४** संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कामगार व सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी नविन ठेकेदारांची/कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेकामी वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्दीस देऊन, मान्यताप्राप्त ठेकेदारांकडून " सिलबंद निविदा " मागविणेत आल्या होत्या. " सिलबंद निविदा " फॉर्मस् विक्रीची मुदत दि.१८-०१-२००७ पासून ते दि.३०-०१-२००७ पर्यंत अशी होती. तसेच सिलबंद निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.३१-०१-२००७ रोजी सायंकाळी ५-०० वाजेपर्यंत अशी होती. त्याप्रमाणे संस्थानकडे मान्यताप्राप्त ठेकेदारांकडून एकूण ३८ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्यापैकी श्री.सिताराम बापू वैद्य या ठेकेदाराचे विनंती वरुन त्यांची निविदा रद्द करणेत आलेली आहे. उर्वरीत ३७ सिलबंद निविदा मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७-०२-२००७ रोजीचे सभेमध्ये उघडणेत येऊन, त्याबाबतचा तुलनात्मक तक्ता तयार करुन, मा.व्यवस्थापन समितीचे दि.३१-०३-२००७ रोजीचे सभेमध्ये निर्णयार्थ सादर करणेत आला होता. तसेच त्यादिवशी संबंधीत ठेकेदारांना त्यांचे निविदेतील दरांसंदर्भात चर्चा/वाटाघाटी करणेसाठी उपस्थित रहाणेबाबत कळविणेत आले होते. त्यास अनुसरुन सदर दिवशी ३५ ठेकेदार/प्रतिनिधी चर्चा/वाटाघाटीसाठी उपस्थित होते. चर्चा/वाटाघाटीचे वेळी उपस्थित ठेकेदारांना त्यांचे अंतिम सुधारित दर लेखी स्वरुपात देणेबाबत सांगणेत आले. त्याप्रमाणे ३४ ठेकेदारांनी त्यांचे अंतिम सुधारित दर बंद पाकीटातून दिले. सदरची बंद पाकिटे उघडणेत येऊन त्याबाबत तुलनात्मक तक्ता तयार करुन, निर्णयासाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०-०५-२००७ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता. त्याप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०-०५-२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३९३ अन्वये मे.बी.व्ही.जी.इंडिया लि., पुणे, मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इं) लि., नासिक यांची अकुशल, कुशल कामगार कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी लेबर कॉन्ट्रॅक्टर म्हणून तसेच मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा.लि., मुंबई व मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हीसेस प्रा.लि., पुणे यांची सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर म्हणून एक वर्ष कालावधीसाठी नियुक्ती करणेबाबत निर्णय झालेला आहे.

मा.व्यवस्थान समितीचे दि.२०-०५-२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३९३ ला अनुसरुन मे.बी.व्ही.जी.इंडिया लि., पुणे , मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इं) लि., नासिक यांची अकुशल, कुशल कामगार कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी लेबर कॉन्ट्रॅक्टर म्हणून तसेच मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा.लि., मुंबई व मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हीसेस प्रा.लि., पुणे यांची सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर म्हणून दि.०१-११-२००७ पासून ते दि.३१-१०-२००८ अखेर एक वर्ष कालावधीसाठी दि.०३-१०-२००७ रोजीचे आदेशान्वये नेमणूक करणेत आलेली आहे.

त्याप्रमाणे मे.बी.व्ही.जी.इंडिया लि., पुणे, मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी ( इं)लि., नासिक व मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा.लि., मुंबई यांनी कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कामगार व सुरक्षा कर्मचारी पुरविण्याचे कॉन्ट्रॅक्ट/काम दि.०१-११-२००७ पासून सुरु केलेले आहे. तथापी, मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हीसेस प्रा.लि., सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर यांनी दि.०१-११-२००७ पासून कंत्राटी पध्दतीने मंदिराबाहेरील विभाग श्री साईबाबा भक्तनिवासस्थान व इतर परिसरात सुरक्षा कर्मचारी पुरविण्याचे कॉन्ट्रॅक्ट/काम सुरु केलेले नाही. त्याऐवजी ऐनवेळी दि.३१-१०-२००७ रोजी फॅक्स लेटर पाठविले. त्यात त्यांनी :-

1) Please refer to your letter No.SSS/WSI 7A /15727/2007 dated 03 October 2007 regarding deposit of additional security deposit of Rs. 3,00,000/- ( Rupees Three Lakh only). It may please be noted that we have already deposited a Security deposit of Rs.1,00,000/- (Rs. One Lakh Only ).

2) We are already providing security service to the Shri Sai Sansthan as a matter of our corporate social responsibility and consider it as a social service. It is for this reason that our services are being provide on no profit basis. On the contrary, we have to incur out of pocket expenditure, which we take in our stride.

3) However, it may be appreciated that we are in no position to deposit any additional security deposit.

4) You are requested to reconsider the matter regarding deposition of additional security deposit and inform us at the earliest " असे म्हटलेले आहे.

उपरोक्तप्रमाणे श्रीसाईबाबा भक्तनिवासस्थान विभाग व इतर परिसरातील सुरक्षेबाबतचे कॉन्ट्रॅक्ट देणेपुर्वी मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हीसेस प्रा.लि., पुणे यांना मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६-०७-२००६ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा निर्णय क्र.५३० अन्वये श्री साईबाबा हॉस्पिटल व परिसराचे सुरक्षेकामी कंत्राटी पध्दतीने सुरक्षा सुपरवायझर-०३, सशस्त्र सुरक्षा रक्षक-२१, सुरक्षा गार्ड-५४ असे एकूण ७८ सुरक्षा कर्मचारी दि. १७-०८-२००६ पासून ते दि. १६-०८-२००७ पर्यंत एक वर्ष कालावधीसाठी पुरविणेबाबत दि.१०-०८-२००६ रोजीचे पत्रान्वये लेखी कळविणेत आले होते. त्याप्रमाणे ते दि.१७-०८-२००६ पासून कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी पुरवित आहेत. त्यावेळी त्यांनी चर्चा/वाटाघाटीत ठरलेप्रमाणे कंत्राटी कामाची हमी म्हणून रु.१,००,०००/- (रुपये एक लाख ) मात्र सुरक्षा अनामत /सिक्युरिटी डिपॉझीट म्हणून बिनव्याजी संस्थानकडे जमा केलेले आहे.

त्यानंतर दि.१६-०८-२००७ अखेर मुदत संपलेनंतर मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हीसेस प्रा.लि., पुणे यांना मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८-०७-२००७ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा निर्णय क्र.६३० अन्वये दि.१७-०८-२००७ पासून एक वर्ष मुदतवाढ देणेत आलेली आहे व तसे मे. स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हीसेस प्रा.लि., पुणे यांना दि.१७-०८-२००७ रोजीचे पत्रान्वये लेखी कळविणेत आले आहे. त्याप्रमाणे त्यांचेकडून संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल व इतर परिसराचे सुरक्षेकामी दि.१७-०८-२००७ पासून ते दि.१६-०८-२००८ पर्यंत एक वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी पुरविणेत येत आहे.

तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०-०५-२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३९३ नुसार मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हीसेस प्रा.लि., पुणे यांना मंदिर परीसराबाहेरील इतर विभाग उदा.श्री साईबाबा भक्तनिवासस्थान, शैक्षणिक संकुल, वाहन विभाग, श्री साईनाथ रुग्णालय, कनकुरी तळे व इतर परिसर याठिकाणी सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी इकडील जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१५७२७/२००७ दि.०३-१०-२००७ रोजीचे पत्रान्वये लेखी कळविणेत आले होते. परंतू मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हीसेस प्रा.लि., पुणे यांनी उपरोक्तप्रमाणे दि.३१-१०-२००७ रोजीचे फॅक्स पत्रान्वये ऐनवेळी आमचे एजन्सीने श्री साईबाबा हॉस्पिटलकडील सुरक्षा कामाचे कॉन्ट्रॅक्टमध्ये रु.१,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख )मात्र सिक्युरिटी डिपॉझीट भरलेले असल्याने आमची एजन्सी आणखी सिक्युरिटी डिपॉझीट रु.३,००,०००/- (रुपये तिन लाख) मात्र भरण्याचे परिस्थितीत नाही., तरी त्याबाबत फेरविचार व्हावा असे कळविले आहे. सदर एजन्सीला संस्थानने दि.०३-१०-२००७ रोजी लेखी पत्रान्वये कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी दि.०१-११-२००७ पासून पुरविणेकामी कळविले होते. तेंव्हापासून ते दि.३०-१०-२००७ पर्यंत त्यांनी सिक्युरिटी डिपॉझीट बाबत कुठलीही विचारणा अथवा चर्चा केलेली नव्हती. त्यांची सदरची बाब ही संस्थान प्रशासनास

अडचणीत आणणारी आहे. निविदेतील अट व शर्त क्र.१३ प्रमाणे तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.३१-०३-२००७ रोजीचे सभेतील चर्चा/वाटाघाटीत ठरलेप्रमाणे सदर एजन्सीने कंत्राटी कामाची हमी म्हणून सुरक्षा अनामत (सिक्युरिटी डिपॉझीट) रक्कम रु.३,००,०००/-(रुपये तिन लाख ) मात्र १५ दिवसांचे आंत त्वरीत संस्थानचे लेखाशाखेत रोखीने अथवा डिमांड ड्राफ्टने जमा करणे आवश्यक असून ते त्यांचेवर बंधनकारक आहे. तसे त्यांना इकडील जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१५७२७/२००७ दि.०३-१०-२००७ रोजीचे पत्रान्वये लेखी कळविणेत आले आहे.

तथापी, त्यांनी सदर सिक्युरिटी डिपॉझीटची रक्कम रु.३,००,०००/-(अक्षरी रुपये तिन लाख ) मात्र संस्थानचे लेखाशाखेत बिनव्याजी जमा न करता दि.३१-१०-२००७ रोजीचे फॅक्स पत्राअन्वये श्री साईबाबा हॉस्पिटल कडील सुरक्षा कामाचे कॉन्ट्रॅक्टमध्ये रु.१,००,०००/- भरलेले असल्यामुळे, आता आणखी सिक्युरिटी डिपॉझीट रु.३,००,०००/- मात्र भरणा करण्याचे परिस्थितीत नाही तरी त्याबाबत फेरविचार करणेत यावा व तसे आम्हांस कळविणेत यावे असे म्हटलेले आहे. व त्यांनी दि.०३-१०-२००७ रोजीचे वर्कऑर्डरप्रमाणे दि.०१-११-२००७ पासून श्री साईबाबा भक्तनिवासस्थान व इतर परिसराचे सुरक्षेकामी संस्थानला कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी पुरविण्याचे काम/कॉन्ट्रॅक्ट चालू केलेले नाही. त्यांनी निविदेतील अटी शर्तीचा तसेच मा.व्यवस्थापन समितीचे सभेमधील चर्चा/ वाटाघाटीमध्ये ठरलेप्रमाणे अटी शर्तीचा भंग केलेला आहे.

मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हीसेस प्रा.लि., पुणे, सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए-१५७२७/२००७ दि.०३-१०-२००७ रोजीचे पत्रान्वये लेखी कळवून देखील त्यांनी दि.०१-११-२००७ पासून ते अद्याप पर्यंत संस्थानचे श्री साईबाबा भक्तनिवासस्थान व इतर परिसराचे सुरक्षेकामी कॉन्ट्रॅक्ट/काम सुरु केलेले नाही. तसेच सदर कामाचा चार्ज देखील त्यांनी घेतलेला नाही. त्यांनी कंत्राटी सुरक्षा कर्मचा-यांना अद्याप पर्यंत ओळखपत्र व युनिफॉर्म देखील दिलेले नाही. सदर एजन्सीचे प्रतिनिधींशी दुरध्वनीवरुन अनेकवेळा त्याबाबत संपर्क साधून देखील, त्यांनी कॉन्ट्रॅक्ट चालू करणेबाबत प्रतिसाद दिलेला नाही. त्यांचे सिक्युरिटी डिपॉझीट संदर्भात निर्णय होणेस काही कालावधी लागणार आहे. त्यामुळे कामाची गैरसोय होऊ नये म्हणून, तुर्त दि.०१-११-२००७ पासून ते पुढील आदेश होईपर्यंत मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हीसेस प्रा.लि., पुणे यांचे ऐवजी मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा.लि., मुंबई, सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर यांना श्री साईबाबा भक्तनिवासस्थान व परिसरातील सुरक्षेकरीता कॉन्ट्रॅक्ट चालू करणेकामी आदेश देणेत यावा असा निर्णय मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८-११-२००७ रोजीचे सभेममध्ये संमत झालेला आहे त्यास अनुसरुन मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा.लि., मुंबई, कॅम्प शिरडी यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३१७६/२००७ दि. २३-११-२००७ रोजीचे आदेशान्वये लेखी कळविणेत आले आहे. त्याप्रमाणे त्यांनी श्री साईबाबा भक्तनिवासस्थान व इतर परिसरातील सुरक्षेकामी सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविण्याचे काम चालू केलेले आहे.

**सबब,** मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हीसेस प्रा.लि., पुणे, सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर यांना निविदेतील अट व शर्त क्र.१३ व मा.व्यवस्थापन समितीचे दि.३१-०३-२००७ रोजीचे सभेत झालेल्या चर्चा/वाटाघाटीत ठरलेप्रमाणे कंत्राटी कामाची हमी म्हणून सुरक्षा अनामत रक्कम रु.३,००,०००/- (अक्षरी रुपये तिन लाख) मात्र भरणे आवश्यक असतांना त्याबाबत फेरविचार करुन, त्यांना रु.३,००,०००/- सिक्युरिटी डिपॉझीट संस्थानचे लेखाशाखेमध्ये भरणेबाबत सुट दयावयाची किंवा कसे ? **अथवा**

मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हीसेस प्रा.लि., पुणे सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर यांनी निविदेतील अटी व शर्ती तसेच मा.व्यवस्थापन समितीचे सभेत झालेल्या चर्चा/वाटाघाटीत ठरले प्रमाणे दि.०१-११-२००७ पासून सुरक्षा कर्मचारी पुरविण्याचे काम/कॉन्ट्रॅक्ट सुरु न केल्याने व तसेच रु.३,००,०००/- (अक्षरी रुपये तिन लाख) मात्र सिक्युरिटी डिपॉझीट संस्थानचे लेखाशाखेत जमा/भरणा करणेस ते असमर्थ असल्याने, त्यांचे कॉन्ट्रॅक्ट रद्द (टर्मिनेट) करावयाचे किंवा कसे ? याबाबत निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हीसेस प्रा.लि., पुणे सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर यांना एकवेळ सुधारणेची संधी देण्यात यावी व त्यांना नियमानुसार अनामत रक्कम भरणेबाबत कळविण्यात यावे, असें ठरले. (कार्यवाही-कामगार अधिकारी)

**विषय नं. ९५** **रुग्णवाहिका सेवा आकार दर वाढीबाबत**

**निर्णय क्र.९५** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी तर्फे साईनाथ रुग्णालय व साईबाबा रूग्णालयात उपचार घेणाऱ्या गरीब व गरजू रूग्णाकरिता मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद इ. ठिकाणी पुढील उपचारा करीता पाठविणे कामी टाटा४०७ रूग्णवाहिका / शववाहिका-०३, टाटा सुमो रूग्णवाहिका / शववाहिका-०२, मारूती रूग्णवाहिका-०२, कार्डीयाक रूग्णवाहिका-०१ अशा एकुण- ०८ रूग्णवाहिका वापरात आहेत.

दि.२५/०२/२००३ चे मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेतील निर्णय क्रं.६६ व दि.२७/१२/२००४ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं.१८९ नुसार खालील प्रमाणे दर निश्‍चित करण्यात आलेले आहेत. पुर्वीचे इंधन दर, घेण्यात येणारा सेवाआकार व आजरोजीचे इंधन दर खालील प्रमाणे.

| अ.नं. | वाहन प्रकार/ इंधन | सेवाआकार दर (प्रति कि.मी.) | पुर्वीचे इंधन दर | आज रोजी इंधन दर |
|---|---|---|---|---|
| ०१ | टाटा सुमो- डिझेल | रू.३.०० | रू.२५.३० | रू.३४.१४ |
| ०२ | टाटा४०७- डिझेल | रू.३.०० | रू.२५.३० | रू.३४.१४ |
| ०३ | टेम्पो ट्रॅव्हलर- डिझेल | रू.३.०० | रू.२५.३० | रू.३४.१४ |
| ०४ | कार्डीयाक (A/C) डिझेल | रू.५.०० | रू.३१.६४ | रू.३४.१४ |
| ०५ | मारूती - पेट्रोल | रू.४.०० | रू.३६.७९ | रू.४६.७७ |

इंधन दर निश्‍चितीचे वेळी असलेले इंधन दर व घेण्यात येणारा सेवाआकार व आज रोजी असलेले इंधन दर व घेण्यात येणारा सेवाआकार यांचा विचार करता इंधन दर व जमा होणारा सेवाआकार या मध्ये तफावत दिसते.

सन २००६ ते २००७ चे लेखापरिक्षण अहवालात रूग्णवाहिका सेवाआकार दर वाढ करण्याचे सुचविलेले आहे.

सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रं. जिरूफो१०००/प्र.क्र.९०/२०००/आरोग्य-३ मंत्रालय, मुंबई. दि.१०जुलै २००१ या शासन निर्णया प्रमाणे रूग्णवाहिका शुल्क प्रति कि.मी. रू ५/- तसेच प्रतिक्षा शुल्क (८ तासापुढे) रू.३०/- प्रती तास असा आहे.

तरी वेळोवेळी इंधन दरात झालेली वाढ तसेच शासन निर्णया नुसार (प्रतिक्षा शुल्काचा विचार न करता) साईनाथ रूग्णालयात व साईबाबा रूग्णालयात उपचार घेणाऱ्या गरीब व गरजू रूग्णांकरिता वापरात असलेल्या रुग्णवाहिकेच्या दरात प्रति कि.मी. सेवाआकार दरात खालील प्रमाणे वाढ करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

| | |
|---|---|
| डिझेल रूग्णवाहिके करीता प्रति कि.मी. | रू.५/- |
| पेट्रोल रूग्णवाहिके करीता प्रति कि.मी. | रू.६/- |
| कार्डीयाक रूग्णवाहिके करीता प्रति कि.मी. | रू.७/- |

यावर सविस्तर चर्चा होऊन,संस्थान रुग्णालयातील रुग्णवाहिकेचा वापर गरीब व गरजु रुग्णांना होत असल्याने रुग्णवाहिकेचा सेवा आकार वाढविण्यात येऊ नये असे ठरलें.

(कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

**विषय नं. ९६** **नवीन प्रसादालयाकरीता बसेस खरेदी करणेबाबत**

**निर्णय क्र.९६** दिनांक १७/०२/२००७ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.११५, ब-१७ नुसार मंदिर परिसर ते नवीन प्रसादालय बस सेवा सुरू करणे करीता उपलब्ध बसेस अपुऱ्या असलेने प्रसादालय प्रमुख यांचे मागणी नुसार नविन ४ बसेस खरेदी करणे कामी अंदाजे रू.६० लाख मात्रचे खर्चास तसेच अशोक लेलॅण्ड कंपनीच्या अधिकृत डिलर कडुन कोटेशन बोलाविणेस मान्यता देण्यात आली होती.

दिनांक १७/४/२००७ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील आयत्या वेळचा निर्णय क्रं.३५० नुसार प्रस्तावित ०४ बसेस पैकी प्रयोगिक तत्वावर २ लो फ्लोअर बसेस प्रथम खरेदी करण्यात याव्या असे ठरले. सदर निर्णयानुसार दि.२६/५/२००७ च्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत लेलॅन्ड कंपनीच्या अधिकृत डिलर यांचेकडून आलेल कोटेशन उघडण्यात येऊन चर्चा वाटाघाटी करून २ चेसीज ॲटोमोटीव्ह मॅन्युफॅकचरर्स प्रा.लि. औरंगाबाद यांच्या कडून खरेदी कराव्यात व एक चेसीज वर बॉडीबांधनीचे काम इनकोच बॉडीबिल्डर, मुंबई व दुसऱ्या चेसीजवर आरको इंजिनीअर्स, पुणे यांचे कडून करून घेण्यात यावे असे ठरले त्यानुसार चेसीज खरेदी करण्यात आलेल्या आहेत. व सदरचे चेसीजवर बॉडी बांधनीचे काम चालु आहे.

दिनांक ३०/०८/२००७ रोजी मा.सदस्या सौ. उर्मिला जाधव यांचेशी समक्ष झालेल्या चर्चेत त्यांनी असे सुचविले आहे की, "नवीन प्रसादालयात एका वेळेस अंदाजे ५,००० साईभक्त प्रसाद भोजन घेणार असल्याने ०२ बसेस अपुऱ्या पडतील त्यामुळे साईभक्तांची ने-आण करण्याची अडचण निर्माण होईल. तरी मंजुर बसेस पैकी उर्वरित दोन बसेस जादा आसन क्षमता असलेल्या खरेदी करण्यात याव्यात"

दिनांक १७/०४/२००७ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार, ३६ सिटर आसनक्षमता होणाऱ्या चेसीज खरेदी करून बॉडीबांधणीचे काम चालु आहे. परंतु, लेलॅण्ड कंपनी स्वतः बस तयार करत नसलेने बॉडी बांधणीस जास्त कालावधी लागतो. ३६ सिटर आसन क्षमतेपेक्षा जास्त आसनक्षमता असलेल्या बसेस खरेदी करावयाच्या असल्यास टाटा कंपनी स्वतः बसेसची बॉडी बांधणी करून देत असलेने लेलॅण्ड ऐवजी टाटा कंपनीच्या बसेस खरेदी कराव्या लागतील.

तरी दि.१७/०२/२००७ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मंजुर असलेल्या बसेस पैकी शिल्लक टाटा कंपनीच्या ५४ प्रवासी आसन क्षमतेच्या ०२ बसेस खरेदी करणेचा व टाटा कंपनीचे

अधिकृत डिलर यांचेकडुन कोटेशन बोलाविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

**विषय नं. ९७ माल वहातुकीसाठी वाहने खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.९७** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डीची वाढती भौगोलिक स्थिती व दिवसेंदिवस साईभक्तांचे वाढते गर्दीचे प्रमाण तसेच मालवाहतूकी करीता वाहनांच्या मागणीचा विचार करता सध्या आपणाकडे असलेली वाहने अपुरी पडत आहेत.

वाहन विभागाकडे मालवाहतूकी करीता खालील प्रमाणे वाहने आहेत.

| | | |
|---|---|---|
| ०१. | महिंद्रा मॅक्स व कॅम्पर | - ०४ वाहने |
| ०२. | टाटा ४०७ टेम्पो | - ०१ वाहन |
| ०३. | टाटा ७०९ टेम्पो | - ०१ वाहन |
| ०४. | स्वराज ८५५ ट्रॅक्टर | - ०१ ट्रॅक्टर . |
| | **एकुण वाहने** | **- ०७ वाहने** |

वरील वाहने साईनाथ व साईबाबा हॉस्पिटल, प्रसादालय, भांडार-खरेदी विभाग, पाणीपुरवठा विभाग, लाडूप्रसाद वाहतूक, बांधकाम विभाग, बगीचा विभाग इ. विभागांचे मागणीनुसार मालवाहतूकी करीता पुरविली जातात. परंतू, सदर वाहने अपुरी पडत आहे तसेच नव्याने सुरू होत असलेले साईप्रसादालय करीता मालवाहतूक वाहने अपुरी पडणार आहेत.

मालवाहतूकीसाठी अडचण येऊ नये या करीता खालील प्रमाणे नवीन वाहने खरेदी करावी लागतील.

| | | |
|---|---|---|
| ०१. | टाटा ४०७ | ०१ वाहन |
| ०२. | टाटा ACE | ०१ वाहन |
| ०३. | स्वराज ८५५ ट्रॅक्टर (बाहुबली हायड्रोलिक ट्रेलरसह) | ०१ वाहन |
| | **एकुण वाहने** | **०३ वाहने** |

वरील प्रमाणे तीन वाहने खरेदी कामी अंदाजे रू.१८ लाख मात्र खर्च अपेक्षीत आहे. सदर वाहने खरेदी करणे कामी टाटा व स्वराज कंपनीचे अधिकृत डिलर यांचेकडून कोटेशन मागवून खरेदी करण्यात येतील.

तरी एक टाटा४०७ टेम्पो, एक टाटा ACE व एक स्वराज ट्रॅक्टर (बाहुबली हायड्रोलिक ट्रेलरसह) अशी एकुण तीन वाहने खरेदी करणे व या कामी अंदाजे रू.१८ लाख मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

**विषय नं. ९८ वाहन विभागातील सर्व वाहनांचे वार्षिक विमा नुतनीकरण करणेबाबत.**

**निर्णय क्र.९८** वाहन विभागात कार, बसेस, रूग्णवाहिका, व मालवाहतूक अशी एकुण ४४ वाहने वापरात आहेत. सदर वाहनांचा दि.३१/०३/२००८ अखेर विमा संपुष्टात येत आहे.

या पुढे दि.०१/०४/२००८ ते दि.३१/०३/२००९ अखेर एक वर्षाकरीता सर्व वाहनांचा विमा उतरविण्याचा असलेने याकामी अंदाजे एकुण रू. ०८ ते १० लाख मात्र खर्च अपेक्षीत आहे. त्याकरीता राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडून कोटेशन बोलावणे आवश्यक आहे.

तरी दि.०१/०४/२००८ ते दि.३१/०३/२००९ अखेर एक वर्षाकरीता सर्व वाहनांचा विमा नुतनीकरण करावयाचा असलेने राष्ट्रीयकृत कंपन्यां दि.न्यु इंडिया एन्शोरन्स, कं.लि., दि. ओरीएन्टल इंश्योरन्स कं. लि., युनायटेड इंडिया कं. लि., नॅशनल इन्शुरन्स कं.लि. यांचेकडून दरपत्रके (कोटेशन) मागविणे व या कामी अंदाजे एकुण रू. ०८ ते १० लाख खर्च अपेक्षित असून,त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

**विषय नं. ९९ नवीन टायर्स खरेदी करणेबाबत**

**निर्णय क्र.९९** वाहन विभागाकडील वापरात असलेल्या खालील वाहनांचे सध्याचे टायर खराब झालेने त्यांना नवीन टायर्स (टयुब, फ्लॅपसह) खरेदी करणे आवश्यक आहे. त्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.नं | वाहन क्रं. | प्रकार / वापर | सध्याचे टायर एकूण वापर कि.मी. | आवश्यक टायर साईज | कंपनी | टायर नग |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | एमएच-१७/ टी-१६४१ | बोलेरो / कार्यालयीन | ५७,६०० | २१५-७५ R-१५ रेडियल | ब्रिजस्टोन | ०५ |
| २. | एमएच-१७/ टी-७१४१ | टाटा४०७ / रूग्णवाहिका | ४७,६७८ | ७-५०-१६ | अपोलो | ०५ |
| ३. | एमएच-१७/ एफ-६००१ | ट्रेलर / मालवाहतुक | - | ९-००-१६ | अपोलो | ०४ |
| | | | | | **एकुण** | **१४** |

वरील प्रमाणे तीन वाहनांकरिता १४ टायर्स खरेदी कामी रू.८०,०००/- मात्र खर्च अपेक्षीत आहे.

महिंद्रा बोलेरो करीता ब्रिजस्टोन कंपनीचे तसेच टाटा४०७ रूग्णवाहिका व ट्रेलर करीता अपोलो कंपनीचे टायर अधिकृत डिलर यांचे कडून कोटेशन बोलावुन खरेदी करण्यात येतील.

तरी वरील प्रमाणे १४ टायर्स, टयुब, फ्लॅपसह खरेदीस व येणारे अंदाजे रू.८०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

**विषय नं. १०० निरुपयोगी / खराब लोखंडी खुच्या वार्षिक उच्चतम दराने विक्री करणेस व व डेडस्टॉकमधून कमी करणेबाबत.**

**निर्णय क्र.१००** जनसंपर्क कार्यालयामध्ये अपंग व वयोवृध्द व्यक्तींना थेट दर्शन व आरती करणेसाठी पास देण्याची सुविधा उपलब्ध आहे. तसेच ज्या अपंग व वयोवृध्द व्यक्तींना अजिबातच चालता येत नाही अशांसाठी व्हील चेअरची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. त्याकामी चार व्हील चेअर ठेवण्यात आल्या असून त्यापैकी खालीलप्रमाणे दोन व्हील चेअर अतिशय नादुरुस्त झालेल्या असून दुरुस्त करुनही वापराता येण्यासारख्या नाहीत तसेच कार्यालयातील एक रिव्हॉल्व्हींग चेअरही अतिशय खराब झालेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.नं | संगणक कोड नं | तपशिल | नग | प्रत्येकी मुळ किंमत |
|---|---|---|---|---|
| 01 | CHR/278 | व्हील चेअर | 01 | 5,500.00 |
| 02 | CHR/113 | व्हील चेअर | 01 | 6,000.00 |
| 03 | CHR/114 | रिव्हॉलविंग चेअर | 01 | 1,500.00 |

तरी उपरोक्त व्हील चेअरची अभिलेखा विभागामार्फत मंजूर वर्षिक उच्चतम दराने विक्री करणेस तसेच विक्री झालेल्या साहित्याची नोंद माहिती जनसंपर्क कार्यालयाचे मालमत्ता नोंद वहीतून (डेडस्टॉक मधुन) कमी करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रशासन शाखा,वशी-०५)

**विषय नं. १०१ श्री साईबाबा संस्थान,शिर्डी भोजनगृह परिसरातील ग्रामोद्योग वस्तू विक्री केंद्रासाठी महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळास २ ते ३ स्टॉलची जागा उपलब्ध करुन देणे बाबत.**

**निर्णय क्र.१०१** महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, विभागीय कार्यालय- नाशिक विभाग, उद्योग भवन पहीला मजला, सातपुर, नाशिक ७ यांचे पत्र दि १०/०५/२००७ पत्र या विभागाचे कार्यकारी अधिकारी श्री. प्रितम आठवले,यांचे पत्र दि ०८/०५/२००७ व अध्यक्ष महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग यांचे मा. अध्यक्ष श्री ढोबळे यांचे श्री ससाणे सो अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिरडी यांचे ३१/०५/२००७ चे पत्र व ग्रामोद्योग अधिकारी यांचे मा. अध्यक्ष यांचे नांवे यांनी दि १६/०७/२००७ पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झाले असून त्यात त्यांनी महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ हे शासन अंगीकृत मंडळ असून हे मंडळ ग्रामीण भागातील, ग्रामीण कारागीर / सुशिक्षित बेरोजगार / उद्योजक यांना ग्रामीण भागामध्ये उद्योग आणि व्यवसाय उभारणी करीता राज्य व केंद्र शासनाच्या योजनाव्दारे आर्थिक आणि तांत्रिक सहाय्य उपलब्ध करुन देते, त्याचबरोबर त्यांनी उत्पादीत केलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध व्हावी म्हणून सातत्याने प्रयत्नशिल असते. श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री साईबाबांच्या दर्शनासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून लाखो भाविक येतात अशा ठिकाणी ग्रामीण उद्योजकांचे उत्पादीत मालास बाजारपेठ मिळवून देण्याचे दृष्टीने विक्री केंद्र सुरु करण्याचा खादी ग्रामोद्योग मंडळाचा मानस आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांचे वतीने अनेक खाजगी उद्योजकांना स्टॉल्स उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत असे समजते महाराष्ट् राज्य खादी ग्रामोद्योग मंडळास शिर्डी संस्थानच्या मालकीच्या मोकळया जागेत भोजनगृह परिसरात साधारण दोन ते तीन स्टॉल करीता जागा उपलब्ध करून दिल्यास अधिक सोईचे होईल. की जेणेकरुन ग्रामीण कारागीर सुशिक्षित बेरोजगार यांनी उत्पादीत केलेल्या मालास बाजारपेठ उपलब्ध करुन देण्याचा दृष्टीने हातभार लागेल. तेव्हा आपणांस मी या पत्राव्दारे विनंती करीत आहे की, वर नमूदकेल्या प्रमाणे तीन स्टॉलसाठी महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाला नाममात्र भाडेतत्वावर जागा उपलब्ध करुन देवून सहकार्य क्रावे असे प्रस्तुत पत्रात म्हटलेले आहे.

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, विभागीय कार्यालय- नाशिक विभाग, उद्योग भवन पहीला मजला, सातपुर, नाशिक यांनी महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ हे शासन अंगीकृत मंडळ असून हे मंडळ ग्रामीण भागातील, ग्रामीण कारागीर / सुशिक्षित बेरोजगार / उद्योजक यांना ग्रामीण भागामध्ये उद्योग आणि व्यवसाय उभारणी करीता राज्य व केंद्र शासनाच्या योजनाव्दारे आर्थिक आणि तांत्रिक सहाय्य उपलब्ध करुन देते, त्याचबरोबर त्यांनी उत्पादीत केलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध व्हावी म्हणून सातत्याने प्रयत्नशिल असते.. याबाबतचा विचार करता त्यांना प्रस्तुत ठिकाणी लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर जागा देणे ठरल्यास त्यांचेकडून प्रत्येकी एका

स्टॉलसाठी रुपये १०,०००/- व प्रत्येकी एका स्टॉलसाठी मासिक परवाना फी रुपये १०००/- आकारुन व प्रत्येकी विद्युत बील मीटर रिडीगप्रमाणे वेगळे आकारुन एक वर्षासाठी जागा वापरास कामी देता येईल पुढील विचारार्थ सादर

प्रसादालय परिसरात महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, विक्री केंद्रांसाठी ग्रामीण कारागीर / सुशिक्षित बेरोजगार / उद्योजक यांना ग्रामीण भागामध्ये उद्योग आणि व्यवसाय उभारणी करीता व त्याचबरोबर त्यांनी उत्पादीत केलेल्या वस्तूंना बाजारपेठ एक स्टॉल कामी परवानगी प्रसादालय परिसरात दयावयाची झाल्यास डिपॉझीट रुपये १०,०००/- मासिक परवाना फी रक्कम रुपये १०००/- फी व विद्युत बील वेगळे आकारून एक स्टॉलसाठी लिव्ह अॅन्ड लायसेन्स तत्वावर जागा उपलब्ध करुन देता येईल. या प्रसादालय परिसरात इतर संस्थेस दिलेल्या स्टॉलचे अनुषंगाने ( रुपये ५००/- ते रुपये २०००/-) ठरविलेली आहे.

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, विभागीय कार्यालय- नाशिक विभाग, उद्योग भवन पहीला मजला, सातपुर, नाशिक यांना प्रसादालय परिसरात एक स्टॉल डिपॉझीट रु.१०,०००/- रुपये रुपये १०००/- मासिक परवाना फी आकारून व मिटर रिडीगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारून लिव्ह अॅन्ड लायसेन्सी तत्वावर एक स्टॉलकामी एका वर्षासाठी परवानगी देता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, तो अमान्य करण्यात आला. (कार्यवाही-विधी अधिकारी)

**विषय नं. १०२ महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,अहमदनगर विभाग राज्य परिवहन कोपरगांव यांना प्रसादालय परिसरात लिव्ह अॅण्ड लायसेन्स तत्वावर एस.टी.चे तिकीट अॅडव्हॉन्स बुकींगकामी स्टॉलसाठी दिलेल्या जागेस मुदतवाढ देणेबाबत**

**निर्णय क्र.१०२** संस्थानने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अहमदनगर विभाग तर्फे आगार प्रमुख राज्य परिवहन कोपरगांव, ता- कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांना लिव्ह अॅन्ड लायसेन्स तत्वावर एस. टी. चे तिकीट अॅडव्हान्स बुकींग कामी स्टॉलसाठी प्रसादालय परिसरात जागा साईभक्तांचे व संस्थानचे सोयीच्या दृष्टीने अकरा महिने मुदतीचे कालावधी करिता तात्पुरत्या वापरांसाठी दिलेली आहे.

| अ.नं | इमारतीचे नांव | गाळा / जागा धारकाचे नांव | वापरासाठी घेण्यात येणारी फी | वापर | पूर्वीचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईप्रसाद परिसर -चहा कॅन्टीन / कार्यालय जवळ स्टॉलकामी जागा | महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अहमदनगर विभाग- आगार प्रमुख राज्य परिवहन कोपरगांव ता- कोपरगांव जिल्हा अहमदनगर | एका स्टॉलसाठी दरमहा रुपये ५००/- व दरमहा मिटर रिडींग प्रमाणे येणारे वीजेचे बील वेगळे आकारून | एस. टी. चे तिकीट अॅडव्हान्स बुकींगसाठी | ०५/०१/२००७ ते ०४/११/२००७ ११महिने कालावधीसाठी |

उपरोक्त प्रमाणे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अहमदनगर विभाग तर्फे आगार प्रमुख राज्य परिवहन कोपरगांव, ता- कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांना देण्यात आलेल्या स्टॉलसाठी जागेची मुदत दिनांक ०४-११-२००७ रोजी मुदत संपत असल्याने पुढील दहा वर्षे कालावधी करिता मुदतवाढ मिळणेबाबत प्रस्ताव इकडील कार्यालयास ०५/१२/२००७ रोजीचे पत्र प्राप्त झालेले आहे. त्यात त्यांनी " भोजनगृहासमोर असलेल्या आरक्षण ऑफीस मुदतीबाबत सदरचे विषयानुसार श्री साईबाबा संस्थानचे भोजनगृहासमोर संस्थानमार्फत आरक्षण ऑफीससाठी जागा उपल्बध करून दिली आहे. सदरचे जागेची परवानगी दि ०४/११/२००७ रोजी संपली आहे. त्यांनी दिनांक ०५/११/२००७ पासून आरक्षण कार्यालयासाठी येथून पुढे दहा वर्षासाठी परवानगी देण्यात यावी ही विनंती संस्थानचे नेहमीच एस.टी. महामंडळास सहकार्य लाभले आहे. असा प्रस्ताव /अर्ज स्टॉलसाठी दिलेल्या जागेस मुदतवाढ मिळणेबाबत त्यांनी सादर केलेला आहे.

साईभक्त व संस्थानला सुविधेचा होणारा उपयोग लक्षात घेता महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अहमदनगर विभाग तर्फे आगार प्रमुख महाराष्ट्र राज्य परिवहन कोपरगांव, ता- कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांना दिलेल्या एका स्टॉलसाठी जागेची मुदत दि ०४/११/२००७ रोजी संपत असल्याने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अहमदनगर विभाग तर्फे आगार प्रमुख राज्य परिवहन कोपरगांव, ता- कोपरगांव, जिल्हा अहमदनगर सदर पत्राव्दारे त्यांनी दि ०५/११/२००७ पासून पुढे १० वर्ष कालावधीकरिता मुदतवाढ कामी परवानगी मागितली आहे. परंतु संस्थान अधिनियमानुसार एक वर्षापेक्षा पुढील कालावधीकरिता परवानगी दयावयाची झाल्यास सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे प्रथम मान्यतेसाठी पाठवावा लागेल. त्यांचे मान्यतेनंतरच सदरची परवानगी देता येईल.व तदनतरच विषय मा. व्यवस्थापन समितीसमोर ठेवता येईल.

महाराष्ट्र राज्य परिवहन कोपरगांव, ता- कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांना दिलेल्या एका स्टॉलसाठी तात्पुरत्या वापरासाठी दिलेल्या जागेस दिनांक ०५/११/२००७ पासून दि ०४/१०/२००८

अखेर ११ महिने कालावधीकरिता लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर मुदतवाढ देता येईल त्यांचेकडून सदरचे एका स्टॉलसाठी मासिक परवाना भाडे रुपये ५००/- ( अक्षरी रुपये पाचशे ) मात्र व तसेच माहे मिटर रिडींग प्रमाणे विद्युत बील वेगळे आकारून पूर्वीचेच अटी व शर्तीस अनुसरून लिव्ह ॲन्ड लायसेन्सी तत्वावर एका स्टॉलसाठी दिलेल्या जागेस ११ महिने मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-विधी अधिकारी)

**विषय नं.१०३ निरुपयोगी/खराब लोखंडी खुर्च्या वार्षिक उच्चतम दराने विक्री करणेस व डेडस्टॉक मधून कमी करणेस मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१०३** वैधानिक लेखापरिक्षक यांनी निकामी अनावश्यक साहित्य वेळचे वेळी मंजूरी घेऊन स्टॉक मधून कमी करावे अशा सुचना दिलेल्या आहेत. डेडस्टॉकच्या वस्तू स्टॉक मधून कमी करतांना मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेण्यात यावी असे नमूद करण्यात आलेले आहे.

प्रशासनशाखेकडील कार्यालयीन कामकाजासाठी वापरण्यात येत असलेल्या खालीलप्रमाणे लोखंडी खुर्च्या दैनंदिन वापरामुळे खराब झालेले आहे. त्यामुळे त्या प्रशासनशाखेच्या स्टोअरमध्ये पडून आहे. त्याची अभिलेखा विभागामार्फत लिलावाने विक्री करणेस तसेच लिलावाने विक्री झालेल्या साहित्याची नोंद माहिती प्रशासनशाखेच्या मालमत्ता नोंद वहीतून (डेडस्टॉक मधुन) कमी करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली.

| अ.नं | संगणक कोड नं | तपशिल | नग | प्रत्येकी मुळ किंमत |
|---|---|---|---|---|
| 01 | CHR/098 | रिव्हॉलविंग चेअर (चॉक,कुशन विथ आर्मस् ) | 01 | 1,400.00 |
| 02 | CHR/090 | एक्झिक्यूटीव्ह रिव्हॉलविंग चेअर | 01 | 3,674.25 |
| 03 | CHR/064 | माडर्न चेअर्स (विथ आर्मस् क्रोम प्लेटेड) | 01 | 380.00 |

(कार्यवाही-प्रशासन शाखा,वशी-०५)

**विषय नं. १०४ श्री प्रल्हाद गो.कर्डीले, कंत्राटी आचारी, प्रसादालय यांचे मुदतवाढीबाबत**

**निर्णय क्र.१०४** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/०८/२००६ रोजीच्या सभेतील समक्ष मुलाखती (Walk in Interview) व त्याच दिवशीचे सभेतील निर्णयानुसार श्री प्रल्हाद गोरक्षनाथ कर्डीले,उक्कलगांव यांची कंत्राटी आचारी,या पदावर एक वर्षे कलावधीसाठी प्रसादालय विभागाकडे संस्थान कामगार कायदेशीर सल्लागार ॲड.अशोक पाटील यांचे सल्ल्यानुसार नेमणूक करण्यात आलेली असून त्यानुसार ते दि.२८/१२/२००६ रोजी कामावर हजर झालेले आहेत.

उपरोक्त श्री.कर्डीले यांची दि.२७/१२/२००७ रोजी एक वर्षे कालावधीची मुदत संपुष्टात आलेली आहे. सदर कालावधीमध्ये त्यांचे काम,वर्तणूक कशी आहे ते हुकूमाप्रमाणे काम करतात किंवा कसे याबाबत अधिक्षक प्रसादालय विभाग यांचे अभिप्राय मागविण्यात आले असता त्यांनी " श्री कडीर्ले यांची वर्तणूक चांगली असून ते हुकूमाप्रमाणे व योग्यरितीने कामे करतात.त्यांचे बाबतीत कोणतीही प्रकरणे चालू किंवा प्रस्तावित नाही त्यांना मुदतवाढ देणेस हरकत नाही.कालावधी प्रशासनाने ठरवावा असे वाटते."असे अभिप्राय दिलेले असून त्यावर संबंधीत प्रशासकीय अधिकारी यांची संमती दर्शक स्वाक्षरी आहे..

तरी श्री.कर्डीले कंत्राटी,आचारी यांचेबाबत अधिक्षक प्रसादालय व संबंधीत प्रशासकीय अधिकारी यांचे अभिप्राय विचारात घेता त्यांचा एक वर्षाचा कालावधी संपुष्टात आलेच्या तारखेपासून पुढे एक वर्षे मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय)

**विषय नं. १०५ "टेलिफोन टेक्निशियन" पदाची वेतनश्रेणी मिळणेबाबत**

**निर्णय क्र.१०५** याबाबत आस्थापना उपसमितीचे सभेत निर्णय घेण्यात यावा,असे ठरले.

**विषय नं. १०६ श्री.एस.सी.वाखुरे,कन्सलटंट यांचा मानधन वाढवून मिळणेबाबतचा अर्ज**

**निर्णय क्र.१०६** श्री. चंद्रभान सिताराम वाखुरे यांची उपरोक्त जा.नं.एसएसएस/वशी-०१/१०५५०/२००५ दि.२३/०९/२००५ अन्वये प्रशासन शाखा विधीविभाग (वर्शी-०२) कडे कंत्राटी पध्दतीने कन्सल्टंट या पदावर दरमहा रु.७०००/- या एकत्रित मानधनावर सहा महिने ( दि.२१/१०/२००५ ते २०/०४/२००६ अखेर ) कालावधीसाठी नेमणूक करण्यात आलेली आहे.

सदरची मुदत संपल्यानंतर त्यांची वेळोवेळी आहे त्याच अटी-शर्ती व मानधनावर मुदतवाढ करण्यात आलेली आहे.

| अ.नं. | मुदवाढ तारीख | कालावधी |
|---|---|---|
| ०१. | २१/१०/२००५ ते २०/०४/२००६ | सहा महिने |
| ०२. | २१/०४/२००६ ते २०/१०/२००६ | सहा महिने |
| ०३. | २१/१०/२००६ ते २०/०४/२००७ | सहा महिने |
| ०४. | २१/०४/२००७ ते २०/०४/२००८ | एक वर्षे |

आता,श्री वाखुरे यांनी दि.०९/१०/२००७ अर्ज करुन,त्यांना संस्थानकडून मिळणाऱ्या रु.७,०००/-रु.सात हजार) मात्रच्या मानधनात कौटुंबिक खर्च भागत नसल्याने त्यांनी सदर खर्चाचे तपशीलासह माहिती दिली आहे.सदरचा तपशील खालील प्रमाणे

| घरभाडे | दुध | गॅस | प्रवास खर्च | वीज बील(अंदाजे) | फोन बील | शैक्षणिक खर्च | किराणा सामान | आठवडे बाजार | आकस्मित खर्च | एकूण मासिक खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १,७००/- | ७,४४/- | ३,१०/- | ६,००/- | ५,००/- | ५,००/- | २,०००/- | १,५००/- | ४,००/- | २,५०/- | ८,५०४/- |

संस्थानकडून टॅक्स वजा जाता मिळणारे मानधन रु. ६,२८९/-

तरी मला उपरोक्त परिस्थितीचा विचार करुन अपेक्षीत मासिक मानधन रु.११,०००/- मिळावे अशी विनंती केलेली आहे.सदर अर्जावर प्रशासकीय अधिकारी (माहितीचा अधिकार) यांनी," श्री वाखुरे कंन्सलटंट हे माहितीच्या अधिकाराखाली आलेल्या अर्जांबाबतचे कामकाज चांगल्या प्रकारे करीत आहेत.त्याचप्रमाणे आस्थापना विभागातील कर्मचाऱ्यांची सेवा पुस्तके व पर्सनल फाईलचे कामही करीत आहेत.योग्य ते मानधन वाढवून देण्यास हरकत नाही." असा अभिप्राय दिलेला आहे.

आजपर्यंत संस्थानकरीता भु-संपादन तसेच इतर शासकीय कामांचे पुर्तता करणेकामी अनुभवी व सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी यांच्या कंन्सलटंट म्हणून तात्पुरत्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने एकत्रीत रु.७,००० मानधनावर नेमणूका करण्यात आलेल्या असून त्यांचेप्रमाणेच श्री वाखुरे यांनाही रु.७,०००/- एकत्रीत मानधन देण्यात आलेले आहे.

त्यात श्री चंद्रकांत रणशुर यांना दरमहा रु.७,००० एकत्रीत मानधनात दरमहा रु.५०० ची वाढ करण्यात आलेली आहे.

श्री वाखुरे यांचे सध्या वय ६८ वर्षे आहे.श्री वाखुरे यांना त्यांचे विनंतीनुसार मानधनात वाढ करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, तो अमान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं. १०७ संस्थानमार्फत सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या पती किंवा पत्नीस मोफत वैद्यकीय सुविधा मिळणे बाबत**

**निर्णय क्र.१०७** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं. १०८ संस्थान सेवेत असताना मयत झालेल्या कर्मचाऱ्याचे एका नातेवाईकास अनुकंपा तत्वावर संस्थान सेवेत घेणेबाबत.**

**निर्णय क्र.१०८** श्रीमती मिनाक्षी तुकाराम पाठक ह्या संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयाकडे लिपीक टंकलेखक या पदावर सेवेत असतांना त्यांचे **दि.१३/११/२००७** रोजी निधन झालेले असून त्यांच्या झालेल्या सेवेबाबतची माहिती खालील प्रमाणे

**०१. दिवंगत कर्मचाऱ्यांचे नांव :-कै.श्रीमती मिनाक्षी तुकाराम पाठक** (पतीच्या निधनाने अनुकंपा नेमणूक )

०२. मृत्युचे वेळी हुद्या व विभाग :- लिपीक टंकलेखक, श्री साईनाथ रुग्णालय शिर्डी

०३. संस्थानमधील सेवेचा कालावधी :- दि.०४/०४/१९९२ ते दि.१२/११/२००७
एकूण सेवा १५ वर्षे ०७ महिने ०८ दिवस

०४.मृत्यु दिनांक :- १३/११/२००७

श्रीमती मिनाक्षी तुकाराम पाठक यांचे **दि.१३/११/२००७** रोजी निधन झाल्याने त्यांचा वारसदार मुलगा नामे श्री उपेंद्र तुकाराम पाठक यांनी संस्थानमध्ये वडीलांचे जागी अनुकंपा तत्वावर सेवेत घेणेबाबत अर्ज केला असून त्यांचे बाबत माहिती खालील प्रमाणे

०१. अर्जदाराचे नांव :- श्री उपेंद्र तुकाराम पाठक

०२. मयत कर्मचाऱ्याशी नाते :- मुलगा

०३. वारसदार अर्जदाराची जन्मतारीख व वय :- दि.१५/०७/१९८६ (वय वर्षे २१)

०४. शैक्षणिक व शारीरीक पात्रता :- १० वी,वेदशास्त्र पदविका (तीन वर्षांचा कोर्स )

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१०००-प्र.क्र.२०/२०००,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२८/०३/२००१ व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१००४-प्र.क्र.५१/२००४,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२२/०८/२००५ सुधारीत शासन निर्णय २ (२) नुसार शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकांस अनुकंपाकारणास्तव शासकीय सेवेत घेण्याची तरतूद आहे.त्यास अनुसरुन संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकास मानवतेच्या दृष्टीकोणातून यापुर्वी अनुकंपाकारणास्तव संस्थान सेवेत घेण्यात आलेले आहे.त्यानुसार श्री उपेंद्र तुकाराम पाठक,(मुलगा) यांनी अर्ज सादर केलेला आहे.

सदर बाबत श्री उपेंद्र यांची लहान बहीण नामे वृषाली तुकाराम पाठक तसेच लहान भाऊ साईराम तु.पाठक यांनी दिवंगत मिनाक्षी पाठक यांचे जागेवर त्यांचा मोठा भाऊ नामे श्री उपेंद्र पाठक यांना नोकरी देणेची संमती असलेचे **दि.३०/११/२००७**रोजी करुन दिलेले पत्र यासोबत सादर केलेले आहे.

दिवंगत श्रीमती मिनाक्षी पाठक यांची लहान मुलगी नामे कु.वृषाली व लहान भाऊ श्री साईराम पाठक यांनी सादर केलेल्या पत्रास अनुसरुन दिवंगत श्रीमती पाठक यांचा मोठा मुलगा नामे **श्री उपेंद्र तु.पाठक** यांना,शासन निर्णयातील तरतुदीनुसार ते पात्र ठरत असल्याने त्यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून अनुकंपा तत्वावर **वर्ग-४** चे पदावर नेमणूक देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**विषय नं. १०९ श्रीसाईबाबा हॉस्पिटल व श्रीसाईनाथ रुग्णालय, वैद्यकीय अधिकारी,स्टाफ यांचे नेमणूकी बाबत**

**निर्णय क्र.१०९** श्री साईबाबा हॉस्पीटलकडे वैद्यकिय अधिकारी आर.एम.ओ तसेच व्हिजीटींग कन्सलटंट या पदावर नोकरी मिळणेबाबत पात्रताधारक उमेदवारांनी अर्जाद्वारे विनंती केली होती. वैद्यकिय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटलकडे आवश्यकता व पदे रिक्त असल्याने नेमणूकीबाबत अभिप्राय दिलेले आहेत. त्यानुसार मा.सचिव विधी व न्याय विभाग यांचेकडे श्री साईबाबा हॉस्पीटल वैद्यकीय अधिकारी / कर्मचारी यांचेबाबत पद व वेतनश्रेणी निहाय मान्यतेसाठी पाठविण्यात आलेल्या आकृतीबंधास मंजूरीचे अधीन राहून,खालीलप्रमाणे नेमणूका करण्यात आलेल्या आहेत.

| **अ. नं.** | **वैद्यकीय अधिकारी नांव** | **शैक्षणिक पात्रता** | **नेमणूक आदेश नंबर व हॉस्पीटलचे नांव** | **दिलेले पदनांम व एकत्रीत मानधन /वेतन** |
|---|---|---|---|---|
| ०१. | डॉ. स्वाती डी खेमनर, संगमनेर | एम.बी.बी.एस. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१८३८३/०७ दि.१७/११/२००७ श्री. साईनाथ हॉस्पीटल | वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ) रु.१७०००/- एकत्रित वेतन |
| ०२. | डॉ. काळे राजू निंबाजी श्रीगोंदा | एम.बी.बी.एस. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१९४३८/०७ दि.१०/१२/२००७ श्री. साईबाबा हॉस्पीटल | वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ) रु.१७०००/- एकत्रित वेतन |
| ०३. | डॉ. राहूल आर. पाटील पुणे | एम.बी.बी.एस. एम.डी. मेडीसीन | जा.नं.एसएसएस/वशी-१/२००४६/२००७ दि.२०/१२/२००७ श्री. साईबाबा हॉस्पीटल | Visiting Hon. Interventional Cardiologist. |
| ०४. | डॉ. अरुण व्ही. मरवाळ औरंगाबाद | एम.बी.बी.एस. डी.पी.एम. डी.एन.बी. एम.ए. (सायकॅ) | जा.नं.एसएसएस/वशी-०१/२०३६७/०७ दि.२६/१२/२००७ श्री. साईबाबा हॉस्पीटल | Visiting Hon. Psychiatrist |
| ०५ | डॉ.नितिन रामदास उंडे, कोळपेवाडी | एम.डी.बालरोगतज्ञ | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१८३/०८ दि.३/१/२००८ श्री. साईनाथ हॉस्पीटल | वैद्यकीय अधिकारी बालरोगतज्ञ रुपये २१,०००/- एकत्रित वेतन |
| ०६ | डॉ.अजित मुकुंद काळे अहमदनगर | एम.एस.जनरल, एम.सी.एच.प्लॉस्टिक सर्जरी | जा.नं.एसएसएस/वशी-०१/४८८/०८ दि.९/१/२००८ श्री.साईबाबा हॉस्पीटल | व्हिजीटींग प्लॉस्टिक सर्जन |
| ०७ | डॉ.आहेर चांगदेव स. लोणी ता.राहाता | एम.बी.बी.एस.एम.डी मेडिकल मायक्रोबायोलॉजिस्ट | जा.नं.एसएसएस/वशी-०१/४८९/०८ दि.९१/२००८ श्री साईबाबा हॉस्पीटल | व्हीजिटींग मायक्रोबॉयोलॉजिस्ट |
| ०८ | डॉ.घोगरे रविराव बी राहाता | एम.बी.बी.एस.डी.जी. ओ. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/२२५/०८ दि.४/१/२००८ श्रीसाईबाबा हॉस्पीटल | वैद्यकीय अधिकारी (आर.एम.ओ) रुपये १८०००/-एकत्रित वेतन |

तरी श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पीटलकडे वैद्यकिय अधिकारी(आर.एम.ओ.), तसेच Visiting Hon. Interventional , व Visiting Hon. Psychiatrist या पदावर केलेल्या नेमणूकास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**विषय नं. ११० श्रीसाईबाबा हॉस्पिटल व श्रीसाईनाथ रुग्णालय, वैद्यकीय अधिकारी, स्टाफ यांचे नेमणूकीस मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.११०** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं. १११ निमगाव कोऱ्हाळे येथील गट नं.१६९ मध्ये बांधण्यात आलेले निवासस्थान,कर्मचाऱ्यांना निवासस्थानासाठी देणेबाबत.**

**निर्णय क्र.१११** बांधकाम विभाग यांनी दि.२३/०८/२००७ रोजीचे पत्रान्वये निमगांव को-हाळे येथील गट नं.१६९ मध्ये बांधण्यात आलेल्या निवासस्थानाबाबत खालील प्रमाणे माहीती कळविली आहे.

०१) वर्ग ४ कर्मचारी निवासस्थानाकरीता एकूण ०८ इमारती बांधण्यात आलेल्या आहेत.

०२) एका इमारतीत एकूण १२ सदनिका आहेत

०३) एका सदनिकामध्ये ९.६ x ९.६ या साईज मध्ये हॉल , बेडरुम व किचन अशा एकूण तिन खोल्या व अटॅच्ड संडास व बाथरुम आहे.

०४) या इमारती मध्ये खोल्यांची वर्गवारी केलेली नसून सर्व खोल्या एक समान आहे.

या प्रकल्पाचे ड्रेनेजचे काम झालेले असून,विद्युत ठेकेदार यांचे काम बाकी आहे.

संस्थान आस्थापनेवरील एकूण कर्मचाऱ्यांची संख्या विचारात घेता संस्थानकडील उपलब्ध निवासस्थान कर्मचाऱ्यांना पुरेसे नाही.त्यामुळे येणा-या अर्जातील सर्व कर्मचाऱ्यांना निवासस्थाने पुरविणे शक्य नाही.

उपलब्ध निवासस्थानाच्या वाटपाबाबत दि.१२/०८/२००० रोजीचे टिपणीन्वये खालील मार्गदर्शक तत्वे वजा नियम निश्चित करण्यात आलेले आहेत.

| अ.नं. | इमारतीचे नांव | कर्मचारी वर्गवारी |
|---|---|---|
| ०१. | साईसहवास नं.०१ /०२ | प्रशासकीय अधिकारी /वैद्यकिय अधिकारी |
| ०२. | ए टाईप इमारत नं.०१/०२ | वैद्यकीय अधिकारी |
| ०३. | बी. टाईप इमारत भाग-०१/०२ | अधिक्षक / विभागप्रमुख |
| ०४. | बी टाईप इमारत भाग-०३/०४ | रुग्णालयातील परिचारिका व इतर तांत्रिक कर्मचारी |
| ०५. | साईध्यान नं.०१/०२<br>(जुनी ए/बी टाईप इमारत साईनगर) | वर्ग-०३ कर्मचारी लिपीक टंकलेखक, पर्यवेक्षक, परिचारीका,वाहन चालक, पुजारी इत्यादी. |
| ०६. | साईनगर | वर्ग - ०३ लिपीक / वर्ग ०४ |
| ०७. | सेवाधाम /सपर्मण | वर्ग-०४ |

उपरोक्त मार्गदर्शक तत्वे वजा नियम ठरवितांना निवासस्थाना संदर्भात खालील मागदर्शक तत्वांचाही समावेश करण्यात आलेला आहे.

०१) उपलब्ध होणारी निवासस्थाने कर्मचाऱ्यांच्या पदनिहाय सेवाजेष्ठतेनुसार देण्यात यावीत.

०२) निवासस्थाने वाटप करतांना शिर्डी गावांत अथवा शिर्डीपासून १५ किलोमिटर अंतरात ज्यांची स्वतःची अथवा कुटुंबाची जागा आहे व भाडोत्री जागेत राहत नसतील.अशा संबंधीतांना संस्थान निवासस्थाने देण्यात येणार नाहीत.

०३) ज्या कर्मचाऱ्यांचे निवासासाठी संस्थानचे निवासस्थान दिलेले आहेत.त्या संबंधीतांने स्वतःचे घर बांधल्यास संस्थानचे निवासस्थान खाली करुन देणे त्यांचेवर बंधनकारक राहील तसे लेखी अंडरटेकिंग त्यास प्रथम द्यावे लागेल.

उपरोक्त निवासस्थानबाबत मार्गदर्शक तत्वांचा विचार करता येथून पुढे निवासस्थान वाटप करतांना अ.नं.०३ बाबत काटेकोर पणे अंमलबजावणी केल्यास बरीचशी निवासस्थानेही रिक्त होतील व आवश्यकतेनुसार सेवाजेष्ठ कर्मचाऱ्यांना निवासस्थान उपलब्ध होतील व बऱ्याच कर्मचाऱ्यांचा निवासस्थानाचाही प्रश्न निकाली निघण्यास मदत होईल.

तसेच उपरोक्त टिपणीत नमूद केलेले निमगांव-को-हाळे येथील गट नं.१६९ मध्ये वर्ग-४ कर्मचारी निवासस्थाने बांधण्यात आलेली आहेत.सेवाधाम इमारतीतीत निवासस्थाने ही फारच लहान व गैरसोयीची असल्याने (१० बाय १०चे खोलीत पती पत्नी,मुले,भांडी,पलंग,टि.व्ही.,अभ्यासू पुस्तके,बाथरुम,इत्यादींच्या सोई होवू शकत नाही.) त्यांचे निवासस्थानांचा विचार करुनच सदर निवासस्थाने बांधण्यात आलेली आहेत.व या इमारती मधील सध्याचे कर्मचा-यांनी निवासस्थानबदलून मिळणेबाबत विनंती केलेली आहे. तसेच साईनाथ रुग्णालयाकडील परिचारीका व संस्थान कर्मचारी तसेच इतरांनी निवासस्थानांची मागणी केलेली आहे.त्यांची मागणी खालील प्रमाणे

०१) सध्या सेवाधाम इमारतीमध्ये रहात असलेले कर्मचारी संख्या :- ५६
०२) साईनाथ रुग्णालय सन.२००० च्या परिचारीका :- ०३
०३) संस्थान सेवेतील इतर वर्ग-४ कर्मचारी :- १५ (अंदाजे)
०४) साईबाबा हॉस्पीटलमधील विविध वैद्यकीय अधिकारी :- ३८
०५) श्री साईबाबा हॉस्पीटलमधील विविध मॅनेजर व इतर :- ०६
०६) श्री साईबाबा हॉस्पीटलमधील परिचारीका :- ६९
०७) श्री साईबाबा हॉस्पीटलकडील फार्मासिस्ट / लॅब टेक्निशियन व इतर :- १०

तरी वरीलप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पीटलमधील वैद्यकीय अधिकारी इतर अधिकारी, परिचारीका, सेवाधाम मधील जुने कर्मचारी इत्यादींना सदर निवासस्थान वाटप करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,संस्थानने निमगाव-कोऱ्हाळे येथील गट नं.१६९ मध्ये बांधण्यात आलेल्या निवासस्थानामध्ये संस्थानचे साईनगर कर्मचारी वसाहतीतील ५० खोल्यातील कर्मचाऱ्यांना या इमारतीमध्ये स्थलांतरीत करणेत यावेत. तसेच ज्या कर्मचाऱ्यांची निवासस्थान शिर्डी शहरात अशा कर्मचाऱ्यांचे निवासस्थाने खाली करुन घेण्यात यावीत. साईनगर वसाहतीत वरीलप्रमाणे रिक्त होणाऱ्या खोल्यांमध्ये तसेच निमगांव कोऱ्हाळे येथील गट नं. १६९ मधील उर्वरित खोल्यांमध्ये श्रीसाईबाबा हॉस्पिटलमधील अधिकारी व परिचारिका यांना देण्यात याव्यात,असें ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**यानंतर मा.अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा सुरु करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ०१** **संस्थान परिसर विकसित करणेकामी आंतरराष्ट्रीय स्तरावरील वास्तुविशारदांची स्पर्धा भरविणेबाबत**

**निर्णय क्र.११२** **(अ)** श्री क्षेत्र शिर्डी येथे प्रतिदिनी सुमारे ५० ते ७५ हजार भक्त भेट देऊन, श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतात. उत्सवकाळात तसेच उन्हाळी सुट्टया, दिपावली व नाताळच्या सुट्टया, गुरुवार व रविवार तसेच या दिवसांना जोडून येणाऱ्या सरकारी सुट्टया इत्यादी काळात श्री क्षेत्र शिर्डीस भेट देणाऱ्या साईभक्तांची संख्या दैनंदिन सुमारे ३ ते ४ लाखांपर्यन्त जाते. श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री साईबाबांचे समाधी मंदिर, श्री गुरुस्थान, श्री व्दारकामाई, चावडी आदि पवित्र स्थाने असून, साईभक्त याठिकाणी आवर्जून भेट देतात व आपली मनोकामना पूर्ण व्हावी म्हणून श्री साईंना साकडे घालतात.

श्रीक्षेत्र शिर्डी येथे येणाऱ्या भक्तांना साईंचे दर्शन सुलभ व विनासायास मिळावे म्हणून पुर्वीच्या मा.व्यवस्थापन मंडळाने समाधी मंदिर व मंदिर परिसरात बदल करणेकामी सन १९९६-९७ मध्ये राष्ट्रीय स्तरावर वास्तुविशारदांची स्पर्धा भरवून, त्यात मे. माथूर ॲण्ड काप्रे असोसिएटस्, नवि दिल्ली या वास्तुविशारदाचे विस्तृत व विकासात्मक प्रतिकृती प्रथम क्रमाकांने निवडून, त्या प्रतिकृतीप्रमाणे मे.लार्सन ॲण्ड टुब्रो या बांधकाम क्षेत्रातील कंपनीमार्फत मंदिर व मंदिर परिसराचे विस्तारीकरणासह सदृढीकरण व सुशोभिकरण केले. तद्नंतर, विद्यमान मा. व्यवस्थापन समितीने मंदिर व मंदिर परिसरात भक्तांच्या सोयी-सुविधेत वाढ होणेसाठी मध्यवर्ती देणगी काऊंटर, मध्यवर्ती पुस्तक-फोटो विक्री केंद्र, सभाकुंड परिसरामध्ये छत उभारणी आदि सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.

तथापि, गेल्या दोन-तीन वर्षाचा अनुभव पाहतां, श्री क्षेत्र शिर्डी येथे उत्सव, उन्हाळी व दिपावलीच्या सुट्टयांच्या कालावधीत तसेच नाताळ वर्षारंभीच्या कालावधीमध्ये मोठया प्रमाणावर भक्तांची गर्दी होऊ लागलेली आहे तसेच वर्षभर देशाच्या विविध काना-कोपऱ्यातून हजारो साईभक्त पालखी पदयात्रेव्दारे तसेच अन्य मार्गाने दररोज येत आहेत. त्यामुळे सध्या मंदिर व मंदिरात उपलब्ध असलेल्या सुविधांसह संस्थान मार्फत देण्यात येणाऱ्या निवास, भोजन व्यवस्था यांसह इतर सुविधा अत्यंत अपुऱ्या पडतात. त्यावेळेस कापडी शामियाने - मंडप उभारुन निवासाची व्यवस्था करणे, त्याठिकाणी चहा-पाणी, जेवण-नाष्टयाची व्यवस्था करणे आदि तातडीने उपलब्ध करुन द्याव्या लागतात. त्यामुळे संस्थान यंत्रणेवर सेवा-सुविधा पुरविण्याबाबत ताण पडतो, अडचणी उद्‌भवतात.

**(ब)** उपरोक्त परिच्छेदात नमूद केल्यानुसार, सध्या साईभक्तांना मुलभूत-सेवा सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी साधारणत : ३० विविध विभाग कार्यरत असून ते खालीलप्रमाणे प्रामुख्याने संस्थान परिसरात ०५ ठिकाणी विभागलेले आहेत :

| **अ.नं.** | **विभाग** | **विभागात समाविष्ट असणारा भाग** |
|---|---|---|
| ०१ | समाधी मंदिर व मंदिर परिसर | प्रशासन शाखा व इतर विभागांसह दर्शन रांगांचे हॉल्स, देणगी व इतर काऊंटर्स आदि. |
| ०२ | साईप्रसादालय परिसर | प्रसादालय, खरेदी, भांडार, निवासस्थान कार्यालय, लाडू प्रसाद विक्री केंद्र आदि |
| ०३ | रुग्णालय व धर्मशाळा परिसर | साईनाथ रुग्णालय, साईबाबा हॉस्पीटल, धर्मशाळा, व्दारावती भक्तनिवासस्थान, मध्यवर्ती भांडार इमारत, कर्मचारी निवासस्थाने आदि |
| ०४ | भक्तनिवासस्थान व शैक्षणिक संकुल परिसर | भक्तनिवासस्थान, शैक्षणिक संकुल, नियोजित साई आश्रम प्रकल्प, कर्मचारी निवासस्थाने आदि |
| ०५ | श्री साई प्रसादालय (निमगांव कोऱ्हाळे) परिसर | मौजे निमगांव कोऱ्हाळे शिवारातील श्री साईप्रसादालयासह नियोजित साई आश्रम प्रकल्प, नियोजित बाग-बगीचे आदि |

उपरोक्त ०५ ही विभाग हे साधारणतः मंदिरापासून ०४ किलोमीटरच्या परिसरात आहेत. या सर्व विभागांचा एकमेकांशी सुसंगतरित्या संबंध असावा, साईभक्तांना दर्शन, निवास, भोजन, धार्मिक व मनोरंजनात्मक सुविधा संलग्नपण उपलब्ध व्हाव्यात या दृष्टीने पुढील २५ ते ३० वर्षाचा विचार या सर्व विभागांचा एकत्रितरित्या व योजनाबध्द पध्दतीने विकास होणे अत्यंत आवश्यक व गरजेचे आहे. या करीता पुर्वी ज्याप्रमाणे राष्ट्रीय पातळीवर वास्तुविशारद स्पर्धा आयोजित करुन मंदिर व मंदिर परिसराचे विस्तारीकरण व सुशोभिकरण करण्यात आले त्याच धर्तीवर आता आंतरराष्ट्रीय पातळीवर अशा प्रकारची वास्तुविशारद स्पर्धा आयोजित करण्यात यावी, असे मत आहे.

या स्पर्धेव्दार वास्तुविशारदांकडून, संस्थानचे वर निर्देशित केलेले सर्व भाग एकमेकांशी जोडणे, त्यांचे परिस्थितीनुरुप विकास करणे, भक्तांच्या सुलभ दर्शन सुविधेबरोबरच त्यांना निवास, भोजन इत्यादी व या सारख्या मुलभूत सेवा-सुविधा विनासायास उपलब्ध होईल यादृष्टीने आवश्यक असे स्ट्रक्चर उभारणे, धार्मिक व सामाजिक कार्यांकरीता जागा उपलब्ध करुन देणे, मनोरंजनासह रमणीय बाग-बगिचे उभारणे आदि बाबींचा प्रामुख्याने विचार करणेबाबत सुचविता येईल. याकामी आवश्यकता भासल्यास सर्व्हेक्षण संस्थेची तसेच याकामी तज्ञ वास्तुविशारद सल्लागाराची नेमणूक करुन त्यांची याकामी मदत घेता येईल.

उपरोक्त परिच्छेदांमध्ये नमूद केल्यानुसार, आंतरराष्ट्रीय पातळीवर वास्तुविशारदांची स्पर्धा आयोजित केल्यास निश्चितच श्री क्षेत्र शिर्डीचे रुप व स्वरुप पालटून जाईल व भक्तांना श्री साईंचे दर्शनाचा आल्हाददायक अनुभव येईलच तसेच संस्थान परिसराचा योजनाबध्दरितीने विकास साधता येईल.

**(क)** आंतरराष्ट्रीय पातळीवर वास्तुविशारद स्पर्धा आयोजित करणेसाठी मा. व्यवस्थापन समितीची तत्वत: मान्यता मिळाल्यास याकामी संस्थानविषयक परिपूर्ण माहिती तयार करुन तसेच सध्या असणाऱ्या व नियोजित असणाऱ्या सेवा-सुविधांचा सर्वसमावेशक अहवाल तयार करुन तो वास्तुविशारदांना पाठविता येईल तसेच याकामी वर्तमानपा८पत्रातून जाहिरात देऊन, तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीच्या अधिकृत संकेतस्थळावरुन व्यापक प्रसिध्दी देऊन याबाबत कार्यवाही करता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषय सध्या स्थगीत ठेवण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०२** **मौजे कनकुरी,ता.राहाता येथील गट नं.१२१/ब/१ मधील ०० हे.७४ आर व गट नं.१२१/अ/२ मधील ०० हे ७४ आर जमीनी संस्थानने खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.११३** **(अ)** श्री. बाबासाहेब रामभाऊ डांगे, राहणार कनकुरी यांनी कनकुरी येथील गट नंबर १२१/ब/१ मधील ०० हे ७४ आर व गट नंबर १२१/अ/२ मधील ०० हे ७४ आर जमीन संस्थानने प्रति आर रुपये १,४०,०००/- मात्र या दराने खरेदी करावी म्हणून दिनांक १६ ऑक्टोबर, २००७ रोजी विनंती अर्जाव्दारे प्रस्ताव दिलेला आहे.

याबाबत सदर जमिनीचे ७/१२ च्या उताऱ्याचे अवलोकन केले असता खालीलप्रमाणे स्थिती आहे :

| अ.नं. | खातेदाराचे नांव | सर्व्हे नंबर | ७/१२ उताऱ्यानुसार क्षेत्र | इतर हक्कात |
|---|---|---|---|---|
| ०१ | बाबासाहेब रामभाऊ डांगे<br>लताबाई बाबासाहेब डांगे | १२१/ब/१ | ०० हे ७६ आर ०० चौमी<br>०० हे ८० आर ०० चौमी<br>०० हे ०१ आर ०० चौमी पो.ख.<br>**०१ हे ५६ आर ०० चौमी** | कनकुरी वि.का.सो.<br>इ.क.प.घे.<br>(ज्ञानदेव व अप्पासाहेब)<br>पोहेगांव ग्रामीण बिगरशेती सह.पतसंस्था मर्यादित. |
| ०२ | बाबासाहेब रामभाऊ डांगे | १२१/अ/२ | **०० हे ७४ आर ०० चौमी** | कनकुरी वि.का.सो.<br>इ.क.प.घे. |
| | | **एकूण** | **०२ हे ३० आर ०० चौमी** | |

**(ब)** इतर हक्कात पोहेगांव बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, पोहेगांव यांचे कर्जाची नोंद आहे. सदर संस्थेकडे विचारणा केली असता त्यांनी त्यांचे दिनांक ०७ नोव्हेंबर, २००७ रोजी पत्राने खालीलप्रमाणे खुलासा केलेला आहे :

०१. सौ.लताबाई बाबासाहेब डांगे ह्या कर्जदार आहेत, त्यांनी गट नंबर १२१/ब/१ क्षेत्र ०० हे ८१ आर जमीन तारण दिलेली आहे. त्यांचे दिनांक ०६ नोव्हेंबर, २००७ अखेर रक्कम रुपये २,८०,५४७/- मात्र कर्जबाकी आहे.

०२. सुयोग बाबासाहेब डांगे हे संस्थेचे कर्जदार आहेत, त्यांचेकडे दिनांक ०६ नोव्हेंबर, २००७ अखेर रक्कम रुपये ३८,१०७/- मात्र कर्जबाकी आहे. सदर कर्जास श्री.बाबासाहेब रामभाऊ डांगे जामीनदार आहेत. संस्थेने मा.सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कोपरगांव यांचेकडेस कलम १०१ अन्वये वसुलीबाबत प्रकरण दिलेले आहे. गट नंबर १२१/अ/२ क्षेत्र ०० हे ७४ आर जमीन जप्तीची कार्यवाही सुरु आहे.

०३. या पत्रात संस्थेने शेवटी असे नमूद केले आहे की, पतसंस्थेच्या संमतीशिवाय गट नंबर १२१/ब/१ व गट नंबर १२१/अ/२ ही शेतजमीन संपादित करु नये.

**(क)** संस्थानचे कंत्राटी मोजणीदार यांनी जमिनीची मोजणी करुन अहवाल दिला, त्यांत असे नमूद केले आहे की,

०१. गट नंबर १२१/अ/२ व गट नंबर १२१/ब/१ या दोन्ही जमिनींची एकत्रित वहिवाट आहे.

०२. दोन्ही गटाचे क्षेत्र ०२ हेक्टर ३१ आर येत आहे पण प्रत्यक्ष क्षेत्र मात्र ०१ हेक्टर २४ आर येत आहे म्हणून ०१ हेक्टर ०७ आर क्षेत्र कमी येत आहे.

०३. अर्जदाराचे म्हणणे आहे की, गट नंबर १२१/ब/१ क्षेत्र ०१ हेक्टर ५७ आर पैकी त्यांचे क्षेत्र ०० हे ७६ आर विकत द्यावयाचे आहे परंतु त्यांनी उरलेले सौ.लताबाई बाबासाहेब डांगे यांचे ०० हे ८१ आर क्षेत्र खरेदीखतात चर्तु:सिमा दाखविणेकामी आवश्यक आहे. तसेच गट नंबर १२१/अ/२ मधील ०० हे ७४ आर क्षेत्र अर्जदार यांनी मोजणीकामी दाखवून देणे आवश्यक आहे.

**(ड)** पाणीपुरवठा विभागाने श्री. बाबासाहेब रामभाऊ डांगे यांची जमीन नविन फिल्टर प्लॅन्ट, लॅब, फिनेल व लिक्वीड सोप प्लॅन्ट, बगीचा, कार्यालय आदि बार्बीसाठी आवश्यक आहे असे दिनांक २४ ऑक्टोबर, २००७ रोजीच्या टिपणीन्वये इकडील कार्यालयास कळविलेले आहे.

**(इ)** अर्जदार याने प्रती आर रुपये १,४०,०००/- प्रती गुंठा (आर) या दराने जमीन देणेबाबत नमुद केलेले आहे.

सन २००८ च्या रेडिरेकनरमध्ये मौजे कनकुरी हे गांव विभाग ०३ मध्ये दाखविलेले आहे. सदर जमिनीचा दर हेक्टरी सारा ४ रुपये ७० पैसे आहे. दर हेक्टरी रुपये २.५१ ते रुपये ५/- मात्र असा सारा असणाऱ्या जमिनीचा दर हेक्टरी दर २,१०,०००/- मात्र नमूद केलेला आहे. यानुसार सदरील जमिनीचा दर रुपये २१००/- मात्र प्रति आरला येत आहे. सदरहू दर हा जिरायत जमिनीसाठी आहे. बागायत जमिनीसाठी साधारणतः दुप्पट दर विचारात घेतले असता, प्रति आर रुपये ४२००/- मात्र असा दर येईल.

**(ई)** सदरहू जमिनीबाबत खाली दर्शविलेल्या त्रुटी / अडचणी दूर झाल्यास जमीन खरेदी करणेबाबत विचार करता येईल :

०१. सदर जमिनीवर असणाऱ्या सोसायटीच्या कर्जाचा बोजा तसेच पोहेगांव ग्रामीण बिगर शेती पतसंस्था यांचा कर्जाचा बोजा पुर्ण कमी झाल्यावर किंवा सदर संस्थांनी जमीन खरेदीस संस्थानला संमती दिल्यास खरेदी करता येईल.

०२. सदर जमिनीपैकी गट नंबर १२१/ब/१ यामधील अर्जदारांचा हिस्सा क्षेत्र ०० हे ७६ आर व सौ.लताबाई बाबासाहेब डांगे यांचे क्षेत्र ०० हे ८१ आर हे वेगवेगळे वहिवाटीनुसार दाखविणे चर्तु:सिमेच्या दृष्टीने आवश्यक आहे. तसेच गट नंबर १२१/अ/२ क्षेत्र ०० हे ७४ आर हे स्वतंत्ररित्या जमीन खरेदी करण्याचे दृष्टीने व खरेदीखतात नोंदवावयाच्या चर्तु:सिमेसाठी दाखविणे आवश्यक आहे.

तरी खालील बाबतीत निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

०१. अर्जदार मौजे कनकुरी येथील गट नंबर १२१/ब/१ क्षेत्र ०० हेक्टर ७६ आर व गट नंबर १२१/अ/२ क्षेत्र ०० हेक्टर ७४ आर जमीन खरेदी करणेस व त्याचा प्रती आर दर ठरविणे.

०२. अर्जदार यांनी त्यांची जमीन गट नंबर १२१/ब/१ व गट नंबर १२१/अ/२ मधील क्षेत्र स्वतंत्ररित्या वहिवाटीनुसार दाखविल्यानंतरच खरेदी करणे. याकामी विहित पध्दतीने कायदेशीर बाबींची पूर्तता करुन जमीन खरेदी कार्यवाही करणेस मान्यता मिळणे.

सदरची जमीन संस्थानच्या पाणीपुरवठा तळयाच्या लगत आहे. पाणीपुरवठा योजनेचे वाढीव फिल्ट्रेशन प्लँटसाठी या जागेची अत्यंत आवश्यकता आहे असे पाणीपुरवठा विभागप्रमुख यांनी सभेपुढे सांगितले. जमीनमालक श्री बाबासाहेब डांगे यांचेशी किंमतीबाबत सभेने चर्चा केली असता त्यांनी रुपये १.४० लाख प्रती आर किंमत मिळावी असे सांगीतले तथापि उपस्थित सदस्यांनी जमीन किंमतीबाबत बाजारभावाचा आढावा घेऊन श्री डांगे यांना रुपये १ लाख प्रती आर या किंमतीस जमिनी देणेबाबत विनंती केली त्यास त्यांनी मला योग्य किंमत मिळालेसच जमीन देण्यास तयार आहे असे सांगितले. यावर श्री डांगे यांचेशी किंमतीबाबत वाटाघाटी करुन एक लाख प्रति आर या प्रमाणे जमीन खरेदी करण्यात यावी असे ठरले. सदर जागेची प्राथमिक मोजणी करुन खातेदाराच्या क्षेत्राची निश्चीती करणेत यावी. याबाबत कायदेशिर बाबींची पूर्तता करुन जमीन खरेदीची कार्यवाही करण्यात यावी. याकामी सर्वसमावेशक सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०३** **सध्या चालू असलेल्या विविध बांधकामांना मुदतवाढ व अपेक्षित जादा खर्चाबाबत**

**निर्णय क्र.११४** **अ)नवीन श्री साई प्रसादालय इमारत पाणी पुरवठ्यासाठी डी.आय.पाईपलाईन करणे :-**

दि. १७/०२/२००७ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील नि.क्र. ६४२ अन्वये श्री साई प्रसादालय इमारत पाणी पुरवठा करण्यासाठी डी.आय.पाईप लाईनचे काम ठेकेदार मे.आर.एल.भुतडा, कोपरगांव यांना इकडील जा.क्र. १३९३१/२००७ दिनांक १६/०८/२००७ अन्वये बहाल करण्यात आले आहे.

त्यानुसार ठेकेदार यांनी निविदेतील रकमेचे काम दि. १४/१२/२००७ रोजी म्हणजेच मूदतीत पूर्ण केले आहे. तथापी पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांनी दि. १४/१२/२००७ रोजीचे पत्रान्वये असे कळविले आहे. की, सदर पाईपलाईन ही सध्या असलेल्या इनलेट मधून न देता डायरेक्ट टाकीतून द्यावी लागणार आहे. त्यासाठी ओव्हर हेड टँकपासून ग्रांउंड लेव्हल पर्यंत अंदाजे ६०' इतक्या उंचीची जादा पाईपलाईन करणे गरजेचे आहे. म्हणजे योग्य दाबाने पाणी प्रसदालय येथे जाईल तसेच श्री साई प्रसादालय येथील टाकीजवळ गेट व्हॉल्व पाणी मापक यंत्र व इतर पाईप फिटींग मटेरीअलची आवश्यकता असून सदर काम बांधकाम विभागामार्फत सध्या पाईपलाईनचे काम करीत असलेले ठेकेदार यांचे मार्फत पूर्ण करुन मिळावे असे पाणीपूरवठा विभाग प्रमुख यांनी कळविले आहे. याकामी अंदाजे रुपये १,४०,०००.०० मात्र जादा खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्तप्रमाणे काम हे वाढीव स्वरुपाचे असून ठेकेदार मे.आर.एल.भुतडा यांचे निविदेमध्ये सदर कामाचा समावेश नाही. तसेच उपरोक्त काम विशिष्ठ व कठिण स्वरुपाचे असून ठेकेदार यांनी त्यांचे दि. २२/०२/२००७ चे पत्रान्वये सदर काम करण्यासाठी दि.१४/०२/२००८ अखेर म्हणजेच एकूण दोन महिने मूदतवाढ मागितली आहे.

तरी वरील प्रमाणे रुपये १,४०,०००.०० (एक लक्ष चाळीस हजार) मात्र रकमेच्या जादा खर्चास तसेच सदर काम पूर्ण करण्यासाठी ठेकेदार मे.आर.एल.भुतडा यांना दि. १४/०२/२००८ अखेर मूदतवाढ मंजूर होणेस विनंती.

**ब) नविन श्री साई प्रसादालय इमारत अंतर्गत सजावट करणे :-**

दि. २८/०७/२००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे बैठकीतील नि.क्र. ५२४ अन्वये श्री साई प्रसादालय इमारत अंतर्गत सजावट करणेचे काम ठेकेदार मे. सुदर्शन फ्लेझिबल पॅकेजींग प्रा.ली., नाशिक यांना इकडील जा.क्र. १२९३०/२००७ दि. १६/०८/२००७ अन्वये कार्यादेशाव्दारे बहाल करण्यात आले असून सदर कामाची मूदत दि. ०८/१२/२००७ रोजी संपुष्टात आली आहे. आता ठेकेदार यांनी त्यांचे दि. ०४/०१/२००८ रोजीचे पत्रान्वये खालील कारणांमुळे दि. १५/०२/२००७ अखेर मूदतवाढीची मागाणी केली आहे.

०१. मा. राष्ट्रपती यांचे शुभहस्ते नवीन प्रसादालय इमारतीचा उद्घाटन समारंभ असल्यामुळे फर्निचरचे काम बंद ठेवावे लागले.

०२. विद्युत पुरवठा वारंवार बंद होत कामात व्यत्यय येऊन कामास विलंब लागला.

तरी ठेकेदार मे. सुदर्शन फ्लेक्जीबल पॅ. प्रा.लि., नाशिक यांना वरिलप्रमाणे अंतर्गत सजावट तसेच फर्निचरचे काम करतांना अडचणी आल्या असल्यामुळे त्यांना दि. १५/०२/२००८ अखेर मूदतवाढ मंजुर होणेस विनंती.

**क) श्री साईनाथ रुग्णालय व धर्मशाळा येथील सांडपाणी टाक्यांवर स्लॅब टाकणे व ड्रेनेज लाईन करणे:-**

संस्थानचे शिर्डी येथील सर्व्हे नं. १४८/२ मध्ये धर्मशाळा इमारतीचे पाठीमागे सांडपाणी शुध्दीकरण सिस्टीमच्या कलेक्शन टँकचे सेप्टीक टँकमध्ये रुपांतर करणेसाठी व ड्रेनेज दुरुस्तीचे काम ठेकेदार श्री . योगेश पाटील, कोपरगांव यांना इकडील कार्यादेश जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/५९१५/०७ दि. १३/०४/२००७ चे कार्यादेशान्वये देण्यात आलेले आहे. सदरचे काम अंतीम टप्प्यात आहे. सदरचे कामाचा संक्षिप्त तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**०१. कामाचे नांव** :-श्री साईनाथ रुग्णालय व धर्मशाळा येथील सांडपाणी टाक्यांवर स्लॅब टाकणे व नविन ड्रेनेज लाईन करणे.

**०२. आर्किटेक्ट** :- निकम पाटील ॲण्ड असोसिएटस, श्रीरामपूर

**०३. ठेकेदाराचे नांव** :- श्री.योगेश सुरेश पाटील, कोपरगांव

**०४. काम पूर्ण करण्याची मूदत:-** दि. ३०/०९/२००७ अखेर प्रथम मूदतवाढ

**०५. मंजूर निविदा रक्कम** :- रु. ०४,०५,६८३.००

वरील काम पूर्ण करण्यासाठी दि. ३०.०९.२००७ पर्यंत मूदतवाढ घेण्यात आली होती. परंतू ठेकेदार यांनी दि. ०२/०१/२००८ चे पत्रान्वये कळविले की, सदरचे काम हे चालू सेप्टीक टँक व ड्रेनेज चालू असताना करावयाचे आहे. सदर काम हे अत्यंत दुर्गंधीयुक्त परिस्थितीत (foul condition) करावयाचे आहे. सदरचे कामावर मजूर व इतर लोक काम करण्यास नकार देतात. तसेच मध्यंतरी शिर्डी मध्ये उत्सवामुळे व सुट्ट्यांमुळे वाढलेल्या गर्दीमुळे काही दिवस काम बंद ठेवावे लागले. सेप्टीक टँकवर स्लॅब टाकावयाचे असल्याने सेप्टीक टँक साफ करावा लागतो. पंरतू गर्दीमुळे सेप्टीक टँक साफ करण्यास विलंब झाला. तरी मला दि. १५/०१/२००८ पर्यंत मदूतवाढ मिळावी असे ठेकेदार यांनी उपरोक्त पत्रान्वये कळविले आहे. याबाबत आर्किटेक्ट यांनी अभिप्राय दिला आहे. की, ठेकेदार यांचे उपरोक्त विनंतीचा विचार करता व कामाचे स्वरुप बघता ठेकेदार यांना दि. १५/०१/२००८ पर्यंत मूदतवाढ देणेस हरकत नाही असे कळविले आहे.

तसेच वरील काम पूर्ण करणेकामी मंजूर रकमेपेक्षा जादा खर्च होणे अपेक्षित असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे. याबाबत आर्किटेक्ट निकम पाटील ॲण्ड असो., श्रीरामपूर यांनी दि. ०२/०१/२००८ चे पत्राव्दारे सविस्तर अहवाल सादर केलेला आहे. त्यानुसार अपेक्षीत होत असलेली वाढ ही प्रामुख्याने खालील बाबींमध्ये होणार आहे.

०१.Inspection Chamber (९०cmx४५ cm & ४५cmx४५cm) :- (अपेक्षीत वाढीव खर्च रुपये १,७०,०००.००)

०२.एस्टीमेट बनविताना बाथरुमचे पाणी व सांडपाणी हे एकाच चेंबरमध्ये सोडावयाचे होते व संलग्न अशा दोन टॉयलेटचे जोडावयाचे होते. परंतू प्रत्यक्ष काम करतेवेळी असे लक्षात आले की, त्यामुळे चेंबर तुंबण्याचा प्रकार वाढला असता. त्यामुळें बाथरुम व संडासचे चेंबर वेगळे करण्यात आले व

प्रत्येक टॉयलेट करीता एक एक स्वतंत्र चेंबर घेण्यात आले जेणेकरुन चेंबर तुंबण्याचा प्रकार होणार नाही. पुर्वी एस्टीमेट करताना जुने चेंबर साफ करुन वापरात घ्यावयाचे होते. पंरतू ड्रेनेज लाईनला पुरेशा प्रमाणात उतार मिळण्याचे दृष्टीने नवीन चेंबरची लेव्हल वर घेण्यात आली. जुन्या चेंबरची लेव्हल खली असल्याने ते नवीन चेंबरला जोडता आले नाही. त्यामुळे सर्व ड्रेनेज लाईन व चेंबर नविन करावे लागले. त्यामुळे चेंबरचे नगात वाढ झाली आहे. या बाबीच्या कामासाठी अंदाजे रुपये १,७०,०००.०० मात्र इतका वाढीव खर्च अपेक्षित आहे.

०३.SWR UPVC (११० mm) Pipe :- (अपेक्षीत खर्च :- १,००,०००.००)

एस्टीमेट बनविताना जी जुनी पाईपलाईन चांगल्या स्थितीत आहे. तीचा वापर करण्याचे गृहीत धरण्यात आले. तथापी चेंबरची पातळी उंचावल्यामुळे संपूर्ण नवीन पाईपलाईन वरील पातळीस करावी लागली. त्यामुळे पाईपचे लांबीत वाढ झाली. या बाबीच्या कामासाठी अंदाजे रुपये १,००,०००.०० मात्र इतका वाढीव खर्च अपेक्षित आहे.

वरील प्रमाणे १ व २ मिळून एकूण रुपये २,७०,०००.०० मात्र इतका वाढीव खर्च अपेक्षीत आहे. तरी मंजूर निविदा रक्कम रुपये ०४,०५,६८३.०० मात्र व्यतिरिक्त अपेक्षित असलेल्या वाढीव खर्च रक्कम एकूण रुपये २,७०,०००.०० मात्रला मंजुरी मिळणेस विनंती तसेच सदरहू वाढीव कामांसह सर्व काम पूर्ण करणेसाठी दि. १५.०१.२००८ अखेर मूदतवाढ मंजुर होणेस विनंती.

**ड) कनकुरी साठवण तलाव भोवती चेनलिंक जाळीचे कुंपन करणे कामास मुदतवाढ देणेबाबत :-**

संस्थानचे कनकुरी येथील साठवण तलावाभोवती चेनलिंक जाळीचे कुंपन करणेचे काम ठेकेदार अमर मजुर बांधकाम सह. सोसायटी लि., पांगरी बु ।। यांना देण्यात आलेले आहे. ठेकेदार यांनी कामास सुरुवात केलेली असून दक्षिण मध्य ते पश्चिम, पश्चिम व उत्तर बाजू कडील काम ठेकेदार यांनी पूर्ण केले आहे. पुर्व बाजुकडील निम्म्या भागातील काम पूर्ण झाले असून लगतचे शेतकरी यांनी हरकत घेतल्याने पुढील काम सध्या बंद आहे. याकरीता लगतचे शेतकरी यांचेकडे चर्चा करण्यात येत आहे.

ठेकेदार यांची कामाची मुदत दि. ३०.११.२००७ अखेर संपुष्टात आलेली आहे. दि. ०५/०१/२००८ चे पत्रान्वये ठेकेदार यांनी उपरोक्त कारणांमुळे काम बंद असल्याने दि. ३१.०१.२००८ अखेर मूदत वाढ मिळणेस विनंती केलेली आहे. याबाबत आर्किटेक्ट निकम पा. श्रीरामपूर यांनी ठेकेदार यांनी दिलेल्या कारणांचा विचार करता ठेकेदार यांना दि. ३१/०१/२००८ अखेर मूतदवाढ देता येईल असे कळविले आहे. तरी ठेकेदार अमर मजुर बांधकाम सह सो. लि., पांगरी बु ।। यांना दि. ३१/०१/२००८ अखेर मुदतवाढ मंजूर होणेस विनंती.

यावर सविस्तर चर्चा होऊन, वरील अ व ड नमुद केलेल्या बाबी विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

०१) नवीन श्री साईप्रसादालय इमारत पाणीपुरवठ्यासाठी डी.आय पाईपलाईन टाकणेकरीता जादा वाढीव खर्च रुपये १,४०,०००/- मात्रचे खर्चास व दिनांक १४.२.२००८ अखेर सदर काम पूर्ण करणेसाठी ठेकेदार मे.आर.एल.भुतडा यांना मुदतवाढ देणेस मान्यता देण्यात आली

०२) नवीन श्री साईप्रसादालय इमारत अतर्गत सजावट करण्याचे काम पूर्ण करणेसाठी मे.सुदर्शन फ्लेक्जिेझिबल ,नाशिक यांना दिनांक १५.२.२००८ अखेर मुदतवाढ देणेस मान्यता देण्यात आली.

०३) श्री साईनाथ रुग्णालय व धर्मशाळा इमारत येथील सांडपाणी टाक्यावर स्लॅब टाकणे व ड्रेनज लाईन करणेकामात वाढ झाल्यामूळे याकामी जादा वाढीव खर्च रुपये २,७०,०००/- मात्रचे खर्चास व सदर काम पूर्ण करण्यासाठी श्री योगेश सुरेश पाटील, कोपरगांव यांना १५.१.२००८ अखेर मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली

०४) कनकुरी साठवण तलावाभोवती चिनलिंक जाळी कुंपण करण्याचे काम पूर्ण करण्यासाठी अमदर मजूर बांधकाम सहकारी सोसायटी लि.पांगरी बु यांना दिनांक ३१.१.२००८ अखेर मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०४** **समाधी मंदीर परिसरातील सुधारणांबाबत**

**निर्णय क्र.११५** मा.अध्यक्षमहोदय यांनी नाताळ सुट्टी व वर्षारंभीच्या गर्दीच्या वेळेस समाधी मंदिर परिसरास भेट देऊन, समाधी मंदिराच्या उत्तरेकडील बाजूस साईभक्तांना मोकळेपणाने फिरता येईल, वावरतां येईल यासाठी सध्याच्या मंदिर परिसरात काही बदल करता येतील किंवा कसे याबाबत पहाणी करुन अहवाल सादर करावा, असे निर्देश दिलेले आहेत.

समाधी मंदिराचे उत्तर बाजूस, सभाकुंड (पूर्वीचे सरंजामे बागेत) मंदिर परिसर सुशोभिकरणाचे प्रकल्पाचे वेळेस, उत्सवाचे व इतर वेळी होणारे धार्मिक व मनोरंजनात्मक कार्यक्रमासाठी पक्के स्टेज व त्या सभोवती भक्तांना बसणेसाठी / अल्प विश्रांतीसाठी खुले प्रेक्षागृहाप्रमाणे पायऱ्या असलेले बांधकाम करण्यांत आलेले आहे. याच ठिकाणी मध्यभागी सध्या एक सुशोभित कारंजा बसविण्यांत

आलेला आहे. याठिकाणी जाणेसाठी समाधी मंदिराचे उत्तर बाजूकडून दोन ठिकाणी प्रवेशव्दारांची सोय करण्यात आलेली आहे. तसेच बांधकामास लागून सत्यनारायण हॉल व त्यावर पहिल्या मजल्यावर खुल्या स्वरुपातील हॉल बांधण्यात आलेला आहे व पूर्वीकडील बाजूस तळमजल्यावर देणगी काऊंटर, उदीप्रसाद काऊंटर, कंत्राटी सुरक्षा विभागाचे कार्यालय व एक पूजा साहित्याचे दुकान आहे.

दररोजचे दैनंदिन कार्यक्रमामध्ये समाधी मंदिरात श्री साईंच्या तीन आरत्या होतात. या आरत्यांच्या वेळेस या उत्तर बाजूस भक्तांची मोठया प्रमाणात गर्दी होते. तसेच मंदिरातून दर्शन घेऊन बाहेर पडणाऱ्या साईभक्तांची गर्दी या ठिकाणी नेहमी होत असते. त्यामुळे साईभक्तांबरोबरच संस्थान सुरक्षा कर्मचाऱ्यांना याठिकाणीचे सुरक्षा व्यवस्थेचा ताण पडतो.

त्यास अनुसरुन समाधी मंदिर परिसरात खालीलप्रमाणे बदल करता येणे शक्य आहे :

**टप्पा क्रमांक ०१.**

०१. पहिल्या टप्प्यामध्ये समाधी मंदिराचे उत्तर बाजुस असलेले, सभाकुंडामधील स्टेज व कारंजा कायमस्वरुपी काढून टाकणे.

०२. गुरुस्थान मंदिरासमोरील ध्यानमंदिराचे जमिनीचे पातळीपर्यन्त सपाटीकरण जागा मोकळी करणे. या मोकळया होणाऱ्या जागेत (गुरुस्थान मंदिरासमोर) सभा मंडप उभारणे.

**टप्पा क्रमांक ०२.**

०१. दुसऱ्या टप्प्यामध्ये समाधी मंदिराचे उत्तर बाजुस असलेले देणगी कार्यालय, उदीप्रसाद वाटप खोली, काऊंटर, नारळ फोडण्याची खोली इत्यादी कायमस्वरुपी काढून टाकणे.

०२. सध्याचे सत्यनारायण हॉलच्या भिंती काढून कॉरिडॉरप्रमाणे मोकळा करणे.

०३. साधना महाव्दार (सध्याचे महाव्दार क्रमांक ०१) समोरील, यु आकारातील लॉन (पूर्वीचे व्ही.आय.पी.वाहनतळ) कायमस्वरुपी काढून घेऊन परिसर मोकळा करणे. सध्याचे जनसंपर्क कार्यालयासमोरील (मिटींग हॉलसमोरील) कारंजा व लॉन काढून परिसर मोकळा करणे. या मोकळया झालेल्या परिसरातून / जागेतून, म्हणजेच साधना महाव्दार ते शांतीनिवास इमारतीचे दर्शन रांगेच्या तळमजल्यावरील प्रवेशव्दारापर्यन्त कॉरीडॉर तयार करणे.

उपरोक्तप्रमाणे मंदिर परिसरातील बांधकामे कायमस्वरुपी काढून त्याठिकाणची जागा मोकळी करुन अशा मोकळया करण्यात आलेल्या जागेवर भक्तांचे ऊन,वारा, पाऊस इत्यादीपासून संरक्षण होणेसाठी कायमस्वरुपी भक्कम असे एम.एस. पोल उभे करुन पॉलिकार्बोनेटचे छत असलेले मंडप अथवा कायमस्वरुपी कॉंक्रिटचे छताची उभारणी करता येणे शक्य होईल.

तथापि याबाबत मंदिर व मंदिर परिसर सुशोभिकरणाचे आर्किटेकट मे.माथूर ॲण्ड काप्रे असोसिएटस, नवि दिल्ली यांच्या प्रतिनिधी आर्किटेकट श्रीमती सोनिया काप्रे यांचा अभिप्राय घेऊन याबाबतची कार्यवाही करता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, पहिल्या टप्प्यात मंजूर केलेले समाधी मंदिराशेजारील उत्तर बाजूचे स्टेज त्वरीत काढून तेथील जागा जमिन पातळीपर्यन्त करण्यात यावी. उर्वरित कामाबाबत आर्किटेक्ट सोनिया काप्रे, नवी दिल्ली यांचेकडून आराखडा तयार करण्यात यावा व त्यांचे अभिप्रायासह प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करावा असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ०५** **नाताळ सुट्टीतील गर्दीचे कालावधीत साईभक्तांचे सोयीकरिता मंडप उभारणे कामाचे बीलाबाबत.**

**निर्णय क्र.११६** नाताळ सुट्टयांचे कालावधीत दि. २१/१२/२००७ ते दि. ०२/०१/२००८ अखेर १३ दिवस कालावधीमध्ये संस्थान परिसरात मंडप ( बिच्छायत व मॅटींगसह), आवश्यक गाद्या व चादरीसह येणारे रु. ११.५० लाखचे खर्चास व याकामी कोटेशन मागविणेस तसेच गर्दीचे स्वरुप विचारात घेऊन वाढीव मंडप उभारणे, गाद्या चादरी पुरविणेसह येणारें खर्चास मा. व्यवस्थापन उप समितीचे दि. १८/११/२००७ चे सभेत मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार मंडप ठेकेदार यांचेकडून कोटेशन मागवुन दि. १३/१२/२००७ रोजी मा. कार्यकारी अधिकारी, मा. विश्वस्त श्री. वाबळे, श्री. खांबेकर, प्रशासकिय अधिकारी, मुख्य लेखाधिकारी व वरिष्ठ मुख्य अभियंता यांचे उपस्थितीत कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात कोटेशन उघडणेत येऊन मंडप ठेकेदार यांचेशी चर्चा तथा वाटाघाटी करुन निम्नतम दर असलेले ठेकेदार कैलास मंडप डेकोरेटर्स, अहमदनगर यांचेकडून मंडपाचे व इतर अनुषंगिक कामे करुन घेणेंस तसेच गर्दीचे कालावधीत अधिक मंडपाची आवश्यकता भासल्यास त्यांचेकडून मंजूर दराप्रमाणे करुन घेण्यात यावे अथवा इतर मंडप ठेकेदार यांचेकडून कैलास मंडप डेकोरेटर्स, अहमदनगर यांचे मंजूर दरात करुन घेण्यात यावे व याकामी येणारे योग्य त्या खर्चासही मान्यता देण्याची शिफारस करणेत आली. तसेच शिर्डी महोत्सव २००७ कार्यक्रमाठी साईनगर येथिल ग्राउंडवर २५ फुट x ३० फुट साईजचे स्टेज, ड्रेसींग रुम

२००x१०० चे मॅटींग व ३०० नग प्लास्टीक खुर्च्या इ. चे कामे मंजूर दर असलेले ठेकेदार कैलास मंडप डेकोरेटर्स, अहमदनगर यांचेकडून करुन घेणेस व याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्याची शिफारस करण्यात आली आहे.

त्यानुसार निम्नतम दर असलेले ठेकेदार कैलास मंडप डेकोरेटर्स, अहमदनगर यांना मंदिर परिसर, प्रसादालय परिसर, धर्मशाळा परिसर (भाग ०१) करीता रु. ५,३३,३३९.०० व नविन भक्तनिवासस्थान परिसर (५०० रुम) भाग ०२ करीता रु. १८,९५,६००.०० मात्र रकमेचे म्हणजेच एकुण रु. २४,२८,९३९.०० चे कार्यादेश ठेकेदार कैलास मंडप डेकोरेटर्स, अहमदनगर यांना देण्यात आला होता. ठेकेदार यांनी कार्यादेशानुसार सर्व कामे पुर्ण केली असून वेळोवेळी साईभक्तांची वाढती गर्दीमुळे वाढीव मंडप उभारणेचे काम ठेकेदार यांनी पुर्ण केले आहे.

ठेकेदार कैलास मंडप डेकोरेटर्स, अहमदनगर यांनी कार्यादेशानुसार केलेले कामाचे बिल रु. २२,५०,७२३.०० व वाढीव मंडपाचे रु. ३,२४,२४४.०० म्हणजेच एकुण रु. २५,७४,९६७.०० मात्र रकमेचे बिल सादर केले आहे. तसेच ऐनवेळेस भक्तांची वाढती गर्दीमुळे भक्तांचे सोयीसाठी द्वारकामाई व चावडी समोर मंडप उभारणेचेकाम ठेकेदार झुराळे मंडप, खैरी निमगांव यांचेकडून करुन घेणेत आले आहे. त्याचे बिल रु. २२,६७४.०० व दि. ३१/१२/२००७ शिर्डी महोत्सव मधील कार्यक्रम ऐनवेळेस मंदिर परिसर शेजारील जुनी जिल्हा परिषद शाळेचे मैदानावर ठरल्याने स्टेज उभारण्याचे काम सावता मंडप डेकोरेटर्स, राहाता यांचेकडून करुन घेण्यात आले आहे. त्याचे बिल रु. ३०००.०० मात्र ठेकेदार यांनी सादर केले आहे. नाताळ सुट्टी निमीत्त भक्तांचे सोयीसाठी केलेल्या मंडपाचे, वाढीव मंडपासह एकुण रु. २६,००,६४१.०० मात्र खर्च आलेला आहे.

तरी नाताळ सुट्टी निमीत्त भक्तांचे सोयीसाठी मंडप व इतर अनुषंगिक सुविधा करणे कामी झालेल्या वाढीव खर्च रु. १,७१,७०२.०० मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०६** **दिपावळीच्या सुट्ट्यांमध्ये गर्दीचे कालावधीत साईभक्तांचे सोईकरीता उभारलेले जादा मंडपाचे बील आदा करणेबाबत**

**निर्णय क्र.११७** दिपावली सुट्टयांचे कालावधी मध्ये दि. ०७/११/२००७ ते दि. १८/११/२००७ (**१२ दिवस** ) कालावधीसाठी शामियाना कापडी मंडप, बाजुचे पार्टीशन (कनाती) सह, खालील बिच्छायतीसह (मॅटीन) व आवश्यक गाद्यासह मंडप मंदिर परिसरात, तसेच प्रसादालय परिसरात साईभक्तांचे सोयीकरीता मंडप उभारणीकामी येणारे रु.१,४४,४४७/- मात्रचे खर्चास व सदरचे काम रोशनी मंडप, संक्रापूर यांचेकडून करुन घेण्यास तसेच मान्य दराने जादा मंडप टाकण्याचे आवश्यकता भासल्यास व भक्तांची गर्दी टिकून राहिल्यास मंडपाची मुदतवाढ करणेस मा.उपसमितीचे दि.०७.११.२००७ चे सभेत शिफारस करणेत आलेली आहे. ठेकेदार यांनी रु.१,३५,०४८/- मात्र रकमेचे काम कार्यादेशानुसार पूर्ण केले होते. तसेच भक्तांची गर्दी दि.१८.११.२००७ नंतरही टिकूण राहिल्याने खालील ठिकाणी मंडपाचा कालावधी दि.१९.११.२००७ ते दि.१८.१२.२००७ पर्यंत वाढविणेत आलेला होता.

**अ)** प्रसादालय परिसरातील मंडप (कालावधी वाढविलेले) मंडप वाढीव कालावधी दि. १९/११/२००७ ते दि. १८/१२/२००७ पर्यंत खालील दर्शविलेप्रमाणे-

| **अ.नं.** | **मंडपाचा तपशिल** | **साईज** | **एकूण चौ.फुट** |
|---|---|---|---|
| ०१ | प्रसादालय पार्किंग परिसरात | १३६'X६०'<br>४५'x३०' | ८१६०.००<br>१३५०.०० |
| ०२ | प्रसादालय तिकिट काउंटर समोर | ४५'X११८' | ५३१०.०० |
| ०३ | चौकशी कार्यालयासमोर | ५०'X२०' | १०००.०० |

**ब)** तसेच ऐनवेळी भक्तांची वाढती गर्दीमुळे खालील ठिकाणी विविध मुदतीकरीता वाढीव मंडप टाकणेत आले होते.

| **अ.नं.** | **मंडपाचा तपशिल** | **कालावधी** | **साईज** | **एकूण चौ.फुट** |
|---|---|---|---|---|
| ०१ | धर्मशाळा परिसर | दि. २४/११/२००७ ते दि. २९/११/२००७ | १२३'X१००' | १२३००.०० |
| | | दि. २४/११/२००७ ते दि. २९/११/२००७ | ५९'X२०' | ११८०.०० |
| | | दि. २४/११/२००७ ते दि. २९/११/२००७ | ५४'X१५' | ८१०.०० |
| | | दि. २३/११/२००७ ते दि. २९/११/२००७ | ६०'X४४' | २६४०.०० |
| ०२ | कन्याशाळा येथे कापडी पार्टीशनमध्ये बाथरुम तयार करणे | दि. ०६/११/२००७ ते १८/११/२००७ | ६४ ' | ६४.०० |
| ०३ | प्रसादालय पाठीमागील बाजुस पुरी बनविणेकरीता मंडप | दि. १०/०१/२००७ ते १०/१२/२००७ | १५'X३०' | ४५०.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०४ | दर्शन रांग टेरेसवर | दि. १२/११/२००७ ते २९/११/२००७<br>दि. १२/११/२००७ ते २९/११/२००७ | ४२'-६"X७'-<br>२९"X९'-६" | २९७.५०<br>२७५.५० |
| ०५ | श्री चावडी समोर | दि. १२/११/२००७ ते २९/११/२००७ | ३०'X१५' | ४५०.०० |
| ०६ | श्री. व्दारकामाई समोर | दि. १२/११/२००७ ते २९/११/२००७ | १०६'-६"X१५' | १५९७.५० |
| ०७ | साईउद्यान समोर | दि. १८/११/२००७ ते २९/११/२००७ | ४५'X६०' | २७००.०० |

उपरोक्तप्रमाणे वाढीव मंडपाचे काम ठेकेदार रोशनी मंडप डेकोरटर्स, संक्रापूर यांचेकडून त्यांचे मंजूर दरात करुन घेणेत आले आहे. दिपावली सुट्टयामध्ये गर्दीचे कालावधीत साईभक्तांचे सोयीकरिता जादा मंडप उभारणीसह एकूण रु.३,३५,७८७/- मात्र खर्च आलेला आहे. दि.०७.११.२००७ चे मा.उपसमिती सभेत रु. १,४४,४४७/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. करिता रु. २,००,७३९.०० मात्र जादा खर्च आलेला असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०७ गुंतवणूक.**

**निर्णय क्र.११८** नाताळाच्या सुटीमुळे साईभक्तांचे गर्दीचे प्रमाण वाढल्याने दि.२४.१२.२००७ रोजी दक्षिणापेटीतील मोजणीतून एकूण रु. १.५५ कोटी इतकी विक्रमी रक्कम प्राप्त झाल्याने तसेच त्यापुढील होणा-या दक्षिणामोजणीतूनही मोठयाप्रमाणात रक्कम प्राप्त झाल्याने आज अखेर संस्थानच्या बचत खात्यात एकूण १० कोटीपर्यंत रक्कम शिल्लक आहे. तसेच माहे फेब्रुवारी,२००८ चे पहिले आठवडयात आर.बी.आय बॉन्ड वरील मिळणारे व्याज धरुन उपलब्ध होणारी रक्कम अंदाजे रु.५ कोटी एकत्रीत करुन एकूण रु. १५ कोटीपर्यंत रक्कम गुंतवणूकीसाठी उपलब्ध होणार आहे.

उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम ही नियमित सेवा देणा-या बॅंकेकडे उच्चतम व्याज दराने गुंतवणूक करणे आवश्यक आहे. तसेच त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळविता येतील. विश्वस्तव्यवस्थेचे सन २००५-०६ व २००६-०७ चे वैधानिक लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणा-या बॅंकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी असे लेखापरिक्षक यांनी सुचविले असल्याने, संस्थानला प्रामुख्याने सेवा देणा-या खालील बॅंकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बॅंकेकडे सदरची गुंतवणूक करता येईल :-

०१.युनियन बॅंक ऑफ इंडीया, शिर्डी
०२.सेंट्रल बॅंक ऑफ इंडीया, शिर्डी
०३.आंध्र बॅंक, शिर्डी
०४.स्टेट बॅंक ऑफ इंडीया, शिर्डी-कोपरगांव
०५.बॅंक ऑफ बरोडा, कोपरगांव
०६.बॅंक ऑफ बरोडा, नासिक

स्थानिक बॅंक :

०१. बॅंक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी

तरी वरील सातही बॅंकांकडून व्याजदर मागवुन व जास्तीत- जास्त व्याजदर देणा-या बॅंकेकडे टप्प्या-टप्प्याने एकूण रक्कम रु. १५ कोटीची गुंतवणूक करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त सातही बॅंकांना आजचे सभेसमोर समक्ष चर्चेसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी एक वर्ष मुदतीसाठी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | बॅंकेचे नांव | देऊ केलेले दर |
|---|---|---|
| ०१. | युनियन बॅंक ऑफ इंडीया, शिर्डी | ९.१० % |
| ०२. | सेंट्रल बॅंक ऑफ इंडीया, शिर्डी | ८.३५ % |
| ०३. | आंध्र बॅंक, शिर्डी | ९.००% |
| ०४. | स्टेट बॅंक ऑफ इंडीया, शिर्डी-कोपरगांव | ८.७५% |
| ०५. | बॅंक ऑफ बरोडा, कोपरगांव | ९.१०% |
| ०६. | बॅंक ऑफ बरोडा, नासिक | ९.१०% |
| ०७. | बॅंक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी | ९.१०% |

उपरोक्त बॅंकांपैकी अ.नं.०१,०५,०६ व ०७ या बॅंकांचे व्याजदर जास्त असल्याने उपलब्ध रक्कम समप्रमाणात एक वर्षाचे मुदतीकरीत ९.१० टक्के या व्याजदराने गुंतविण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी )

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०८** **संस्थानकडे उपलब्ध असलेले शुद्ध सोने-चांदी पासून नाणी, पॅडण्ट तयार करणेकामी इंडिया गर्व्हमेंट मिंट, मुंबई यांचेकडे हस्तातंरीत करणे तसेच सोने चांदी वस्तु वितळविणेबाबत.**

**निर्णय क्र.११९** **(अ)** श्री साईबाबा संस्थानचे दिनांक ३१ मार्च, २००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णया नूसार इंडिया गर्व्हमेंट मिंट, मुंबई यांचेकडून श्री साईंची प्रतिमा असलेली चांदीची (२० ग्रॅम), सोन्याची (प्रत्येकी २.५, ५, १० ग्रॅमची ) नाणी साईभक्तांना योग्य किंमतीत उपलब्ध करुन देणेबाबत निर्णय घेण्यात आलेला होता.

उपरोक्त निर्णयान्वये संस्थानकडे उपलब्ध असलेले शुध्द सोने व चांदी इंडिया गर्व्हमेंट मिंट,मुंबई यांचेकडे मा.व्यवस्थापन समितीचे सदस्यांचे उपस्थितीत हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. मिंटने संस्थानने पुरविलेल्या सर्व शुध्द सोने व चांदी चे विहीत वजनाची नाणी पुरविलेली असुन त्यास श्री साईभक्तांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. तथापी संस्थानकडे संस्थानचे शिर्डी कार्यालयात तसेच मुंबई येथील लॉकर मध्ये शुध्द सोने ९१४१.४०० ग्रॅम शिल्लक आहे. तरी सदरचे शुध्द सोने श्री साईभक्तांना नाणी व पेंडेटस् बनविणेकामी इंडिया गर्व्हमेंट मिंट,मुबंई यांचेकडे हस्तांतरीत करण्यास व त्यापासुन प्रचलित वजनाची नाणी बनवुन घेणेस मान्यता मिळणेस विंनती.

**(ब)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ चे अधिसूचनेनूसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे कामकाज शासननियुक्त मा.व्यवस्थापन समिती पहात आहे. मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयान्वये देणगी रुपाने प्राप्त होणारे सोने-चांदी वस्तू अलंकारापैकी, जे अलंकार अत्यंत अत्युत्कृष्ट व असामान्य कलाकुसरीचे असतील, असेच अलंकार व्यवस्थापनाकडे सदैव जतन करुन ठेवता इतर उर्वरीत सोने-चांदी वस्तूं अलंकार वितळविणे बाबतचे कार्यपध्दतीस मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांनी त्यांचे पत्रक्रमांक सासंवि-२००५/४०७/(६४)-का.सोळा दिनांक ३१ मे, २००७ अन्वये स्थायी मान्यता दिलेली आहे.

दक्षिणापेटी मोजणीचे वेळी उपलब्ध होणारे तसेच भक्तांकडून देणगी स्वरुपात प्राप्त होणारे सोने-चांदी वस्तु अलंकार मुख्य रोखपाल यांचे ताब्यात स्ट्रॅांग रुममध्ये सुरक्षित ठेवण्यात येतात. हे ठेवतानां देणगी पावतीनिहाय स्वतंत्र पिशवीत ठेवण्यात येतात व त्या पिशवीतही देणगीपावती बाबतचा तपशील दर्शविणारी चिठ्ठी टाकण्यात येते. अशाप्रकारे माहे एप्रिल,२००३ पासुन माहे मार्च, २००४ अखेरपर्यन्त साठलेल्या सर्व सोने-चांदी वस्तू अलंकाराची प्रत्यक्ष पाहणी दिनांक ३० मार्च, २००४ रोजी तत्कालीन मा.विश्वस्तांनी समक्ष केली होती. त्यावेळेस देणगी पावतीनिहाय असलेल्या चिठ्ठया काढून टाकण्यात येऊन, सर्व सोने तसेच चांदी वस्तु अलंकार एकत्रित करण्यात आले व त्यांचे समक्ष वजनही करण्यांत करण्यात आलेले आहे. त्यामुळे एप्रिल, ०३ पासुन आज अखेरच्या सर्व सोने-चांदी वस्तु मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांनी सोने-चांदी वितळविणेबाबत दिलेल्या मंजुरीचे अधिनराहुन वितळविण्यात याव्यात, असे नम्र मत आहे.

लेखाशाखेकडे दिनांक **३१ डिसेंबर,२००७** अखेर साधारणतः पुढील प्रमाणे देणगी रुपाने जमा झालेले वितळविण्या योग्य सोने-चांदी वस्तू अलंकार शिल्लक आहेत, त्याचा गोषवारा :

| **अ.नं.** | **तपशिल** | **वजन (ग्रॅम मध्ये)** |
|---|---|---|
| **०१.** | **सोने वस्तु** | **६८६११.४००** |
| **०२.** | **चांदी वस्तु** | **११३७६४४५.५२०** |

उपरोक्त सोने व चांदी वस्तुची संख्या / वजन पाहता वितळविण्यास नेताना टप्प्या टप्प्यांने नेणे सोईस्कर होईल, असे नम्र मत आहे. तरी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २७ डिसेंबर,२००४ रोजीचे निर्णयान्वये, देणगी स्वरुपात येणा-या सोने-चांदी वस्तूपैकी लिलावाच्या दृष्टीने सुयोग्यवस्तु निवडून वितळविण्या योग्य सोने चांदी वस्तु अलंकार आदींची पाहणी मा.सदस्यांकडून होऊन तसेच तत्कालीन मा.व्यवस्थापन मंडळाच्या सदस्यांनी यापुर्वी सोने-चांदी वस्तु अलंकार वितळविताना निवडुन अथवा राखुन ठेवलेल्या सोने-चांदी वस्तुंचीही पाहणी करुन सर्व अलंकार एकत्रितपणे वितळविणेबाबत निर्णय होणेस व त्या अनुषंगाने पुढील वेळापत्रक ठरविणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,संस्थानकडे शिल्लक असलेले शुध्द सोने ९१४१.४०० ग्रॅम इंडिया गव्हर्नमेंट मिंट मुंबई यांचेकडे देण्यात येऊन त्यापासून श्रीसाईंची प्रतिमा असलेली नाणी तयार करुन घेण्यात यावीत. व शिल्लक असलेल्या सोने चांदी वस्तू अलंकाराची पहाणी मा.स्थानिक सदस्यांकडून करुन घेऊन लिलावासाठी सुयोग्य वस्तू निवडून इतर वस्तू व अलंकार वितळविणेकामी इंडिया गव्हर्नमेंट मिंट मुंबई यांचेकडे देण्यात यावे याकामी विहित पध्दती अवलंबविण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९** **पाणी पुरवठा विभागाकडील ५० एच.पी.सबमर्सिबल पंपाकरिता पॅनलकरिता लागणाऱ्या खर्चास मंजुरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१२०** पाणीपुरवठा विभागाने ५० एच.पी.च्या नविन दोन सबमर्शिबल मोटारी खरेदी केलेल्या असून या मोटारींसाठी पॅनल खरेदी करणेकरीता पाणीपुरवठा विभागाने रक्कम रुपये १,३८,१३९.०० इतक्या रकमेस दिनांक १७-०७-२००७ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील विषय नं.१ निर्णय क्र.५९६ /१० अन्वये खर्चास मंजूरी घेतलेली आहे.

पाणीपुरवठा विभागाने बनविलेल्या व मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर केलेल्या इस्टिमेटमध्ये काही इलेक्ट्रीकल मटेरीअलचा समावेश नसल्याने पुन्हा सर्व बाबी विचारात घेऊन इस्टिमेट तयार केले असता एकुण खर्च रक्कम रुपये १,९७,१५७.०० इतका होत आहे. म्हणजे पुर्वीच्या इस्टिमेटपेक्षा रक्कम रुपये ५९,०१८.०० इतका जादा खर्च येणार आहे. या जादा होणा-या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :-

| DSR.NO. | SR.NO. | DESCRIPTION | QTY | RATE | AMOUNT |
|---|---|---|---|---|---|
| 11.1.15 | 1 | Supplying and erecting panel mounting type digital ammeter having 31/2 digit LED display, external C.T. operated, calibrated for 0 to 1000 Amps. AC suitable to operate on 500 Volts A/C supply with necessary PVC wire leads and lugs and mounting hardware on provided panel complete with calibration certificate from manufacturer (Similar to A. E. make) | 004 Nos. | Rs. 01,300.00 | Rs. 0,05,200.00 |
| 11.1.16 | 2 | Supplying and erecting digital voltmeter having 3 1/2 digits LED display 0 to 750 volts range with necessary PVC wire leads lugs and mounting hardware on provided panel complete with calibration certificate from manufacturer (Similar to A.E. make) | 003 Nos. | Rs. 01,300.00 | Rs. 0,03,900.00 |
| 11.1.8 | 3 | Providing and erecting L.T. Current Transformer with bar primary 50/5 to 1000/5 ratio with 15VA burden erected in provided CRCA box duly secured with insulating materials connected to the meter with test certificates. | 009 Nos. | Rs. 00,370.00 | Rs. 0,03,330.00 |
| 11.1.2 | 4 | Providing and erecting Selector Switch suitable for Voltmeter/Ammeter for 3 phase A.C supply 500 V, 50Hz, on provided box / panel and duly connecting with necessary PVC wire leads and lugs. | 002 Nos. | Rs. 00,415.00 | Rs. 0,00,830.00 |
| 11.2.1A | 5 | Supplying & erecting LED type indicating pilot lamp with LED colours Red / Yellow / Green, 230 / 250 V on provided box / panel with necessary material, wiring & connections etc. | 009 Nos. | Rs. 00,170.00 | Rs. 0,01,530.00 |
| 11.1.10 | 6 | Supplying and erecting KWH meter provided with maximum KW demand indicator for unbalanced load 3 phase 4 wire 50 cycles 230/440 V with incorporated time switch of 30 minutes integration period and of 15 seconds | 001 Nos. | Rs. 10,990.00 | Rs. 0,10,990.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | tune required for decoupling suitable to work on provided three numbers of instrument current transformers of class C accuracy with ratio 100/5 A - 400/5 A complete with zero adjustment & test certificate from manufacturer erected on provided M.S. box and connected to CTs. | | | |
| 5.3.10B | 7 | Supplying & erecting fuse bridges with base H.C.type fuse links 250/500 V. 200 Amps. erected on polished T.W. block. | 006 Nos. | Rs. 00,123.00 | Rs. 0,00,738.00 |
| 5-3-14B | 8 | Supplying & erecting ISI marked HRC fuse cartridge 500V. 32 Amps. | 006 Nos. | Rs. 00,051.00 | Rs. 0,00,306.00 |
| | | | | | Rs. 0,26,824.00 |
| | | | | | Rs. 0,26,824.00 |
| 5.7.2 | 9 | Providing & erecting 3 Pole Moulded case circuit breaker of 15A to 200A. capacity with S.C. rating 35 K.A.capacity complete erected in provided enclosure & connected with provided leads on incoming and outgoing side duly complete in an approved manner. | 002 Nos. | Rs. 17,163.00 | Rs. 0,34,326.00 |
| 5.1.18 | 10 | Supplying and erecting Triple pole metal /iron clad HRC fuse switch 415/ 500 V. 300A. with neutral link with ISI marked HRC fuses, approved make complete erected on angle iron frame. | 001 Nos. | Rs. 11,174.00 | Rs. 0,11,174.00 |
| 5.3.20 | 11 | Supplying & erecting approved make porcelain/epoxy bus bar support complete erected in provided M.S.box for 200/300 Amps. | 025 Nos. | Rs. 00,036.00 | Rs. 0,00,900.00 |
| 5.5.1 | 12 | CRCA sheet 16 gauge to be used for fabrication of boxes panel boards etc. including cutting, bending, drilling, welding, riveting etc. and painting with one coat of red lead paint and 2 coats of enamel paint. | 030 sq.mm. | Rs. 00,987.00 | Rs. 0,29,610.00 |
| 5.5.15 | 13 | Supplying and erecting self locking arrangement with duplicate keys, made of brass duly erected, flush with surface of panel/cupboard. | 020 Nos. | Rs. 00,130.00 | Rs. 0,02,600.00 |
| 5.5.14 | 14 | Supplying and erecting Iron work for panel board or other purposes complete with bending, cutting, drilling and welding complete erected at the position with necessary materials duly painted with one coat of red oxide and two coats of enamel paint to match the switchgears or as per the directions by the authority. (Size of the angle/flat iron to be specified in estimate). | 300 Kg. | Rs. 00,061.00 | Rs. 0,18,300.00 |
| NON C.S.R. | 15 | Supplying erecting & marking L&T make star delta starter suitable for 50HP motor with required wiring connection & Lugs etc in provided panel wiring | 002 Nos. | Rs. 25,000.00 | Rs. 0,50,000.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | connection in provided panel. | | | |
| NON C.S.R. | 16 | Supplying & erecting clip on terminal size of 50 sq.mm.with required wiring connection in provided panel. | 012 Nos. | Rs. 00,120.00 | Rs. 0,01,440.00 |
| NON C.S.R. | 17 | Supplying and erecting size of 150 sq.mm. Aluminium busbar in provided panel. | 060 Meter. | Rs. 00,240.00 | Rs. 0,14,400.00 |
| | | | | Total Amount :- | Rs. 1,89,574.00 |
| | | | | Contigency 4% | Rs. 0,07,583.00 |
| | | | | Total Amount :- | Rs. 1,97,157.00 |

उपरोक्तप्रमाणे पाणीपुरवठा विभागाकडील ५० एच.पी. सबमर्सिबल पंपाकरीता पॅनलकरीता पूर्वीच्या मंजूर रु.१,३८,१३९/- पेक्षा रक्कमेपेक्षा वरीलप्रमाणे रक्कम रुपये १,९७,१५७/- इतका खर्च अपेक्षित आहे. तरी पूर्वी मंजूर खर्चापेक्षा अतिरिक्त जादा खर्च रक्कम रु. ५९,०१८/-मात्र अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १०** **नविन प्रसादालय इमारत लॅण्डस्केपिंगसाठी होणाऱ्या इलेक्ट्रिकल कामाचे होणाऱ्या वाढीव खर्चास व बिल्डिंगमध्ये इंटरनल फॉल्स सिलींगचे कामातील लावाव्या लागणाऱ्या इलेक्ट्रिकल फिटींगचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१२१** नविन प्रसादालय इमारत लॅण्डस्केपिंगसाठी सिव्हील, हॉर्टीकल्चर, इलेक्ट्रीकल इ.कामे करणेबाबत मा. आर्किटेक्ट मे.अमृता पवार यांनी कळविलेल्या एकुण रक्कम रुपये ३५,८५,१८०.०० इतक्या इस्टिमेट्च्या रक्कमेस दिनांक २८-०७-२००७ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेत खालीलप्रमाणे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

| अ.क्र. | कामाचे स्वरुप | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| ०१) | Civil work | रु. २२,५०,७६४.०० |
| ०२) | Horticultural work | रु. ०९,६५,८४७.०० |
| ०३) | Fountain | रु. ०१,००,०००.०० |
| ०४) | Electrification work | रु. ०२,४५,६०५.०० |
| ०५) | Water Supply work | रु. ००,२२,९६४.०० |
| | | रु. ३५,८५,१८०.०० |

वरीलपैकी रक्कम रुपये २,४५,६०५.०० मात्र अपेक्षित खर्चाचे इलेक्ट्रीफिकेशन काम संबंधीत विभागामार्फत सध्याचे विद्युत ठेकेदाराकडून मंजूर निविदा दरात करुन घेणेस मा. व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यता मिळालेली आहे.

नविन प्रसादालयाचे लॅंडस्केपिंगचे तसेच बिल्डिंगमध्ये इन्टरनल फॉल्स सिलींगचे काम आर्किटेक्ट मे.अमृता पवार, नाशिक याच्या देखरेखीखाली चालू झालेले आहे.

इलेक्ट्रिकलच्या कामासाठी आर्किटेक्ट मे.अमृता पवार, नाशिक यांनी दिलेल्या पूर्वीचे इस्टिमेटनुसार इले.कामाकरीता रुपये २,४५,६०५.०० इतकी तरतूद मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक २८-०७-२००७ चे सभेत विषय क्र.६ निर्णय क्र.५१७ (६) अन्वये मान्य करण्यात आली आहे.

तसेच इलेक्ट्रीकलचे काम मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार नविन प्रसादालय इलेक्ट्रीकलचे काम करीत असलेले इलेक्ट्रीकल कॉन्ट्रॅक्टर, मे.अदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक यांना काम चालू करण्यास कळविण्यात आलेले आहे.

आता काम चालू झाले असून, या महिन्यातील साईटवर झालेल्या पाहणीच्या वेळी आर्किटेक्ट मे.अमृता पवार, नासिक यांनी बसवाव्या लागणा-या विशिष्ट टाईपच्या वेगवेगळया लाईट फिटींगसंबंधी आता दिनांक ०४-०१-२००७ रोजी सुधारीत इस्टिमेट पाठविले असून या सर्व फिटींगची एकत्रित किंमत रु.९,५१,८५४.०० इतकी होत असून केबलसाठी ( आरमर्ड कॉपर केबल -४ X ४ स्क्वे.एम.एम. दर रु. १८७.५० X १००० मीटर ) रु.१,८७,५००.०० इतका खर्च येणार आहे. दोन्ही मिळून रु. ११,३९,३५४.०० इतका खर्च अपेक्षीत आहे. ही रक्कम मूळ इस्टिमेट रु.२,४५,६०५.०० पेक्षा जास्त होत आहे,

तसेच इमारतीच्या आतील भागात फॉल सिलींगचे काम चालू असून त्यासाठी लागणाऱ्या विशिष्ट टाईपच्या वेगवेगळया लाईट फिटींगसंबंधी रु.४,८३,२६९.०० इतका खर्च आर्किटेक्ट मे.अमृता पवार, नाशिक यांनी दिनांक ०४-०१-२००७ रोजी कळविला असून या खर्चाचा पूर्वीच्या इस्टिमेटमध्ये समावेश नाही.

उपरोक्त (१) नविन प्रसादालयाचे लँडस्केपिंगचे कामासाठी येणाऱ्या रु. ११,३९,३५४.०० व (२) बिल्डिंगमध्ये इन्टरनल फॉल्स सिलींगचे कामातील विशिष्ट टाईपच्या वेगवेगळया लाईट फिटींगसाठी रु. ४,८३,२६९.०० मिळून होणाऱ्या रु. १६,२२,६२३०० इतका खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ११ "महिंद्रा लोगान" वाहन देणेगीबाबत**

**निर्णय क्र.१२२** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे विविध कल्याणकारी योजने करीता महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनी यांनी खालील प्रमाणे पाच वाहने देणगी दिलेली आहेत.

०१) महिंद्रा व्हायोजर - ०१
०२) महिंद्रा बोलेरो - ०१
०३) महिंद्रा स्कॉर्पिओ - ०२
०४) महिंद्रा कॅम्पर (मालवाहतूक)- ०१ .
**एकुण वाहने - ०५**

दि.०६/१२/२००७ रोजी महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनी यांनी एक "महिंद्रा लोगान" (पेट्रोल) वाहन देणगी दिलेले आहे. सदर वाहनाची किंमत रू.२,६४,९५७/- मात्र असून त्यास प्रादेशिक परिवहन कार्यालयकडून एमएच-१७/वाय-३६३६ हा नोदणी क्रमांक मिळालेला आहे त्याची नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १२ मंदीराचे दैनंदिन व्यवस्थापन (पुजा-अर्चा,आरती) बाबत.**

**निर्णय क्र.१२३** मंदीर भक्तांकरीता पहाटे ०४.३० वा. उघडले जाते. भक्तांना रांगेमधुन आत सोडण्यात येते. पहाटे ५.०० वा. भूपाळीच्या रेकॉर्ड लावण्यात येतात. ०५.१५ वा. श्रींची काकड आरती सुरु होते. त्यानंतर ०५.५० वा. श्रींचे मंगलस्नान सुरु होते व नंतर शिर्डी माझे पंढरपुर ही आरती ०६.१५ ते ०६.३० दरम्यान होते, आरती झाल्यानंतर दर्शनाकरिता रांगा सोडल्या जातात.

पुर्वी गर्दीचे प्रमाण अत्यल्प होते, दिवसेंदिवस गर्दीमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. जास्तीत जास्त भक्तांना सुलभतेने दर्शन व्हावे याकरीता प्रयत्न असतात. त्यासाठी मुर्तीचे व समाधीचे स्नान एकाच वेळेस सुरु केले जाते. व मंगलस्नानाचे वेळी पूर्वीप्रमाणे भक्तांना समाधीला हात लावू न देता समाधीला स्नान घालण्यात येते. भक्तांना लवकरात लवकर व सुलभतेने दर्शन व्हावे याकरिता सलग रांगा चालू असतात. असे असून सुध्दा वाढलेल्या गर्दीच्या प्रमाणामुळे तसेच हार, श्रीफळ, प्रसाद इ. स्वीकारण्यामुळे होणारा वेळ व त्यानंतर आरतीपूर्वी सफाई करिता लागणारा वेळ हे सर्व विचारात घेतले तर प्रत्यक्ष दर्शनासाठी कमी वेळ मिळतो. इतर ठिकाणच्या मंदिरामध्ये काकड आरतीच्या वेळा या वेगवेगळया व लवकर आहेत. तसेच बऱ्याच मंदिरातून स्नानाचे अथवा नैवेद्याचे वेळी पडदा लावला जातो. काकड आरती ही लवकर सुरु करता येईल का? व काकड आरती, स्नान हे सोपस्कर झाल्यानंतर भक्तांना आत घेऊन दर्शनाला घेता येईल का? तसेच प्रयोगादाखल आरती सुरु असतानाही दर्शन रांग सुरु ठेवता येईल का? व शेजारतीची वेळ बदलता येईल का? हे सर्व बदल करणेकरिता तज्ञांचे मत घ्यावे लागेल, इतर देवस्थानांची माहिती घेऊन असा बदल झाल्यास अधिकाधिक भक्तांना दर्शनाचा लाभ होईल. त्याचप्रमाणे श्रीफळ, हार, प्रसाद यामुळे होणाऱ्या विलंबामुळे केवळ दर्शनाकरिता उभ्या असलेल्या भक्तांना विलंब होतो. यासाठी फक्त दर्शन घेणारांची रांग स्वतंत्र करणे किंवा हार, श्रीफळ व प्रसाद स्वीकारणेकरिता स्वतंत्र व्यवस्था केल्यास निश्चितच फरक पडेल. याबाबत तज्ञांशी चर्चा करुन त्यांचे लेखी अभिप्राय घेऊन श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर, श्रीक्षेत्र शेगाव, श्रीक्षेत्र तिरुपती येथून माहिती घेणेस मान्यता घेण्याबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली. (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १३ कर्मचाऱ्यांच्या पाल्यांच्या शैक्षणिक फी परताव्याबाबत**

**निर्णय क्र.१२४** सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १४ शैक्षणिक फी परताव्यासाठी तिसऱ्या व त्यापूढील अपत्याच्या जन्म तारखेत शासन निर्णयानुसार बदल करणेबाबत**

**निर्णय क्र.१२५** सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १५ श्रीरामनवमी उत्सव-२००८**

**निर्णय क्र.१२६** श्रीक्षेत्र शिर्डी येथे सालाबाद प्रमाणे याहीवर्षी श्रीरामनवमी उत्सव शनिवार दिनांक १२/०४/२००८ ते सोमवार दिनांक १४/०४/२००८ (चैत्र शुध्द ८ शके १९३० ते चैत्र शुध्द १० शके १९३०) असा तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचा मुख्य दिवस रविवार दिनांक १३/०४/२००८ हा राहिल. या उत्सवासाठी प्रामुख्याने खालीलप्रमाणे तयारी करावी लागेल, ज्यास मान्यता देण्यात आली व इतर अनुषंगिक निर्णय घेण्यात आले.

**०१) उत्सव निमंत्रण पत्रिका :-** संस्थानचा कारभार चालविणेसाठी तयार करण्यात आलेल्या योजनेच्या तरतुदीमध्ये दुरुस्ती झाल्या प्रमाणे भक्त मंडळाचे आजीव व आश्रयदाते सभासदांना उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका पाठवाव्या लागतात. श्रीरामनवमी उत्सवात सभासदांची वाढती संख्या धरुन १ लाख २५ हजार निमंत्रण पत्रिका तसेच सन्माननीय पाहूण्यांसाठी २,००० पाकीटांसह निमंत्रण पत्रिका छपाई करुन घेण्यात याव्यात. तसेच नेहमी प्रमाणे प्रेस नोट (न्यूज अॅटम) म्हणून वर्तमान पत्रातून प्रसिध्दी देण्यात यावी.

**०२) उत्सव व्यवस्था :-**

**अ) कलाकार कार्यक्रम :-**

निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम मिळणेबाबत आलेली कलाकारांची पत्रे मा.अध्यक्ष,मा.उपाध्यक्ष व मा.विश्वस्तांना दाखवुन कार्यक्रम निश्चित करण्यात यावेत.

**ब) कीर्तन कार्यक्रम :-** परंपरेनुसार श्रीरामनवमी उत्सवातील कीर्तन कार्यक्रम ह.भ.प.दासगणू महाराज आश्रम गोरटे, यांनी नामनिर्देशित केलेले कीर्तनकार करीत असतात. त्यांचेकडून नामनिर्देशित करणेत आलेल्या कीर्तनकारामार्फत कीर्तने व्हावीत.

**०३) श्री साईसत्यव्रत (सत्यनारायण ) पूजा व अभिषेक पूजा :-** उत्सवकाळात दि. १२/०४/२००८ ते दि. १४/०४/२००८ अखेर श्री साईसत्यव्रत पूजा चालू राहतील. मात्र अभिषेक पूजा होणार नाहीत.

**०४) अखंड पारायण व्यवस्था :-** उत्सव काळात दिनांक १२/०४/२००८ रोजी सकाळी ०६.१५ वाजता श्री द्वारकामाई मंदिरात श्री साईचरित्राचे अखंड पारायणास सुरुवात होईल. दिनांक १३/०४/२००८ रोजी सकाळी ०५.४५ वाजता त्यांची समाप्ती होईल. मा.व्यवस्थापन समितीचे ५ सदस्य पहिले पाच अध्याय वाचतील व राहिलेले ४८ अध्याय प्रत्येकी एक असे ४८ भक्त वाचतील. इच्छुक भक्तांची नांवे दिनांक ११/०४/२००८ रोजी मंदिर कार्यालयात नोंदविली जातील व त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या नावाच्या चिठ्ठया काढून पारायणा करीता नांवे निश्चित केली जातील. पारायणात भाग घेणा-या प्रत्येक भक्तास प्रसाद म्हणून एक श्रीफळ देण्यात यावे

या उत्सवात पोथी, वीणा, प्रतिमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपूजा या कार्यक्रमात मा.विश्वस्त भाग घेतील मुख्य दिवशी, पाद्यपूजा मा.अध्यक्ष व एक मा.विश्वस्त हे करतील. मा.विश्वस्तांच्या या सर्व कार्यक्रमातील सहभागागबाबत उचित निर्णय घेण्याचे अधिकार मा. अध्यक्ष यांना देण्यात आले.

**०५) पालखी व रथ मिरवणूक :-** उत्सवाचे पहिले दिवशी शनिवार दिनांक १२/०४/२००८ रोजी रात्रौ ९.१५ वाजता श्रींचे पालखीची गांवातून मिरवणूक व रविवार दिनांक १३/०४/२००८ रोजी रथाची गांवातून मिरवणूक सायंकाळी ०४.४५ वाजता निघेल.

**०६) कावडी व निशाणांची मिरवणूक :-**उत्सवाचे मुख्य दिवशी दिनांक १३/०४/२००८ रोजी सकाळी कावडी व सायंकाळी निशाणांची मिरवणूक राहिल. श्री रामनवमीचे दिवशी परिसरातील गांवकरी व साईभक्त गोदावरी नदीचे पवित्र पाणी आणून श्री साईबाबांचे समाधीस मंगलस्नान घालतात. कावडी घेऊन येणारे गांवकरी व साईभक्तांना समाधीला पाणी घालण्याचा मान दिला जातो. कावडीधारकांना श्रीफळ व लहान मुलांना पेरु प्रसाद दिला जातो. सायंकाळी ०४.०० वाजता निशाणांची मिरवणूक होईल.

**०७) विद्युत रोषणाई :-** समाधी मंदिर, श्री द्वारकामाई, श्री चावडी, श्री गुरुस्थान व मंदिर परिसरात सोईप्रमाणे विद्युत रोषणाई करण्यात येईल. श्री रामनवमी उत्सवात श्री द्वारकामाई मंडळ, मुंबई हे विनामुल्य विद्युत रोषणाई करीत असतात. मात्र ट्रक भाडे व जाणे - येण्याचा खर्च त्यांना द्यावा लागेल. यावेळी विद्युत विभागामार्फत त्यांना पत्र देण्यात आलेले आहे. ते न आल्यास संस्थान मार्फत विद्युत रोषणाई करण्यात यावी.

**०८) संरक्षण व्यवस्था :-** उत्सव काळात मंदिर परिसरात बंदोबस्त ठेवणेकामी संरक्षण विभागात ठेकेदारी पध्दतीने जादा गार्ड नेमण्यात येतील. तसेच शांतता व सुव्यवस्था राखणेसाठी पुरेसा बंदोबस्त ठेवणेकामी मा.पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना विनंती करण्यात यावी.

**०९) प्रसादभोजन व्यवस्था :-** उत्सव काळात प्रसादालयात मिष्टांन्नासह रुपये ५=०० या दराने भक्तांना प्रसाद भोजन दिले जाते. मा.व्यवस्थापन समितीचे सदस्याचे कुटुंबिय व नातेवाईक तसेच इतर सन्माननीय व्यक्तींना स्वतंत्र प्रसाद भोजनाची व्यवस्था केली जाते. पोलीस कर्मचारी व उत्सवात काम करणेकरीता मदतीस येणा-या व्यक्तींची प्रसाद भोजन व्यवस्था स्वतंत्र मंडप टाकून करण्यात यावी. साईभक्तांचे सोईसाठी अन्नपाकिटे, चहा, कॉफी, दूध व बिस्कीटे इत्यादी कॅटींनमध्ये २४ तास सुविधा

उपलब्ध असावी. तसेच तीनही दिवस मिष्टांन्न प्रसाद नेहमीचे दराने देण्यात यावा. उत्सव काळात लाडू प्रसाद विक्री दोन ते तीन ठिकाणी चालू करावी.

उत्सवाचे तीन मिष्टांन्न म्हणून प्रथम दिवशी शिरा, मुख्य दिवशी जिलेबी व सांगता दिनी बुंदी मिष्ठान्न म्हणून देण्यात यावे.

**१०) लिलाव :-** श्रींना अर्पण केलेली वस्त्रे व इतर वस्तूंची प्रसाद रुपाने जाहिर लिलावाने विक्री तीनही दिवस करण्यात यावा.

**११) जादा कंत्राटी कर्मचारी :-** उत्सवाचे पूर्व तयारी करणेकामी व उत्सव पार पडणेकरीता लागणा-या जादा कर्मचारी वर्ग आवश्यकतेनुसार ज्या त्या खात्यास नेमण्यात यावा. याकामी मा.कार्यकारी अधिकारी विविध खात्याकडून आलेल्या मागणीची छाननी करुन योग्य ते आदेश पारीत करावा.

**१२) मंडप व कमानी** उत्सवात समाधी मंदिर परिसर व इतर ठिकाणी तसेच पालखी पदयात्रींसाठी आवश्यकतेनुसार मंडप/शामियाने व स्टेज टाकावयाचे आहेत. त्यास मान्यता असावी. तसेच उ-न्हाळी मंडप ५ नग टाकण्यात येतात. गरजेनुसार त्यात वाढ करावी लागेल.

**१३) सर्व साधारण व्यवस्था :-** नेहमी प्रमाणे भक्तांची स्वागत व्यवस्था, मदत केंद्र, प्रथमोपचार केंद्र, निवास व्यवस्था, आरोग्य व्यवस्था इत्यादी व्यवस्था करण्यात यावी. स्वयंसेवी म्हणून काम करु इच्छिणा-या कर्मचारी व इतर व्यक्तींना नेहमी प्रमाणे संधी देण्यात यावी. देणगी स्विकारणे कामी जादा काऊंटर्स उघडण्याची व्यवस्था करण्यात यावी. निमंत्रीत कलाकारांची निवास, भोजन, मानधन व्यवस्था करण्यात यावी. कलाकारांसाठी वास्तव्य व्यवस्था गरजेनुसार गोरडीया, नालंदा व एम.टी.डी.सी. हॉटेल, शिरडी अथवा संस्थानचे निवासात करण्यात यावी.

**१४) पालखी व्यवस्था:-** श्री रामनवमी उत्सवात मुंबई तसेच इतर ठिकाणाहून पालख्या येत असतात. उत्सवात येणा-या पालख्या ठेवण्याची व्यवस्था लेंडीबाग, मंगल कार्यालय, साईउद्यान, धर्मशाळा परिसरात करण्यात येते व पालखी सोबत येणा-या भक्तांची व्यवस्था मंगलकार्यालय, साईउद्यान, श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय, धर्मशाळा इ. इमारतीत करण्यात येते. या वर्षीही ती व्यवस्था मा.व्यवस्थापन मंडळाचे निर्देशानुसार करण्यात यावी. पालख्यांचे स्वागताकरीता मा.विश्वस्तांची एक कमिटी असावी व या कमिटीने पालख्याचे स्वागत करावे. त्याच प्रमाणे येणा-या पालख्यांसाठी पिण्याचे पाण्याची व्यवस्था सिन्नर ते शिरडी रस्त्यावर मागील श्री रामनवमी प्रमाणे यंदाही क रण्यात यावी. गरजेनुसार पालख्या मुक्कामाचे ठिकाणी खर्डी, लतीफवाडी, घारनदेवी, खंबाळे, वेल्लोळी, नासिक, शिंदे, सिन्नर (एमआयडीसी), खोपडी- दत्तमंदिर, पांगरी, वावी, हॉटेल वनराई, पोहेगांव, दुशिंगवाडी, मलढोण फाटा, सायाळे, जवळके, डो-हाळे, इ. ठिकाणी पालखी मंडप, वीजव्यवस्था व पाणी व्यवस्था करणेत यावी.

**१५) भक्तांची निवास व्यवस्था :-** संस्थानचे साईप्रसाद नं.१ व नं.२,धर्मशाळा नं.२, भक्तनिवासस्थान, शैक्षणिक संकुलाचे इमारतीतील वर्ग इ. इमारतीमधून तसेच धर्मशाळा व न.भ.निवासस्थान परिसरात स्वतंत्र मंडप टाकून भक्तांची निवास व्यवस्था करण्यात यावी.

**१६) कुस्त्या हंगामा :-** श्री रामनवमी उत्सवात कुस्त्यांचा हंगामा गांवक-यां मार्फत भरविण्यात येतो. यावर्षी कुस्त्यांसाठी रुपये ७५,०००.०० ( अक्षरी रुपये पंच्याहत्तर हजार) मात्र खर्चास मंजूरी देण्यात आली.

**१७) पाणीपुरवठा :-** पाटबंधारे खात्यास उत्सवकाळात कॅनॉल चालू ठेवणे बाबत विनंती करण्यात यावी, नियमित पाणीपुरवठा राहिल, याची व्यवस्था करण्यात यावी.

**१८) कार्यक्रमाची सांगता :-** गोपाळ काल्याचे कीर्तनाने उत्सवाची सांगता होईल. काल्याचे कीर्तन निमंत्रित कीर्तनकार करतील.

**१९) खर्चाचे अंदाज पत्रक :-** श्री रामनवमी उत्सव - २००७ च्या खर्चाकरिता एकूण रुपये **६०,००,०००.००** मात्र एवढी आर्थिक तरतूद मान्य करण्यात आली.(कार्यवाही-प्रशासन शाखा,वशी-०५)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. १६** **नवीन फ्रँकिंग मशिन खरेदी करणेबाबत**

**निर्णय क्र.१२७** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडीचे प्रशासन शाखा जावक विभागाकरीता संस्थानचे कार्यालयीन कामकाजाचे टपाल शिरडी पोष्ट ऑफीस कार्यालयामार्फत पाठविले जाणारे टपाल संस्थानचे फ्रँकिंग मशिनवर फ्रँकिंग करुन पाठविले जाते. याकामी सन १९९७ मध्ये एसकॉम व्हॉसलर कंपनीचे,२२० प्लस मॉडेलचे फ्रँकिंग मशिन, मे.कोरस इंडिया लिमिटेड पुणे यांचेकडून रुपये-२,९०,७००/- मात्र इतक्या रक्कमेस खरेदी करण्यात आलेले असून सदर मशिनची रक्कम डिपॉझिट करण्याची क्षमता रुपये-९९ लाख इतक्या रक्कमेची आहे. सध्या या मशिनमध्ये वेळोवेळी ४ लाख ते ५ लाख रुपयापर्यत डिपॉझिट करीत आहोत. सदर मशिनचा ताशी वेग ६००० टपाल फ्रँकिंग करण्याचा असून आज अखेर पर्यत सदर मशिनवर रुपये- ३,९१,३३,२८४/- (अक्षरी रुपये- तीन कोटी, एक्यान्नो लाख, तेहतीस हजार, दोनशे चौऱ्यांऐशी ) मात्र रक्कमेचे टपाल फ्रँकिग करण्यात आलेले आहे. त्यावर शिरडी पोष्ट कार्यालयातून शेकडा रुपये- ३% या दराने कमिशन संस्थानला देण्यात येत असून आज अखेर पर्यत रुपये- ११,७३,९९९/- (अक्षरी रुपये- अकरा लाख, त्र्याहत्तर हजार, नऊशे नव्यान्नो ) मात्र

इतके कमिशन मिळाले आहे. सदर मशिन हे १० वर्षापुर्वीचे जुने झालेले असून त्या कंपनीचे मॉडेल आता बंद झालेले आहेत.सदर मशिन वांरवार नादुरुस्त होत असून, त्याचे स्पेअर्स पार्टस् सध्या कंपनीकडे उपलब्ध नसल्याने मशिन दुरुस्त करण्यात बराच कालावधी लागतो. त्यामुळे संस्थानचे दैंनदिन कामकाजात व्यत्यय निर्माण होऊन टपाल पाठविणेस उशिर होतो.

सन १९९७ मध्ये संस्थानचे भक्तमंडळ सभासद संख्या ३५ ते४० हजार या दरम्यान होती.हीच सभासद संख्या आज अखेर १ लाख २५ हजार इतकी झालेली आहे. या भक्तमंडळाचे सभासंदाना वर्षातून तीन उत्सवांच्या निमंत्रण पत्रिका व उत्सव झालेनंतर उदीप्रसाद पाठवावा लागतो. म्हणजेच साधारणतः अंदाजे ७ लाख ५० हजार टपाल फ्रँकिंग एक वर्षात करावे लागते.

तसेच संस्थानला मनिऑर्डर,चेक, डि.डी., टपालव्दारे देणगी पाठविणारे भक्तांची संख्या मोठया प्रमाणात वाढली असून, या भक्तांना पैसे मिळाल्याची पोहोच पावती व उदीप्रसाद टपालव्दारे पाठवावा लागतो. याची दैनंदिन संख्या सध्या ९०० ते १००० एवढी होते.

याशिवाय भक्तांना पोष्टाव्दारे फोटो-पुस्तके पाठविणे, गरजू भक्तांना वैद्यकीय अनुदानाचे धनादेश पाठविणे,दैंनदिन कार्यालयीन कामकाजाचे टपाल पोष्टाने पाठविणे इत्यादीसाठी साधारणतः अंदाजे ३०० ते ३५० टपाल फ्रँकिंग करावे लागते.

म्हणजेच उत्सव काळात दररोज साधारणतः अंदाजे ३ ते ४ हजार टपाल फ्रँकिंग करावे लागते. सध्या असणारे फ्रँकिंग मशिन १० वर्षापूर्वीचे जुने असून त्याचे तंत्रज्ञानही जुने झालेले आहे. त्यामुळे ते नादुरुस्त झाल्यास ते दुरुस्त करण्यासाठी वेळे बरोबरच दुरुस्ती खर्च मोठया प्रमाणावर होतो. त्यामुळे नविन फ्रँकिंग मशिन खरेदी करणे अत्यंत गरजेचे व आवश्यक आहे.

सध्या बाजारात मे.पिटनी बोस, मे.कोरस न्यु पोष्ट, मे. मोदी जी.बी.सी., मे.किलबर्न या नामांकित कंपनीचे मशिन कार्यरत असून उत्पादक कपंन्याकडून /अधिकृत विक्रेत्यांकडून ताशी १० ते १२ हजार पाकिटे फ्रँकिंग करण्याची क्षमता, व नविन अत्याधुनिक सुविधा व शासन मान्यता असलेल्या कंपनीचे पोष्टल फ्रँकिंग मशिन विहीत पध्दतीने दरपत्रक मागवून खरेदी करता येईल.

तरी आता संस्थानच्या वाढत्या कामाचा व्याप लक्षात घेता,व साईभक्तांना वेळेवर उत्सव निमत्रंण पत्रिका व उदीप्रसाद, मनिऑर्डर उदीप्रसाद पाकिटे व दैंनदिन टपाल वेळेवर पाठविणे करीता अंदाजे रुपये- ३,५०,०००/- (अक्षरी रुपये- तीन लाख, पन्नास हजार ) मात्र इतक्या किंमतीचे नामांकित कंपन्यांचे फ्रॅकिंग मशिन कोटेशन्स मागवुन खरेदी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्रशासनशाखा-जावक विभाग/अधिक्षक,खरेदी विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १७** **माहिती तंत्रज्ञान विभागाकडील तांत्रिक कामकाजासाठी मानद स्थानिक तांत्रिक सल्लागार म्हणून श्री.विजय नायडू,कोपरगाव यांचे नेमणूकीस मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.१२८** (अ)कार्यालयीन संगणकीकरण व नियोजित रुग्णालयांच्या संगणकीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. या संगणकीकरणांच्या प्रकल्पांसाठी वेळोवेळी संगणकीय यंत्रसामुग्री खरेदी करणे, संगणकीय कार्यप्रणाली विकसित करणे आदि कामे पार पाडावी लागतात. ही कामे सुरळीतपणे होण्याच्या दृष्टीने संस्थानमधील संगणकीकरणासंबंधित प्राप्त परिस्थितीची संपूर्ण माहिती असणारे तांत्रिक अर्हता उपलब्ध असलेले मनुष्यबळ संस्थान आस्थापनेकडे खूपच कमी आहे. तसेच संगणक क्षेत्रातील बाजारपेठेत उपलब्ध असलेल्या संगणकीय उत्पादनांची माहिती व दर्जा आपल्याकडे त्वरीत उपलब्ध होत नाही. यादृष्टीने संगणकीकरणाचे प्रकल्प व्यवस्थितरित्या कार्यान्वीत व्हावे म्हणून प्रकल्पाची कार्यवाही सुरु असतांना तसेच आवश्यक तेथे तांत्रिक सल्ला-तथा-अभिप्राय तात्काळ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने, विशेषतः संगणकीय कार्यप्रणालींचे झपाटयाने होत असलेले अद्यायवतीकरण, बाजारातील उपलब्धता व गुणवत्तेबाबत सखोल ज्ञान असणारा आणि विश्वासू व प्रामाणिक अशा साईभक्त-स्थानिक सल्लागाराची गरज असल्याने, मा.व्यवस्थापन मंडळ सभा दिनांक ०४ जानेवारी,२००४ मधील निर्णय क्रमांक ३२ नुसार, श्री.विजय पंढरीनाथ नायडू, कोपरगांव यांची स्थानिक पातळीवरील मानद तांत्रिक सल्लागार म्हणून दोन वर्षासाठी नेमणूक करण्यात यावी, तसेच श्री.विजय नायडू यांना रुपये ३०००/- मात्र प्रतीमाह एवढे नाममात्र मानधन देण्यात यावे असा निर्णय झ ाालेला होता. त्यानुसार श्री.नायडू यांची या ध्मानद स्थानिक तांत्रिक सल्लागार ङ पदावर दोन वर्षासाठी नेमणूक करण्यात आलेली होती. ही नेमणूकीची मुदत दिनांक ०३ जानेवारी,२००६ रोजी संपलेली असल्याने, मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०४ फेब्रुवारी, २००६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ५० नुसार माहे जानेवारी, २००६ पासून पूढील दोन वर्षांसाठी नेमणूकीची मुदत वाढविण्यात आली होती. सदर कालावधी माहे जानेवारी, २००८ मध्ये संपुष्टात येत आहे.

(ब) श्री.विजय नायडू, कोपरगांव हे संस्थानला मागील १५ वर्षांपासून संस्थानमधील संगणकीकरणाचे कामामध्ये व संबंधीत यंत्रसामुग्रीच्या दुरुस्ती-देखभालीसाठी तांत्रिक सल्ला व सक्रीय

सहकार्य देत आहेत. श्री.विजय नायडू स्वतः व त्यांचे कुंटुंबिय हे निस्सीम साईभक्त असलेने आतापर्यन्त त्यांनी सदरील काम विनामूल्य केलेले आहे. संस्थानमधील संगणकीकरणाबाबत आतापर्यन्त आलेल्या दैनंदिन व विशेष प्रसंगी आलेल्या अडचणी / समस्या सोडविण्यासाठी बाहेरील कोणत्याही तांत्रिक संस्था / व्यक्तींच्या सेवा सर्वसाधारणपणे विकत घेतलेल्या नसून, आत्तापर्यन्त आलेल्या अडचणी तसेच कार्यालयीन संगणकीकरण प्रकल्पासाठी श्री.नायडू यांनी तत्परतेने मदत केलेली आहे. त्यामुळे संस्थान व्यवस्थापनाची मोठया प्रमाणावर आर्थिक बचत झालेली आहे. श्री. विजय नायडू हे श्री साईंचे निस्सीम भक्त असल्याने त्यांना देऊ केलेले मानधन त्यांनी न स्वीकारता संस्थानला विनामोबदला सेवा पुरविल्या आहेत.

उपरोक्त परिच्छेदांमधील विवेचनानुसार, श्री. विजय नायडू, कोपरगांव यांच्या "मानद स्थानिक तांत्रिक सल्लागार" म्हणून नेमणूकीस माहे जानेवारी,२००८ पासून पुढील दोन वर्षासाठी मुदत वाढ देण्यात देण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-आय.टी. विभागप्रमुख/अधिक्षक,आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. १८** **श्रीसाई दैनंदिनी-२००८ चे छपाईकामाचा शिर्डी पोहोच पुरवठ्याबाबत.**
**निर्णय क्र.१२९** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी प्रकाशित श्री साई दैनंदिनी २००८ छपाईकामी मे.महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे यांना जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/१८१८९/२००७ दि.१२/११/२००७ अन्वये श्री साई दैनंदिनी ९०,००० नगांचा छपाई कामाचा पुरवठा आदेश देण्यात आला आहे. उपरोक्त छपाई आदेशात नमुद केलेप्रमाणे एकूण दैनंदिनी छपाईतील पहिला टप्पा १५ डिसेंबर २००७ पासून माहे फेब्रुवारी २००८ पर्यंत टप्प्या टप्प्याने छपाई कामाचा संपूर्ण पुरवठा करणेबाबत कळविले आहे. त्यांना दैनंदिनी छपाई कामाचे तृतीय फायनल प्रूफ दि.३०.११.२००७ रोजी तपासून सदर दिवशी त्यांचे शिर्डी भेटीचे वेळी जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/१९०७६/२००७ दि.३०.११.२००७ रोजी समक्ष ताब्यात देवून दैनंदिनी छपाईचे काम त्वरीत चालू करुन वेळेत पुरवठा करणेबाबत कळविण्यात आले. तसेच जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/१९५६०/२००७ दि.१२.१२.२००७ नुसार त्यांना खालील तपशिलाप्रमाणे सहा टप्प्यात एकूण दैनंदिनी छपाई कामाचा पुरवठा करणेबाबत कळविण्यात आले आहे.

| अ.नं. | तपशिल | शिर्डी पोहोच करावयाचा पुरवठा |
|---|---|---|
| ०१ | दि.१५.१२.२००७ | १५,००० नग |
| ०२ | दि.२५.१२.२००७ | २५,००० नग |
| ०३ | दि.०७.०१.२००८ | २०,००० नग |
| ०४ | दि.२३.०१.२००८ | १५,००० नग |
| ०५ | दि.०२.०२.२००८ | १०,००० नग |
| ०६ | दि.२०.०२.२००८ | ५,००० नग |
| | एकूण नग | ९०,००० नग |

उपरोक्तप्रमाणे संबंधीत छपाई प्रेसधारक महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे यांना कळविण्यात आले आहे. तथापी वर दर्शविल्याप्रमाणे छपाई आदेशानुसार संबंधीत प्रेसधारकांनी दि.१५.१२.२००७ रोजी दैनंदिनी छपाई कामाचा पुरवठ्याचा प्रथम टप्पा शिर्डी पोहोच करावयास पाहिजे होता, याबाबत दैनंदिनी २००८ छपाईसंबंधीत चौकशीकामी मा. श्री वाबळे साहेब, विश्वस्त यांचे सोबत मी स्वतः दि.१४.१२.२००७ रोजी प्रत्यक्ष पुणे येथे महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे यांचेकडे गेलो होतो, त्यावेळी दैनंदिनी छपाई कामाची प्रत्यक्ष चालू असलेले कार्यवाहीची पहाणी करुन दैनंदिनीचा शिर्डी पोहोच पुरवठ्याबाबत चौकशी केली असता, संबंधीत प्रेसचे सहा.व्यवस्थापन श्री सातपूते व सरव्यवस्थापिका सौ बागाईतकर यांनी १०,००० नगांचा प्रथम पुरवठा दि.२०.१२.२००७ रोजी शिर्डी पोहोच करणार असल्याचे कबुल केले तदनुसार दि.१९.१२.२००७ रोजी दुरध्वनीद्वारा श्री सातपुते यांचेशी संपर्क साधला असता, त्यांनी दि.२०.१२.२००७ रोजी रात्री छपाई झालेल्या दैनंदिनी ५,००० नग गाडीत लोड करुन दि.२१.१२.२००७ रोजी शिर्डी पोहोच करणेबाबत कबुल केले होते. तथापी त्यांचेकडून दि.२१.१२.२००७ रोजीही पुरवठा न झाल्याने दि.२२.१२.२००७ रोजी संबंधीत प्रेसच्या सरव्यवस्थापिका सौ बागाईतकर यांचेशी दुरध्वनीद्वारा सकाळी १० वाजता दैनंदिनी शिर्डी पोहोचबाबत चौकशी केली असता, त्यांनी दि.२२.१२.२००७ रोजी दैनंदिनी ५,००० नग गाडीत रात्री लोड करुन दि.२३.१२.२००७ रोजी शिर्डीस सकाळी ११ वाजेपर्यंत पोहोच करणेबाबत कबुल केले. तदनुसार त्यांचेकडून त्यांनी कबुलकेलेप्रमाणे दैनंदिनी छपाईकामाचा अपेक्षित पुरवठा झालेला नसून, दि.०४.०१.२००८ अखेर खालील तपशिलाप्रमाणे दैनंदिनी नगांचा कमी प्रमाणात पुरवठा झालेला आहे.

| अ.नं. | तपशिल | शिर्डी पोहोच पुरवठा |
|---|---|---|
| ०१ | दि.२३.१२.२००७ | १६०० नग |

| | | |
|---|---|---|
| ०२ | दि.२४.१२.२००७ | २२०० नग |
| ०३ | दि.२६.१२.२००७ | १८४० नग |
| ०४ | दि.२९.१२.२००७ | २७२० नग |
| ०५ | दि.०२.०१.२००८ | ९६० नग |
| ०६ | दि.०४.०१.२००८ | ३६०० नग |
| | एकूण पुरवठा | १२९२० नग |

उपरोक्त तक्त्यातील दर्शविल्याप्रमाणे दि.०४.०१.२००८ अखेर एकूण दैनंदिनी २००८ छपाई आदेशातील फक्त १२,९२० नगांचा म्हणजे फक्त १४% पुरवठा झालेला आहे. सदरच्या कमी झालेल्या पुरवठ्यामुळे माहे डिसेंबर २००७ मध्ये श्री दत्तजयंती व नाताळ निमित्त तसेच नवर्षाच्या आगमनानिमित्त भक्तांची मोठ्याप्रमाणात गर्दी झाल्याने भक्तांना अपेक्षित पुरवठ्या अभावी दैनंदिनी विक्रीस उपलब्ध करुन देता आल्या नाहीत. त्यामुळे भक्तांमध्ये नाराजी निर्माण झाली जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/२०५२१/२००७ दि.३०.१२.२००७ नुसार माहे ३१ डिसेंबर २००७ पर्यंत किमान ४०,००० दैनंदिनी नगांचा म्हणजे एकूण दैनंदिनी नगांपैकी ४४% नगांचा पुरवठा करणेबाबत कळविले होते, तथापी यापैकी त्यांचेकडून मात्र दि.०४.०१.२००८ अखेर फक्त १२,९२० नगांचाच म्हणजे १४% पुरवठा झाला आहे. याबाबत दैनंदिनी छपाई कामाचा शिर्डी पोहोच पुरवठा करणेबाबत संबंधीत प्रेसचे सहा. व्यवस्थापक श्री सातपुते व सरव्यवस्थापिक सौ.बागाईतकर यांचेशी दि.१९.१२.२००७ पासून दि.०३.०१.२००८ पर्यंत दररोज वेळोवेळी दुरध्वनीद्वारा संपर्क साधूनही दैनंदिनीचा विक्रीसाठी वेळेत अपेक्षित पुरवठा होऊ शकला नाही. याप्रमाणे वेळेत पुरेसा अपेक्षित पुरवठ्याअभावी भक्तांचे प्रत्यक्ष व दुरध्वनिद्वारा दैनंदिनीविषयक होणा-या सततपणे मागणीस तोंड देणे भाग पडत आहे.

मे. महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे यांचेकडून प्राप्त दैनंदिनीचा पुरवठा पहाता त्यांना दि.१५.१२.२००७ पासून दैनंदिनी पाठविणेबाबत कळविण्यात आले होते. परंतु त्यांचेकडून कळविण्यात आलेल्या नियोजनानुसार दैनंदिनीचा पुरवठा न झाल्याने दैनंदिनीबाबत त्यांचेकडून दि.२३.१२.२००७ ते ०४.०१.२००८ अखेर फक्त १२,९२० नग दैनंदिनींचा १४ दिवसात दिवसाआड पुरवठा झालेला आहे.

वरील प्राप्त दैनंदिनींचा आवक लक्षात घेता त्यांचेकडून दि.२०.०२.२००८ अखेर फक्त ४५,००० ते ५०,००० दैनंदिनी प्राप्त होतील असे दिसून येत आहे. तरी त्यांचेकडून उर्वरित ४०,००० नग दैनंदिनी स्वीकारावयाच्या किवा कसे याबाबत याबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे येथे विश्वस्त मा.श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे व प्रकाशने विभागप्रमुख यांनी प्रत्यक्ष जाऊन व दैनंदिनी छपाईबाबत पहाणी करुन अंतिम निर्णय घेण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. १९** **नविन प्रसादालयाकरिता भांडी खरेदीबाबत.**
**निर्णय क्र.१३०** नविन प्रसादालयाचे बांधकाम लवकरच पुर्ण होत आहे. नविन प्रसादालयात साईभक्तांना प्रसाद भोजन तयार करणे व भोजन वितरीत करणेकामी लागणारे इम्पोर्टेड, इंडियन इक्वीपमेंट, अलाईड सिस्टीम खरेदीसाठी पुरवठा आदेश पारित झालेले आहेत. तसेच फेब्रीकेटेड किचन इक्वीपमेंट खरेदीसाठी येत्या मा.व्यवस्थापन समिती सभेमध्ये निर्णय होणार आहे.

सध्याचे प्रसादालयात प्रसाद भोजनकामी साईभक्तांची बैठक व्यवस्था १००० आहे. नविन प्रसादालयाची बैठक व्यवस्था सुमारे ४००० व्यक्तींची आहे. म्हणजेच ४ पट आहे. त्यामुळे गर्दीचे वेळी एकाच बैठकीत ४ पट साईभक्त प्रसाद भोजनाचा लाभ घेउ शकतील अशी व्यवस्था केलेली आहे. त्यानुसार त्या पटीत प्रसाद भोजन बनवावे लागेल.

सध्याचे प्रसादालयातील भांडी ही सुमारे ५ ते १० वर्षापूर्वीचे आहेत. त्यामुळे त्यातील बरेच भांडयांचा वापर होउन वाकडे-तिकडे, चेपलेले आहेत. त्यामुळे वापरणे योग्य राहीलेले नाहीत. काही प्रमाणात चांगले आहेत ते भोजन घेणा-या भक्तांचे तुलनेत अत्यंत तोकडे आहेत. त्यामुळे प्रसाद भोजन घेणा-या साईभक्तांचे संख्येच्या तुलने प्रमाणे भांडी खरेदी करणे आवश्यक आहे.

तरी नविन प्रसादालयाकरीता भांडी खरेदीकामी अंदाजे रु.८८,८५,०५०/- चे खर्चास व वृत्तपत्रात जाहीरात देउन निवीदा मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (अधिक्षक,प्रसादालय विभाग)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. २०** **छायचित्रे व चित्रीकरण करणे बाबत**
**निर्णय क्र.१३१** श्रींचे दर्शनासाठी महत्वाच्या व अतिमहत्वाच्या व्यक्ती येत असतात. आलेल्या महत्वाच्या व अतिमहत्वाच्या व्यक्तींच्या भेटीप्रसंगी वृत्तसंकलनासाठी विविध वृत्तपत्रांचे व वृत्तवाहिन्यांचे प्रतिनिधी

येत असतात. सदरचे प्रतिनिधी मान्यवरांचे दर्शन घेतेवेळीचे छायाचित्रे काढणेकामी व चित्रीकरण करणेकामी समाधी मंदिरात जातात. त्यामूळे तेथे गर्दी होवून ब-याच जणांना व्यवस्थितपणे छायाचित्रे काढता येत नाहीत किंवा चित्रीकरण करता येत नाही. गर्दीत भक्तानाही छायाचित्रकारांचा त्रास होतो. अनेक वाहिन्यांचे प्रतिनिधी एकाचवेळी मंदिरात आल्याने भक्तांना दर्शनरांगेत त्रास होतो व संदेशही वेगळा जातो.

त्याअनुषंगाने मा. अध्यक्ष सो. यांनी, "यापूढे मान्यवरांच्या शिर्डी भेट प्रसंगी छायाचित्रे अथवा चित्रीकरण करणेकामी संस्थानच्या ध्वनीक्षेपण विभागामार्फत पूर्णवेळ एक कर्मचारी नेमण्यात यावा. मंदिरामध्ये कोणत्याही वृत्तवाहिनीच्या व वृत्तपत्राच्या प्रतिनिधींना चित्रीकरण अथवा छायाचित्रे काढण्यास परवानगी देण्यात येवू नये. मात्र संस्थानचे छायाचित्रकाराने काढलेली छायाचित्रे व केलेले चित्रीकरण प्रसिध्दीकामी वृत्तपत्राचे कार्यालयांना तात्काळ ई-मेल करण्याची व वृत्तवाहिन्यांचे प्रतिनिधींना चित्रीकरणाची सीडी लागलीच उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करावी", असे निर्देश दिलेले आहेत.

तरी मा. अध्यक्ष महोदय यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे तात्काळ कार्यवाही सुरू करणेकामी ध्वनीक्षेपण विभागातील एक कर्मचारी छायाचित्रे व चित्रीकरण करणेकामी पूर्णवेळ नेमणेबाबत व त्यांचे व्यतिरिक्त जर कोणी छायाचित्रे घेत असतील किंवा चित्रीकरण करत असतील तर त्यांना संरक्षण विभागाने सदरकामी मज्जाव करावा असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. २१** **श्री साई प्रसादालयाकरीता गॅस सिलेंडर्स मॅनिफोल्ड शेड उभारणी करणेबाबत**

**निर्णय क्र.१३२** दिनांक ३१.०३.२००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.२४९ (०९) अन्वये प्रसादालयासाठी बल्क गॅस यंत्रणेबरोबरच गॅस सिलेंडर्स मॅनिफोल्ड यंत्रणा असणे गरजेचे असल्यामूळे समृध्दी इंण्डेन, राहाता यांचेकडून १८० सिलेंडरची दोन मॅनीफोल्ड यंत्रणा उभारणेस मान्यता देण्यात आलेली आहे. त्याबाबत संस्थानने जा.नं. एसएसएस-वशी-प्रसाद-७२२३/२००७ दिनांक ८.५.२००७ चे पत्रान्वये मॅनिफोल्ड उभारणी करुन देणेबाबत कळविले आहे. त्यासोबतचे नकाशात प्रत्येकी ५२ सिलेंडरच्या सहा खोल्या दर्शविलेल्या आहेत. म्हणजेच एकूण ३१२ सिलेंडर्सची व्यवस्था प्रस्तावित आहे.

वरीलप्रमाणे ३१२ सिलेंडर्सचे मॅनिफोल्डस व्यवस्थेसाठी स्लॅब अथवा पत्राशेडचे बांधकाम करणेसाठी प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार रुपये ७.५० लक्ष मात्र इतका खर्च येईल . त्याबरोबरच येथील गट नं. ८०,८५ मधील जागेभोवती राहिलेल्या भागात कंम्पाऊंड भिंतीचे बांधकाम करणे आवश्यक असून त्यासाठी अंदाजे रुपये ८.२० लक्ष मात्र इतका खर्च येईल. अशाप्रकारे मॅनिफोल्ड शेडस् व कंम्पाऊड भिंत बांधकामासाठी एकूण अंदाजे रुपये १५.७० लक्ष मात्र खर्च अपेक्षित असून त्याकामी आर्किटेक्टची नेमणूक करुन त्यांचेमार्फत प्लॅन,एस्टिमेट व निविदा तयार करुन वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे निविदा मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी शक्ती परमार असोसिएटस,मुंबई यांची आर्किटेक्ट म्हणून सेवा घेणेत यावी असे ठरले.कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. २२** **शिरडी नगरपंचायत शिर्डी विशेष स्वच्छता कर व आरोग्य प्रदुषण नियत्रण कर (पथकर )बाबत**

**निर्णय क्र.१३३** शिरडी येथे साईबाबांच्या भक्तांची वाहने थांबवून त्यांचेकडून पथकर वसूल करण्यात येऊ नये, अशी विनंती नगरपंचायतीकडे संस्थानचे पत्र क्रमांक एसएसएस/वशी ०२/१३२१०/२००४ दिनांक ३१/१२ /२००४ चे पत्राने करण्यात आली आहे. याबाबत शिरडी नगरपंचायत यांनी दिनांक ११/०७/२००५ चे पत्राने टोल नाक्यापासून प्रती वर्षी मिळणा-या रक्कमेएवढी रक्कम त्यांना मिळावी. सन २००४-२००५ साली रुपये ४५,६१,९९० /- एवढी रक्कम त्यांना मिळाली तेवढी रक्कम त्यांना प्रतिवर्षी मिळावी व प्रतिवर्षी त्यांत २० % वाढ करण्यात यावी, ५ वर्षाची आगाऊ रक्कम भरावी. अश आशयाचे पत्र इकडेस पाठविले आहे. संस्थानकडून निश्चित धोरण त्यांना कळविल्यास मंजूरीसाठी शासनांस त्यांनाही प्रस्ताव पाठविता येईल असेही त्यांनी कळविले आहे. सदर प्रकरणी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६/०८/२००५ व दिनांक १८/०९/२००५ चे सभेत विषय क्रमांक ५० निर्णय क्रमाक ४३८ झालेला आहे. शिरडी नगरपंचायतीस निव्वळ येणारे उत्पन्न हिशोबी धरून त्याबाबतची माहिती प्राप्त करुन घेऊन त्या आधरे निव्वळ येणारे उत्पन्नाचे अनुषंगाने अनुदान ठरवावे लागेल. असा प्रस्ताव दिनांक १८/०९/२००५ चे सभेत मांडण्यात आला होता. त्याबाबत सविस्तर चर्चा होऊन विशेष स्वच्छता कर व आरोग्य प्रदुषण नियंत्रण कर बंद करणेसाठी नगरपंचायत शिरडी यांना द्यावयाचे अशंदानाबाबत प्रस्तावास तत्वतः मान्यता देण्यात आली. याकामी शिरडी नगरपंचायत यांना द्यावयाचे रक्कमेबाबत मा. जिल्हाधिकारी , अहमदनगर व

स्थानिक विश्वस्त यांचे संमतीने याबाबत अंतिम निर्णय घ्यावा असे ठरले आहे. सदर ठरावांची प्रत सोबत जोडली आहे.

उपरोक्त ठरावांस अनुसरून दिनांक ०१/१०/२००५ रोजीचे सल्लागार परिषद सभेत सदरचा विषय सादर करण्यात आला होता. त्यावर सविस्तर चर्चा होऊन प्रस्तावास तत्वता मान्यता देण्यात आली आहे. शिरडी येथे श्री साईबाबांचे दर्शनासाठी येणार साईभक्तांकडून शिरडी नगरपंचायत यांनी विशेष स्वच्छता व आरोग्य प्रदुषण नियंत्रण कर आकारु नये. याकरिता शिरडी नगरपंचायत यांनी मागणी केलेली रक्कम प्रतीवर्षी रुपये ३९,६१,९१०/- पुर्णांकित रक्कम रुपये ४०,००,०००/- ( अक्षरी रुपये-चाळीस लाख मात्र ) प्रती तीन महिन्यास रुपये- १०,००,०००/- ( अक्षरी रुपये दहा लाख मात्र ) याप्रमाणे आगाऊ रक्कम शिरडी नगरपंचायतीस देण्यात यावी, असे मा. जिल्हाधिकारी , अहमदनगर यांनी सांगितले. सर्वानुमते त्यास मान्यता देण्यांत आली. सदरहू विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा, त्यानंतर याकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी. शासनाचे मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत येईल असे ठरले. यास दिनांक ०५/११/२००५ चे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्रमांक ६५१ (०६) मान्यता देण्यात आली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिरडी अधिनियम - २००४ चे कलम २१(२) (सी ) चा विचार करता नगरपंचायत शिरडीस अनुदान देणेबाबत शासनाची परवानगी घेणे जरुरीचे आहे.

त्याप्रमाणे संस्थानने जा.क्रं. १३०५४ दिनांक ०९/११/२००५ ने शासनाची परवानगी मिळणेबाबत प्रस्ताव दाखल केलेले आहे. अद्याप सदर परवानगी मिळालेली नाही. त्याबाबत संस्थानचे अध्यक्ष मा. श्री. ससाणे साहेब तसेच नगरपंचायतीचे माजी अध्यक्ष मा. श्री. कैलास कोते प्रयत्नशील आहेत. शासनाकडून परवानगी प्राप्त होणेवर आहे.

**यापूर्वी संस्थानने मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे खालीलप्रमाणे रक्कम अदा केली आहे.**

| | |
|---|---|
| **१)** नोव्हेंबर- २००५, डिसेंबर-२००५, जानेवारी-२००६ | रुपये १०,००,०००-०० |
| **२)** फेब्रुवारी-२००६, मार्च-२००६, एप्रिल- २००६ | रुपये १०,००,०००-०० |
| **३)** मे-२००६, जुन-२००६, जुलै -२००६ | रुपये १०,००,०००-०० |
| **४)** ऑगस्ट-२००६,सप्टेंबर-२००६ ऑक्टोंबर-२००६ | रुपये १०,००,०००-०० |
| ५) नोव्हेंबर -२००६, डिसेंबर २००६, जानेवारी २००७ | रुपये १०,००,०००-०० |
| **एकूण रुपये** | **५०,००,०००-००** |

मा. व्य.समितीचे दि ०६/०१/२००७ चे आयत्या वेळेचा विषय नं ३८ निर्णय क्रमांक १०६ ठराव खालील आशयाचा झालेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन शिर्डी नगरपंचायत यांना ऑगस्ट,सप्टेबंर ऑक्टोबर २००६ ची रक्कम रुपये १०,००,०००/- मात्र शासनाचे मंजूरीस अधिन राहून अदा करणेस मान्यता देण्यात येत आहे. तसेच यापुढेही रक्कम देय झालेनंतर त्यांना देण्यात यावी असे ठरले. आहे.

परंतु शिर्डी नगरपंचायत,शिर्डी विशेष स्वच्छता कर व आरोग्य प्रदुषण नियंत्रण कर वसूली थाबविण्यात आल्याबाबत औपचारिक आदेशांची दिनांक दिनांक २४/०१/२००७ च्या पत्रान्वये शासनाने नगरपंचायतीकडे मागणी केली आहे. सदर आदेश वा त्यासंबंधीच्या कार्यवाहीचा तपशिल शासनास शिर्डी नगरपंचायतीकडून प्राप्त होईपर्यंत संबंधीत कराची अदायगी शिर्डी नगरपंचायतीस करण्यात येऊ नये असे शासनाने १४.३.२००७ चे पत्राने इकडील कार्यालयास कळविले आहे. सदर बाब विचारात घेता नगरपालिकेस जानेवारी २००७ नंतरचे रक्कम अदाई केलेली नाही.

आज रोजी नगरपंचायतीलचे मा.अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य यांनी मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेत उपस्थित राहून सोबतचा दिनांक १०.१.२००८ चा कर मागणीचा अर्ज सादर केला. स्वच्छता व आरोग्य प्रदूषण कर मिळावा अशी आग्रही विनंती केली. सदर कराअभावी नगरपंचायतीचे कामे रोखली आहेत पगारासाठीही रकमेची आवश्यकता आहे इत्यादी बाबी सांगितल्या.

शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी दिनांक १०/०१/२००८ रोजीचे पत्राव्दारे (त्यासोबत शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी स्थायी समिती दि ३१/१२/२००७ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त जोडलेले आहे.) आजअखेर म्हणजे डिसेंबर २००७ अखेर पर्यंतची विशेष स्वच्छता कर व आरोग्य प्रदुषण नियंत्रण कर ( पथकर ) राहिलेल्या रक्कमेची मागणी केलेली आहे. संस्थानने बंद केलेले अनुदान शासनाने मंजूरी न दिलेस सदर अनुदान मालमत्ता करापोटी मंजूरी घेऊन वर्ग करणेत येईल असे पत्रात म्हटले आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे मंजूरीने यापूर्वी नगरपंचायतीस रक्कम अदा केली आहे. मा. विधी व न्याय खात्याकडून प्रकरणी मान्यता येत आहे. रिट पिटीशन नं ४६४०/२००७ श्री.शेळके विरुध्द महाराष्ट्र शासन मध्ये अर्जदाराने नगरपंचायत, शिर्डी यांना रक्कम अदाईबाबत मुद्दा उपस्थित केला आहे. नगरपंचायतीने सदरचा टॅक्स व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६/०८/२००५ चे ठरावास

अनुसरून नगरपंचायतीस नुकसान भरपाई देणेचे अटीवर भक्तांकडून टॅक्स आकारणेचे थांबवले असा मुद्या रिट पिटीशन मध्ये उपस्थित केला आहे.

तसेच छाननी समितीचे निर्देशानुसार संस्थानचे अधिनियम -४ चे कलम नं २१ (२) पोटकलम १ मध्ये निर्देश केलेल्या प्रयोजनासाठी पुरेशा तरतुदी केलेनतर व विश्वस्त व्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहिलेस अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरण योग्य उत्पन्नाच्या ३० टक्कपेक्षा अधिक नसेल येवढा भाग , समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल अशी तरतुद आहे.

मा.कोर्टातील रिट पिटीशन मध्ये अर्जदाराने टॅक्सबाबत सादर केलेले मुद्दे विधी व न्याय विभागाने नगरपालिकेकडून करआकारणी थांबविणेबाबतचे मागविणेत आलेले तपशील आदेश तो प्राप्त होई पावेतो कराची अदायगी करू नये असे इकडेस कळविणेत आलेले आहे त्याचा विचार करता तसेच छाननी कमेटी चे तरतुदी या बाबत विचार करता तसेच नगरपंचायत शिर्डी यांनी त्यांचे अर्जात नगरपंचायतीस अदाई झालेले रकमेस शासनाने मंजूरी न दिलेस सदर अनुदान रक्कम ही मालमत्ता करापोटी सभेची मंजूरी घेऊन वर्ग करणेस नगरपंचायतीची तयारी आहे. करिता या सर्व बाबी विचारात घेऊन नगरपंचायत शिर्डीस खालीलप्रमाणे विशेष स्वच्छता कर /आरोग्य कर ( नाके ) रक्कम अदाई करणेस मा.अध्यक्षांनी निर्देश केले आहेत.

| | |
|---|---|
| **१)** फेब्रुवारी- २००७ ,मार्च२००७ एप्रिल-२००७ | रुपये १०,००,०००-०० |
| **२)** मे-२००७, जुन-२००७, जुलै -२००७ | रुपये १०,००,०००-०० |
| **३)** ऑगस्ट-२००७,सप्टेंबर-२००७ ऑक्टोंबर-२००७ | रुपये १०,००,०००-०० |
| **४)** नोव्हेंबर-२००७ , डिसेंबर २००७ | रुपये ०६,६६,६६६-०० |
| **एकूण रुपये** | **३६,६६,६६६-००** |

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. तसेच शासनाकडूनही अद्याप मान्यता मिळालेली नाही. शिर्डी नगरपंचायतीची विनंती व अडचण लक्षात घेता पथकराची रक्कम त्यांना देण्यात यावी. शासनाने शिर्डी नगरपंचायतीस पथकर देण्यास मान्यता न दिल्यास नगरपंचायतीस देणे असलेल्या घरपट्टीतून/मालमत्ता करातून सदर रक्कम वसूल करण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही-विधी अधिकारी)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. २३** **लेंडीबागेत साईजप करणेस परवानगी मिळणेबाबत...**

**निर्णय क्र.१३४** श्रीमती पुनम खन्ना, न्यु दिल्ली यांचा दि.२९/१२/२००७ रोजीचा फॅक्स इकडील कार्यालयास प्राप्त झाला असुन त्यांनी दि.१०/०२/२००८ रोजी लेंडीबागेत **साई जप** नावाचा गायनाचा कार्यक्रम करणेस परवानगी मागितलेली आहे.

मागील वर्षापासुन श्री विकास मेहता हे श्री शिवनेर स्वामी यांची पुण्यतिथी कार्यक्रम साजरा करीत असून, त्यांचे इतर कार्यक्रम हे शिवनेर स्वामींचे आश्रमात करत असतात व मनोरंजनाचा कार्यक्रम फक्त संस्थान परिसरात करीत असतात. मागील वर्षीही त्यांनी गायनाचा कार्यक्रम लेंडीबागेत आयोजित केला होता त्यास परवानगी देण्यात आली होती. यावर्षीही त्यांनी त्याचप्रकारचा कार्यक्रम आयोजित केलेला असून मागील वर्षाप्रमाणे उपरोक्तप्रमाणे लेंडीबागेमध्ये दि. १०/०२/२००८ रोजी **साई जप** नांवाचा श्रीमती पुनम खन्ना, न्यु दिल्ली यांचा गायनाचा कार्यक्रम आयोजित करणेस परवानगी मागितलेली आहे, लेंडीबागेत गायनाचे कार्यक्रम करणेस संस्थान परवानगी देत नसते, तथापि एक विशेष बाब म्हणून **साई जप** गायन कार्यक्रम लेंडीबागेत दत्तमंदिरासमोर करणेस परवानगी देता येईल, त्यांची निवासव्यवस्था उपलब्धतेनुसार व नियमानुसार भाडे आकारुन करता येईल असे संबंधीतांना कळविता येईल. संस्थानमार्फत विद्युत व्यवस्था करता येईल. मंडप, बैठक व्यवस्था व ध्वनीक्षेपण व्यवस्था त्यांचे स्वतःच्या खर्चाने करणेस संबंधीतांना पत्राने कळविता येईल. तसेच त्यानुसार संबंधीत विभागांना आदेश काढता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्रशासन शाखा, वशी-०५)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. २४** **सिन्नर (मुसळगाव) औद्योगिक वसाहत येथील संस्थानचे पालखी थांबा बांधकामासाठी मागविण्यात आलेल्या फेर निविदांबाबत.**

**निर्णय क्र.१३५** साईभक्तांसाठी उपरोक्त विषयांकीत पालखी थांबा वास्तुचे बांधकाम ठेकेदार मे. साहेबराव कोकाटे ॲण्ड असो. यांचे असमाधान कारक बांधकाम प्रगतीमुळे त्यांचेकडून काढून उर्वरीत कामासाठी

वर्तमान पत्रात जाहिरात देवून नव्याने निविदा मागवणिस दि. २२/०९/२००७ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यता मिळाली आहे.

त्यानुसार सिन्नर येथील पालखी थांब्याचे बांधकाम करणेसाठी सदरच्या कामाचे आर्किटेक्ट निकम पा. ॲण्ड असो. यांचेकडून नव्याने उर्वरीत कामासाठी निविदा बनवण्यात आल्या आहेत. वर्तमान पत्रात विहीत पध्दतीने निविदा सूचना प्रसिध्द करुन दि. २१/१२/२००७ ते दि. ०३/०१/२००८ पर्यंत कोऱ्या निविदा विक्री करण्यात आली आहे. खालील चार ठेकेदार यांनी कोऱ्या निविदा खरेदी केल्याआहेत.

१. श्रुती कन्स्ट्रक्शन, सिन्नर
२. समर्थ कन्स्ट्रक्शन, नाशिक
३. अवीस कन्स्ट्रक्शन, नाशिक
४. मे.आर.एल.भुतडा, कोपरगांव

सिलबंद निविदा सादर करण्याची अंतीम मूदत दि. १०/०१/२००८ रोजी सकाळी १०.०० पर्यंत ठेवण्यात आली होती. विहित मूदतीत उपरोक्त पैकी चार ठेकेदार यांनी सिलबंद निवदा सादर केलेली आहे.

| अ.नं. | निविदा सादरकर्त्यांचे नांव |
|---|---|
| १ | श्रुती कन्स्ट्रक्शन, सिन्नर |
| २ | समर्थ कन्स्ट्रक्शन, नाशिक |
| ३ | अवीस कन्स्ट्रक्शन, नाशिक |
| ४ | मे.आर.एल.भुतडा, कोपरगांव |

उपरोक्त प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेपुढे समक्ष उघडणेत येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | निविदा सादरकर्त्यांचे नांव | निविदेतील दर | चर्चा/ वाटाघाटीनंतरचे दर |
|---|---|---|---|
| १ | श्रुती कन्स्ट्रक्शन, सिन्नर | १०.१०% अधिक | ०८.१०% अधिक |
| २ | समर्थ कन्स्ट्रक्शन, नाशिक | अपात्र | अपात्र |
| ३ | अवीस कन्स्ट्रक्शन, नाशिक | अपात्र | अपात्र |
| ४ | मे.आर.एल.भुतडा, कोपरगांव | १७ % अधिक | अनुपस्थित |

यावर सविस्तर चर्चा होऊन मे. श्रुती कन्स्ट्रक्शन, सिन्नर यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन यांना कार्यादेश देणेत यावा, असे ठरले.

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. २५** **शिर्डी येथील सर्व्हे नं. ०६ (आरक्षण क्र. ०८) मधील संस्थान बांधलेल्या नविन जि.प.शाळेतील इमारतीबाबत**

**निर्णय क्र.१३६** शिर्डी येथील सर्व्हे नं. ०६ (आरक्षण क्र. ०८) मधील जि.प.शाळा इमारतीचे बांधकाम दिनांक २६/०८/२००६ रोजी पूर्ण करण्यात आलेले आहे. दिनांक २८/०८/२००६ पासून या नूतन इमारतीत शाळेचे कामकाज सुरु झालेले आहे. दिनांक १०-११-१२/१२/२००७ या तारखांचे दै.सकाळ या वृत्तपत्राव्दारे शाळेबाबत बातमी छापून आली आहे की, 'सदोष इमारतीमुळे वेड लागण्याची वेळ आली आहे'. त्यावर गट शिक्षण अधिकारी, राहता व इमारतीचे आर्किटेक्ट श्री. चंद्रकांत कदम, नाशिक यांनी दिनांक १२/१२/२००७ रोजी शाळेला भेट दिली. तसेच दिनांक १३/१२/२००७ रोजी मा. विश्वस्त डॉ. गोंदकर सो., व मा. कार्यकारी अधिकारी सो., यांनी शाळेची पहाणी केली. आर्किटेक्ट यांचे सांगण्यानुसार सदर शाळेच्या वेटींग हॉलमधील जिन्याचे व खिडक्यांचे काचा तात्पुरत्या स्वरुपात काढण्यात आल्या व छतास असणारा डोम काढण्यात आला. त्यामुळे जवळपास ५०% प्रतीध्वनी कमी झाला आहे.

त्यानुसार पुणे येथील ॲकोस्टीकचे तज्ञ श्री. मिलींद रोंगे यांना बोलाविण्यात आले . त्यांनी सदर शाळेची पहाणी करुन दिनांक ०३ जानेवारी २००८ रोजी सदर पहाणीचा अहवाल ई.मेलव्दारे इकडील कार्यालयास पाठविला आहे. सदर अहवालामध्ये त्यांनी प्रतिध्वनीसाठी कारणीभुत ठरणारे कारणे व त्यावर असणारे उपाय सुचविले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**कारणे :-**

१. बाहेरच्या परिसरातील अतिध्वनी प्रदुषन
२. खोलींचा चुकीचा आकार व साईज
३. ॲकोस्टीकल शोषन कमी असणे व मोठा पॅरेलल सरफेस
४. चारही बाजुने बंदीस्त खोल्या व बोगदया प्रमाणे वंरडी.

**शिर्डी येथील शाळेबाबत त्यांनी खालील उपाय सुचविले आहे:-**

१. कॉरीडोरसाठी आर्मस्ट्रॉंग प्रायमाडयुन प्लस ॲक्रॉस्टीकल टाईल्सचे फॉल्स सिलिंग व ५० एम एम ग्लास वूल.
२. वेटींग हॉलचा डोम काढून त्यावर छत टाकणे व त्यास ४-५ फुटाची ओपनींग खिडकी ठेवणे, जेणेकरुन ध्वनी, हवा व प्रकाशाचे अवागमन होईल.
३. सदरचे छतास ॲनुटोन एन एस एस ॲकोस्टीकल टाईल्स ५० एम एम जाडीचे लावणे व तसेच ५० एम एम ग्लासवूल लावणे
४. वर्गखोल्यांसाठी आर्मस्ट्रॉंगची सिलींग व वर्गातील फळ्यांचे विरुध्द भिंतीस ॲनुरोन एन एस एस २५ एम एम ॲकॉस्टीकल पॅनलचे ट्रिटमेंट ग्लासवूलसह दयावी.

उपरोक्त चार गोष्टी सदरचे कन्सलटंट श्री. रोंघे यांनी शाळेसाठी करण्याचे सुचविले आहे. त्यांनी शिर्डी देवस्थानचा प्रकल्प असलेकारणाने कन्सलटींग फी घेण्यात येणार नाही व फक्त कामानिमित्त शिर्डी येथील भेटीसाठी पूर्ण-शिर्डी-पुणे असा कारव्दारे येणारा प्रवासखर्च आदा करावा असे नमूद केले आहे.या कामासाठी त्यांचेकडून सविस्तर अंदाजपत्रक व इतर सविस्तर स्पेशिफिकेशन्स घेता येतील.

तरी सदर कामास येणारे योग्य त्या खर्चास व श्री. मिलींद रोंघे यांचेकडून सेवा म्हणून काम करुन घेणेस तसेच सदर कामासाठी श्री मिलींद रोंघे यांना कारव्दारे येणारा प्रवासखर्च अदा करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. २६** **श्रीसाईबाबा हॉस्पिटलचे प्रशासनाबाबत.**
**निर्णय क्र.१३७** श्रीसाईबाबा हॉस्पिटलमधील प्रशासनाबाबत वारंवार मोठ्या प्रमाणात गंभीर तक्रारी येत आहेत. तसेच सदरहू हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी त्यामुळे संस्थान प्रशासनाची जनमानसातील प्रतिमा डागळली जात आहे. या सर्व बाबींचा विचार करुन निर्णय घेणेकामी मा.शंकरराव गेणूजी कोल्हे, मा.श्री पांडुरंग गमाजी अभंग, मा.श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे यांची समिती स्थापन करण्यात आली. या समितीने श्री साईबाबा हॉस्पिटलचा सर्वांगीण अभ्यास करुन अहवाल व्यवस्थापन समितीस सादर करावा असे ठरले.

(कार्यवाही-मा.विश्वस्त)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. २७** **दर्शन/आरती पासेससाठी आकार ठेवणेबाबत.**
**निर्णय क्र.१३८** संस्थानचे प्रचलित नियमावलीनुसार खालील प्रकारच्या व्यक्तींना जनसंपर्क कार्यालयाकडून दर्शन/आरती पास देण्यात येतात.

| अ.नं. | शिर्षक | तपशिल |
|---|---|---|
| ०१ | अतिमहत्वाच्या व्यक्ती | मा.राष्ट्रपती, मा.उपराष्ट्रपती, मा.पंतप्रधान, मा. सर्वोच्च न्यायालयाचे व उच्च न्यायालयाचे न्यायाधीश, मा.राज्यपाल, मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री व तत्सम, मा.जनरल,मा.ॲडमिरल, मा.एअर मार्शल |
| ०२ | महत्वाच्या व्यक्ती | मा.खासदार, मा.आमदार, मा.जि.प.अध्यक्ष व तत्सम |
| ०३ | वरिष्ठ सरकारी अधिकारी | मा.आय.ए.एस.,मा.आय.पी.एस.,मा.आय.आर.एस.,मा.आय.एफ.एस.व तत्सम, त्याचप्रमाणे सिनीयर कमिशनर मिलीटरी ऑफीसर्स. |
| ०४ | श्री साईबाबा संस्थानचे विश्वस्त | मा.विश्वस्तांचे पाहूणे व संस्थानचे माजी विश्वस्त व कुटुंबीय. |
| ०५ | देणगीदार | रु.५०,०००/- व त्यापेक्षा अधिक देणगी देणारे देणगीदार. |
| ०६ | वयोवृध्द | वय वर्ष ६५ व त्यापेक्षा अधिक वय असणा-या व्यक्ती व त्यांचे समवेत एक. |
| ०७ | आजारी व्यक्ती | सर्व प्रकारच्या दुर्धर आजाराने आजारी असणा-या व्यक्ती,गरोदर स्त्रिया,नवीन बाळंत<br>झालेल्या स्त्रिया व अपंग व्यक्ती.(समवेत ०२ व्यक्ती) |
| ०८ | महान साधुसंत | सर्व धर्माचे साधू संत. |
| ०९ | पत्रकार | ॲक्रीडीशन कार्ड धारक व वर्तमानपत्राचे व दुरचित्रवाहीन्यांचे कार्ड धारक. |
| १० | राजकीय व्यक्ती | सर्व अधिकृत राजकीय पक्षांचे जिल्हाध्यक्ष व त्यावरील पदस्थ व्यक्ती. |
| ११ | पदयात्री | फक्त दर गुरुवारी येणारे पंचक्रोशितील पदयात्री. |

| | | |
|---|---|---|
| १२ | भारतीय सेना दल | भारतीय सेना दलातील<br>जे.सी.ओ.,एन.सी.ओ.,बी.एस.एफ.,टी.ए.,आर.ए.एफ,<br>सी.आर.पी.,एस.आर.पी. |
| १३ | कार्यालयीन आदेशानूसार | मा.कार्यकारी अधिकारी साो.,मा.प्रशासकीय अधिकारी साो.यांचेकडून संस्थान संबंधीत येणारे पाहुणे. |
| १४ | दर्शन वेळा | सकाळी ०७.३० ते ११.००, दुपारी १३.३० ते १७.१५, सायं.१९.३० ते २१.१५ |

तथापि मंत्रालयातील विविध मंत्री महोदयांचे स्विय सहायक वरील नियमावलीनुसार पात्र नसलेल्या ब-याच व्यक्तींना त्यांचे सही असलेले शिफारस पत्र देतात.तरी मंत्रालयातील संबंधित सेक्रेटरी अथवा संबंधित खात्याचे जबाबदार अधिकारी यांनी आपले पत्रावर व्ही.आय.पी. ची पुर्ण माहिती दयावी व अशा पत्रावरच दर्शन/आरती पास दयावा.

महाराष्ट्र राज्यातील मा.आमदार व मा.खासदार स्वतः आले किंवा त्यांचे कुटुंबातील व्यक्ती आलेनंतर त्यांची दर्शन/आरतीची व्यवस्था जनसंपर्क कार्यालयामार्फत करण्यात येते. परंतू ब-याच लोकांकडे आमदार व खासदार यांची कोरी पत्रे असतात. तरी मा.आमदार व मा.खासदार यांना स्वतःसाठी व त्यांच्या हस्ताक्षरात त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींसाठी शिफारस पत्र असेल तरच दर्शन/आरती पास दयावा व त्यांच्या शिफारसपत्रावर इतर व्यक्तींना दर्शन/आरती पास देवू नये असे मत आहे.

महाराष्ट्र राज्याव्यतिरिक्त आंध्रप्रदेश व दिल्ली येथील ब-याच लोकांकडे त्या राज्यातील मा.मंत्री,मा.आमदार व मा.खासदार यांची शिफारस पत्रे असतात. तरी इतर राज्यातील मा.आमदार व मा.खासदार हे स्वतः दर्शनासाठी आले तर त्यांची दर्शन/आरती व्यवस्था करण्यात यावी व त्यांच्या शिफारसपत्रावर इतर लोकांना दर्शन/आरती पास देवू नये असे मत आहे.

जनसंपर्क कार्यालयामार्फत महत्वाच्या व अतिमहत्वाच्या व्यक्तींची दर्शन/आरतीची व्यवस्था वरील प्रचलित पध्दतीनुसार करण्यात येते. तथापि महत्वाच्या व अतिमहत्वाच्या व्यक्तींची दिवसेंदिवस दर्शनासाठी वाढणारी गर्दी व त्यामुळे सामान्य साईभक्तांची होणारी गैरसोय, तसेच दर्शन/आरती पासेसचे होणारे गैरप्रकार व त्यामुळे होणारे वादयाकरिता पासेससाठी आकार (चार्जेस) ठेवण्यात यावेत असे वाटते. यातून देणगीदार भक्तांची विशेष व्यवस्था करण्यात यावी.

**०१) आरती व्यवस्था :-**

श्रींचे आरतीसाठी सध्या खालीलप्रमाणे भाविक उभे राहू शकतात.

**०१.चांदीच्या खांबापासून ते जाळीच्या दरवाज्या पर्यंत**

दक्षिण बाजू व उत्तर बाजू — १६० व्यक्ती

२७' x ६' x २' = ३२४ चौ.फुट. (सध्याचे व्यवस्थेप्रमाणे स्त्री व पुरुष प्रत्येकी ८०)

**०२.जाळीच्या दरवाज्यापासून ते नंदी पर्यंत**

दक्षिण बाजू व उत्तर बाजू — १८० व्यक्ती

४०'x४'.६"x२'=३६० चौ.फुट (सध्याचे व्यवस्थेप्रमाणे स्त्री व पुरुष प्रत्येकी ९०)

**०३.विस्तारीत सभा मंडप -- मुख दर्शनद्वारा पर्यंत**

६२'x३५'=२१७० चौ.फुट — ४०० व्यक्ती एकत्रित

**०४.विस्तारीत सभा मंडप -- मुख दर्शन प्रवेशद्वार ते स्टेज**

१९'x२८'=५३२ चौ.फुट — ३०० व्यक्ती एकत्रित

३२'x३४'=१०८८ चौ.फुट

**अ)** समाधी मंदिरात जाळीच्या दरवाज्यापासून ते नंदी पर्यंत मधल्या जागेमध्ये सध्या भक्तांना उभे राहू दिले जात नाही.सध्या ४०'x९०'=३६० चौ.फुट या आकारमानाची जागा आज उपलब्ध आहे. या ठिकाणी अंदाजे ६० व्यक्ती आरती करीता बसू शकतील.त्यांचेकडूनही रु.१,०००/-प्रत्येकी आकार घेवून भक्तांना आरतीसाठी घेता येईल.

**ब)** अशा प्रकारे समाधी मंदिरातील चांदीच्या खांबापासून नंदीपर्यंत साधारणतः३४० व्यक्ती पैकी १०० विश्वस्तांचे,५० व्हि.आय.पी.,१०० सामान्य व ९० पासेस असा समावेश असावा.त्यामध्ये पासेस धारकांकडून प्रत्येकी रु.५००/-शुल्क आकारण्यात यावे.सदरच्या भक्तांना सामान्य व्यक्ती सोडून गुरुस्थान गेटने आरतीसाठी प्रवेश देण्यात यावा.

**क)** विस्तारीत सभा मंडपातील एकूण ७०० भक्तांपैकी २०० पास धारक असतील.त्यांचेकडून यासाठी रु.३००/-शुल्क आकारण्यात यावे.यामध्ये १०० विश्वस्तां करीता राखीव ठेवण्यात यावे व ४०० सामान्य भक्तांकरीता असतील.

उपरोक्तचा प्रस्ताव हा सर्वच आरत्यांकरीता सुचविण्यात येत आहे.

**०२) दर्शन व्यवस्था :-**

सध्या दर्शनाकरीता भक्तांसाठी गुरुस्थान गेट,अभिषेक गेट,अपंग व वयोवृध्दांसाठी उत्तरेकडील मुख्य गेट,व्हि.आय.पी.गेट व शनि मंदिर गेट या गेटचा वापर करण्यात येतो.दिवसेंदिवस वाढत असलेल्या गर्दीमुळे या सर्व गेट वरती मोठया प्रमाणात गर्दी होते. त्यामुळे गडबड,गोंधळ वाढला जावून दैनंदिन कामकाज कोलमडून पडते.याकरीता दर्शनासाठी खालीलप्रमाणे शुल्क आकारणी करुन व्यवस्था असावी असे वाटते.

| | |
|---|---|
| ०१. अभिषेक गेट | १००/- प्रत्येकी |
| ०२. व्हि.आय.पी.गेट | ५०/- प्रत्येकी |
| ०३. शनि गेट | ३०/- प्रत्येकी |

०४. उत्तर महाद्वार हे वृध्द, अपंग व्यक्तींकरीता राखीव व मोफत ठेवण्यात यावे.

०५. शिरडी ग्रामस्थांसाठी अभिषेक गेट वापरण्यात यावे व त्यासाठी सकाळी ८.३० ते ९.३० व सायंकाळी ८ ते ९ अशी वेळ निश्चित करावी. ग्रामस्थांच्या वेळे व्यतिरिक्त अ.नं.१ मध्ये नमूद केलेप्रमाणे दर आकारुन भक्तांना दर्शनासाठी सोडण्यात यावे.

०६. गुरुस्थान गेटचा वापर फक्त अतिमहत्वाच्या व्यक्तींकरीता करण्यात यावा.

उपरोक्त गेट नं.१,२ मधून सोडण्यात येणा-या भक्तांकरीता स्वतंत्र दर्शन लाईन ठेवण्यात यावी.दर गुरुवारी परिसरातून येणारे पदयात्री, वर्षभरात पालखी मधून येणारे पदयात्री व लष्कराचे जवान यांची दर्शनाची व्यवस्था विनाशुल्क शनि मंदिर गेटने करण्यात यावी असे वाटते.

उपरोक्त "**अ"** व "**ब** मध्ये नमूद केलेप्रमाणे आकार आकारुन आरती व दर्शन व्यवस्थेबाबत प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, याबाबत मा.विश्वस्तांचे अभिप्राय घेऊन सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे पूढील सभेपूढे सादर करावा असे ठरले. (कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२८** **"साईनिकेतन (दादर, मुंबई) " इमारतीचे नव्याने बांधकाम करणेबाबत.**

**निर्णय क्र.१३९** **"**साईनिकेतन" इमारतीचे नव्यान बांधकाम करणेबाबत (जास्त एफएसआय मिळण्याचे दृष्टीने) आजचे सभेत मा.अध्यक्ष महोदय यांनी चर्चा केली. त्यामूळे खालील प्रमाणे माहिती देण्यात आली.

**(अ)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था,शिर्डी यांची मुंबई येथील कार्यालयाची " **साईनिकेतन** " ही जुनी इमारत पाडून, त्या ठिकाणी अद्यायवत अशी नवीन विस्तारीत इमारतीचे बांधकाम प्रस्तावित आहे. याकामी अंदाजपत्रकासह बांधकाम आराखडा तयार करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०२ ऑक्टोबर, २००५ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ६१७ अन्वये ऑरगॅनिक्स, मुंबई (आर्किटेक्ट श्री.राहुल पी. आंबेकर) या संस्थेची नेमूणक करण्यात आलेली आहे.

तसेच, मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १४ ऑक्टोबर, २००६ रोजीचे सभेतील निर्णयान्वये, ऑरगॅनिक्स, मुंबई (आर्किटेक्ट श्री.राहुल पी. आंबेकर) या संस्थेस त्यांचे दिनांक ०९ सप्टेंबर, २००६ रोजी ई-मेल पत्राव्दारे नियोजित नवीन " **साईनिकेतन** " या इमारतीचे विकसन करणे, इमारतीचे बांधकाम आराखडे तयार करणे, बांधकाम आराखड्यांना महानगरपालिकेच्या संबंधित विभागांची मंजुरी मिळवणे, अंदाजपत्रक तयार करणे, विहित पद्धतीने निविदा तयार करून बांधकाम ठेकेदाराची नेमणूक करणेकामी मार्गदर्शन करणे, प्रकल्प सुरू झाल्यापासून संपेपर्यंत त्यावर नियंत्रण व देखरेख ठेवणे व इतर अनुषंगिक सेवा पुरविणे याकामी प्रकल्पाच्या एकूण किंमतीच्या ०३ (तीन) टक्के आर्किटेक्ट फी देणेबाबत मान्यता मिळालेली आहे.

तद्नुसार, ऑरगॅनिक्स, मुंबई (आर्किटेक्ट श्री.राहुल पी. आंबेकर) यांचेशी दिनांक ०८ नोव्हेंबर, २००६ रोजी करारनामा करण्यात आलेला आहे.

**(ब)** ऑरगॅनिक्स, मुंबई (आर्किटेक्ट श्री.राहुल पी. आंबेकर) यांनी "**साईनिकेतन** " या इमारतीचे संपूर्ण रित्या विकसन व विस्तारीकरण करणेकामी प्रत्यक्ष जागेची पहाणी करून बांधकाम आराखडे तयार करून सादर केलेले आहेत.

याच अनुषंगाने, साईनिकेतन या इमारतीमध्ये व आऊट हाऊसमध्ये राहणाऱ्या भाडेकरुंची प्राथमिक चर्चेची बैठक दिनांक २४ जुलै, २००७ रोजी मुंबई येथील कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. सदरील सभेस मा.अध्यक्षसो., श्री.राहुल आंबेकर, आर्किटेक्ट, श्री.शानभाग, ॲडव्होकेट, कार्यालय अधिक्षक, मुंबई कार्यालय व एकूण ०९ भाडेकरु या बैठकीस हजर होते.

या बैठकीत, आर्किटेक्ट आंबेकर यांनी उपस्थितांना साईनिकेतन इमारतीचे नवीन बांधकामाबाबतचे सर्व आराखडे समजावून सांगितले. आर्क्टिटेक्ट यांनी सादर केलेल्या बांधकाम आराखडयास भाडेकरुंनी संमती दर्शविली, उपस्थित सर्व भाडेकरुंनी सध्या त्यांचे ताब्यात असलेल्या कार्पेट एरियापेक्षा जास्त म्हणजे २५ टक्के कार्पेट एरिया वाढून मिळणेबाबतची विनंती मा.अध्यक्षसो.

यांचेकडे केली. तथापि, मा.अध्यक्ष महोदय यांनी सदरील विनंतीस नकार देऊन, कार्पेट एरिया वाढवून मिळणार नाही, असे स्पष्ट केले. त्यानंतर भाडेकरुंनी प्रस्तावित केलेल्या बांधकाम आराखडयानुसार, आकारात बदल न करता टेरेससह फ्लॅट दिल्यास मान्य राहील असे सांगितले. तसेच भाडेकरुंनी साईनिकेतन इमारतीच्या विकसन व विस्तारीकरणाच्या दरम्यान, भाडेकरुंना सहा मोठे फ्लॅटस् व तीन लहान फ्लॅटस् मधून तात्पुरती निवाऱ्याची जागा म्हणून मिळणेबाबतचा प्रस्ताव दिला. हा प्रस्ताव थोडक्यात खालीलप्रमाणे :

०१. इमारतीचे बांधकाम ३० महिन्यांचे आंत पूर्ण व्हावे. पुर्नःविकासाच्या काळात ट्रॉन्झीट कॅम्पच्या नियमाप्रमाणे भाडेकरुंना भाडे द्यावे. सध्याच्या बाजारभावाप्रमाणे चालू असलेल्या दराने म्हणजे मोठया फ्लॅट करीता रुपये ६०/- प्रति चौरस फुट किंवा प्रत्येक फ्लॅटकरीता रुपये १,२५,०००/- मात्र प्रति महिना द्यावा. यामध्ये वाहतूक, स्थलांतर, मुद्रांक शुल्क व इतर सर्व खर्चाचा समावेश आहे. याच प्रमाणात लहान फ्लॅटस् करीता भाडेकरुंना भाडे आदा करण्यात यावे.

०२. सदरचे भाडे भाडेकरुंनी फ्लॅट खाली करुन दिलेल्या दिवसापासून ते नवीन बांधकाम झालेल्या इमारतीत नवीन फ्लॅटचा ताबा मिळेपर्यन्त आदा करण्यात यावे.

०३. सदरील भाडे १५ महिन्यांचे आगाऊ मिळावे अथवा १५ महिन्यांचे बँकेचे धनादेश द्यावेत.

०४. या भाडेकरुंची सोसायटी म्हणून नोंद केल्यानंतर रुपये २५ लाख मात्र मोठया फ्लॅटसाठी व त्याच प्रमाण लहान फ्लॅटसाठी कार्पोस फंड मिळावा, अशी विनंती केली.

यावर मा.अध्यक्षसाो. यांनी मा.व्यवस्थापन समितीचे सभेत याबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेण्यात येईल, असे सांगितले.

तसेच, आर्किटेक्ट यांनी बांधकाम आराखडयाची माहिती देतांना असे निदर्शनास आणून दिले की, सध्याचे इमारतीचे बांधकाम एकूण सुमारे १६३६४.५२ चौरस फुट आहे. प्रस्तावित बांधकाम अंदाजे २९१२३.४३ चौरस फुट इतके होईल. प्रस्तावित बांधकामात तळमजल्यावर हॉल, १ ते ५ माळे कार पार्किंग लिफ्टसह, ६ ते ९ माळयावरती संस्थान करीता बहुउद्देशीय हॉल, १० व्या माळयावरती संस्थान कार्यालय, ११ व्या माळावरती संस्थान अतिथीगृह, १२ ते १८ माळयावर भाडेकरु असा साधारणतः प्रस्ताव आहे.

मा.अध्यक्ष महोदय यांनी सदरहू बैठकीतील चर्चेची माहिती आजचे सभेत उपस्थित सदस्यांना दिली. आजचे सभेत सदरच्या प्रस्तावास तत्वतः मान्यता देण्यात आली. या इमारतीचे बांधकामाबाबत सर्वंकष अटी शर्तीसह प्रस्ताव तयार करावा, या प्रस्तावाबाबत कायदेशीर बाबी तपासून पुढील कार्यवाही करण्यात यावी, असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२९** **पवनहंस हेलिकॅप्टर लि.नवी दिल्ली यांचे शिर्डी येथे हेलिकॅप्टरसेवा सुरु करणेचे विनंतीबाबत**

**निर्णय क्र.१४०** पवनहंस हेलिकॅप्टर लि.नवी दिल्ली यांचे शिर्डी येथे हेलिकॅप्टर सेवा सुरु करणेबाबत व्यवस्थापन समितीचे दिनांक २८.७.२००७ चे सभेत निर्णय क्र.५३० अन्वये चर्चा झाली होती. पवनहंस हेलिकॅप्टर यांचेमार्फत हेलिकॅप्टर सेवा लवकर सुरु करणेस परवानगी मिळणेबाबत तगादा सुरु आहे. या क्षेत्रात स्पर्धा होण्याचे दृष्टीने सविस्तर चर्चा होऊन, पवनहंस हेलिकॅप्टर लि.नवी दिल्ली यांना शिर्डी येथे संस्थानचे हेलिपॅडवर हेलिकॅप्टरव्दारे हवाई सेवा सुरु करणेस मान्यता देण्यात आली. याबाबतचा सविस्तर प्रस्ताव त्यांचेकडून घेण्यात यावा. यापूवी जगसन एअरलाईन्स नवी दिल्ली यांचेशी झालेला करारनामाबाबत कायदेशिर अभिप्राय घेऊन त्यानुसार पूढील कार्यवाही करण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

वरील निर्णय क्र ०१ ते १४० सर्वानुमते घेण्यात आले आहेत.

यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| (भाऊसाहेब रा.वाकचौरे) | (जयंत मुरलीधर ससाणे) |
| कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |
| श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती,शिर्डी | श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती,शिर्डी |